# विदेश संचार आणि मुक्त चिंतन



REFBK-0029497

डॉ. वि. रा. करन्दीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
अ. क्र. ८७९
२९४९७
५।६।९८
शाखा (स्थान)

रजि नं. ८५८७१ / संदर्भ
संदर्भ
भू-प्रवास
८७९
२९४९७
५।६।९८

# विदेशसंचार आणि मुक्त चिंतन

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे**

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

| | |
|---|---|
| ७।७।९८ | २०।२।९९ |
| १८।७।९८ | २०।३।९९ |
| २५।७।९८ | १७।४।९९ |
| २६।७।९८ | २८।४।९९ |
| ८।८।९८ | १९।५।९९ |
| २२।८।९८ | ३।६।९९ |
| २६।९।९८ | ७।९।९९ |
| १४।१०।९८ | 23।10।99 |
| १४।११।९८ | 30।10।99 |
| २९।११।९८ | १६।११।९९ |
| ३०।१।९९ | |

(कृ.मा.पहा.)

१६०००/११-९५

स्नेहल- ..... २०६

---

प्रकाशक-मुद्रक
सौ. अंजली रवींद्र घाटपांडे
स्नेहल प्रकाशन
३६ ब, गुरुदत्त सहवास,
दक्षिणमुखी मारुतीजवळ, ४७०/ ४९८ शनिवार पेठ,
पुणे ४११०३०. दूरध्वनी-४५२९११

© डॉ. वि. रा. करन्दीकर

मुखपृष्ठ मांडणी-अनिल उपळेकर

प्रथम आवृत्ती- १२ मार्च १९९८
टाईपसेटिंग-स्नेहल प्रकाशन, पुणे ३०

मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०

---

मूल्य २००/- रुपये

*ज्याने माझ्यावर अखेरपर्यंत निरपेक्ष प्रेम केले,*
*आणि*
*मी या प्रवासात असताना*
*ज्याने या जगाचा अकस्मात निरोप घेतला,*
*तो माझा एक सात्त्विक वर्गमित्र*
*प्राचार्य प्रभाकर सबनीस*
*याच्या स्मृतीस*

## *डॉ. वि. रा. करन्दीकर*

## *यांची ग्रंथसंपदा*

वामनपंडितांची यथार्थदीपिका — -आवृत्ती संपली

★ भगवद्‌गीतेचे तीन टीकाकार — -आवृत्ती संपली

ग्रंथवेध

★ रामकृष्ण आणि विवेकानन्द - आवृत्ती दुसरी

समर्थ रामदास - आवृत्ती संपली

★ ज्ञानदेवांचा आत्मसंवाद

सांस्कृतिक संचित - आवृत्ती संपली

रामकृष्ण संघ - एक शतकाची वाटचाल

★ ज्ञानेश्वरीदर्शन

★ वेध ऋणानुबंधांचा

ज्ञानदेवांचा गीतासंवाद

ज्ञानदेव : विवेकानन्द

विदेशसंचार आणि मुक्त चिंतन

★ (महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार)

---

आकाशभाषिते, पुणे आकाशवाणी

एकतरी ओवी ज्ञानेशांची, सहलेखक डॉ. हे. वि इनामदार. आवृत्ती दुसरी

साक्षेप समर्थांचा, सहलेखिका कल्याणी नामजोशी

एका जनार्दनी, सहलेखिका कल्याणी नामजोशी

समर्थ रामदास · विवेकदर्शन, संपादन

रामकृष्ण आणि विवेकानन्द, इंग्रजी भाषांतर, प्रा. म. द. हातकणंगलेकर

समर्थ रामदास, कानडी भाषांतर प्रसिद्ध झाले आहे.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | विषयानुक्रमणिका | सहा |
| | प्रवास आणि प्रतिसाद - प्रास्ताविक | नऊ |
| १. | प्रवासाची ओढ | १ |
| २. | ही इंग्लडची भूमी | २३ |
| ३. | शेक्सपियरच्या गावा जावे | ४७ |
| ४. | ग्रीन पार्क आणि पार्लमेंट हाउस | ६४ |
| ५. | सेट पॉल्स आणि टॉवर ऑफ लडन | ९३ |
| ६. | डिकन्सचे घर आणि वेदान्त सेंटर | १११ |
| ७. | व्हॅली फोर्जचा परिसर | १३२ |
| ८. | राजधानी वॉशिंग्टन | १४६ |
| ९. | कॅलिफोर्नियातील विवेकानन्दाच्या पाऊलखुणा | १९१ |
| १०. | अटलांटिकच्या तीरावर | २१३ |
| ११. | राष्ट्रसघ आणि वेदान्तकेन्द्र | २३८ |

# विषयानुक्रमणिका


**१. प्रवासाची ओढ**

प्रवास आणि इतिहास - १ / निसर्गसौन्दर्याचा आनंद - ४ / वृक्ष, नदी, आणि पर्वत - ९ / देश आणि विदेश - १३/ परदेशगमनाचा योग - १८

**२. ही इंग्लंडची भूमी**

इतर राष्ट्रांची सावधानता - २३ / मध्यमसे आसन, छोटीशी खिडकी - २६ / लंडनच्या विमानतळावर - २९ / इंग्लंडचा साम्राज्यकालीन दरारा - ३२/ हिटलरचे भयावह संकट - ३४/ चर्चिलचे युद्धकालीन नेतृत्व - ३६ / इंग्लंडचा चर्चिल आणि भारताचे जवाहरलाल - ४३

**३. शेक्सपियरच्या गावा जावे**

श्रेष्ठ नाटककार शेक्सपियर - ४७ / शेक्सपियरच्या शोकांतिका - ४९ / भारतीय साहित्य आणि शोकांतिका - ५१/ शेक्सपियरचे निवासस्थान - ५६ / लीड्समधील स्वच्छता आणि नीटनेटकेपणा - ६१

**४. ग्रीन पार्क आणि पार्लमेंट हाउस**

व्हिक्टोरिया स्थानकावरून ईस्ट क्रॉयडन - ६४ / प्रवासातील मर्यादा - ६७ / बकिंग -हॅम पॅलेससमोर - ६९ / आठवा एडवर्ड आणि आजचा चार्ल्स - ७२ / उघड्यावरचे शृंगारिक चाळे - ७६ / पॅलेस आणि पार्लमेंट - ८१ / भारताची समृद्ध संस्कृती - ८७ / इतिहासाचा वारसा आणि इंग्रज माणूस - ८९

**५. सेंट पॉल्स आणि टॉवर ऑफ लंडन**

सेंट पॉल्स कॅथेड्रल - ९३ / फ्रॅन्सिस बेकनचा ग्रंथ - ९७ / महाराष्ट्रातील भुईसपाट किल्ले - ९८ / व्हाइट टॉवर आणि ट्रेटर्स गेट - ९९ / इतिहासातील उलटसुलट घटना - १०१/ मुकुट, अलंकार, आणि इतिहासदर्शन - १०३/ इंग्रजांची ज्ञानलालसा - १०५/ ब्रिटिश म्युझियम - १०८

### ६. डिकन्सचे घर आणि वेदान्त सेंटर

डिकन्स आणि त्याचा सिडने कार्टन - १०१/ फ्रेंच राज्यक्रांती आणि एडमंड बर्क - ११३/ क्राती, प्रगती आणि सस्कृती - ११६ / राजकीय पृष्ठभूमीवरील कादंबऱ्या - ११९ / इंग्लडमधील रामकृष्ण वेदान्त सेंटर - १२१/ ''वनशोभेची खाणी उघडे ।'' - १२३/ मानवमात्रात गुंतलेले विवेकानन्द - १२५/ डांटेची ''डिव्हाइन कॉमेडी'' - १२८

### ७. व्हॅली फोर्जचा परिसर

आमिश आणि दिव्यांची मिरवणूक - १३२ / ज्ञानेश्वरीच्या निमित्ताने डलासला - १३५ /.स्वातंत्र्ययुद्धाच्या सिद्धतेचा परिसर - १३८/ कार्पेटर्स हॉल आणि इडिपेंडन्स हॉल - १४१/ समकालीन भारतातील स्थिती - १४३/ पिट, चॅथॅम, आणि एडमंड बर्क - १४५

### ८. राजधानी वॉशिंग्टन

जगातील महासत्तेचे केन्द्रस्थान - १४५ / जॉर्ज वॉशिंग्टनचे नेतृत्व आणि लोकप्रियता - १५२ / गुलामगिरी आणि वंशसंहार - १५४ / भारतातील सहिष्णुता आणि समावेशकता - १५८/ दोन विस्तीर्ण परिसर - १४१/ दफनभूमी आणि सजीव सृष्टी - १६४ / अनंत अवकाशाचा शोध - १६७ / अंतरिक्ष / संशोधनाचे दर्शन - १६९ / जडाचा शोध आणि चैतन्याचा वेध - / १७२ / रशिया आणि अमेरिका - १७७ / प्रगती आणि कार्यक्षमता - १७९ / केनेडीचा अंतिम क्षण - १८१/ सी आय ए आणि जागतिक शांतता - १८५

### ९. कॅलिफोर्नियातील विवेकानन्दांच्या पाऊलखुणा

होलीवुडची वेदान्त सोसायटी - १९१/ पॅसाडेना येथील विवेकानन्द हाउस -१९३ / डागरावरील वणवा आणि शहरातील मंदिर - १९५ / स्वामी स्वाहानन्द यांच्याशी सवाद - १९७ / पॅसिफिकच्या तीरावरील सांता बार्बरा - १९९ / सॅनफ्रॅन्सिस्कोचे स्वामी प्रबुद्धानन्द २०१/ मेरी ल्युई बर्क याची भेट - २०४ / मेरी बर्क यांचे अमोल कार्य -२०७ / कॅप टेलर आणि ओकलंड -२१०

### १०. अटलांटिकच्या तीरावर

चद्राचे किरण आणि दिव्याची रागोळी -२१३/ सर्वधर्मपरिषदेचे स्थान -२१५ / शिकागोतील कोजागिरी पौर्णिमा - २१९/ मित्रांच्या भेटी आणि गप्पागोष्टी - २२०/ ऑनिस्क्वमधील विवेकानन्द - २२४ / विदेशातील भारतीयांपुढचा यक्षप्रश्न - २२६ /

स्वावलबन आणि अपरिपक्वता - २३१ / मुक्त शृंगार आणि प्रेमाचा शोध - २३४

**११. राष्ट्रसंघ आणि वेदान्तकेन्द्र**

स्वातन्त्र्यदेवीचा पुतळा आणि कन्याकुमारीचे शिलास्मारक - २३८/ जागतिक पातळीवरील राष्ट्रसघ - २४१/ राजकीय स्वार्थ आणि मानवाचे कल्याण - २४३ / संहारक अण्वस्त्रांचे भीषण सावट -२४५ / ''मा विद्विषावहै । '' -२४७ / वेदान्तकेन्द्र आणि व्यासाचा आक्रोश - २५०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
श्री-प्रवास
दा. क.
ग्रंथ शाखा

# प्रवास आणि प्रतिसाद

## प्रास्ताविक

इंग्लंड आणि अमेरिका या दोन देशांचा जवळजवळ पावणेदोन महिन्यांचा जो प्रवास मी १९९६-च्या सप्टेंबर महिन्याच्या अखेरीपासून केला, तो केवळ एक योगायोग होता. एका तरुण मित्राचा त्यात पुढाकार होता. माझ्यावर मनापासून लोभ करणारे पुढच्या पिढीतील तसेच आणखी काही तरुण या दोन देशांत काही ठिकाणी होते. एकदोन ठिकाणी कुटुंबियांपैकी कोणीकोणी होते. या सर्वांनी माझी त्या त्या ठिकाणाची सारी व्यवस्था अतिशय जिव्हाळ्याने आणि मनःपूर्वक केली. त्यामुळे हा सारा प्रवास सुखाचा होऊन गेला, हे कृतज्ञतापूर्वक नमूद करावयास हवे. हे नमूद करण्यात कोणताही औपचारिकपणाचा भाव नाही. कारण या सर्वांकडून मिळालेले साहाय्य ही वस्तुस्थिती आहे. या सर्वांचा हा आपुलकीचा साहाय्याचा हात नसता, तर मी हा प्रवास करू शकलो नसतो. असा स्नेह लाभणे ही आयुष्यातील एक भाग्याची गोष्ट आहे, एवढेच या संदर्भात म्हणता येते. बेलूर मठातील रामकृष्ण संघाचे कार्यवाह, स्वामी स्मरणानन्द यांनी एक परिचयपत्र दिले होते. त्यामुळे विदेशातील वेदान्तकेन्द्रे दृष्टीखालून घालणे अतिशय सुलभ होऊन गेले. त्यांना द्यावेत तेवढे धन्यवाद थोडे आहेत.

आणखी एक स्नेहल धागा यामध्ये सहजपणे गुंफला गेला आहे. माझे एक मित्र श्री. रवीद्र घाटपांडे यांना माझ्या लेखनाबद्दल विशेष आस्था आहे मी परदेशी चाललो आहे असे समजल्यावर त्यांनी मला म्हटले, "त्या त्या वेळी तुमच्या मनात जे काही येईल, त्याची नोंद करून ठेवा." प्रवास संपवून मी परत आल्यावर ते म्हणाले, " या तुमच्या प्रवासाचा वृत्तात देणारं एक पुस्तक तुम्ही लिहावं." मी त्यांना म्हटले, "माझे अनुभव आणि प्रतिक्रिया अधिकांशानं वैचारिक स्वरूपाच्या आहेत" ते म्हणाले, "ते जे काही असेल ते असेल, ते तुम्ही लिहावं." त्यांचा आग्रह मनापासून होता. त्यानी हा आग्रह केला नसता, तर या लेखनाकडे वळण्याचे माझ्या मनातही आले नसते. कारण अशी प्रवासवर्णनपर कितीतरी पुस्तके आतापर्यंत मराठीत लिहिली गेली आहेत. हे पुस्तक माझ्याकडून लिहिले गेले, याचे सारे श्रेय घाटपांडे यांना आहे

हे प्रवासवर्णन असले, तरी जी स्थळे पाहिली त्याच्या वर्णनाकडे येथे फार थोडे लक्ष दिले आहे. ती ती स्थळे पाहताना मागच्या आयुष्यातील काही आठवणी जाग्या झाल्या,

काही वेळा मन इतिहासाच्या प्रदेशात फिरून आले. आणि आपल्या देशाच्या भागधेयाशी त्या स्थळाचे व त्यांच्या दर्शनामुळे आठवलेल्या प्रसगाचे काही नाते जाणवले पाश्चात्त्याच्या राहणीचे आणि व्यवहारांचे दर्शन तर सर्वत्र घडले, नियतकालिकांतील काही लेख डोळ्याखालून गेले, तेथे भेटलेल्या अनेक मराठी माणसांशी संवाद झाले, आणि या साऱ्यांचा जो प्रतिसाद मनात उमटला, त्याला येथे अधिक स्थान मिळाले आहे. यांतील काहीही जाणीवपूर्वक वा योजनापूर्वक केलेले नाही जो सहज हुंकार मनात उमटला, तो कागदावर उतरला आहे. त्या साऱ्याला कोणतेही एकच एक सूत्र नाही. वृत्तांतात वा प्रतिक्रियेत काही क्रमबद्धता असावयास हवी असे मानलेले नाही. हा संचार जितका मुक्त होता, तितकेच त्यावरील चिंतनही मुक्तपणाने झालेले आहे. त्याला काळाचे वा विषयाचे कोणतेही बंधन ठेवलेले नाही.

कोठे भारताचे पारतंत्र्याचे दिवस आठवले, कधी स्वातंत्र्यानंतरचा काळ डोळ्यासमोर उभा राहिला, तर केव्हातरी गेल्या शतकाच्या अखेरीस स्वामी विवेकानन्दानी आधुनिक पाश्चात्त्य जगाला भारताची जी ओळख करून दिली तिची आठवण झाली. भूतकाळ आणि वर्तमानकाळ हे दोन्ही येथे कसेही सरमिसळ आले आहेत. कोठे राष्ट्राराष्ट्रांतील कलह डोकावला आहे, तर कोठे विज्ञानातील शोधाची नवी दिशा कोणती आहे याकडे चित्त वळले आहे. प्रवास चालू होता, नाना प्रकारच्या गोष्टी दृष्टीसमोर येत होत्या, आणि त्यांना जमेल तसा प्रतिसाद मन देत होते. हे जसे घडत गेले, तसेच येथे शब्दबद्ध केलेले आहे. अशा प्रकारच्या लेखनात लेखकाच्या विशिष्ट दृष्टिकोणाचा आणि त्याच्या मनावर झालेल्या संस्काराचा ठसा उमटणे अपरिहार्य आहे आपण या सर्व विषयांचा सखोल अभ्यास केलेला नाही, हे ध्यानात होते पण तरी जे काही समोर येत गेले, त्याला मनाचा काही ना काही प्रतिसाद मिळत राहिला. तो प्रतिसाद येथे तसाच राहू दिला आहे. त्यावर संस्कार करण्याचा किंवा त्याला अधिक अभ्यासाची जोड देण्याचा प्रयत्न केलेला नाही.

येथे व्यक्त झालेली मते व विचार हे परिपूर्ण आणि परिपक्व अशा अभ्यासाचे फलित आहे, असे मानण्याचे कारण नाही. कोठे काही घटनाचा अन्वयार्थ लावला गेला आहे, तर कोठे त्याची काही कारणमीमासा केली गेली आहे कोठे भावनिक आविष्कार उत्स्फूर्तपणे प्रकट झाला आहे कोठे निसर्गातील सौन्दर्याच्या दर्शनाने मन अतिशय प्रसन्न होऊन गेले आहे तर कोठे आपल्या देशाच्याच नव्हे तर अवघ्या मानवजातीच्या भवितव्याचा विचार येऊन गेला आहे, आणि क्वचित कोठे विश्वाच्या एकूण अस्तित्वाच्या शोधात त्याच्या अनतत्वाचा काही थांग न लागल्यामुळे बुद्धी परत फिरली आहे. हे सारे करण्याचा अधिकार आपल्याला आहे, असा भ्रम लेखकाच्या मनात नाही. पण मनात आले ते वाचकासमोर ठेवण्याची मोकळीक त्याच्या सौजन्याच्या आधारावर घेतली आहे. या प्रतिसादाला कोणाचाही

कोणत्याही स्वरूपाचा प्रतिसाद असू शकेल. येथे जे व्यक्त झाले आहे त्यातील चुकीचे काय आणि बरोबर काय, योग्य कोणते आणि अयोग्य कोणते, काय स्वीकारार्ह आहे आणि काय बाजूला ठेवण्यासारखे आहे, याचा निर्णय वाचकांनी आपापल्या दृष्टिकोणानुसार करावयाचा आहे. हे सारे लिहीत असताना ज्याचे जे श्रेय आहे ते त्याला मोकळेपणाने देण्याचा प्रयत्न केलेला आहे. ते करताना आपला वा परका, किंवा पाश्चात्त्य वा भारतीय असा कोणताही भेदभाव केलेला नाही. त्यातूनही अनवधानाने काही उणेअधिक लिहिले गेले असेल, तर लेखक क्षमाप्रार्थी आहे.

अशा लेखनात आधारभूत ग्रंथांचा संबंध येत नाही, आणि सूची देण्याची जरुरी नसते. पुस्तकाच्या प्रारंभी सविस्तर विषयानुक्रमणिका दिलेली आहे. तीवरून कोठे कोणता विषय आला आहे. हे समजण्यास साहाय्य होईल.

पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करण्याचे कष्टाचे काम माझा धाकटा भाऊ दिगंबर, - दत्तक गेल्यामुळे नाव प्रा. वामन रामचन्द्र शिदोरे - याने आनंदाने केले आहे. त्याची शोधक नजर मजकुरावरून फिरल्यामुळे लेखन अधिक निर्दोष होण्यास साहाय्य झाले आहे. स्नेहल प्रकाशनाच्या संचालिका सौ. अंजली रवीन्द्र घाटपांडे यांनी प्रकाशनाची जबाबदारी तत्परतेने स्वीकारली. सुबक मुद्रणाचा भाग स्मिता प्रिंटर्सचे श्री. बापट आणि त्यांचे सहकारी यांनी उचलला. मुद्रणात चूक राहू नये हे किचकट काम श्रीमती वझे यांनी दक्षतापूर्वक केले. चित्रकार अनिल उपळेकर यांनी सुंदर मुखपृष्ठाच्या द्वारा पुस्तकाला सौन्दर्याची जोड दिली. असे सर्वांचे हात लागतात, तेव्हा आपले लेखन वाचकांपर्यंत पोचते, हे कसे विसरता येईल? या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

हुताशनी पौर्णिमा, शके १९१९
दिनांक बारा मार्च १९९८

**वि. रा. करन्दीकर**

विनायक रामचन्द्र करन्दीकर
१३, क्षिप्रा सहनिवास, कर्वेनगर
पुणे - ४११०५२

विस्तीर्ण विश्वरूपी उद्यान हे सुरम्य
निर्माण हो प्रभूच्या लीलेतुनी अगम्य ।
शोभे तरू विशाल ही त्यात सूर्यमाला
लतिका तयावरील अवनी गमे मनाला ॥

निजलोचनी प्रभूची करणी पहावयासी
ब्रह्माण्ड धुंडणारा मी हा असे प्रवासी ।
युगकाल लोटुनीया गेले कितीक जात
मी हिंडतो कधीचा प्रभुची कृती पहात ॥

देखूनि भव्य शोभा नेत्री वसुंधरेची
वांछा मनी उदेली येथे रहावयाची ।
सौन्दर्य पाहण्यात दिन चार घालवूनी
तोषूनिया अखेर जाईन मी निघूनी ॥

# १. प्रवासाची ओढ

माणसाला आयुष्यामध्ये निर्भेळ आनंद देणाऱ्या आणि त्याच वेळी त्याच्या ज्ञानात व अनुभवात भर घालणाऱ्या ज्या काही थोड्या गोष्टी आहेत, त्यांत प्रवासाचा अंतर्भाव करावा लागेल. असाच उल्लेख विविध विषयांवरील उत्तम वैचारिक ग्रंथ किंवा मानवी जीवनातील अनुभवांच्या थेट तळाशी घेऊन जाणारे ललित वाङ्मय यांच्या वाचनाचा करता येईल. आपला हा भारत त्या दृष्टीने एक समृद्ध देश आहे. येथे उपनिषदे आणि इतर तत्त्वज्ञानपर ग्रंथ आहेत, तशीच काही शतके भर पडत आकाराला आलेली रामायण-महाभारत यांसारखी आणि कालिदासासारख्या महाकवीने लिहिलेली रघुवंश आणि कुमारसंभव यांसारखी महाकाव्ये आहेत. याहून निराळ्या प्रकारच्या इतर अनेक ग्रंथांचा असाच उल्लेख करता येईल.

## प्रवास आणि इतिहास

भारताचा साडेतीनचार हजार वर्षांचा इतिहास हा एक अमोल खजिना आहे. हा भारतीय समाज कसा घडत आला, आणि कालाच्या ओघात उत्कर्ष व अपकर्ष यांचे कालखंड कसे येत गेले, यांचे दर्शन आपण घेऊ शकलो; तर केवळ वर्तमानकालीन घटनांत सर्वस्वी गुंतून राहणाऱ्या आपल्या मनाला त्या बऱ्यावाईट गोष्टींची मुळे सुदूर भूतकालात कशी दडलेली आहेत हे समजू शकेल, आणि त्यायोगे आपल्या विचारांना व चिंतनाला एक विशाल परिमाण लाभेल. याच प्रक्रियेला अनुसरून आज या देशात जे काही घडत आहे त्याला कोणती दिशा दिली गेली, तर पुढील शेंदोनशे वर्षे उलटल्यावरचा भविष्यकाल उज्ज्वल होईल, याचा विचार करता येईल.

हा आपला विशाल भारत एकीकडे निसर्गाची नाना रूपे दाखवणारा आहे, त्याचबरोबर भिन्न भिन्न वैशिष्ट्ये असलेले नाना लोकसमूह शतकाशतकांच्या वाटचालीतून एका विशाल सांस्कृतिक छत्राखाली सामावून घेत आला आहे. हे सारे पाहताना आपले मन विस्मित होते व अंतमुर्खही होते. आजवर जे काही घडत आले ते सारेच चागले होते असे नाही. त्यात कितीएक गोष्टी अशा आहेत की, त्यांच्या स्मरणानेही सुसंस्कृत माणसाची मान शरमेने खाली

जाईल. पण त्याच वेळी असेही काही आहे की, ज्यामुळे तीच मान पुन्हा उंच होईल जे वाईट आहे ते नष्ट कसे होईल, आणि जे चांगले आहे ते साऱ्या समाजापर्यंत कसे पोचवता येईल, याची चिंता विचारवंतांनी वाहावयास हवी. पण हे कसे साधता येईल हे समजून घेण्यासाठी हा देश पाहिला पाहिजे, आणि त्याच्या इतिहासावर दृष्टीही टाकली पाहिजे

गेल्या तीनचार हजार वर्षांत जगातील नाना देशांत जे काही घडत आले, त्याची माहिती याच्या जोडीने आपण करून घेतली, तर आपल्या विचाराला एक निराळे खाद्य मिळते, आणि त्यातून सहज होत राहणाऱ्या चिंतनाला नव्या दिशा प्राप्त होतात. आपला महाराष्ट्र हा जसा भारताचा एक प्रांत आहे, तसाच आपला भारत हा समग्र मानवजातीचा एक भाग आहे. पृथ्वीच्या पाठीवर नांदत आलेल्या या मानवकुळातील निरनिराळ्या राष्ट्रांमध्ये भारत कोठे आहे आणि समग्र मानवसंस्कृतीमध्ये तो कोणती वैशिष्ट्यपूर्ण भर घालू शकतो, येथवर ज्याला जगाच्या इतिहासाचे भान असते अशा विचारी माणसाचे मन स्वदेशाचा विचार करताना जाऊन पोचते. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या Discovery of India या ग्रंथाची येथे सहज आठवण होईल. त्यांनी जगातील नाना देश पाहिले होते, तेथील समाजांचे अवलोकन केले होते, कितीएक वस्तुसंग्रहालये पाहिली होती, मानवी इतिहासाला कलाटणी देणाऱ्या घटना जेथे घडल्या अशी अनेक स्थाने त्यांच्या डोळ्यांखालून गेली होती; आणि त्याच वेळी स्वातंत्र्याच्या लढ्याचे नेतृत्व करण्याच्या निमित्ताने हा उभा भारत देश व त्याच्या विविध प्रांतांतील लोक त्यांनी पाहिले होते.

या देशात वाद किंवा भांडणे काय कमी आहेत? नित्य वाद चालू आहेत. निरनिराळ्या गोष्टी त्या वादांना दररोज नवी निमित्ते पुरवीत आहेत. या देशाच्या कित्येक शतकांच्या इतिहासाची पाने उलटत गेले, तर त्यांतही हेच दृश्य दिसते. पण संघर्षाच्या अशा लाटा सतत उठत असतानाच या भारताचे एकत्व कोठेतरी खोलवर लपलेले आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी त्या भारताचा शोध घेतला आहे. साऱ्या जगात केलेला प्रवास आणि त्याच वेळी भारतासह इतर राष्ट्रांच्या इतिहासाची त्यांना असलेली जाण या दोहोंच्या समवायातून त्यांचा ग्रंथ सिद्ध झाला आहे जवाहरलालांचा हा शोध कोठवर पोचला आणि त्या शोधात त्यांना काय भावले किंवा मोलाचे वाटले, याचा आपल्याला शोध घ्यावयाचा असेल, तर ऐन तरुण वयात त्यांच्यावर झालेला इंग्लंडमधील वास्तव्याचा संस्कार आणि त्यांचे विशिष्ट व्यक्तिमत्त्व याकडे वळावे लागेल

जवाहरलालांची नाना देशांची भ्रमंती त्यांच्या कुटुंबाच्या अपार धनसंपदेमुळे घडून आली, तर भारतातील त्यांचे अनेक दौरे राजकीय चळवळीला दिशा देण्याच्या निमित्ताने झाले. ज्याने साऱ्या जगभरात प्रवास केला आहे, जगन्मान्यता पावलेल्या अनेक नामवंत

जाईल. पण त्याच वेळी असेही काही आहे की, ज्यामुळे तीच मान पुन्हा उंच होईल जे वाईट आहे ते नष्ट कसे होईल, आणि जे चांगले आहे ते साऱ्या समाजापर्यंत कसे पोचवता येईल, याची चिंता विचारवंतांनी वाहावयास हवी पण हे कसे साधता येईल हे समजून घेण्यासाठी हा देश पाहिला पाहिजे, आणि त्याच्या इतिहासावर दृष्टीही टाकली पाहिजे.

गेल्या तीनचार हजार वर्षांत जगातील नाना देशांत जे काही घडत आले, त्याची माहिती याच्या जोडीने आपण करून घेतली, तर आपल्या विचाराला एक निराळे खाद्य मिळते, आणि त्यातून सहज होत राहणाऱ्या चिंतनाला नव्या दिशा प्राप्त होतात. आपला महाराष्ट्र हा जसा भारताचा एक प्रांत आहे, तसाच आपला भारत हा समग्र मानवजातीचा एक भाग आहे. पृथ्वीच्या पाठीवर नांदत आलेल्या या मानवकुळातील निरनिराळ्या राष्ट्रांमध्ये भारत कोठे आहे आणि समग्र मानवसंस्कृतीमध्ये तो कोणती वैशिष्ट्यपूर्ण भर घालू शकतो, येथवर ज्याला जगाच्या इतिहासाचे भान असते अशा विचारी माणसाचे मन स्वदेशाचा विचार करताना जाऊन पोचते. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या Discovery of India या ग्रंथाची येथे सहज आठवण होईल. त्यांनी जगातील नाना देश पाहिले होते, तेथील समाजांचे अवलोकन केले होते, कितीएक वस्तुसंग्रहालये पाहिली होती, मानवी इतिहासाला कलाटणी देणाऱ्या घटना जेथे घडल्या अशी अनेक स्थाने त्यांच्या डोळ्यांखालून गेली होती; आणि त्याच वेळी स्वातंत्र्याच्या लढ्याचे नेतृत्व करण्याच्या निमित्ताने हा उभा भारत देश व त्याच्या विविध प्रांतांतील लोक त्यांनी पाहिले होते.

या देशात वाद किंवा भांडणे काय कमी आहेत? नित्य वाद चालू आहेत. निरनिराळ्या गोष्टी त्या वादांना दररोज नवी निमित्ते पुरवीत आहेत. या देशाच्या कित्येक शतकांच्या इतिहासाची पाने उलटत गेले, तर त्यांतही हेच दृश्य दिसते. पण संघर्षाच्या अशा लाटा सतत उठत असतानाच या भारताचे एकत्व कोठेतरी खोलवर लपलेले आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी त्या भारताचा शोध घेतला आहे. साऱ्या जगात केलेला प्रवास आणि त्याच वेळी भारतासह इतर राष्ट्रांच्या इतिहासाची त्यांना असलेली जाण या दोहोंच्या समवायातून त्यांचा ग्रंथ सिद्ध झाला आहे. जवाहरलालांचा हा शोध कोठवर पोचला आणि त्या शोधात त्याना काय भावले किंवा मोलाचे वाटले, याचा आपल्याला शोध घ्यावयाचा असेल, तर ऐन तरुण वयात त्याच्यावर झालेला इंग्लंडमधील वास्तव्याचा संस्कार आणि त्यांचे विशिष्ट व्यक्तिमत्त्व याकडे वळावे लागेल

जवाहरलालाची नाना देशांची भ्रमती त्याच्या कुटुंबाच्या अपार धनसंपदेमुळे घडून आली, तर भारतातील त्यांचे अनेक दौरे राजकीय चळवळीला दिशा देण्याच्या निमित्ताने झाले. ज्याने साऱ्या जगभरात प्रवास केला आहे, जगन्मान्यता पावलेल्या अनेक नामवंत

व्यक्तींच्या भेटी घेतल्या आहेत, आणि त्याच्याशी उत्तम सवाद साधला आहे, असा या शतकातील दुसरा राजकीय नेता दृष्टीसमोर येत नाही. रवीद्रनाथानीही असाच साऱ्या जगभर प्रवास केला. देशभक्तीचा अकुर त्याच्याही ठायी होता. आणि तेही अनेक श्रेष्ठ व्यक्तींच्या संपर्कात आले. पण रवीद्रनाथ मूलतः कवी होते, त्यांची दृष्टी रसिकतेची अधिक होती. जवाहरलालांतही रसिकतेची बाजू होती, पण तिचे स्थान दुय्यम होते. मूलतः ते विचारवंत होते. आजारी असलेल्या पत्नीला भेटता यावे म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांना काही काळासाठी नैनीच्या कारागृहातून मुक्त केले. काठगोदामपासून नैनितालकडे जाणाऱ्या रस्त्यावर उंच पहाडाच्या कुशीत असलेल्या एका रुग्णालयात कमला नेहरू क्षयरोगावर उपचार घेत होत्या. तिकडे चाललेले असताना दूरवर हिमालयाची रांग दिसली, ती दृष्टीसमोर येताच निसर्गसौदर्याची ओढ असलेले जवाहरलाल राजकारणातील प्रश्न आणि पत्नीच्या आजाराची चिता या दोन्ही गोष्टी काही काळ विसरून गेले, आणि कारावासात श्रांत झालेले त्यांचे मन काहीसे शांत झाले; असा आपला अनुभव त्यांनी आत्मचरित्रात वर्णन केला आहे. पण हा आनंद मुक्तपणाने घेण्याइतकी उसंत त्यांना आयुष्यात कधी मिळाली नाही. त्याची रसिकतेची भूक तशी अतृप्त राहिली असावी. पण थोडीशी संधी आली, तरी त्यांची सौदर्यवृत्ती अशी जागी होत असे. ती रसिकता विचारांच्या प्रदेशात रमे, इतिहासात फेरफटका मारून येई, आणि निसर्गातील सौदर्याचाही आस्वाद घेऊ शके. असे हे एक मोठे दुर्मिळ रसायन होते.

रवीद्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वात सौदर्याची अनुभूती हा सर्वात प्रबळ घटक होता. ती त्याची सौदर्यवृत्ती त्यांना गहन अध्यात्मपर आशय व्यक्त करणाऱ्या गीतांजलीतील काव्यनिर्मितीकडे घेऊन गेली. निसर्ग आणि सगीत यांतील सौदर्य रवीद्रनाथांना नित्य खुणावीत असे. वसंत ऋतूचे आगमन होत असताना शांतिनिकेतनमधील आपल्या निवासस्थानाबाहेरच्या बागेत ते एकदा खुर्ची टाकून बसले होते. सूर्योदयाच्या आधीची वेळ होती. कोणीतरी त्यांना सहज प्रश्न केला, ''काय करताहात?'' तितक्याच सहजतेने त्यांनी उत्तर दिले, ''वसंत ऋतूचं स्वागत करतो आहे.'' आकाश निरभ्र होते, पूर्व दिशेला क्षितिजावर लाली पसरलेली होती, शेजारीच बागेत असलेली फुलझाडे आपले कोमल सौदर्य मिरवीत होती, आणि सरळ सपाट भूमीवर नजर पोचेतो पसरलेल्या हिरव्यागार विस्तीर्ण शेतांमधून अनेक डेरेदार वृक्ष वाऱ्यावर डोलत होते.

प्रभातकालचे हे सौदर्य नित्याचेच असते. रवीद्रनाथ त्यातील रमणीयत्व आणि नित्यनूतनत्व जाणणारे होते. अशाच प्रकारे ते सुरांच्या विश्वातही रमत. गीतांजली हा त्यांच्या प्रतिभेचा उन्मेष आहे. त्याच प्रतिभेचा आश्रय घेऊन त्यानी संगीतातील स्वरविलासाचे नवदर्शन घडवले. त्या रवीद्रसंगीताचे सूर बंगालमध्ये आपल्याला आजही ऐकावयास मिळतात. देशभक्ती हा

जवाहरलालांच्या जीवनातील स्थायिभाव होता. त्या देशभक्तीचा स्पर्शही रवींद्रनाथांना होता हे त्यांची स्वदेशीवरची चार व्याख्याने वाचली तरी ध्यानात येते. त्यामुळेच लुई फिशरसारखे जगभरातील विचारवंत ज्यांना मोठ्या कुतूहलाने सेवाग्राममध्ये भेटावयास येत, ते महात्मा गांधी केवळ रवींद्रनाथांना भेटण्यासाठी शांतिनिकेतनमध्ये गेले त्यांचे 'जनगणमनअधिनायक' हे गीत स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत होऊन गेले. तो त्यांच्या ललाटी लिहिलेल्या भाग्याचा भाग म्हणावा लागेल. त्याच्या जोडीने का होईना पण 'वंदे मातरम्' राष्ट्रगीत म्हणून एका मर्यादित स्वीकारले गेले, हे ज्यांनी त्याची केवळ घोषणा करण्यासाठी फटके खाल्ले होते, त्या देशभक्तांचेही काही भाग्य म्हणावे लागेल. आपल्या देशात अगदी अलीकडच्या काळात घडलेल्या अशा घटनांतही नियतीची लीला दिसते. चिंतनशील मनाला अशा अनेक गोष्टी जाणवत असतात.

## निसर्गसौन्दर्याचा आनंद

विषय चालला होता प्रवासाचा, आणि त्या प्रवासामुळे माणसाचे अनुभवविश्व कसे समृद्ध होत जाते याचा. तो विचार करीत असताना इतिहासाची आठवण झाली, तशीच रसिक वृत्तीची झाली, त्या त्या स्थळी इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असे काय घडले हे माहीत नसेल, आणि माहीत असले तरी त्याला उत्फुल्ल मनाने दाद देण्याची रसिकता नसेल, तर नुसते हिंडून काही उपयोग होत नाही. कोणीतरी व्यापारी काश्मीरचा प्रवास करून आला आणि त्या प्रवासाचे फलित आपल्या मित्राला सांगताना म्हणाला, ''श्रीनगरला बाजारात गेलो आणि तेथील शाली व अक्रोडच्या लाकडापासून बनवलेल्या नाना प्रकारच्या वस्तू घेऊन आलो, परत आल्यावर त्या चढ्या किमतीने विकल्या तर जातायेताचा सारा प्रवासखर्च जाऊन वर आणखी पैसे मिळाले.'' साऱ्या जगातून जेथे प्रवासी येत असतात, त्या निसर्गसुंदर काश्मीरच्या प्रवासाचा हा असा आर्थिक ताळेबंद त्या व्यापाऱ्याने मांडला. याला प्रवास करणे म्हणत नाहीत. अशी अरसिक वृत्ती असेल, तर मुंबईतील सिमेंटच्या इमारतींचे जंगल आणि काश्मीरमधील सोनमर्गच्या मार्गावरील वृक्षांचे जंगल ही दोन्ही सारखीच होऊन जातात.

व्हेरीनाग येथील झेलमचा उगम, तेथील स्फटिकशुभ्र पाण्याचा भला मोठा झोत, त्याच्यासमोर शहाजहानने तयार केलेली ती बाग, नदीच्या पाण्याला प्रारंभीच्या काही भागात बंदिस्त पाटामधून करून दिलेली वाट, तिच्या दोन्ही बांजूना उभी असलेली उंचच उंच अशा चिनार वृक्षांची रांग, त्या डेरेदार वृक्षांवर असलेली विविध रंगच्छटांची कोवळी लुसलुशीत पाने, पहलगाम येथील डोळ्यांनी पिऊन घ्यावी अशी नीरव शांतता, त्या शांततेचा भंग

करणारा मधल्या दरीतून लिडार नदीचा फेसाळत चाललेला प्रवाह, दोन बाजूंच्या डोंगरांच्या उतारावरून असलेल्या प्रचंड वृक्षावरील पक्ष्यांचे कूजन, खिलनमर्गच्या पठारावर उभे राहून थेट उत्तरेला दृष्टी टाकल्यावर नजरेच्या टप्प्यात येणारा न येणारा असा एकीकडे चीन तर दुसरीकडे रशिया आणि एकीकडे तिबेट तर दुसरीकडे पाकिस्तान येथवर पोचणारा विशाल भूप्रदेश, मार्तंड किंवा अनंतनाग येथे मनात जाग्या होणाऱ्या प्राचीन भारतीय संस्कृतीच्या खुणा आणि कानांत अस्फुटपणे जाणवणारी वेदकालीन ऋषीची उषासूक्ते; अशा कितीतरी गोष्टी काश्मीरमध्ये आपल्या मनाला साद घालतात. निसर्ग खुणावतो, तसाच इतिहास मनाला डिवचतो, आणि वर्तमानकाळात वावरणारे मन काहीसे सैरभैर होते. कुठे दूर दक्षिणेत केरळमध्ये जन्माला आलेले शंकराचार्य, पण दाल सरोवराच्या काठी असलेल्या टेकडीवरील शंकराचे त्यांनी उभारलेले मंदिर पाहताना बाराशे वर्षांपूर्वीच्या त्या काळात, जम्मूनंतर लागणारा दीडशे मैलांचा हिमालयाचा दुर्गम प्रदेश ओलांडून ते या काश्मीरच्या दरीत कसे येऊन पोचले असतील, याचा विस्मय मनात दाटून येतो.

तो विस्मय आपल्याला हिमालयाच्या दूरवरच्या भागात असलेल्या अकराबारा हजार फूट उंचीवरील केदारनाथच्या मंदिराशी घेऊन जातो. तेथे मंदिराच्या मागच्या बाजूलाच शंकराचार्यांचे स्थान दाखवले जाते. तेथून ते हिमालयात निघून गेले एवढेच इतिहास सांगतो. त्याहून अधिक त्यालाही काही माहीत नाही. कोठे केरळमधील कालडी, कोठे थेट उत्तरेकडील काश्मीर, आणि कोठे हिमाच्छादित पर्वताच्या पृष्ठभूमीवरील केदारनाथ. एवढ्या विस्तीर्ण भूप्रदेशावर भ्रमण केलेला आणि त्याच वेळी प्रस्थानत्रयीवर उत्कृष्ट भाष्यग्रंथ लिहिणारा दुसरा कोणी तत्त्वज्ञ संन्यासी जगाच्या इतिहासात आढळेल काय? प्रवास आणि इतिहास ही अशी हातात हात घालून जातात. निसर्गाचे विलसित हे जड सृष्टीतील पदार्थांच्या गुणधर्मातून अवतरते. ते स्वरूपतः ना सुंदर असते, ना असुंदर असते. त्यातील सौन्दर्य भावते ते माणसाच्या रसिक संवेदनशीलतेला. त्याचप्रमाणे निरनिराळ्या स्थानांना महत्त्व प्राप्त होते ते कोणत्या ना कोणत्या क्षेत्रातील मानवी कर्तृत्वाचे दर्शन घडवणाऱ्या किंवा त्याच्या नियतीला आकार देणाऱ्या घटना तेथे घडलेल्या असतात म्हणून. निसर्ग आणि मानव या दोहोमध्ये हे असे नाते जोडले जाते. तेथे जणू जडाला चैतन्याचा स्पर्श लाभतो. प्रवास आणि इतिहास ही देखील अशीच एकमेकांची साथसंगत करीत असतात. इतिहासाची सोबत लाभली तर प्रवासात जे काही समोर येते त्याला एक जिवंतपणा आणि अर्थपूर्णता ही प्राप्त होतात.

## जवाहरलाल, रवींद्रनाथ आणि विवेकानन्द

जवाहरलालांनी आपल्या परीने भारताचा शोध घेतला. भारताच्या आत्म्याशी ते पोचले

की नाही हा एक विचार करण्याचा प्रश्न होईल; पण असे मनात येऊन जाते की रवींद्रांच्या गीतांजलीत त्या आत्म्याची स्पदने उमटली आहेत. जवाहरलालांच्या ग्रथात तो सूर अतिशय क्षीण आहे. एक लोकप्रिय राजकीय नेता, आणि एक प्रतिभावंत कवी यांची ही थोडी निराळी असलेली रूपे आपल्या दृष्टीसमोर येतात. असे भारतभ्रमण आणि असा विश्वसंचार गेल्या शतकात स्वामी विवेकानन्दांसारख्या एका संन्याशानेही केला होता. त्यांच्या अवलोकनाचे फलित त्यांच्या जीवनातील घटना, त्यांची अनेक पत्रे व असंख्य व्याख्याने आणि त्यांनी केलेले थोडेफार लेखन, यांच्या द्वारा आपल्याला उपलब्ध आहे त्यांनी दिलेल्या अनेकानेक मुलाखती आणि निरनिराळ्या व्यक्तीबरोबर झालेली अनौपचारिक संभाषणे ग्रंथनिविष्ट केली गेली आहेत. असे म्हणण्याचा मोह होता की, जे जवाहरलाल आणि रवींद्रनाथ यांच्या ठायी होते, ते सारे विवेकानन्दांच्या ठिकाणी होते, पण त्याहून काहीतरी अधिक होते.

त्या अधिकाच्या द्वारा विवेकानन्द भारताच्या आत्म्याच्या शोध अधिक समर्थपणाने घेऊ शकले. त्या वेळी जगातील इतर देशांच्या तुलनेने भारत कोठे उणा पडतो व कोठे उजवा ठरतो, यांवर ते अधिक प्रकाश टाकू शकले. विवेकानन्दांनी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतचा सारा भारत पायातळी घातला आणि तो तसा घालताना ऐश्वर्यशाली संस्थानिक आणि उच्चशिक्षित अधिकारी यांच्यापासून तो अर्धपोटी राहणारा शेतकरी आणि अज्ञानात बुडलेला तळागाळातला दलित येथवर त्या माणसांशी त्यांनी साक्षात संपर्क साधला. ते त्या सर्वांबरोबर राहिले आणि जेवले, त्यांतील अनेकांशी त्यांनी व्यक्तिगत पातळीवरून संवाद केला, आणि त्यांच्या मनाचे भावनिक चलनवलन जवळून पाहिले. अडाणी असलेल्या एखाद्या खेडूताच्या दैनंदिन जीवनात काही उदात्त मूल्यांचे प्रतिबिंब पडलेले असते, पण त्याचा उगम कोठे आहे व त्यातून आपल्या जीवनाला मांगल्याचा स्पर्श कसा होत असतो, हे एखाद्या झोपडीत कसेबसे आयुष्य कंठत असलेल्या त्या गरीब माणसाला माहीतही नसते, असा विवेकानन्दांचा अनुभव होता.

या सामान्य माणसाला दोन घास अन्न मिळाले, शिक्षणाचा काही लाभ झाला, आणि आपल्या प्राचीन संस्कृतीतील आध्यात्मिक मूल्ये त्याच्यापर्यंत पोचवली गेली, तर हाच अज्ञानी आणि दरिद्री समाज आपले प्रचंड सामर्थ्य घेऊन उभा ठाकेल, सिहसदृश पराक्रम करील, आणि या अवनतीत बुडलेल्या भारताचा तारणहार होऊन जाईल; असे विवेकानन्दांचे निरीक्षण होते. यातील अध्यात्माचा सूर रवींद्रनाथांच्या गीतांजलीतील षड्ज होता. पण तो त्यांच्या सूक्ष्म जाणिवांचा केवळ अस्पष्ट असा प्रतिध्वनी होता. तो आपल्या साक्षात प्रचीतीचा भाग आहे, असा दावा त्यांनीही कधी केला नाही. भारतीय समाजाचे प्राणभूत सत्त्व असणारे हे सांस्कृतिक संचित जवाहरलालांच्या अंतःकरणाची तार छेडू शकले नाही. त्यासाठी

आवश्यक अशी सवेदनशीलता त्याना लाभली नव्हती. त्यांच्या एकंदर विचारविश्वावर आधुनिक पाश्चात्त्य संस्कृतीची जी दाट छाया होती, तिचा तो अप्रत्यक्ष असा परिणाम होता. उलट विवेकानन्दांची संवेदनशीलता सर्व दिशांनी जागती होती. तिला जवाहरलालांच्या ठायी असलेल्या आधुनिकतेची जोड होती, तशीच रवीद्रनाथाच्या सौन्दर्यवृत्तीचीही होती. १८९३-मध्ये शिकागोला तोवरच्या विज्ञानाच्या प्रगतीची साक्ष पटवणारे एक प्रचड औद्योगिक प्रदर्शन भरले होते संसाराचे सारे पाश तोडून ऐहिकाकडे पाठ फिरवलेल्या या तरुण संन्याशाने ते प्रदर्शन अकरा दिवस अतिशय उत्सुकतेने पाहिले मानवाच्या बुद्धिमत्तेचे ते विराट वैभव त्यांचे डोळे दिपवून गेले.

पण त्याच प्रदर्शनातून हिडत असताना केवळ विवेकानन्दांचा पोषाख वेगळा आहे म्हणून कोणीतरी त्यांचा फेटा मागच्या बाजूने ओढला. एक काळा आदमी ही त्यातील असहिष्णुतेची भावना पाश्चात्त्यांच्या संकुचित मनोवृत्तीची साक्ष त्यांना पटवून गेली, त्याचीही त्यांनी नोद घेतली, एवढेच नव्हे तर या आधुनिक जगात भोग आणि वासना यांचे मिथुन राज्य करीत आहे हेही त्यांनी ओळखले दरिद्री आणि पराधीन असलेला भारत त्यांच्या दृष्टीसमोर सतत उभा होता: त्याचे मन तो व्याकुळ करीत होता. पण तोच भारत जगाला काय देऊ शकेल हेही ते जाणून होते. त्यासाठी हा भारत जागा झाला पाहिजे ही त्यांची आस होती. दरिद्रनारायणाची सेवा हे विवेकानन्दांनी निवडलेले देशसेवेचे माध्यम होते. जवाहरलालांची पत्नी कमला या अलाहाबादच्या रामकृष्ण मठात जात असत. त्यामुळे ती संस्था त्यांना ऐकून माहीत होती. कुतूहल म्हणून जवाहरलालही एकदा वाराणशीच्या मठात गेले होते, आणि तेथील सेवाकार्य पाहून प्रभावित झाले होते. त्याच्या व्यक्तिमत्त्वातील हा विशेष डोळ्यांआड होता कामा नये. या सेवाकार्यामागे कोणती प्रेरणा उभी आहे किंवा कोणत्या धारणेने हे संन्यासी अशी सेवा करीत असतात, इकडे त्यांचे चित्त वळले नाही. प्रकृतिभेद असतो तो असा.

अज्ञानी आणि पराधीन भारताने आधुनिक पाश्चात्त्य संस्कृतीपासून काय शिकले पाहिजे, हे जवाहरलालांनी ओळखले होते, आणि त्यासाठी त्यांनी शर्थीचे प्रयत्न केले. लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्य, त्याचबरोबर बुद्धिवाद आणि विज्ञाननिष्ठा ही मूल्ये स्वतंत्र भारताच्या घटनेतच समाविष्ट होतील हे त्यांनी कटाक्षाने पाहिले पण या मूल्यांचे नाते भारताच्या मातीशी आणि त्याच्या साडेतीनचार हजार वर्षाच्या सांस्कृतिक वाटचालीशी कसे जुळवून घेता येईल, हे कोडे त्यांना सोडवता आले नाही. प्रत्यक्ष व्यवहारात ते कठीण आहे हे खरे, पण वैचारिक पातळीवरून त्यानी त्याचा परामर्श घेतला नाही. जगातील श्रेष्ठ पुरुषांच्या मालिकेत समाविष्ट करता येतील असे अनेक श्रेष्ठ पुरुष भारतातही झाले आहेत, तो त्यांच्या अभिमानाचा विषय झाला नाही. आपण जगापासून काही घेऊ शकतो व घेतले पाहिले, हे जवाहरलाल आणि

विवेकानन्द यांच्यातील समानत्व आहे. पण भारत जगाला काही देऊ शकतो आणि ते स्वीकारण्यात जगाचे भविष्यकालीन हित आहे, येथवर जवाहरलाल पोचू शकले नाहीत हा ते आणि विवेकानन्द या दोघांत असलेला फरक आहे.

पाश्चात्त्य देशांत विवेकानन्दानी उदंड संचार केला. अमेरिका आणि इंग्लंड यांच्या जोडीने सारा युरोप, ही विवेकानन्दांच्या भ्रमणाची विशाल कक्षा होती. जवाहरलालांचा भारतातील विराट जनसंपर्क सभेला जमणाऱ्या प्रचंड गर्दीच्या द्वारा साधला जात होता. भारतातील सामान्य माणसाच्या अगदी निकट पोचून त्याच्या भावभावनांचे व श्रद्धाविषयांचे विश्व त्यांनी कधी पाहिले असेल, असे मानण्यास जागा नाही. त्यांना सदैव समोर दिसला तो विशाल जनसमूह, आणि तोही देशभक्तीच्या भावनेतून एकत्र आलेला. त्यांनी एखादे ग्रंथालय वा पुस्तकांचे दुकान ज्या उत्सुकतेने पाहिले, तशा उत्कटतेने शतकाशतकांतून भारतातील बहुसंख्य समाजाच्या मानसिक जीवनाचा आधार होऊन गेलेली स्थाने पाहिली नाहीत. या सर्वांची माहिती त्यांना नव्हती असे मानता येणार नाही, पण त्याबद्दल त्यांना मनापासून आस्था नव्हती. थेट उपनिषदे आणि भगवद्गीता येथवर ते पोचले होते. त्यांच्या आत्मचरित्रातील धर्माविषयी त्यांनी व्यक्त केलेले विचार या दृष्टीने पुरेसे बोलके आहेत. धर्मातील आचार आणि उपासना यांच्या अतीत पोचणारी आध्यात्मिकता त्यांना भावली नाही. ही जाण रवींद्रनाथांत अधिक प्रमाणात होती. त्यांचे भावविश्व आणि सौदर्यविश्वही त्याच्याशी संबद्ध होते. त्यांचे वडील देवेन्द्रनाथ हे महर्षी म्हटले गेले आणि त्यांचा संस्कार या तरल संवेदनशील कवीवर मोठ्या प्रमाणात होता. पण अशा या रवीद्रनाथांचा भारतीय समाजाशी असलेला खरा संपर्क कला आणि साहित्य यांच्या माध्यमातून होता. ही माध्यमे सुशिक्षित वर्गापुरती मर्यादित राहतात.

विवेकानन्दांच्या जनसंपर्काला अशा मर्यादा नव्हत्या. भारतातील गोरगरिबांबरोबर ते राहिले, आणि त्याचबरोबर पाश्चात्त्य जगात फिरताना तेथील सर्व क्षेत्रांतील तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, आणि विचारवंत यांच्याशी त्यांचा संवाद होत राहिला. या संवादातून विचारांची देवाणघेवाण झाली. आधुनिक शास्त्रीय संस्कृतीचा गाभा म्हणजे विज्ञान, आपण ते पाश्चात्त्य देशांपासून घेतले पाहिजे असे त्यांनी निःसंदिग्धपणे म्हटले. पण या विज्ञानाला सद्भावाचे आणि नीतिमूल्यांचे डोळे लाभले नाहीत, तर सारे जग ते विनाशाच्या ज्वालामुखीवर नेऊन ठेवील, हे त्यांनी नेमके हेरले. त्यासाठी पाश्चात्त्यांनी भारताचा अध्यात्मविचार घेतला पाहिजे, तो भारताने दिला पाहिजे, भारत तो देऊ शकतो, आणि त्याद्वारा भविष्यकालीन मानवसस्कृतीचा शिल्पकार होऊ शकतो; असे विवेकानन्दांनी म्हटले. तसे म्हणताना त्यांनी एकीकडे पाश्चात्त्यांना संभाव्य विनाशापासून वाचण्याचा मार्ग दाखवला, तर दुसरीकडे पराधीन भारताला त्याची

सांस्कृतिक अस्मिता कशात साठवलेली आहे याचे भान उत्पन्न करून दिले. हे भान त्याला आत्मविश्वासाचे बळ पुरवणारे तर ठरलेच, पण जगातील राष्ट्रांच्या मालिकेत आपल्याला केवढी महत्त्वाची भूमिका घ्यावयाची आहे हेही त्याच्या दृष्टीसमोर उभे राहिले.

हा विवेकानन्दांनी घातलेला पूर्व आणि पश्चिम यांचा समन्वय होता. यामागे त्याचा ईश्वरदत्त असा काही अधिकार होता आणि सन्यस्त जीवनाची तपश्चर्या उभी होती, त्याचबरोबर त्यांनी त्रिखडात केलेला प्रवास आणि साधलेला विराट लोकसपर्क यातून घेतलेला अनुभव होता. जगातील निरनिराळ्या राष्ट्रांच्या आजवरच्या इतिहासाचे त्यांना असलेले ज्ञानही त्याच्या चिंतनाला बळ पुरवीत होते. विवेकानन्दाच्या या आगळ्यावेगळ्या जीवनात त्यांनी भारताचा शोध घेतला, तसाच पाश्चात्त्य देशाचाही घेतला, आणि अखेर तो शोध भविष्यकालीन मानवसंस्कृतीची दिशा दाखवण्याशी पोचला. पृथ्वीच्या पाठीवर केलेला त्यांच्याइतका अफाट संचार आणि निरनिराळ्या देशांतील व्यक्तीशी साधलेला एवढा विराट सपर्क आणखी कोणत्या व्यक्तीच्या जीवनात आढळतो काय, याचा शोध आपल्याला साऱ्या जगात घ्यावा लागेल तसा तो घेऊ गेले तर विवेकानन्दाचे असामान्यत्व त्यातील अनेकानेक अंगासह आपल्यासमोर उभे ठाकेल. जवाहरलाल, रवींद्रनाथ आणि विवेकानन्द अशी ही व्यक्तिमत्त्वे वेगळ्या प्रकारची आहेत. एक राजकीय नेता, दुसरा प्रतिभावंत कवी, तर तिसरा सर्वसंगपरित्यागी सन्यासी. त्या सर्वांनी घेतलेल्या भारताच्या आणि जगाच्या शोधामागे त्यांनी केलेला प्रवास आणि मानवजातीच्या इतिहासाचा अभ्यास उभा होता, हे सहज लक्षात येते. प्रवास आणि इतिहास या दोहोची साथसंगत महान व्यक्तिमत्त्वाच्या जीवनात जर अशी मोलाची ठरते, तर सामान्य माणसालाही ती एक वरदान होऊन जाईल यात नवल नाही.

## वृक्ष, नदी आणि पर्वत

असा हा प्रवास कळत्या वयात पदार्पण केल्यापासून मनाला मोह घालत आलेला होता. हे सारे तेव्हा कळले होते असे नाही, पण आता मागे वळून पाहताना त्याची जाग कशी येत गेली हे ध्यानात येते. काही गोष्टीची आवड आणि निरनिराळ्या विषयांबद्दलची जिज्ञासा याची बीजे आपल्या मनात कशी पेरली जातात, हे नेमके सागता येत नाही. स्थूल मानाने असे म्हणता येईल की प्रवासाची ओढ ही अंतरगातूनच उमललेली असावी. किर्लोस्करवाडी आणि कऱ्हाड यांच्या मध्यावर असलेल्या भवानीनगर या अगदी लहानशा खेड्यात आजची अकरावी व तेव्हाची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मी दोनतीन महिने राहिलो होतो. आईवडील तेथे नुकतेच मिरजेहून गेले होते, आणि थोड्या दिवसांनी मी गेलो तिकडे जात असताना किर्लोस्करवाडी स्थानक ओलांडल्यावर लगेच उजव्या बाजूला छोटीशी डोंगरांची रांग लागली

खाली जमिनीवर यावे, असा चिंचेच्या झाडाशी आम्हा तीनचार मित्रांचा खेळ शालेय जीवनातील मधल्या सुटीत चालत असे. सूरपारंब्या हा त्या काळातील मुलाचा आवडता खेळ चिंचेच्या झाडावरच चाले चिंचेच्या झाडाइतकेच आंब्याचे झाड ओढ लावी. आंब्याचा डेरेदार वृक्ष ही एक वेगळी शोभा आहे. मिरजेच्या आसपास आंब्याची झाडे विशेष नव्हती. पण काही ठिकाणी भली मोठी वडाची झाडे होती. वडाच्या पारंब्या हातांनी धरून झोके घेणे हा सर्वच मुलांचा छंद असतो. कोठेही झाड दिसले आणि त्यावर चढलो नाही, असे वयाच्या विशीपर्यंत कधी घडले नाही. दोघेतिघे मित्र मिळून फिरावयास गेलो, तर गावाबाहेरच्या शेतात गप्पा मारण्यासाठी न बसता एखादे झाड पाहून त्यांच्या फांद्यांवर बसून आमच्या गप्पा चालत समानशील मित्र भेटला की हा आनंद वयाच्या तेवीसचोवीस वर्षापर्यंत मी मनमुराद घेत आलो.

वृक्षाची नाना रूपे असतात व प्रत्येकाची शोभा वेगळी असते हे पुढे अनुभवाला आले सपाटीवर घनदाट अरण्य असते, त्याचप्रमाणे पर्वताच्या उतारांवरून वृक्ष असतात. हिमालयात तर दीड-दोन हजार फूट उंचीच्या उतारावर सर्वत्र दीडदोनशे फूट उंचीचे वृक्ष उभे असतात. असे डोंगर दोन्ही बाजूंना असतात, आणि कोठेकोठे दरीच्या मध्यावरून खळाळत चाललेल्या नदीचा प्रवाह उतारावरून खाली येताना आपला घनगंभीर आवाज सारी दरी भरून टाकत असतो. नद्या, वृक्ष आणि डोंगर या सर्वांना आपापल्या परीने सौंदर्याचे रूप लाभलेले आहे. ही तीनही एकत्र येतात ती सह्याद्रीच्या कुशीत क्वचित कोठेतरी, पण ठायी ठायी एकत्रित आढळतात ती हिमालयाच्या प्रदेशात. या तिहीवर निळ्या निळ्या आकाशाचे छत्र असते. पृथ्वीच्या पाठीवरील रमणीय निसर्ग आणि विश्वाचा अनंत असा विस्तार यांची भेट तेथे होते. वृक्ष वा डोंगर यांवरून आपली दृष्टी अनंत अशा आकाशाकडे वळली, तर सौन्दर्याचे एक आगळे भांडार खुले होते. सूर्योदयापूर्वीचा उषःकाल आणि सूर्यास्तानंतरची सायंकाळ हे दोन्ही संधिकाल मन विशेष रमवणारे असतात. रात्रीचे आकाश कधी शीतल चन्द्रमा घेऊन येते, आणि झगमगणाऱ्या ताऱ्यांचे वैभव तर सदासर्वदा आपला मंद प्रकाश उधळत असते

या सौंदर्याचे केवळ दर्शनही आपल्याला अन्तर्मुख करते. दैनंदिन जीवनातील साऱ्या व्यापतापांचा विसर पडतो, हे सारे अस्तित्व म्हणजे काय आहे व ते पाहणारे आपण कोण आहोत आणि नाना रूपांनी नटणाऱ्या या वस्तुजाताशी आपले नाते कोणत्या प्रकारचे आहे, असे प्रश्न विचारण्यापर्यंत आपले मन पोचते. त्याची उत्तरे क्वचितच कोणाला मिळतात, पण त्या प्रश्नांशी चाळा करण्याचा आनंद कोणालाही घेता येतो. हा थोडा गंभीर विषय झाला. तो बाजूला ठेवावा साधी मनाला सुखवणारी शोभा विचारात घेतली, तर वृक्ष आणि वेली सर्वत्र दृष्टीला पडत असल्या तरी उंच पर्वत, विशाल दऱ्या, आणि घनदाट जंगल ही सारी नागरी

वस्तीपासून दूर असतात. तेथे मुद्दाम जावे लागते नदीचा खळाळता प्रवाहही एखाद्या ठिकाणीच असतो. गर्दीने जीव नकोसा करणाऱ्या मोठमोठ्या शहरांत राहणाऱ्यांना तर या सर्वाचे दर्शन आता दुर्मिळ झाले आहे. पण आकाश? ते मात्र सदैव आपल्या मस्तकावर खुले आहे आणि त्यामुळे त्याचा आनंद केव्हाही घेता येतो. निसर्गातील सौन्दर्याची अशी जिवंत आवड मनात ठाण मांडून बसलेली असेल, तर ती व्यक्ती प्रवासाचा आनंद अधिक प्रमाणात घेऊ शकते.

भवानीनगरपासून पाचसहा किलोमीटरवर ताकारी आहे. तेथे स्थानकाच्या समोरच्या डोगरावरच्या उतारावर कमळभैरीचे देऊळ आहे, तर त्या डोंगराच्या आतल्या बाजूला सागरेश्वराचे मंदिर आहे. पायीच ते पाहावयास गेलो. छोटीमोठी अनेक शिवमंदिरे तेथे विखुरलेली होती. कोणीतरी सांगितले की, तेथून एक-दीड किलोमीटर अंतरावर एका घळीमध्ये कोणी एक तपस्वी राहतो. त्याचा शोध घेत गेलो. एका घळीमधून पाण्याचा अगदी छोटा स्वच्छ असा प्रवाह जात होता. त्याच्या बाजूला एक बऱ्यापैकी लहानशी खोली होती तेथे तो तपस्वी एकांतात राहिलेला होता. त्याच्याशी दोन शब्द बोलण्याचे धाडस तेव्हा झाले नाही. काही ग्रंथ दिसले, आणि तो साधू एक पुस्तक वाचत होता. मुद्रा सौम्य, दाढी वाढवलेली, अंगावर साधे पांढरे वस्त्र, आणि ऐकले होते ते असे की तो मौन धारण करून असतो. विवेकानन्दांचे ग्रंथ आणि श्रीरामकृष्णांचे चरित्र माझ्या वाचनात येऊन गेले, त्याला आठदहा महिनेच उलटले होते त्यांचा संस्कार ताजा होता. एकांतातील त्या साधकाचे दर्शन मला मनाने हिमालयात घेऊन गेले. तेच मनात घोळवत त्या डोगराच्या वरच्या बाजूने वाट काढत संध्याकाळ होत असता मी घरी परत आलो. घराच्या बाहेर विहिरीचे पाणी काढून हातपाय धूत असताना सहज समोर पाहिले तर पाच किलोमीटर दूर असलेला मच्छिंद्रगड दिसला. बराच चढ असलेल्या त्या डोगरावरही एकदा जाऊन आलो.

मच्छिन्द्रनाथांचा शोध घेणारा त्याचा शिष्य गोरक्षनाथ. ही नावे कानांवरून गेली होती, काही अद्‌भुत वाटणाऱ्या कथा ऐकल्या होत्या. गोरक्षनाथांबरोबर मन कामरूपच्या प्रदेशात म्हणजे आसाममध्ये जाऊन आले. ''चलो मच्छिंदर गोरख आया'' हा घोष कानात दुमदुमला आसामच्या दक्षिणेस बंगालची भूमी. त्या भूमीत श्रीरामकृष्ण-विवेकानन्द होऊन गेले. केव्हातरी हे सारे पाहावयास मिळाले पाहिजे अशी मोठी प्रबळ ऊर्मी मनात उत्पन्न झाली. पंजाबमधील स्वामी रामतीर्थांचे ग्रंथही नुकतेच वाचनात येऊन गेले होते. संन्यस्त जीवन आणि वेदान्त विचारांचा प्रसार हे त्या दोघांतील निकटचे नाते सहज कळणारे होते. रामतीर्थांचे पूर्वाश्रमीचे नाव तीर्थराम. ते लाहोरच्या महाविद्यालयात प्राध्यापक होते. ते अधूनमधून हरिद्वारहृषीकेशला जात असत. हृषीकेशजवळची गंगा आणि ती गंगा ज्या

प्रदेशातून तेथे सपाटीवर येते तो हिमालयाचा पावन प्रदेश. रामतीर्थांनी केलेले हिमालयातील निसर्गसौन्दर्याचे वर्णन तेव्हाही मनाला भुरळ घालून गेले होते. त्या साऱ्या वर्णनात काव्यात्मता ओतप्रोत भरून राहिलेली होती. पण बंगाल, पंजाब वा हिमालय हे सारे त्या काळात माझ्या दृष्टीने फार दूरचे होते.

घरची आर्थिक स्थिती अशी होती की, मिरजेहून अकराबारा किलोमीटर दूर असलेल्या सांगलीला मी माध्यमिक शाळेच्या मिरजेतील सहा वर्षांच्या वास्तव्यात केवळ दोन वेळा जाऊ शकलो होतो. मिरजेच्या तुलनेने खूपच नीटस असलेले सांगली आपल्याला पाहावयास मिळाले, याचे अप्रूप वाटावे अशा स्थितीत तोवरचे दिवस गेले. किर्लोस्करवाडी हे त्या वेळचे कारखान्याचे गाव. तेथील नीटस आधुनिक वस्ती मनात भरणारी होती. भवानीनगरचे लोहमार्गाचे स्थानक आमच्या घरापासून केवळ दीडशे पावलांवर होते. पुण्याकडे जाणाऱ्या गाड्या दिसत, आणि मी कैक वेळा मनाने त्या गाडीत चढून पुण्याकडे प्रस्थान ठेवीत असे. संध्याकाळी डोंगरावर फिरावयास जाणे हा रोजचा छंद होता. त्यासाठी स्थानक ओलांडून पलीकडे जावे लागत असे. तेथे फलाटावर पोचले की, कऱ्हाडच्या दिशेने जाणारा तो दोन रुळांचा लोहमार्ग दिसे. अनेक वेळा मनात येऊन जाई की, या मार्गावरून जाणारी गाडी पुण्याला जाते. त्या पुण्यात सोळा-सतरा वर्षांपूर्वी लोकमान्य टिळक होऊन गेले, त्याची आठवण होई. भवानीनगरच्या स्थानकप्रमुखांकडून पुण्यातील गणेशोत्सवाच्या बहारदार वार्ता आणि त्यात होणारे गायनाचे कार्यक्रम हे सारे त्या वयात अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टीइतके अद्‌भुत वाटे.

पुण्याला जाणारी माणसे तेव्हा कमी होती काय? मिरजेतच कितीतरी होती. पण ज्याला शेजारी असलेल्या सांगलीला जाणे शक्य झाले नव्हते, त्याच्या दृष्टीने पुणे दूर असावे हे स्वाभाविक होते. पण पुण्याला कधीतरी गेले पाहिजे, मुंबई खूप मोठी आहे म्हणतात, कलकत्ता पाहिले पाहिजे, आणि हिमालय? तो तर निसर्गसौंदर्याच्या अवर्णनीय अशा भांडाराचा स्वामी असलेला कुबेर वाटे. रात्री लख्ख चांदणे पडले म्हणजे मनात येई, हेच चादणे हिमालयातील दऱ्याखोऱ्यांत किती सुंदर दिसत असेल, आणि चंद्राची हिमशुभ्र किरणे तेथील हिमधवल शिखरांना केवढी शोभा प्राप्त करून देत असतील? असे वाटते की, वयाची सतरा वर्षे पूर्ण होणाच्या आधीच्या त्या वयात अशा प्रकारचे जे तरंग मनात उमटत असत, त्यांच्या बुडाशी प्रवासाची आवड लपलेली होती

## देश आणि विदेश

ही आपली आवड पुरी होण्यासाठी किती काळ वाट पाहावी लागेल, किंबहुना ती आयुष्यात कधी पुरी होईल की नाही, याबद्दल मन साशंक होते. प्राथमिक शाळेत शिक्षक होणे

किवा एखादी कारकुनाची नोकरी मिळवणे यापलीकडचे अर्थार्जनाचे कोणतेही साधन दृष्टीच्या टप्प्यात त्या वेळी येत नव्हते. आमच्या कुटुंबातील मागची सारी पिढी कारकुनांची होती. त्यांचा पगार तेव्हा पंधरा रुपये असे, आणि पुणे-मिरज लोहमार्गाच्या प्रवासासाठी तीन रुपये लागत होते. मग मोठा प्रवास कसा शक्य होता? वाचन मात्र चालू होते. शिवप्रभूंची स्वराज्यस्थापना आणि नंतरचा मराठेशाहीचा व पेशवाईचा सारा काळ ह. ना. आपटे, ना. ह. आपटे, नाथमाधव आणि वि. वा. हडप यांच्या कादंबऱ्यांतून दृष्टीसमोर आला होता. न. चिं. केळकर यांचे 'मराठे आणि इंग्रज' व स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'हिंदुपदपादशाही' ही पुस्तके वाचली होती. बाप्पा रावळ आणि महाराणा प्रतापसिंह यांचा राजस्थान कर्नल टॉडच्या 'Annals and Antiquities of Rajasthan' या हजार-अकराशे पृष्ठांच्या ग्रथात वास्तवाला थोडासाही धक्का लागू न देता मोठ्या रोमहर्षक शैलीत साकार झाला होता. ह. ना. आपटे यांची 'रूपनगरची राजकन्या', ना. ह. आपटे यांची 'रजपुतांचा भीष्म', किंवा रमेशचन्द्र दत्त यांची 'जीवनसंध्या' या राजस्थानच्या इतिहासावर आधारलेल्या कादंबऱ्या मनाला भुरळ घालून गेल्या. मग कधीतरी मन चितोड आणि हळदीघाट येथे फेरी मारून येत असे. ह. ना. देशपांडे यांनी लिहिलेली 'राजपूत संस्कृती' आणि 'राजपूत राज्यांना उदय आणि ऱ्हास' ही पुस्तके आज कोणाच्या स्मरणात असतील असे वाटत नाही, पण ती फार अभ्यासपूर्ण होती.

मध्ययुगीन भारताचा इतिहास वाचला आणि भारताच्या अवनतीची काही कारणे ध्यानात आली. विजयनगरच्या साम्राज्याचे अपार वैभव साधार चित्रित करणारा एक सुंदर ग्रंथ तेव्हा हाती पडला होता, आणि ह. ना. आपटे यांची 'वज्राघात' ही कादंबरी त्या साम्राज्याचा विध्वंस कसा झाला याचे चित्र रंगवणारी होती. इतिहासाचे हे अवलोकन भारतापुरते मर्यादित राहिले नव्हते. फ्रेंच राज्यक्रांती आणि रशियातील साम्यवादी क्रांती यांचे इतिहास दृष्टीखालून गेले. आयर्लंडचा स्वातंत्र्यवीर टेरेन्स मॅकस्विनी याचे 'स्वातंत्र्याची मूलतत्त्वे' हे गुलामगिरीत असलेल्या देशांतील तरुणांना देशभक्तीची प्रेरणा देणारे अतिशय विचारपूर्ण पुस्तक होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जप्त झालेला 'जोसेफ मॅझिनी' गुपचूप हातात येईतो अद्याप दीड वर्षे उलटावयाची होती. पण गॅरिबाल्डी आणि जोसेफ मॅझिनी यांची चरित्रे वाचावयास मिळाली होती. त्या काळात मीही मनाने देशभक्तीत गुंतत चाललो होतो. आनंदमठ ही बंकिमचन्द्र चतर्जीची कादंबरी व तीमधील 'वंदे मातरम्' हे गीत यांनी एवढे वेड लावले होते की, त्यानंतर दोनतीन वर्षे पत्रे लिहिताना वरच्या बाजूस मी 'वंदे मातरम्' हे शब्द टाकत असे.

साने गुरुजींची पुस्तके डोळ्यांखालून गेली होती. हिंदू समाजाची संघटना हे शब्दही

त्यांना ऐकवत नसत, पण विनोबांची गीताप्रवचने त्यांनी शब्दबद्ध केली, आणि 'भारतीय संस्कृती' हे हिंदू संस्कृतीतील उदात्त मूल्याचे दर्शन घडवणारे अतिशय सुंदर पुस्तक ते लिहून गेले होते. 'श्यामची आई' या त्यांच्या पुस्तकाचा मनावर फार खोल परिणाम झाला होता. ''मातृदेवो भव'' या उपनिषदातील वचनाचा हुंकार त्यात उमटला होता, त्याचबरोबर त्यातील शोकंतिकेकडे घेऊन जाणारी कथा मन हेलावून टाकणारी होती. त्या शोकांतिकेला दारिद्र्याचा पदर होता, पण संस्कार करण्याचे सामर्थ्यही होते. विवेकानन्दांची कोलंबो-आल्यमोरा व्याख्यानमाला एकीकडे प्राचीन भारतीय संस्कृतीची गौरवगाथा आणि दुसरीकडे गेल्या हजार-बाराशे वर्षांच्या अवनतीची भारताच्या आजच्या गुलामगिरीत झालेली परिणती, या दोहोंचा खोलवर पोचणारा परिणाम मनावर करून गेली होती. असा हा आजचा आपला देश. त्याचा इतिहास बराचसा दृष्टीसमोर आला होता. त्यातील महत्त्वपूर्ण घटना जेथे घडल्या ती स्थाने आपण पाहिली पाहिजेत, अशी ओढ मनात होती. ती पुरी व्हावयाची तर प्रवास केला पाहिजे हे जाणवत होते. पण इतिहास जाणून घेण्यासाठी मिरजेच्या खरेमंदिराच्या ग्रंथालयातील पुस्तकांनी आधार दिला असला, तरी प्रवास करावयाचा तर पैसा हवा. हातात एक छदाम नव्हता, अशा परिस्थितीत केवळ मनातील ऊर्मींशी चाळा करीत राहणे आणि कल्पनेने ती स्थाने डोळ्यांपुढे उभी करणे यात मन दिलासा शोधत असे.

पण नियती अशी होती की, त्यानंतर तीन वर्षे उलटत असताना मी देशभक्तीच्या भावनेने घर सोडून निघून जाणार होतो, सदैव अनिश्चित अशा वातावरणात आठदहा वर्षे वावरत असताना बऱ्याच उचापती हातून व्हावयाच्या होत्या, आणि पाचसहा वर्षे उलटण्याच्या आत खांद्यावर केवळ दोन पिशव्या टाकून हरिद्वारहृषीकेश ते म्हैसूर-बंगलोर आणि जयपूर-अहमदाबाद ते मोंघीरकलकत्ता अशा विस्तीर्ण प्रदेशातील अर्धाअधिक भारत फिरणार होतो. तो सारा प्रवास कसाही अवचित घडत असे. खिशात पुरेसे पैसे नसल्यामुळे कोठेही एखाद्या मठात वा धर्मशाळेत, एखाद्या घराच्या बाहेरच्या बाजूच्या ओसरीत, किवा लोहमार्गस्थानकाच्या फलाटावर पथारी पसरत असे. अनेक दिवस दुपारी पुरीभाजी घेऊन संध्याकाळी दोन केळी किंवा खजूर-शेंगदाणे खाऊन वेळ भागवावी लागली. कोणत्याही मोठ्या शहरात उतरले की बहुतेक भाग पायी फिरून पाहताना दिवसाकाठी बारापंधरा मैल हिंडत असे. पण ते ऐन तरुण वय होते, अशा गोष्टीचे त्या वेळी काही वाटत नाही. शिवाय देशभक्तीच्या दिशेने जे काही मनात धगधगत होते त्यातील धडपडीचा एक भाग म्हणून हे सारे घडत असल्यामुळे हरएक स्थान पाहताना तेथील इतिहास समोर उभा राही आणि मग भारताचे विविध अंगांनी घडणारे हे दर्शन एक रोमांचकारक अनुभव होऊन जाई या भटकंतीच्या कथा नंतर मित्र माझ्याकडून ऐकत आणि त्या ऐकताना ते रगून गेले आहेत हे पाहताना माझ्या आधीच्या आनंदात एक वेगळी भर पडे

पहिल्या वेळी मी ती पाहिली तेव्हा तडक गाडीतून उतरून त्या डोंगरावर चढून जावे, असे फार तीव्रतेने वाटले वयाची सोळा वर्षे संपून काही महिने उलटले होते. त्या वयाला अनुसरून हरएक नवी गोष्ट अतिशय कुतूहलाने पाहण्याची ऊर्मी मनात सदैव जितीजागती होती. ती डोंगरांची रांग भवानीनगरपर्यंत सतत साथ करीत होती, आणि भवानीनगरच्या पुढे ती तशीच साताऱ्याच्या पलीकडे नीरा आणि जेजुरी येथवर पोचते, हे मला त्या वेळी माहीत नव्हते.

डोंगरांच्या माथ्यावर करवंदांच्या अनेक जाळ्या होत्या. डोंगरमाथ्यावर जाणारी पायवाट वेडीवाकडी फत्तरावरून जाणारी होती आणि ती संपण्याच्या जागेशी एक अगदी छोटे देऊळ होते. वरचा सारा प्रदेश त्या वयात मी पायातळी घातला. करवंदाची प्रत्येक जाळी माझ्या ओळखीची होऊन गेली. मी भवानीनगरला पोचलो ते दिवस मार्च महिन्याच्या उत्तरार्धातील होते. त्या वेळच्या भाषेत बोलावयाचे तर त्या छोट्या गावात पन्नाससाठ उबरा होता. घराच्या अंगणातून पाऊण किलोमीटर, अंतरावरचा तो डोंगर सदैव समोर दिसत असे. किर्लोस्करवाडीच्या दिशेने पाच किलोमीटर, तर पुण्याच्या दिशेने तेवढ्याच अंतराची ही डोंगरांची रांग व त्यावरचे स्वच्छ निळे आकाश मनाला वेध लावीत असे डोंगराचे रूप म्हणावे तर तो केवळ उघडाबोडका होता. कोठेही एखादासुद्धा मोठा वृक्ष नव्हता. पण त्या वेळी ती उणीव ध्यानात आली नाही. एकदा दुपारी तीन वाजता आकाश अतिशय भरून आले विजा चमकू लागल्या आणि ढगांचा प्रचंड कडकडाट कानांवर आदळला घराच्या अंगणातून पाहिले तर ताकारीच्या दिशेला वळवाचा जोरदार पाऊस कोसळत होता. तो पाऊस आमच्या दिशेने येत होता. डोंगराच्या माथ्यावरून तो पाऊस कसा पुढे सरकत चालला आहे हे स्वच्छ पाहता आले पंधरा मिनिटांत तो सरकत सरकत आमच्या घराच्या समोरच्या डोंगरावर आला. गावातही जोरदार सर आली. दारातून पाहताना डोंगराचा उंच फलक मागे उभा असल्यामुळे पावसाच्या भल्यामोठ्या धारा आकाशातून जमिनीवर उतरताना पाहावयास मिळाल्या. ते एक मन वेधून घेणारे दृश्य होते. अद्यापही ते ध्यानात आहे एका जागी अचल असा डोंगर आणि क्षणाक्षणाला पुढे चाललेला पाऊस यांची ही भेट फार अपूर्व वाटली.

डोंगराइतकेच मला आठव्यानवव्या वर्षापासून झाडांचे वेड होते. कोणतेही झाड दिसले की त्यावर चढणे हा पहिला कार्यक्रम असे. मिरज प्रशालेच्या प्रशस्त आवारात दहाबारा भलीमोठी चिंचेची झाडे होती. चिंचेचे झाड त्यावर चढण्याचा आनंद घेण्याच्या दृष्टीने सर्वांत उत्तम. कितीही बारीक फांदी असो, ती थेट जमिनीपर्यंत वाकेल पण कधी मोडणार नाही. बुंध्यावरून चढावे, थेट वरचा शेंडा गाठावा, आणि कोणत्याही फांदीवरून

खाली जमिनीवर यावे, असा चिंचेच्या झाडाशी आम्हा तीनचार मित्रांचा खेळ शालेय जीवनातील मधल्या सुटीत चालत असे. सूरपारब्या हा त्या काळातील मुलांचा आवडता खेळ चिंचेच्या झाडावरच चाले. चिंचेच्या झाडाइतकेच आंब्याचे झाड ओढ लावी. आब्याचा डेरेदार वृक्ष ही एक वेगळी शोभा आहे. मिरजेच्या आसपास आब्याची झाडे विशेष नव्हती. पण काही ठिकाणी भली मोठी वडाची झाडे होती. वडाच्या पारंब्या हातानी धरून झोके घेणे हा सर्वच मुलाचा छंद असतो. कोठेही झाड दिसले आणि त्यावर चढलो नाही, असे वयाच्या विशीपर्यंत कधी घडले नाही. दोघेतिघे मित्र मिळून फिरावयास गेलो, तर गावाबाहेरच्या शेतात गप्पा मारण्यासाठी न बसता एखादे झाड पाहून त्यांच्या फांद्यांवर बसून आमच्या गप्पा चालत. समानशील मित्र भेटला की हा आनंद वयाच्या तेवीसचोवीस वर्षापर्यंत मी मनमुराद घेत आलो.

वृक्षांची नाना रूपे असतात व प्रत्येकाची शोभा वेगळी असते हे पुढे अनुभवाला आले सपाटीवर घनदाट अरण्य असते, त्याचप्रमाणे पर्वताच्या उतारांवरून वृक्ष असतात. हिमालयात तर दीड-दोन हजार फूट उंचीच्या उतारावर सर्वत्र दीडदोनशे फूट उंचीचे वृक्ष उभे असतात. असे डोगर दोन्ही बाजूंना असतात, आणि कोठेकोठे दरीच्या मध्यावरून खळाळत चाललेल्या नदीचा प्रवाह उतारावरून खाली येताना आपला घनगंभीर आवाज सारी दरी भरून टाकत असतो. नद्या, वृक्ष आणि डोगर या सर्वांना आपापल्या परीने सौंदर्याचे रूप लाभलेले आहे ही तीनही एकत्र येतात ती सह्याद्रीच्या कुशीत क्वचित कोठेतरी, पण ठायी ठायी एकत्रित आढळतात ती हिमालयाच्या प्रदेशात. या तिहीवर निळ्या निळ्या आकाशाचे छत्र असते. पृथ्वीच्या पाठीवरील रमणीय निसर्ग आणि विश्वाचा अनत असा विस्तार यांची भेट तेथे होते. वृक्ष वा डोगर यांवरून आपली दृष्टी अनत अशा आकाशाकडे वळली, तर सौन्दर्याचे एक आगळे भांडार खुले होते. सूर्योदयापूर्वीचा उषःकाल आणि सूर्यास्तानंतरची सायंकाळ हे दोन्ही संधिकाल मन विशेष रमवणारे असतात. रात्रीचे आकाश कधी शीतल चन्द्रमा घेऊन येते, आणि झगमगणाऱ्या ताऱ्यांचे वैभव तर सदासर्वदा आपला मंद प्रकाश उधळत असते.

या सौंदर्याचे केवळ दर्शनही आपल्याला अन्तर्मुख करते. दैनंदिन जीवनातील साऱ्या व्यापतापांचा विसर पडतो, हे सारे अस्तित्व म्हणजे काय आहे व ते पाहणारे आपण कोण आहोत आणि नाना रूपांनी नटणाऱ्या या वस्तुजाताशी आपले नाते कोणत्या प्रकारचे आहे, असे प्रश्न विचारण्यापर्यंत आपले मन पोचते. त्याची उत्तरे क्वचितच कोणाला मिळतात, पण त्या प्रश्नांशी चाळा करण्याचा आनद कोणालाही घेता येतो. हा थोडा गभीर विषय झाला. तो बाजूला ठेवावा. साधी मनाला सुखवणारी शोभा विचारात घेतली, तर वृक्ष आणि वेली सर्वत्र दृष्टीला पडत असल्या तरी उंच पर्वत, विशाल दऱ्या, आणि घनदाट जगल ही सारी नागरी

वस्तीपासून दूर असतात. तेथे मुद्दाम जावे लागते. नदीचा खळखळाट, प्रवाहही एखाद्या ठिकाणीच असतो. गर्दीने जीव नकोसा करणाऱ्या मोठमोठ्या शहरांत राहणाऱ्यांना तर या सर्वांचे दर्शन आता दुर्मिळ झाले आहे. पण आकाश? ते मात्र सदैव आपल्या मस्तकावर खुले आहे आणि त्यामुळे त्याचा आनंद केव्हाही घेता येतो. निसर्गातील सौन्दर्याची अशी जिवत आवड मनात ठाण मांडून बसलेली असेल, तर ती व्यक्ती प्रवासाचा आनंद अधिक प्रमाणात घेऊ शकते.

भवानीनगरपासून पाचसहा किलोमीटरवर ताकारी आहे. तेथे स्थानकाच्या समोरच्या डोंगरावरच्या उतारावर कमळभैरीचे देऊळ आहे, तर त्या डोंगराच्या आतल्या बाजूला सागरेश्वराचे मंदिर आहे. पायीच ते पाहावयास गेलो. छोटीमोठी अनेक शिवमंदिरे तेथे विखुरलेली होती. कोणीतरी सांगितले की, तेथून एक-दीड किलोमीटर अंतरावर एका घळीमध्ये कोणी एक तपस्वी राहतो. त्याचा शोध घेत गेलो. एका घळीमधून पाण्याचा अगदी छोटा स्वच्छ असा प्रवाह जात होता. त्याच्या बाजूला एक बऱ्यापैकी लहानशी खोली होती. तेथे तो तपस्वी एकांतात राहिलेला होता. त्याच्याशी दोन शब्द बोलण्याचे धाडस तेव्हा झाले नाही. काही ग्रंथ दिसले, आणि तो साधू एक पुस्तक वाचत होता. मुद्रा सौम्य, दाढी वाढवलेली, अगावर साधे पांढरे वस्त्र, आणि ऐकले होते ते असे की तो मौन धारण करून असतो. विवेकानन्दाचे ग्रंथ आणि श्रीरामकृष्णांचे चरित्र माझ्या वाचनात येऊन गेले, त्याला आठदहा महिनेच उलटले होते. त्यांचा संस्कार ताजा होता. एकांतातील त्या साधकाचे दर्शन मला मनाने हिमालयात घेऊन गेले. तेच मनात घोळवत त्या डोंगराच्या वरच्या बाजूने वाट काढत संध्याकाळ होत असता मी घरी परत आलो. घराच्या बाहेर विहिरीचे पाणी काढून हातपाय धूत असताना सहज समोर पाहिले तर पाच किलोमीटर दूर असलेला मच्छिंद्रगड दिसला. बराच चढ असलेल्या त्या डोगरावरही एकदा जाऊन आलो.

मच्छिन्द्रनाथांचा शोध घेणारा त्याचा शिष्य गोरक्षनाथ. ही नावे कानांवरून गेली होती, काही अद्भुत वाटणाऱ्या कथा ऐकल्या होत्या. गोरक्षनाथाबरोबर मन कामरूपच्या प्रदेशात म्हणजे आसाममध्ये जाऊन आले. ''चलो मच्छिंदर गोरख आया'' हा घोष कानात दुमदुमला आसामच्या दक्षिणेस बंगालची भूमी. त्या भूमीत श्रीरामकृष्ण-विवेकानन्द होऊन गेले. केव्हातरी हे सारे पाहावयास मिळाले पाहिजे अशी मोठी प्रबळ ऊर्मी मनात उत्पन्न झाली. पंजाबमधील स्वामी रामतीर्थांचे ग्रंथही नुकतेच वाचनात येऊन गेले होते. संन्यस्त जीवन आणि वेदान्त विचारांचा प्रसार हे त्या दोघांतील निकटचे नाते सहज कळणारे होते. रामतीर्थांचे पूर्वाश्रमीचे नाव तीर्थराम ते लाहोरच्या महाविद्यालयात प्राध्यापक होते. ते अधूनमधून हरिद्वारहृषीकेशला जात असत. हृषीकेशजवळची गंगा आणि ती गंगा ज्या

प्रदेशातून तेथे सपाटीवर येते तो हिमालयाचा पावन प्रदेश. रामतीर्थांनी केलेले हिमालयातील निसर्गसौन्दर्याचे वर्णन तेव्हाही मनाला भुरळ घालून गेले होते. त्या साऱ्या वर्णनात काव्यात्मता ओतप्रोत भरून राहिलेली होती. पण बंगाल, पंजाब वा हिमालय हे सारे त्या काळात माझ्या दृष्टीने फार दूरचे होते.

घरची आर्थिक स्थिती अशी होती की, मिरजेहून अकराबारा किलोमीटर दूर असलेल्या सांगलीला मी माध्यमिक शाळेच्या मिरजेतील सहा वर्षाच्या वास्तव्यात केवळ दोन वेळा जाऊ शकलो होतो. मिरजेच्या तुलनेने खूपच नीटस असलेले सांगली आपल्याला पाहावयास मिळाले, याचे अप्रूप वाटावे अशा स्थितीत तोवरचे दिवस गेले. किर्लोस्करवाडी हे त्या वेळचे कारखान्याचे गाव. तेथील नीटस आधुनिक वस्ती मनात भरणारी होती. भवानीनगरचे लोहमार्गाचे स्थानक आमच्या घरापासून केवळ दीडशे पावलांवर होते. पुण्याकडे जाणाऱ्या गाड्या दिसत, आणि मी कैक वेळा मनाने त्या गाडीत चढून पुण्याकडे प्रस्थान ठेवीत असे. संध्याकाळी डोंगरावर फिरावयास जाणे हा रोजचा छंद होता. त्यासाठी स्थानक ओलांडून पलीकडे जावे लागत असे. तेथे फलाटावर पोचले की, कऱ्हाडच्या दिशेने जाणारा तो दोन रुळांचा लोहमार्ग दिसे. अनेक वेळा मनात येऊन जाई की, या मार्गावरून जाणारी गाडी पुण्याला जाते. त्या पुण्यात सोळा-सतरा वर्षांपूर्वी लोकमान्य टिळक होऊन गेले, त्याची आठवण होई. भवानीनगरच्या स्थानकप्रमुखांकडून पुण्यातील गणेशोत्सवाच्या बहारदार वार्ता आणि त्यात होणारे गायनाचे कार्यक्रम हे सारे त्या वयात अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टीइतके अद्‌भुत वाटे.

पुण्याला जाणारी माणसे तेव्हा कमी होती काय? मिरजेतच कितीतरी होती. पण ज्याला शेजारी असलेल्या सांगलीला जाणे शक्य झाले नव्हते, त्याच्या दृष्टीने पुणे दूर असावे हे स्वाभाविक होते. पण पुण्याला कधीतरी गेले पाहिजे, मुंबई खूप मोठी आहे म्हणतात, कलकत्ता पाहिले पाहिजे, आणि हिमालय? तो तर निसर्गसौदर्याच्या अवर्णनीय अशा भांडाराचा स्वामी असलेला कुबेर वाटे. रात्री लख्ख चांदणे पडले म्हणजे मनात येई, हेच चांदणे हिमालयातील दऱ्याखोऱ्यांत किती सुंदर दिसत असेल, आणि चंद्राची हिमशुभ्र किरणे तेथील हिमधवल शिखरांना केवढी शोभा प्राप्त करून देत असतील? असे वाटते की, वयाची सतरा वर्षे पूर्ण होणाऱ्या आधीच्या त्या वयात अशा प्रकारचे जे तरंग मनात उमटत असत, त्याच्या बुडाशी प्रवासाची आवड लपलेली होती.

## देश आणि विदेश

ही आपली आवड पुरी होण्यासाठी किती काळ वाट पाहावी लागेल, किंबहुना ती आयुष्यात कधी पुरी होईल की नाही, याबद्दल मन साशंक होते. प्राथमिक शाळेत शिक्षक होणे

वस्तीपासून दूर असतात. तेथे मुद्दाम जावे लागते. नदीचा खळाळता प्रवाहही एखाद्या ठिकाणीच असतो. गर्दीने जीव नकोसा करणाऱ्या मोठमोठ्या शहरांत राहणाऱ्यांना तर या सर्वांचे दर्शन आता दुर्मिळ झाले आहे पण आकाश? ते मात्र सदैव आपल्या मस्तकावर खुले आहे आणि त्यामुळे त्याचा आनंद केव्हाही घेता येतो. निसर्गातील सौन्दर्याची अशी जिवंत आवड मनात ठाण मांडून बसलेली असेल, तर ती व्यक्ती प्रवासाचा आनंद अधिक प्रमाणात घेऊ शकते.

भवानीनगरपासून पाचसहा किलोमीटरवर ताकारी आहे. तेथे स्थानकाच्या समोरच्या डोंगरावरच्या उतारावर कमळभैरीचे देऊळ आहे, तर त्या डोंगराच्या आतल्या बाजूला सागरेश्वराचे मंदिर आहे. पायीच ते पाहावयास गेलो. छोटीमोठी अनेक शिवमंदिरे तेथे विखुरलेली होती. कोणीतरी सांगितले की, तेथून एक-दीड किलोमीटर अंतरावर एका घळीमध्ये कोणी एक तपस्वी राहतो. त्याचा शोध घेत गेलो. एका घळीमधून पाण्याचा अगदी छोटा स्वच्छ असा प्रवाह जात होता. त्याच्या बाजूला एक बऱ्यापैकी लहानशी खोली होती. तेथे तो तपस्वी एकांतात राहिलेला होता. त्याच्याशी दोन शब्द बोलण्याचे धाडस तेव्हा झाले नाही काही ग्रंथ दिसले, आणि तो साधू एक पुस्तक वाचत होता. मुद्रा सौम्य, दाढी वाढवलेली, अंगावर साधे पांढरे वस्त्र, आणि ऐकले होते ते असे की तो मौन धारण करून असतो. विवेकानन्दांचे ग्रंथ आणि श्रीरामकृष्णांचे चरित्र माझ्या वाचनात येऊन गेले, त्याला आठदहा महिनेच उलटले होते. त्यांचा संस्कार ताजा होता. एकांतातील त्या साधकाचे दर्शन मला मनाने हिमालयात घेऊन गेले. तेच मनात घोळवत त्या डोंगराच्या वरच्या बाजूने वाट काढत संध्याकाळ होत असता मी घरी परत आलो. घराच्या बाहेर विहिरीचे पाणी काढून हातपाय धूत असताना सहज समोर पाहिले तर पाच किलोमीटर दूर असलेला मच्छिंद्रगड दिसला. बराच चढ असलेल्या त्या डोगरावरही एकदा जाऊन आलो.

मच्छिन्द्रनाथाचा शोध घेणारा त्याचा शिष्य गोरक्षनाथ. ही नावे कानांवरून गेली होती, काही अद्भुत वाटणाऱ्या कथा ऐकल्या होत्या. गोरक्षनाथांबरोबर मन कामरूपच्या प्रदेशात म्हणजे आसाममध्ये जाऊन आले. ''चलो मच्छिंदर गोरख आया'' हा घोष कानात दुमदुमला. आसामच्या दक्षिणेस बंगालची भूमी. त्या भूमीत श्रीरामकृष्ण-विवेकानन्द होऊन गेले. केव्हातरी हे सारे पाहावयास मिळाले पाहिजे अशी मोठी प्रबळ ऊर्मी मनात उत्पन्न झाली. पंजाबमधील स्वामी रामतीर्थांचे ग्रंथही नुकतेच वाचनात येऊन गेले होते. संन्यस्त जीवन आणि वेदान्त विचारांचा प्रसार हे त्या दोघांतील निकटचे नाते सहज कळणारे होते. रामतीर्थांचे पूर्वाश्रमीचे नाव तीर्थराम. ते लाहोरच्या महाविद्यालयात प्राध्यापक होते. ते अधूनमधून हरिद्वारहृषीकेशला जात असत. हृषीकेशजवळची गंगा आणि ती गंगा ज्या

प्रदेशातून तेथे सपाटीवर येते तो हिमालयाचा पावन प्रदेश. रामतीर्थांनी केलेले हिमालयातील निसर्गसौन्दर्याचे वर्णन तेव्हाही मनाला भुरळ घालून गेले होते. त्या साऱ्या वर्णनात काव्यात्मता ओतप्रोत भरून राहिलेली होती. पण बंगाल, पंजाब वा हिमालय हे सारे त्या काळात माझ्या दृष्टीने फार दूरचे होते.

घरची आर्थिक स्थिती अशी होती की, मिरजेहून अकराबारा किलोमीटर दूर असलेल्या सांगलीला मी माध्यमिक शाळेच्या मिरजेतील सहा वर्षाच्या वास्तव्यात केवळ दोन वेळा जाऊ शकलो होतो. मिरजेच्या तुलनेने खूपच नीटस असलेले सांगली आपल्याला पाहावयास मिळाले, याचे अप्रूप वाटावे अशा स्थितीत तोवरचे दिवस गेले. किर्लोस्करवाडी हे त्या वेळचे कारखान्याचे गाव. तेथील नीटस आधुनिक वस्ती मनात भरणारी होती. भवानीनगरचे लोहमार्गाचे स्थानक आमच्या घरापासून केवळ दीडशे पावलांवर होते. पुण्याकडे जाणाऱ्या गाड्या दिसत, आणि मी कैक वेळा मनाने त्या गाडीत चढून पुण्याकडे प्रस्थान ठेवीत असे. संध्याकाळी डोंगरावर फिरावयास जाणे हा रोजचा छंद होता. त्यासाठी स्थानक ओलांडून पलीकडे जावे लागत असे. तेथे फलाटावर पोचले की, कऱ्हाडच्या दिशेने जाणारा तो दोन रुळांचा लोहमार्ग दिसे. अनेक वेळा मनात येऊन जाई की, या मार्गावरून जाणारी गाडी पुण्याला जाते. त्या पुण्यात सोळा-सतरा वर्षापूर्वी लोकमान्य टिळक होऊन गेले, त्याची आठवण होई. भवानीनगरच्या स्थानकप्रमुखांकडून पुण्यातील गणेशोत्सवाच्या बहारदार वार्ता आणि त्यात होणारे गायनाचे कार्यक्रम हे सारे त्या वयात अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टीइतके अद्‌भुत वाटे.

पुण्याला जाणारी माणसे तेव्हा कमी होती काय? मिरजेतच कितीतरी होती. पण ज्याला शेजारी असलेल्या सांगलीला जाणे शक्य झाले नव्हते, त्याच्या दृष्टीने पुणे दूर असावे हे स्वाभाविक होते. पण पुण्याला कधीतरी गेले पाहिजे, मुंबई खूप मोठी आहे म्हणतात, कलकत्ता पाहिले पाहिजे, आणि हिमालय? तो तर निसर्गसौंदर्याच्या अवर्णनीय अशा भांडाराचा स्वामी असलेला कुबेर वाटे. रात्री लख्ख चांदणे पडले म्हणजे मनात येई, हेच चांदणे हिमालयातील दऱ्याखोऱ्यांत किती सुंदर दिसत असेल, आणि चंद्राची हिमशुभ्र किरणे तेथील हिमधवल शिखरांना केवढी शोभा प्राप्त करून देत असतील? असे वाटते की, वयाची सतरा वर्षे पूर्ण होणाच्या आधीच्या त्या वयात अशा प्रकारचे जे तरंग मनात उमटत असत, त्यांच्या बुडाशी प्रवासाची आवड लपलेली होती.

### देश आणि विदेश

ही आपली आवड पुरी होण्यासाठी किती काळ वाट पाहावी लागेल, किंबहुना ती आयुष्यात कधी पुरी होईल की नाही, याबद्दल मन साशंक होते. प्राथमिक शाळेत शिक्षक होणे

किंवा एखादी कारकुनाची नोकरी मिळवणे यापलीकडचे अर्थार्जनाचे कोणतेही साधन दृष्टीच्या टप्प्यात त्या वेळी येत नव्हते. आमच्या कुटुंबातील मागची सारी पिढी कारकुनांची होती. त्यांचा पगार तेव्हा पंधरा रुपये असे, आणि पुणे-मिरज लोहमार्गाच्या प्रवासासाठी तीन रुपये लागत होते मग मोठा प्रवास कसा शक्य होता? वाचन मात्र चालू होते. शिवप्रभूंची स्वराज्यस्थापना आणि नंतरचा मराठेशाहीचा व पेशवाईचा सारा काळ ह. ना. आपटे, ना. ह. आपटे, नाथमाधव आणि वि. वा. हडप यांच्या कादंबऱ्यातून दृष्टीसमोर आला होता. न. चिं. केळकर यांचे 'मराठे आणि इंग्रज' व स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'हिंदुपदपादशाही' ही पुस्तके वाचली होती. बाप्पा रावळ आणि महाराणा प्रतापसिंह यांचा राजस्थान कर्नल टॉडच्या 'Annals and Antiquities of Rajasthan' या हजार-अकराशे पृष्ठांच्या ग्रंथात वास्तवाला थोडासाही धक्का लागू न देता मोठ्या रोमहर्षक शैलीत साकार झाला होता. ह. ना. आपटे यांची 'रूपनगरची राजकन्या', ना. ह. आपटे याची 'रजपुतांचा भीष्म', किंवा रमेशचन्द्र दत्त यांची 'जीवनसंध्या' या राजस्थानच्या इतिहासावर आधारलेल्या कादंबऱ्या मनाला भुरळ घालून गेल्या. मग कधीतरी मन चितोड आणि हळदीघाट येथे फेरी मारून येत असे. ह. ना. देशपांडे यांनी लिहिलेली 'राजपूत संस्कृती' आणि 'राजपूत राज्यांना उदय आणि ऱ्हास' ही पुस्तके आज कोणाच्या स्मरणात असतील असे वाटत नाही, पण ती फार अभ्यासपूर्ण होती.

मध्ययुगीन भारताचा इतिहास वाचला आणि भारताच्या अवनतीची काही कारणे ध्यानात आली. विजयनगरच्या साम्राज्याचे अपार वैभव साधार चित्रित करणारा एक सुंदर ग्रंथ तेव्हा हाती पडला होता, आणि ह. ना. आपटे यांची 'वज्राघात' ही कादंबरी त्या साम्राज्याचा विध्वंस कसा झाला याचे चित्र रंगवणारी होती. इतिहासाचे हे अवलोकन भारतापुरते मर्यादित राहिले नव्हते. फ्रेंच राज्यक्रांती आणि रशियातील साम्यवादी क्रांती यांचे इतिहास दृष्टीखालून गेले. आयर्लंडचा स्वातंत्र्यवीर टेरेन्स मॅकस्विनी याचे 'स्वातंत्र्याची मूलतत्त्वे' हे गुलामगिरीत असलेल्या देशांतील तरुणांना देशभक्तीची प्रेरणा देणारे अतिशय विचारपूर्ण पुस्तक होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जप्त झालेला 'जोसेफ मॅझिनी' गुपचूप हातात येईतो अद्याप दीड वर्षे उलटावयाची होती. पण गॅरिबाल्डी आणि जोसेफ मॅझिनी यांची चरित्रे वाचावयास मिळाली होती. त्या काळात मीही मनाने देशभक्तीत गुंतत चाललो होतो. आनंदमठ ही बंकिमचन्द्र चतर्जींची कादंबरी व तीमधील 'वंदे मातरम्' हे गीत यांनी एवढे वेड लावले होते की, त्यानंतर दोनतीन वर्षे पत्रे लिहिताना वरच्या बाजूस मी 'वंदे मातरम्' हे शब्द टाकत असे.

साने गुरुजींची पुस्तके डोळ्यांखालून गेली होती. हिंदू समाजाची संघटना हे शब्दही

त्यांना ऐकवत नसत, पण विनोबांची गीताप्रवचने त्यांनी शब्दबद्ध केली, आणि 'भारतीय संस्कृती' हे हिंदू संस्कृतीतील उदात्त मूल्याचे दर्शन घडवणारे अतिशय सुदर पुस्तक ते लिहून गेले होते. 'श्यामची आई' या त्याच्या पुस्तकाचा मनावर फार खोल परिणाम झाला होता. ''मातृदेवो भव'' या उपनिषदातील वचनाचा हुंकार त्यात उमटला होता, त्याचबरोबर त्यातील शोकतिकेकडे घेऊन जाणारी कथा मन हेलावून टाकणारी होती. त्या शोकांतिकेला दारिद्र्याचा पदर होता, पण संस्कार करण्याचे सामर्थ्यही होते. विवेकानन्दांची कोलंबो-आल्यमोरा व्याख्यानमाला एकीकडे प्राचीन भारतीय संस्कृतीची गौरवगाथा आणि दुसरीकडे गेल्या हजार-बाराशे वर्षाच्या अवनतीची भारताच्या आजच्या गुलामगिरीत झालेली परिणती, या दोहोचा खोलवर पोचणारा परिणाम मनावर करून गेली होती. असा हा आजचा आपला देश. त्याचा इतिहास बराचसा दृष्टीसमोर आला होता. त्यातील महत्त्वपूर्ण घटना जेथे घडल्या ती स्थाने आपण पाहिली पाहिजेत, अशी ओढ मनात होती. ती पुरी व्हावयाची तर प्रवास केला पाहिजे हे जाणवत होते. पण इतिहास जाणून घेण्यासाठी मिरजेच्या खरेमंदिराच्या ग्रंथालयातील पुस्तकांनी आधार दिला असला, तरी प्रवास करावयाचा तर पैसा हवा. हातात एक छदाम नव्हता, अशा परिस्थितीत केवळ मनातील ऊर्मीशी चाळा करीत राहणे आणि कल्पनेने ती स्थाने डोळ्यांपुढे उभी करणे यात मन दिलासा शोधत असे.

पण नियती अशी होती की, त्यानतर तीन वर्षे उलटत असताना मी देशभक्तीच्या भावनेने घर सोडून निघून जाणार होतो, सदैव अनिश्चित अशा वातावरणात आठदहा वर्षे वावरत असताना बऱ्याच उचापती हातून व्हावयाच्या होत्या, आणि पाचसहा वर्षे उलटण्याच्या आत खांद्यावर केवळ दोन पिशव्या टाकून हरिद्वारहृषीकेश ते म्हैसूर-बंगलोर आणि जयपूर-अहमदाबाद ते मोघीरकलकत्ता अशा विस्तीर्ण प्रदेशातील अर्धाअधिक भारत फिरणार होतो. तो सारा प्रवास कसाही अवचित घडत असे. खिशात पुरेसे पैसे नसल्यामुळे कोठेही एखाद्या मठात वा धर्मशाळेत, एखाद्या घराच्या बाहेरच्या बाजूच्या ओसरीत, किंवा लोहमार्गस्थानकाच्या फलाटावर पथारी पसरत असे. अनेक दिवस दुपारी पुरीभाजी घेऊन संध्याकाळी दोन केळी किवा खजूर-शेंगदाणे खाऊन वेळ भागवावी लागली. कोणत्याही मोठ्या शहरात उतरले की बहुतेक भाग पायी फिरून पाहताना दिवसाकाठी बारापधरा मैल हिंडत असे. पण ते ऐन तरुण वय होते, अशा गोष्टीचे त्या वेळी काही वाटत नाही शिवाय देशभक्तीच्या दिशेने जे काही मनात धगधगत होते त्यातील धडपडीचा एक भाग म्हणून हे सारे घडत असल्यामुळे हरएक स्थान पाहताना तेथील इतिहास समोर उभा राही आणि मग भारताचे विविध अंगांनी घडणारे हे दर्शन एक रोमांचकारक अनुभव होऊन जाई या भटकंतीच्या कथा नंतर मित्र माझ्याकडून ऐकत आणि त्या ऐकताना ते रंगून गेले आहेत हे पाहताना माझ्या आधीच्या आनंदात एक वेगळी भर पडे

अशा त्या काळात जे इंग्रज सरकार आपल्या मानेवर टाच रोवून उभे आहे आणि ज्या ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नाही असे म्हणतात, त्याची मूळ भूमी जी इंग्लंड ती आहे तरी कशी, तेथील समाज कसा आहे, आणि इंग्लंडच्या इतिहासात ज्या महत्त्वाच्या घटना घडल्या त्यांच्या जागा कशा आहेत, हेही पाहून आले पाहिजे असे क्वचित कधी मनात येऊन जाई कोणी कोणी क्रांतिकारक नौयानावर कोळसा भरण्यासारखे किंवा हमालीचे काही काम पत्करून इंग्लंडला गेल्याचे वाचनात आले होते. तसा विचार मनात तरळून जाई. पण त्या वयातही मन शुद्धीवर होते असे म्हणावयास हवे. कारण लगेच जाणवे की नौयानावरचे काम आपल्याला मिळणार नाही, मिळाले तरी झेपणार नाही, आणि एवढेही करून आपण इंग्लंडला गेलो तर तेथे खाणार काय आणि राहणार कोठे, या प्रश्नांची उत्तरे आपल्याजवळ नाहीत हे कळत होते. पण तरी निळ्या निळ्या आकाशाचा टोप ज्याच्या निळ्या निळ्या अथांग जलविस्तारावर सर्व दिशांनी टेकलेला आहे, अशा समुद्रातून सफर करण्याची ओढ वाटे. या इवल्याशा पृथ्वीवरील अनंताची चाहूल देणारा सागर असीम अशा विश्वाच्या अनंताची साक्ष पटवणाऱ्या आकाशाला चहू दिशांनी भेटत असतो. कितीही कोटी वर्षे असोत, पण या पृथ्वीला अंत आहे. येथील जीवनाला प्रकाश पुरवणारा आकाशातील तो सूर्य, तोही कधीतरी नाहीसा होणार आहे. पण ही पृथ्वी आणि तो सूर्य ज्या अनंत अवकाशातून भ्रमण करीत आहेत, त्या असीम आकाशाला अंत आहे असे म्हणता येईल काय?

समुद्रावरच्या सफरीचे स्वप्न रंगवताना मन असे अनंताचा यात्रिक होऊन जाई. याचा देशभक्तीशी काही संबंध नव्हता. पण निसर्गाचे एक वेगळे आणि विशाल रूप पाहावयास मिळेल एवढेच मनात होते. अशाच तंद्रीत केव्हातरी इंग्लंडला जाण्यासाठी नौयानाचे भाडे किती पडते हेही कोणाला तरी विचारले होते हे पक्के आठवते, पण हे आपण उगाचच विचारतो आहोत हे त्या वेळीही कळत होते याचीही आठवण आहे. हरिद्वार-हृषीकेशला वयाच्या सव्विसाव्या वर्षी प्रथम गेलो. तेथून चारपाच किलोमीटर दूर लक्ष्मण झूला होता. पन्नासबावन वर्षापूर्वी तो सारा परिसर अतिशय शांत होता. गंगेच्या काठाने लक्ष्मण झूल्याकडे चाललो असताना एक फारशी ठळक अक्षरांत नसलेली छोटीशी पाटी दिसली. तीवर लिहिले होते, ''बदरीकेदारका रास्ता.'' केवळ मंत्रमुग्ध होऊन मी त्या पाटीने दाखवल्या जाणाऱ्या रस्त्याकडे चारपाच मिनिटे पाहात उभा होतो. हा रस्ता बद्रीनाथ आणि केदारनाथ या स्थानांकडे घेऊन जातो, एवढी जाणीवच त्या अवधीत सारे मन व्यापून राहिली. हिमालयातील एकाहून एक उंच पर्वतप्रदेश मागे टाकण्यासाठी धड रस्ते नव्हते किंवा यात्रेकरूंना रात्रीच्या मुक्कामापुरता निवारा देणाऱ्या जागा नव्हत्या. बाबा काली कंबलीवाले हे

नाव ऐकले होते. त्याने प्रवाशांच्या सोयीसाठी अंतराअंतरावर काही चट्ट्या म्हणजे झोपडीवजा जागा उभारल्या आहेत, हे माहीत होते. हिमालयातील सारा प्रवास त्या काळात पायी करावा लागे. त्या यात्रेची माहिती देणारी एकदोन पुस्तके वाचली होती. पण कल्पनासृष्टीत कितीही भरारी घेतली, तरी वास्तवाचे थोडे फार भान ठेवण्याची सावधगिरी माझ्या मनात असे.

इंग्लंडला जाणे शक्य नाही, तो विचार मनात केवळ आला आणि गेला अनेकांचे असे होत असणार. पण हिमालयाचे तसे नव्हते. ते शक्यतेत होते, आयुष्यात कधीतरी ही यात्रा करता येईल असे मन सांगत होते. वाट पाहण्याची तयारी ठेवली पाहिजे, हे सारे त्या वेळी मनात येऊन गेले. पुढे बऱ्याच उशिरा का होईना पण आयुष्यात हे सारे प्रवास घडले. काश्मीरपासून दार्जिलिंगपर्यंतची हिमालयातील सारी महत्त्वाची स्थाने पाहण्यासाठी आठ वेळा हिमालयाचे दर्शन घेता आले तरी नेपाळची भूमी, तेथून दिसणारी अन्नपूर्णा शिखराची हिमाच्छादित रांग, गौतमबुद्धाच्या जीवनाशी संबद्ध असलेले लुंबिनी हे स्थान मनाला अद्याप साद घालत आहे. तो भाग राहून गेला आहे. पण जेवढे काही पाहता आले तेही कमी नाही. मन तृप्त आहे. हिमालयापासून रामेश्वर-कन्याकुमारीपर्यंत सारा भारत भरपूर पाहून झाला. काही काळ भटक्या अवस्थेत कोणत्याही प्रकारचा आधार वा आसरा नसताना झाला, तर प्राथमिक शिक्षकाऐवजी महाविद्यालयात प्राध्यापक होण्याचा योग आल्यामुळे आयुष्याच्या उत्तरार्धात सर्व सोयी व सुविधा यांचा उत्तम लाभ घेतही झाला. पण इंग्लंड, युरोप आणि अमेरिका यांचे काय? तो योग कधी येईल असे सत्तरी उलटून गेल्यावरही कधी वाटले नाही.

पण काही ना काही कारणाने हाती पैसा येत गेला. संसारातल्या सर्व जबाबदाऱ्या संपल्या असल्यामुळे आणि निवृत्त होऊन दहा वर्षे उलटल्यावर मायबाप सरकारने अवचितपणे निवृत्तिवेतन दिल्यामुळे आपण एकदम थोडेसे श्रीमंत झालो आहोत असे वाटून गेले. गरजेपुरता पैसा ठेवावयाचा, आकस्मिक कारणासाठी थोडा अधिक ठेवावयाचा, पण त्यानंतर हातात येणारा पैसा हा त्या त्या वेळीच खर्च करून त्यातून जीवनात सतत काही ना काही आनंद घ्यावयाचा; हे वळण आरंभापासून मनाला लागले होते. पैसा हा खर्च करण्यासाठी आहे, साठवून ठेवण्यासाठी नाही, ही मनाची पक्की धारणा होती, आणि सावध राहण्याची सवय असल्यामुळे जमा आणि खर्च यांचा मेळ घालता आला. घरच्या मूळ बिकट परिस्थितीमुळे हे सारे प्रवास आयुष्यात फार उशिरा घडले हेही खरे. पण त्यामुळे काय विघडते? न घडण्यापेक्षा उशिरा का होईना घडणे हे महत्त्वाचे अशी मनाची धारणा होती. अखेर चार वर्षांपूर्वी ध्यानात आले की, इंग्लंड-अमेरिकेच्या प्रवासासाठी लागणारे भाडे आपण खर्च करू शकू. स्वतःच्या बळावर तेथे एखाद्या विश्रामगृहात पैसे देऊन राहणे वा टॅक्सी करून कसेही फिरणे हे मात्र मुळीच शक्य नव्हते. पण कोणा कोणा मित्रांची मुले तिकडे होती. ती आतिथ्य करण्यास

मनापासून तयार होती. ही सोय जेथे होईल तेथेच जावयाचे, बाकीचे राहिले तर राहिले, हाही निर्णय मनाने घेतला. चौकशी सुरू केली, पण व्हिसा देण्याची लहर अमेरिकेच्या दूतावासाची लागली नाही, व १९९३ साली बेत ऐन वेळी बाजूला ठेवावा लागला. त्यानंतर तीन वर्षे उलटली. तोवर दर वाढले होते व हा विचार मनातून जवळजवळ मावळला होता.

## परदेशप्रवासाचा योग

पण एक तरुण मित्र, हृदयविकाराचा तज्ज्ञ असलेला, डॉ. अन्वय मुळे हा तीन वर्षे इंग्लंडमध्ये लीडस् येथे नोकरीसाठी होता. त्याने १९९५-च्या ऑगस्टमध्ये आपल्या वडिलांना माझा उल्लेख करून पत्रात लिहिले, "काकांनी माझ्याकडे काही दिवस राहण्यासाठी यावे अशी माझी इच्छा आहे. त्यांची प्रकृती कशी काय आहे? ते येतील का?" अन्वयचे वडील नाना, त्यांनी मला सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात माझा मनोदय विचारला. याला होकार देणे मला अवघड तर वाटले नाहीच, उलट परदेशप्रवासाची संधी चालून आली असे मनात आले. मग युरोपच्या प्रवासाबद्दल चौकशी केली, तर त्या देशांचा व्हिसा मिळण्यासाठी मेडिकल इन्शुअरन्स आवश्यक आहे, आणि वयाची सत्तरी संपल्यावर ते मिळत नाही, असे समजले. इतिहासातील घटना आणि कलाकृतींचे विश्व या दृष्टींनी युरोप फार महत्त्वाचा. थेट लिआनार्दो द व्हिन्सीपासून सॉक्रेटिसपर्यंत घेऊन जाणारा. पण तो विचार बाजूला ठेवावा लागला. अन्वयचे चुलते आणि पुण्यातील दीनदयाळ स्मारक रुग्णालयांचे संचालक डॉ. मुळे मला म्हणाले, "अन्वयकडं जात असाल, तर अमेरिकेचा प्रयत्न करून पाहा," मग ती चौकशी केली. फारशी अपेक्षा नव्हती, कारण एकदा नकारघंटा ऐकली होती. पण तो व्हिसाही मिळून गेला. विदेशसंचाराचा योग आला तो असा. सतराव्या वर्षी केवळ मनात तरळून गेलेला विचार वयाला सत्त्याहत्तर वर्षे उलटून गेल्यावर प्रत्यक्षात उतरण्याचा योग आला होता. हेही खरे की, त्या कल्पनेचे त्या वेळी जे एक अद्‌भुत म्हणावे असे आकर्षण होते ते आता शिल्लक उरले नव्हते. वाढलेल्या वयाचा जसा तो एक परिणाम होता, तसाच भारताच्या बदललेल्या परिस्थितीचाही होता.

देशाची जी काही प्रगती किंवा सुधारणा झालेली आपल्याला आज दिसते, तीमुळे पूर्ण संतुष्ट होऊन जावे असे कोणाही विचारी माणसाला वाटत नाही, हे एक कटू वास्तव आहे. अनेकांचा अपेक्षाभंग झालेला आहे, कित्येक देशभक्तांनी मनाशी रंगवलेली उज्ज्वल स्वप्ने पार उद्‌ध्वस्त झाली आहेत. त्यात वैफल्यापोटी पहिली आत्माहुती दिली ती अतिशय संवेदनशील पण तेवढ्याच हळव्या मनाच्या साने गुरुजींनी १९५० साली. स्वातंत्र्य मिळून

केवळ तीन वर्षे उलटली होती. तेवढ्या अवधीतच त्यांचा भ्रमनिरास झाला. तो भ्रमनिरास आता एक स्वाभाविक वास्तव वाटावे आणि अपेक्षाभगाची वेळच येऊ नये, अशा स्थितीला देश येऊन पोचला आहे. काही व्यक्तीना तर आपला देश अराजकतेकडे चाललेला नाही ना, असे भय आज वाटत आहे. पण हे सारे खरे असले, तरी ज्यांनी रस्त्यावरून चाललेली मोटार प्रथम पाहिल्यावर वाटलेले नवल, किवा झुकझुक करीत धुराचे भपकारे सोडत चाललेल्या आगगाडीतून केलेल्या पहिल्या प्रवासाच्या वेळी वाटलेले आश्चर्य आपल्या मागच्या पिढीतून ऐकले आहे, त्यांना आता कितीएक नवनव्या गोष्टी वेगाने भारतात येत असताना पाहावयास मिळत आहेत.

विमानाचा प्रवास असे म्हटल्यावर डोळे विस्फारून पाहात राहावे, किंवा पोलादाचा कारखाना हे शब्द ऐकल्यावर एकदम आपल्या देशाच्या मागासलेपणाची बोचक जाणीव व्हावी, अशी स्थिती आता राहिलेली नाही. लुना किंवा स्कूटर अशी साधी स्वयंचलित वाहने आता रस्त्यावरील गर्दीचा विषय झाली आणि विजेचे दिवे ही गोष्ट आता खेडेगावातही नवलाईची राहिलेली नाही. अनेक कारखान्यांच्या आवारात दिसणाऱ्या सुंदर आखीव रचनेच्या बागा किंवा ठिकठिकाणी लावली जाणारी झाडे, ही सौंदर्यदृष्टीबरोबरच निसर्गाशी नाते जोडण्याच्या आधुनिक पर्यावरणाची जाग समाजात मूळ धरत आहे, याची खूण पटवीत आहेत. पदवीधर तरुण ही साठ वर्षापूर्वी कौतुकाचीच बाब होती, आणि डॉक्टर किंवा इंजिनिअर ही तर फार मोठी प्रतिष्ठा देणारी गोष्ट होती. आता त्या कल्पनेतून वरच्या वर्गातील लोक तर बाहेर पडले आहेतच, पण खालच्या वर्गातील लोकांना पदवी ही सामाजिक प्रतिष्ठेची एक खूण वाटण्याची भावनाही पुढच्या दहापंधरा वर्षांत नाहीशी होणार आहे, आणि आपण शिकलो हे खरे पण खरोखरी काही ज्ञान प्राप्त करून घेतले का, या प्रश्नांची जाग त्यांच्या मनात उत्पन्न होण्याच्या दिशेने वाटचाल होत आहे.

स्वातंत्र्य मिळाले हे खरे, पण जगातील राष्ट्रांच्या तुलनेने आपण काही मानाचे स्थान प्राप्त करून घेतले का, हा प्रश्न आज विचारी माणसाच्या मनात आहे. भौतिक सुखाची सारी साधने आहेत, पण आपण खऱ्या अर्थाने सुसंस्कृत झालो आहोत का, किंवा कोणत्याही निमित्ताने कोणातरी वर्गाचा द्वेष करण्यावरच आपण आपल्या अस्तित्वाचा वा चळवळीचा पाया उभारण्यात दोन पिढ्या खर्ची घातल्या, पण त्यामुळे आपण खऱ्या अर्थाने वर आलो आहोत का, असे आत्मपरीक्षणाचे प्रश्न, स्वातंत्र्यानंतर ज्यांना शिक्षणाचे व प्रगती करून घेण्याचे सारे दरवाजे कायद्याने खुले झाले, त्या प्रचंड संख्येने असणाऱ्या आजवर सर्वथा वंचित आणि उपेक्षित राहिलेल्या वर्गातील लोकांची आणखी एक पिढी उलटल्यावर त्यांनाच पडणार आहेत. ते पडतील तेव्हा समाजाच्या सर्वांत खालच्या थरांमध्ये आत्मपरीक्षण होऊ

लागेल, आणि खऱ्या अर्थाने हा भारतीय समाज उन्नत समाजजीवनाकडे वळेल. त्यासाठी अजून काही काळ वाट पाहावी लागणार आहे, पण हे सारे घडणार यात शंका नाही. या देशातील समाजाचे आंतरिक सत्त्वच त्याला त्या दिशेने घेऊन जाणार आहे. वाद आहेत, भांडणे आहेत, द्वेष आणि मत्सर आहेत, आणि राजकीय लाभाच्या पोटी आपापल्या गटाचे वा जातीचे वेगळेपण जपण्याचे प्रयत्न आहेत. त्याचे निकटचे परिणाम बरे असणार नाहीत हेही खरे आहे शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार अखेरचा टप्पा गाठेपर्यंत आणि ते शिक्षण पचनी पडून खऱ्या ज्ञानाची जाणीव झाल्यावर मग ही विकासाची आंतरिक प्रक्रिया सुरू होणार आहे. भौतिक विकासाची अत्याधुनिक साधने जगाच्या बाजारातून कोठूनही विकत आणता येतात, पण सांस्कृतिक मूल्ये माहीत झाली तरी ती आत्मसात व्हावी लागतात. ती प्रक्रिया सावकाशीने होते, पण आपण त्या दिशेने जाणार आहोत. हे सारे घडून येण्यास अद्याप शेदीडशे वर्षेही लागतील. पण युरोपीय देशांतून झालेली जागृतीही शंभरदीडशे वर्षात झालेली नाही. ती होताना तेथेही काही कमी उत्पात झालेले नाहीत. तशा चुका करीत व ठेचा खातच जगातील सारे समाज हळूहळू प्रगत होत आले आहेत. आपल्या देशातील प्रगतीची प्रक्रियाही तशीच राहणार आहे. पण प्रगती होते आहे. खालचे वर्ग जागे झाले आहेत व विचार करू लागले आहेत. ही त्याचीच एक महत्त्वाची खूण आहे.

त्याचबरोबर इंग्लंड किंवा अमेरिका ही नुसती नावे ऐकली, किंवा कोणीतरी इंग्लंडरिटर्नड् आहे हे ऐकले की, त्याच्याकडे विस्मयाने पाहात राहावे, किंवा तो कोठेतरी नंदनवनात जाऊन आला आहे असा भाव मनात उत्पन्न व्हावा, अशी स्थिती आता थोडीशीही उरलेली नाही. आपण परदेशी जाऊन आलो याचा आवर्जून किंवा अभिमानाने उल्लेख करावा, ही ऊर्मीही सुशिक्षित वर्गात कमी होत आहे, आणि कोणी इंग्रज वा अमेरिकन मनुष्य आला तर त्याच्यासमोर आपले मन दबकलेले असावे, ही स्थिती आपण ओलांडली आहे. प्रवासाची साधने वाढली आहेत आणि प्रवृत्तीही वाढली आहे. दूरदर्शनमुळे तर क्रांतीच झाली आहे. १९५५ साली दिल्लीत एक औद्योगिक प्रदर्शन भरले होते. त्या वेळी आपल्याकडे नुकता कोठे काही घरांतून रेडिओ दिसू लागला होता. इंग्लंड, जर्मनी, जपान, अमेरिका अशा देशांच्या विभागांमध्ये ठेवलेला दूरदर्शनचा संच आणि त्यावर दिसणारी प्रतिमा त्या प्रदर्शनात फिरणारे भारतीय अतिशय कुतूहलाने पाहात होते. आता खेड्यातील माणसालाही एखाद्या सार्वजनिक ठिकाणी दूरदर्शनवर उद्याची हवा कशी राहणार आहे किंवा भारताच्या राजधानीत वा संसदेत आपणच निवडून दिलेले आपले प्रतिनिधी किती केविलवाणे आणि शरमिंदे करणारे वर्तन करीत आहेत, हे ऐकावयास आणि पाहावयास मिळते.

हा तपशील असाच आणखीही वाढवता येईल. त्याची आवश्यकता नाही. आता

देशविदेशाचे प्रवासवृत्त वाचताना तेथील स्थळाच्या वर्णनाचे आकर्षण उरलेले नाही. तिकडची सारी हालचाल दूरदर्शनच्या पडद्यावर दिसते आणि वैज्ञानिक प्रगतीतील झेपही साक्षात डोळ्यांसमोर उभी राहते. या सर्व घटनांचा खरा अर्थ काय आहे, हे सारे जगाला कोठे घेऊन जाणार आहे, आणि आपल्या देशाच्या प्रगतीशी या सर्वाचा कशा प्रकारे संबंध येतो, अशा विचाराकडे परदेशप्रवासाबद्दल बोलताना व ऐकताना आता सुशिक्षित वर्ग वळत आहे केवळ शहरे, कारखाने, प्रयोगशाळा किवा वस्तुसंग्रहालये यांची वर्णने आता कोणी कुतूहलाने वाचत नाही. ते आकर्षण झपाट्याने ओसरत चालले आहे. एखाद्याने इंग्लंडमध्ये किवा अमेरिकेत काय पाहिले, हा व्याख्यानाचा विषय राहिलेला नाही. तिकडच्या समाज पाहिल्यावर आपल्या देशाबद्दल, त्याच्या सद्य:स्थितीबद्दल आणि भवितव्याबद्दल काय वाटले, हा आता जिज्ञासेचा विषय झाला आहे.

हे वाटणे किंवा अशी काही प्रतिक्रिया ही व्यक्तीव्यक्तीप्रमाणे निराळी असू शकते. हर एक व्यक्तीजवळ काही अनुभवाचे संचित असते, आणि तिचा असा एक जीवनविषयक दृष्टिकोण असतो. त्यांची छाया अशा प्रवासात जे काही पाहावयास मिळते त्यामुळे मनावर उठणाऱ्या तरंगांवर पडणे अपरिहार्य असते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीचे होणारे मतप्रदर्शन हे इतरांना पटले पाहिजे अशी अपेक्षा करता येत नाही. पंचाहत्तरी उलटलेल्या माणसाचे भावनाविश्व आणि विचारांचे जग ही आताच्या वर्तमानकालातील वातावरणाशी नाते राखू शकतीलच असे नाही. अशा मागच्या पिढीतील व्यक्तीच्या प्रतिक्रिया कालबाह्य आहेत, आणि त्या विचारात घेण्यासारख्या नाहीत, असे एकविसाव्या शतकाची चाहूल लागलेल्या आताच्या तरुणाला वाटले, तर त्यातही अनपेक्षित असे काही नाही. पण त्या पिढीलाही थोडेसे मनोरंजन किंवा एक साधी नोद म्हणून अशा लेखनाकडे पाहता येईल.

प्रस्तुत लेखनाच्या मर्यादांकडेही थोडे लक्ष वेधणे आवश्यक आहे. परदेशप्रवास ही गोष्ट एकदम आकर्षक वाटणारी आहे. माझा प्रवास फार फार मर्यादित आहे त्याचा कालावधीही छोटा आहे. अशा धावत्या प्रवासात जे काही समोर येते, तेवढ्या आधारावर कोणत्याही समाजाचे अंतरग आपण समजून घेऊ शकतो; असा थोडासाही भ्रम लेखकाच्या मनात नाही. त्यातही हा प्रवास दोन देशांपुरताच आहे. पण आजच्या आधुनिक पाश्चात्त्य जगाचे ते प्रतिनिधी आहेत. पुस्तकाच्या नावातील चितन हा शब्द भारदस्त आहे फार खोलवर अशा चिंतनाचे सामर्थ्य आपल्याजवळ आहे, असे लेखक मानीत नाही चिंतनामागे ज्ञान आणि अनुभव यांचे काही बळ उभे असावे लागते. ज्ञानाचे क्षेत्र तर आज नित्य विस्तारत चालले आहे, The expanding universe हा खगोलशास्त्रातील शब्दप्रयोग आजच्या ज्ञानविश्वाला सहज लावता येईल. आणि अनुभव? मानवाच्या अनुभवांचे विश्व अमर्याद आहे हे ललितवाङ्मयातील

बहुरंगी चित्रणाकडे लक्ष टाकले, तर तात्काळ ध्यानात येते. एक साधेसुधे जीवन काहीशा जाणीवपूर्वक व्यतीत करीत आलेल्या व थोडीफार चौकसबुद्धी असलेल्या एका सामान्य माणसाचे चिंतन येथे आढळेल. ते चिंतन जिकडे वळेल तिकडे वळेल म्हणून मुक्त हे विशेषण त्याच्यामागे टाकलेले आहे. एक प्रकारे विषयाच्या बंधनातून लेखकाने स्वतःची सोडवणूक करून घेतली आहे. एखाद्या छोट्याशा सहलीला आपण कधी कधी जातो. त्यात एकमेकांशी बोलताना काही जुन्या आठवणी निघतात, काही वर्तमानकालातील प्रश्न निघतात, आणि थोडीफार विचारांची देवाणघेवाण होते. आपण ते सारे नंतर विसरूनही जातो. या लेखनाचे स्वरूपही काहीसे त्या प्रकारचेच आहे; हे स्वीकारले तर वाचकांचा अपेक्षाभंग होणार नाही.

# २. ही इंग्लंडची भूमी

एकवीस सप्टेबर १९९६ या दिवशी पहाटेच्या पूर्वी किवा दुसऱ्या शब्दांत वीस सप्टेबरची मध्यरात्र उलटल्यावर पाऊण वाजता मुंबईच्या सहार विमानतळावर ब्रिटिश एअरवेजच्या लंडनला जाणाऱ्या विमानात मी आसनस्थ झालो. त्याआधी विमानतळावर प्रवेश करताना दाराशी नातेवाइकांचा निरोप घेतला होता. ऑगस्ट संपत असताना मी वयाची सत्याहत्तर वर्षे पूर्ण केली होती. घरच्या माणसांना थोडीफार काळजी वाटावी हे स्वाभाविक होते. ''मी प्रकृती जपेन, काहीही चिंता करू नका,'' असे आश्वासन त्यांना दिले आणि त्यांचा निरोप घेऊन विमानतळावरील उतारूंच्या भागात प्रवेश केला. इंग्लंडमध्ये पंधरा दिवस आणि अमेरिकेत एक महिना असा प्रवासाचा कालावधी डोळ्यांसमोर होता. माझा मूळ बेत होता त्यापेक्षा या प्रवासासाठी निघण्यास मला एक महिना विलंब झाला होता. अमेरिकन कॉन्सुलेटचे कार्यालय ऑगस्ट तेरा-चौदापासून तीन सप्टेबरअखेर अनपेक्षितपणे बंद राहिले आणि व्हिसा मिळण्यास उशीर झाला. पण उशीर झाला असला तरी व्हिसा मिळाला याचा आनद होता. कारण तीन वर्षे आधी व्हिसा नाकारला गेला होता. सारे कागदपत्र व्यवस्थित होते तरी पण या वेळी एकही कागद उघडून सुद्धा पाहिला गेला नाही. वय किती, कशासाठी जाणार व किती दिवस राहणार, असे जुजबी प्रश्न विचारले गेले.

### इतर राष्ट्रांची सावधानता

खिडकीवरील कर्मचाऱ्याने माझ्या हातात बरेच कागद आहेत एवढ्यावर सारे ठीक आहे असे मानले होते आणि व्हिसा मिळून गेला होता. हे सारे अशासाठी लिहिले की, अलीकडे बारा-पधरा वर्षात व्हिसा मिळण्याच्या बाबतीत फरक पडत चालला आहे. यामागे अनेक कारणे आहेत असे जाणकारांकडून ऐकले. युरोप-अमेरिकेतील अनेक देशांत नागरिकांसाठी विशेष वैद्यकीय सेवा उपलब्ध आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी त्या अधिक प्रमाणात उपलब्ध आहेत. कोणत्या तरी मार्गाने तिकडे प्रवेश मिळवून याचा गैरफायदा घेणारे अनेक लोक आहेत. दहशतवादी टोळयांच्या कारवाया हे आणखी एक कारण आहे. त्याचबरोबर आपल्या देशात

परकीय नागरिक किती सख्येने येऊ द्यावेत याबद्दल सारे देश दक्ष आहेत. अमेरिका हा देश विस्ताराने भारताच्या अडीचपट आहे, आणि तेथील लोकसंख्या मात्र भारताच्या एक चतुर्थांशही नाही. तरीही गेली काही वर्षे त्यांचे व्हिसाबाबतचे धोरण अधिक अधिक कडक होत आले आहे

आपल्या देशाच्या सर्वांगीण रक्षणासाठी हे सारे प्रगत देश असे सावध आहेत. या तुलनेने आपली काय स्थिती आहे, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. सीमाप्रदेशाकडे दुर्लक्ष असणे हा भारतीयांचा कित्येक शतकांचा दुर्गुण आहे अल्लाउदीन खिलजी दिल्लीहून सैन्य घेऊन निघतो, सारा मध्यभारत ओलांडतो, खानदेशच्या भागात प्रवेश करतो, आणि वेरूळच्या बाजूने येऊन देवगिरीच्या किल्ल्याला वेढा घालतो. एवढे सारे घडेतो रामदेवराय यादवाला त्याची वार्ताही नसते. देवगिरीचा किल्ला आपण आज पाहिला, तर सातशे वर्षांपूर्वी तो केवळ अभेद्य होता हे सहज ध्यानात येते. तो किल्ला एका छोट्याशा टेकडीवर आहे. प्रत्यक्ष किल्ल्याला तर भक्कम तट आहेच, पण भोवतालच्या सपाट प्रदेशातही एकानंतर एक तीन तरी तट होते. त्या तटाच्या खुणा आजही दिसतात. इतके सारे असून शत्रू थेट किल्ल्यासमोर येऊन उभा राहेतो राज्याच्या स्वामीला आक्रमणाची चाहूलही असू नये आणि त्याच वेळी किल्ल्यावर सैनिकांसाठी पुरेसा धान्याचा साठा असू नये, हे केवळ बेबंदशाहीचे लक्षण आहे

अशा स्थितीत यादवाचे साम्राज्य त्यानंतर केवळ वीस वर्षांत चार लढाया होऊनही, त्या सर्वांमध्ये तितकेच दुर्लक्ष केल्यामुळे, कोसळून पडले यात नवल नाही. त्यांतल्या एकाही लढाईच्या वेळी आधीचा पराभव ध्यानात घेऊन त्यातील अनुभवापासून काही शिकण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांनी केल्याचे दिसत नाही. अडीचशे वर्षांचे यादवांचे साम्राज्य बघता बघता अस्तंगत झाले, हा परकीय आक्रमकांच्या शौर्यापेक्षाही त्या आक्रमणशीलतेला आपल्या राज्याचे रस्ते पूर्ण मोकळे ठेवण्याचा अधिक परिणाम आहे. इतिहासातील या उदाहरणांपासून आपण आजही काही शिकलो आहोत का, हा प्रश्न शांतपणे स्वतःचा स्वतःला विचारावा असा आहे मला तीन वर्षे आधी व्हिसा नाकारला गेला, त्या वेळी मनाला थोडी निराशा वाटली हे खरे, पण एकंदरीत जो अनुभव आला होता आणि इतरांना आलेले अनुभव ऐकले होते, त्यावरून हे इतर देश आपल्या तुलनेने किती जागरूक आहेत, हा विचार माझ्या मनात प्रकर्षाने आला होता. पण हेही खरे की, एकदा नकार मिळाला असल्यामुळे या वेळी विमानात आसनस्थ होताना थोडे अधिक समाधान वाटले.

पण त्या समाधानालाही एक खारटतुरट चव होती. आपला देश स्वतंत्र झाला त्याला या वर्षी पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. पण याचाच अर्थ असाही आहे की, आधीच्या देशाची

फाळणी झाली आणि आधीचा भारत व फुटून निघालेले पाकिस्तान असे दोन देश अस्तित्वात आले. जे एका भूमीत राहात असताना दंगली करून वेगळे झाले, ते नंतर आपल्याला शत्रू मानणार हे स्पष्ट होते. पण आपल्या उर्वरित भारताचे आपण रक्षण करू शकू अशा प्रकारे दोन देशांच्या सीमा निश्चित केल्या गेल्या पाहिजेत, या मुद्द्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले गेले त्याची फळे आजही आपण भोगत आहोत. सीमेवर अनेक ठिकाणी आक्रमण होते, कोठूनही कोणीही आत येऊ शकतो, आणि अधूनमधून गोळीबार होऊन क्वचित सैनिकांची आहुती पडते. पण त्याचा काहीही विषाद सुखाने दोन वेळचे जेवण घेणाऱ्या भारतीय नागरिकांच्या मनात नसतो, नेत्यांनाही त्याची काही फिकीर वाटताना दिसत नाही. सत्तेवर असणाऱ्यांनाही ती वाटत नसावी.

दोन निराळे देश आपण ब्रिटिश राजसत्तेशी केवळ एक करार करून निर्माण केले, आणि एका रात्रीत कालपर्यंत आपले देशबांधव असलेले सिंध, पंजाब आणि बंगाल प्रांतांतील आपलेच लोक आपल्याला परके होऊन गेले. पाकिस्तानमधील तेव्हाचे राज्यकर्ते आपल्या सत्तेखाली आलेल्या प्रदेशातील हिंदूंना केवळ त्यांचा धर्म वेगळा म्हणून संपूर्ण अन्यायाने वागवू लागले त्यांचा रक्षणकर्ता कोण, हा कधी आपल्या गंभीर विचाराचा विषय झाला नाही. चीनशी पंचशील करार केला त्याचा आम्हाला एवढा मोह पडला की, कितीएकांनी आपल्या नव्या घरांना पंचशील हे नाव दिले परक्या देशातील राज्यकर्त्यांशी बोलणी करताना ते प्रतिनिधी सदैव स्वतःचे हित जपत असतात, आणि कोणत्याही क्षणी आधीच्या कराराला केराची टोपली दाखवू शकतात, हे राजकीय व्यवहारातील साधे सत्य आपल्याला कधी उमगले नाही. काश्मीरमधील १९४७- च्या स्वातंत्र्यापाठोपाठ सुरू झालेले युद्ध थांबवताना लष्करी दृष्टीने मोक्याचे असलेले हाजीपीर हे ठिकाण संरक्षणविषयक तज्ज्ञांचा व सेनापतीचा सल्ला न मानता आपण खाली केले

लष्करातील जवान कशासाठी आणि कोणासाठी आपले प्राण पणाला लावतात, हा विचारही आपल्या भल्याभल्या नेत्यांच्या मनात कधी आला नाही, आणि आला असेलच तर परराष्ट्रीय व्यवहारात त्याचे प्रतिबिंब कधी उमटलेले दिसले नाही. आपल्या देशात कोण येतो आणि येथे येऊन काय करतो, याची खबरही आपल्याला नसते, हे एक कोणालाही सहज कळावे असे भीषण सत्य आहे या साऱ्याचे परिणाम आपल्याच देशाच्या नागरिकांना भोगावे लागतात. त्यांची मालमत्ता नाहीशी होते, एवढेच नव्हे, तर स्त्रियांची अब्रूही सुरक्षित राहात नाही, असे विषण्ण करणारे चित्र गेल्या पन्नास वर्षांत अनेक प्रसंगी दिसत आले आहे समर्थ रामदासांसारख्या साक्षेपी महंताचा उद्गार आहे, ''मोठे ते पाप लोकांचे प्रभू तो जाणता नव्हे।'' व्हिसाचा अनुभव घेताना मनावर ठसा उमटला तो इतर देशांच्या राज्यकर्त्यांकडून या बाबतीत



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू- प्रवास
९१
वा. क्र. २९८८०
५।७।९८
शाखा

आपण किती शिकण्यासारखे आहे याचा. पण राजकारणातील खेळात मग्न असलेल्या पुढाऱ्याना ते शिकण्यासाठी सवड नाही, असेच म्हणावयास हवे.

### मध्यमसे आसन, छोटीशी खिडकी

याआधीच्या आयुष्यात भारतात मी केवळ दोन वेळा विमानाने प्रवास केला होता परदेशचा प्रवास हा पहिलाच होता. साडेतीनचारशे उतारूंचे विमान होते. आसनावर बसलो आणि थोडी निराशा झाली. आसन सुखावह होते हे खरे, पण ते आपल्याकडील आरामगाडीतही आता असते. तेवढाच आराम यातही होता, एकच गोष्ट अधिक होती ती म्हणजे तीन प्रवाशांत मिळून एक दूरभाष होता. पण आसनाची जागा आपल्याकडील राज्य परिवहन मडळाच्या साध्या गाडीत असते तेवढीच होती. माझी देहयष्टी छोटी आहे. अनेक प्रवासी इकडून तिकडे जात होते, कोणी आपली जागा शोधत होते. त्यांतील बहुसंख्य चणीने भरदार होते, तर काही चांगले जाडजूड होते. मनात येऊन गेले की, तसा एखादा प्रवासी या आसनावर बसला तर रेसभर हलू तर शकणार नाहीच, पण कदाचित त्याला आसनावरून उठताही येणार नाही. अगदी ठाकठीक असलेल्या अभ्र्यातून उशी किंवा तक्क्या बाहेर काढावा लागतो, तसा त्या जाडजूड प्रवाशाला आपला देह या आसनातून सोडवून घ्यावा लागेल. एवढ्या दीर्घ प्रवासाच्या दृष्टीने ही विमानकंपनीने मोठीच काटकसर केली आहे असे मनात आले.

माझी जागा खिडकीपासून दुसरी होती. एक बाजूस वीस मिनिटांनी विमानाने आकाशात भरारी घेतली. अफाट पसरलेल्या मुंबईतील रस्त्यांवरच्या दिव्यांचा तेवढाच अफाट पसारा विमानातून फार आकर्षक दिसतो, असे मी ऐकलेले होते. विमान वर गेल्यावर मी मोठ्या कुतूहलाने खिडकीतून बाहेर पाहण्याचा प्रयत्न केला. प्रयत्न हा शब्दच योग्य आहे, कारण बाहेरचे काहीही दिसत नव्हते, आणि खाली जमिनीच्या दिशेने दृष्टी वळवली तरी काहीही दिसले नाही. याचे कारण खिडकीचा आकार फारच लहान होता. तीमधून काही दिसणे शक्यच नव्हते. खिडकीजवळच्या उतारूला थोडेफार दिसले असावे. हिमालयात सहासात हजार फूट किवा अकराबारा हजार फूट उंचीवर गेल्यावर रात्रीच्या वेळी आकाशात दृष्टी टाकली, तर सारा नभोमंडप झळाळणाऱ्या ताऱ्यानी भरून गेलेला दिसतो. हवा अधिक स्वच्छ असल्यामुळे तारे झगमगत असतात. एरवी शहरातून पाहताना धूसर दिसणारे कृत्तिका नक्षत्र किंवा आकाशगंगेचा विशाल पट्टाही तेजःपुंज दिसतात. माझी अपेक्षा अशी होती की, विमान तीस-पस्तीस हजार फूट उंचीवरून जाणार, तेव्हा आपल्याला ग्रहनक्षत्राचे मनोहर दर्शन घडेल. पण तसे काहीही दिसले नाही. कारण खिडकीतून आकाशाचा फारच लहानसा

तुकडा दृष्टीत येत होता. एकंदरीत आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या विमानातील आसने आणि खिडक्या अशा असतात, एवढी नोंद करून स्वस्थ डोळे मिटले. त्या वेळी हातातील घड्याळात पावणेदोन वाजले होते

मध्यंतरी एकदाच जाग आली, पण लगेच झोप लागली. सकाळी जागा झालो तेव्हा सकाळचा चहा आला होता. सारे प्रवासी चहा किंवा कॉफी घेत होते. मी तर चूळही भरली नव्हती, आणि नीट तोंड धुतल्याशिवाय आपल्याला तोंडात काही टाकण्याची सवय नसते. पण तोंड वगैरे धुऊन येण्यास सवड नव्हती. पंधरावीस मिनिटांत लंडन येणार अशी घोषणा झाली होती. इंग्रजी रीतिरिवाजानुसार सकाळी बिछान्यावरून उठण्याच्या आधीच चहा घेतात, अशा आशयाचा बेड टी हा शब्द कानांवरून गेला होता. इंग्रजीतच म्हण आहे, "Behave like a Roman when you are in Rome", म्हणजे आपण रोममध्ये असू तर रोमन लोक वागतात तसे वागावे. ते ध्यानात घेतले आणि न्याहरीचा आदर केला. हवाई सेविकांपैकी एक भारतीय होती. त्यामुळे थोडे बरे वाटले. विमानातून उतरल्यावर प्रथम बॅग ताब्यात घेतली. एक मोठी बॅग आणि एक खांद्यावरची एवढेच सामान जवळ होते. केवळ प्रवास हा हेतू होता, तेव्हा आवश्यकतेपेक्षा अधिक सामानाची गरज नव्हती. इंग्लंडअमेरिकेत थंडी असणार हे माहीत असल्यामुळे स्वेटर वगैरे घ्यावे लागले होते. तसे नसते तर हे ओझे आणखीही कमी करता आले असते.

सामान घेऊन जाणारा हमाल कोठेही असणार नाही आणि लोहमार्गाची स्थानके किंवा विमानतळ येथे इकडून तिकडे जातानादेखील बरेच अंतर चालत जाण्याची वेळ येते. तेव्हा आपले सामान आपल्याला नेता आले पाहिजे, हा सल्ला मिळाला होता. त्या दृष्टीने चाके असलेली बॅग घेतली होती. पण अनेक प्रवासी आपल्या बॅगा इकडून तिकडे नेताना पाहिले. त्यांत स्त्रियाही होत्या. अतिशय सुलभतेने नेता येणाऱ्या अशा उत्कृष्ट बॅगा आणि त्यांतील काही बॅगांना वरच्या बाजूने सहज धरता याव्यात अशा बाहेर काढता येणाऱ्या दांड्या असलेल्या पाहिल्या. साखळीला बांधलेले कुत्रे आपल्या मागून येते तशी कोणाकोणा प्रवाशाची बॅग निमूटपणाने त्याच्या मागून चाललेली पाहिली मनात आले, ही फारच चांगली सोय आहे, आपण थोडी अधिक चौकशी करावयास हवी होती. हे मनात येण्याला कारणही होते. माझ्या बॅगला पट्टा होता, पण तो लंडनच्या विमानतळावरच तुटला तरी विशेष त्रास झाला नाही ही गोष्ट वेगळी हरएक विमानाचे सामान कोठे मिळते त्याची सूचना असते. तेथे सरकत्या पट्ट्यावरून बॅगा चाललेल्या असतात. तीनचारशे उतारू विमानात होते, तेव्हा बॅगाही मोठ्या संख्येने असणे स्वाभाविक असते. बॅग सरकत्या पट्ट्यावरून येताना पाहिली आणि नंतर ती घेऊन सरकत्या जिन्यावरून जाण्याचा अनुभवही लगेच घेतला या जिन्यावर पहिले पाऊल

कसे टाकतात आणि अखेरचे पाऊल कसे टाकतात हे इतर प्रवाशाकडे लक्ष ठेवून ध्यानात घेतले तरीही अखेरच्या पायरीशी थोडासा झटका बसलाच. हा सारा सवयीचा भाग असतो, फार अवघड तर नसतोच पण सावध असावेच लागते. मी सावध राहणे अधिक आवश्यक होते. कोठेतरी पडणे वा पाय मुरगळून घेणे अशी साधी आपत्तीही मला परवडणारी नव्हती. परदेशात होतो आणि एकटा होतो. आपले हातपाय नीट काम करीत राहतील यावर लक्ष ठेवणे वयाच्या दृष्टीने अधिक आवश्यक होते. त्यामुळे आरंभी आरभी कोणतीही गोष्ट करताना मी दोन मिनिटे थांबत असे. प्रकृतीची काळजी घेणे हेही महत्त्वाचे होते. ताप किंवा साधी सर्दी किंवा पडसे हे प्रवासात बाधा आणणारे होते. जपणे आपल्या स्वाधीन आहे, उरलेले ईश्वराधीन होते. जपण्याचे काम मी केले, ईश्वरानेही आपले केले व ते मला अनुकूल राहिले

सतत गावे बदलत राहणे व हिंडत राहणे यामुळे थकवा येतो, क्वचित कंटाळा येतो, किंवा मनच शिणून जाते. यांतील काहीही माझ्या वाट्याला पन्नास दिवसांच्या या प्रवासात आले नाही. थकवा न वाटण्याचे मुख्य कारण थंडीची हवा. एकदा भरपूर कपडे चढवले की, थंड हवेत शिणवटा जाणवत नाही. शिवाय सर्वत्र घरे वातानुकूलित, त्यामुळे तर सारेच सुखकारक होऊन जाते. रस्त्यावरून फिरताना मात्र आपल्याकडे काश्मीरच्या वा हिमालयातील थंड हवेच्या ठिकाणी आपण काळजी घेतो त्याहून अधिक जपावे लागले. पाश्चात्त्य देशांत आईसक्रीम भरपूर असते असे ऐकले होते. मला आईसक्रीम विशेष प्रिय. भरपूर खाऊन घेऊ असे मनात होते. थंड पेये नाना प्रकारची असतात. पण लंडनला उतरताच तेथील थंडी पाहिली आणि ठरवून टाकले की, आईसक्रीम वा थंड पेय यांना स्पर्श करावयाचा नाही. हौसच करावयाची असेल तर भारतात परतल्यावर करू. अशी थोडी दक्षता घेतल्यामुळे व अनपेक्षित काही न उद्भवल्यामुळे मी पन्नास दिवसांनी निर्विघ्न प्रवास करून स्वगृही परत

बॅग वगैरे ताब्यात घेईतो साडेसहा होऊन गेले होते, इंग्लंडमधील वेळेप्रमाणे घड्याळ लावून घेतले. आठच्या सुमारास चहा घेतला. त्याआधी आयुष्यातील पहिला प्रवासी धनादेश वटवला. स्वाक्षरी केली व पौंड मिळाले. काही अडचण आली नाही हे बरे वाटले आजवर ही वेळ कधी आली नव्हती. आयुष्यात माणसाने शक्य होतील तितक्या प्रकारचे सारे अनुभव घ्यावेत. त्यांतील कोणते पुन्हा घ्यावेत आणि कोणत्या अनुभवापासून तो घेण्यापूर्वीच दूर असावे, याचा विवेक ठेवावा. ही एकीकडे अनुभवाच्या अंगाने जीवन समृद्ध करणारी, आणि त्याच वेळी विवेकाचा आश्रय केल्यामुळे ते एका उन्नत पातळीवर घेऊन जाणारी वाट असते. चहा घेतला तेव्हा पैसे दिले. किती पडले ते नेमके कळले नाही. पण

चाळीस रुपयांहून कमी नाहीत, एवढे समजले एक कप चहाला इतके पैसे, असे मनात आले. पण विचार केला की, इतके पडणार हे आपल्याला माहीत नव्हते का? मग हा विचार करण्याचे काय कारण? आवश्यक तो खर्च केला पाहिजे. तेव्हा कशाचीही किंमत यानंतर रुपयांत मोजावयाची नाही ही खूणगाठ मनाशी घातली. भारतात पुन्हा पाऊल पडेपर्यंत पुन्हा तो विचार केला नाही. प्रवास एवढाच माझा हेतू होता, त्यामुळे वस्तूंची खरेदी वा अनाठायी खर्च या मार्गाने जाण्याचे मला कारणच नव्हते. या व्यक्तिगत तपशिलांचे उल्लेख करण्याचे खरे तर काही कारण नाही. पण पैशाचा म्हणजे ते केवळ शिल्लक ठेवण्याचा मोह बाजूला ठेवता आला, आणि काही मर्यादा स्वीकारल्या तर ज्याचे चारदोन मित्र परदेशात स्वागत करणारे असतील त्यालाही अशा प्रवासाचा आनंद घेता येईल, हे माहीत व्हावे या हेतूने हे उल्लेख केले आहेत.

## लंडनच्या विमानतळावर

हीथ्रो विमानतळ केवढा आहे? ''प्रचंड आहे'' एवढाच उद्‌गार पुरेसा आहे. चार टर्मिनल्स म्हणजे वेगवेगळे विभाग आहेत, आणि त्यांवरून पाच पाच मिनिटाला चारी दिशांना विमाने जात असतात आणि परदेशांतून आलेली उतरत असतात. सारे काही स्वच्छ, सुदर, आणि पूर्ण सोयीस्कर. दीडदोन तास मी नुसता सर्वत्र हिंडत होतो. बोटाने नळ विशिष्ट प्रकारे दाबला की स्वच्छ पाणी सरळ तोंडात घेता येत होते. स्वच्छतागृहात ओले हात कोरडे करण्यासाठी एका छोट्याशा यंत्राचे बटण दाबले की, त्यातून किंचित गरम वाऱ्याचा झोत येई आणि त्यात हात धरले की ते कोरडे होऊन जात. हे सारे प्रथम अनुभवताना मोठीच गंमत वाटली. अशा काही सुविधाची आपल्याला माहिती नसते. त्यामुळे इतर प्रवासी कोठे काय करीत आहेत, हे पाहून घेणे उपकारक ठरले. विमानतळाच्या व्यवस्थापनाचे निरनिराळे विभाग आणि नाना वस्तूंची अनेकानेक दुकाने यांची संख्या बरीच होती. कस्टम ड्यूटी नाही, ही पाटी सर्वत्र. बरीच दुकाने शातपणे पाहिली. किती प्रकारच्या वस्तू नाना देशांतून आलेल्या दुकानांतून ठेवलेल्या आहेत, हे पाहूनही ज्ञानात भर पडते. प्रवाशांना लागणाऱ्या वस्तू आणि विविध खाद्यपदार्थ हे अपेक्षित होते. पण त्यांतही अनंत तऱ्हा होत्या. कलात्मक वस्तूंची दुकाने पाहणे हा एक वेगळा आनंद होता. यातील काहीही आपल्यासाठी नाही हे पक्के ध्यानात असल्यामुळे विविध वस्तूंचे संग्रहालय पाहावे तसे वाटले. हे सारे एकदोनदा पाहण्यातच थोडीफार गंमत वाटते. पुढे पुढे हे सारे ठराविक साच्याचे होऊन जाते, आणि तिकडे लक्षही जात नाही. आपल्या गावात बाजार असतो तसाच हा एक श्रीमंती थाटाचा बाजार आहे, एवढा निष्कर्ष हाताला लागतो.

अन्वय लीड्सला होता. तो रुग्णालयात कामावर असल्यामुळे आणि रजा मिळणे शक्य नसल्यामुळे मला उतरून घेण्यासाठी लडनला येणे त्याला अशक्य होते. पण मी मुंबईहून निघण्याच्या दोन दिवस आधी त्याचे एक पत्र मला आले होते. विमानातून बाहेर पाऊल टाकल्यापासून लीड्सला घेऊन जाणाऱ्या बसमध्ये बसेपर्यंत मी कोणत्या क्रमाने कोणत्या गोष्टी करावयास हव्यात, हे त्याने मला तपशीलवार कळवले होते. भारतात एका मित्राने मला सांगितले होते की, परदेशात सर्वत्र स्थानकावर वा विमानतळावर कोठे काय आहे व तिकडे कसे जावयाचे याच्या सविस्तर सूचना दर दहावीस पावलांवर देणाऱ्या इतक्या पाट्या आणि फलक असतात की, तुम्ही ते नुसते वाचत गेलात तरी कोणालाही काहीही न विचारता तुम्ही इच्छित स्थळी जाऊ शकता. याची पुरी प्रचीती आली. आणखी एक जाणवले ते असे की, कितीही गर्दी असली तरी कोठेही गोधळ, गडबड वा अव्यवस्थितपणा आढळत नाही. आपल्याकडे अशा ठिकाणी केवढा गोंगाट आणि गजबजाट असतो. विनाकारण वाट अडवणारे फेरीवाले आणि आपापला माल विकण्यासाठी ओरडत पुकारा करणारे विक्रेते कोठेही नव्हते. सर्वत्र भरपूर माणसे इकडून तिकडे चाललेली असतात, पण तरीही शांतता असते. प्रवासाचा थकवा आपल्याला येतो तो कमालीचा गोंगाट, तिककाच गोधळ, आणि माणसांची बेफिकीर वृत्ती यांमुळे, हे परदेशात प्रवास करताना ताबडतोब जाणवते.

चौकशी असा फलक जेथे असतो, तेथे जागेवर माणूस असतो आणि तो तुम्ही विचाराल ती माहिती तत्परतेने देतो, हा अनुभवही अनोखा वाटतो. हे सारे मनाशी टिपण्यात तास दोन तास कोठे गेले ते कळलेही नाही. लीड्सला जाणारी बस दहा वाजता होती व ती विमानतळाबाहेर पडताच समोर मिळणार होती. सावधगिरी म्हणून मी तेथे साडेनऊ वाजता आलो. तेवढ्यात एक बस आली. ती ब्रिस्टलला जाणारी होती. भारतातील आजच्या प्रबोधनाचे आद्य प्रवर्तक राजा राममोहन रॉय यानी ब्रिस्टल येथे इहलोकाचा निरोप घेतला, त्याची आठवण झाली. अशा काही महत्त्वाच्या शहरांना जाणाऱ्या गाड्या विमानतळावर उपलब्ध असणे ही प्रवाशांच्या दृष्टीने मोठीच सोय वाटली. टॅक्सी करून त्याकरिता कोठेतरी जाण्याची दगदग करावी लागत नाही. ही सोय सहार विमानतळावर झाली, तर तेथूनच प्रवासी विदर्भ, कोकण, मराठवाडा, किंवा गुजराथ अशा निरनिराळ्या दिशांनी जाऊ शकतील, असे मनात आले. कदाचित अशी सोय असेलही, मला निश्चित माहिती नाही. लंडन शहर विमानतळापासून पंधरासोळा मैल तरी दूर आहे. तेथे जाण्यासाठी जवळच लोहमार्गाचे स्थानकही आहे. असे प्रचंड विमानतळ शहरापासून इतके दूर असणे आवश्यक आहे. भारतातील मोठ्या शहरांच्या बाबतीत हा विचारही पुढील आठदहा वर्षांत करावा लागणार.

मी बससाठी उभा होतो तेथे चारसहा व्यक्तीच होत्या. दोन-तीन ब्रिस्टलच्या गाडीत

चढल्या. बरोबर नऊ पन्नासला लीड्सला जाणारी बस आली. आत शिरलो. अतिशय आरामशीर अशी ही गाडी होती. विशेष म्हणजे गाडीच्या मध्यावर खालच्या बाजूस सामानासाठी भरपूर जागा होती. वाहक तत्परतेने खाली उतरला व माझी बॅग त्याने तेथे ठेवली. गर्दी नव्हती. आणि दुपारी अडीच वाजता लीड्स येईतो विशेष उतारू चढले नाहीत. एका बाजूला चार तर दुसऱ्या बाजूला विरुद्ध दिशेने जाणारे चार असे भलेमोठे रुंद रस्ते होते. मधला विभाजकही चांगला रुंद. समोरून वाहन येईल हा भागच नाही. लहानसाही रस्ता उत्तम. खाचखळगा कोठे नाही. त्यामुळे प्रवाशांना हादरे बसणे ही गोष्टच नाही. प्रवाशांना त्रास नाही तसाच गाडी चालवणाऱ्याला नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भक्कम कुंपण, त्यामुळे कोणी माणूस वा एखादे जनावर रस्त्यावर येईल ही शक्यता नाही. ताशी पन्नास मैल हा सर्वसाधारण वेग. प्रत्येक गाडी आपल्या ओळीतून जात होती. वाटेत काही ठिकाणी फर्लांग दोन फर्लांगाच्या अंतरामध्ये पाठोपाठ दोनतीन पूल रस्त्याच्या एका बाजूने दुसऱ्या बाजूकडे जात असलेले दिसले. ते अरुंद असत. नंतर समजले की, कोठेही एखादे खेडेगाव असले तर तेथील लोकांना महामार्ग ओलांडून पलीकडे जाण्याची ती सोय आहे. यामुळेच रस्त्यावरून मनुष्य आडवा जाण्याचा प्रश्न नव्हता. वाहतुकीच्या खुणा असलेल्या पाट्या भल्यामोठ्या. त्यांवरील पुढे येणाऱ्या गावांची नावे तशीच ठळक आणि मोठ्या अक्षरांत, रस्त्याला कोठे फाटा फुटणार असेल तर त्याची दिग्दर्शक अशी प्रथम तीन बाणांची खूण अर्धा मैल आधी, नंतर दोन बाण, नंतर एक बाण, व त्यानंतर तो फाटा. त्यामुळे गाडी वेगात असली तरी वाहकाला भरपूर आधी पूर्वसूचना मिळत असे. अशा या साऱ्या रस्त्याच्या सुविधा व इतर सूचना व्यवस्थित असल्यावर गाडी निर्धास्तपणे चालवता येणे सहजसुलभ होते.

वाहक चाकावर हात ठेवून नुसता बसलेला आहे, त्याला काही कामच नाही, जणू गाडी आपोआप चाललेली आहे, आणि हा नुसता पाहतो आहे; असे वाटले रस्त्यावर जागोजाग असलेल्या फलकांवरून त्याची सराईत नजर फिरते आहे, पण गाडी चालवताना कोणताही भार त्याच्या मनावर नाही. ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे असे मनात आले. मनुष्य थकत नाही, अशा उत्कृष्ट रस्त्यामुळे गाडीही सुस्थितीत राहते, आणि विनाकारण पेट्रोल वाया जात नाही, हा केवढा लाभ आहे! या दृष्टीने आपल्या देशातील रस्त्यांची असलेली दुर्दशा, त्यामुळे होणारी गाड्यांची हानी, त्यांची वारंवार करावी लागणारी दुरुस्ती, आणि पेट्रोलची होत असलेली नासाडी, हे राष्ट्रीय संपत्तीचे केवढे प्रचंड नुकसान आपण दररोज करीत आहोत, याचा फार गंभीरपणाने विचार व्हावयास हवा. तो कोण करणार एवढाच प्रश्न आहे. गाडीच्या वाहकाची साहाय्यक एक महिला होती. त्या दोघांच्या छान गप्पा चालल्या होत्या. इंग्रज माणूस फार बोलत नाही असे ऐकून होतो पण मी पाहिलेली ही सामान्य काम

करणारी बहुसंख्य समाजातील माणसे, बराच वेळ बोलत आहेत हे पाहून बरे वाटले. प्रवासी मात्र शात बसून होते. विमानतळाचा परिसर मागे पडला आणि गाडीने लीड्सचा मार्ग धरला. मी आसपास पाहू लागलो.

### इंग्लंडचा साम्राज्यकालीन दरारा

हीं इंग्लंडची भूमी. या भूमीचे हे पहिले दर्शन मी घेत होतो. या इंग्लंडने एकशेतीस वर्षे खंडप्राय अशा आमच्या विशाल देशावर राज्य केले. इंग्रज शिपायांचा केवढा दरारा असे त्याचा अनुभव ऐन तरुण वयात घेतलेला होता. दरारा म्हणण्यापेक्षा भय हा शब्द वापरणे अधिक योग्य होईल. १९४२-४३ साली दुसरे महायुद्ध ऐन भरात होते. त्या काळातही खडकीला मोठे लष्करी ठाणे होते. पुण्याजवळ खडकी स्थानक ओलाडून लोहमार्गावरून गाडी मुंबईच्या दिशेने निघाल्यावर उजव्या बाजूस दृष्टी टाकली, तर फिकट हिरव्या रंगांच्या लष्करी गाड्या आणि रणगाडे एकामागोमाग हारीने अनेक रांगांमधून उभे असलेले पाहावयास मिळत. त्यांतील वाहनांचा ताफा कोठे जावयाचा असला तर साहजिकच शिपायांची वर्दळ दिसे. त्या वेळी एकदा पुणे स्थानकाच्या बाहेरच्या बाजूस दोन इंग्रज शिपाई उभे होते; तर समोरच्या रस्त्यावरील सारे प्रवासी व नागरिक अगदी चूपचाप चालले होते. कोणाला काही गडबड करण्याची इच्छा होती असे नाही, किंवा ते शिपाई आपल्याला काही करणार आहेत असे वाटत होते असेही नाही. पण कोणाला थोडासाही मोकळेपणा वाटत नसे.

समोर दोनच शिपाई होते हे खरे, पण त्याच्यामागे अवाढव्य ब्रिटिश शासनाची संपूर्ण ताकद उभी आहे, हे जाणवत असे. त्याच्या उभे राहण्यात, हालचाल करण्यात, इकडून तिकडे जाताना पावले टाकण्यात लष्करी सैनिकाच्या ठायी स्वाभाविक असणारा रुबाब आणि दमदारपणा असे. सामर्थ्य आणि आत्मविश्वास यांचा प्रत्यय आणून देणारे अशा प्रकारचे सहज वावरणे हे भारतातील नागरिकांत क्वचितच कोठे पाहावयास मिळे. स्वातत्र्य मिळून गेले, पण आमच्या देशाचे नेतृत्व करणाऱ्यांच्या हालचालीत वा उभे राहण्यात काही थोडे अपवाद वगळता पौरुष आणि आत्मविश्वास यांचे प्रभावी दर्शन घडत नाही. स्वातंत्र्यासाठी केलेल्या चळवळीत धोरण म्हणून स्वीकारलेल्या अहिंसेचा वारसा या स्वरूपात राहिला आहे. १९४६ साली नव्या दिल्लीत पायी फिरत असताना दोन बाजूंच्या केंद्रीय सचिवा-लयांच्या समोरच्या बाजूस जो आडवा रस्ता आहे, त्याच्या पलीकडे सामान्य नागरिक सहसा फिरकत नसे, हा अनुभव पुरता ध्यानात आहे. हे परकीय राज्यकर्ते आहेत. आपण त्यांच्यापासून दूर असावे अशी सार्वत्रिक भावना असे. चळवळीच्या वेळी मोठमोठ्या सभा होत, प्रचंड मिरवणुकी निघत, आणि अनेक जण सत्याग्रह करीत. त्या वेळी मात्र कोणाच्या मनात भीती

नसे, उलट पारतंत्र्याविषयीची चीड आणि राज्यकर्त्यांविषयीचा संताप उग्रपणे व्यक्त होई पण हे सारे चळवळ ऐन भरात असेल तोवर. एकदा नेते गजाआड टाकले गेले की सर्वत्र सामसूम होई. सारे लोक इंग्रजांना वचकून असत, ही वस्तुस्थिती होती.

प्रचंड प्रमाणातील सर्वसामान्य जनतेला तर स्वदेशातील आणि एकदर जगातील राजकीय परिस्थितीची कोणतीही जाण नव्हती. अज्ञान फार मोठे होते. पण सुशिक्षित वर्गातही इंग्रज माणसासमोर उभे राहताना मनात न्यूनगड असे. आज तो पार लोप पावलेला आहे. आणि आता कोणी इंग्रज प्रवासी रस्त्यावरून जाताना दिसला, तर त्याचे कोणाला काही वाटत नाही. पण स्वातंत्र्यप्राप्तीच्या पूर्वीच्या काळातील परिस्थिती फार वेगळी होती. ज्यांचे मन जागे झालेले असे, त्यांना आपण परतत्र आहोत याची जाणीव पदोपदी होत असे. त्यामुळे स्वातंत्र्य हा शब्द नुसता उच्चारताना किंवा सभेत कधीतरी 'वंदे मातरम्' हे गीत ऐकताना देशभक्त तरुणांच्या अंगावर थरथरून रोमांच उभे राहात. पण असे प्रसंग हा अपवाद होता. एरवी सामान्य माणसाच्या मनात त्या काळात इंग्रजाबद्दलचे भय मनात खोलवर लपलेले असे. पन्नास वर्षापूर्वीच्या त्या काळात आपल्या मातृभूमीच्या पायात अडकवल्या गेलेल्या पारतंत्र्याच्या शृंखलांची सूत्रे जेथून हलवली जात असत, ते हे इंग्लंड; असे आसपासचा प्रदेश न्याहाळत असताना मनात आले.

लंडन ते लीड्स हे अंतर दोनशे मैलांचे होते आणि प्रवास साडेचार तासांचा होता. गाडी पुढे धावत होती, दृष्टी समोरच्या प्रदेशाकडे होती, आणि माझे मन जवळजवळ साठ वर्षापूर्वीच्या भूतकालात शिरले होते. त्या काळात ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता. बेचाळीसची चळवळ काही महिन्यांत ओसरली, पंचेचाळीस साली दुसरे महायुद्ध संपले, दोस्त राष्ट्रांचा विजय झाला होता आणि इंग्लंड त्यात अग्रभागी होते. हे सारे खरे असूनही ब्रिटिश साम्राज्याचा सूर्य अस्ताचलाच्या जवळ आला आहे याची चाहूल १९४६ साली कॉग्रसचे नेते कारावासातून बाहेर आले, तेव्हा लागली होती. पुण्याला सर परशुराम महाविद्यालयाच्या पटांगणावर प्रचंड सभा झाली. कारावासातून मुक्त झालेल्या कॉग्रेसच्या नेत्यांचे स्वागत करताना नागरिकांचा आनंद ओसंडून जात होता, आणि त्या सभेत झालेले अच्युतराव पटवर्धनांचे ओजस्वी व्याख्यान ऐकण्याचे भाग्य इतराबरोबर मलाही लाभले होते. भारतातील परिस्थितीने हे वळण घेतले होते, सारा नूरच पालटला होता. जागतिक राजकारणाचे संदर्भ बदलत होते, आणि स्वातंत्र्याची प्रभात जवळ आली आहे हे जाणवू लागले होते. भारत स्वतंत्र झाला की, ब्रिटिश साम्राज्यातील कोहिनूर दृष्टीआड होणार होता. पण एवढेच नाही. त्यांना भविष्यकालात थोडे दूरवर पाहता येत होते, त्यांच्या हे ध्यानात आले होते की, तीन-चार दशके उलटतील आणि जागतिक राजकारणातील इंग्लंडचे महत्त्व हळूहळू कमी होत

जाईल आज पन्नास वर्षानंतर ती वस्तुस्थिती झाली आहे.

## हिटलरचे भयावह संकट

पण १९३९- च्या सप्टेंबर महिन्यात सुरू झालेल्या दुसऱ्या महायुद्धाच्या पाचसाडेपाच वर्षांच्या काळातील इंग्लंडचे चित्र फार वेगळे होते. तो देश आपल्या दृष्टीने शत्रुस्थानी होता व त्या काळात आपणा भारतीयांच्या मनात त्याच्याबद्दल चीड होती. पण एकदर जागतिक पातळीवरून विचार करू गेले, तर इंग्लंडच्या अतुलनीय पराक्रमाची दुसरे महायुद्ध ही एक उज्ज्वल साक्ष होती. इतिहासाने हे सत्य नोंदलेले आहे, आणि आपण ते नाकारण्याचे कारण नाही. जर्मनीच्या महाबलवान लष्करी सामर्थ्याशी झुंज देऊ शकेल असा समर्थ नेता म्हणून इंग्लंडच्या पंतप्रधानपदी दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर काही महिन्यात विन्स्टन चर्चिलची निवड झाली. जर्मनीत त्याआधी सातआठ वर्षे नाझी राजवटीचा उदय झाला होता. अॅडॉल्फ हिटलर हा प्रमुख होता. पहिल्या महायुद्धातील पराभव आणि त्यानंतर आपल्या देशाची मानहानी ज्याच्या अतरंगात धगधगत होती, असा हा एक वज्रकठोर पुरुष होता.

पण एवंढेच नाही, त्याच्या कठोरपणात क्रूरपणा आणि निष्ठुर वृत्ती यांचा फार मोठा अंश होता. त्याला कोणाचीही दयामाया नव्हती आणि त्याचे दमनयंत्र कोणाचा अपवाद करीत नसे. त्याचे निकटचे सहकारीही त्यात बळी गेले आहेत, आणि त्याबद्दल त्याला थोडीशीही खंत वाटत नसे. त्याच्या स्वदेशाभिमानाला दुरभिमान आणि द्वेषभावना यांची भीषण जोड होती. जर्मन राष्ट्र हे आर्य वंशाचे आणि आर्य वंश हाच काय तो राज्य करण्यास योग्य, अशी त्याची ठाम विचारसरणी होती. माइन काम्फ हे त्याचे पुस्तक गाजलेले होते. त्याचे इंग्रजी भाषांतर भारतात सर्वदूर पोचले होते. आर्य हा शब्द आर्यभूमी, आर्यावर्त, किंवा वैदिक आर्य याची आठवण करून देणारा. स्वस्तिक हे प्रतीक हिटलरने स्वीकारलेले होते. ते त्याच्या दंडावरील आडव्या पट्टीत लावलेले छायाचित्रात पाहावयास मिळे. जर्मन गरुड असा शब्दप्रयोग सर्वत्र. आर्य, स्वस्तिक आणि गरुड हे सारे भारतीयांना फार जवळचे वाटणारे होते. त्यामुळे त्या वेळच्या तरुण पिढीत अनेकांना हिटलरची भुरळ पडली होती. काही थोड्या राजकीय नेत्यांचाही त्यात समावेश होता. जे राज्यकर्ते आपल्या छातीवर गुडघे रोवून बसले आहेत, त्यांची मानगूट मागच्या बाजूने कोणीतरी धरली आहे, हे दृश्य मनाला सुखावणारे होते त्यात आपल्या पराक्रमाचा काहीही भाग नसला तरीही.

शिवाय युद्धाच्या प्रारंभीच्या काळात जर्मनीने प्रकट केलेले युद्धकौशल्य मन स्तिमित करणारे होते. जर्मन सैन्याची चढाई ही ब्लिट्झक्रिग या शब्दाने ओळखली जात होती, आणि विजेच्या वेगाने होणारी असा त्याचा अर्थ होता. युद्धाची वर्णने आणि जर्मन सेनेचा पराक्रम

वाचताना मन थरारून जात असे. हिटलरने पाचसहा वर्षे आधीपासून युद्धाची सुसज्ज तयारी केली होती. तीव्र बुद्धिमत्ता, विलक्षण शिस्तशीरपण, आणि प्रचंड उद्यमशीलता हे जर्मन समाजाचे व्यवच्छेदक विशेष आहेत. त्या साऱ्यांचा प्रत्यय येऊन युद्धाला प्रारंभ होताच चारसहा महिन्यांत जग विस्मित होऊन गेले पण त्याच वेळी काही जाणकार विचारवंत यातील धोका ओळखून सावधही झाले हिटलर हा हुकूमशहा आहे, तो आसुरी महत्त्वाकांक्षेने झपाटलेला आहे, आपले ईप्सित साध्य करण्यासाठी तो केवढाही नरसहार करील, आणि हे मानवजातीवरील एक महान संकट आहे, हे ओळखू शकणारे कोणी कोणी होते. त्यांत विन्स्टन चर्चिल अग्रभागी होता.

युरोपमधील हिटलरची आक्रमक पावले १९३८-च्या पूर्वार्धापासून पडण्यास प्रारंभ झाला. फ्रान्सच्या हद्दीतील ऱ्हाइनलँडचा प्रदेश त्याने ताब्यात घेतला. स्तंभित झालेल्या फ्रान्सकडून कोणताही प्रतिकार झाला नाही. त्यानंतर केवळ धमकावणीच्या बळावर त्याने ऑस्ट्रियाचा ताबा घेतला. त्या वर्षाच्या उत्तरार्धात पाळी आली झेकोस्लोव्हाकियातील जर्मन बहुसंख्य असलेल्या सुडेटन या भागाची. ही वार्ता कळताच इंग्लंडचा पतप्रधान चेबरलेन याने थेट हिटलरशी संपर्क साधला आणि त्याने तात्काळ जर्मनीत म्युनिक येथे जाऊन हिटलरशी बोलणी केली व तडजोड करून तो परत आला. पण सौम्य प्रकृतीचा चेबरलेन कणखर वृत्तीचे दर्शन घडवू शकला नव्हता. प्रत्यक्षात हिटलरला जे हवे होते ते सारे चेबरलेनने मान्य केले होते. पण ''आपणा सर्वांचे आयुष्य शांततेत जाणार आहे'' असा उद्‌गार इंग्लंडला परतल्यावर विमानतळावर उतरताच पत्रकारांशी बोलताना त्याने काढला. ऐंशी वर्षाच्या त्या नेत्याच्या मनात तीस वर्षे आधी संपलेल्या पहिल्या महायुद्धाच्या स्मृती ढळढळीतपणे जाग्या होत्या, आणि कसे का होईना, पण संभाव्य महायुद्ध टळले याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

हिटलरला आवर घालण्यास हे नरमाईचे धोरण पुरेसे होणार नाही, हे ओळखून चर्चिलने चेबरलेनवर पार्लमेंटमध्ये घणाघाती टीका केली. फार दिवस जावे लागले नाहीत. त्यानंतर सहा महिने उलटण्याच्या आत संपूर्ण झेकोस्लोव्हाकियाचा ताबा घेतला गेला, आणि जर्मनीची आक्रमक प्रवृत्ती स्पष्ट झाली. त्यानंतर १९३९-च्या ऑगस्टमध्ये हिटलरची दृष्टी पोलंडकडे वळली आहे हे स्पष्ट झाले. हा निर्णायक क्षण ठरला. पोलंडवर आक्रमण झाल्यास त्याला लष्करी साहाय्य करण्याची घोषणा इंग्लड आणि फ्रान्स यांनी केली. एक सप्टेंबरला हिटलरने पोलंडवर स्वारी केली, आणि इग्लडने तीन सप्टेबरला जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले १९४०-च्या एप्रिलअखेर हिटलरने पोलंड, डेन्मार्क, नॉर्वे, बेल्जम हे देश झपाट्याने पादाक्रांत केले. या संग्रामात नेता तसाच झुंझार हवा म्हणून दहा मे १९४०या दिवशी चर्चिलची

पतप्रधान म्हणून निवड झाली या साऱ्या घटना आमच्या पिढीने जाणतेपणाने पाहिल्या आहेत पॅरिसची रात्र गाजलेली आहे, तीवर मराठी कवीनीही कविता लिहिल्या आहेत. विलासी जीवन हा त्या नगरीचा एक विशेष आहे तेथेच दीडशे वर्षे आधी नेपोलियन हा जगाच्या इतिहासातील एक महान रणधुंरधर होऊन गेला हे खरे. पण त्यातील काहीही तेज या वेळच्या फ्रान्समध्ये शिल्लक नव्हते. जर्मनीच्या आक्रमणाला प्रतिकार करता यावा म्हणून सीमेवर मॅजिनो तटबंदी उभी केली होती. पण कोणत्याही अभेद्य तटाला एका ठिकाणी खिंडार पडले की, उरलेला सारा भक्कम तट निरुपयोगी ठरतो. तेच मॅजिनो तटबंदीचे झाले जर्मनीची फौज फ्रान्सच्या प्रदेशात दौडत चालली

पराभव अटळ आहे हे ओळखून आपली सुंदर नगरी शाबूत राहावी यासाठी पॅरिस हे खुले शहर म्हणून फ्रान्सने जाहीर केले व युद्धात शरणागती पत्करली वास्तविक पाहता फ्रान्सचे लष्कर बलाढ्य होते, पण कचखाऊ मनोवृत्तीमुळे त्याचा सारा धीर सुटला. चर्चिलने सूत्रे हाती घेतल्यास पाच आठवडेही उलटले नव्हते त्याला ही वार्ता समजली, तेव्हा तीवर त्याचा विश्वास बसेना. जर्मनीने रशियाशी अनाक्रमणाचा करार केला होता, मुसोलिनी हिटलरचा सहकारी झाला होता, आणि जवळजवळ उरलेल्या साऱ्या युरोपवर हिटलरचे प्रभुत्व प्रस्थापित झाले होते. सर्व अर्थानी आता समरांगणात इंग्लंड एकाकी उभे होते. जनरल द गॉलसारख्या काही शूर फ्रेंच सेनाधिकाऱ्यांचा थोडाफार छुपा प्रतिकार चालू राहिला इतकेच. फ्रान्सच्या पूर्व किनाऱ्यावर इंग्लंडपासून केवळ पस्तीस किलोमीटर अतरावर जर्मन सैन्य येऊन उभे राहिले. पण मध्ये ब्रिटिश खाडी होती. हा हिटलरच्या दृष्टीने मोठा अडसर होता, आणि इंग्लंडला ते जणू संरक्षक कवच होते. हिटलर थेट इंग्लंडवर आक्रमण करू शकला नाही. नेपोलियनला हाच अनुभव आला होता. त्याचे तर असे उद्‌गार होते, ''मला चोवीस तास सैन्यासह इंग्लंडच्या भूमीवर पाय रोवता आले, तर तो देश मी माझ्या आधिपत्याखाली आणेन.''

### चर्चिलचे युद्धकालीन नेतृत्व

अशा या भीषण काळात एकाकी पडलेले इंग्लंड धैर्याने पाय रोवून उभे राहिले. चर्चिलचे खंबीर नेतृत्व या राष्ट्राला लाभले होते. चर्चिल नुसताच लष्करी नेता नव्हता, लोकशाहीचा भोक्ता होता आणि हिटलर मानवजातीवरील एक महान संकट आहे हे जाणणारा विचारवंत होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत थोडासाही न डगमगणारा, मनाची शांत वृत्ती कधी ढळू न देणारा, आणि आपल्या समाजाला स्फूर्ती देणारा असा नेता होता. ''आमचा इंग्लंडमध्ये पराभव झाला तर आम्ही बाहेरून लढू, पण अखेरपर्यंत लढत राहू'',

ही त्याची घोषणा होती, आणि त्याचबरोबर ''अंतिम विजय आपलाच आहे'' अशी त्याची ग्वाही होती. ''व्ही फॉर व्हिक्टरी'' असे शब्द उच्चारून तो आपल्या हाताची दोन बोटे व्ही या अक्षराच्या आकारात उभी करी. त्याचे ते शब्द इंग्लडसाठी परवलीचा शब्द होऊन गेले. त्याचे वक्तृत्व प्रभावी होते, आणि मुत्सेद्देगिरी अव्वल दर्जाची होती. आपण एकाकी टिकू शकणार नाही हे ओळखून चर्चिलने अमेरिकेच्या प्रेसिडेट रुझवेल्टचे मन प्रयत्नपूर्वक वळवले व आपल्याला युद्धसामग्रीचे साहाय्य मिळेल अशी व्यवस्था केली. अमेरिका अटलांटिक महासागराच्या पलीकडे होती. तिला युरोपातील या संघर्षाशी काय कर्तव्य होते?

पण ही तटस्थ राहण्याची वेळ नाही, हे चर्चिलने रुझवेल्टला पटवून दिले. अखेर पर्ल हार्बर येथील अमेरिकन नौदलावर जपानचा प्रचंड विनाशकारी हल्ला झाला, आणि अमेरिका रणांगणात उतरली. हिटलरने रशियाशी केलेला अनाक्रमणाचा करार मोडून अकस्मात रशियावर हल्ला केला. एकाच वेळी पूर्व आणि पश्चिम या दोन्ही आघाड्यांवर लढण्याची ही आपत्ती आपण होऊन हिटलरने ओढवून घेतली, आणि त्याच्या अखेरच्या पराभवाचे बीज पेरले गेले. सोव्हिएट रशियाचा सत्ताधीश जोसेफ स्तालिन हा हिटलरसारखाच हुकूमशहा. तेवढाच क्रूरकर्मा आणि महत्त्वाकांक्षी. हिटलरने पोलंडवर ताबा मिळवला तर त्याच वेळी धूर्तपणाने आपले सैन्य तेथे पाठवून काहीही न करता अर्धा पोलंड गिळंकृत केला. त्यालाही सारा युरोप नव्हे, तर आशियाही आपल्या कामगारशाहीचा बुरखा पांघरलेल्या हुकुमशाहीखाली आणावयाचा होता. ज्यूंचा द्वेष आणि लक्षावधी ज्यूंची हत्या, त्याचबरोबर छळछावण्या आणि शंका येताच विरोधकांनाच नव्हे तर निकटच्या सहकाऱ्यांना कंठस्नान या बाबतीत हिटलर आणि स्तालिन यांच्यांत डावेउजवे ठरवणे कठीण आहे. ऑर्थर क्रोसलरचे Darkness at Noonकिंवा सोल्झेनिट्झिनच्या First Circle-सारख्या कादंबऱ्या ज्यांनी वाचल्या असतील त्यांना हे सहज कळेल.

पहिल्या महायुद्धातील पराभवाचा राष्ट्रीय अपमान हिटलरला पुसून टाकावयाचा होता. त्यासाठी फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यावर त्याचा विशेष राग होता. त्याने दाखवलेले रणकौशल्य थक्क करणारे होते. पण समरांगणातील हे यश ज्याच्या प्रत्यक्ष कर्तृत्वामुळे साकार होते, त्या आपल्याच सैन्यातील सेनापतीबद्दलही त्याला प्रेम नव्हते. नेपोलियन कसलेला सेनानी होता आणि शत्रूच्या सैन्यावर चढाई करताना आघाडीवर असलेल्या पथकातील सैनिक धारातीर्थी पडताना दिसत असले, तरी तो त्याची पर्वा करीत नसे. पण त्याच वेळी तो याबद्दल बेफिकीर कधीही राहात नसे. आवश्यकतेहून अधिक प्राणहानी होता कामा नये याबद्दल तो दक्ष असे. आपले शिकलेले सैनिक जो विनाकारण मृत्यूच्या खाईत लोटतो तो सेनापतीच नव्हे, असे त्याचे उद्गार आहेत. रणांगणावरील व्यूहरचनेच्या बळावर शत्रूचे सैन्य कैचीत पकडल्यावर

त्यातील एकही सैनिक जिवंत परत जाऊ शकणार नाही अशी खात्री करून घेतल्यावर नेपोलियनने आपल्या शत्रूच्या सेनापतीस रणांगणात बसून पत्र लिहिले आहे, ''मी म्हणतो त्या अटीवर तह करा, विनाकारण आपले सैनिक मारले जातील असे पाऊल उचलू नका व्यर्थ संहार होऊ देणे बरे नाही.'' यातही काही नैतिकतेचा अंश आहे, मानवाच्या जीवनाविषयीची आस्था आहे, हे जाणवल्याशिवाय राहात नाही. आपल्या रणझुंझार सरदारांवरच नव्हे, तर सामान्य सैनिकांवरही नेपोलियनचे प्रेम असे. त्याचा प्रत्यय त्या सैनिकांना येत असे. त्यामुळे त्या सैनिकांचेही या आपल्या सम्राटावर अपार प्रेम होते. त्याबद्दलच्या अनेक कथा त्याच्या चरित्रात आढळतात. पण हिटलरच्या कोशात प्रेम हा शब्दच नव्हता. त्याच्या निकटच्या सेनाधिकाऱ्यांनीच त्याच्या हत्येचा कट रचला होता. आफ्रिकेत अतिशय यशस्वी माघार घेणाऱ्या रोमेलला जर्मनीचा पराभव अटळ आहे हे त्या वेळीच ध्यानात आले होते, आणि हत्येच्या कटात तो सामील झाला नसला तरी जर्मन लोकांच्या हिताच्या दृष्टीने आता युद्ध थांबवावे असा सल्ला त्याने पंधरा जुलै १९४४ या दिवशी पत्र लिहून हिटलरला दिला.

फील्ड मार्शल आर्विन रोमेल हा एवढा शूर, धडाडीचा आणि त्याच वेळी उमद्या मनाचा सेनापती होता की, त्याच्या शत्रुपक्षातील सैनिकही त्याची मुक्तकंठाने प्रशंसा करीत असत. शत्रूच्या या सेनापतीबद्दल भलतेच आकर्षण आपल्या सैनिकांत वाढू नये, त्यासाठी ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांना सावधगिरी घेण्याची वेळ आली होती. रोमेलच्या चरित्रात हे सारे उल्लेख आले आहेत. पण अशा या हितकर्त्या सेनापतीनेही सबुरीचा सल्ला दिलेला हिटलरला मानवला नाही. त्याने चौदा ऑक्टोबरला दोन वरिष्ठ अधिकारी रोमेलकडे पाठवले आणि आपण होऊन आत्महत्या करणे किंवा बंदुकीच्या गोळीला सामोरे जाणे हे दोनच पर्याय त्याच्यासमोर ठेवले गेले स्वाभिमानी रोमेलने तात्काळ निर्णय घेतला. आपली पत्नी आणि मुलगा यांना त्याने हे सांगितले आणि विषाची गोळी घेऊन अर्ध्या तासाच्या आत आपली जीवितयात्रा समाप्त केली. हे सारे वाचताना आपले मन विषादाने भरून जाते. ''पॅरिस जळते आहे ना'', असा प्रश्न हिटलरने आपल्या सहकाऱ्यांना विचारला होता. पॅरिस शत्रुराष्ट्राची राजधानी होती, तेव्हा हा प्रश्न युद्धाशी सुसंगत मानता येईल. पण आपल्या देशातील नागरिकांशी तरी त्याचे वर्तन काय होते? त्याने केलेली जवळपास साठ लाख निरपराध ज्यूंची हत्या ही गोष्ट तर आपले मन केवळ सुन्न करून जाते. त्या साऱ्या अंगावर काटा उभ्या करणाऱ्या घटना व त्यांची छायाचित्रे एका पुस्तकात इस्राएलने पुढे प्रसिद्ध केली. तो करुण आणि भीषण वृत्तांत वाचल्यावर आपली झोप उडून जाते, आणि सांस्कृतिक दृष्टीने विचार करता कोणत्या युगात आपण वावरत आहोत, समजेनासे होते. स्तालिनच्या कथा नेमक्या अशाच आहेत. निरपराध माणसांची ही हत्याकांडे आणि केवळ संशयावरून वर्षानुवर्ष

सहकारी असलेल्याना रातोरात दिलेले मृत्युदंड यांच्या तुलनेने भारतामध्ये झालेले सामाजिक अन्याय हे केवळ फिके वाटू लागतात. अर्थात अन्याय तो अन्यायच. आपण कोणाचाही आधार घेऊन त्याचे समर्थन करू नये.

योग्य वेळी योग्य सल्ला देणारा रोमेल हिटलरला मानवला नाही, त्याला त्याबद्दल कोणतीही पूर्वकल्पना नसताना प्राण गमवावे लागले. हिटलरच्या निकटच्या वर्तुळातील त्याचे विश्वसनीय सहकारी असणारे सेनापती कायटेल किंवा प्रचारप्रमुख गोबेल्स याना अंतःकरणच नव्हते, असे वाटून जाते. सारे धुळीला मिळाल्यावर हिटलरसकट हे सर्वजण आपण होऊन मृत्यूला सामोरे गेले हे खरे, पण त्यातील त्याच्या निर्धाराचे कौतुक वाटत नाही. विषारी वायूचा उपयोग करून एकाच वेळी शेकड्यांनी ज्यूंची हत्या करण्याचे काम आईशमान करीत होता. युद्धानंतर तो मेक्सिकोत पळून गेला व तेथे कित्येक वर्षे खोट्या नावाने वावरत होता. युद्ध समाप्त झाल्यावर ज्यूना इस्राएल हा त्यांचा देश मिळाला. इस्राएलने कसोशीने शोध केला व तितक्याच शिताफीने आईशमानला पकडून आणले. त्याच्यावर रीतसर खटला भरला. ''वरिष्ठांनी दिलेल्या आज्ञेचं मी पालन केलं, ते माझं कर्तव्य होतं'' असा त्याचा युक्तिवाद होता.

त्याला देहन्त शासन करण्यात आले. फाशी देण्यासाठी त्याला नेले जात असताना तो थोडासाही खचलेला नव्हता. उलट तेथे उभ्या असलेल्या अधिकाऱ्यांना उद्देशून तो म्हणाला, ''ठीक आहे मंडळी, थोड्याच वेळात आपण पुन्हा भेटू.'' आपण ज्या मार्गाने चाललो आहोत त्याच मार्गाने अखेर मला मृत्युदंड देणारे तुम्हीही सारेजण आज ना उद्या येणार आहात, असे त्याला म्हणावयाचे होते. मृत्यूला सामोरे जाण्याच्या क्षणीचा हा निधडेपणा कौतुकास्पद आहे आणि कदाचित त्यालाही कधीही न भावलेला असा मानवी जीवनाच्या क्षणभंगुरतेवर बोट ठेवणारा असा तत्त्वज्ञानाचा स्पर्श आहे, असेही वाटण्यापर्यंत पोचणारा हा आईशमानचा उद्गार आहे. पण तरीही त्याच्याबद्दल आदराचा लवलेश मनात निर्माण होत नाही. त्याचे कारण इतकेच की, त्याच्या या उद्गारामागे सुसंस्कृतपणाचा लवलेशही नाही. प्राचीन काळात रानटी माणसे अतिशय क्रूरपणाने वागत. त्याच्या कथा आपण वाचतो तेव्हाही मन शहारून जाते. पण ती रानटीच होती. एवढे स्पष्टीकरण पुरेसे ठरते. त्यांना ना विद्या होती, ना संस्कृती होती. पण आईशमानच्या संदर्भात असे काहीच म्हणता येत नाही. केल्या कृत्याचा थोडासाही खेदाचा वा पश्चात्तापाचा भाव त्याच्या ठिकाणी दिसला नाही. अशी पाषाणहृदयी माणसे हिटलरने निर्माण केली होती. युद्ध हे अखेर युद्ध असते, तेथे माणसांचा बळी पडत असतो. कमी क्रूरपणाचे वा अधिक क्रूरपणाचे असा काही भेद युद्धात करू जाणे हे व्यर्थ असते, हे सारे खरे असते. पण निरपराध जीवांच्या हत्येबद्दल काय म्हणता येईल? त्यात स्त्रिया आणि

त्यातील एकही सैनिक जिवंत परत जाऊ शकणार नाही अशी खात्री करून घेतल्यावर नेपोलियनने आपल्या शत्रूच्या सेनापतीस रणांगणात बसून पत्र लिहिले आहे, ''मी म्हणतो त्या अटीवर तह करा, विनाकारण आपले सैनिक मारले जातील असे पाऊल उचलू नका. व्यर्थ संहार होऊ देणे बरे नाही.'' यातही काही नैतिकतेचा अंश आहे, मानवाच्या जीवनाविषयीची आस्था आहे, हे जाणवल्याशिवाय राहात नाही. आपल्या रणझुंझार सरदारांवरच नव्हे, तर सामान्य सैनिकांवरही नेपोलियनचे प्रेम असे. त्याचा प्रत्यय त्या सैनिकांना येत असे. त्यामुळे त्या सैनिकांचेही या आपल्या सम्राटावर अपार प्रेम होते. त्याबद्दलच्या अनेक कथा त्याच्या चरित्रात आढळतात. पण हिटलरच्या कोशात प्रेम हा शब्दच नव्हता. त्याच्या निकटच्या सेनाधिकाऱ्यांनीच त्याच्या हत्येचा कट रचला होता. आफ्रिकेत अतिशय यशस्वी माघार घेणाऱ्या रोमेलला जर्मनीचा पराभव अटळ आहे हे त्या वेळीच ध्यानात आले होते, आणि हत्येच्या कटात तो सामील झाला नसला तरी जर्मन लोकांच्या हिताच्या दृष्टीने आता युद्ध थांबवावे असा सल्ला त्याने पंधरा जुलै १९४४ या दिवशी पत्र लिहून हिटलरला दिला.

फील्ड मार्शल आर्विन रोमेल हा एवढा शूर, धडाडीचा आणि त्याच वेळी उमद्या मनाचा सेनापती होता की, त्याच्या शत्रुपक्षातील सैनिकही त्याची मुक्तकंठाने प्रशंसा करीत असत. शत्रूच्या या सेनापतीबद्दल भलतेच आकर्षण आपल्या सैनिकात वाढू नये, त्यासाठी ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांना सावधगिरी घेण्याची वेळ आली होती. रोमेलच्या चरित्रात हे सारे उल्लेख आले आहेत. पण अशा या हितकर्त्या सेनापतीनेही सबुरीचा सल्ला दिलेला हिटलरला मानवला नाही. त्याने चौदा ऑक्टोबरला दोन वरिष्ठ अधिकारी रोमेलकडे पाठवले आणि आपण होऊन आत्महत्या करणे किंवा बंदुकीच्या गोळीला सामोरे जाणे हे दोनच पर्याय त्याच्यासमोर ठेवले गेले. स्वाभिमानी रोमेलने तात्काळ निर्णय घेतला. आपली पत्नी आणि मुलगा यांना त्याने हे सांगितले आणि विषाची गोळी घेऊन अर्ध्या तासाच्या आत आपली जीवितयात्रा समाप्त केली. हे सारे वाचताना आपले मन विषादाने भरून जाते. ''पॅरिस जळते आहे ना'', असा प्रश्न हिटलरने आपल्या सहकाऱ्यांना विचारला होता. पॅरिस शत्रुराष्ट्राची राजधानी होती, तेव्हा हा प्रश्न युद्धाशी सुसंगत मानता येईल. पण आपल्या देशातील नागरिकांशी तरी त्याचे वर्तन काय होते? त्याने केलेली जवळपास साठ लाख निरपराध ज्यूंची हत्या ही गोष्ट तर आपले मन केवळ सुन्न करून जाते. त्या साऱ्या अंगावर काटा उभ्या करणाऱ्या घटना व त्यांची छायाचित्रे एका पुस्तकात इस्राएलने पुढे प्रसिद्ध केली. तो करुण आणि भीषण वृत्तांत वाचल्यावर आपली झोप उडून जाते, आणि सांस्कृतिक दृष्टीने विचार करता कोणत्या युगात आपण वावरत आहोत, समजेनासे होते. स्तालिनच्या कथा नेमक्या अशाच आहेत. निरपराध माणसांची ही हत्याकांडे आणि केवळ संशयावरून वर्षानुवर्ष

सहकारी असलेल्यांना रातोरात दिलेले मृत्युदंड यांच्या तुलनेने भारतामध्ये झालेले सामाजिक अन्याय हे केवळ फिके वाटू लागतात. अर्थात अन्याय तो अन्यायच. आपण कोणाचाही आधार घेऊन त्याचे समर्थन करू नये.

योग्य वेळी योग्य सल्ला देणारा रोमेल हिटलरला मानवला नाही, त्याला त्याबद्दल कोणतीही पूर्वकल्पना नसताना प्राण गमवावे लागले. हिटलरच्या निकटच्या वर्तुळातील त्याचे विश्वसनीय सहकारी असणारे सेनापती कायटेल किंवा प्रचारप्रमुख गोबेल्स यांना अतःकरणच नव्हते, असे वाटून जाते. सारे धुळीला मिळाल्यावर हिटलरसकट हे सर्वजण आपण होऊन मृत्यूला सामोरे गेले हे खरे, पण त्यातील त्यांच्या निर्धाराचे कौतुक वाटत नाही. विषारी वायूचा उपयोग करून एकाच वेळी शेकड्यांनी ज्यूंची हत्या करण्याचे काम आईशमान करीत होता युद्धानंतर तो मेक्सिकोत पळून गेला व तेथे कित्येक वर्षे खोट्या नावाने वावरत होता. युद्ध समाप्त झाल्यावर ज्यूंना इस्राएल हा त्यांचा देश मिळाला. इस्राएलने कसोशीने शोध केला व तितक्याच शिताफीने आईशमानला पकडून आणले. त्याच्यावर रीतसर खटला भरला. ''वरिष्ठांनी दिलेल्या आज्ञेचं मी पालन केलं, ते माझं कर्तव्य होत'' असा त्याचा युक्तिवाद होता.

त्याला देहन्त शासन करण्यात आले. फाशी देण्यासाठी त्याला नेले जात असताना तो थोडासाही ख्चलेला नव्हता. उलट तेथे उभ्या असलेल्या अधिकाऱ्याना उद्देशून तो म्हणाला, ''ठीक आहे मंडळी, थोड्याच वेळात आपण पुन्हा भेटू.'' आपण ज्या मार्गाने चाललो आहोत त्याच मार्गाने अखेर मला मृत्युदंड देणारे तुम्हीही सारेजण आज ना उद्या येणार आहात, असे त्याला म्हणावयाचे होते. मृत्यूला सामोरे जाण्याच्या क्षणीचा हा निधडेपणा कौतुकास्पद आहे आणि कदाचित त्यालाही कधीही न भावलेला असा मानवी जीवनाच्या क्षणभंगुरतेवर बोट ठेवणारा असा तत्त्वज्ञानाचा स्पर्श आहे, असेही वाटण्यापर्यंत पोचणारा हा आईशमानचा उद्गार आहे. पण तरीही त्याच्याबद्दल आदराचा लवलेश मनात निर्माण होत नाही. त्याचे कारण इतकेच की, त्याच्या या उद्गारामागे सुसंस्कृतपणाचा लवलेशही नाही. प्राचीन काळात रानटी माणसे अतिशय क्रूरपणाने वागत. त्यांच्या कथा आपण वाचतो तेव्हाही मन शहारून जाते. पण ती रानटीच होती. एवढे स्पष्टीकरण पुरेसे ठरते. त्यांना ना विद्या होती, ना संस्कृती होती. पण आईशमानच्या संदर्भात असे काहीच म्हणता येत नाही. केल्या कृत्याचा थोडासाही खेदाचा वा पश्चात्तापाचा भाव त्याच्या ठिकाणी दिसला नाही. अशी पाषाणहृदयी माणसे हिटलरने निर्माण केली होती. युद्ध हे अखेर युद्ध असते, तेथे माणसांचा बळी पडत असतो. कमी क्रूरपणाचे वा अधिक क्रूरपणाचे असा काही भेद युद्धात करू जाणे हे व्यर्थ असते, हे सारे खरे असते. पण निरपराध जीवांच्या हत्येबद्दल काय म्हणता येईल? त्यात स्त्रिया आणि

बालकेही होती, हे वाचताना अंतःकरण बधिर होऊन जाते.

आईशमान फाशी गेला त्या वेळच्या प्रसंगावर आणि त्याच्या भूमिकेवर भाष्य करणारा ''क्राइम अॅंड पनिशमेंट'' या नावाचा एक सुंदर लेख टाइम्स ऑफ इंडिया या नियतकालिकात आला. भरमसाठ व्याज घेऊन गोरगरिबांना पिळून काढणाऱ्या एका वृद्ध स्त्रीचा ती शासनास पात्र आहे असे मानून व ते शासन तिला करणे हे आपले कर्तव्य आहे अशा जाणिवेने प्रेरित होऊन रॉस्कोलनिकॉफ हा तरुण खून करतो, पण नंतर आपण केलेल्या त्या अपराधाबद्दल त्याच्या मनात पश्चात्तापाचा भाव उत्पन्न होऊन तो त्याचे अंतःकरण जळू लागल्यावर कबुलीजबाब देऊन शिक्षेचा स्वीकार करतो; अशी कथा रंगवणारी दोस्तोए-व्हस्कीची प्रख्यात कादंबरी आहे. तिचे नाव ''क्राइम अँड पनिशमेंट'' असे आहे. आईशमान-वरील लेखाला ते नाव लेखकाने योजले आहे यात काही सूचितार्थ आहे हे खरे. पण विपरीत कल्पनेच्या आहारी जाऊन एक खून केलेल्या कल्पित कादंबरीतील नायकाला पश्चात्ताप होतो, आणि लाखो लोकांची हत्या केलेल्या वास्तवातील आईशमानला थोडासाही अनुतापाचा भाव स्पर्श करीत नाही; यांतील परस्परविरोध, सत्य हे कधीकधी कल्पितापेक्षाही अद्‌भुत असते असे म्हटले जाते त्याऐवजी सत्य हे कधीकधी कल्पितापेक्षाही क्रूर, विकृत, आणि भयानक असते, असा निष्कर्ष काढण्याकडे आपल्याला घेऊन जातो. आधुनिक विज्ञानाने निर्माण केलेली संहारक शस्त्रे धारण करणारी, आसुरी महत्त्वाकांक्षेने अंध झालेली, मानवाचे जीवन नष्ट करणे म्हणजे एखादा डास वा ढेकूण मारावा अशा धारणेने वागणारी हिटलर, गोबेल्स, वा आईशमान यासारखी पिसाट मनोवृत्तीची माणसे कोणत्या कोटीतील मानावीत हे कळेनासे होते. नेपोलियनही महत्त्वाकांक्षी होता, सारा युरोप एका झेंड्याखाली आणण्याच्या आकांक्षेने भारलेला होता. पण त्याचे फ्रेंच जनतेवर एवढे प्रेम होते की, एल्बाहून सुटून तो फ्रान्सच्या भूमीवर उतरला आणि पॅरिसच्या दिशेने चालला असताना बोरबॉन राजाने पाठवलेले सैन्य समोरच्या रस्त्याने येताना दिसले. आपल्याबरोबर असलेल्या सैनिकांना त्याने थोपवले, घोड्यावरून तो खाली उतरला, राजाने पाठवलेल्या सैनिकांच्या समोर चालत जाऊन उभा राहिला, आणि त्यांना उद्देशून म्हणाला, ''मी फ्रान्सला वैभव प्राप्त करून दिले आहे हे लक्षात घ्या. फ्रान्सचा सन्मान वाढावा हीच माझी एकमेव आकांक्षा आहे. मी तुमचा सम्राट होतो. माझ्यावर तुम्हाला गोळी चालवायची असेल तर हा मी तुमच्यासमोर उभा आहे'' या उद्‌गारात आत्मविश्वास आहे, आत्मसन्मान आहे, स्वदेशाभिमान आहे, आणि धीरोदात्तपणाही आहे. तो त्याची ही कथा वाचताना आपल्याला स्पर्श करून जातो, मग ज्यांनी ते उद्‌गार प्रत्यक्ष ऐकले त्यांच्यावर त्या शब्दांचा केवढा परिणाम झाला असेल? समोरच्या सैनिकांनी रोखलेल्या बंदुका खाली केल्या, नेपोलियनचा जयजयकार केला, आणि ते त्याच्या सैनिकांत

जाऊन उभे राहिले असाच मार्ग काढत तो पॅरिसला पोचला, तर लोकांनी त्याला खांद्यावरून उचलून नेऊन सिंहासनावर बसवले, ''एका फ्रेंच माणसाचं रक्त सांडणार असेल तर मी फ्रान्सचा राजा होणार नाही'', असे त्याचे उद्‌गार होते. ते त्याने असे खरे करून दाखवले. महत्त्वाकांक्षी योद्धयातही काही उदात्तत्व असते, मानवतेचा आविष्कार दिसतो, सुसंस्कृतपणाचे दर्शन घडते. असे काहीतरी नेपोलियनमध्ये होते आणि ते भुरळ घालणारे होते. नेपोलियन कलेचा आस्वाद घेऊ शकत होता. त्याने जिंकलेल्या प्रदेशातून उत्तम कलाकृती फ्रान्समध्ये आणल्या ही त्याची रसिकता आहे, तर जर्मनी पादाक्रांत केल्यावर तो गटेला भेटून त्याच्याशी संवाद करू शकला ही त्याच्या ज्ञानाची बूज राखण्याच्या सामर्थ्याची खूण आहे. अखेर वॉटर्लूच्या लढाईत हार पत्करावी लागून सेंट हेलिना बेटात तो बंदिवान होऊन राहिला, तर तेथेही तो आपली प्रतिष्ठा सांभाळून राहिला. तेथील त्याच्या वागण्यात एका सम्राटाचा डौल आणि थोडासाही न उणावलेला स्वाभिमान यांचे दर्शन घडते. अनेक लोक त्याला भेटण्यासाठी किंबहुना केवळ त्याला पाहण्यासाठी तेथे गेले, तर ते त्याच्या उदार, बाणेदार आणि तितक्याच समधात वृत्तीने भारावून गेले. नेपोलियनने सारा जन्मभर युद्धेच केली, आणि त्यामुळे माणसे मारली गेली हे तर खरेच आहे. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राचा पराभव करून तेथील लोकांना गुलाम बनवणे यात कोणती संस्कृती आहे, असा प्रश्न केला तर नेपोलियन अपराधीच ठरेल पण असा अपराध ज्याच्या ठायी कर्तृत्व होते अशा प्रत्येक राष्ट्रप्रमुखाने केला आहे, ही इतिहासाची साक्ष आहे. शिवाय असा अपराध आपल्यापैकी प्रत्येकजण आपल्या इवल्याशा अधिकाराचा वा सामर्थ्याचा उपयोग करून आपल्या छोट्याशा स्वार्थासाठी आपल्याहून दुर्बळ वा खालच्या स्थानावर असलेल्या व्यक्तीबाबत करीत असतो, आणि या नियमाला अपवाद असणाऱ्या व्यक्ती विरळा आढळतात, हेही विसरता येत नाही. अफाट कर्तृत्व, उत्तुंग पराक्रम, आणि दुर्दम्य महत्त्वाकांक्षा असलेल्या व्यक्तीच्या ठायी आढळणारा मानवतेचा आणि सुसंस्कृतपणाचा अंश त्यामुळे मनात गौरवाचा भाव उत्पन्न करतो. यांतील काहीही हिटलरजवळ नव्हते. होती ती केवळ जर्मन राष्ट्राच्या श्रेष्ठत्वाविषयीची भावना, इतर सर्व राष्ट्रांविषयीचा तुच्छताभाव, आणि त्याच्या जोडीने असीम क्रौर्य त्यामुळे त्याच्या साऱ्या कर्तृत्वाला काळिमा आला.

जगात काय चाललेले असते हेही डोळे उघडे ठेवून पाहावे लागते. त्यापासून काही धडे मिळतात व सावध राहता येते. त्याच वेळी अव्यवहारी ध्येयवादाच्या सात्त्विक मोहापासूनही दूर राहता येते. ज्यू लोकांनी हिटलरला अहिंसेच्या मार्गाने उत्तर द्यावे, असे गांधीजींचे मत होते असे म्हणतात. हे अनाकलनीय आहे, एवढेच त्यांच्याबद्दल पूर्ण आदर ठेवून म्हणावे लागते. ज्यूंना त्यांचा असा देश नव्हता. हिटलरच्या छळापासून सुटावयाचे, तर जर्मनीतून बाहेर पडले पाहिजे. ज्यू माणसाने कोठे जावयाचे? एका ज्यूने गांधीजींना पत्र लिहून ही व्यथा कळवली व

''आम्हाला आमचा असा देशच नाही, अशा परिस्थितीत आम्ही काय करावे'' असा प्रश्न विचारला. याचे उत्तर काही दिवसांनी देईन, असे गाधीजीनी दिल्याचे दुर्गा भागवत यांनी आपल्यावर गांधीचा सस्कार आहे हे नमूद करतानाच म्हटले आहे. पण त्यांनी नंतर काय उत्तर दिले हे त्यांनी सांगितलेले नाही. या साऱ्या पृष्ठभूमीवर भारतीयांनी ''आपला देश'' हा आपल्या प्रेमाचा विषय मानला पाहिजे, असे मोठ्या पोटतिडिकीने दुर्गाबाईनी लिहिले आहे राष्ट्रीय विचार कसा मांडता येईल याची चर्चा करण्यासाठी सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. स. ह देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली हिन्दुत्ववादी दृष्टिकोण धारण करणाऱ्या काही कार्यकर्त्यांनी औरगाबाद येथे १९९७- च्या पूर्वार्धात एक चर्चासत्र आयोजित केले होते. त्यासाठी पाठवलेल्या एका छोट्या निबंधात दुर्गाबाईनी उपर्युक्त विचार व्यक्त केले आहेत. हिटलरही स्वदेशाचा अभिमानी होता, पण त्या अभिमानाने विकृत रूप धारण केले. उदारमनस्क चर्चिल लोकशाहीचा तारणहार झाला, पण तो ब्रिटिश साम्राज्य राहिले पाहिजे अशा आग्रही मताचा होता. मानवी मनाचे व्यापार सहजासहजी उलगडत नाहीत, हेच खरे.

हिटलरने मानवहत्येसाठी उभारलेल्या विषारी वायू सोडण्याच्या इमारती, आणि स्तालिनने सैबेरियातच नव्हे तर मॉस्कोतही तयार केलेली यातनागृहे, यांतील अधिक क्रूरपणाचे कोणते आहे हे ठरवणे अवघड जाईल. चर्चिल हे सारे ओळखून होता. एवढेच नव्हे, हिटलर तुमच्या देशावर चाल करण्याच्या बेतात आहे ही सूचना त्याने स्तालिनला दिली होती. स्तालिनचा विश्वास बसला नाही, पण अखेर जर्मनीशी रशियाची झुंज सुरू झाली. स्तालिनच्या हुकूमशाहीशी चर्चिलच्या लोकशाहीचे कोणते नाते होते? पण ही युद्धाची वेळ होती. ध्येयवादाच्या पायी खोट्या भ्रमजालात गुंतून व्यवहारातील कठोर वास्तवाकडे दुर्लक्ष करण्याचा भाबडेपणा चर्चिलकडे नव्हता. त्याने स्तालिनशी हातमिळवणी केली. याल्टा येथे चर्चिल, स्तालिन, आणि रूझवेल्ट या तिघांची १९४५ मध्ये एकत्रित भेट झाली. त्या वेळी युद्धाचा शेवट आणि जर्मनीचा पराभव दृष्टिपथात आला होता. ही भेट अर्थातच गुप्तपणे झाली. पण नतर तिचे छायाचित्र वृत्तपत्रांत झळकले. ते पाहताना हा जागतिक युद्धमंच डोळ्यांसमोर उभा राहिला. तिघाची तीन भिन्न व्यक्तिमत्त्वेही त्यात उठून दिसली. अशीच त्रयी जर्मनीचा हिटलर, इटालीचा मुसोलिनी, आणि जपानचा टोजो यांची होती. जगाच्या रगभूमीवरील हे एक थरारक नाट्य होते.

चर्चिल युद्धनेता होता, तेवढाच महान लेखक होता. तो नोबेल पारितोषिकाचा मानकरी ठरला. भिन्न भिन्न क्षेत्रांतील त्याचे कर्तृत्व डोळे दिपवणारे आहे. प्रथमच रशियात चालला असताना त्याच्या विमानाने रशियन प्रदेशात प्रवेश केला, तेव्हा ''ही कामगारक्रांतीची भूमी'' असे त्याच्या मनात आले. पण याला क्रूर हुकूमशाहीची जोड आहे, व्यक्तिस्वातंत्र्य

येथे शून्य आहे, आणि मानवाला येथे केवळ काम करणारे एक यंत्र मानले जाते का जनावर मानले जाते असा प्रश्न पडावा अशी ही भूमी आहे, असे सारे त्याच्या मनात येऊन गेले. त्याचे त्या वेळचे चितन त्याच्या आत्मचरित्रात आले आहे, ते मुळातून वाचण्यासारखे आहे असा हा विन्स्टन चर्चिल. दोस्त राष्ट्राचा व पर्यायाने लोकशाहीचा विजय झाला, त्याचे सर्वाधिक श्रेय त्याला आहे. त्याच्या निधनाची वार्ता आल्यावर जवाहरलालांनी 'a tremendous life' अशा शब्दांत त्याचे वर्णन केले, तर विसाव्या शतकातील एकमेव व्यक्ती निवडावयाची असेल तर ती ही, या अर्थाने ' Man of the Century' असे शब्द त्याचा गौरव करताना योजले होते. मानवाच्या मूलभूत स्वातंत्र्याची जपणूक अशा दृष्टीने विचार करू गेले, तर हे वर्णन अतिशयोक्तीचे म्हणता येत नाही. पण..

## इंग्लंडचा चर्चिल आणि भारताचे जवाहरलाल

होय, या एवढ्या गौरवपद वर्णनालाही एका पण-ची मर्यादा आहे. लोकशाहीचा विजय व्हावा या ध्येयवादाने भारला गेलेला चर्चिल हा एक श्रेष्ठ नेता होता हे खरे पण भारताबद्दल त्याचा कोणता भाव होता? भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीत होता. त्या त्या देशाच्या दृष्टीने स्वातंत्र्य ही किती मोलाची गोष्ट आहे, हे त्याला समजत नव्हते असे नाही. त्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी कोणी हातात शस्त्र घेतले, तर त्याचे कौतुकही तो करू शकत होता. एक जुलै १९०९ या दिवशी लंडनमध्ये नॅशनल इंडियन ॲसोसिएशनचा उत्सव संपला, आणि मदनलाल धिंग्रा यांनी झाडलेल्या पिस्तुलातील गोळीने कर्झन वायली ठार झाले. सारे लंडन त्या घटनेने हादरले. न्यायालयापुढे दिलेल्या जबानीत धिंग्रांनी उदगार काढले: "होय, त्या दिवशी मी इंग्रज रक्त सांडले. देशभक्त हिंदी तरुणाना फाशीची जी अमानुष शिक्षा देण्यात आली, आणि हद्दपारीची शिक्षा ठोठावण्यात आली, त्याचा तो अल्पसा सूड होता. जे राष्ट्र परक्यांच्या बायोनेटांनी दडपलेले असते, ते अखंड युद्धातच गुंतलेले असते... माझ्या देशाचा अवमान हा परमेश्वराचा अवमान आहे. माझ्याजवळ संपत्ती नाही, बुद्धीही नाही. दुसरे काही जवळ नसल्याने माझ्या रक्ताचा अभिषेक मी माझ्या मातृभूमीला केला आहे. ईश्वराच्या चरणांशी माझी एवढीच प्रार्थना आहे की, याच मातेच्या पोटी मला जन्म मिळावा, आणि याच पवित्र कार्यात मला पुन्हा मरण यावे." कोणीही थरारून जावे असे हे निर्भय निवेदन होते. चर्चिलही थरारून गेला. तो त्या वेळी वसाहतीचा अंडर सेक्रेटरी होता. तरी तो म्हणाला, "The Finest Speech ever made in the name of patriotism" म्हणजे देशभक्तीच्या भावनेचा आजवरच्या काळातील हा सर्वोत्कृष्ट आविष्कार होय. पण तरीही युद्धकाळातील भारतामधील सारी चळवळ त्याने दडपून टाकली त्याने भारतातून आकर्षक पगार देऊन सैन्य

उभे केले, त्याच्या पाठीशी व्यवस्थापकीय यंत्रणा म्हणून कित्येक कारकुनांची भरती केली, आणि जपानशी लढताना आघाडीवरील सैनिकांना काहीही कमी पडता कामा नये म्हणून या देशात प्रचंड प्रमाणावर धान्याची खरेदी केली, हे सारे एक वेळ समजू शकते. पण ही मर्यादा कोठवर जावी? प्रचंड प्रमाणावर तांदूळ आणि बटाटा असे पदार्थ शासकीय पातळीवरून खरेदी केल्यामुळे बंगाल-बिहारमध्ये धान्यटंचाई झाली, त्यामुळे कमालीची भाववाढ झाली, सामान्य माणसाला धान्य विकत घेणे अशक्य झाले, आणि परिणामी या मानवनिर्मित दुष्काळात भारतात पस्तीसचाळीस लाख माणसे भुकेने तडफडून मेली. छळछावण्यातील मृत्यू आणि हे कृत्रिम दुष्काळातील बळी दोहोत परिणामाच्या दृष्टीने कोणता फरक करता येईल?

या दुष्काळाच्या वा अन्नटंचाईच्या आणि त्यातील मृत्यूच्या वार्ताही प्रसिद्ध होऊ नयेत, अशी व्यवस्था तेव्हा करण्यात आली होती. १९४३ आणि १९४४ या वर्षातील ही कथा आहे. बंगालसाठी त्या वेळी महाराष्ट्रात दुष्काळनिधी गोळा केला जात होता आणि त्या कामात एक स्वयंसेवक म्हणून प्रस्तुत लेखकाने काम केले होते. बंगालमध्ये आणि दुष्काळ? खरे तर आमचा विश्वास बसत नव्हता. पण भीषण सत्य नंतर प्रकाशात आले आणि हा आकडा ऐकला तेव्हा अंगावर काटा उभा राहिला. भूक असह्य झाल्यावर अन्न न मिळाल्यामुळे होणारा मृत्यू हा अतिशय यातनापूर्ण असतो. या मृत्युपर्वाला शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करून ते बाजारात न आणणारे आपल्या देशातील व्यापारीही तितकेच जबाबदार होते, याचाही विसर पडू नये. व्यापाऱ्याला फक्त पैसा कळतो. कोणी परदेशस्थ वा स्वदेशबांधव हा भेद याच्या लेखी असत नाही. आपल्या करणीमुळे कोणी जगतात वा कोणी मरतात याचे खाते त्याच्या रोजकीर्दीत नसते. दुसऱ्या महायुद्धात रणांगणावर एक कोटीहून थोडे अधिक लोक मारले गेले, तर भारतात अन्नाविना पस्तीसचाळीस लाख माणसे मृत्युमुखी पडली. आकड्यांची ही तुलना काय दर्शवते? याला मूलतः इंग्रज सरकार जबाबदार होते की ज्याच्या प्रमुखपदी चर्चिल होता. त्याला भारतातील ही परिस्थिती कळत नव्हती, यावर विश्वास बसणे कठीण आहे. इंग्रज जनतेची अशी उपासमार त्याने होऊ दिली असती काय?

एवढ्याने भागले नाही. भारताला स्वातंत्र्य देण्यास चर्चिल थोडासाही अनुकूल नव्हता तो प्रश्न निघाला असता त्याने एकदा काढलेले उद्‌गार आहेत, ''ब्रिटिश साम्राज्य नष्ट करून टाकण्यासाठी मी पतप्रधान झालेलो नाही.'' जवाहरलाल ही मूळ आधुनिक उदारमतवादी ब्रिटिश संस्कृतीची निर्मिती, म्हणून त्यांना लोकशाहीची चाड आणि स्वातंत्र्याची ओढ. त्यापोटी ते भारतात आल्यावर राजकीय चळवळीत उतरले भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर जवाहरलाल पंतप्रधान झाले जे जे गुण चर्चिलमध्ये होते त्यांतील एक

युद्धनेतृत्व सोडल्यास बाकीचे सारे जवाहरलालांच्या ठायी होते. त्या दृष्टीने साकल्याने विचार करता चर्चिलच्या निकट येणारी अशी दुसरी कर्तृत्ववान व्यक्ती साऱ्या जगात दाखवता येणे कठीण होते. चर्चिल एका राष्ट्राचा राजकीय नेता असला, तरी त्याची बुद्धी चौफेर फिरणारी होती. अनेक विषयांत ती रमणारी होती. इग्रजी भाषा बोलणाऱ्या समाजाचा म्हणजेच इंग्लडचा विस्तृत इतिहास त्याने लिहिला आहे. तो उत्तम लेखक होता. कला आणि साहित्य यांची त्याला बूज होती. आपली मायभूमी जी इंग्लंड तिच्या गौरवशाली पराक्रमाचे प्रतीक म्हणून त्याला ब्रिटिश साम्राज्याचा अभिमान होता हे खरे, पण भारत स्वतंत्र झाल्यावर त्याने नव्या परिस्थितीशी जुळवूनही घेतले. त्याचे चिंतन युद्धकाळात अमेरिकेशी आलेल्या संपर्कामुळे आणि रशियात झालेल्या साम्यवादी क्रांतीमुळे युरोपच्या व जगातील लोकशाहीच्या भवितव्यापर्यंत पोचले. ब्रिटिश संस्कृतीत जे काही उत्तम आहे त्याचा परिपूर्ण आविष्कार त्याच्या ठायी दिसतो.

त्याच ब्रिटिश वातावरणात जवाहरलाल आठव्या-नवव्या वर्षापासून वाढले, तेथे शिकले, आणि आधुनिक विज्ञानवादी लोकशाहीतील सारे सत्त्व त्यांनी आत्मसात केले. त्यांचीही बुद्धी चौफेर फिरणारी होती. सुंदर इंग्रजी लिहिणाऱ्या जगातील पहिल्या दहा लेखकांत त्यांचा समावेश करता येतो, असे म्हटले गेले आहे. याच्याच जोडीला सारे जग त्यानी पाहिले होते. केवळ भारताच्याच नव्हे, तर जगाच्या इतिहासाचा धांडोळा त्यांनी घेतला होता, हे त्यांच्या "Glimpses of the world History " या ग्रंथावरून ध्यानात येते. चर्चिलला वरिष्ठ इंग्रजी समाजात जे स्थान होते तेच जवाहरलालांचे वडील मोतीलाल यांना भारतात होते. अलाहाबाद येथील एका विस्तीर्ण आवारात असलेले त्यांचे निवासस्थान असलेले आनंदभवन आपण पाहिले, तर या घराण्याच्या ऐश्वर्याची कल्पना येते.

अशा ऐश्वर्यात राहणाऱ्या व इंग्लंडमध्ये शिकलेल्या जवाहरलालांनी भारतात आल्यावर गांधीजीचे अनुयायित्व स्वीकारले, खादीचा जाडाभरडा वेष स्वीकारला, अकरा वर्षाचा कारावास भोगला, आणि भारतीय जनतेचे राजकीय नेतृत्व केले स्वातंत्र्य हे मूल्य त्यांनी ब्रिटिशांकडून उचलले आणि स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याच ब्रिटिशांशी झगडा केला. ही त्यांची सारी वाटचाल ध्यानात घेतली, तर स्वतंत्र भारताचा हा पहिला पंतप्रधान समोर उभा राहिल्यावर चर्चिललाही त्याचे आंतरिक मोठेपण जाणवून गेले असेल. चर्चिल ज्याचे नेतृत्व करीत होता तो इंग्रज समाज पुढारलेला होता, जवाहरलालांचा भारत मागासलेला होता व खंडप्राय होता. त्यामुळे दोघांना लाभलेल्या यशात फरक पडला. त्याचबरोबर जागतिक शातता आणि राष्ट्राराष्ट्रांतील सामंजस्य यांविषयीच्या जवाहरलालाच्या कल्पना वास्तवापासून फार दूर होत्या, त्यामुळे त्यांना पुढे काही धक्के खावे लागले भारताच्या दृष्टीनेही त्यांच्या राजकारणातील काही उणेपण जाणवते, पण ते येथे बाजूला ठेवावे. ब्रिटिश कॉमनवेल्थची बैठक इंग्लंडमध्ये

झाली तेव्हा सर्व प्रतिनिधींचे स्वागत करताना भारताचे पतप्रधान असलेल्या जवाहरलालाशी चर्चिल हस्तांदोलन करीत आहेत, असे छायाचित्र वृत्तपत्रांत पाहताना मनोमन धन्य वाटले, अभिमानही वाटला.

भारताच्या स्वातंत्र्याला विरोध करताना ''भारतीयाना राज्य कसं करावं हे माहीत नाही'' असे चर्चिलचे उद्‌गार होते. हिंदुमुसलमानात भीषण दंगे होतील, आणि सारी अंदाधुदी माजेल, असे त्याने भाकित केले होते, हे भवितव्य तेव्हा बोलणी करणाऱ्या आपल्या नेत्यांच्या लक्षात आले होते, असे म्हणवत नाही. हे विधान मान्य झाले, तर तो त्यांचा फार मोठा अदूरदर्शीपणा ठरतो असे म्हणावे लागते. व्हावयाचे ते झाले आणि लक्षावधी माणसे मारली गेली, हजारो स्त्रियांची अब्रू लुटली गेली, तेवढ्याच संख्येत स्त्रिया पळवल्या गेल्या, आणि कोट्यवधी हिंदू आपली पुरातन काळापासूनची भूमी सोडून स्वतत्र भारतात अंगावरच्या वस्त्रांनिशी आले. या सर्वांच्या या अपार दुर्दशेचे पातक नैतिक दृष्ट्या कोणाच्या माथ्यावर आहे, याचा निर्णय इतिहासाने अद्याप पुरेशा स्पष्टपणे नोंदवलेला नाही. एकविसाव्या शतकाच्या आगमनाच्या तुताऱ्या सध्या उंच स्वरात निनादत आहेत. त्या शतकात हे सत्य स्वच्छ शब्दांत स्पष्ट केले जाईल यात शंका नाही.

हा सारा विषय अतिशय गुंतागुंतीचा आहे. कोणते तरी एक कारण यामागे आहे असे म्हणता येणार नाही, किंवा कोणा एक पक्षाला त्याबद्दल जबाबदार धरता येणार नाही. राष्ट्राच्या वर्तमानकालीन स्थितीची कारणे काही वेळा कित्येक शतके आधीच्या घटनात पोचतात, पण तितकीच ती नेते जे निर्णय वेळोवेळी घेतात त्यांत लपलेली असतात. चर्चिलचे भाकित खरे ठरवण्यास आपलाही बराच हातभार लागला आहे. आपण कमी पडलो आणि अद्यापही पडत आहोत. पण त्याच वेळी हेही खरे की, भारतात हर एक ठिकाणी व हर एक स्तरावर फूट पडेल व भांडणाची मुळे पेरली जातील, याची पद्धतशीर आखणी १८८५-मधील काँग्रेसच्या स्थापनेपासूनच ब्रिटिशांची कुटिल राजनीती करीत आली आहे. १८५७-च्या उद्रेकातून राज्यकर्त्यांनी घेतलेला तो धडा होता. त्याचाच वारसदार दुसऱ्या महायुद्धातील लोकशाहीच्या विजयाचा प्रमुख शिल्पकार असलेला चर्चिल होता. हे त्याला माहीत नव्हते. असे नाही. अखेर जो इंग्लंडचा राजा तो भारताचा मात्र सम्राट, हे खरे वास्तव होते. त्या इंग्लडच्या प्रदेशातून लीड्‌सकडे गाडी धावत असताना मन असे नाना घटनांशी व राष्ट्राराष्ट्रातील व्यवहारांच्या वास्तवाशी चाळा करीत होते. गाडी अडीच वाजता लीड्‌सला पोचली. डॉ. अन्वय मुळे मला घरी घेऊन गेला, आणि मी त्याच्या भावपूर्ण आतिथ्याचा आस्वाद घेण्यात रमून गेलो.

# ३. शेक्सपियरच्या गावा जावे

दुसरे दिवशी रविवार होता. अन्वयला सुटी होती. तो आणि मी त्याच्या गाडीतून निघालो. सुमारे दीडशे मैल दूर असलेल्या स्ट्रॅटफोर्ड-अपॉन-ॲव्हॉन या शेक्सपियरच्या जन्मगावी आरामशीरपणे येऊन पोचलो. वाटेत सर्व वेळ गप्पा चालल्या होत्या. आपल्या तीन वर्षांच्या वास्तव्यातील आपले इंग्लंडमधील काहीकाही अनुभव तो सांगत होता. तो उत्तम हृदयविकारतज्ज्ञ आहे, त्यातील शस्त्रक्रिया करतो. अनुभव घेण्यासाठी तो इकडे आला आहे. तो काम करतो ते रुग्णालय अतिशय सुसज्ज आहे. ज्यांच्या हाताखाली तो काम करतो ते डॉक्टर त्याच्या कामावर संतुष्ट आहेत, आणि त्यांचे प्रेम त्याला लाभले आहे. अन्वयची पत्नी संज्योत ही दंतरोगतज्ज्ञ आहे. त्यातील प्रगत अभ्यासक्रम करीत आहे. तिने एका आंतरराष्ट्रीय परिषदेत नुकताच एक निबंध सादर केला होता आणि त्यासाठी ती चार दिवस ऑस्ट्रियात जाऊन कालच परत आली होती. मुलगी प्रमथा लहान आहे, पण तिला सांभाळण्याची व्यवस्था आहे. त्यामुळे संज्योत आपला पुढील अभ्यास करू शकेल. हृदयावरील शस्त्रक्रियेतील अद्ययावत अनुभव आपल्याला मिळत आहे, याचे समाधान अन्वयला मिळत आहे.

### श्रेष्ठ नाटककार शेक्सपियर

आणखी दोनतीन वर्षे येथे काढावीत, त्या अवधीत संधी मिळाली तर अमेरिकेतील एखाद्या रुग्णालयात तेथील कामाचा अनुभव घ्यावा, असा आपला विचार अन्वयने बोलून दाखवला. कायम परदेशात राहण्याचा त्याचा विचार नाही. आपल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या लोकांना व्हावा यासाठी आपल्या देशात परत जावे असे त्याने निश्चित ठरवले आहे. पण वैद्यकीय व्यवसायात भारतात कसे व्यवहार चालतात, याचा त्याने घेतलेला अनुभव सात्त्विक प्रवृत्तीच्या माणसाचे मन विषण्ण व्हावे, असा होता. योग्य तेवढाच पैसा घेऊन आपण रुग्णांचे दुःख हरण करावे, असे शिकत असल्यापासूनचे त्याचे स्वप्न आहे. पण ते प्रत्यक्षात उतरणे सोपे नाही, हे त्याच्या अनुभवाला आले आहे. यातून मार्ग कसा काढावयाचा, हा त्याच्यापुढे असलेला प्रश्न आहे. डॉ. ए. जे. क्रोनिन याची सिटॅडेल ही कादबरी सन्मार्गाने जाऊ पाहणाऱ्या ध्येयवादी डॉक्टरला किती विपरीत अनुभव येतात, त्याचे भेदक चित्र उभे करणारी आहे.

"ॲडव्हेचर्स इन टू वर्ल्डस्" या नावाचे त्याचे आत्मचरित्र आहे ते वाचल्यावर ध्यानात येते की, वैद्यकीय व्यवसायातील जे विपरीत प्रसंग त्याने कादंबरीत वर्णन केले आहेत, त्यांतील बरेचसे त्याने आपल्या आयुष्यात प्रत्यक्ष घेतलेले अनुभव आहेत

सत्प्रवृत्ती आणि असत्प्रवृत्ती यांतील हा झगडा सनातन आहे त्यातील विपरीत म्हणावा असा भाग हा आहे की, सत्प्रवृत्त माणसाला अधिक सावध राहावे लागते, आणि सतत संघर्षाला सामोरे जाण्याची सिद्धता ठेवावी लागते. याच्या उलट, जे काही वावगे असेल त्याकडे डोळेझाक केली तर निदान सुरक्षित राहता येते. आपण त्याच कळपात सामील झालो तर रोजची डोक्याची सारीच कटकट मिटते. माणसाने चांगले वागावे हा जीवनातील पहिला धडा आहे असे मानले, तर आपण केवळ चांगले वागून निभाव लागत नाही आणि आपण चांगले वागल्याने आपल्या वाट्याला चांगलेच येईल असे या जगात घडत नाही, हे मानवी जीवनाचे विपरीत स्वरूप नीट ध्यानात येणे हा दुसरा धडा आहे. हा दुसरा धडा नीट आत्मसात केला तरच पहिला धडा अनुसरता येतो हे जेव्हा कळते, तेव्हा जीवनविषयक खऱ्या शिक्षणाचा प्रारंभ होतो.

अशा काहीकाही गप्पा मारत आम्ही शेक्सपियरच्या जन्मगावी येऊन पोचलो. ज्यावर आम्ही बोलत होतो त्याच मानवी व्यवहाराची अनेकविध रूपे आपल्या नाटकांतून उभी करणारा हा महान नाटककार गावात प्रवेश करतानाच मनाला धन्य वाटले. शेक्सपियर तत्त्वज्ञ होता का, किंवा निदान विचारवंत होता का, असा प्रश्न विचारला तर काय उत्तर देता येईल? जॉर्ज बर्नार्ड शॉ हा या शतकात होऊन गेलेला तसाच एक श्रेष्ठ नाटककार. तो श्रेष्ठ विचारवंत म्हणून गाजलेला होता. मानवी जीवनातील कठीण समस्यांना तो नाटकांच्या माध्यमातून हात घालत असे. "Doctor's Dilemma" हे त्याचे नाटक आठवले, कारण ज्याच्याबरोबर आलो होतो तो अन्वय डॉक्टर होता. लंडनमधील सीसेम क्लबचा शॉ सदस्य होता व तेथे अनेकिवध कूट समस्यांवर चर्चा चालत असत. शॉने आपल्या नाटकांना लिहिलेल्या प्रस्तावना गाजलेल्या आहेत. स्वतः शॉलाही त्या महत्त्वाच्या वाटत, आणि त्यांत जे काही महत्त्वाचे असे, त्याचे प्रतिबिब त्याच्या नाटकात पडलेले दिसते. शेक्सपियरची अशी काही प्रतिमा आहे का? तशी आहे असे म्हणवत नाही. किंबहुना असे काही मूलभूत जीवनविषयक प्रश्न उभे करावेत या हेतूने त्याने आपली नाटके लिहिली, असे कोणी समीक्षकही म्हणत नाहीत. पण तरीही तो सर्वश्रेष्ठ नाटककार म्हणून मान्यता पावला.

तत्त्वज्ञ किंवा विचारवंत अशी प्रतिमा नसली तरी मानवी स्वभावाचे अनेक नमुने शेक्सपियरने उभे केले आहेत, आणि कोठेकोठे मानवी जीवनाच्या स्वरूपाविषयी असे काही अर्थगर्भ उदगार काढले आहेत की, हे त्याच्या लेखणीतून कसे उतरले असा प्रश्न आपल्याला

पडतो , Life is a tale told by an idiot" म्हणजे मानवी जीवन ही कोणातरी वेडपट माणसाने सांगितलेली कथा आहे, हे मॅकबेथ या शोकातिकेतील छोटेसेच वाक्य, पण ते जणू मानवी जीवनातील साऱ्या विसंगतीवर आणि अंतिम अर्थशून्यतेवर झगझगीत प्रकाश टाकून जाते. असा हा सखोल वेध घेणारा स्पर्श त्याच्या विचारविश्वाचा किंवा निदान जाणिवांच्या विश्वाचा भाग कसा झाला असेल? तत्त्वज्ञान वा मानसशास्त्र यांवरची गहन पुस्तके त्याने अभ्यासली होती असे कोणी म्हणत नाही. समाजाच्या व्यवहाराचे नियंत्रण करणाऱ्या किंवा समाजाचे भले व्हावे यासाठी प्रयत्न करणाऱ्या कार्याचा वा दुःखिताची सेवा करण्याच्या क्षेत्राचा अनुभव त्याला होता असे नाही. मग सखोल चिंतनपर अशा कोठेकोठे आढळणाऱ्या त्याच्या नाटकांतील उद्‌गारांचा उगम कोठे शोधता येईल ? शेक्सपियरवर अनेकानेक श्रेष्ठ समीक्षकांनी विपुल लेखन केले आहे. कोणीतरी हा शोध घेतला असेलही. प्रस्तुत लेखकाचा तो अभ्यास फार फार तुटपुंजा आहे.

## शेक्सपियरच्या शोकांतिका

अनेक नाटके शेक्सपियरने लिहिली, पण त्यांतील सर्वाधिक गाजल्या त्या त्याच्या शोकान्तिका. मानवाच्या ललाटी लिहिलेले दुःख आणि त्यातील कारुण्य हे मनाला चटका लावणारे विषय आहेत. " Our sweetest songs are those that tell us saddest thoughts" हा उद्‌गार गाजलेला आहे. हरएक विचारी आणि काही धडपड करणाऱ्या माणसाची ती नियती जणू अटळ आहे, आणि जे प्रत्यक्ष काही धडपड करीत नाहीत पण तटस्थपणाचे जीवनाचे, त्यातील गुंतागुंतीच्या व्यवहाराचे, आणि अंती हरएकाच्या पदरी पडणाऱ्या भागधेयाचे अवलोकन करीत असतात, तेही अखेर याच निष्कर्षाला येऊन पोचत असतात. हे अटळ असे दुःख हा सर्वांच्याच सततच्या चिंतनाचा विषय आहे. पण माणसे सरळ का वागत नाहीत किवा वाकड्या मार्गाने जाण्याची बुद्धी त्यांना का होते, हा त्याहून खोलवर पोचणारा विषय आहे. ''अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः'' म्हणजे तशी इच्छा नसताना आणि कोणीतरी जणू जबरदस्ती केल्याप्रमाणे, अशी शब्दयोजना करून माणसे कुमार्गाने का जातात, हा प्रश्न अर्जुनाने गीतेत विचारला आहे. काही दैवी आघात किंवा ज्यावर आपली सत्ता नाही असे काहीतरी अघटित घडून येणे हे दुःखाला कारण झाले, तर ते स्वीकारता येते. पण कळत असून वळत नाही असे झाल्यामुळे कोणाकोणाच्या आयुष्याची दुर्दशा होऊन जाते असे आढळते, तेव्हा तो मनुष्यच आपल्या दुःखपूर्ण नियतीला जबाबदार ठरतो. विवेकाचा अभाव आणि विपरीताचा मोह ही मानवाची एक दुर्बलता आहे आणि तीच जणू एक शोकांतिका आहे.

असे वाटून जाते की, शेक्सपियरच्या अधिकांश शोकांतिका मानवाच्या या प्रवृत्तीवर आधारलेल्या आहेत. ज्याच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाकडे किंवा त्यांच्या उक्तीकृतीतून प्रकट होणाऱ्या एखाद्या उदात्त अशा मूल्याकडे आपण विस्मित होऊन पाहात राहावे, आपली मान काहीशी नम्र व्हावी, आणि दुःखालाही सामोरे जावे ते या भूमिकेने असा ठसा मनावर उमटावा; अशा व्यक्ती दिसत नाहीत. जूलियस सीझरमध्ये तसा काही स्पर्श आहे असे वाटते. इतर शोकांतिकांना मोल चढले आहे ते शेक्सपियरच्या प्रतिभेच्या परिसस्पर्शाने. अर्थात जे मुळात फारसे भव्य नाही ते रसिकाचे चित्त रमून जाईल अशा कलात्मक उंचीवर नेऊन ठेवणे ही सामान्य किमया नाही. जे अनेक वेळा म्हटले गेले आहे, पण इतक्या सुंदर शब्दांत कधी व्यक्त केले गेले नव्हते, अशा प्रकारे साहित्यातील मनोवेधक आविष्कारांचे वर्णन इंग्रजीतच केले गेले आहे त्या कसोटीस शेक्सपियर पुरापुरा उतरतो. वरवर पाहता सामान्य वाटणाऱ्या मानवी जीवनातील घटनांना असामान्यत्वाचे दान करणारी ही प्रतिभा कशी विकसित होत गेली असेल, आणि मानवी स्वभावाचे एवढे अनंत नमुने त्याच्या बुद्धीने कोठून गोळा केले असतील, असा प्रश्न आपल्या मनाला पडतो.

रोमियो अँड ज्यूलियट ही कोवळ्या यौवनातील असफल प्रेमाची कहाणी आहे. प्रतिकूल परिस्थिती हे त्याचे एकमेव कारण मानता येईल की नाही हे सांगता येत नाही, पण तरुण प्रेमिकांची जीवने पुरती उमललेली नसतानाच त्यांचा झालेला शेवट मनाला स्वाभाविकच चटका लावून जातो. इतर शोकांतिकांचे नायक कोणी मत्सरी, कोणी महत्त्वाकांक्षी पत्नीच्या आहारी गेलेले, तर कोणी वार्धक्यातील अंगभूत चिडचिडेपणाचा किंवा स्वतःच्या अपत्यांकडून होणाऱ्या उपेक्षेचा बळी झालेले अशा व्यक्ती आहेत. हॅम्लेटची शोकांतिका मात्र एकदम वेगळी आहे. आपले नेमके कर्तव्य काय याविषयीच्या अतिशय जटिल परिस्थितीतून निर्माण झालेल्या पराकोटीच्या संभ्रमाची ती कथा आहे. ''किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः।'' म्हणजे काय करावे आणि काय करू नये या प्रश्नाच्या बाबतीत मोठमोठे ज्ञातेही संशयाच्या आवर्तात सापडतात, असा भगवान श्रीकृष्णाचा उद्‌गार येथे सहज आठवेल. हॅम्लेटच्या पहिल्या अंकात शेक्सपियरने म्हटले आहे की, निसर्गाची लीलाच अशी असते की तो माणसाच्या ठिकाणी जणू त्याच्या जन्माच्या वेळीच असा एखादा दोष वा दुर्गुण पेरून ठेवतो की तेवढ्यामुळे त्याच्या ठायी असलेले इतर सारे गुण व्यर्थ ठरतात, आणि जीवनाची शोकांतिका होऊन जाते. हे सारे इतके अनिर्वाय होऊन जाते की टळत नाही आणि त्याबद्दल त्या व्यक्तीला जबाबदार धरावे की नाही असे वाटण्याची वेळ येते.

हा आशय व्यक्त करणारे एक स्वगत हॅम्लेटमध्ये येते. " Carrying----- the stamp of one defect ----- "म्हणजे स्वभावगत अशा एखाद्या दोषाचा शाप शिरावर

घेऊन जीवनाला सामोरे जाण्याची वेळ आल्यावर त्या व्यक्तीच्या वाट्याला काय येते, याचे वर्णन करताना शेक्सपियरने म्हटले आहे.

Their virtues else, - be they as pure as grace
As infinite as man may undergo
shall in the general censure take corruption
From that particular fault......

सारे गुण मातीमोल होऊन जावेत असा कोणता दुर्गुण हॅम्लेटमध्ये होता, असे म्हणता येईल? नीतिअनीतीची चाड नसलेल्या निकटच्या नात्यातील व्यक्तीच्या विळख्यात तो सापडला होता, आणि ते त्याचे केवळ दुर्भाग्य होते असे वाटून जाते. पण हे दुर्भाग्य आपले मन विषण्णतेने भरून जाईल, अशा परिणामकारकपणे शेक्सपियरने उभे केले आहे हॅम्लेट मोठ्या विलक्षण पेचात अडकलेला होता यात संशय नाही. त्याच्या काकांनी आपल्या भावाचा खून करून राज्य बळकावले. आपल्या पित्याचा खून करणारा म्हणून त्याचा सूड घ्यावा तर तो प्रत्यक्ष चुलता. पण तेवढेही पुरेसे नव्हते म्हणून की काय, हॅम्लेटच्या आईने त्या दीराशी लग्न केले. आता खून करणारा चुलता अधिक अपराधी, का त्याच्याशी लग्न करणारी व्यभिचारी आई अधिक अपराधी? आपल्या वडिलांची निर्घृणपणे हत्या केली गेली, तेव्हा मुलगा म्हणून आपले कर्तव्य काय असा प्रश्न हॅम्लेटला पडला. तो इतका गुंतागुंतीचा आहे की, हॅम्लेटला दोष देववत नाही. रंगभूमीवर सतत काहीतरी घडत राहावे लागते असे नाटकाच्या बाबतीत म्हणतात. मती कुंठित झालेला हॅम्लेट काही करू शकत नाही आणि असा हा कोणताही ठाम निर्णय घेऊ न शकलेला संभ्रमित नायक असूनही शेक्सपियरचे नाटक प्रेक्षकांना खिळवून ठेवते, तर त्यात अधूनमधून येणारी वरच्या अवतरणासारखी अर्थांतरन्यासात्मक वाक्ये वाचकाला एकूण मानवी जीवनाबद्दल विचार करण्यास प्रवृत्त करतात, हे त्याचे अपूर्व यश आहे.

## भारतीय साहित्य आणि शोकांतिका

अशा शोकनाट्यांच्या प्रभावी दर्शनामुळे शेक्सपियर असामान्य ठरून गेला. भारतीय साहित्यात अशा शोकांतिका नाहीत असे मानले जाते. शोकान्तिकेची साहित्यशास्त्रातील जी काही संकल्पना असेल, त्या अर्थाने आपल्याकडील साहित्यकृतीत शोकांतिका नसतीलही. नाटकाचा शेवट सुखान्त असावा, असा एक संकेत संस्कृत साहित्यात होता, असे म्हणतात. पण मानवाच्या ललाटी येणाऱ्या दुःखपूर्ण नियतीची दखल आपल्याकडे घेतली गेली आहे. त्यातील विशेष असा आहे की त्या शोकांतिका सामान्य माणसाच्या नशिबी त्याच्या एखाद्या दोषापायी येणाऱ्या नसून उदात्तचरित पुरुषांच्या ललाटी त्यांचा कोणताही अपराध नसताना लिहिल्या गेलेल्या आहेत. भवभूतीने ''एको रसः करुण एव निमित्तभेदात्'', म्हणजे निमित्ते

आहे त्या सीतेला दुःखसागरात लोटून द्यावे लागण्याचा अपराध रामाला करावा लागला, आणि त्याचबरोबर सीतेच्या सहवासाला अंतरल्यामुळे सारे जीवन दुःखपूर्ण तर झालेच पण आपण पत्नीवर अन्याय केल्याची जाणीव मनाला सतत टोचणी देत राहिली. उदात्त ध्येयाच्या पूर्ततेसाठी स्वीकारलेले हे दुःख रामाचे अवघे जीवन शोकात्म करून गेले पती म्हणून आपले कर्तव्य पार पडू न शकलेला राम अपराधी, का जे व्रत त्याने उभ्या आयुष्यासाठी स्वीकारले होते ते एवढी किमत देऊनही त्याने पाळले म्हणून तो निरपराधी, हे कोडे सोडवताना विचारी माणसाचाही हॅम्लेट होण्याची वेळ येते; आणि सर्वथा निरपराध अशा सीतेच्या दुःखाबद्दल तर काहीच बोलता येत नाही.

अशा उदात्त पातळीवरील शोकात्मता एका उंचीवर जाणारी असते. ही रामायणाची कथा झाली. महाभारत हीदेखील अखेर एक शोकांतिकाच म्हणावी लागते. किंबहुना त्यात शेक्सपियरच्या बहुतेक सर्व शोकांतिका निरनिराळ्या पात्रांच्या रूपाने आपोआप येऊन जातात, आणि त्यांतील काही व्यक्तिरेखा आपल्याला अधिक वरच्या पातळीवरील मानवी नियतीच्या शोकांतिकेकडे घेऊन जातात. दुर्योधन अतीव महत्त्वाकांक्षेचा बळी आहे, तर नाकर्ता धृतराष्ट्र सारे काही विपरीत होत चालले आहे हे केवळ पुत्रस्नेहापोटी पाहात राहून अधिक अधिक दुःखात लोटला जात आहे. सूतपुत्र म्हणून सतत अवहेलनेचा बळी झालेला कर्ण आणि सूडाच्या भावनेने पेटलेला अश्वत्थामा आपल्या त्या वर्तुळातून कधी बाहेर पडू शकलेले नाहीत. कौमार वयातील मोहाचा एक क्षण कुंतीचे हृदय अखेरपर्यंत आतल्या आत जाळत राहिला आहे, आणि अकाली झालेल्या पतीच्या निधनामुळे आपल्या मुलांची होत असलेली सारी परवड असहाय्य होऊन तिला पाहावी लागली आहे. एकाहून एक समर्थ असे पाच पराक्रमी पती असूनही द्रौपदी जणू अनाथ झाली आहे. अखेर आपल्या अपमानाचा बदला घेतला गेला म्हणून ती तोवर मोकळे सोडलेले केस विंचरून आपली वेणी घालते, एवढ्यात आपले पाचही पुत्र मृत्यूच्या वाटेने गेल्याचे असह्य दुःख तिच्यासमोर उभे राहते. अशी ही महाभारतातील निरनिराळी पात्रे आपापला दुःखाचा भार वाहात आयुष्याचा रस्ता चालत राहिली आहेत.

द्यूताच्या पायी सर्वनाशाकडे जाणारा युधिष्ठिर काही दोषाने युक्त आहे असे म्हणता येते, पण त्याच वेळी तो धर्मराज जीवनाचा अर्थ स्वतंत्रपणाने लावू पाहणारा आहे, धर्माचा शोध घेणारा आहे आणि त्यासाठी दुःखाच्या वाटा स्वीकारणारा आहे. शांतिपर्वात भीष्माशी संवाद करणाऱ्या युधिष्ठिराचे मन युद्धातील विजयाचा हात धरून आलेल्या दुःखाने पोळलेले आहे तोच युधिष्ठिर आपली पत्नी आणि भाऊ यांच्यासह सारे राजवैभव बाजूला ठेवून इहलोकाचा निरोप घेण्यासाठी हिमालयातील केदारनाथकडे घेऊन जाणारा चढ चढू लागतो, एकामागोमाग द्रौपदी आणि चारी भाऊ वाटेतच कोसळतात, आणि केवळ एक कुत्रा संगतीला

निराळी पण अखेर साहित्यातील रस करुण हा एकच, असा उद्‌गार काढला आहे. येथे शोकाला किंवा दुःखाला अग्रस्थान दिलेले आहे शृंगार किंवा वीर हे रस साफ बाजूला सारले आहेत. हा उद्‌गार त्याच्या ज्या नाटकाच्या प्रारंभी येतो ते उत्तररामचरित केवळ शोकान्त म्हणता येत नाही, तर ते शोकात्म आहे. पहिल्या अंकात श्रीरामचन्द्र सीतेशी विश्रब्ध संवाद करताना पती या नात्याने मधुर वाटावे असे काही आश्वासन देतो, तेवढाच काय तो शृंगाराचा ईषत्स्पर्श आहे. तो प्रसंग संपतो आणि तेवढ्यात दुःखाची जी छाया येते ती त्या दोघांचे सारे जीवन व्यापून टाकते. सीतेच्या दुःखाचे प्रत्यक्ष चित्रण येत नाही, पण रामाच्या दुःखाचे चित्र एवढ्या उत्कटतेने उभे राहते की, ''दुःखसंवदेनायैव रामे चैतन्यमाहितम्।'' म्हणजे दुःखाची बोच सतत जाणवत राहावी यासाठीच या रामाच्या ठायी ईश्वराने चैतन्य ठेवलेले आहे, हे त्याने वासंती या वनदेवतेला उद्देशून काढलेले उद्‌गार सार्थ

---

''आराधनाय लोकानाम्'' म्हणजे लोकांचा संतोष राहावा यासाठी ''स्नेह, दया, स्वतःचे सुख, एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष जानकीचा देखील त्याग करण्यास मी सिद्ध असेन'' असे राजा या नात्याने आपल्या जीवनाचे ध्येय सांगणारे शब्द भवभूतीने रामाच्या मुखात टाकले आहेत, आणि सीतात्यागाचा निर्णय तो घेतो तेव्हा ते खरे ठरतात. ईश्वरी अवतार मानला गेलेला हा श्रीराम स्नेह वा दया अशा भावनांना पारखा झाला आहे, असे चित्र मनासमोर उभे राहते. पण त्याच वेळी स्वतःच्या सुखालाही आयुष्यभरासाठी त्याने तिलांजली दिली आहे हे विसरता येत नाही हे सारे शब्द त्याने एक कठोर निर्णय घेऊन खरे करून दाखवले, पण त्याच श्लोकांत त्याच्या मुखातून बाहेर पडलेले ''मुंचतो नास्ति मे व्यथा'' म्हणजे हा त्याग करताना आपण त्याचे दुःख मानणार नाही हे शब्द त्याला प्रत्यक्षात उतरवता आले काय? असे म्हणता येईल की, तो निर्णय घेताना त्याने ती व्यथा मनावर घेतली नाही. पण तो निर्णय प्रत्यक्षात आणताना त्याच्या जीवनात जी व्यथा निर्माण झाली, ती साऱ्या आयुष्यभर त्याचे अंतःकरण जाळत राहिली, आणि त्यातील दाहकता हा उत्तररामचरिताचा अखेरपर्यंतचा विषय आहे. त्यामुळे ते शोकात्म होऊन जाते. वासंतीशी बोलत असताना रामाच्या या कधी न संपणाऱ्या व्यथेला वाचा फुटली आहे.

निष्कलंक अशा सीतेला रामाने अपराधी मानावे का, हा प्रश्न रास्त आहे. पण रामालाही तो मान्य आहे याचा विसर पडू नये. लोकांचे समाधान राखणे हे राजाचे कर्तव्य आणि पत्नीला रक्षण देणे हे पतीचे कर्तव्य अशा कात्रीत रामाचे मन सापडले होते. परिणाम असा झाला की, लोकाच्या आक्षेपाचा मान राखल्यामुळे राजपत्नीचे चारित्र्य संशयातीत असावे हे तत्त्व सांभाळले गेले. पण त्यासाठी जी निरपराध आहे हे स्वतःला पूर्ण माहीत

आहे त्या सीतेला दुःखसागरात लोटून द्यावे लागण्याचा अपराध रामाला करावा लागला, आणि त्याचबरोबर सीतेच्या सहवासाला अंतरल्यामुळे सारे जीवन दुःखपूर्ण तर झालेच पण आपण पत्नीवर अन्याय केल्याची जाणीव मनाला सतत टोचणी देत राहिली. उदात्त ध्येयाच्या पूर्ततेसाठी स्वीकारलेले हे दुःख रामाचे अवघे जीवन शोकात्म करून गेले. पती म्हणून आपले कर्तव्य पार पडू न शकलेला राम अपराधी, का जे व्रत त्याने उभ्या आयुष्यासाठी स्वीकारले होते ते एवढी किंमत देऊनही त्याने पाळले म्हणून तो निरपराधी, हे कोडे सोडवताना विचारी माणसाचाही हॅम्लेट होण्याची वेळ येते; आणि सर्वथा निरपराध अशा सीतेच्या दुःखाबद्दल तर काहीच बोलता येत नाही.

अशा उदात्त पातळीवरील शोकात्मता एका उंचीवर जाणारी असते ही रामायणाची कथा झाली. महाभारत हीदेखील अखेर एक शोकांतिकाच म्हणावी लागते. किंबहुना त्यात शेक्सपियरच्या बहुतेक सर्व शोकातिका निरनिराळ्या पात्रांच्या रूपाने आपोआप येऊन जातात, आणि त्यांतील काही व्यक्तिरेखा आपल्याला अधिक वरच्या पातळीवरील मानवी नियतीच्या शोकांतिकेकडे घेऊन जातात. दुर्योधन अतीव महत्त्वाकांक्षेचा बळी आहे, तर नाकर्ता धृतराष्ट्र सारे काही विपरीत होत चालले आहे हे केवळ पुत्रस्नेहापोटी पाहात राहून अधिक अधिक दुःखात लोटला जात आहे. सूतपुत्र म्हणून सतत अवहेलनेचा बळी झालेला कर्ण आणि सूडाच्या भावनेने पेटलेला अश्वत्थामा आपल्या त्या वर्तुळातून कधी बाहेर पडू शकलेले नाहीत. कौमार वयातील मोहाचा एक क्षण कुतीचे हृदय अखेरपर्यंत आतल्या आत जाळत राहिला आहे, आणि अकाली झालेल्या पतीच्या निधनामुळे आपल्या मुलांची होत असलेली सारी परवड असहाय्य होऊन तिला पाहावी लागली आहे. एकाहून एक समर्थ असे पाच पराक्रमी पती असूनही द्रौपदी जणू अनाथ झाली आहे. अखेर आपल्या अपमानाचा बदला घेतला गेला म्हणून ती तोवर मोकळे सोडलेले केस विंचरून आपली वेणी घालते, एवढ्यात आपले पाचही पुत्र मृत्यूच्या वाटेने गेल्याचे असह्य दुःख तिच्यासमोर उभे राहते. अशी ही महाभारतातील निरनिराळी पात्रे आपापला दुःखाचा भार वाहात आयुष्याचा रस्ता चालत राहिली आहेत.

द्यूताच्या पायी सर्वनाशाकडे जाणारा युधिष्ठिर काही दोषाने युक्त आहे असे म्हणता येते, पण त्याच वेळी तो धर्मराज जीवनाचा अर्थ स्वतंत्रपणाने लावू पाहणारा आहे, धर्माचा शोध घेणारा आहे आणि त्यासाठी दुःखाच्या वाटा स्वीकारणारा आहे. शातिपर्वात भीष्माशी संवाद करणाऱ्या युधिष्ठिराचे मन युद्धातील विजयाचा हात धरून आलेल्या दुःखाने पोळलेले आहे. तोच युधिष्ठिर आपली पत्नी आणि भाऊ यांच्यासह सारे राजवैभव बाजूला ठेवून इहलोकाचा निरोप घेण्यासाठी हिमालयातील केदारनाथकडे घेऊन जाणारा चढ चढू लागतो, एकामागोमाग द्रौपदी आणि चारी भाऊ वाटेतच कोसळतात, आणि केवळ एक कुत्रा संगतीला

असलेला एकाकी युधिष्ठिर मानवी जीवनाचे सारे महाभारत अनुभवल्यावर त्यातील व्यर्थत्व उराशी जपत पुढे चाललेला दिसतो

कुंतीला तर दुःखाची सोबत विवाहाच्या आधीपासूनची आहे. अखेर तिची मुले राजपदावर चढलेली ती पाहते, आणि ती राजमाता होते. येथे खरे तर तिचे दुःख समाप्त व्हावे. पण तोवर सोसलेले दुःखच जणू तिला अपार संहार झाल्यावर वाट्याला आलेल्या ऐश्वर्यापासून दूर नेते, आणि गांधारी व धृतराष्ट्र यांच्यासह ती अरण्यवासाकडे वळते, तेव्हा वृद्धापकाळात तिने आपण होऊन स्वीकारलेला पुत्रवियोग तिचे दुःख अधिक गडद करून जातो.अन्यायाची बाजू घेणारा भीष्म ''अर्थस्य पुरुषो दासः'' असे म्हणतो तेव्हा ती एक फार मोठी आत्मवंचना वाटते, पण पित्याच्या सुखासाठी त्याने वैराण आयुष्याचा स्वीकार केलेला असतो आणि तोच अखेर शरपंजरी पडल्यावर धर्मराजाला तत्त्वोपदेश करण्याइतका शांतचित्त असतो. पण त्याने स्वीकारलेला तो मृत्यू कशासाठी असे विचारले, तर ज्या कुरुकुलाच्या कल्याणासाठी आपण जन्मभर झगडतो आहोत असे तो मानीत आलेला असतो, त्याचा संपूर्ण विध्वंस झालेला पाहण्याचे त्याच्या भाली आलेले असते.

आणि भगवान श्रीकृष्ण? त्याच्या उदात्त आयुष्याचा शेवट काय झाला? ऐन विशीत अपराधी कंसाला त्याने शासन केले, पण त्याचे राज्य घेतले नाही, ते उग्रसेनाला दिले. त्याने द्वारका नव्याने वसवली पण तो तिचा अधिपती झाला नाही. एकेक पाऊल निर्धाराने टाकत फलावर कधीही दृष्टी न ठेवता आपले कर्तव्य करीत राहिलेला हा यदुकुलाचा अनभिषिक्त नृपती अखेर तत्त्वज्ञ या पदवीवर चढतो. त्याच्या पराक्रमावर लुब्ध होऊन त्याच्याकडे आपण होऊन चालत आलेल्या राज्यकन्येशी प्रेमविवाह करण्यापासून जीवनाची एकेक पायरी चढत चढत युधिष्ठिराने केलेल्या राजसूय यज्ञामध्ये पितामह भीष्मांच्या सांगण्यावरून तो अग्रपूजेचा मानकरी ठरतो. युद्ध टळावे म्हणून त्याने केलेली कौरवांच्या दरबारातील शिष्टाई जेवढी अपूर्व आहे, तेवढीच ते युद्ध ऐन वेळी टाळू पाहणाऱ्या अर्जुनाला ''क्लैब्यं मा स्म गमः पार्थ'' म्हणजे ''या दौर्बल्याला थारा देऊ नको'' असा समरांगणात त्याने केलेला उपदेश अर्थपूर्ण आहे.

सारासारविचारपूर्वक जीवनातील हरएक कटू वास्तवाला सामोरा जाणारा हा तत्त्वज्ञ आहे. धुरंधर असा हा पांडवांचा कैवारी अखेरच्या त्या रणसंग्रामात आपण हातात शस्त्र धारण करीत नाही, आणि टाकून दिलेले गांडीव धनुष्य अर्जुनाला मात्र पुन्हा उचलून घेण्यास प्रवृत्त करतो. येथवरची त्याची सारी जीवितयात्राच मोठी अदभुत आहे. त्याच्या नावावर सांगितली गेलेली भगवद्गीता तीमधील तत्त्वज्ञानविषयक विचारांच्या समन्वयशील मांडणीमुळे आजही साऱ्या जगातील तत्त्वज्ञांच्या अभ्यासाचा विषय होऊन गेली आहे पण गीतेतील ते

उच्चतम तत्त्वज्ञान सांगितल्यावर त्याच्या नशिबी काय आले? त्याच्याच कुळातील यादव त्याच्या दृष्टीसमोर आपापसात लढून मेले, आणि भगवद्गीता या शब्दाइतकाच यादवी हा शब्द चिरकाल टिकणारा होऊन गेला. ती यादवी शोभादायक नव्हती, श्रेय देणारी तर नव्हतीच. उलट तोवरच्या प्रदीर्घ जीवनात प्राप्त करून घेतलेले सारे श्रेय जणू हिरावून घेणारी होती. ज्या लोकांत आपण सतत वावरत आलो आणि त्यांच्यासमोर उदात्त जीवनाचा मूर्तिमंत आदर्श उभा केला, त्यानी त्यातील काय उचलले असे म्हणावयाचे? असे हे दु:ख समोर उभे राहिले, आणि आपण इहलोकाचा निरोप घेण्याची वेळ आली आहे हे त्याने ओळखले.

पण हा निर्णय समाधानातून आला असे म्हणता येईल काय? आपण असे म्हणू शकतो की भगवान श्रीकृष्ण स्थितप्रज्ञ होता, आणि आपल्या वाट्याला आलेल्या नियतीचा त्याने शांतपणे आणि समधात वृत्तीने स्वीकार केला. पण फलित काय? श्रीरामाचे जीवन शोकात्म होऊन गेले, तर श्रीकृष्णाचे शोकान्त झाले. दोन्हीतील कोणते बरे म्हणावे? पण कोणतेही घेतले तरी समोर उभे राहते ते दु:खच. पण त्यांच्या या दु:खाला कोणाविषयीचा मत्सर वा व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा असा कोणताही मानवी पातळीवरचा दोष कारणीभूत नव्हता. उलट इतरांकरिता आपले सौख्य वा श्रेष्ठत्व बाजूला ठेवण्याची प्रवृत्ती त्यांनी जन्मभर जपली होती. अशा विभूतीच्या जीवनातही अखेर दु:ख असते. शोकान्तिका लिहिल्या गेल्या नसल्या तरी मानवी जीवनातील दु:खाची जाणीव भारतीय साहित्यात या प्रकारे ठेवलेली आहे, आणि ते जीवन जगलेल्या व्यक्ती सामान्य नाहीत, तर लोककल्याणाच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या आहेत. ''जया अंगी मोठेपण। तया यातना कठीण॥'' या संत तुकारामांच्या साध्या उद्‌गारात हा सारा गहन अर्थ सहजपणे व्यक्त होऊन गेला आहे, तर ''सुख पाहता जवापाडे। दु:ख पर्वताएवढे॥'' या त्याच्या दुसऱ्या उद्‌गारात एकंदरीत हरएक मानवाच्या वाट्याला येणाऱ्या दु:खाचा निर्देश केलेला आहे.

शिवछत्रपतीच्या उदात्त जीवनाचा शेवट सुखाचा होता, असे म्हणता येईल काय? सोळाव्या वर्षीच स्वराज्यस्थापनेचा हुंकार त्यांच्या मनात उमटला. त्यांच्याबरोबर त्या काळातील एकही मातबर सरदार नव्हता, वडील शहाजीराजेही अखेरपर्यंत नव्हते. शिवरायांनी शेतकऱ्यांतून आपले योद्धे आणि सरदार निर्माण केले, नाना संकटांना तोड दिले, आणि आग्र्याला औरंगजेबाच्या कैदेतून सुटून येण्याची अद्भुत करामत केली. भाषाशुद्धीपासून आरमाराच्या निर्मितीपर्यंत त्यांची दृष्टी फिरली. स्वार्थाचा स्पर्श नाही. साधुपुरुषांबद्दल नितांत आदरभाव. परधर्मियांच्या प्रार्थनास्थळाला धक्का लावला नाही, पण अन्यायाचा व आक्रमणाचा मुकाबला खंबीरपणाने केला. अखेर विधिपूर्वक अभिषेक करून घेऊन छत्रपती हे बिरुद धारण केले, तर लगेच सिंहासनावरून खाली उतरले, आणि जिजाबाईच्या चरणांवर मस्तक ठेवून म्हणाले, ''मासाहेब,

आपल्या आशीर्वादेकरून सारे मनोरथ सिद्धीस गेले '' पण त्यानंतर? युवराज संभाजी विलासी राहणीकडे वळत आहे आढळल्यावर त्याच्यात काही सुधारणा व्हावी म्हणून त्याला काही दिवस समर्थ रामदासांकडे ठेवले, पण काही उपयोग झाला नाही. राजाराम सात्त्विक वृत्तीचा पण धाकटा, शौर्यही कमी होते. सोयराबाई व ताराबाई यांच्यात गृहकलह निर्माण झाला. आपण स्थापन केलेल्या स्वराज्याचे पुढे काय होणार, ही चिंता मन जाळत असताना या महापुरुषाच्या जीवनाचा शेवट झाला. या उदात्त ध्येयवादी जीवनाचा हा शोकान्त शेवट समर्थपणाने चित्रित करणारा एकही प्रतिभावंत महाराष्ट्रात निर्माण झाला नाही. अशा परिस्थितीत माणसाच्या ठायी असणाऱ्या एखाद्या दोषामुळे त्याच्या जीवनाची होणारी शोकंतिका शेक्सपियरने एका उंचीवर नेऊन ठेवावी, हा त्याच्या प्रतिभेचा चमत्कार मानावा लागतो.

शेक्सपियरच्या शोकांतिकांत "To err is human" या सार्वत्रिक सत्याचा आविष्कार प्राधान्याने आहे. जूलियस सीझर हा स्वतःकडे सारा अधिक अधिकार घेतो आहे आणि सर्वांना युद्धाकडे घेऊन चालला आहे, असे त्याच्याबद्दल आदर बाळगणाऱ्या निकटच्या सहकाऱ्यांना वाटू लागले, आणि म्हणून आपणच त्याच्या जीवनाचा शेवट केल्यावर "Here was the man" असे त्याला उद्देशून काढलेले उत्स्फूर्त उद्‌गार त्यांच्या मुखातून बाहेर पडतात. दुसरीकडे ''ब्रूटस्, तूसुद्धा'' हे, आपल्यावर प्राणांतिक प्रहार होत असताना सीझरच्या मुखातून बाहेर पडलेले दोन शब्द त्याची सारी वेदना व्यक्त करून जातात. येथे उदात्ततेचा काही स्पर्श आहे असे वाटून जाते. त्या नाटकातील तो ब्रूटस आणि दुसरा मार्क अँटनी यांच्या व्यक्तिरेखा मनाशी घोळवत मी शेक्सपियरच्या दाराशी पोचलो.

## शेक्सपियरचे निवासस्थान

शेक्सपियरचे घर. साऱ्या इंग्लंडच्या यथार्थ अभिमानाचा विषय असलेले. एक राष्ट्रीय स्मारक म्हणून ते उत्तम प्रकारे जपलेले आहे. त्यात कल्पकतेचा अंशही दिसतो. तो असा की, माडीवरच्या ज्या खोलीत तो आपले लेखन करीत असे ती त्याची खोली जशीच्या तशी तर ठेवलेली आहेच, पण खिडकीच्या शेजारी असलेल्या त्या वेळच्या मेजाच्या मागच्या बाजूस कपाटात काही पुस्तके आहेत, मेजावर दौत, लेखणी, आणि कागद असे लेखन साहित्य इकडेतिकडे ठेवलेले आहे, आणि या सर्वांना एक प्रत्ययकारी जिवंतपणा आणणारी गोष्ट आहे ती अशी की, मेजाजवळच्या खुर्चीवर शेक्सपियर बसलेला आहे अशी त्याची पाठमोरी मूर्ती दाखवलेली आहे. आपण खोलीच्या दारातून आतला भाग पाहतो, त्यामुळे त्याची पाठ आपल्याकडे असावी हे अगदी स्वाभाविक वाटते, आणि लेखन करीत असताना त्याच्या मुद्रेवरचा भाव किंवा त्याचे डोळे दाखवण्याची अडचण टळलेली आहे.

पण केवळ तेवढ्या खुर्चीवरच्या त्याच्या मूर्तीमुळे आपण खरोखरीच एकदम त्या काळात जातो, आणि जणू काही या नाटककाराला भेटावयास आलो आहोत, असा भाव आपल्या मनात तरळून जातो.

कलात्मक दृष्टीने घातलेली एवढी एक भर सोडली, तर बाकीचे सारे घर, त्यातील खोल्या, त्या त्या ठिकाणचे सामान, स्वयंपाकघरातील शेगड्या व भांडीकुंडी, कपडे वगैरे धुण्यासाठी असलेल्या बादल्या, धान्य आणि इतर वस्तू ठेवण्यासाठी त्या वेळी वापरले जाणारे लहानमोठे डबे आणि लाकडी पिपे, पळया आणि चमचे, पातेली आणि ताटवाट्या, झोपण्याच्या खोलीतील लाकडी खाटा आणि त्यावरच्या गाद्या, उश्या आणि चादरी हे सारे काही जसेच्या तसे ठेवलेले आहे. लाकडाचे ओडकेही रचून ठेवलेले व त्यांतील थोडे चुलाणाजवळ पडलेले आपल्याला दिसतात. हेच इतर हरएक वस्तूबद्दल म्हणावे लागेल. शेक्सपियर प्रत्यक्षात त्या घरात राहात असताना घरातील विविध वस्तू इकडे-तिकडे विखुरलेल्या असणार, तशाच स्थितीत त्या ठेवलेल्या आहेत. कशाचीही मुद्दाम मांडणी केलेली नाही. त्यामुळे सर्वत्र त्या काळातील वास्तवाचा जागता स्पर्श आहे. आपल्यासारखेच हे घर पाहावयास आलेल्या इतर प्रवाशांचा आपल्याला क्षणभर विसर पडला, तर आपण चारशे वर्षांपूर्वीच्या शेक्सपियरच्या घरात शिरलो आहोत, आणि त्याच्या लेखनात व्यत्यय येऊ न देता निरनिराळ्या खोल्यांतून फिरतो आहोत, असे वाटल्याशिवाय राहात नाही.

भल्यामोठ्या आकाराची व ओबडधोबड आकार असलेली भांडी व इतर सामान हे सारे काही जुनाट वाटते; पण तसे ते वाटणे हे अतिशय स्वाभाविक आहे, आणि ते स्वाभाविकपण जपले आहे हेच या स्मारकाचे वैशिष्ट्य आहे. काही खोल्यांतून कोठेकोठे माहिती सांगणारे मार्गदर्शक उभे होते. सर्वत्र लाकडी फळ्यांनी बनवलेली तक्तपोशी होती. त्या फळ्या त्या वेळच्या आहेत का, असे मी एका मार्गदर्शकाला विचारले, त्यावर मात्र त्याने ''नाही'' असे उत्तर दिले. ''एक वेळ आम्ही आमचं साम्राज्य देऊ, पण शेक्सपियर कोणाला देणार नाही,'' असे इंग्रज लोक अभिमानाने म्हणतात हे तरुण वयात ऐकले होते. एका मार्गदर्शकाला म्हणावेसे वाटले, ''भारतातून परत आलात आणि तिथलं आपलं साम्राज्य सोडलंत हे बरं केलंत. आमचा देश स्वतंत्र झाला. तुमच्या शेक्सपिअरचा आस्वाद आम्ही आमच्या भारतात बसूनही घेऊ शकतो.'' प्रत्यक्षात तसे काही म्हटले नाही.

कला, शास्त्रे, साहित्य, विज्ञान, अध्यात्म, तत्त्वज्ञान, आदीची रूपे देशकालानुसार थोडीफार निरनिराळी असली, तरी जगातील निरनिराळ्या देशांतील कलावंतांनी, संशोधकांनी आणि तत्त्वचिंतकांनी या सर्व क्षेत्रांत जी काही प्रगती केलेली असते, ते एकंदर मानवजातीचे श्रेय असते. कोणत्याही देशाचा नागरिक त्या श्रेयाचा वाटेकरी होऊ शकतो. देशकालाची बंधने

तेथे उरत नाहीत. शेक्सपियरच्या त्या घरात सर्वत्र फिरत असताना जागतिक मान्यता पावलेल्या एका महान नाटककाराच्या निवासस्थानात त्याच्या काळात जे काही होते ते जसेच्या तसे आज आपण पाहात आहोत, ही जाणीव रोमांचकारक होती. या इंग्रज समाजाला हे का करता आले? त्यांची इतिहासाविषयीची आणि ज्ञानाच्या विविध क्षेत्राविषयीची जाण याच्यामागे उभी आहे. या पाश्चात्त्य देशांत ऐतिहासिक दृष्ट्या जे जे महत्त्वाचे आहे ते ते जपले जाते. केवळ आपल्या स्वतःच्या देशापुरतीच त्यांची ही दृष्टी मर्यादित राहात नाही. ती सर्वदूर पोचते. स्वामी विवेकानन्द अमेरिकेत संचार करीत होते, त्या वेळी सामान ठेवण्यासाठी वापरलेली एक ट्रंक ते ज्यांच्याकडे पाहुणे म्हणून राहिले होते, त्यांना आपली आठवण म्हणून त्यांनी दिली होती. विवेकानन्द त्या वेळी साऱ्या अमेरिकेत विख्यात होऊन गेले होते. अशा कीर्तिमंत व्यक्तीने आपल्याला दिलेली एक भेट म्हणून ती ट्रंक त्या यजमानांनी तर जपून ठेवलीच, पण त्यांच्या मुलानेही जपली. एवढेच नव्हे, तर ब्रिटिश म्युझियम भरघोस किंमत देऊन ती विकत घ्यावयास तयार असताना पैशाच्या लोभाने त्याने ती दिली नाही. कौतुक ब्रिटिंश म्युझियमचे करावे का त्या अमेरिकन व्यक्तीचे करावे, असा प्रश्न आपल्याला पडतो. ही दृष्टी आता आपण थोडीशी उचलली आहे, पण ते सारे जतन कसे करावे, त्यात भडकपणा येऊ न देता वास्तवता कशी आणावी, आणि त्या त्या व्यक्तीच्या श्रेष्ठत्वानुसार भोवतालचे वातावरण कसे ठेवावे, हे सारे आत्मसात करण्यास आपल्याला अजूनही काही काळ वाट पाहावी लागणार आहे. कालिदासाचे एक छोटेसे स्मारक रामटेकला उभे केले आहे, पण त्या महाकवीच्या उत्तुंग प्रतिभेला शोभेल असे तेथे काहीही आढळत नाही. त्याची देखभालही केली जात नाही. नागपूर ते रायपूर या लोहमार्गावर एक स्थानक आहे, तेथून जवळ कोठेतरी भवभूतीची जागा आहे असे म्हणतात. त्याची काही दखल घेतली गेली आहे, असे वाटत नाही. केरळमधील कालडी येथे शंकराचार्यांची जागा दाखवतात, तेथे असलेला मठ व छोटेसे मंदिर मात्र त्यांच्या काळाला शोभेसे आहे, भोवतालचे वातावरणही शांत आणि निसर्गरम्य आहे.

शेक्सपियरच्या घराशेजारी एक वस्तुसंग्रहालय आहे. घरातील वस्तूंव्यतिरिक्त त्याच्या साहित्याशी, नाट्यकृतीशी , तत्कालीन रंगभूमीशी, आणि त्याच्यावरील समीक्षेशी संबंधित असे जे जे काही आहे ते सारे तेथे आहे. त्या काळच्या नाट्यमंदिराची एक प्रतिकृती ठेवलेली आहे. त्या काळात नाटके कशी सादर केली जात याची आणि नाट्यप्रयोगविषयक इतर सर्व तपशिलांची माहिती तेथे आपल्याला मिळू शकते. अनेक छायाचित्रे आहेत. निरनिराळ्या गोष्टींची माहिती देणारा मजकूर जागोजाग काचफलकातून लावलेला आहे. तो सारा शांतपणाने वाचत गेले, तर शेक्सपियर आणि त्याच्या काळातील रंगभूमी यांची माहिती तर कळतेच;

पण त्याच्या जीवनाचा आणि एक नाटककार म्हणून झालेल्या त्याच्या वाटचालीचा सारा आलेख डोळयांसमोर उभा राहतो. पुढील काळात त्याची नाटके निरनिराळया प्रकारे कशी सादर केली गेली त्याचीही माहिती मिळते. त्या अनुषंगाने वेगवेगळया भूमिका करणारे नट आणि नट्या, नेपथ्य आणि वेषभूषा, रंगकर्मी आणि दिग्दर्शक आदींचे तपशीलही समजतात. शेक्सपियरच्या नाटकांच्या वेळोवेळी निघालेल्या आवृत्त्या, नाट्यप्रयोगांच्या केल्या जाणाऱ्या जाहिराती, आणि प्रयोगासाठी वापरले जाणारे साहित्य तेथे जिज्ञासूंसाठी खुले आहे. शेक्सपियरच्या नाट्यकृतीचा परामर्श घेणारे ग्रंथ तर थेट आजच्या काळापर्यंत येऊन पोचतात. ज्याला नाटकांचा विशेष अभ्यास करावयाचा आहे, त्याच्या दृष्टीने हे एक अमोल भांडार आहे.

शेक्सपियरची नाटके जेथे अद्यापही केली जातात व जेथे अनेक प्रख्यात नटांनी आपली हजेरी लावली आहे, ते नाट्यगृह पाहावयास गेलो. दुपारची वेळ, त्यामुळे ते साहजिकच बंद होते. भोवतीचे आवार प्रशस्त आणि सुदर होते. शेजारून जाणाऱ्या ॲव्हॉन नदीच्या काठावर काही मध्यम आकाराचे वृक्ष व फुलझाडे होती. तेथील एका बाकावर आम्ही बसलो. घरून जेवण आणले होते. त्याचा आस्वाद घेत होतो तर तेवढ्यात एक पांढरा शुभ्र मोठा व उंच मानेचा पक्षी समोर येऊन उभा राहिला. पाहतो तर तो हंस होता. अन्नाच्या वासाने तो आला होता आणि आपली उंच मान आणखी उंच करून आपली चोच समोर करीत होता. मी पाहात राहिलो. यापूर्वी हंस पाहिल्याचे आठवत नव्हते. गरुड एकदाच पाहिला होता. तो छोटा होता, पण त्याच्यातील डौल जाणवला होता. भारतात घुबड अशुभ मानतात. पण पाश्चात्त्य देशांत तो शुभ मानलेला आहे तोही एकदाच टेकडीच्या कुशीत पाहिला होता.

भारतातील आध्यात्मिक परिभाषेमध्ये हंसाला एक प्रतीकरूप स्थान आणि अर्थ आहे. ईश्वरी साक्षात्कार झालेला साधक हंसपदवीवर पोचतो, आणि त्यांतही ज्यांचे ते अनुसंधान कधी सुटत नाही ते परमहंस म्हटले जातात. श्रीरामकृष्ण परमहंस हा शब्दप्रयोग सर्वांच्या मुखात आहे राजहंस हेही पक्ष्याचे नाव आहे, तो मानससरोवराच्या प्रदेशात आढळतो असे सांगतात, पण तो कल्पित सृष्टीतील पक्षी असावा असे वाटते, कारण आपण राजहंस पाहिला आहे असे म्हणणारे हिमालयात जाऊन आलेल्यांपैकीही कोणी भेटलेले नाही. बालगंधर्वांच्या मूळ नावात नारायणराव राजहंस हे शब्द आहेत. रामकृष्ण संघाच्या बोधचिन्हात विवेकानन्दांनी हंसाला स्थान दिले आहे. दमयंतीने नलाला आपला निरोप हंसाबरोबर पाठवला आहे कालिदासाच्या मेघदूत काव्यात विरहिणी असलेली यक्षपत्नी सारिकेशी गुजगोष्टी करून आपले मन रमवते, तसाच हा दमयंतीचा संवाद. साधना करण्यासाठी अरण्यातील एखादे शांत आणि रमणीय स्थान कसे असावे त्याचे सहाव्या अध्यायात वर्णन करताना मोर आणि कोकिळ यांच्याबरोबर हंसाचाही उल्लेख ज्ञानदेवांनी केला आहे. भारताच्या साहित्यविश्वात आणि आध्यात्मिक क्षेत्रात

तेथे उरत नाहीत. शेक्सपियरच्या त्या घरात सर्वत्र फिरत असताना जागतिक मान्यता पावलेल्या एका महान नाटककाराच्या निवासस्थानात त्याच्या काळात जे काही होते ते जसेच्या तसे आज आपण पाहात आहोत, ही जाणीव रोमांचकारक होती. या इंग्रज समाजाला हे का करता आले? त्यांची इतिहासाविषयीची आणि ज्ञानाच्या विविध क्षेत्रांविषयीची जाण याच्यामागे उभी आहे. या पाश्चात्त्य देशांत ऐतिहासिक दृष्ट्या जे जे महत्त्वाचे आहे ते ते जपले जाते. केवळ आपल्या स्वतःच्या देशापुरतीच त्यांची ही दृष्टी मर्यादित राहात नाही. ती सर्वदूर पोचते स्वामी विवेकानन्द अमेरिकेत संचार करीत होते, त्या वेळी सामान ठेवण्यासाठी वापरलेली एक ट्रंक ते ज्यांच्याकडे पाहुणे म्हणून राहिले होते, त्यांना आपली आठवण म्हणून त्यांनी दिली होती. विवेकानन्द त्या वेळी साऱ्या अमेरिकेत विख्यात होऊन गेले होते. अशा कीर्तिमंत व्यक्तीने आपल्याला दिलेली एक भेट म्हणून ती ट्रंक त्या यजमानांनी तर जपून ठेवलीच, पण त्यांच्या मुलानेही जपली. एवढेच नव्हे, तर ब्रिटिश म्युझियम भरघोस किंमत देऊन ती विकत घ्यावयास तयार असताना पैशाच्या लोभाने त्याने ती दिली नाही. कौतुक ब्रिटिंश म्युझियमचे करावे का त्या अमेरिकन व्यक्तीचे करावे, असा प्रश्न आपल्याला पडतो. ही दृष्टी आता आपण थोडीशी उचलली आहे, पण ते सारे जतन कसे करावे, त्यात भडकपणा येऊ न देता वास्तवता कशी आणावी, आणि त्या त्या व्यक्तीच्या श्रेष्ठत्वानुसार भोवतालचे वातावरण कसे ठेवावे, हे सारे आत्मसात करण्यास आपल्याला अजूनही काही काळ वाट पाहावी लागणार आहे. कालिदासाचे एक छोटेसे स्मारक रामटेकला उभे केले आहे, पण त्या महाकवीच्या उत्तुंग प्रतिभेला शोभेल असे तेथे काहीही आढळत नाही. त्याची देखभालही केली जात नाही. नागपूर ते रायपूर या लोहमार्गावर एक स्थानक आहे, तेथून जवळ कोठेतरी भवभूतीची जागा आहे असे म्हणतात. त्याची काही दखल घेतली गेली आहे, असे वाटत नाही. केरळमधील कालडी येथे शंकराचार्यांची जागा दाखवतात, तेथे असलेला मठ व छोटेसे मंदिर मात्र त्यांच्या काळाला शोभेसे आहे, भोवतालचे वातावरणही शांत आणि निसर्गरम्य आहे.

शेक्सपियरच्या घराशेजारी एक वस्तुसंग्रहालय आहे. घरातील वस्तूंव्यतिरिक्त त्याच्या साहित्याशी, नाट्यकृतीशी , तत्कालीन रंगभूमीशी, आणि त्याच्यावरील समीक्षेशी संबंधित असे जे जे काही आहे ते सारे तेथे आहे. त्या काळच्या नाट्यमंदिराची एक प्रतिकृती ठेवलेली आहे. त्या काळात नाटके कशी सादर केली जात याची आणि नाट्यप्रयोगविषयक इतर सर्व तपशिलांची माहिती तेथे आपल्याला मिळू शकते. अनेक छायाचित्रे आहेत. निरनिराळ्या गोष्टींची माहिती देणारा मजकूर जागोजाग काचफलकातून लावलेला आहे. तो सारा शांतपणाने वाचत गेले, तर शेक्सपियर आणि त्याच्या काळातील रंगभूमी यांची माहिती तर कळतेच;

पण त्याच्या जीवनाचा आणि एक नाटककार म्हणून झालेल्या त्याच्या वाटचालीचा सारा आलेख डोळ्यांसमोर उभा राहतो. पुढील काळात त्याची नाटके निरनिराळ्या प्रकारे कशी सादर केली गेली त्याचीही माहिती मिळते. त्या अनुषंगाने वेगवेगळ्या भूमिका करणारे नट आणि नट्या, नेपथ्य आणि वेषभूषा, रंगकर्मी आणि दिग्दर्शक आदींचे तपशीलही समजतात. शेक्सपियरच्या नाटकांच्या वेळोवेळी निघालेल्या आवृत्त्या, नाट्यप्रयोगांच्या केल्या जाणाऱ्या जाहिराती, आणि प्रयोगासाठी वापरले जाणारे साहित्य तेथे जिज्ञासूंसाठी खुले आहे. शेक्सपियरच्या नाट्यकृतीचा परामर्श घेणारे ग्रंथ तर थेट आजच्या काळापर्यंत येऊन पोचतात. ज्याला नाटकांचा विशेष अभ्यास करावयाचा आहे, त्याच्या दृष्टीने हे एक अमोल भांडार आहे.

शेक्सपियरची नाटके जेथे अद्यापही केली जातात व जेथे अनेक प्रख्यात नटांनी आपली हजेरी लावली आहे, ते नाट्यगृह पाहावयास गेलो. दुपारची वेळ, त्यामुळे ते साहजिकच बंद होते. भोवतीचे आवार प्रशस्त आणि सुंदर होते. शेजारून जाणाऱ्या ॲव्हॉन नदीच्या काठावर काही मध्यम आकाराचे वृक्ष व फुलझाडे होती. तेथील एका बाकावर आम्ही बसलो. घरून जेवण आणले होते. त्याचा आस्वाद घेत होतो तर तेवढ्यात एक पांढरा शुभ्र मोठा व उंच मानेचा पक्षी समोर येऊन उभा राहिला. पाहतो तर तो हंस होता. अन्नाच्या वासाने तो आला होता आणि आपली उंच मान आणखी उंच करून आपली चोच समोर करीत होता. मी पाहात राहिलो. यापूर्वी हंस पाहिल्याचे आठवत नव्हते. गरुड एकदाच पाहिला होता. तो छोटा होता, पण त्याच्यातील डौल जाणवला होता. भारतात घुबड अशुभ मानतात. पण पाश्चात्त्य देशात तो शुभ मानलेला आहे. तोही एकदाच टेकडीच्या कुशीत पाहिला होता.

भारतातील आध्यात्मिक परिभाषेमध्ये हंसाला एक प्रतीकरूप स्थान आणि अर्थ आहे. ईश्वरी साक्षात्कार झालेला साधक हंसपदवीवर पोचतो, आणि त्यांतही ज्यांचे ते अनुसंधान कधी सुटत नाही ते परमहंस म्हटले जातात. श्रीरामकृष्ण परमहंस हा शब्दप्रयोग सर्वांच्या मुखात आहे राजहंस हेही पक्ष्याचे नाव आहे, तो मानससरोवराच्या प्रदेशात आढळतो असे सांगतात, पण तो कल्पित सृष्टीतील पक्षी असावा असे वाटते, कारण आपण राजहंस पाहिला आहे असे म्हणणारे हिमालयात जाऊन आलेल्यांपैकीही कोणी भेटलेले नाही. बालगंधर्वांच्या मूळ नावात नारायणराव राजहंस हे शब्द आहेत. रामकृष्ण संघाच्या बोधचिन्हात विवेकानन्दांनी हंसाला स्थान दिले आहे. दमयंतीने नलाला आपला निरोप हंसाबरोबर पाठवला आहे. कालिदासाच्या मेघदूत काव्यात विरहिणी असलेली यक्षपत्नी सारिकेशी गुजगोष्टी करून आपले मन रमवते, तसाच हा दमयंतीचा संवाद. साधना करण्यासाठी अरण्यातील एखादे शांत आणि रमणीय स्थान कसे असावे त्याचे सहाव्या अध्यायात वर्णन करताना मोर आणि कोकिळ यांच्याबरोबर हंसाचाही उल्लेख ज्ञानदेवांनी केला आहे. भारताच्या साहित्यविश्वात आणि आध्यात्मिक क्षेत्रात

एवढे महत्त्वाचे स्थान असलेला हा हंस मला शेक्सपियरच्या या जन्मगावी भेटावयाचा होता मोराच्या पिसाऱ्यातील निळसर जांभळसर रंगच्छटांमुळे त्याला सौंदर्य प्राप्त होते. गरुड आकाशात उंच भरारी घेतो, आणि जणू अनंतात विहार करतो. हंसात असे काय विशेष आहे की, तो आत्मतत्त्वाचे प्रतीक मानला जावा?

ॲव्हॉन नदीकडे लक्ष गेले, तर पाण्यातून काही हस मजेत तरगत चाललेले दिसले बदकही असेच जात, पण त हसाच्या मानाने छोटे वाटते. पाण्यावरून डौलात चाललेले हंस मोठे आकर्षक वाटले. समोरच्या हंसाच्या पावलांकडे पाहिले तर ती पसरट होती, बोटे अशी नव्हतीच. अशा पावलांमुळे तो तरंगत जाऊ शकतो. पाण्यातून जात असूनही त्या पाण्याच्या स्पर्शामुळे लिप्त न होणारा आणि त्याच वेळी पाण्यात लीलेने विहार करणारा असा हा हंस आहे. त्याचा पांढरा शुभ्र रंग हा निर्मलत्वाचा आणि सत्त्वगुणाचा सूचक मानता येईल. सत्त्वगुणाचे वर्णन करताना त्याची ज्ञानाशी असलेली जवळीक सांगून तो आत्मतत्त्वाचा प्रकाशक आहे. असे म्हणताना ''निर्मलत्वात्'' हा शब्द गीतेत आला आहे शरीरधारी असल्यामुळे सतत कर्मक्षेत्रात वावरावे लागत असूनही त्यात लिप्त न होणारा अशा अर्थाने हंस आत्मस्वरूपाचे प्रतीक मानला गेला असावा. तेव्हा बराच महत्त्वाचा पक्षी आपण जवळून पाहात आहोत असे वाटून गेले. त्याच्या पुढ्यात पोळीचा छोटासा तुकडा टाकला. पण त्याची चोच पसरट असल्यामुळे त्या बिचाऱ्याला तो तुकडा चटकन उचलता येईना. बरीच धडपड केल्यावर कसाबसा तो घास त्याला घेता आला.

हंस हा जीवात्म्याचे एक प्रतीक. याच प्रकारे सर्वव्यापक अशा विश्वतत्त्वाचेही असे काही प्रतीक असू शकते. तत्त्वज्ञ त्याचा वेध घेत असतात. मानवी जीवनातील जे जे म्हणून भव्य आणि उदात्त त्याचाही शोध ते घेऊ पाहतात. अशी ज्ञानी पुरुषांचे वर्णन करताना ''जयां- चिये लीळेमाजी नीती। जियाली दिसे।।'' असे वर्णन ज्ञानदेव करून गेले. दोस्तोएव्हस्कीच्या ''ब्रदर्स कॅरॅमॅझॉव्ह'' या कादंबरीतील आल्येशा हा असाच एक सत्त्वगुणसंपन्न जिज्ञासू होता. ''लोकांमध्ये वावरत राहा'' असा त्याच्या गुरूने त्याला आदेश दिला. त्याच्या साधुतुल्य पुरुषाला शोभेल अशा वावरण्याचे मोठे मनोवेधक चित्र त्या कादंबरीत पाहावयास मिळते. टॉलस्टॉयच्या ''वॉर अँड पीस'' या महाकाव्यात्मक कादंबरीतील पीरे रणांगणावरून रात्रीच्या वेळी फेरी टाकतो आणि त्या युद्धातील एक सेनानी आन्द्रे याच्याशी मानवी जीवनाचा अर्थ काय याविषयी चर्चा करतो. अशी व्यक्तिरेखा शेक्सपियरच्या नाटकांत कोठे आढळते काय, अशी जिज्ञासा उत्पन्न होते. तिचे नेमके उत्तर मी देऊ शकत नाही. अशा तात्त्विक पातळीवरील उंची तो गाठू शकलेला नाही, अशा आशयाची टीका त्याच्यावर क्वचित कोणी केली आहे. त्यावर ती मत्सरापोटी केलेली आहे असा प्रतिवादही केला गेला आहे. पण केवळ अपवादात्मक

असा हा मतभेद बाजूला सारला, तर मानवी जीवनाची नाना रूपे न्याहाळणारा आणि माणसाच्या मनात खोलवर उतरून तेथील घालमेल चित्रित करणारा हा नाटककार केवळ एखाद्या कालखंडाचा प्रतिनिधी नाही, तर त्याचे श्रेष्ठत्व सार्वकालीन आहे अशा आशयाचे शेक्सपियरच्या समकालीन असलेल्या बेन जॉन्सनने काढलेले उद्‌गार सर्वमान्य होऊन गेले आहेत.

थोडा वेळ गावात चक्कर टाकली. इंग्लंडमधील काहीसे ग्रामीण भागातील म्हणावे असे हे गाव अतिशय नीटस आहे. रस्त्यांच्या चौकांनाही रेखीवपणा आहे. रस्ते रुंद आणि सरळ आहेत. एक आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळ म्हणून त्याची विशेष काळजी घेतली जाते. बाजारात फिरलो. तोही समृद्ध आहे. दुकानांतील अनेक वस्तूंनी शेक्सपियरशी काही ना काही नाते जोडलेले होते. त्याचे घर, वस्तुसंग्रहालय आणि नाट्यगृह यांची सुदर रगातील छायाचित्रे असलेली कितीएक चित्रपत्रे होती. चार ओळी लिहाव्यात, आणि परिवारातील शेक्सपियरविषयी आस्था असणाऱ्यांना ती पत्रे पाठवून द्यावीत. अर्थात हा भाग सर्वच प्रसिद्ध ठिकाणी असतो. या छोट्याशा गावातील बाजारावर सर्वत्र शेक्सपियरचे अधिराज्य होते. संध्याकाळी सात वाजता लीड्‌सला परत आलो. इंग्लंडमधील पहिला दिवस या असामान्य आणि जगविख्यात नाटककाराच्या सान्निध्यात गेला याचे समाधान मनात होते.

## लीड्‌समधील स्वच्छता आणि नीटनेटकेपणा

याच प्रकारे वर्डस्वर्थची निसर्गपर कविता ज्या प्रदेशात फुलली, त्या लेक डिस्ट्रिक्टमध्ये फेरफटका मारावा, असा विचार होता. पण नंतरचे तीनचार दिवस पाऊस होता आणि तो बेत जमला नाही. लीड्‌स हे इंग्लंडमधील एक मोठे शहर आहे दररोज संध्याकाळी मी कोठे ना कोठे फेरफटका मारत असे. अन्वय राहात होता तो निवासी भाग सुरेख होता. पण त्यात विशेष मानावे असे काही नाही. सारे शहरच नीटस होते. मग तो निवासी भाग असो वा बाजाराचा असो. कोठेही गर्दी नाही, माणसांचा गोंगाट नाही बाजारात फिरतानाही कानांवर मोठा आवाज पडत नाही. रस्त्यावरून सारख्या गाड्या जात असल्यातरी कर्णा वाजलेला ऐकला नाही. आवाजाचे प्रदूषण हा भागच नाही. आपल्याकडे गल्लीपासून मंडईपर्यंत सर्वत्र किती प्रकारचे आवाज कानांवर पडत असतात, त्याची आठवण झाली.

वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळले जातात. कोणत्याही वळणावरून जाताना एकही गाडी किंचित थाबल्याशिवाय पुढच्या रस्त्याला लागलेली दिसत नाही आपल्या मार्गावर गाडी येताना दिसत आहे आणि तरी कोणी आपली गाडी मध्येच घातली असे घडत नाही. दोनतीन मिनिटे वाट पाहावी लागली तरी त्या गाडीतील व्यक्ती शांतपणे थांबलेली दिसे

नागरिकांची सार्वजनिक शिस्त म्हणजे काय, याचे मूर्तिमंत दर्शन घडत होते. शहरातील रस्त्यांवरही वाहतुकीच्या खुणा भरपूर होत्या. ठिकठिकाणचे रस्त्यावरचे आडवे पट्टे स्पष्ट होते. जागोजाग छोटे खांब दोन्ही बाजूंना होते. एखाद्या वृद्ध माणसाला रस्ता ओलांडावयाचा असेल, तर त्याने खांबावरचे बटन दाबावयाचे. दोन्ही बाजूंच्या खांबावरचे दिवे लागत, आणि दोन्ही बाजूंच्या गाड्या लगेच थांबत. तो वृद्ध माणूस शांतपणे रस्ता ओलांडू शके. पादचारी माणसाची ही दखल कौतुकास्पद वाटली पण आपल्याकडे हे शक्य नाही हे ध्यानात आले कारण पादचाऱ्यांची संख्याच एवढी प्रचंड असते की, असे दिवे लावले तर ते बंद करावे लागणार नाहीत आणि गाड्यांना वाट मिळणारच नाही. प्रत्येक ठिकाणचे प्रश्न वेगळे असतात हेही खरे पण शक्य असेल तेवढे तरी आपल्याकडील उत्तम सुशिक्षित वर्गातील माणसे तरी करतात का, हे मनात आल्याशिवाय राहात नाही.

लीड्सच्या काही भागांतून जात असताना विस्तीर्ण हिरवळीचे स्वच्छ भाग आणि कोठेकोठे असलेले उंच वृक्ष मन वेधून घेत होते. मुलांसाठी एक क्रीडांगण दिसले आणि त्याच्या शेजारीच डेरेदार वृक्षांचा काही भाग होता. संध्याकाळची वेळ होती. मैदानात काही तरुण मुले खेळत होती, आणि वृक्षांच्या छायेखालून असलेल्या नीटस पायवाटेने प्रौढ माणसे फिरत होती. प्रचंड हिरवळीमुळे शहराची शोभा कितीतरी पटींनी वाढते. डोळेही आपोआप निवतात. पण यासाठी नगरपालिकांचा कारभार दक्षतेचा असावा लागतो. आपल्याकडेही काश्मीर, केरळ, मलबार किंवा हिमालयातील थंड हवेची ठिकाणे येथे निसर्गाने आपले भांडार मुक्त हस्तांनी उधळले आहे, पण आपल्या अस्वच्छ वागण्यामुळे आपण ते वैभव वेगळ्या अर्थाने उधळून टाकत आहोत. आपल्या तुलनेने पाश्चात्त्य जग या बाबतीत फार पुढे आहे हे स्ट्रॅटफोर्डमध्ये एक दिवस तर लीड्समध्ये तीनचार दिवस फिरत असताना सतत जाणवत होते. शिस्त, स्वच्छता, शांतता, आणि सौन्दर्यदृष्टी ही येथील नागरी जीवनाची भूषणास्पद वैशिष्ट्ये आहेत. चार दिवस एखाद्या शांत ठिकाणी जाऊन राहावे असे येथे मनात येण्याचे कारणच नाही. हौस म्हणून किंवा थोडा बदल म्हणून सहलीवर जावे हे वेगळे

हे सारे आपला देश केव्हा आत्मसात करील? यातील काही भाग समृद्धीचे आहेत. आपला देश गरीब आहे काही भाग शिक्षणावर अवलंबून आहेत. आपला बहुसंख्य समाज अद्याप अशिक्षित आहे. दारिद्र्य निदान कमी व्हावयास हवे. शिक्षणाचा प्रसार शेवटपर्यंत पोचावयास हवा. पण तेवढेच नाही. पाश्चात्त्य लोकांच्या वागण्यात तीनशेचारशे वर्षांच्या परंपरेतून जी नागरिकनीती मुरलेली आहे, त्या प्रक्रियेचा आपल्याकडे अद्याप धड प्रारंभही झालेला नाही आंतरिक सद्‌गुण आत्मसात होणे ही दीर्घकाळची प्रक्रिया असते. तेव्हा आपल्याला निदान शंभर वर्षे वाट पाहावयास हवी. इंग्लंड-अमेरिकेत यानंतर दीड महिना

फिरत असताना सर्वत्र नागरी जीवनाचा आणि नागरिकांच्या वर्तनाचा हाच अनुभव येत राहिला. तसे पाहिले तर या गोष्टी आपल्याकडे सुशिक्षित वाचकवर्गाला आता पूर्ण माहीत आहेत. यात नवे काही नाही. पण आपण कोठे कमी पडत आहोत, हे अधूनमधून दृष्टीसमोर येणेही आवश्यक आहे. थोडी ना थोडी जाग येण्यास याचा उपयोग आहे.

लीड्समधील वास्तव्यात अनपेक्षितपणे दोन पूर्वपरिचित मराठी साहित्यिकांशी दूरभाषवरून संपर्क साधला गेला, आणि काही संवाद झाला. लंडनमधील महाराष्ट्र मंडळाचे एक पूर्वीचे कार्यकर्ते श्री. मधू अभ्यंकर यांचा भारतात परिचय झाला होता. त्यांना दूरभाष केला, तर ते पुढच्या आठवड्यात ऑस्ट्रियाला जाणार होते. पण त्यांनी सांगितले की, प्रा. श्री. पु. भागवत आणि डॉ. सरोजिनी वैद्य सध्या लंडनमध्ये आहेत. मग त्यांना दूरभाष केला. ओळख कितीएक वर्षाची आणि तीही भारतातील. तेव्हा त्यांच्याशी संवाद करण्यात काही नवे होते असे नाही. अधूनमधून कोठेतरी भेटी होत असतात. पण भारताच्या बाहेर कोठेतरी परदेशात एकमेकांशी बोलणे हे काहीसे अप्रूप वाटते हे खरे. भागवत पतिपत्नी त्यांचा अमेरिकेतील मुलगा काही दिवसांसाठी इंग्लंडमध्ये आला आहे. म्हणून त्याला भेटण्यासाठी आले होते, तर सरोजिनी वैद्य यांच्या नव्या पुस्तकाचे प्रकाशन लंडनच्या महाराष्ट्र मंडळाच्या वतीने आदल्या दिवशी थाटामाटात झाले होते, आणि त्या पुढे अमेरिकेत आपल्या मुलाला भेटण्यासाठी जाणार होत्या. त्यांपैकी कोणाची आणि माझी लंडनमध्ये भेट होण्याची शक्यता नाही, हे त्याच वेळी ध्यानात आले. एरवी भारतात दूरभाषवर झाला असता त्यापेक्षा हा आमचा संवाद थोडा अधिक काळ झाला हे मात्र खरे.

# ४. ग्रीन पार्क आणि पार्लमेंट हाउस

सत्तावीस सप्टेंबरला दुपारी तीनच्या गाडीने लंडनकडे निघालो. संज्योतचा निरोप घेतला. अन्वयने आज रुग्णालयात काही व्यवस्था केली होती. तो माझ्याबरोबर लंडनपर्यंत आला. हा लोहमार्गाचा प्रवास होता. व्हिक्टोरिया हे प्रमुख स्थानक. मी यानंतर एकटा फिरणार हे ध्यानात घेऊन अन्वयने मला व्हिक्टोरिया स्थानकावरील सारी व्यवस्था समजावून सांगितली. स्थानक चांगले प्रशस्त होते. संध्याकाळी सहाचा सुमार होता. कार्यालये बंद होऊन लोक घरी परतण्याची वेळ होती, तरी त्या मानाने वर्दळ फार कमी होती. विमानतळाप्रमाणेच येथेही प्रवाशांना सामान नेण्यासाठी अनेक हातगाड्या होत्या. त्यावर माझ्या दोन्ही बॅगा टाकल्या, त्यामुळे वावरणे सोपे झाले या हातगाड्या कोठेही सोडता येतात. हमाल ही संस्था नाही. पण हमाल नाहीत तसेच तिकीट तपासनीसही नाहीत, हे माहीत नव्हते.

**व्हिक्टोरिया स्थानकावरून ईस्ट क्रॉयडन**

यंत्राचा वापर किती प्रमाणात केला जात आहे त्याचा येथे आणखी एक अनुभव आला. आपल्या घराच्या समोरच्या अंगणात शिरण्यासाठी छोटीशी फाटके असतात, तसे एक फाटक असते. त्यातून एकावेळी एकच उतारू जाऊ शकतो. दोन बाजूंनी डाव्याउजव्या हाताला वळणारी दोन छोटीशी दारे एकेका फाटकाला होती. अलीकडच्या बाजूला आपण आपले तिकीट यंत्राच्या फटीत घालवयाचे, ते घातल्यावर दार उघडते, आणि आपण पलीकडे गेल्यावर ते तिकीट तेथील दुसऱ्या फटीतून बाहेर पडते व पुन्हा दार बंद होते. जाड कागदाचे एक तिकीट, तेवढ्यावर एवढे सारे होऊन जाते, याचे तर नवल वाटलेच. पण त्यापुढचे नवल असे की आपण चुकीचे वा भलतेच तिकीट घातले तर ते गडप होते. ते दुसऱ्या बाजूने बाहेर येत नाही आणि दारही उघडत नाही. खोटेपणा करण्याचा रस्ता असा यत्रानेच बंद करून टाकला आहे. यत्रावर तिकीटे मिळण्याची सोय तर होतीच, पण तिकिटाचे पैसे वजा केल्यावर उरलेले पैसे ते यंत्र खालच्या बाजूच्या एका फटीतून तिकिटाबरोबर आपल्याला देते.

नतर लडनमध्ये फिरत असताना पाहिले, तर मोठ्या बॅकांच्या कार्यालयाच्या बाहेर

अशीच यंत्रे होती. वरच्या बाजूच्या फटीत मोठ्या रकमेची नोट सरकवली की खालच्या बाजूने सुटी नाणी बाहेर पडतात. ही केवढी सोय आहे असे तर वाटलेच, पण यंत्र हिशेबही करते व पैसेही देते याचे नवल वाटले. आता संगणकाचे युग आले आहे, याची ही एक नवी खूण पाहावयास मिळाली. व्हिक्टोरिया स्थानकावर आत जाण्यासाठी हारीने बरीच फाटके होती, त्यामुळे कोणाला थबकून राहावे लागत नव्हते. स्थानकावर सर्वत्र भल्यामोठ्या अक्षरांतील माहिती देणाऱ्या पाट्या लटकलेल्या होत्या. त्या त्या भागाकडे वा कार्यालयाकडे जाण्याचे मार्ग प्रत्येक वीसपंचवीस पावलांवर बाणांनी दाखवलेले होते. आपण शांतपणे सारे पाहात व वाचत गेलो, तर कोणालाही काहीही विचारण्याची गरज नव्हती. दहावीस पावले टाकताच एकेक खांबावर चार बाजूंना चार दूरभाष. स्थानकाच्या सर्व भागांत कोठेही दूरभाष नाही असे नाही, आणि कोणताही दूरभाष बिघडलेला आहे असे आढळत नाही. हेच सारे अनुभव मी नंतरच्या प्रवासात सर्वत्र घेत गेलो. अशी ही सारी माहिती मला अन्वयने करून दिली. ईस्ट क्रॉयडन या उपनगरात मला जावयाचे होते. त्या गाडीत त्याने मला बसवले आणि सात वाजता तो परत लीड्सला गेला. येथे मी अन्वयचा निरोप घेतला.

यानंतरचा प्रवास उपनगरी गाडीचा झाला. लोहमार्गाच्या प्रवासामध्ये एक जाणवले की, या गाड्या भारतातील गाड्यांपेक्षा सरस आहेत. डबे चांगले, आसने आरामशीर, गाडीला हादरे जवळजवळ बसत नाहीत, रूळ बदलताना होणारा खडखडाटही बेताचा आणि शेजारून विरुद्ध दिशेची गाडी गेली तरी नको वाटण्याइतका मोठा आवाज नाही. स्थानकावर गाडी थांबली तरी प्रवाशांची गर्दी वा धावपळ नाही, फेरीवाल्यांचा त्रास कोठेही नाही, आणि एकंदरीत सर्वत्र शांतता अधिक. मुंबईतील उपनगरी गाड्यांतील परिस्थिती या सर्वांच्या तुलनेने भयावह म्हणावी लागेल. याच्या जोडीला सगळीकडे कमालीची स्वच्छता. स्वच्छता आणि शांतता हे एकंदर समाजाच्या सुसंस्कृतपणातील फार महत्त्वाचे घटक आहेत, ते आत्मसात करण्यास आपल्याला पन्नास-साठ वर्षे तरी किमान लागतील. थेट खालपर्यंत शिक्षण पोचल्यावर एक पिढी उलटावी लागेल. मनात आले, अशा वातावरणात नित्य वावरणारे हे परदेशाचे प्रवासी भारतात येतात. त्यांना येथील गोंधळ, गोंगाट, अस्वच्छता, बेपर्वाई, आणि अव्यवस्थितपणा पाहून काय वाटत असेल? ग्रंथांतून जे आमच्या संस्कृतीची थोरवी वाचतात, त्यांचा भ्रमनिरास व्हावा अशी व्यवस्था आपण सर्वत्र करून ठेवली आहे.

ईस्ट क्रॉयडनला विजय तासे हा अन्वयचा मित्र होता. ते दोघे पार्ल्याला टिळक विद्यालयात एकत्र शिकत होते. तेव्हापासूनची मैत्री. लंडनमधील माझ्या एक आठवड्याच्या वास्तव्याची व्यवस्था अन्वयने त्याच्याकडे केली होती. मी स्थानकावर येऊन उतरलो आहे असा दूरभाष करताच विजय गाडी घेऊन आला आणि मला घरी घेऊन गेला. स्वभावाने

अगदी साधा आणि मनमोकळा, तितकाच सात्त्विक प्रवृत्तीचा. आधीची काहीही ओळख नव्हती, पण मला त्याच्याकडे कोणताही संकोच वाटला नाही. त्याची पत्नी सूझन ही इंग्रज होती. दोघांचा प्रेमविवाह झाला होता. विजय स्थापत्यशास्त्रातील पदवीधर. चांगल्या नोकरीवर होता. सूझनही तितकीच सुविद्य. गणितातील डॉक्टरेट ही पदवी तिने मिळवली होती. पण आपल्या त्या संशोधनपर अभ्यासाचा थोडासाही दर्प वा ताठा तिच्या वागण्यात नव्हता. एका भारतीय तरुणाशी विवाह करताना इंग्लंडचा एके काळचा जेतेपणाचा भाव तिने पूर्णपणे बाजूला सारला होता. जितका विजय साधा, तितकीच सूझन साधी होती. दोन लहान मुले होती. त्यांचा सांभाळ करावयास हवा म्हणून काही वर्षे नोकरी करावयाची नाही, असा निर्णय तिने घेतला होता. वृत्तीने सौम्य आणि शांत. मुलांचे सारे काही करीत होती आणि स्वयंपाक-घरातील सारी जबाबदारी तिला पाहावी लागत होती. पोषाख इंग्रजी पद्धतीचा होता, पण वागणे भारतीय गृहिणीला साजेसे होते. गळ्यात मंगळसूत्र होते हे मला विशेष वाटले. मला काय हवे नको हे सारे ती पुढचा एक आठवडा आस्थेने पाहात होती.

लंडन पाहण्यासाठी मी दररोज सकाळी साडेनऊ वाजाता बाहेर पडत होतो. मला आवश्यक ती पोळीभाजी, पाण्याची बाटली आणि छत्री हे सर्व एका पिशवीत सूझन तयार ठेवी, आणि गाडीतून मला स्थानकावर सोडत असे, कारण विजय कामावर जाण्यासाठी आठ वाजता बाहेर पडत होता. सध्याकाळी साडेसातपर्यंत मी परत येई. त्या वेळी स्थानिक परिवहनाच्या गाडीने माझा मी येईन, असे मी म्हटले होते. सूझनने आपला ख्रिस्तधर्म साभाळला होता. ती रविवारी चर्चमध्ये जात असे. मला इंग्लंडमधील चर्चमध्ये उपासना कशी चालते ते पाहावयाचे होते. मी मला एकुणतीस सप्टेंबरच्या रविवारी सकाळी बरोबर घेऊन गेली. तेथील सारे विधी अतिशय शांततेत आणि ठराविक शिस्तीनुसार चालतात. खुर्चीच्या समोरच एक प्रार्थनेचे पुस्तक होते. त्यातील एका संताच्या स्तोत्राचे पठण झाले व नंतर धर्मोपदेशकाचे प्रवचन झाले. ते बोलणे मला फार थोडे समजले. कारण इंग्रज माणसाचे उच्चार ऐकण्याची मला सवय नव्हती. पण कोणत्या भागावर ते बोलत आहेत हे सूझनने पुस्तकातील पान काढून दाखवले त्यामुळे माझी सोय झाली.

तेथील कर्मकांडाचा भाग म्हणून सर्वांच्या हातात काचेचे छोटे पेले आले, आणि ते इतरांनी तोडाला लावले हे पाहून मीही तो घोट घेतला. तेव्हा लक्षात आले की, ते सौम्यसे मद्य होते. शेवटी बायबलमधील एक प्रार्थना सर्वांनी मिळून गंभीर स्वरात म्हटली. तीही त्या पुस्तकात होती म्हणून मला समजली. आपल्याकडील संतांचे भक्तिपर अभंग असतात त्याच आशयाची बरीच स्तोत्रे त्या पुस्तकात होती. उपासनेचा हा सारा भाग एक तासाच्या आत आटोपला. ईस्ट क्रॉयडन हे उपनगर लहान नाही. खूप मोठी वस्ती आहे. पण चर्चमध्ये

पन्नाससाठ स्त्रीपुरुषच होते. ही संख्या वस्तीच्या मानाने फारच कमी होती. खिस्त धर्मातही पंथ व उपपंथ आहेत. ईस्ट क्रॉयडनमध्ये निरनिराळ्या पंथांची आणखीही प्रार्थनांमंदिरे आहेत, हे नंतर दृष्टीला पडले पण तेथेही संख्या अशीच असणार. सारा कार्यक्रम यथासांग पूर्ण झाल्यावर तेथील धर्मोपदेशक दाराशी उभे राहून कोणाकोणाशी दोन शब्द बोलत होते. मी भारतातून आलो आहे असे सूझनने सांगितल्यावर त्या धर्मोपदेशकांनी अगत्यपूर्वक हस्तांदोलन केले. ''मला बायबल आणि खिस्तचरित्र यांची थोडी माहिती आहे, पण थॉमस-ए-केम्पिस याचं " The Imitation of Christ" हे पुस्तक मी समग्र वाचलं आहे आणि ते मला अतिशय आवडलेलं आहे, ते आणि बायबल माझ्या संग्रही आहे, '' असे मी म्हटल्यावर ते धर्मोपदेशक साहाजिकच प्रसन्न झाले. सूझनलाही हे ऐकल्यावर बरे वाटले. थॉमस- ए-केंपिसच्या पुस्तकाला बायबलच्या खालोखाल मान्यता. चौदापंधराव्या शतकात हा एक फार मोठा संत होऊन गेला. दीडदोन पानांचा एक उतारा, आणि त्यात एक विचार मांडलेला, अशी सुमारे सव्वाशे पृष्ठांच्या त्या पुस्तकाची रचना आहे. एक मनुष्य म्हणून असणारी आपली मर्यादा, आपले वर्तन शुद्ध करण्याचा मार्ग, आणि त्यासाठी खिस्ताविषयी भक्तिभाव व सर्वशरणता अंगी बाणण्याचे महत्त्व, हे त्या पुस्तकाचे प्रमुख सूत्र आहे. अतिशय परिणामकारक शैलीत हा विषय या छोट्याशा पुस्तकात मांडला आहे.

## प्रवासातील मर्यादा

अठ्ठावीस सप्टेंबर. लंडनमधील पहिला दिवस. हवा एकदम स्वच्छ होती. इंग्लंडमध्ये नेहमी ढगाळ हवा असते, स्वच्छ ऊन पडले तर शाळा लवकर सोडतात, मुलांना सूर्यप्रकाशाचा आनंद मिळावा म्हणून; असे लहानपणी ऐकले होते. त्याची आठवण झाली. लीड्सला माझे तीन दिवस पावसामुळे वाया गेले होते. पण या प्रवासासाठी बाहेर पडतानाच मनाशी ठरवले होते की, आपल्या मनात आहे तेवढे सारे आपल्याला पाहता येणार नाही. एक तर आपल्याजवळ असलेला पैसा मर्यादित आहे. केव्हाही कोठेही टॅक्सी करून जावे असे ठरवले, तर एका मर्यादित ते भारतात शक्य होते. त्याच्या सातआठ पटीनी महागाई असलेल्या या परदेशात तो विचारही मनात आणणे शक्य नव्हते. हॉटेलमध्ये म्हणजे विश्रामगृहात उतरण्याच्या बाबतीत तीच मर्यादा होती. शिवाय एकट्याने टॅक्सीत बसून शक्य तो कोठे न जावे हे बरे अशी सावधगिरीची सूचना मला एकदोघांनी केली होती. ते सुरक्षितपणाचे नाही, हा त्यातील आशय होता.

लीड्सला मी घरी दिवसभर एकटा असे. अन्वयने सूचना केली होती की, दूरभाष वाजला तरी उचलावयाचा नाही, आणि घंटी वाजली तरी दार उघडावयाचे नाही; बाहेर कोण

आहे, याची आधी खात्री करून घ्यावयाची. या सूचनांचा अर्थ काय होतो? एवढ्या शिस्तीच्या पाश्चात्त्य जगात परक्या माणसाने स्वतःला सांभाळावे लागते, हा त्याचा अर्थ होता.

सुधारलेल्या जगातील खरी संस्कृती काय आहे, याची हीदेखील एक कसोटी मानावयास हवी. विज्ञानाची प्रगती झपाट्याने होते आहे, अनेक नवनवी साधने सर्वांच्या हातात येत आहेत. पण माणूस सुधारणे, तो सद्वर्तनी व सुसंस्कृत होणे, आणि असा साराच्या सारा समाज होऊन जाणे हे पूर्णपणे अशक्य आहे. पूर्वी कधी तसे नव्हते, जगात कोठे नव्हते, आणि भारतातही कधी नव्हते. खूप खूप दूरच्या भविष्यकालात कधीतरी हे घडून येईल का, या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देववत नाही. मानवाच्या ठिकाणी मूलतः असलेल्या सुष्ट आणि दुष्ट अशा सरमिसळ प्रवृत्तींचा तो अपरिहार्य परिणाम आहे. सारा सार्वजनिक व्यवहार या पाश्चात्त्य जगात जवळजवळ आदर्श म्हणावा असा आहे. स्थानक वा विमानतळ येथे भेटणारे कर्मचारी व इतर माणसे अतिशय सौजन्यशील आणि मदत करण्यात तत्पर असतात. उडवाउडवीचे उत्तर देणे किंवा दुर्लक्ष करणे हा प्रकार कोठेही आढळला नाही. पण याचा अर्थ तुम्ही सर्वत्र निर्धास्त राहू शकता असा नाही. आपण शहराच्या उत्तम भागातून फिरतो, आणि समाजातील चांगल्या लोकांशी आपला संपर्क येत असतो. तेथील अनुभव चांगले असतात आणि नोकरी करणारी सर्व माणसे कर्तव्यदक्ष आहेत, एवढाच त्याचा अर्थ आहे. पण या समाजजीवनाला दुसऱ्याही काही बाजू आहेत, आणि सुसंस्कृतपणाच्या दृष्टीने त्या विशेष स्पृहणीय मानता येत नाहीत हेही त्यांची शिस्त व टापटीप पाहून चकित होताना ध्यानात ठेवावे लागते. त्याचबरोबर हेही विसरता येत नाही की, भारतातील हा सार्वजनिक सेवेतील व्यवहार किंवा सर्वसामान्य माणसांचे परकीयांशी होणारे वर्तन हे पाश्चात्त्यांच तुलनेने फार खालच्या पातळीचे आहे. आपण अभिमान बाळगावा असे त्यात काहीही नाही, उलट कठोर आत्मपरीक्षणाची दृष्टी ठेवून बोलावयाचे असेल, तर आपला सामाजिक आणि शासकीय व्यवहार अप्रामाणिकपणा आणि कामचुकारपणा यांनी इतका भरलेला आहे की, त्यामुळे आपल्याला कोणी असंस्कृत म्हटले तरी ते वावगे ठरू नये.

हेही तितकेच खरे की, आशिया आणि आफ्रिका या दोन खंडांत आपल्याहून वाईट स्थिती असलेले कितीतरी देश आहेत. त्यांच्या तुलनेने भारत फार चांगला आहे. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट आहे ती अशी की, सुधारत जाण्याची आपल्या समाजाची आंतरिक क्षमता फार मोठी आहे. एखाद्या विद्यार्थ्याने नीट अभ्यास केला तर तो पहिल्या दहापाचांत येईल अशी त्याची बुद्धी तीव्र असावी, पण वायफळ गोष्टीत वेळ दवडल्यामुळे आणि अभ्यासाकडे लक्ष न दिल्यामुळे तो परीक्षेत अपयशी ठरावा, तशी आपल्या समाजाची अवस्था आहे.

सर्वांगीण विचार करू गेले, तर जगातील प्रगत राष्ट्रांच्या तुलनेने आपली क्षमता अधिक वरच्या दर्जाची ठरेल असे सांस्कृतिक धन आपल्याजवळ आहे. पण समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींना त्याचे भान नाही आणि त्यांचा वैयक्तिक स्वार्थ सुटत नाही, त्यामुळे समाजातील सर्वसमान्य माणसाला योग्य ते मार्गदर्शन मिळत नाही, हे खरे शल्य आहे. खिशात सुवर्णाची नाणी असताना केविलवाणेपणाने लोकांसमोर हात पसरावा, अशी ही अवस्था आहे. देश प्रचंड आहे ही दुसरी अडचण आहे. लोकसंख्या अफाट व तिला आळा घालणे दुर्घट हे तर सारेजण जाणून आहेत.

तेव्हा आपला भारत असो वा प्रगत असा पाश्चात्त्य देश असो, उणेअधिक सर्वत्रच असते. ते वास्तव ध्यानात ठेवून फिरावयाचे, असा संकल्प मनाशी केलेला होता. स्वतःची मर्यादा आणि परिस्थितीची मर्यादा या दोन्ही गोष्टी स्वीकारून जेवढे पाहता येईल तेवढ्यात समाधान मानावयाचे, अशी खूणगाठ बांधलेली होती. वर्डस्वर्थबद्दल मला आकर्षण होते. निसर्गाच्या शोभेच्या मागे असलेल्या शक्तीची जाणीव होण्यापर्यंत त्याची संवेदनशीलता पोचलेली होती. निसर्गाचे भव्य रूप पाहिल्यामुळे प्राचीन काळातील भारतातील ऋषींना उदात्त विचारांचे स्फुरण झाले, तो प्रदेश पाहण्यासाठी पंजाबातील सप्तसिंधूंचा भाग आणि हिमालयाची गगनचुंबी शिखरे पाहावयाची; त्याचप्रमाणे वर्डस्वर्थला ज्या सरोवरांच्या प्रदेशातील वनसौंदर्य पाहिल्यामुळे उदात्त जाणिवांकडे घेऊन जाणारी कविता स्फुरली, तो प्रदेश डोळ्यांखालून घालावा अशी इच्छा होती. पण ते शक्य झाले नाही. त्यामुळे शेक्सपियरचे घर हर्षनिर्भर होऊन पाहिले, तर वर्डस्वर्थला मनोमन प्रणाम केला. लंडनमध्ये मी सात दिवस राहणार होतो. एवढ्यात सारे लंडन पाहून होणार नाही हे दिसत होते. पण जे पाहावयाचे ते सावकाशपणे आत्मसात करावयाचे, असा विचार होता. घाईगर्दी करीत नुसते भटकत गेल्याने धड कशाचच संस्कार मनावर उमटत नाही;—आणि कोणत्याही गोष्टीचा खरा आनंद घेता येत नाही.

## बकिंगहॅम पॅलेससमोर

विजयला सुट्टी होती, त्यामुळे तो माझ्याबरोबर आला. प्रारंभिक मार्गदर्शन या दृष्टीने हा मोठा लाभ होता. त्याची पाचसहा वर्षाची मुलगी गिरिजा ही हौसेने बरोबर आली, आणि संध्याकाळपर्यंत आमच्याबरोबर मजेत फिरली. ती चालताना थकेल म्हणून विजयने हातगाडी बरोबर घेतली. मी पाहिले तर त्या गाडीची छान घडी करता आली व ती मजबूत गाडी त्याने आपल्या पाठीवर सहज अडकवली. ही मला मोठीच सोय वाटली. सकाळची न्याहरी करून आम्ही दहा वाजता स्थानकावर आलो. ट्रायव्हलकार्ड घेतले. हे संपूर्ण दिवसासाठी होते, तीन पौंड नव्वद पेन्स. एकदा हे घेतले की साऱ्या दिवसात कोणत्याही उपनगरी लोहमार्गावरून

आहे, याची आधी खात्री करून घ्यावयाची. या सूचनांचा अर्थ काय होता? एवढ्या शिस्तीच्या पाश्चात्त्य जगात परक्या माणसाने स्वतःला सांभाळावे लागते, हा त्याचा अर्थ होता.

सुधारलेल्या जगातील खरी संस्कृती काय आहे, याची हीदेखील एक कसोटी मानावयास हवी. विज्ञानाची प्रगती झपाट्याने होते आहे, अनेक नवनवी साधने सर्वांच्या हातात येत आहेत. पण माणूस सुधारणे, तो सद्वर्तनी व सुसंस्कृत होणे, आणि असा साराच्या सारा समाज होऊन जाणे हे पूर्णपणे अशक्य आहे. पूर्वी कधी तसे नव्हते, जगात कोठे नव्हते, आणि भारतातही कधी नव्हते. खूप खूप दूरच्या भविष्यकालात कधीतरी हे घडून येईल का, या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देववत नाही. मानवाच्या ठिकाणी मूलतः असलेल्या सुष्ट आणि दुष्ट अशा सरमिसळ प्रवृत्तींचा तो अपरिहार्य परिणाम आहे. सारा सार्वजनिक व्यवहार या पाश्चात्त्य जगात जवळजवळ आदर्श म्हणावा असा आहे. स्थानक वा विमानतळ येथे भेटणारे कर्मचारी व इतर माणसे अतिशय सौजन्यशील आणि मदत करण्यात तत्पर असतात. उडवाउडवीचे उत्तर देणे किंवा दुर्लक्ष करणे हा प्रकार कोठेही आढळला नाही. पण याचा अर्थ तुम्ही सर्वत्र निर्धास्त राहू शकता असा नाही. आपण शहराच्या उत्तम भागातून फिरतो, आणि समाजातील चांगल्या लोकांशी आपला संपर्क येत असतो. तेथील अनुभव चांगले असतात आणि नोकरी करणारी सर्व माणसे कर्तव्यदक्ष आहेत, एवढाच त्याचा अर्थ आहे. पण या समाजजीवनाला दुसऱ्याही काही बाजू आहेत, आणि सुसंस्कृतपणाच्या दृष्टीने त्या विशेष स्पृहणीय मानता येत नाहीत हेही त्यांची शिस्त व टापटीप पाहून चकित होताना ध्यानात ठेवावे लागते. त्याचबरोबर हेही विसरता येत नाही की, भारतातील हा सार्वजनिक सेवेतील व्यवहार किंवा सर्वसामान्य माणसांचे परकीयांशी होणारे वर्तन हे पाश्चात्त्यांच तुलनेने फार खालच्या पातळीचे आहे. आपण अभिमान बाळगावा असे त्यात काहीही नाही, उलट कठोर आत्मपरीक्षणाची दृष्टी ठेवून बोलावयाचे असेल, तर आपला सामाजिक आणि शासकीय व्यवहार अप्रामाणिकपणा आणि कामचुकारपणा यांनी इतका भरलेला आहे की, त्यामुळे आपल्याला कोणी असंस्कृत म्हटले तरी ते वावगे ठरू नये.

हेही तितकेच खरे की, आशिया आणि आफ्रिका या दोन खंडांत आपल्याहून वाईट स्थिती असलेले कितीतरी देश आहेत. त्यांच्या तुलनेने भारत फार चांगला आहे. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट आहे ती अशी की, सुधारत जाण्याची आपल्या समाजाची आंतरिक क्षमता फार मोठी आहे एखाद्या विद्यार्थ्याने नीट अभ्यास केला तर तो पहिल्या दहापाचांत येईल अशी त्याची बुद्धी तीव्र असावी, पण वायफळ गोष्टीत वेळ दवडल्यामुळे आणि अभ्यासाकडे लक्ष न दिल्यामुळे तो परीक्षेत अपयशी ठरावा, तशी आपल्या समाजाची अवस्था आहे.

सर्वांगीण विचार करू गेले, तर जगातील प्रगत राष्ट्रांच्या तुलनेने आपली क्षमता अधिक वरच्या दर्जाची ठरेल असे सांस्कृतिक धन आपल्याजवळ आहे. पण समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींना त्याचे भान नाही आणि त्यांचा वैयक्तिक स्वार्थ सुटत नाही, त्यामुळे समाजातील सर्वसमान्य माणसाला योग्य ते मार्गदर्शन मिळत नाही, हे खरे शल्य आहे. खिशात सुवर्णाची नाणी असताना केविलवाणेपणाने लोकांसमोर हात पसरावा, अशी ही अवस्था आहे. देश प्रचंड आहे ही दुसरी अडचण आहे. लोकसंख्या अफाट व तिला आळा घालणे दुर्घट हे तर सारेजण जाणून आहेत.

तेव्हा आपला भारत असो वा प्रगत असा पाश्चात्त्य देश असो, उणेअधिक सर्वत्रच असते. ते वास्तव ध्यानात ठेवून फिरावयाचे, असा संकल्प मनाशी केलेला होता. स्वतःची मर्यादा आणि परिस्थितीची मर्यादा या दोन्ही गोष्टी स्वीकारून जेवढे पाहता येईल तेवढ्यात समाधान मानावयाचे, अशी खूणगाठ बांधलेली होती. वर्डस्वर्थबद्दल मला आकर्षण होते. निसर्गाच्या शोभेच्या मागे असलेल्या शक्तीची जाणीव होण्यापर्यंत त्याची संवेदनशीलता पोचलेली होती. निसर्गाचे भव्य रूप पाहिल्यामुळे प्राचीन काळातील भारतातील ऋषींना उदात्त विचारांचे स्फुरण झाले, तो प्रदेश पाहण्यासाठी पंजाबातील सप्तसिंधूंचा भाग आणि हिमालयाची गगनचुंबी शिखरे पाहावयाची; त्याचप्रमाणे वर्डस्वर्थला ज्या सरोवरांच्या प्रदेशातील वनसौंदर्य पाहिल्यामुळे उदात्त जाणिवांकडे घेऊन जाणारी कविता स्फुरली, तो प्रदेश डोळ्यांखालून घालावा अशी इच्छा होती. पण ते शक्य झाले नाही. त्यामुळे शेक्सपियरचे घर हर्षनिर्भर होऊन पाहिले, तर वर्डस्वर्थला मनोमन प्रणाम केला. लंडनमध्ये मी सात दिवस राहणार होतो. एवढ्यात सारे लंडन पाहून होणार नाही हे दिसत होते. पण जे पाहावयाचे ते सावकाशपणे आत्मसात करावयाचे, असा विचार होता. घाईगर्दी करीत नुसते भटकत गेल्याने धड कशाचच संस्कार मनावर उमटत नाही; आणि कोणत्याही गोष्टीचा खरा आनंद घेता येत नाही.

### बकिंगहॅम पॅलेससमोर

विजयला सुट्टी होती, त्यामुळे तो माझ्याबरोबर आला. प्रारंभिक मार्गदर्शन या दृष्टीने हा मोठा लाभ होता. त्याची पाचसहा वर्षाची मुलगी गिरिजा ही हौसेने बरोबर आली, आणि संध्याकाळपर्यंत आमच्याबरोबर मजेत फिरली. ती चालताना थकेल म्हणून विजयने हातगाडी बरोबर घेतली. मी पाहिले तर त्या गाडीची छान घडी करता आली व ती मजबूत गाडी त्याने आपल्या पाठीवर सहज अडकवली. ही मला मोठीच सोय वाटली. सकाळची न्याहरी करून आम्ही दहा वाजता स्थानकावर आलो. ट्रायव्हलकार्ड घेतले. हे सपूर्ण दिवसासाठी होते, तीन पौंड नव्वद पेन्स. एकदा हे घेतले की साऱ्या दिवसात कोणत्याही उपनगरी लोहमार्गावरून

आहे, याची आधी खात्री करून घ्यावयाची या सूचनांचा अर्थ काय होतो? एवढ्या शिस्तीच्या पाश्चात्त्य जगात परक्या माणसाने स्वतःला सांभाळावे लागते, हा त्याचा अर्थ होता.

सुधारलेल्या जगातील खरी संस्कृती काय आहे, याची हीदेखील एक कसोटी मानावयास हवी. विज्ञानाची प्रगती झपाट्याने होते आहे, अनेक नवनवी साधने सर्वांच्या हातात येत आहेत. पण माणूस सुधारणे, तो सद्वर्तनी व सुसंस्कृत होणे, आणि असा साराच्या सारा समाज होऊन जाणे हे पूर्णपणे अशक्य आहे. पूर्वी कधी तसे नव्हते, जगात कोठे नव्हते, आणि भारततही कधी नव्हते. खूप खूप दूरच्या भविष्यकालात कधीतरी हे घडून येईल का, या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देववत नाही. मानवाच्या ठिकाणी मूलतः असलेल्या सुष्ट आणि दुष्ट अशा सरमिसळ प्रवृत्तींचा तो अपरिहार्य परिणाम आहे. सारा सार्वजनिक व्यवहार या पाश्चात्त्य जगात जवळजवळ आदर्श म्हणावा असा आहे. स्थानक वा विमानतळ येथे भेटणारे कर्मचारी व इतर माणसे अतिशय सौजन्यशील आणि मदत करण्यात तत्पर असतात. उडवाउडवीचे उत्तर देणे किंवा दुर्लक्ष करणे हा प्रकार कोठेही आढळला नाही. पण याचा अर्थ तुम्ही सर्वत्र निर्धास्त राहू शकता असा नाही. आपण शहराच्या उत्तम भागातून फिरतो, आणि समाजातील चांगल्या लोकांशी आपला संपर्क येत असतो. तेथील अनुभव चांगले असतात आणि नोकरी करणारी सर्व माणसे कर्तव्यदक्ष आहेत, एवढाच त्याचा अर्थ आहे पण या समाजजीवनाला दुसऱ्याही काही बाजू आहेत, आणि सुसंस्कृतपणाच्या दृष्टीने त्या विशेष स्पृहणीय मानता येत नाहीत हेही त्यांची शिस्त व टापटीप पाहून चकित होताना ध्यानात ठेवावे लागते. त्याचबरोबर हेही विसरता येत नाही की, भारतातील हा सार्वजनिक सेवेतील व्यवहार किंवा सर्वसामान्य माणसांचे परकीयांशी होणारे वर्तन हे पाश्चात्त्यांच तुलनेने फार खालच्या पातळीचे आहे. आपण अभिमान बाळगावा असे त्यात काहीही नाही, उलट कठोर आत्मपरीक्षणाची दृष्टी ठेवून बोलावयाचे असेल, तर आपला सामाजिक आणि शासकीय व्यवहार अप्रामाणिकपणा आणि कामचुकारपणा यांनी इतका भरलेला आहे की, त्यामुळे आपल्याला कोणी असंस्कृत म्हटले तरी ते वावगे ठरू नये.

हेही तितकेच खरे की, आशिया आणि आफ्रिका या दोन खंडांत आपल्याहून वाईट स्थिती असलेले कितीतरी देश आहेत. त्यांच्या तुलनेने भारत फार चांगला आहे. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट आहे ती अशी की, सुधारत जाण्याची आपल्या समाजाची आंतरिक क्षमता फार मोठी आहे एखाद्या विद्यार्थ्याने नीट अभ्यास केला तर तो पहिल्या दहापाचांत येईल अशी त्याची बुद्धी तीव्र असावी, पण वायफळ गोष्टीत वेळ दवडल्यामुळे आणि अभ्यासाकडे लक्ष न दिल्यामुळे तो परीक्षेत अपयशी ठरावा, तशी आपल्या समाजाची अवस्था आहे.

सर्वांगीण विचार करू गेले, तर जगातील प्रगत राष्ट्रांच्या तुलनेने आपली क्षमता अधिक वरच्या दर्जाची ठरेल असे सांस्कृतिक धन आपल्याजवळ आहे. पण समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींना त्याचे भान नाही आणि त्यांचा वैयक्तिक स्वार्थ सुटत नाही, त्यामुळे समाजातील सर्वसमान्य माणसाला योग्य ते मार्गदर्शन मिळत नाही, हे खरे शल्य आहे. खिशात सुवर्णाची नाणी असताना केविलवाणेपणाने लोकांसमोर हात पसरावा, अशी ही अवस्था आहे. देश प्रचड आहे ही दुसरी अडचण आहे. लोकसंख्या अफाट व तिला आळा घालणे दुर्घट हे तर सारेजण जाणून आहेत.

तेव्हा आपला भारत असो वा प्रगत असा पाश्चात्त्य देश असो, उणेअधिक सर्वत्रच असते. ते वास्तव ध्यानात ठेवून फिरावयाचे, असा संकल्प मनाशी केलेला होता. स्वतःची मर्यादा आणि परिस्थितीची मर्यादा या दोन्ही गोष्टी स्वीकारून जेवढे पाहता येईल तेवढ्यात समाधान मानावयाचे, अशी खूणगाठ बांधलेली होती. वर्डस्वर्थबद्दल मला आकर्षण होते. निसर्गाच्या शोभेच्या मागे असलेल्या शक्तीची जाणीव होण्यापर्यंत त्याची संवेदनशीलता पोचलेली होती. निसर्गाचे भव्य रूप पाहिल्यामुळे प्राचीन काळातील भारतातील ऋषींना उदात्त विचारांचे स्फुरण झाले, तो प्रदेश पाहण्यासाठी पंजाबातील सप्तसिंधूंचा भाग आणि हिमालयाची गगनचुंबी शिखरे पाहावयाची; त्याचप्रमाणे वर्डस्वर्थला ज्या सरोवरांच्या प्रदेशातील वनसौंदर्य पाहिल्यामुळे उदात्त जाणिवांकडे घेऊन जाणारी कविता स्फुरली, तो प्रदेश डोळ्यांखालून घालावा अशी इच्छा होती. पण ते शक्य झाले नाही. त्यामुळे शेक्सपियरचे घर हर्षनिर्भर होऊन पाहिले, तर वर्डस्वर्थला मनोमन प्रणाम केला. लंडनमध्ये मी सात दिवस राहणार होतो. एवढ्यात सारे लंडन पाहून होणार नाही हे दिसत होते. पण जे पाहावयाचे ते सावकाशपणे आत्मसात करावयाचे, असा विचार होता. घाईगर्दी करीत नुसते भटकत गेल्याने धड कशाचच संस्कार मनावर उमटत नाही;-आणि कोणत्याही गोष्टीचा खरा आनंद घेता येत नाही.

## बकिंगहॅम पॅलेससमोर

विजयला सुट्टी होती, त्यामुळे तो माझ्याबरोबर आला. प्रारंभिक मार्गदर्शन या दृष्टीने हा मोठा लाभ होता. त्याची पाचसहा वर्षांची मुलगी गिरिजा ही हौसेने बरोबर आली, आणि संध्याकाळपर्यंत आमच्याबरोबर मजेत फिरली. ती चालताना थकेल म्हणून विजयने हातगाडी बरोबर घेतली. मी पाहिले तर त्या गाडीची छान घडी करता आली व ती मजबूत गाडी त्याने आपल्या पाठीवर सहज अडकवली. ही मला मोठीच सोय वाटली. सकाळची न्याहरी करून आम्ही दहा वाजता स्थानकावर आलो. ट्रायव्हलकार्ड घेतले. हे संपूर्ण दिवसासाठी होते, तीन पौंड नव्वद पेन्स. एकदा हे घेतले की साऱ्या दिवसात कोणत्याही उपनगरी लोहमार्गावरून

आणि परिवहनाच्या गाडीतून कोठेही कितीही फिरता येते. ही सोय फार छान वाटली. अकरा वाजता आम्ही व्हिक्टोरिया स्थानकावर आलो. विजयबरोबर आज पुन्हा सारे स्थानक नीट डोळ्यांखालून घातले मुख्य म्हणजे जवळच भुयारी लोहमार्गाचे स्थानक होते ते पाहिले लंडनचा भुयारी लोहमार्ग जगात गाजलेला आहे त्यातील प्रशस्तपणा आणि नेटकेपणा यांची प्रचीती आली. व्हिक्टोरिया स्थानकाच्या बाहेर प्रमुख दिशांनी रस्ते जातात. लंडन शहर दाखवणाऱ्या अनेक सार्वजनिक गाड्या आहेत. त्या थांबण्याच्या व्हिक्टोरिया स्थानकाच्याजवळ असलेल्या जागा विजयने मला दाखवल्या. लंडनमधील अतिशय महत्त्वाची अशी काही स्थाने साधारणपणे अर्ध्यापाऊण मैलांच्या परिघात होती. पायी फिरण्यामुळे सारे काही सावकाशीने दृष्टीपुढून घालता येते, हाही लाभ होता.

बकिंगहॅम पॅलेसची दिशा धरली. त्याचे छायाचित्र अनेक वेळा दृष्टीसमोरून गेले होते. तेथील पहारेकऱ्यांचे पथक बदलते तो रोजचा सोहळा अनेक प्रवासी आवर्जून पाहतात. दूरदर्शनवर केव्हातरी ते दृश्य पाहिले होते. त्यामुळे त्यासाठी थांबून राहावे असे वाटले नाही. बाजूला असलेल्या एका प्रवेशद्वारासमोर राणीच्या संरक्षक दलातील परंपरागत गणवेष धारण केलेला सैनिक लष्करी शिस्तीत उभा होता. राजवाड्याच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर मोठा चौक आहे व त्याच्या मध्यभागी भलेमोठे कारंजे आहे. त्याच्या चौथऱ्याच्या चार बाजूंना असलेले चार व वरच्या बाजूला असलेला एक असे पाच पुतळे फार आकर्षक आहेत. कलाकृतीचे असे नमुने शांतपणे पाहिले व तपशिलांवर नीट दृष्टी टाकली, तर त्यांतील सौंदर्य खऱ्या अर्थाने ध्यानात येते. एक कारंजे तर आहे असे मानून तसेच पुढे गेलो तर आपण बरेच काही गमावून बसतो.

रोमच्या पाषाणनगरीत अनेक सुंदर शिल्पकृती आहेत. त्यांतील काही कारंजी अतिशय सुदर आहेत. एका पुलावर तर दोन्ही बाजूंना पंख असलेल्या, यौवनात नुकतेच पदार्पण करीत असलेल्या कोवळ्या अप्सरांचे अतिशय नाजूक आणि सुंदर पुतळे आहेत. ही सारी मूर्तिकला बर्निनीची आहे. लिओनार्दो-द-व्हिन्सीइतकाच रोम नगरीच्या सौदर्यात बर्निनीचा वाटा आहे. हे सारे पुस्तकातील उत्कृष्ट छायाचित्रांतून पाहिले होते. स्त्री आणि पुरुष यांच्या विविध प्रकारांतील शिल्पकृतीच्या बाबतीत ग्रीस आणि इटली या देशांतील कलावंतांची बरोबरी अन्य कोणी करू शकलेला नाही. मानवाच्या शरीराकृतीत केवढे सौदर्य साठवलेले आहे, पुरुषाच्या आकृतीतील सामर्थ्याचे दर्शन आणि स्त्रीच्या देहयष्टीतील नाजूकपणाचा आविष्कार या दोन्हीतील फरक काय आहे, हे त्या त्या कलावंतांनी अतिशय कलात्मकतेने दाखवले आहे. काही काही नग्न पुतळेही आहेत, पण ते पाहताना कोणताही विकृत भाव मनात उत्पन्न होत नाही वा वासना चाळवली जात नाही, अशी त्यांतील सौंदर्याची आणि

कलात्मकतेची किमया आहे.

संगमरवर हा पांढरा असला तरी एक फत्तर आहे, पण त्या दगडातून लहान बालकाचा नाजूकपणा किंवा स्त्रीच्या शरीराची कोमलता उमलून उभी राहते, यावर विश्वास बसत नाही. बाराचौदा फूट उंचीचा डेव्हिडचा नग्न पुतळा लिओनार्दो-द-व्हिन्सीच्या छिन्नीतून आकाराला आला आहे. आपण त्याचे छायाचित्र पाहताना स्तिमित होऊन जातो. खांदे, मनगट, हाताची बोटे, पावलांचे स्नायू, वळलेल्या मानेतील ऐट आणि उभे राहण्यातील डौल डोळे दिपवणारा आहे. संगमरवरातील शिल्पकलेचे हे ऐश्वर्य आणि बारीक नक्षीकामातील विलक्षण नाजूकपणा अबूच्या पहाडावर असलेल्या दिलवाडा मंदिरात पाहावयास मिळतात. आग्र्याला गेली पंचवीस वर्षे एक भव्य संगमरवरी मंदिर दयाळबागेत उभे राहात आहे. तेथे तर रंगीत संगमरवर वापरला आहे. लतावेली आणि फुलेपालवी यांतील सारे सौदर्य आकाराला येत आहे. मंदिर पुरे होण्यास अजून दहाबारा वर्षे लागतील म्हणतात. पण देवदेवतांच्या मोजक्या आकृती सोडल्या तर भारतात मानवी शरिराचे सौदर्य समर्थपणाने साकार झालेले नाही. सर्वत्र एक प्रकारचा ओबडधोबडपणा आहे.

बकिंगहॅम पॅलेससमोरचे हे कारंजे आणि आधी पाहिलेला सैनिक यांमुळेच आपण एक राजप्रासाद पाहतो आहोत असे वाटले. प्रत्यक्ष राजवाड्याची इमारत आडवीच्या आडवी पसरलेली आहे. तिला बाहेरच्या अंगाने तरी प्रासादाचे ऐश्वर्य नाही. राजवाडा आतून पाहण्याची सोय आहे. पण तिकिटांसाठी मोठी रांग होती. शिवाय मोठमोठी दालने, त्यांतील सजवलेली आसने, भिंतीवरील चित्रे किंवा कलाकुसर, छतावरून खाली सोडलेली हंड्याझुंबरे असा राजशाही श्रीमंतीचा झगझगाट पाहण्याचे आकर्षण नव्हते. भारतात आग्रा आणि दिल्ली येथे मोगल सम्राटांचे संगमरवरी विस्तीर्ण प्रासाद आहेत. अप्रतिम वास्तुसौदर्याने ते नटलेले आहेत. तेथील नक्षीकाम दृष्टी खिळवून ठेवणारे आहे. जयपूर-उदेपूरचे राजस्थानी वैभवही आगळेवेगळे आहे. म्हैसूरचा प्रचंड राजवाडा सावकाशपणे पाहिला होता. अनेक दालने मोठी भव्य आणि प्रशस्त, प्रत्येकात वेगळ्या प्रकारची सजावट, संस्थानिकांसाठी खास सजवलेली आसने, छतांवरील वेधक रंगकाम, पायांखाली सर्वत्र रुजामे, असे सारे दोन तास हिंडून पाहिले होते. पण मनात आले होते, फार तर दोन महाल समारंभासाठी पुरेसे आहेत, एक छोटा व एक मोठा. हे इतके दिवाणखाने वर्षातून किती वेळा वापरले जात असतील? यांची गरज काय? पण ऐश्वर्याच्याही काही कल्पना असतात, एवढेच म्हणावयाचे. बकिंगहॅम पॅलेसच्या अंतर्भागातही तसेच काही असेल, मुद्दाम वेळ खर्च करून ते पाहिले पाहिजे असे वाटले नाही. दिल्लीत इंग्रजांनीच उभे केलेले आजचे राष्ट्रपतिभवन आतूनबाहेरून पाहिले होते. त्याचे वास्तुशिल्प तर अप्रतिम आहे. भारतातील व्हाइसरॉय हा खरे तर इंग्लंडमधील सम्राटाचा एक सुभेदार. पण

त्या सुभेदाराच्या निवासस्थानाचा दिमाख लंडनमधील सम्राटाच्या प्रासादाला निदान बाहेरून पाहताना तरी थोडादेखील नाही असे वाटून गेले

## आठवा एड्वर्ड आणि आजचा चार्ल्स

वास्तविक पाहता इंग्लंड हे लोकशाही राष्ट्र. पण त्या देशाने आपली राजपरंपरा प्रतिष्ठेच्या अंगाने जपली आहे. राज्याचा उपभोगशून्य स्वामी ही राजाची भारतीय संस्कृतीतील आदर्श कल्पना आहे. शिवछत्रपतीत ती साकार झाली, म्हणून ते पुण्यश्लोक मानले गेले असे पुण्यश्लोक नृपती अपवादात्मकच असतात. या नामावळीत दुसरे नाव समोर येते ते एका स्त्रीचे आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी. राजसत्तेवर असणारी तरीही एवढी साधेपणाने राहणारी, दानशूर, व प्रजाहिततत्पर स्त्री आपल्या देशात होऊन गेली, ही अभिमान वाटावा अशी गोष्ट आहे. ब्रिटनच्या राजाचे वर्णन राज्याचा अधिकारशून्य स्वामी या शब्दांत करता येईल. पण लोकशाहीच्या कट्टर पुरस्कर्त्या असलेल्या इंग्रज समाजाला आपल्या राजवंशाबद्दल प्रेम आहे हेही खरे. इंग्लंडने घातलेला हा एक अद्‌भुत मेळ आहे. पण आता सर्वत्रच काळ पालटतो आहे. चर्चिलला राजघराण्याबद्दल जे प्रेम होते, ते नुकताच जो पंतप्रधान होता त्या जॉन मेजरला तितक्याच उत्कटतेने वाटले असेल का? पण अशा या प्रेमाचा विषय असलेल्या राजपदावरील व्यक्तीकडून इंग्रज लोकांची काय अपेक्षा होती? आठव्या एड्वर्डला मिसेस सिंप्सनशी विवाह करण्यासाठी सिंहासनाचा त्याग करावा लागला. प्रेम आणि सम्राटपद या दोहोंत एडवर्डचा कौल प्रेमाच्या अंगाने पडला. हा ज्याचा त्याचा व्यक्तिगत निवडीचा भाग आहे. "The Heart Has Its Reasons" या नावाचे या साऱ्या कथेमधील आपला अनुभव वर्णन करणारे मिसेस सिंप्सन यांचे पुस्तक त्या वेळी गाजले होते. ते त्या प्रकरणानंतर सतराअठरा वर्षांनी प्रसिद्ध झाले. आमच्या पिढीने तरुण वयात हे सारे प्रत्यक्ष घडताना पाहिलेले आहे.

भारताच्या संस्कृतीबद्दल ज्यांना कोणताही अभिमान वाटत नाही आणि तीमध्ये जो काही भाग जनमानसात विशेष आदराचा मानला जातो, त्याला उणेपणा आणण्यात ज्यांना गोडी वाटत असते, अशांपैकी कोणीकोणी त्या वेळी एडवर्डचे उदाहरण देऊन रामाने सीतेसाठी असा राज्यत्याग केला नाही, असे म्हणत असत. पण रामाने सीतेचा त्याग केला असला, तरी त्याने दुसरा विवाह केला नाही, आणि त्यामुळे त्याचे व्यक्तिगत आयुष्य वैराण होऊन गेले, यांचा त्यांना विसर पडतो. शिवाय राजपदाच्या लोभापोटी रामाने सीतेचा त्याग केला, असे त्यांनाही म्हणता येणार नाही. एडवर्डवर आक्षेप काय होता? मिसेस सिंप्सन यांचे आधीचे दोन पती जिवंत होते, आणि एडवर्डच्या प्रेमात गुंतल्यावर तिने सिंप्सन या आपल्या

दुसऱ्या पतीशी घटस्फोट घेतला. दोनवेळा घटस्फोट घेतलेल्या स्त्रीशी विवाह करणारी व्यक्ती राजसिंहासनावर असावी का, हा चर्चेचा मुद्दा झाला. म्हणजे येथे वैवाहिक जीवनातील निष्ठेला समाजाकडून एक वेगळी मान्यता दिली जात होती. पाश्चात्त्य समाजात घटस्फोट घेणे सर्वमान्य असून आणि त्याहीपुढे विवाहबाह्य संबंधाकडे सामान्यपणे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती असूनही, सिंहासनाधिष्ठित राजा तसा असू नये असे मत होते. ही घटना केवळ साठ वर्षापूर्वीची म्हणजे अगदी आधुनिक काळातील आहे

राजा हा राजा म्हणून कारभार नीट करतो की नाही एवढेच पाहावे, त्याच्या वैयक्तिक जीवनात डोकावण्याचे काही कारण नाही, असे कोणी म्हटले नाही लॉर्ड बाल्डविन पंतप्रधान होते. त्यांच्यापासून सर्वांनी एडवर्डला त्याच्या निर्णयापासून परावृत्त करण्याचा कसोशीचा प्रयत्न केला. ब्रिटन हे आधुनिक राष्ट्र आहे. पण तरीही आपल्या राजाला मोहात पाडणारी ती ही सिप्सन, हे वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्यावर तिला धमकी देणारी अनेक पत्रे आली. सुरक्षिततेची चिंता वाटल्यामुळे तिला युरोपात जावे लागले. आपल्यावरील प्रेमासाठी एडवर्ड सम्राटपदासारखा अधिकार सोडणार ही कल्पना सिंप्सनला असह्य वाटली. तिनेही एडवर्डला गळ घातली, आणि आपण एकमेकांपासून दूर होऊ या असे म्हटले सिंप्सनने आपल्या पुस्तकात हे सारे काही दिले आहे मनात येऊन जाते की, आपल्यासाठी राम राजपदावरून दूर होत आहे असे सीतेला समजले असते, तर तिनेही रामाला असाच आग्रह केला असता. जे सिंप्सनला डोळयांत अश्रू आणून सांगावेसे वाटले, ते सीतेला वाटले नसते असे म्हणवत नाही. शिवाय एवढा अन्याय होऊन सीतेचे रामावरील प्रेम थोडेसेही कमी झाले नाही. पण हा सारा निराळा विषय आहे.

इंग्लिश जनता राजघराण्याची प्रतिष्ठा कशात मानीत होती, त्याची एडवर्डचा राज्यत्याग ही एक खूण आहे. यामध्ये वैवाहिक जीवनातील चारित्र्य या मूल्याचा निर्विवादपणाने स्वीकार केलेला आहे. मिसेस सिंप्सनचे घटस्फोट हा आक्षेपार्ह विषय ठरला होता, आज दोन पिढ्या उलटल्यावर इंग्लडचा भावी राजा चार्ल्स आणि त्याची पत्नी डायना यांचाच घटस्फोट इंग्रजी समाजाने स्वीकारला आहे. त्या दोघांच्या वैवाहिक जीवनाच्या वार्ता वृत्तपत्रांतून झळकल्या आणि लोकांनी त्या काहीशा चविष्टपणाने वाचल्या. कोणाच्याही वैवाहिक जीवनात डोकावता आले, तर लोकांना त्याचे विशेष आकर्षण वाटते. पण त्यात काहीतरी ''अफेअर'' असावे लागते. त्याशिवाय त्या कहाणीला खुमारी येत नाही. पण इंग्लंडमधील मान्यवरांचे याबद्दल आजचे मत काय आहे?

१९९७ - च्या जून महिन्याच्या पूर्वार्धाअखेर या संदर्भात वृत्तपत्रात बातमी आली आहे राजपुत्र चार्ल्स याचे कॅमिला पार्कर बोल्स या नावाच्या एका विवाहित स्त्रीशी संबंध आहेत

डायनाशी घटस्फोट घेतल्यावरही हे संबध चालू राहिले आहेत आणि ते त्याने मान्य केले आहेत. ऑग्लिकन चर्चचे एक पदाधिकारी रेव्हरंड डेव्हिड स्ट्रीटर यांनी असे म्हटले आहे की, त्याने हे सबंध तोडावेत अगर आठव्या एडवर्डप्रमाणे सिहासनाचा त्याग करण्याची सिद्धता ठेवावी. हे करताना त्याला वेदना होतील, पण ज्याला सार्वजनिक आयुष्यात नेतृत्व करावयाचे आहे, त्याने काही वैयक्तिक गोष्टीचा त्याग करण्याची तयारी ठेवली पाहिजे; असा स्ट्रीटर यांनी चार्ल्सला सल्ला दिला आहे, आणि त्यापुढे जाऊन ब्रिटनला व्यभिचारी राजा चालणार नाही, असा इषारा दिला आहे. इंग्रजीत ज्याला अफेअर म्हणतात, किंवा मराठीमधे अशा गोष्टीचे समर्थन करू पाहणारे ''त्या दोघांचे एकमेकावर प्रेम आहे'' असे सोज्वळ शब्द वापरतात, तो वास्तवात एक व्यभिचार असतो, हे स्ट्रीटर यांच्या इशाऱ्यात स्पष्टपणे व्यक्त होऊन गेले आहे. यानंतर चार्ल्स हा कॅमिलाशी विवाहबद्ध होणार, अशी बातमी जुलैच्या पूर्वार्धात आली आहे. वृत्तपत्रात बातम्या येत राहतात. तेवढ्यावर आपण निश्चयाने काही तर्क करू शकत नाही. चार्ल्सने डायनाशी घटस्फोट घेतला ही गोष्ट त्याने सिंहासनावर बसण्याच्या आड येणार नाही, येथवर रेव्हरंड स्ट्रीटर आले आहेत. चार्ल्सने कॅमिलाशी विवाह केला तर त्यावर कोणते पडसाद उमटतात, हा एक कुतूहलाचा विषय आहे.

इंद्रिये, त्यांना हवेसे वाटणारे विषय, आणि त्यातून उत्पन्न होणारी वासना ही अत्यंत नैसर्गिक गोष्ट आहे. तिरस्कार करावा असे त्यात काहीही नाही. साऱ्या सजीव सृष्टीत जे आढळते तेच मानवाच्या ठायी आहे पण मानवाने आपल्या स्वतंत्र बुद्धीचा उपयोग करून, हरएक वासनेच्या तृप्तीसाठी व्यक्ती आणि समाज या दोहींचे जीवन निरामय राहण्याच्या दृष्टीने काही व्यवस्था लावण्याचा प्रयत्न केला आहे. ज्ञान आणि अनुभव यांच्या आधारावर ही व्यवस्था अधिक चांगली कशी होत जाईल हे माणूस पाहात आला आहे, आणि त्यात त्याची प्रगती आणि संस्कृती साठवलेली आहे. या वासनांतील कामवासना ही सर्वात बलवान. तिच्या मुळाशी स्त्रीपुरुषांतील शारीरिक आकर्षण असते हे स्पष्ट आहे. पण पशूचा हा व्यवहार केवळ शारीर आकर्षणाशी थांबतो. माणसाने आपल्या स्वतंत्र बुद्धीच्या आधारे त्या शारीर आकर्षणाला मानसिक पातळीवर नेले. त्यातून प्रेम हा शब्द आला आणि शारीर शृंगार हा त्या प्रेमाचा एक आविष्कार ठरला.

स्त्रीपुरुषांतील प्रेम ही केवळ शारीर शृंगारापेक्षा वरच्या पातळीवरची गोष्ट आहे. ती अधिक टिकून राहणारी आहे आणि माणसाचे अवघे जीवन आनंदपूर्ण करणारी आहे. शृंगार कोठेतरी थांबतो, प्रेम टिकून राहते. शृंगाराचा आनंद काही वेळापुरता असतो. एक क्षण येतो आणि त्यातील उत्कटता समाप्त होते. पोट भरले की खाण्याची वासना तृप्त होते, आणि त्यातील आनंदही संपतो, तो आनंद हवा असेल तर पुन्हा भूक लागेपर्यंत थांबावे लागते. ही

सारी शारीर प्रक्रिया आहे तीच शृंगारातील क्रीडेलाही लागू पडते. पण प्रेम ही मनाने जाणावयाची आणि अनुभवावयाची गोष्ट आहे. प्रेमातील मानसिक आनंद हा चोवीस तासाचा आहे. एकमेकांच्या निकट असले तरच शृंगाराचा आस्वाद घेता येतो. प्रेम ही गोष्ट अशी आहे की, आपण आपल्या प्रिय व्यक्तीपासून दूर असलो तरी ती आपली सोबत करते आणि आनंद देते. वयाबरोबर शृंगारक्रीडा करण्याचे शारीरिक सामर्थ्य कमी होत जाते वृद्धापकाळात ते जवळजवळ लोप पावते. पण कोवळ्या तरुण वयातील सदैव उत्सुक आणि नवथर असलेले प्रेम वाढत्या वयाबरोबर व जीवनातील सुखदु:खांच्या एकत्रितपणे घेतलेल्या अनुभवांच्या बळावर अधिक अधिक दृढ होत एक शांत स्थिर रूप धारण करते. प्रेमातील आनंद कधी शिळा होत नाही. अशा प्रेमावर अधिष्ठित असलेला शृंगार हा माणसाला शोभा देणारा आहे. ते प्रेम नसेल तर नुसता शृंगार हा नुसता शारीर व्यापार आहे. केवळ त्यात बुडणे यात मनुष्यत्वाची शोभा नाही.

याला आणखीही एक बाजू आहे. प्रेम हे परस्परविश्वासावर आधारलेले आहे. या विश्वासाला तडा गेला, तर तेथे प्रेम शिल्लक राहात नाही. दोन व्यापाऱ्यांमधील साधा आर्थिक व्यवहार विश्वासावर उभा असतो, तो विश्वास गेला की त्या व्यवहाराला धक्का बसतो. ज्या व्यापाऱ्याच्या शब्दावर निर्धास्तपणे विश्वास ठेवता येतो, त्याची बाजारातील पत मोठी असते. एवढे महत्त्व विश्वासाला साध्या व्यवहारात आहे. हा विश्वास किंवा दिलेला शब्द पाळण्याची वृत्ती याला प्रामाणिकपणा म्हणतात. मानवी व्यवहाराच्या सर्व क्षेत्रांत या सचोटीला महत्त्व आहे. वैवाहिक जीवनातील या प्रामाणिकपणालाच चारित्र्य म्हणतात. म्हणून व्यभिचार हा अप्रामाणिकपणा ठरतो, आणि अप्रामाणिकपणा हा भूषणावह आहे असे कोणीच मानीत नाही. आर्थिक व्यवहारातील अप्रामाणिकपणा हा पाश्चात्त्य देशांत दुर्गुण मानला जातो, आणि या बाबतीत आपण भारतीय तुलनेने अद्याप फार कमी पडतो हे आपल्याला माहीत आहे, आणि ही गौरवाची गोष्ट आहे असे कोणी म्हणत नाही. साध्या पैशाच्या व्यवहारात ज्यांना खोटेपणा चालत नाही त्या या पाश्चात्त्य देशांतील आधुनिक प्रगत समाजाला वैवाहिक जीवनात प्रामाणिकपणा हवा हे आग्रहाने मांडावे, तो प्रामाणिकपणा येईल यासाठी पद्धतशीरपणे प्रयत्न करावा, असे का वाटत नाही ही एक नवलाची गोष्ट आहे. वैवाहिक जीवनात प्रामाणिक न राहणाऱ्या व्यक्तीच्या सामाजिक प्रतिष्ठेला धक्का बसावा, असे कसे घडत नाही?

उघड्यावर शृंगारिक चाळे करण्यापासून तो आपले वैवाहिक जीवन व्यभिचारी ठेवण्यापर्यंत पाश्चात्त्य देशांतील स्त्रीपुरुषसंबंधांचा हा विषय विस्तारत गेलेला आहे इतर अनेक क्षेत्रांतील त्यांची प्रगती आणि वैवाहिक चारित्र्याबद्दल बेफिकीर राहण्याची वृत्ती या दोहीचा मेळ कसा घालावा हे उलगडेनासे होते. वैवाहिक नीतिपरता हा संस्कृतीमधील फार महत्त्वाचा घटक आहे.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मू-प्रवास
दा. क्र.

त्या बाबतीत पाश्चात्त्यांचे वर्तन आणि भारतीयांचे वर्तन यांत गुणात्मक फरक आहे, हे नाकारता येणार नाही. पाश्चात्त्य समाजातील रात्रीचे जीवन कसेही असो, दिवसभरात आपले कर्तव्य ते चोखपणाने करतात हे आपण ध्यानात घेतले पाहिजे, असा एक भ्रामक गौरवपर युक्तिवाद केला जातो. आपापल्या कामात पाश्चात्त्य लोक तत्पर आहेत हा त्यांचा गुणच आहे, पण तो गुण रात्रीच्या विलासी जीवनाला मर्यादा न ठेवण्याचा परवाना ठरू शकत नाही. जी शिस्त आणि जो प्रामाणिकपणा आपापल्या कामात आहे, तशीच काही मूल्ये आणि त्यांचे पालन यांचा आढळ स्त्रीपुरुषांच्या व्यवहारातही व्हावयास हवा. व्यक्तिगत आणि सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवरील व्यवहारांची मिळून समाजाची संस्कृती ठरत असते.

भारताच्या दृष्टीने दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, पाश्चात्त्य लोकांची कर्तव्यनिष्ठा आपण उचलत नाही किंवा त्यांची शिस्त आणि स्वच्छता आपलीशी करीत नाही; पण त्यांचे मद्यपान आपण स्वीकारीत आहोत, त्याला प्रतिष्ठा प्राप्त करून देत आहोत, आणि त्यांचे स्त्रीपुरुषसंबंधांतील अनिर्बंध व्यवहार आपलेसे करीत आहोत, त्याचे बुद्धिवादावर आधारलेले समर्थन करण्याचा प्रयत्न करीत आहोत. राष्ट्रीय चारित्र्य किंवा सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकपणा हा भारतापुढचा आजचा महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला आहे. हा या थराला का आला? नीतिमूल्यांची पायमल्ली करण्यास सुरुवात झाली म्हणून आला. अजून व्यक्तिगत चारित्र्य तरी काही प्रमाणात आपल्याकडे तगून आहे असे म्हणता येते. तेही आपण उद्या पूर्ण गमावले, तर राष्ट्रीय चारित्र्य कशाच्या आधारावर आपण सुधारू शकू? हा विषय वाढवावा तेवढा थोडा आहे. पण तो आपल्या देशाच्या भवितव्याशी निगडित आहे, त्यामुळे त्याकडे अतिशय गांभीर्याने पाहिले पाहिजे असे वाटते.

## उघड्यावरचे शृंगारिक चाळे

समाज कसाही वागत असो आणि रूढ चालीरीती कशाही असोत, पण सिंहासनावर बसणाऱ्या व्यक्तीने आपले शील सांभाळले पाहिजे, ही अपेक्षा आजही आहे विवाहसंबंध फारशा गांभीर्याने न घेणाऱ्या इंग्लंडमध्ये असे असूनही व्यक्तींचे चव्हाट्यावरचे वागणे याला सर्वथा विरोधी का असावे, हा प्रश्न थोड्याच वेळात माझ्यासमोर उभा राहिला. बकिंगहॅम पॅलेससमोर ग्रीन पार्क आहे. नावाप्रमाणेच ते एक सुंदर हरित उद्यान आहे दिल्लीला शांतिवन हे मखमली हिरवळ आणि शोभिवंत वृक्षराजी यांनी नटलेले पंडित जवाहरलालांचे सुरेख स्मारक आहे. त्याच प्रकारचे हे ग्रीन पार्क होते. हिरव्यागार गवताची भूमी, तीवर अधूनमधून वृक्ष, आणि इकडून तिकडे जाणाऱ्या छान पायवाटा, असे हे रमणीय उद्यान होते. प्रवासी तर लंडनमध्ये येतच असतात. शेजारच्या भव्य कारंज्याजवळ त्यांचा मोठा समूह

उभा होता· पॅलेसच्या आसपासच्या मोठ्या रस्त्यांवरून भरपूर वर्दळ होती. एक वाजून गेला होता विजय आणि मी तेथील एका बाकावर बसलो आणि जेवणाचा डबा उघडला. कोणी वृद्ध, कोणी तरुण, तर कोणी स्त्रिया व त्यांच्याबरोबर लहान मुले अशी कितीएक माणसे उद्यानात फिरत होती.

पाश्चात्त्य समाजात एकमेकांचे चुंबन घेणे हा प्रेम वा वात्सल्य दाखवण्याचा किंवा निरोप घेण्याचा सर्वमान्य प्रकार आहे. याचे विशेष मानावे असे नाही. आपल्याकडे मातेने आपल्या बालकाचे चुंबन घ्यावे किंवा वडीलधाऱ्या माणसांनी लहान मुलांना कुरवाळावे, तसाच हा प्रकार असतो. हे दृश्य आतापर्यंत विमानतळावर व अन्यत्र पाहिले होते. पण समोर सहज लक्ष गेले, तर एक तरुणतरुणीची जोडी एकमेकांना बिलगून आडवी झाली होती. परस्परांत रमली होती. त्यांचे चाळे केवळ शृंगाराचे होते. हे सारे आता आपल्याकडे दूरदर्शनवरील चित्रपटांत इतक्या प्रकारांनी डोळ्यांसमोर येत आहे की, त्याचे काही वाटू नये इतपत प्रौढ माणसांची मने तरी बधिर होऊन गेली आहेत. पण समोरचे दृश्य प्रत्यक्षातील आणि सार्वजनिक ठिकाणी अनेक व्यक्ती आसपास येत-जात असतानाचे होते. त्या दोघा तरुणतरुणीच्या आलिंगनातील आवेग विलक्षण होता. एकमेकांच्या अंगावर वरखाली होण्याचे नाना प्रकार चालू होते. तरुण वयातील हा आवेग समजू शकतो; तो निसर्गसिद्ध आहे पण हे शृंगाराचे खेळ आपण चारचौघांसमोर करीत आहोत, याचा त्या दोघांना कोणताही संकोच नव्हता. तसा वाटण्याचे कारणही नव्हते, कारण पाश्चात्त्य समाजात याचे कोणी काही मानीत नाही. लहान मुले खेळत असतात, तसाच हा तरुण स्त्रीपुरुषांच्या क्रीडेचा भाग आहे, अशी याविषयीची समजूत असावी

पण लहान मुलांच्या खेळण्यात निरागसपणा असतो. हे समोरचे दृश्य वासनेचे उत्तान प्रदर्शन होते. कोणतीही वासना नैसर्गिक असली तरी ती कोठे आणि कशा प्रकारे तृप्त करून घ्यावी, याविषयीचे काही सर्वमान्य रीतिरिवाज असतात. पाश्चात्त्य देशांत या संदर्भातील दडक बराच शिथिल आहे, हे आपणा सर्वांना माहीत आहे. तरीही हे सारे असे उघड्यावर चारचौघांसमोर करण्यात कोणता सुसंस्कृतपणा आहे, हे ध्यानात येत नाही. बुद्धिवादी दृष्टीने पाहिले, तरी याला आणखी काही बाजू आहे. लहान मुलांचे एक वेळ ठीक आहे, त्यांना फार काही कळत नाही. पण जी मुले कौमार अवस्थेतून यौवनात पदार्पण करीत असतात, आणि अद्याप ज्यांचे तारुण्य शारीरिक दृष्ट्या पूर्णावस्थेला आलेले नसते, त्यांची वासना अशा दृश्यामुळे चाळवली जात नसेल यावर विश्वास बसणे कठीण आहे. त्यांच्या त्या उत्तेजित होणाऱ्या वासनेला योग्य वाट मिळण्याचा रस्ता नसतो आणि ती तृप्त करून घेण्याचा मार्ग त्यांना उपलब्ध नसेल, तर वैद्यकीय दृष्ट्या पाहता त्यांच्या मनावर त्याचा केवढा ताण येईल,

त्याचे शरीरावर कोणते परिणाम होतील, आणि ऐन तरुण वयात असे घडणे हितावह आहे का, याचा विचार बुद्धिवादाचे पुरस्कर्ते म्हणवणाऱ्या या समाजात कोणीच कसा करीत नाही, याचे मनाला आश्चर्य वाटते. सार्वजनिक ठिकाणी कोणीही अशा प्रकारचे चाळे करता कामा नयेत, असा कायदा करणे अवघड नाही, आणि हा समाज कायदा पाळणारा असल्यामुळे त्याचा निश्चितच उपयोग होईल.

विशिष्ट समारंभाला जावयाचे असले तर विशिष्ट वेष केला पाहिजे, आणि सर्वत्र प्रत्येक शिष्टाचार कटाक्षाने पाळला गेला पाहिजें, याबद्दल इंग्रज समाज अतिशय दक्ष आणि काटेकोर आहे. त्या शिष्टाचारात शृंगाराच्या या प्रकाराला आळा घालण्याचे गंभीरपणाने त्यांना कसे सुचत नाही, याचा उलगडा होत नाही. विवेक आणि संयम हे गुण सुसंस्कृत जीवनाचा विचार केला तर आवश्यक आहेत, किंबहुना साऱ्या सुसंस्कृतपणाच्या बुडाशी ती मूल्ये आहेत. कामवासना ही सर्वात बलवान आहे तिला संयमाची जोड अधिक असली पाहिजे. त्या संयमाला पूरक असे चारचौघांसमोरचे वर्तन असावे, अशी शिष्टाचाराची पद्धती मानली गेली पाहिजे. आपण भारतीय आपल्या कुटुंबात वाढतो. आपले आई आणि वडील घरात वावरत असताना आपण लहानपणापासून पाहात आलेलो असतो. पण ते जसे आपले आई आणि वडील आहेत, तसेच त्या दोघांतील नाते पती आणि पत्नी हे आहे. पण आपण त्यांच्या नित्य सहवासात असूनही हे आपल्या कधी ध्यानात येते काय? त्या उभयतांच्या शृंगारातूनच आपला जन्म झालेला आहे, हे आपण स्वतः विवाह केल्यावरही आपण मनात आणू शकत नाही, एवढेच नव्हे तर याआधीचे एक वाक्य एवढ्या स्पष्ट शब्दांत लिहिले गेलेले एखाद्याला योग्य वाटणार नाही, असा संस्कार आपल्या मनावर बालपणापासून घरातील एकंदर वातावरणाचा होत असतो. आपल्या कुटुंबातील पिता वयात आलेल्या मुलीलाही, अपवादात्मक प्रसग सोडले, तर स्पर्श करीत नाही. निष्काम बुद्धी कशी असू शकते याचे वर्णन करताना ज्ञानदेव ज्ञानेश्वरीत सहज वर्णन करून गेले आहेत, ''अगा आत्मजेचा विखीं। जीवु जैसा निरभिलाखी।'' म्हणजे कन्येच्या बाबतीत कोणीही सामान्य माणूस केवळ निरभिलाष असतो. तुकारामांचा उदगार आहे, ''पराविया नारी मातेसमान!''

स्त्रिया आणि पुरुष, किंवा मोठी मुले आणि मुली आपल्या समाजात एकमेकाला खेटून बसत नाहीत. अजूनही ती मर्यादा बऱ्याच प्रमाणात पाळली जात आहे. स्त्री आणि पुरुष यांच्या संदर्भात स्पर्श ही गोष्ट अतिशय संवेदनशील असते, आधी कळत नसले तरी ती केव्हाही वासनेच्या दिशेने जाऊ शकते. हे ध्यानात ठेवून आपल्या संस्कृतीमध्ये नेहमीच्या आचारातच तो दोर कापून टाकलेला आहे. त्यामुळे संयम आपोआप सांभाळला जातो. भारतात आज शिक्षण वाढत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. ते वाढणे आवश्यकच आहे.

पण ते वाढत असतानाच आपण आपला सुसंस्कृतपणाचा वारसा गमावून बसत आहोत, ही तितकीच चिंता करण्यासारखी गोष्ट आहे. एडस् या रोगाविरुद्ध भित्तिपत्रके लावून आजकाल प्रचार करावा लागत आहे, ही आपण आपले वैवाहिक चारित्र्य फार मोठ्या प्रमाणात गमावून बसलो आहोत, याची जाहिरात आहे. एखाद्या विवाहित स्त्रीला आपल्या मित्राबद्दल मनापासून जवळीक वाटली, तर त्याला आनंद देण्यासाठी मैत्रीण म्हणून आपले शरीर एखाद्या वेळी अर्पण करण्यास हरकत नाही, तो उत्कट मैत्रीचा एक आविष्कार मानता येईल; असे एका मासिकातील लेखात एका विवाहित स्त्रीने लिहिल्याचे एक वर्षापूर्वी वाचनात आले. तिच्या पतीला हे वाचून काय वाटेल असे भय मानण्याचे कारण नव्हते, कारण ती सुविद्य लेखिका हा लेख लिहिण्याच्या आधीच आपल्या पतीपासून वेगळी राहिली आहे हे माहीत होते. अशा युक्तिवादावर मौन पत्करण्याहून अधिक काहीही भाष्य करता येत नाही. ही दिशा आपण पाश्चात्त्यांकडून उचलली आहे.

एक जुलै १९९७ या दिवशीच्या महाराष्ट्र टाइम्सच्या अंकात एक बातमी प्रसिद्ध झाली. पुणे शहरात लैंगिक छळाच्या घटना वाढत आहेत, असा एका संस्थेने केलेल्या पाहणीचा निष्कर्ष त्या बातमीत होता. स्वयंसिद्धा या परित्यक्ता महिलांसाठी काम करणाऱ्या संस्थेने एक चर्चासत्र घेतले. त्यामध्ये पुण्यातील सोळा अशासकीय संघटना, वकील, न्यायाधीश, सामाजिक कार्यकर्ते व कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे हाताळणारे पोलीस सहभागी झाले होते. या तपशिलांवरून हे चर्चासत्र प्रातिधिक स्वरूपाचे होते असे म्हणता येते. कौटुंबिक नाती, सासू-सून किंवा नणंदभावजय, यांतील ताणतणावामुळे व अखेर पतिपत्नीमधील बेबनावामुळे नवविवाहित मुलीला त्रास होतो व तिचा छळही होतो., अशा घटना पूर्वापार चांगल्या चांगल्या घरांतून घडत आल्या आहेत. त्यामध्ये 'भारतीय सस्कृतीचा अभिमान वाटणाऱ्यांनीही समाधान मानावे असे काही नाही, हे सत्य नाकारण्याचे कारण नाही. अखेर माणसाचा स्वभाव व त्याच्या प्रवृत्ती या बलवत्तर असतात, त्यांना वळण देण्याचा प्रयत्न करावयाचा असतो इतकेच. त्यातही पती व पत्नी यांतील संबंध अतिशय नाजूक आणि गुतागुंतीचे असतात. कधीकधी असे वाटते की, आपल्याकडे शिक्षण मिळते, पण माणसाने जगावे कशासाठी, कोणत्या पद्धतीने, संपर्कात येणाऱ्या हरएकाशी वर्तन कसे ठेवावे, आणि सावधपणा व समजूतदारपणा यांना त्यात किती महत्त्व आहे, या विषयीचे मार्गदर्शन कोठेही मिळत नाही. हा संस्कार निरामय आणि संयमशील अशा कौटुंबिक वातावरणातील वडीलधाऱ्या मंडळीच्या वागण्यातूनच होऊ शकतो, आणि शिक्षक चांगले असतील तर तेथे होतो. पण आधुनिकतेच्या नावाखाली मुक्त वर्तनाचे समर्थन केले जाते. भोगप्रवण मुक्त वर्तन कोणत्या दिशेने जाते हे उपर्युक्त चर्चासत्रात आलेल्या लैंगिक छळ या शब्दप्रयोगावरून कळते. अशी प्रकरणे हल्ली

वाढत आहेत असे सांगून त्याचे कारण स्पष्ट करताना कौटुंबिक न्यायालयातील वरिष्ठ सल्लागार राजेन्द्र तित्तिर यांनी त्या चर्चासत्रात असे म्हटले की, इतर कारणांबरोबरच महत्त्वाचे कारण आहे ते केबल वाहिनीवरून रात्री उशिरा दाखवले जाणारे लैंगिक विषयावरील इंग्रजी चित्रपट होय. त्या चित्रपटातून संपूर्ण अवास्तव लैंगिक क्रीडेचे प्रदर्शन केले जाते. अपरिपक्व पुरुष त्याला बळी पडतात आणि त्यातून स्त्रीचा लैंगिक छळ होतो.

जर विवाहित पुरुषाच्या वासनेमुळे होणारा प्रक्षोभ या थराला पोचतो, तर यौवनात पदार्पण करणाऱ्या मुलामुलींवर, उघड्यावर चालणारे शृंगारिक चाळे पाहिल्यावर याचे अनिष्ट परिणाम होतील हे सांगण्याची अवश्यकता नाही. भारतीय संस्कृतीत वैवाहिक जीवनातील चारित्र्याला फार महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. आमची सारी आयुष्ये इतर स्त्रीपुरुषांची शय्यासोबत करण्यात गेली आहेत, असे विधान पाश्चात्त्य देशांतील एखादी उच्चपदस्थ व्यक्ती सहजपणाने करताना दिसते. त्या वेळी सत्यवचन हे मूल्य ती पाळत आहे याबद्दल आदर बाळगूनही, आपण व्यभिचारी आहोत, अशी सरळ कबुली देत असते हे दृष्टीआड करता येत नाही. असे तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, आणि जबाबदारीच्या पदांवरील अधिकारी ज्या समाजात आहेत, तेथे एका उदात्त मूल्याची विटबंना होत आहे, असे म्हणणे प्राप्त आहे. एवढे असूनही व्यभिचाराला मान्यता आहे असे म्हणता येत नाही. कारण राजघराण्यातील व्यक्तीकडून विशुद्ध चारित्र्याची अपेक्षा आहे.

तोच बकिंगहॅम पॅलेस मागच्या बाजूस होता, आणि समोर उघड्यावर चाललेले ते शृंगारिक चाळे पाहावयास मिळत होते. मानवी जीवन किती प्रकारच्या विसंगतींनी भरलेले आहे, असा विचार करीत जेवण संपवले, आणि ग्रीन पार्कचा निरोप घेतला. हे सारे लिहीत असताना अशा प्रकारची विसंगती वा व्यभिचार भारतीय समाजात आढळत नाही, असा दावा करण्याचा थोडासाही हेतू नाही. अखेर मनुष्य स्खलनशील आहे हेच खरे आहे. पण म्हणूनच संयम शिकवण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने भारतीय समाजात काही सर्वमान्य संकेत पूर्वापार चालत आले आहेत. अतिशय श्रीमंत वर्गात आणि अतिशय दरिद्री समाजात काही ना काही इकडेतिकडे असणार, पण सुसंस्कृत मध्यमवर्गाच्या वागण्यात कितीतरी प्रमाणात संयमाला स्थान आहे. माझे अमुक एका स्त्रीशी वा पुरुषाशी अनैतिक संबंध आहेत, हे उघडपणे चारचौघांत गर्वाने सागू शकणारी व्यक्ती आपल्याकडे आढळत नाही. उघड्यावर चालणारे शृंगारिक चाळे हे आपल्याकडे अजून तरी केवळ चित्रपटात दिसणारे दृश्य आहे तसे प्रत्यक्षात कोणी केले, तर त्याच्या समाजातील प्रतिष्ठेला धक्का बसतो. त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे चारित्र्यसंपन्न व्यक्तीला आपल्या समाजात मान आहे, त्याच्याबद्दल सर्वांना आदर असतो. पाश्चात्त्यांकडून आपण अनेक गोष्टी शिकणे आवश्यक आहे, पण

चारित्र्य ही गोष्ट अशी आहे की ती त्यांनी भारतीयांकडून शिकावयास हवी.

दुसरे महायुद्ध संपल्याची घोषणा झाली तेव्हाची एक प्रत्यक्ष घडलेली घटना आहे. सिलोनमधील एका लष्करी छावणीत काही भारतीय आणि काही ब्रिटिश अमेरिकन अधिकारी एकत्र मनमोकळेपणाने गप्पा मारत बसले होते. प्रत्येक जण घरी परत जाण्यास आतुर होऊन गेला होता. त्यामध्ये प्रस्तुत लेखकाचा एक मित्र होता. घरी गेल्यावर काय आढळेल याकडे पाश्चात्त्य अधिकाऱ्यांची चर्चा वळली. सारेजण मनमोकळेपणाने बोलत होते. काही आव आणावा वा लपवून ठेवावे असे कोणाच्या मनात नव्हते. सगळे विवाहित होते. एकदीड वर्षाच्या अवधीत घरी जाऊ न शकलेले कोणी कोणी होते. एका पाश्चात्त्याने भारतीयाला प्रश्न केला, ''तुम्ही घरी चालला आहात, तुमची पत्नी घरी असेल आणि मधल्या काळात तिचे कोणा पुरुषाशी संबंध आले नसतील अशी खात्री तुम्हाला वाटते?'' माझा मित्र म्हणाला, ''त्याबद्दल शंकाच नाही, तिचे कोणाशीही संबंध आलेला असणं तर अशक्य आहे आणि ती माझी सारखी वाट पाहात असणार.'' त्या पाश्चात्त्य अधिकाऱ्याचा विश्वास बसेना. तो म्हणाला, ''भाग्यवान आहात, आम्हा मंडळींना इतकी खात्री वाटत नाही, किंबहुना दरम्यान इकडंतिकडं काही घडून गेलं असणार असंच वाटतं. घरी जायचं, काय असेल ते खरं. तुमचा हेवा वाटतो.'' पण याची दुसरी बाजूही आहे की, या पाश्चात्त्य अधिकाऱ्यांनी कोणा स्त्रियांशी मधल्या काळात संबंध ठेवला नसेल अशी खात्री त्यांची पत्नीही देऊ शकत नसणार. म्हणजे हे उभयपक्षी झाले. दोन समाजातील चारित्र्यविषयक अंतर या साध्या घटनेत स्पष्ट होऊन गेले. यातील कोणते वर्तन अनुकरणीय याचा निर्णय करण्याचे व्यक्तिस्वातंत्र्य सर्वांना आहे.

### पॅलेस आणि पार्लमेंट

ग्रीन पार्कमधील त्या दृश्याने असे बरेच वादळ मनात उत्पन्न केले, हे खरे. पण अर्ध्या तासाने तेथून बाहेर पडलो आणि चित्त दुसऱ्या विषयांकडे वळले. पलीकडच्या रस्त्यावर गेलो, तर तेथे पादचारी मार्गावरील कठड्याला अडकवून ठेवलेली आणि एकावर एक रचून ठेवलेली नाना प्रकारची चित्रे होती. साध्या रंगातील चित्रांपासून तो तैलचित्रापर्यंत. त्यात अनेक निसर्गचित्रे अतिशय सुरेख होती. इंग्लंडमधील कॉन्स्टेबल हा चित्रकार निसर्गचित्रांसाठी गाजलेला आहे. मोठमोठ्या वृक्षावर अनेक फांद्यांवरून असलेली लहानमोठी पानेसुद्धा त्याच्या कुंचल्यातून जिवंत झालेली दिसतात. गेन्सबरो हा दुसरा सुप्रसिद्ध इंग्रज चित्रकार. लंडनमध्ये उत्कृष्ट चित्रसंग्रहालय आहे, वेळेअभावी तेथे जाणे शक्य झाले नाही. उत्तम कलाकृती फार सावकाशपणे पाहाव्या लागतात. पादचारी मार्गावरील ही चित्रे शांतपणाने पाहात गेलो. ते दोनशे फूट ओलांडण्यास आम्हाला अर्धा तास लागला.

थोडेसे अंतर चालून ट्राफलगार स्क्वेअरमध्ये आलो. हा चौक इंग्लंडच्या पराक्रमाचे स्मारक आहे. ट्राफलगारच्या सागरी युद्धात १८०५ साली इंग्लिश आरमाराने स्पेन आणि फ्रान्स यांच्या संयुक्त आरमाराचा पराभव केला, आणि समुद्रावरील आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या युद्धात पराभव झाल्यामुळे इंग्लंडवर स्वामित्व मिळवण्याच्या नेपोलियनच्या साऱ्या आशा धुळीला मिळाल्या. १८१५ साली वॉटर्लूच्या लढाईत नेपोलियनच्या पराभव करण्यात ड्यूक ऑफ वेलिंग्टनचा मोठाच भाग होता. तेथे नेपोलियनचे लष्करी पराक्रमाचे जीवन समाप्त झाले आणि इंग्लंडला कोणीही प्रतिस्पर्धी उरला नाही. पंधराव्या शतकाच्या अखेरच्या दशकात कोलंबस अटलांटिक महासागर ओलांडून अमेरिकेच्या किनाऱ्यावर उतरला, तो स्पेनच्या प्रोत्साहनातून, आणि त्यानतर काही वर्षात आफ्रिकेच्या दक्षिण टोकाशी असलेल्या केप ऑफ गुडहोपला वळसा घालून वास्को द गामा भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदरात उतरला तो पोर्तुगालच्या आश्रयाने. पूर्व आणि पश्चिम या दोन्ही दिशांवर आक्रमण करण्याचे दरवाजे युरोपसाठी यामुळे उघडले गेले.

या स्पर्धेत हळूहळू स्पेन आणि पोर्तुगाल याच्याबरोबर डच, फ्रेंच, आणि इंग्रज उतरले. पण सर्वाधिक यश मिळवले ते इंग्लंडने. त्याच्याशी स्पर्धा करण्यात नेपोलियनच्या पराक्रमामुळे फ्रान्स सर्वात अग्रेसर होता, पण तोही पराभूत झाला. त्यांतील एक महत्त्वाचा विजय तो ट्राफलगारचा. त्या लढाईतील विजयाचा शिल्पकार असलेला ॲडमिरल लॉर्ड नेल्सन धारातीर्थी पडला. भल्यामोठ्या उंच स्तंभावर नेल्सनचा पुतळा उभारलेला आहे. तो इतका उंचीवर आहे की खालून धड दिसतही नाही. त्याची दृष्टी आहे ती पार्लमेंटकडे जाणाऱ्या रस्त्याकडे, असे मला खालून पाहताना तरी वाटले. त्या छोट्याशा रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या रस्त्यावर असेच आणखी तीनचार पराक्रमी वीरांचे अश्वारूढ पुतळे उभे आहेत. त्या रस्त्यावरून पार्लमेंटकडे जात असताना डाउनिंग स्ट्रीटवर उजव्या हाताला थोड्या आतल्या बाजूस इंग्लंडच्या पंतप्रधानांचे निवासस्थान आहे. आश्चर्य वाटले ते असे की त्या रस्त्याच्या तोंडाशी पोलीस उभे होते आणि आत वळण्यास परवानगी नव्हती. लगेच भारताची आठवण झाली आणि इंग्लंडमध्ये तशी काही गडबड आज झाली आहे असे वाटले. त्या गजबजलेल्या भागातही सारे व्यवहार व्यवस्थितपणे चालू होते. सुमारे शंभर पावलांवर असलेले १० डाउनिंग स्ट्रीट या क्रमांकाचे ते घर स्पष्ट दिसत होते. इतिहासात ज्यांची नावे गाजली आहेत असे अनेक पतप्रधान तेथे राहून गेले ग्लॅडस्टन, बाल्डविन, अशी नावे आठवली.

मनात आले की, १७८३ साली केवळ चोविसाव्या वर्षी प्रंतप्रधान झालेला कर्तबगार विल्यम पिट येथेच राहिला असेल का? एवढा तरुण विल्यम पिट. तो पंतप्रधान झाला तेव्हा

भारतात इंग्रजांचा जम बसू लागल्याची खूण पटवणाऱ्या १७५७- मधील प्लासीच्या लढाईस केवळ सव्वीस वर्षे उलटली होती. त्याच काळाच्या सुमारास १७६१ च्या पानिपतावरील पराभवाचे अपयश धुऊन काढणारा पहिला माधवराव पेशवा झाला तेव्हा केवळ अठरा वर्षांचा होता आणि क्षयाच्या असाध्य रोगाचा बळी झाल्यामुळे सत्ताविसाव्या वर्षी तो हे जग सोडून गेला. त्याचे कर्तृत्व विल्यम पिटच्या तुलनेने कमी पडणारे होते असे नाही. पण व्यक्तिशः माधवरावाच्या बाबतीत हे म्हणता आले, तरी आपल्याकडचा एकंदर कारभार आणि इंग्रजांची शिस्तशीर व्यवस्था यांची तुलनाच होऊ शकत नाही. इंग्लडपासून समुद्रमार्गाने भारत सहा हजार मैल दूर होता, आणि इंग्लंडमधून भारतातील इंग्रज अधिकाऱ्यांना निरोप पोचण्यास दीड महिना लागत असे. ईस्ट इंडिया कंपनी मुळात व्यापाराकरिता स्थापन झाली. त्या कंपनीचे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स म्हणजे संचालक मंडळ होते. या मंडळापुढे प्रथम फक्त व्यापाराचे प्रश्न चर्चेसाठी येत, नतर भारतातील वखारीच्या रक्षणासाठी सैनिक ठेवण्याचा, त्यानंतर मोगलांच्या वतीने बंगालचा कारभार पाहण्याचा, आणि त्यानंतर मराठ्यांशी लढाई करण्याचा, आणि अखेर साऱ्या भारतावर राजकीय प्रभुत्व मिळवण्यासाठी कोणती पावले उचलावीत याचे निर्णय घेण्याचा, असे नाना प्रश्न येत गेले.

भारतातील परिस्थितीची तपशीलवार माहिती त्यांना तेथील इंग्रज अधिकारी कळवीत, संचालक मंडळात त्यावर विचारविनिमय होई, आणि तेथे होणारे निर्णय भारतात कळवले की, त्यांचे तंतोतंत पालन केले जाई. यात तसूभरसुद्धा चूक होत नसे. रॉबर्ट क्लाइव्हचे राजकीय चातुर्य आणि त्याचा रणांगणावरील पराक्रम या गोष्टी भारतात इंग्रजांना आपले राज्य स्थापन करण्यास प्राधान्याने उपयोगी पडल्या. पण त्याने कधी स्वतंत्र सुभेदार होण्याचा प्रयत्न केला नाही, किंवा मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथील इंग्रज अधिकाऱ्यांची परस्परांत कधी भांडणे झाली नाहीत. आपल्याकडील दृश्य नेमके उलट होते. माधवरावाला आपल्या सरदारांना कठोर शिस्त लावावी लागली, घरातील चुलता राघोबादादा याच्यावर लक्ष ठेवावे लागले, आणि आपल्या मामाला गैरवर्तनाबद्दल शासन केले तर आपल्या भावाला शिक्षा केली म्हणून प्रत्यक्ष आईने सारा जन्मभर दुरावा धरला. माधवरावाला किती सोसावे लागले हे यावरून कळेल. एक समाज आणि राज्यकर्ता वर्ग या दृष्टीने आपण इंग्रजांपेक्षा किती किती कमी होतो, हे एवढ्यावरून स्पष्ट होऊन जाते. त्यामुळे विल्यम पिट आणि माधवराव पेशवा या दोघापुरती तुलना करून काही उपयोग होत नाही. ते कसेही असो, पासष्टी उलटल्यावर पंतप्रधान झालेला विन्स्टन चर्चिल या डाउनिंग स्ट्रीटवरच राहात होता. साऱ्या जगावर परिणाम करणारे अनेक महत्त्वाचे निर्णय त्या त्या वेळी त्या त्या मुत्सद्द्यांनी जेथे घेतले, ते घर मी पाहत होतो. ते निर्णय मान्य करून घेण्यासाठी जेथे लोकांच्या प्रतिनिधींसमोर मांडले जात होते, ती ब्रिटिश

पार्लमेंटची इमारत समोरच थोड्या अंतरावर उभी होती. पावले तिकडे वळली.

ब्रिटिश पार्लमेंट. पंधराव्या शतकापासून सर्वात यशस्वी लोकशाही परंपरा जेथे जतन केली गेली, ते हे पार्लमेंट. साम्राज्य उभे करणे हा इंग्लंडचा रणांगणावरील पराक्रम, तर लोकशाही राज्यशासन सुव्यवस्थिपणे चालवणे ही त्यांच्या असामान्य कर्तृत्वाची दुसरी बाजू. इंग्रजांच्या बुद्धीची सारी परिपक्वता या पार्लमेंटमध्ये विकसित होत आली. त्या इमारतीला जागतिक इतिहासाच्या विशाल पटावरही एका मर्यादित कालखंडापुरते तरी फार मोठे महत्त्व आहे. प्रचंड साम्राज्याचा कारभार चालवणे ही सोपी गोष्ट नाही. ती प्रथम रोमन साम्राज्यात दिसते. ते साम्राज्य अस्तंगत कसे झाले त्याचा गिबनने लिहिलेला इतिहास जगविख्यात आहे. कालाच्या ओघात ब्रिटिशांचे साम्राज्यही लोप पावले, पण एकेक देश आपल्या आधिपत्याखालून जाऊ देतानाही इंग्लंडने आपली प्रतिष्ठा जपली. शंभर वर्षापूर्वी चीनशी केलेला नव्याण्णव वर्षाचा करार प्रत्यक्षात उतरवण्याचा क्षण याच वर्षातील जून महिन्याच्या शेवटच्या मध्यरात्री बरोबर बारा वाजता पार पडला. हॉगकॉंग चीनच्या स्वाधीन करण्याचा तो समारंभ जगातील कोट्यवधी लोकांनी दूरदर्शनवर पाहिला. आपल्या देशापासून पृथ्वीच्या बरोबर उलट बाजूस असलेला तो साम्राज्याचा छोटासा तुकडा ब्रिटिशांनी चीनच्या हवाली केला आणि ते जणू एका डौलात परत गेले. त्या त्या राष्ट्राच्या इतिहासात असेही काही गौरवाचे भाग असतात. इंग्लंडने या लोकशाही परंपरा जागवणाऱ्या पार्लमेंटच्या इमारतीत असे साम्राज्यविषयक निर्णयही घेतले. नियतीप्रमाणेच इतिहासाचीही ही एक लीला वाटते.

तसेच नवल आणखी एका गोष्टीचे वाटले. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने कित्येक महिने लंडनवर सतत बॉंबहल्ले केले. प्रचंड प्रमाणात इमारती उद्ध्वस्त झाल्या. पण बकिंगहॅम पॅलेस आणि ही पार्लमेंटची इमारत त्यातूनही सुरक्षित राहिली. मोठ्या कौतुकाने मी काही वेळ त्या उत्तुंग इमारतीकडे पाहात उभा होतो. तिचे वास्तुशिल्पही वेगळ्या प्रकारचे आहे. उत्तर दिशेच्या बाजूस असलेल्या तीनशेवीस फूट उंचीवरचे बिगबेन घड्याळ वेळ दाखवीत होते. उलट दिशेला उंच व्हिक्टोरिया टॉवर उभा होता. आठ एकराच्या विसतीर्ण भूमीवर पसरलेल्या या इमारतीचा इतिहास सातशे-आठशे वर्षे मागे जातो. मुळात ही राजघराण्याच्या वास्तव्याची जागा होती. आता त्यातील जवळजवळ काहीही शिल्लक नाही, कारण १८३४ साली मूळ वास्तू आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. तीन वर्षांत नवीन इमारत बांधण्याच्या कामास सुरुवात झाली, पण ती पुरी होण्यास १८८८ साल आले. आताच्या या इमारतीला एकशेदहा वर्षे पूर्ण होत आहेत. हा तपशील समोर येताच चर्चिलची आठवण झाली. त्याने आपला हात उंचावून या पार्लमेंटचा निरोप घेतला, तेव्हाचे त्याचे छायाचित्र वृत्तपत्रात पाहिले होते. त्या वेळी या इमारतीस पंचाहत्तर वर्षे झाली नव्हती, पण चर्चिलच्या

पार्लमेंटची इमारत समोरच थोड्या अंतरावर उभी होती. पावले तिकडे वळली.

ब्रिटिश पार्लमेंट. पधराव्या शतकापासून सर्वात यशस्वी लोकशाही परपरा जेथे जतन केली गेली, ते हे पार्लमेंट. साम्राज्य उभे करणे हा इंग्लंडचा रणांगणावरील पराक्रम, तर लोकशाही राज्यशासन सुव्यवस्थितपणे चालवणे ही त्यांच्या असामान्य कर्तृत्वाची दुसरी बाजू. इंग्रजांच्या बुद्धीची सारी परिपक्वता या पार्लमेंटमध्ये विकसित होत आली. त्या इमारतीला जागतिक इतिहासाच्या विशाल पटावरही एका मर्यादित कालखंडापुरते तरी फार मोठे महत्त्व आहे. प्रचंड साम्राज्याचा कारभार चालवणे ही सोपी गोष्ट नाही. ती प्रथम रोमन साम्राज्यात दिसते. ते साम्राज्य अस्तगत कसे झाले त्याचा गिबनने लिहिलेला इतिहास जगविख्यात आहे. कालाच्या ओघात ब्रिटिशांचे साम्राज्यही लोप पावले, पण एकेक देश आपल्या आधिपत्याखालून जाऊ देतानाही इंग्लंडने आपली प्रतिष्ठा जपली. शंभर वर्षांपूर्वी चीनशी केलेला नव्याण्णव वर्षांचा करार प्रत्यक्षात उतरवण्याचा क्षण याच वर्षातील जून महिन्याच्या शेवटच्या मध्यरात्री बरोबर बारा वाजता पार पडला. हॉंगकॉंग चीनच्या स्वाधीन करण्याचा तो समारंभ जगातील कोट्यवधी लोकांनी दूरदर्शनवर पाहिला. आपल्या देशापासून पृथ्वीच्या बरोबर उलट बाजूस असलेला तो साम्राज्याचा छोटासा तुकडा ब्रिटिशांनी चीनच्या हवाली केला आणि ते जणू एका डौलात परत गेले. त्या त्या राष्ट्राच्या इतिहासात असेही काही गौरवाचे भाग असतात. इंग्लंडने या लोकशाही परंपरा जागवणाऱ्या पार्लमेंटच्या इमारतीत असे साम्राज्यविषयक निर्णयही घेतले. नियतीप्रमाणेच इतिहासाचीही ही एक लीला वाटते.

तसेच नवल आणखी एका गोष्टीचे वाटले. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने कित्येक महिने लंडनवर सतत बॉंबहल्ले केले. प्रचंड प्रमाणात इमारती उद्‌ध्वस्त झाल्या. पण बकिंगहॅम पॅलेस आणि ही पार्लमेंटची इमारत त्यातूनही सुरक्षित राहिली. मोठ्या कौतुकाने मी काही वेळ त्या उत्तुंग इमारतीकडे पाहात उभा होतो. तिचे वास्तुशिल्पही वेगळ्या प्रकारचे आहे. उत्तर दिशेच्या बाजूस असलेल्या तीनशेवीस फूट उंचीवरचे बिगबेन घड्याळ वेळ दाखवीत होते. उलट दिशेला उंच व्हिक्टोरिया टॉवर उभा होता. आठ एकरांच्या विसतीर्ण भूमीवर पसरलेल्या या इमारतीचा इतिहास सातशे-आठशे वर्षे मागे जातो. मुळात ही राजघराण्याच्या वास्तव्याची जागा होती. आता त्यातील जवळजवळ काहीही शिल्लक नाही, कारण १८३४ साली मूळ वास्तू आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. तीन वर्षात नवीन इमारत बांधण्याच्या कामास सुरुवात झाली, पण ती पुरी होण्यास १८८८ साल आले आताच्या या इमारतीला एकशेदहा वर्षे पूर्ण होत आहेत. हा तपशील समोर येताच चर्चिलची आठवण झाली. त्याने आपला हात उंचावून या पार्लमेंटचा निरोप घेतला, तेव्हाचे त्याचे छायाचित्र वृत्तपत्रात पाहिले होते. त्या वेळी या इमारतीस पंचाहत्तर वर्षे झाली नव्हती, पण चर्चिलच्या

तेथील सदस्यत्वाची पन्नास वर्षे पूर्ण झाली होती. हाही एक विक्रमच म्हणावयास हवा.

सावकाशपणे चालत आम्ही थेम्स नदीच्या तीरावरील एका बाकावर जाऊन बसलो. समोरून त्या नदीचा प्रवाह चाललेला होता. माझ्या डोळयांसमोरून वीस ते पंचवीस या वयात वृत्तपत्रांतून वाचलेला दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास सरकत होता. लंडनवर शेकडो विमाने बाँबचा वर्षाव करीत. नागरिक बहुसंख्येने भुयारी लोहमार्गाच्या भागात आसरा घेत. आठदहा वर्षांची मुले आकाशातून पडणाऱ्या विध्वंसक अस्त्रांकडे डोळे विस्फारून पाहात आहेत, लहान बालकांना आयांनी आपल्या उराशी कवटाळून धरले आहे, त्यांच्या चेहऱ्यांवरील चिंतेच्या रेषा स्पष्ट दिसत आहेत, अशी कैक छायाचित्रे या युद्धाचा इतिहास सांगणाऱ्या इतिहासात आपण आजही पाहू शकतो. काही क्षणांनंतर आपण असू की नसू असे प्रत्येकाला वाटत असे आपले घर उद्ध्वस्त झाले असले तरी इंग्रज माणूस सकाळी ठरल्यावेळी आपल्या कामाला जाई सध्याकाळी तो परत येईल की नाही याची शाश्वती पत्नीला नसे, आपण कार्यालयातून परत येईतो घराची माणसे सुखरूप असतील अशी पुरुषांना खात्री नसे आणि मुलांबाळासह पत्नी व आपण संध्याकाळी एकत्र असलो, तरी रात्रीच्या बाँबच्या वर्षावात सकाळपर्यंत काय घडेल याची धास्ती असे. अशा भयग्रस्त आणि शंकाकुल वातावरणात या लंडनमधील नागरिकांनी १९४० हे संपूर्ण वर्ष व पुढच्या वर्षातील काही महिने फार मोठ्या चिंतेत काढले. पण या नागरिकांचे मनोधैर्य कधी खचले नाही त्यांचा नेता खंबीर होता, तशीच त्याच्यामागे उभी असलेली जनता खंबीर होती. अशा अनुभवांतून जावे लागणे हाही समाजाच्या जीवनात त्याला बरेच काही शिकवून जाणारा भाग असतो. सारी युरोपीय राष्ट्रे या अग्निपर्वातून दोन वेळा गेली आहेत

आपल्या देशाला असा कोणताही अनुभव घ्यावा लागलेला नाही. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, ते दुसऱ्याच कोणी परस्परांत केलेल्या जागतिक युद्धामुळे. सुभाषचन्द्रांच्या आझाद हिंद सेनेचा छोटा अपवाद वगळता आपण स्वातंत्र्यासाठी हातात शस्त्र घेऊन केलेल्या युद्धामुळे नाही. त्यामुळे त्या प्रसंगातून जाताना मन अस्वस्थ करणारा जो एक विदारक आणि त्याच वेळी पराक्रमाला स्फुरण आणणारा स्फूर्तिदायक अनुभव मिळतो, त्याला आपण पारखे राहिलो आहोत. चीनने आपल्यावर १९६२ साली अवचित आक्रमण केले, तर अशा प्रसगात नेमके काय करावे हे आपल्या केंद्र शासनातील मोठमोठ्या नेत्यांना नीटसे कळेना, आणि भांबावून गेल्यासारखी त्यांची अवस्था झाली, अशा कथा कानांवरून गेल्या आहेत. पाकिस्तानशी युद्धे झाली, आपण त्यांत विजयही मिळवला. सारा देश त्या वेळी एकत्र येऊन उभा राहिला. पण सीमेवरचा थोडा भाग सोडला, तर आपल्या देशाला युद्धकालीन भीषण अवस्थेचा व तीमध्येही कर्तव्यदक्ष राहण्याचा अनुभव आलेला नाही. युद्ध ही मानवी संस्कृतीला लांछनास्पद गोष्ट

आहे, यात शंका नाही राष्ट्रभक्ती ही तिला कारणीभूत होते, म्हणून आपल्या देशावर प्रेम करणे व त्यापोटी इतर राष्ट्राबद्दल शत्रुभाव धारण करणे ही गोष्ट त्याज्य आहे किंबहुना तिरस्करणीय आहे, असे टॉलस्टॉयने म्हटले आहे. महात्मा गांधी विश्वबंधुत्वाचे पुरस्कर्ते होते. अंतिम ध्येय या दृष्टीने हे विचार अतिशय मोलाचे आहेत. पण तरीही कठोर वास्तवाकडे दुर्लक्ष करून चालत नाही. युद्धाची वेळ आली तर आपण सज्ज असले पाहिजे, तो अनुभव घेण्याची मनाची तयारी पाहिजे. इंग्लंडने हा अनुभव पुरेपूर घेतला आहे. त्याचबरोबर त्यांच्या आताच्या पिढीच्या मागे ब्रिटिश साम्राज्याच्या विस्तारातील शौर्याची गाथा आहे, तशीच लोकशाही जपण्याची एक जागती परंपराही आहे. पार्लमेंटची ती इमारत या साऱ्या इतिहासाची साक्षीदार होती.

आठवण झाली रीडर्स डायजेस्टमध्ये काही वर्षापूर्वी वाचलेल्या एका कथेची. एक अमेरिकन मनुष्य इंग्लंडमध्ये आला होता. एका इंग्रज माणसाने त्याला पार्लमेंटची इमारत दाखवली. ते दोघे आपापल्या देशाच्या इतिहासाबद्दल काही काही बोलत थेम्स नदीच्या तीरावर उभे राहिले. अमेरिका म्हणजे प्रत्यक्षात अर्धे खंड आहे. तिचा विस्तार इंग्लंडच्या पंचवीसतीस पट तरी असेल. तेथील मिसिसिपी नदी, नायगारा धबधबा, आणि ग्रॅंड कॅनियन ही विस्तीर्ण खोल दरी, हे सारे निसर्गाचे वैभव इंग्लंडच्या तुलनेने प्रचंड आहे. हे सारे मनात आल्यामुळे समोरच्या थेम्स नदीकडे पाहात तो अमेरिकन म्हणाला, ''ही थेम्स नदी किती लहान आहे, आमची मिसिसिपी प्रचंड आहे.'' उगमापासून अखेरच्या मुखापर्यंत मिसिसिपीचा प्रवाह जवळजवळ पाच हजार किलोमीटर अंतर कापत जातो. थेम्स दोनशेतीनशे किलोमीटर असेल नसेल. पण तो इंग्रज मनुष्य म्हणाला, ''होय, मिसिसिपी प्रचंड आहे हे खरं, पण ती एक नदी आहे. थेम्स हा वाहता इतिहास आहे.'' स्वदेशाचा अभिमान व्यक्त करणारे हे त्या इंग्रज माणसाचे उद्गार खरे होते. थेम्सच्या तीरावर पार्लमेंटची भव्य इमारत उभी होती. इंग्लंडने प्रस्थापित केलेल्या लोकशाहीतील संकेतांचे आणि ब्रिटिशांच्या प्रचंड साम्राज्याचे प्रतीक असे ते पार्लमेंट होते. त्या पार्लमेंटमध्ये ज्या ऐतिहासिक घटना घडल्या, त्यांची साक्षीदार अशी ती थेम्स नदी होती. या तुलनेने अमेरिकेचे ऐतिहासिक संचित फार बेताचे होते. शिवाय युरोपातून अमेरिकेत वसाहत करण्यासाठी नाना देशांतील लोक गेले असले, तरी तेथे अखेर सर्वात अधिक प्रभाव राहिला तो इंग्रजांचा. इंग्लंडमधून तिकडे गेलेल्या लोकांनीच त्या देशाला आकार दिला. ज्यासाठी पुढे अमेरिकेने युद्ध केले ते राजकीय स्वातंत्र्य आणि देशाचा लोकशाही कारभार हा वारसा त्यांना इंग्लंडच्या इतिहासातूनच मिळाला होता. तेव्हा इंग्रज माणसाचा उद्गार सार्थ होता.

पण आपल्याकडेही गंगा या नावाची एक नदी आहे, आणि तिचा प्रवाह हा केवळ श्रीरामचन्द्राच्या पुराणकथेचा, मगध साम्राज्याचा वा सम्राट चन्द्रगुप्ताच्या पराक्रमाचा साक्षीदार नाही, तर उपर्युक्त इंग्रज माणसाच्या भाषेत तो या देशाच्या प्राचीन संस्कृतीचा सतत वाहत राहिलेला प्रवाह आहे. हरिद्वारला दररोज संध्याकाळी गंगानदीची आरती केली जाते. नदीला लोकमाता मानतात. तिची आरती ही केवढी उदात्त आणि कृतज्ञतेचा सामूहिक भाव व्यक्त करणारी कल्पना आहे! त्या दररोजच्या आरतीच्या वेळी तेथील विस्तीर्ण घाटांवर, पुलावर आणि पायऱ्यांवर भारताच्या साऱ्या प्रांतांतून आलेले यात्रेकरू दाटीवाटीने उभे असतात. सारी धार्मिकता बाजूला ठेवली, तरी यामध्ये केवढा राष्ट्रीय आणि सांस्कृतिक आशय भरून राहिलेला आहे! जगात आणखी कोठे असे दृश्य आढळते काय?

आपण रास्तपणाने अभिमान धरावा असे आपल्या भारतात कितीतरी आहे. साऱ्या युरोपीय देशांतील संस्कृतीचा उगम ग्रीसच्या प्राचीन इतिहासात शोधला जातो. भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र, नागरिकनीती येथपासून तो तर्कशास्त्र, नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञान येथवर अनेकानेक शास्त्रांची प्राथमिक मांडणी अथेन्सच्या परिसरात आणि प्लेटोच्या ॲकॅडेमीत झाली. जग जिंकू पाहणाऱ्या अलेक्झांडरशी त्याचा गुरू म्हणून अनेक शास्त्रांवर पहिले ग्रंथ लिहिणाऱ्या ॲरिस्टॉटलचे नाव जोडले गेले आहे. सॉक्रेटिसचे नाव तर एक श्रेष्ठ तत्त्ववेत्ता म्हणून विख्यात आहे. ग्रीसमधील ज्ञानाच्या क्षेत्रातील या साऱ्या घडामोडी झाल्या, त्याच्या आधी दोनशे वर्षे गौतमबुद्धाचा काळ येतो, आणि त्याच सुमारास आज आपल्यासमोर असलेले महाभारत हे जगातील सर्वश्रेष्ठ महाकाव्य पूर्णतेला पोचले. चाणक्याचे अर्थशास्त्र त्यानंतर थोड्या काळात झाले, तर जगातील कोणत्याही भाषेचे व्याकरण ज्याच्या अष्टाध्यायीचा आदर्श समोर ठेवून लिहिता येईल, असे पाश्चात्त्य देशांतील आजचे भाषाशास्त्रज्ञ म्हणतात तो पाणिनी बुद्धापूर्वी दोन शतके झाला. त्याच्या मागे तीनशे-चारशे वर्षे गेले, तर भारतीय युद्धाचा काळ येतो. कुरुक्षेत्रामधील सरोवराच्या तीरावर उभे राहताना त्या सरोवरात श्रीकृष्ण आणि पांडव यांनी स्नान केल्याची कथा आठवेल, आणि मग त्या पाण्याला स्पर्श करताना अंगावर रोमांच उभे राहतील.

या परिसरातच कोठेतरी श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेचा उपदेश केला. त्या गीतेतील काही वचनांचे साम्य बायबलमधील येशू ख्रिस्ताच्या उद्‌गारांशी आहे, तर तत्त्वज्ञानविचारातील सांख्यविचाराचा धागा आधुनिक वैज्ञानिक विचारप्रणालीशी आणि योगाचा धागा एकीकडे मानसशास्त्राशी तर दुसरीकडे अध्यात्मात पोचणारा आहे. साऱ्या जगातील अनेक विचारवंत आजही गीतेमुळे प्रभावित झाले आहेत, तर त्या गीतेतील उद्‌गारांवर ज्यांची छाया आहे त्या

उपनिषदांतील उत्स्फूर्त उद्‌गार थेट मानवाच्या मूळ स्वरूपाशी आणि विश्वाच्या आदितत्त्वाशी जाऊन भिडणारे आहेत. त्याआधीच्या वेदांकडे वळले, तर त्यात निसर्गदेवतांची प्रार्थना आढळेल, उषासूक्तात सूर्योदयापूर्वीच्या आकाशातील सौन्दर्याची जाणीव दिसेल, यमयमीसंवाद मानवी व्यवहारातील एक वेगळा पैलू दाखवेल, तर नासदीय सूक्तामध्ये तत्त्वविचारांची एवढी उत्तुंग झेप आढळेल की तेथवर आजवर कोणीही तत्त्वज्ञ पोचू शकलेला नाही असे क्षणभर वाटून जाईल. हे विश्व जाणणारा असा जो मानव तो कोण आहे, आणि सारे काही जो जाणून घेत असतो त्या जाणणाऱ्याला कशाच्या साहाय्याने जाणून घ्यावयाचे, असे उपनिषदात विचारले गेलेले प्रश्न पाहिले, तर तीनसाडेतीन हजार वर्षांपूर्वी भारतीयांची बुद्धी किती गहन विषयांचा सूक्ष्म शोध घेत होती, या विचाराने मनात विस्मय दाटून येईल

त्या प्राचीन ग्रंथांत सत्य काय आहे त्याविषयीची जिज्ञासा आहे, मानवी जीवनात मंगल आणि कल्याणकारक असे काय आहे त्याचा वेध घेण्याचा बुद्धीने केलेला प्रयत्न आहे, आणि त्याच वेळी हिमालयाच्या प्रदेशातील निसर्गाची भव्य रूपे व आकाशात रात्रीच्या वेळी झगमगणाऱ्या तारका यातील सौन्दर्याने पुलकित होऊन जाणाऱ्या मनाचे उन्मेष आहेत. याच उपनिषदांत गार्गी आणि मैत्रेयी अशा तत्त्ववेत्त्या स्त्रिया भेटतात, आणि महाभारतात पतीला जाब विचारणारी तेजस्वी द्रौपदी आणि पतीला वाचवण्यासाठी साक्षात यमधर्माशी संवाद करणारी सावित्री आढळते. ख्रिस्ताच्या जन्मापूर्वी हजार वर्षाच्या काळातील या भारतातील स्त्रिया आहेत. स्त्रीजातीचे हे उदात्त, त्यागशील आणि स्वाभिमानाचे वैभव जगात अन्यत्र कोठे आढळते काय? तेथे सौन्दर्याची भुरळ घालणारी क्लिओपात्रा भेटते, किंवा हेलन भेटते. त्या सौन्दर्याचा एक वेगळा आविष्कार भारतातील स्त्रियांतही आहे. येथील कोणीकोणी राज्यकन्या नृत्य आणि गायन या कलांत निपुण होत्या. वीणेवर मधुर स्वर काढणारी स्त्री कालिदासाच्या शाकुंतल नाटकात आहे.

भूप, केदार, कल्याण, मल्हार, अशी संगीतातील रागांची नावे किंवा षड्‌ज, गंधार, पंचम, आदी सुरांचे सात भेद, त्यांतील तीव्र आणि कोमल हे प्रकार, या सर्वांची भिन्नभिन्न रचना करून उभे केलेले संगीताचे विश्व; किंवा आकाशातील तारकासमूहांना स्वाती, सप्तर्षी, कृत्तिका, रोहिणी, विशाखा, किंवा मृगशीर्ष अशी दिलेली सुंदर नावे मनात रुंजी घालणारी आहेत. हिमालय हे पर्वताचे, तर नंदादेवी, कांचनगंगा, गौरीशंकर ही त्याच्या हिमधवल शिखरांची नावे किती सुंदर आहेत. बद्रीनाथ, केदारनाथ, कर्णप्रयाग किंवा रुद्रप्रयाग अशी स्थानांची आणि मंदाकिनी किंवा अलकनदा ही नद्यांची नावे किती वेध लावणारी आहेत. कृष्णा, कावेरी, नर्मदा, तुंगभद्रा, किवा श्रीशैल, गोकर्ण, कन्याकुमारी हे असेच वैभव दक्षिण भारतात आहे. भारतीय मनाचे हे सारे सौदर्यविश्व भोवतालच्या निसर्गाला, मस्तकावरच्या

आकाशाला, आणि त्याच्या दर्शनाने जाग्या होणाऱ्या आंतरिक भावनाव्यापाराला व्यापून राहिले आहे. ही सारी भारतीयांच्या रसिकवृत्तीची साक्ष पटवणारी भांडारे आहेत.

मनाची आणि बुद्धीची एवढी सूक्ष्म स्पंदने आणि अशा उत्तुंग भराऱ्या जगातील आणखी कोणा मानवकुलात एकत्रित आढळतात काय? याच्याच जोडीने अरण्यातील आश्रमात राहून तत्त्वचिंतन करणारे वसिष्ठ, वालमिकी आणि अगस्ती, यांच्यासारखे ऋषी आहेत; तर भरत, दिलीप, चंद्रगुप्त, हर्षवर्धन, किंवा विक्रमादित्य असे प्रजाहिततत्पर भूपती आहेत. गंगायमुनांच्या तीरावरून फिरताना किंवा लुप्त झालेल्या सरस्वतीचा शोध घेताना हे सारे आपल्याला आठवणार नाही काय? माहीत असेल तर आठवेल, इतिहास जाणून घेतला तर माहीत होईल, तो इतिहास पुढील पिढीला शिकवला तर त्यांच्या मनात आत्मगौरवाचा भाव निर्माण होईल, आणि जगातील कोणत्याही देशात फिरताना त्यांची मान ताठ राहील, तर दृष्टीत आत्मविश्वास असेल. आपण स्वतंत्र झाल्यानतर असा काही आत्मशोध घेणे आवश्यक होते, पण ते अद्यापही घडत नाही.

निरनिराळ्या देशांतून आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणारे शासकीय अधिकारी असतात. त्यांना आपल्या देशाचा हा अभिमानास्पद वारसा माहीत असावा, किंवा विदेशातील लोकांशी त्यांच्या होणाऱ्या अनौपचारिक संवादांत त्याची खूण पटेल असा अभिमानाचा हुंकार उमटावा, अशी त्यांच्या प्रशिक्षणाची काही व्यवस्था करावी, हेही आपल्याला अद्याप सुचलेले नाही. ब्रिटिश येथून गेले एवढीच स्वातंत्र्याची खूण आपल्याजवळ आहे. आमची पिढी शाळेत शिकत असताना ब्रिटिश रियासत, मराठा रियासत, आणि मोगल रियासत असा इतिहास शिकत होती, आणि तो इतिहास बाबराच्या आक्रमणाशी थांबत होता, त्याच्या आधीच्या कालखंडाचा मागोवा घेत नव्हता. स्वतःच्या देशासंबंधी शाळेत एवढेच कानांवर पडत होते. त्याचबरोबर ट्यूडर, स्टुअर्ट, किंवा हॅनोव्हर अशा इंग्लंडमधील राजांच्या घराण्यांची नावे पाठ करावी लागत असत, त्या नावांचा काहीही अर्थबोध होत नसे, आणि यांच्याशी आपला संबंध काय तेही कळत नसे. आणखी एक योगायोग कसा की नेमका हाच सारा मध्ययुगीन इतिहासाचा कालखंड भारताच्या अवनतीचा होता, तर त्याच वेळी तो इंग्लंडच्या पराक्रमाचे दर्शन घडवणारा होता.

### इतिहासाचा वारसा आणि इंग्रज माणूस

पण इंग्लडचा हा गौरवशाली इतिहास भूतकालात फार मागे जातो असे नाही. अमेरिकेचा सारा मिळून तो पाचशे वर्षांचा आहे. ज्याबद्दल इंग्लंडला अभिमानाने बोलता येईल तो इतिहास साकार होण्याचा प्रारंभ जेथे झाला तेथवर पोचले, तरी तो काळ आठशे वर्षांहून अधिक भरत नाही. बाराशे वर्षांपूर्वीचे इंग्लंड रानटी अवस्थेतून बाहेर पडत होते.

इंग्लंड, स्कॉटलड, आयर्लंड, आणि वेल्स हे चार प्रमुख भाग एकत्र येऊन ग्रेट ब्रिटन या नावाने हा देश आकाराला आला, त्याला केवळ तीनशे वर्षे झाली. या सर्वात प्रभुत्व राहिले ते इंग्लंडचे, स्कॉटलंडने जमवून घेतले पण त्यांची वेगळी अस्मिता आजही टिकून आहे, आणि आपल्याला अधिक स्वायत्तता हवी म्हणून आयर्लंड सतत झगडत राहिला होता. इमॉन डी व्हॅलेरा हा आयर्लंडचा नेता आणि टेरेन्स मॅक्स्विनी हा अन्नत्याग करून तुरुगात प्राणार्पण करणारा हुतात्मा हे आमच्या पिढीने तरुण वयात रोमांचित होऊन पाहिले आहेत. जितके आकर्षण इटलीतील मॅझिनी आणि गॅरिबॉल्डी यांचे होते, तितकेच आयर्लंडच्या या दोन झुंझार व्यक्तिमत्त्वांचे होते. पण कसेही असो, ग्रेट ब्रिटनचे हे चार भाग एकत्रित आहेत आणि तसे असूनही त्यांच्यांतही वाद होत राहिले आहेत. तेव्हा भारतासारख्या चौदापंधरा प्रमुख प्रांतांत भाडणे आहेत, किवा क्वचित दुरावा आहे, यात आश्चर्य नाही. भाषा आणि वंश यांचे भेद बाजूला सारून एकत्र येणे हे भिन्न भिन्न मानवसमूहांना सोपे गेलेले नाही, याला जगाचा आजवरचा इतिहास साक्ष आहे

पण आठशे हजार वर्षापूर्वीच्या कालखंडात थोडे मागे गेल्यावर साडेतीनशे वर्षे रोमन साम्राज्याखाली असले, आणि त्याच्यापूर्वी सर्वत्र अंदाधुंदी व परस्परकलह असले, तरी गेल्या पाचशे वर्षाचा इंग्लंडचा इतिहास फार मोठ्या पराक्रमाचा व विश्वविजयाचा आहे त्याची मूळ सुरुवात झाली ती सन १२१५-मध्ये रविमीड येथे किंग जॉन याने बंडखोरांसमोर शरणागती पत्करून मॅग्नाचार्टावर स्वाक्षरी केली त्या घटनेशी. त्यानंतरच्या अनेक उलटसुलट घटना आहेत. त्यात लोकांचे अधिकार प्रस्थापित करण्यासाठी सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात चार्ल्स राजाचे शिर धडावेगळे करण्याचे भीषण कृत्य आहे, ऑलिव्हर क्रॉमवेलचा पराक्रम आहे, अकरा वर्षाचा कालखंड गेल्यावर राजपदाची पुनः प्रतिष्ठापना झाली आहे, रोमच्या पोपची सत्ता झुगारून दिली आहे. प्रॉटेस्टंट पंथाचाच राजा सिंहासनावर असेल अशी तरतूद केली गेली आहे, आणि एकीकडे राजवंशाचा मान तर दुसरीकडे राज्यकारभारात पूर्ण प्रजातंत्र असा राजशाही व लोकशाही यांचा अद्‌भुत मेळही आहे. ज्या तीनशे वर्षात ग्रेट ब्रिटन विकसित होत आले, त्याच काळात त्या छोट्याशा बेटात अनेक पराक्रमी पुरुष उदयाला आले, आणि जगात सर्वदूर ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार होत गेला.

तेराव्या शतकापासूनची अशी ही इतिहासाची वाटचाल थेम्स नदीचा समोरून चाललेला प्रवाह पाहताना मनासमोर येऊन गेली. ब्रिटिश पार्लमेंटची ती इमारत या साऱ्या उत्कर्षाची साक्ष देत उजव्या बाजूला खडी होती. थेम्स नदीत भल्यामोठ्या यान्त्रिक नौका दिसत होत्या, तशाच प्रवाशांना फिरवून आणणाऱ्या छोट्या नौकाही होत्या. संध्याकाळ होत आली होती. व्हिक्टोरिया स्थानकाकडे परत वळलो. जवळजवळ पन्नास वर्षे राज्ञीपद आणि सम्राज्ञीपद

यांचा दिमाखात उपभोग घेऊन व्हिक्टोरियाने १९०१ साली या जगाचा निरोप घेतला. तसा कोणताही प्रत्यक्ष अधिकार नसलेलीच ही इंग्रजांची राणी होती. पण तिने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव उमटवला हे खरे, आणि ब्रिटिश साम्राज्याचाही तिच्या काळात परमोत्कर्ष होऊन गेला. व्हिक्टोरियन पीरियड असा त्या कालखंडाचा उल्लेख केला जातो, तर त्या काळातील फर्निचर ते व्हिक्टोरियन स्टाइलचे असे म्हटले जाते. तिचे नाव लंडनमधील या प्रमुख लोहमार्ग स्थानकाला दिले गेले त्या स्थानकाच्या आसपासची सर्वात महत्त्वाची स्थाने पाहिली होती. फक्त वेस्टमिन्स्टर ॲबे हे चर्च राहिले की, जेथे राज्यारोहणाचा समारंभ होतो.

परत येत असताना मनात एवढेच आले की, हा सारा भाग दाटीवाटीचा आहे, रस्तेही अरुंद आहेत, आणि चौकही लहान आहेत. एका महान साम्राज्याची राजधानी आपण पाहात आहोत हा ठसा फक्त त्या गर्दीतच जागोजाग दिसणारे सेनानीचे अश्वारूढ पुतळे आणि भव्य अशी पार्लमेंटची इमारत यांमुळेच काय तो उमटत होता. परवापरवापर्यंत व्हिक्टोरिया टर्मिनस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईच्या व्हिक्टोरिया टर्मिनसमधून बाहेर पडले, तर एका बाजूला दिसणारी मुंबई महानगरपालिकेची भव्य इमारत आहे, स्थानकाचीही इमारत तशीच भव्य आहे. हुतात्मा चौकातील कारंजे, राजाबाई टॉवर, पदार्थ संग्रहालय, त्यानंतर गेट वे ऑफ इंडिया, आणि त्याच्यासमोर उसळणारा सागर, हे सारेच मनावर भव्यतेचा ठसा उमटवते. माणसांच्या गर्दीमुळे हे आपल्या ध्यानात येत नाही, पण रात्रीच्या निवांत वेळी एक फरफटका मारला तर समजते आझाद मैदानही विस्तीर्ण आहे रस्तेही रुंद आणि प्रशस्त आहेत. पण ही सारी नगररचना इंग्रजांनी केली आहे. आपण केलेली नाही. इंग्रजांनी ती अशी दिमाखदार केली, याचे कारण हे सारे त्याना आधी योजना आखून करण्याची संधी मिळाली व्हिक्टोरिया स्थानकाच्या आसपासच्या अर्ध्या मैलाच्या परिघातील परिसर मध्ययुगापासूनचा आहे तेथे भव्यतेला वाव नव्हता. होते तेच ठाकठीक करावे लागले.

लंडनमधील हा पहिला दिवस. त्यामुळे हरएक गोष्ट डोळ्यांसमोर आल्यावर मनात निरनिराळ्या दिशांनी विचार येत गेले आणि विविध प्रतिक्रिया उमटत राहिल्या. तरुणपणी याच इंग्रजांचा केवढा राग मनात होता! पण तो मावळून मनाला थोडी तटस्थ वृत्ती आली होती इंग्रज माणूस असे काही दडपणही मनावर नव्हते. एवढेसे हे छोटे बेट. तीनशे मैल लांब आणि दोनशे मैल रुंद एवढाच त्याचा विस्तार आहे. पण जगाच्या इतिहासावर त्याची मुद्रा उमटली आहे खोल विचार करणे, पराक्रम आणि मुत्सद्देगिरी या दोन्ही अंगांनी सरस असणे, एकदम काहीतरी भव्यदिव्य न बोलणे, आणि तरीही प्रसंगाला स्थिर वृत्तीने सामोरे जाणे हे इंग्रज लोकांचे एक समाज म्हणून असलेले काही महत्त्वाचे विशेष आहेत. आपण कोणीतरी निराळे आहोत असा सुप्त अहंभाव, आणि इतरांना आपल्याहून कमी लेखण्याची प्रवृत्ती, यांची

त्या विशेषांना जोड मिळाली आहे. या साऱ्यांचा आविष्कार एका संयमित व सुसंस्कृत शैलीने होत असतो, असेही सांगितले जाते. उलट अंगाने हे वर्णन करताना उगाच शिष्टपणा आणि फुकाचा आविर्भाव हा आशय व्यक्त करणारा Snobbery हा शब्द योजला जातो. बर्नार्ड शॉनेही आपल्या नाटकातील एका पात्राच्या द्वारा त्याचा खोचक उल्लेख केला आहे.

पण तरीही कोठेतरी या इंग्रज समाजात एक जाणकारी व खोलपणा आहे हे खरे. युरोपातील इतर देशांशी तुलना करता हे विशेष जाणवतात. त्या रात्री अंथरुणावर पडलो तेव्हा दिवसभरातील सारे भिन्नभिन्न विचारतरंग मनात तरळत होते, आणि त्याला कारणीभूत झालेला तो लंडनमधील छोटासा परिसर दृष्टीसमोरून जात होता.

# ५. सेंट पॉल्स आणि टॉवर ऑफ लंडन

सूझनबरोबर चर्चमध्ये रविवारी सकाळी गेलो तेव्हाच पाऊस होता, तो दिवसभर राहिला व मला बाहेर पडता आले नाही. यानंतर उरलेले पाच दिवस मी एकटा दहा वाजता बाहेर पडे, तो व्हिक्टोरिया स्थानकावर जाऊन कोणती तरी दिशा धरत असे आणि काहीतरी पाहून संध्याकाळी साडेसहासातपर्यंत पुन्हा व्हिक्टोरिया स्थानकावर येऊन घरी परतत असे. पाहावे असे वाटणारे लंडनमध्ये इतके आहे की, केवळ जागा पाहावयाच्या ठरवल्या तरी किमान पंधरा दिवस आवश्यक आहेत. शिवाय चित्रसंग्रहालये, पदार्थसंग्रहालये, आणि इतर अनेक संग्रहालये आहेत. प्रत्येक संग्रहालय समृद्ध आहे, आनंद देणारे आहे, आणि ज्ञानात भर घालणारे आहे. त्याशिवाय ऐतिहासिक महत्त्व असलेली खिस्तधर्मी प्रार्थनामंदिरे अनेक आहेत. व्हिक्टोरिया स्थानकाजवळच एक अगदी जुने प्रार्थनामंदिर आहे ते मुद्दाम आतून पाहिले. सहज आत शिरले तर तास दीड तास गेला. बाजारातील दुकानांचे नमुने पाहावेत यासाठीही रस्त्यांवरून पायी फेरफटका केला. पण अखेर हे सारे तेच ते असते.

## सेंट पॉल्स कॅथेड्रल

लंडन पाहण्यासाठी ज्याला लंडनदर्शन असे आपण म्हणू शकू अशा सार्वजनिक परिवहनाच्या गाड्या कैक आहेत. निरनिराळ्या मार्गावरून त्या फिरत असतात. दहा पौंडांचे तिकीट घेतले की, कोठेही उतरावे व पुन्हा चढावे. त्यातल्या एका गाडीतून साऱ्या लंडन शहरातून एक धावती फेरी टाकली. शहर जुने आहे हे स्पष्ट जाणवते. मुख्य म्हणजे नव्या दिल्लीत प्रशस्त रस्ते आहेत, रुंद पादचारी मार्ग आहेत, आणि मोकळ्या जागा भरपूर ठेवल्या आहेत. तसे लंडनमध्ये वाटत नाही. ग्रीन पार्क किंवा हाइड पार्क यांसारखी काही उद्याने मात्र आहेत. स्वच्छता, शांतता, आणि वाहनांपासून चालत जाणाऱ्यापर्यंत सर्वांच्या वावरण्यातील विलक्षण शिस्त मनात भरणारी आहे. ऐन वर्दळ असलेल्या रस्त्यांवरही मोठा आवाज कोठेही येत नाही. अर्थात या शहरातही कोठेतरी गरीब वस्ती व तिला जोडून येणारी काही गडबड किंवा बकालपणाही असू शकेल. आपण प्रवासी लोक साऱ्या साऱ्या भागांतून फिरतो असे होत नाही.

तसे लडन मी फार थोडे पाहिले आणि पाहिले पाहिजे असे कितीतरी राहून गेले. नॅशनल गॅलरी आणि नॅशनल पोर्ट्रेट गॅलरी जेथे जगविख्यात कलावंतांची चित्रे आहेत. ती पाहण्याची फार इच्छा होती. कोशकार जॉन्सन आणि थॉमस कार्लाइल याची घरे पाहावयाची होती युद्धकाळात तळघरातील खोल्यांतून चर्चिलच्या कार्यालयाचे काम चालत असे व तेथेच मत्रिमंडळाच्या बैठकीची खोली दाखवली जाते. इंडिया हाऊस हे तसेच काही वेगळ्या कारणाकरिता. या प्रत्येक वस्तूच्या मागे इतिहास आहे पण हे सारे बाजूला ठेवावे. परिवहनच्या गाडीतून जाताना लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स या विख्यात शिक्षणसंस्थेची तशीच फ्लीट स्ट्रीटची अशा काहीकाही पाट्या दिसल्या. ही नावे अनेक वेळा कानांवरून गेली होती. इमारतीवर धावती दृष्टी टाकण्यात समाधान मानले शिवाय त्या इमारती आतून पाहिल्याने फारसे नवीन काय कळणार होते? सेट पॉल्स कॅथेड्रलचे मात्र तसे नव्हते. ते दिसताच खाली उतरलो. तिकीट काढले आणि आत शिरलो.

पुढच्या बाजूला असलेला दोन बाजूंचा मिळून होणारा अर्धवर्तुळाकार भाग सोडला, तर हे कॅथेड्रल रोमच्या सेट पीटर्सची आठवण करून देणारे आहे. वास्तुशिल्प आणि इमारतीची भव्यता डोळ्यांत भरणारी आहे. थेट वरच्या टोकाला पोचण्यासाठी बाराशे पायऱ्या चढून जावे लागते. मी फक्त पहिल्या मजल्यापर्यंत गेलो. उंचावरून लंडनचे विस्तारलेले दृश्य पाहण्याचा मोह आवरला. या जागेत चौदाशे वर्षे येशू ख्रिस्ताची आराधना केली जात आहे, असा उल्लेख माहितीपत्रकात होता. मूळ इमारत १६६६-च्या लंडनच्या प्रचंड अग्नीत भस्मसात झाली, आणि त्याच जागेवर जवळजवळ पंचवीस वर्षे काम करून ही आता आपण पाहात असलेली गोथिक शैलीची नवी इमारत १७१० - मध्ये उभी राहिली. मधल्या भव्य घुमटाचा पाया शंभर फुटांवर आहे आणि घुमटाचे सर्वात वरचे टोक तीनशे फुटांहून अधिक उंच आहे, यावरूनच त्याच्या भव्यतेची कल्पना करता येते. मुख्य प्रार्थनामंदिराच्या सभागृहात आणि इतर चारपाच छोट्या दालनांत मिळून बाराशेपंधराशे तरी खुर्च्या असाव्यात

आत शिरताच उजव्या बाजूच्या खोलीत डोकावून पाहिले तर पहिल्या महायुद्धात १९१६ साली वीरमरण प्राप्त झालेला ब्रिटिशांचा सेनापती लॉर्ड किचनेर याचे स्मारक तेथे होते. त्याच्या मृत्यूचा इंग्लंडला तेव्हा फार मोठा धक्का बसला होता. एका उंच चबुतऱ्यावर रोमच्या सेट पीटर्समधील, मांडीवर ख्रिस्ताचा मृत देह घेतलेल्या शोकाकुल अशा मेरीच्या पुतळ्याची पूर्ण आकारातील प्रतिकृती होती. पण या मूर्तीमध्ये मेरीने ख्रिस्ताचा एक हात उचलून तो आपल्या मुखाजवळ धरला होता. संगमरवरी मूर्ती नसल्यामुळे तिच्या देखणेपणात थोडी उणीव होती. मेरीच्या या मूर्तीसमोर जमिनीवर किचनेरचा सपूर्ण लष्करी गणवेषातील मृत देह आडवा दाखवलेला होता. पाय लाब पसरलेले होते आणि चेहरा एका बाजूला

कललेला होता. किचनेरच्या मागील बाजूस आणि मेरीच्या मूर्तीच्या समोर दुसऱ्या चबुतऱ्यावर शोकाकुल असे सैनिक दाखवलेले होते. ते आपल्या सेनापतीला अखेरची वंदना देत होते. एकीकडे सैनिकाचा आपल्या सेनापतीच्या मृत्यूबद्दलचा शोक आणि दुसरीकडे मेरीचे आपला पुत्र क्रूसावर चढवला गेल्याचे दुःख, अशी ही कारुण्याची दोन प्रतीके होती.

किचनेरचे स्मारक करावेसे वाटावे हे ठीक आहे. पण किचनेरचे युद्ध आणि येशू ख्रिस्ताची शिकवणूक या दोहोंचा संबंध कसा जुळतो, आणि किचनेरचा वीरमृत्यू आणि ख्रिस्ताचे बलिदान या दोहोतील विसंगतीचा मेळ कसा घालावयाचा, हे ध्यानात येत नाही. साऱ्या जगात आधी ख्रिस्तधर्मी योद्धे गेले आणि नतर त्या धर्माचे प्रचारक गेले. काही ठिकाणी त्यांनी सेवा केली हे खरे, पण त्यांच्या पाठीशी राजसत्ता उभी होती. सेवा केली तीही धर्मातर घडवून आणण्याच्या इच्छेने. ख्रिस्ताचा शांतीचा संदेश पोचवावा हा हेतू नव्हता, तर आपल्या धर्माचे लोक वाढले तर आपल्या राजकीय सत्तेला बळकटी येईल ही दृष्टी होती. याला धर्मातील उदात्त तत्त्वाचा प्रसार करणे म्हणता येत नाही. आपल्या महाराष्ट्रात तर गोव्यामध्ये पोर्तुगीज लोकांनी अनन्वित अत्याचार केले आणि अनेक ठिकाणी जबरीने धर्मातर घडवून आणले. ब्रिटिश त्या मानाने सुसंस्कृत हे खरे. पण त्यांच्या राजसत्तेनेही दुष्काळात माणसे मरत असलेली डोळ्यांना स्पष्ट दिसली, तरी त्याच्याबद्दल थोडीशीही सहानुभूती दाखवली नाही, आणि दुसरीकडे कोणीकोणी धर्मप्रचारक दुष्काळग्रस्त लोकाना धर्मातराच्या बदल्यात अन्नाचे वाटप करीत होते. अशी ही सारी परस्परविरोधी दृश्य निर्माण करणारी कथा आहे.

गोव्यातील एका जुन्या चर्चमध्ये सेंट झेवियरचा देह जतन करून ठेवलेला आहे. ख़िस्ताची शिकवणूक द्यावी या हेतूने आपला देश सोडून झेवियर एवढ्या दूरच्या देशात आला आणि येथील दीनदरिद्री लोकांत फिरून त्याने धर्मप्रसार करण्याच्या कार्यात आपले सारे जीवन वेचले, ही गोष्ट व्यक्तिशः त्याच्या जीवनाला फार मोठे श्रेय देणारी आहे. पण पुढील काळात गोव्यामध्ये जे घडले ते दृष्टीसमोर उभे राहते आणि मग त्या चर्चमध्ये तो त्याचा मृतदेह ठेवलेला पाहताना आपल्या मनात निखळ आदरभावनेपेक्षा एक वेगळा भाव उमटतो. अर्थात हे जे काही घडले, त्यामागे आपल्या समाजाची दुर्बलता आणि आपल्याच लोकांच्या दुःखाविषयी असलेल्या करुणेचा पूर्ण अभाव ही कारणे मुख्यतः आहेत हेही खरे, आणि ते आपल्याला थोडेही भूषणावह नाही याचा विसर पडता कामा नये. आपल्या अवनतीचे खापर दुसऱ्या कोणाच्या तरी शिरावर फोडणे योग्य नाही. पण ख्रिस्ताचे अनुयायीही फार पुण्यवंत आहेत असे नाही. सर्वत्र माणूस सदोषच आहे, दोघांचे स्वरूप वेगळे इतकेच.

पण त्याच वेळी हेही आठवते की, भारतातील बौद्ध धर्माचा प्रसार चीनजपानपर्यत झाला, तो शांततेच्या मार्गाने झाला, आणि इंडोनेशियात किवा बाली बेटात श्रीरामचन्द्राची

कथा पोचलेली होती याच्या खुणा आपण आज पाहतो, तेव्हा त्यामागे तलवार परजलेली नव्हती. माणसाने ईश्वरासमोर अमुक एका पद्धतीनेच नम्र झाले पाहिजे हे सांगत असताना त्याला भीती उत्पन्न करण्यासाठी तो आदेश देणाऱ्याच्या हातात हत्यार आणि नजरेत धाक असावा ही गोष्ट, तो जगन्नियंता सर्वांचा उद्धार करणारा आहे या मूळ संकल्पनेला विरोधी आहे, याचे विस्मरण होत असावे ही एक फार मोठी विसंगती आहे. बुद्धिवादी दृष्टीने विचार केला तर ती तर्कसंगत नाही, आणि आधुनिकतेच्या दृष्टिकोणातून पाहिले तर ती स्वातंत्र्य या मूलभूत संकल्पनेवर आघात करणारी आहे, हे आधुनिक जगाच्या ध्यानात अगदी अल्प प्रमाणात का होईना, पण गेल्या पंधरावीस वर्षात येऊ लागले आहे. पण लॉर्ड किचनेरचा तो पुतळा पाहून पुढे त्या कॅथेड्रलमध्ये फिरू लागलो, तर आणखीही अनेक शूर लष्करी वीरांचे पूर्णाकृती पुतळे तेथे आहेत असे दिसले. त्यातील एका पुतळ्याच्या खाली त्या लष्करी अधिकाऱ्याचे नाव लिहून म्हटले होते, ''भारतातील १८५७ साली झालेल्या युद्धात कानपूरचे रक्षण करताना या सेनानीने आपला देह ठेवला.''

यातील ''कानपूरचे रक्षण करताना'' हे शब्द वाचताना मनातल्या मनात हसू आले. कानपूर हा काय इंग्लंडचा भाग होता, का ते शहर ग्रेट ब्रिटनमध्ये कोठेतरी होते? इंग्रज हे भारतावर आक्रमण करणारे होते, तो देश त्यांना आपल्या राजकीय प्रभुत्वाखाली आणावयाचा होता, आणि त्या लढाईत हा इंग्रज अधिकारी रणांगणात मारला गेला होता. वस्तुनिष्ठ घटना होती ती अशी. कोणाला तरी आपल्या टाचेखाली ठेवावयाचे होते व त्यासाठी ते युद्ध होते. ज्या देशावर आक्रमण करावयाचे असते, तेथे भीतीपोटी उत्पन्न होणारा दरारा उत्पन्न करावा लागतो. झाशी इंग्रजांनी ताब्यात घेतली तेव्हा तेथे तीन दिवस दिसेल त्या भारतीयाची कत्तल करण्याचा आदेश इंग्रजांनी जारी केला आणि त्या संहारात हातात हत्यार नसलेल्या शेकडो नागरिकांचा बळी गेला. गोडसे भटजींनी त्या वेळच्या भयाकुल अवस्थेचे वर्णन आपल्या छोट्याशा प्रवासवर्णनपर पुस्तकात केलेले आपल्याला वाचावयास मिळते. ही कत्तल करताना इंग्रजांनी कशाचे आणि कोणाचे रक्षण केले म्हणावयाचे? आम्हा भारतीयांना त्यांना हे विचारण्याचा काहीही अधिकार नाही: कारण त्यांना आपले राज्य स्थापन करावयाचे होते, आणि आम्ही स्वदेशाचे रक्षण करण्यास असमर्थ ठरलो होतो. राष्ट्राराष्ट्रांच्या लढायांत दुर्बलांनी गळा काढून काही उपयोग होत नसतो. पण ते सारे आपण बाजूला ठेवले, तरी त्या लष्करी अधिकाऱ्याच्या पुतळ्याखाली ''कानपूरमधील इंग्रजांचे रक्षण करताना'' असे शब्द टाकले असते, तर ते निदान वस्तुस्थितीला थोडेतरी अनुसरून झाले असते. कसे का असेना, लंडनमधील या एका महत्त्वाच्या धर्ममंदिरात कोठेतरी भारताचे नावही येऊन गेले आहे, असे मनात येऊन गेले

पुढे पाहात गेलो, तर चित्रकार टर्नरचा पुतळाही तेथे होता. आणि कोशकार जॉन्सनचाही होता. चर्चच्या प्रमुख उपासनेच्या ठिकाणी मात्र येशू ख्रिस्ताच्या जीवनाशी संबंधित आणि धार्मिक जीवनाशी जुळतील अशा गोष्टी होत्या. कॅथेड्रलचे मुख्य सभागृह अतिशय विस्तृत आणि तेथून वर पाहिले तर वरचे छत दोनअडीचशे फुटांच्या वर पोचलेले चोहो बाजूंनी उंच उंच कमानी आणि त्यांवर सर्वत्र नक्षीकाम. जेथे क्रॉस उभा केलेला होता, ती आपल्याकडच्या मंदिरातील गाभाऱ्यासारखी मानली, तर ती मोठी भव्य होती. अखेर ते एक प्रार्थनामंदिर होते. दोनतीन ठिकाणी छोटी दालनेही होती. त्याचा उपयोग लहानलहान कार्यक्रमांसाठी होत असावा. निवांतपणाने दोन तास कॅथेड्रलमध्ये फिरण्यात घालवल्यावर बाहेर पडताना मनात भाव उत्पन्न झाला तो असा की, वास्तुशिल्पाच्या दृष्टीने सेंट पीटर्सची आठवण करून देणारे आणि त्याच वेळी इंग्लिश लोकांच्या भाषा, साहित्य, चित्रकला या क्षेत्रांतील काही विद्वान व कलावंत, आणि त्याहून अधिकांशाने रणांगणावरील धुरंधर योद्धे यांची स्मृती जतन करणारे एक प्रार्थनामंदिर असे या कॅथेड्रलचे संमिश्र स्वरूप आहे.

### फ्रॅन्सिस बेकनचा ग्रंथ

ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार होण्यापूर्वी इंग्लंडला प्रामुख्याने झुंज द्यावी लागली ती स्पेन आणि फ्रान्स या दोन देशांशी. त्याआधी ब्रिटिशांनी आपल्याच राजघराण्याशी लढा दिला व त्यासाठीही समरांगणात रक्त सांडले. हरएक समाजाच्या इतिहासाचे काही विशेष असतात, तसेच त्यात काही चढउतार असतात, आणि मध्येच एखादा उज्ज्वल कालखंड येऊन जातो. आठव्या-नवव्या शतकापर्यंत इंग्लंड फारसे प्रगत नव्हते. युरोपपासून थोड्या अलग असलेल्या या बेटाची काही विशेष दखल घेतली पाहिजे, असे कोणाच्या मनात यावे अशी स्थिती नव्हती. इंग्लंडने आपली सुप्त सांस्कृतिक चुणूक प्रथम दाखवली , ती तेराव्या शतकाच्या पहिल्या दशकात मॅग्नाचार्टा या करारावर जॉन राजाची स्वाक्षरी घेतली त्या घटनेच्या द्वारा. ज्ञानदेवांनी संस्कृतमधील अध्यात्मविद्येचे कवाड ज्ञानेश्वरीच्या द्वारा अवघ्या बहुजनसमाजासाठी खुले केले, ती घटना त्याच तेराव्या शतकाच्या अखेरच्या दशकात घडली. दोन देशांचे सत्त्व भिन्न दिशांनी कसे आविष्कृत होत होते, ते येथेच उमटून पडले.

त्यानंतर सतराव्या शतकाच्या प्रारंभी "The Advancement of Learning" हा फ्रॅन्सिस बेकनचा ग्रंथ प्रसिद्ध झाला, आणि त्यामुळे इंग्लंडमधील ज्ञानाच्या शोधाला भौतिक शास्त्राची दिशा मिळाली. फारशी चूक होत नसेल तर असे म्हणता येईल की, प्रतिभेतून निर्माण होणारे काव्य आणि श्रद्धेतून प्रकट होणारा ख्रिस्तशरणतेचा भाव हे दोन भाग थोडे बाजूला ठेवून, माणसाच्या बुद्धीने निसर्गातील पदार्थांच्या गुणधर्मांचा आणि त्यांतील प्रक्रियांचा

शोध घेण्याकडे वळले पाहिजे, याकडे बेकनने उपर्युक्त ग्रंथात प्रकर्षाने लक्ष वेधले मानवाच्या प्रगतीच्या दृष्टीने ज्ञानाचे हे क्षेत्र जितके विशाल तितकेच महत्त्वाचे आहे, असे त्याने म्हटले आहे. या क्षेत्राचे विविध भाग कसे पडतात, याचाही निर्देश त्याने केला. भूमध्य समुद्राच्या मर्यादेतून बाहेर पडून अटलांटिक महासागराच्या विस्तीर्ण जलसंभारावर संचार करण्याची दिशा कोणीतरी दाखवावी, तशी ज्ञानाचा शोध घेण्याच्या संदर्भात बेकनने दिलेली ही प्रेरणा होती, असे वर्णन केले गेले आहे

त्या सतराव्या शतकात शिवरायांच्या स्वराज्यस्थापनेमुळे महाराष्ट्रातील परधर्मीय जुलमी राजवटीचे अंधकारयुग संपले हे खरे, पण ज्ञानाच्या शोधाची कोणतीही नवी दिशा ना महाराष्ट्रात कोणाला गवसली, ना भारतात तसा कोणी द्रष्टा निघाला. आपण परंपरागत धार्मिक समजुतीच्या आवर्तात अधिकाधिक गुंतत आलो होतो, आणि भौतिक विद्येची तर पुसटशी खूणही कोठे दिसत नव्हती. ही तुलना याहून अधिक विस्ताराने करीत पुढे इंग्रज भारतात येऊन उतरले तोवरच्या या दोन देशाच्या इतिहासावर दृष्टी टाकणे आपल्याला बरेच काही शिकवून जाते. तो विषय येथे प्रस्तुत नाही.

## महाराष्ट्रातील भुईसपाट किल्ले

पण तेराव्या शतकात इंग्रज राजांचे निवासस्थान जेथे होते, ते टॉवर ऑफ लंडन एक ऐतिहासिक स्मारक म्हणून जतन करून ठेवलेले आहे. याच्याजवळच टॉवर ब्रिज ऑफ लंडन हा थेम्स नदीवरील सुप्रसिद्ध पूल आहे त्या पुलावर उंच टॉवर दिसतात, तर टॉवर ऑफ लंडनमध्ये ते निरनिराळया उंच बुरुजांच्या रूपात पाहावयास मिळतात. आपल्याकडील भाषेत बोलावयाचे म्हटले, तर ही एक मोठी गढी किंवा छोटासा भुईकोट किल्ला आहे. विस्ताराच्या दृष्टीने पाहिले, तर पुण्यातील शनिवारवाड्याच्या दोन ते अडीचपट विस्तार आहे

पण स्वतःच्या देशात ऐतिहासिक वास्तूंची काळजीपूर्वक जपणूक करणाऱ्या इंग्रजांनी पुण्यावर कबजा मिळवताच त्या शनिवारवाड्यात जाणाऱ्याला इतिहासाची कोणतीही आठवण होऊ नये या दृष्टीने मूळ इमारतींचा चौथराही धड शिल्लक राहू दिलेला नाही. एवढ्याने भागले नाही. इंग्रज राज्यकर्त्यांची दृष्टी एवढी सूक्ष्म आहे की, शिंदे-होळकर आदींची संस्थाने त्यांनी राहू दिली, छत्रपती राजाराम महाराजांची पत्नी ताराबाई, यांचा वंश जेथे आहे ते कोल्हापूर संस्थान राहू दिले, पण या सर्वांचा मूळ उगम ज्यांच्या उज्ज्वल कर्तृत्वात शोधावा लागतो त्या शिवछत्रपतींची साताराची गादी त्यांनी खालसा केली. महाराष्ट्रात टॉवर ऑफ लंडनसारखे कितीएक किल्ले आहेत. पण छोट्याशा लोहगडपासून तो सिंहगड, राजगड,

रायगड, प्रतापगड, किंवा सातारचा अजिंक्यतारा या महत्त्वाच्या किल्ल्यावर आपण गेलो, तर क्वचित एकदोन इमारती सोडल्या तर कोठेही कोणतीही महत्त्वाची ऐतिहासिक इमारत दिसत नाही. कोठे काय होते हेसुद्धा समजत नाही, आणि सर्वत्र केवळ सपाट पठारे आहेत. याचा अर्थ काय होतो? सारे काही पद्धतशीरपणे केव्हा नाहीसे करून टाकले ते आपल्याला कळूही दिले नाही. साऱ्या किल्ल्यावरच्या जुन्या भक्कम इमारती शेपाचशे वर्षे सहज टिकणाऱ्या होत्या. मालवणजवळच्या सिंधुदुर्ग या आरमारी किल्ल्यात काहीही शिल्लक राहिलेले नाही पण सुदैवाने विजयदुर्गच्या समुद्रतीरावरील किल्ल्याचे तट आणि बुरूज जसेच्या तसे उभे आहेत. किल्ल्यावरच्या रचनेतील कौशल्य असे आहे की, समोरच्या समुद्रातून किल्ल्यावर दृष्टी ठेवून आपण नौयानातून गेलो, तरी त्याचा मुख्य दरवाजा कोठे आहे हे कळत नाही.

मध्ययुगीन काळातील एखाद्या छोट्याशा टेकडीवर किंवा सपाट भूमीवर असलेले कितीएक किल्ले आज इंग्लंड, जर्मनी किंवा ऑस्ट्रिया येथे जपून ठेवलेले आहेत. तेथे काय घडले त्याची सविस्तर माहिती उपलब्ध आहे आपले सारे किल्ले म्हणजे केवळ तटाच्या आत असलेली मैदाने होऊन गेली आहेत. हे कालाच्या ओघात नाहीसे झाले असे घडलेले नाही. पुढे येणाऱ्या पिढ्यांना ज्या ऐतिहासिक वास्तूंच्या दर्शनामुळे मनात काही प्रेरणा उत्पन्न होईल असे काहीही शिल्लक राहता कामा नये, ही इंग्रजांची राजनीती त्यामागे आहे आपण आपल्या दृष्टीने तिला कुटिल म्हणावे, पण त्यांच्या बाजूने ती फार मोठी दूरदृष्टी आहे. मोगल साम्राज्याच्या अपार ऐश्वर्याचे दर्शन घडवणारे आग्रा आणि दिल्ली येथील संगमरवरी विस्तीर्ण राजप्रासाद मात्र मूळच्या अवस्थेत उभे आहेत हे खरे पण त्या या भारतावर झालेल्या इंग्रजांच्या आधीच्या आक्रमणाच्या कालखंडातील खुणा आहेत. त्यासाठी त्यांना इंग्रजांनी हात लावलेला नाही, आणि कदाचित त्या किल्ल्यांतील इमारतीमध्ये कलात्मकतेचे जे दर्शन घडते त्याविषयीच्या रसिकतेच्या पोटीही ते घडले असावे. टॉवर ऑफ लंडनच्या मध्ययुगीन काळातील फारशा भव्य नसलेल्या पण भक्कम बांधणीच्या दगडी कमानींच्या दरवाजातून आत शिरताना असे सारे मनासमोर उभे राहिले.

## व्हाइट टॉवर आणि ट्रेटर्स गेट

हा परिसर अकराव्या-बाराव्या शतकापासून पुढच्या जवळजवळ सहाशे वर्षाच्या इतिहासाचा साक्षीदार आहे. आत शिरताना जुन्या पद्धतीचे मध्यम उंचीचे प्रवेशद्वार दिसते, त्याची रचना आपल्याकडील किल्ल्यावर दिसते तशी सरक्षणाच्या दृष्टीने केलेली आहे. सारा परिसर दाखवणारे मार्गदर्शक आहेत, तसेच कोणी कोणी कर्मचारी आहेत. त्यांचे पोषाख इंग्लंडच्या मध्ययुगीन कालखंडातील सैनिकांच्या गणवेषाशी मिळतेजुळते आहेत. त्यांच्यावर दृष्टी टाकताच

आपले मन एकदम भूतकालात जाते आपला इतिहासाचा वारसा आणि परंपरा हा अत्याधुनिक इंग्रज समाज एवढ्या श्रद्धेने आणि बारकाव्याने जपतो, याचे नवल वाटते आणि कौतुकही वाटते. किल्ल्याच्या भोवती तटबंदी आहे मधूनमधून बुरूज आहेत. त्या तटबंदीवरून आपण फिरू शकतो. तटावरून आतल्या भागावर दृष्टी टाकली तर जुन्या-पुराण्या तीनचार इमारती दिसतात भव्यतेची खूण पटेल अशी एकही इमारत त्यांत नाही राजवाडा म्हणावा अशी वास्तूदेखील नाही मोठमोठे महाल किंवा राजाचा दरबार जेथे भरत असेल असे डोळ्यात भरणारे दिवाणखानेही नाहीत. सारे काही बेताचे म्हणावे असे आहे इमारतींना राजाच्या सत्तेची वा ऐश्वर्याची साक्ष पटवील अशी कोणतीही शोभा नाही. दालनांची उंची खूप आहे आणि जुन्या पद्धतीने बांधलेल्या इमारती बळकट आहेत, एवढे मात्र समजते.

व्हाइट टॉवर ही इमारत अकराव्या शतकाच्या उत्तरार्धात विल्यम दि काँकरर याच्या काळात बांधली गेली. टॉवर ऑफ लंडनच्या इतिहासाचा प्रारंभ तेथून होतो आता त्या इमारतीत मध्ययुगीन काळातील हत्यारे ठेवली आहेत. त्याचबरोबर राजाविरुद्ध बंड करणाऱ्या किंवा इतर गुन्हेगार कैद्यांचा छळ केला जात असे, त्याची साधने ठेवलेली आहेत. आत शिरताना असे भय मनात दाटून येते की, क्रूरपणाच्या कोणत्या तऱ्हा दृष्टीला पडणार कोणास ठाऊक. पण तसे क्रौर्याचे विशेष नमुने आढळले नाहीत. निरनिराळ्या प्रकारच्या बेड्या, हातापायात अडकवण्यात येणारे साखळदंड, किंवा कैद्याच्या गळ्यात अडकवण्याची प्रचंड वजनाची लोखंडाची जाडजाड कडी किंवा असेच इतर काहीकाही पाहावयास मिळते. एका फलकावर लिहिले होते की, ही सारीच साधने सरसकट वापरली जात असत असे नाही नदीच्या बाजूला असलेल्या खंदकाच्या पाण्याजवळ असलेले एक प्रवेशद्वार आहे. तेथून आत आणला गेलेला कैदी तेथून जिवंत बाहेर पडत नसे. त्या दाराला ''ट्रेटर्स गेट'' असे नाव आहे. अनेक कैद्यांचा मृत्यू त्या प्रवेशद्वाराने पाहिलेला आहे

पण मध्ययुगीन कालखंडात सर्वत्रच हा प्रकार होता. आग्र्यातील निरनिराळे राजमहाल किती सुरेख आहेत. पण त्यांतील एका महालाच्या आतल्या भागातील चौकात पायऱ्यांच्या खाली एक दार दाखवले जाते. बादशहाविरुद्ध बंड केल्याचा केवळ संशय असलेली व्यक्ती त्या दारातून खालच्या तळघरात नेली जात असे. त्याला ठार केल्यावर तेथे असलेल्या एक खोल विहिरीत त्याचे मृत शरीर टाकले जाई आणि ते तेथून यमुना नदीच्या प्रवाहात नाहीसे होऊन जाई; असे सांगितले जाते. रायगडावरही कडेलोटाची शिक्षा दिली जात असे ती जागा दाखवली जाते. इतिहासातून हे सारे वाचताना अंगावर शहारे उभे राहतात. पण या विसाव्या शतकात स्तालिन किंवा हिटलर यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा छळ करण्याचे जे अतिशय क्रूर प्रकार निर्माण केलेले आपण पुस्तकांतून वाचतो, त्या तुलनेने हे मध्ययुगीन

ग्रंथालय ठाणे
भ्रू-प्रवास
७९
पी१६९६

इग्रज राजे खूपच कमी क्रूर वाटले. सोव्हिएट राजवटीतील केवळ पन्नाससाठ वर्षापूर्वीच्या कॉन्सेन्ट्रेशन कॅंपमध्ये वर्षानुवर्ष हाल भोगलेल्या कैद्यांनी केवळ सुदैवाने नंतर सुटका झाल्यावर लिहिलेले वृत्तांत प्रसिद्ध झाले आहेत, किंवा झारशाहीत सैबेरियातील तुरुंगवासाचा आपला अनुभव वर्णन करणारे ''हाऊस ऑफ दि डेड'' हे दोस्ताएव्हस्कीचे पुस्तक आहे. हे सारे वाचताना आपले मन आतूनबाहेरून हादरून जाते. तसे काहीही या टॉवर ऑफ लंडनच्या इमारतीत नव्हते.

## इतिहासातील उलटसुलट घटना

रशियातील झारच्या तुरुंगात केवळ एका दुर्दैवी योगायोगाने दोस्तोएव्हस्की ठेवला गेला,तसाच एक प्रसिद्ध लेखक या टॉवर ऑफ लडनमध्ये बारा-तेरा वर्षे होता. तो म्हणजे सर वॉल्टर रॅले. तटाच्या वरच्या बाजूला असलेल्या दोन खोल्यांत त्याला ठेवले होते, त्या खोल्या दाखवल्या जातात. तो तटाच्या भिंतीवरून संध्याकाळी फेऱ्या घालत असे, तर केवळ त्याला पाहण्यासाठी खालच्या रस्त्यावर बरेच लोक गोळा होऊ लागले. मग त्याला तटावरून फिरण्यास बंदी करण्यात आली. महत्त्वाचे कैदी ठेवण्याच्या या भागाला ग्रीन टॉवर हे नाव आहे. सोळाव्या शतकाच्या अखेरीस सिंहासनावर असलेल्या एलिझाबेथ राणीची रॅलेने विश्वासाने सेवा केली होती. पण नंतर राज्यावर आलेल्या पहिल्या जेम्सने त्याला राजद्रोहाच्या आरोपाखाली हालहाल करून मृत्युदंड देण्याची शिक्षा फर्मावली. त्याआधी त्याची काही काळ सुटका झाली होती. पण त्याला पुन्हा पकडण्यात आले, आणि अखेर त्याचा शिरच्छेद करण्यात आला.

हा शिरच्छेद केला जाण्याची जागा आपल्याला टॉवरच्या मोकळ्या आवारात पाहावयास मिळते. तेथे लोकशाहीसाठी झालेल्या झगड्याचा परिणाम म्हणून आठव्या हेन्रीची एक पत्नी ॲन आणि दुसरी कॅथरिन या स्त्रिया बळी गेल्या. तो बाकदार लाकडी ठोकळा तेथे आहे, आणि ज्या कुऱ्हाडीने त्यांच्या मानेवर घाव घातला गेला तीही ठेवलेली आहे. ती पाहताना आपल्या मनाचा आतल्या आत थरकाप होतो, हे नाकारता येत नाही. प्रजेचे अधिकार प्रस्थापित करण्यासाठी इंग्रज जनतेने जो प्रदीर्घ लढा दिला, तीमधील सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात घडलेली ही घटना सर्वात भीषण म्हणावी लागेल. पहिल्या चार्ल्सचा शिरच्छेद झाला तो त्यानंतर सुमारे शंभर वर्षांनी. पण पुढे अकरा-बारा वर्षे उलटत असतानाच आधी हद्दपार केला गेलेला राजपुत्र दुसरा चार्ल्स याला ब्रिटिश पार्लमेंटने बोलावून आणून सिंहासनाधिष्ठित केले.

मॅग्नाचार्टावर जॉन राजाने स्वाक्षरी केली, त्यानंतर सुमारे तीनशे वर्षे उलटल्यावरच्या शतकभरात राजघराण्यातील चारपाच व्यक्तींची हत्या झाली, पण त्यानतर पुन्हा राजपद निर्माण केले गेले इंग्लंडमध्ये प्रजेला अंतिम अधिकार हवा, पण त्याचबरोबर सिंहासनावर

कोणीतरी राजा असावयास हवा, असे लोकशाही प्रस्थापित करून नवे शासन आणणाऱ्या क्रॉमवेललाही का वाटले असावे, याची कल्पना करता येत नाही. राजघराण्याचे संरक्षक दल, त्यांचे घोडे, पूर्वापार चालत आलेले गणवेष, वेस्ट मिन्स्टर अॅबेमध्ये होणारा राज्यारोहणाचा समारंभ, काही विशिष्ट प्रसंगी राजाचा वा राणीचा ठेवला जाणारा मान, हे सारे काही सरंजामशाहीचे अवशेष आजही टिकून आहेत. धार्मिक निष्ठेने एखादा विधी पार पाडावा, त्याप्रमाणे दररोज राजवाड्यासमोरचे पहारेकरी बदलण्याचा कार्यक्रम केला जातो पूर्ण लोकशाही राज्यव्यवस्था असूनही राजघराण्याविषयीचे एक प्रेम इंग्रज समाजात आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी छोटीमोठी अशी पाचशेहून अधिक संस्थाने या देशात होती. काही संस्थानिकांनी थोडी गडबड करून पाहिली. पण वल्लभभाई पटेलांच्या मुत्सद्देगिरीमुळे ती सारी भारतात विलीन होऊन गेली. चारदोन अपवाद वगळता त्या संस्थानिकांचा कारभार विशेष चांगला होता असे नाही. पण तरी पुढील दोन पिढ्यांपर्यंत त्या संस्थानिकांबद्दल व नंतर त्यांच्या मुलांबद्दल प्रजेत एक प्रेमाचा भाव होता. आता तिसरी पिढी सर्वसामान्य समाजात जवळजवळ मिसळून गेली आहे. पुढच्या पिढीत सारे काही विस्मृतीत जाणार आहे. राजपदाची निशाणी असलेली सिंहासने व त्याच्या अनुषंगाने होणारे समारंभ होत होते, तोवर त्या सत्तास्थानाबद्दल व सत्ताधीशाबद्दल केवळ सहवासामुळे किंवा विशिष्ट मानसिकतेच्या पोटी उत्पन्न होणारे एक प्रेम होते. इंग्लंडचे सिंहासन आहे, तेथे आरूढ झालेली कोणीतरी व्यक्ती आहे, तिचे दरबारी मानाचे सोहळे चालू आहेच; म्हणून राजवशाबद्दल आपुलकी आहे. प्रथा चालू आहे म्हणून प्रेम टिकून आहे, असे म्हणावे का? समाजमानस ही गोष्टही व्यक्तीच्या मानसिक व्यापाराइतकीच संमिश्र आणि गुंतागुंतीची गोष्ट आहे, असे म्हणावे लागते. बुद्धीच्या अंगाने एखादा निष्कर्ष काढता आला, तरी व्यवहारात भावनिक अंग बलवान राहते, त्याचे हे एक उदाहरण आहे.

सोळाव्यासतराव्या शतकाच्या अवधीत इंग्लंडमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या उलथापालथी झाल्या. रोमच्या पोपची सत्ता झुगारली गेली, आणि अँग्लिकन चर्चची स्थापना झाली. कॅथॉलिक पँथ दुय्यम स्थानावर गेला, किंबहुना उपेक्षेपर्यंत पोचला, आणि प्रॉटेस्टंट पंथाला अधिकृत मान्यता प्राप्त झाली. ज्या जेम्सने वॉल्टर रॅलेला मृत्युदंड दिला, त्यानेच बायबलचे इंग्रजीत भाषांतर करून घेतले, आणि त्यामुळे साऱ्या जगाला एका सुंदर ग्रंथाचा लाभ झाला, असे म्हटले जाते. या कालखंडातच शेक्सपियरसारखा महान नाटककार उदयास आला. धार्मिक आणि राजकीय क्षेत्रात प्रचंड अस्वस्थता असण्याच्या एलिझाबेथ आणि जेम्स यांच्या राजवटीत त्याची प्रतिभा एवढी कशी बहरू शकली, असा एक प्रश्न कोणीकोणी उपस्थित केला आहे. ट्रेव्हेलियन या इतिहासकाराने त्याचे उत्तर असे दिले आहे की, धार्मिक

आणि राजकीय संघर्षापासून व त्यातील धोक्यापासून अगदी दूर असलेल्या अशा आपल्याच स्वतंत्र विश्वात वावरणाऱ्या शेक्सपियरची प्रतिभा स्वच्छदाने विहार करीत होती. अर्थ असा होतो की, शेक्सपियर हा एक कलावत होता, तो केवळ आपल्या सौदर्यविश्वात रमलेला होता, त्याला समाजातील इतर घडामोडीशी काही देणेघेणे नव्हते, आणि त्यामुळे प्रतिभाविलास निर्वेधपणे चालू राहिला. शिवाय रॅले आणि बनियन हे जर तुरुगवासात ग्रंथरचना करू शकले, तर पूर्ण स्वतंत्र असलेला शेक्सपियर मानवी व्यवहारांची विविध चित्रे रंगवू शकला यात नवल नाही.

## मुकुट, अलंकार, आणि इतिहासदर्शन

इंग्लंडची इतिहासाची जाण फार मोठी. टॉवर ऑफ लंडनमधील एका इमारतीच्या खोलीत तेराव्या शतकापासूनचे राजमुकुट ओळीने मांडून ठेवलेले आहेत. एकामागोमाग ते मुकुट पाहात जाताना एकेक शतक मागे टाकत आपण एकोणिसाव्या शतकात येतो, आणि पुढच्या खोलीत प्रवेश केल्यावर एक मुकुट स्वतंत्र ठेवलेला दिसतो. इतर मुकुटाप्रमाणेच हा मुकुटही सोन्याचा आणि त्यात हिरेमोती बसवलेला असा आहे. पण खास उल्लेख आहे तो भारताची सम्राज्ञी असा. व्हिक्टोरिया राणीच्या मस्तकावरील हा मुकुट. ती केवळ इंग्लंडची राणी नव्हती, तर ब्रिटिश साम्राज्याची सम्राज्ञी होती. तो अभिमान तर जगात लोकशाही टिकली पाहिजे म्हणून खंबीरपणाने उभ्या राहिलेल्या विन्स्टन चर्चिलनेही जपला. ब्रिटिश साम्राज्यात पाचही खंडांतील देश होते. त्यांच्या दृष्टीने हा फार मोठे कर्तृत्व आणि गौरव यांचे द्योतक असलेला भाग होता. पण त्यांच्या साम्राज्यात इतर अनेक देश असूनही भारताचा उल्लेख त्यांना आवर्जून करावासा वाटतो इतर देश लोकसंख्या व क्षेत्रफळ या दृष्टीने लहान होते. आणि भारताला जेवढा प्रदीर्घ इतिहास आणि उच्च दर्जाची संस्कृती होती, तशी आणि तेवढी जमेची बाजू इतर देशांच्या वाट्याला नव्हती, हे याचे एक कारण असू शकेल. राणीचा अलंकार संग्रह कपाटातून ठेवलेला आहे येथेच कोठेतरी किंवा सम्राटपदाच्या त्या मुकुटात गाजलेला कोहिनूर असेल काय, असे पुसटसे मनात येऊन गेले. पण मुद्दाम चौकशी करावी असे वाटले नाही.

आणखी एका खोलीत कपाटांतून राजघराण्याच्या वतीने होणाऱ्या मेजवानीच्या वेळी वापरली जाणारी सोन्याची लहानमोठी भांडी मांडून ठेवलेली होती. कांतिमान आणि झळझळीत. काटे आणि चमचे, पेले आणि सुरया, ताटे आणि वाट्या, पातेली आणि तसराळी, अशी सुंदर नक्षी असलेली नाना प्रकारची भांडी त्यांत होती. हे सारे फार बारकाईने पाहात जावे, असे वाटले नाही. शाही ऐश्वर्याचे असे नाना प्रकार असतात एवढेच वाटले. फार लवकर मी तेथून

बाहेर पडलो. शस्त्रे आणि हत्यारे यांच्या संग्रहाबाबतही तेच झाले होते. तसा थबकलो होतो तो वॉल्टर रॅलेच्या खोलीत. येथील बंदिवासातही त्याने ग्रंथलेखन केले होते. त्याहून अधिक वेळ उभा राहिलो तो मोकळ्या जागेतील तो लाकडी ठोकळा आणि ती कुऱ्हाड पाहताना. ॲन आणि कॅथरिन यांचा मृत्यू तेथे झाला. लोकांच्या प्रक्षोभाला त्यांना सामोरे जावे लागले आज इग्रज जनतेच्या प्रेमाचा विषय असलेल्या एलिझाबेथ राणीची ऐन तारुण्यापासूनची कारकीर्द डोळ्यासमोरून गेली. विंबल्डनचे प्रख्यात टेनिसचे सामने होतात, आणि खेळाडूंना तिच्या हस्ते पारितोषिके दिली जातात, तेव्हा दूरदर्शनवर ही इंग्लंडची राणी दिसते. मनात येऊन गेले की, ती कधी या टॉवर ऑफ लंडनमध्ये एक कुतूहल म्हणून आली असेल, तर तो ठोकळा आणि ती कुऱ्हाड पाहताना तिला चारशे वर्षापूर्वीच्या ॲन व कॅथेरिन यांची आठवण झाली असेल काय? आणि झाली असेल तर तिच्या मनात काय आले असेल? तर्क करणे कठीण आहे, पण शेक्सपियर ते भाव व्यक्त करणारे एक समर्थ स्वगत भाषण लिहून गेला असता.

मुख्य इमारती पाहून झाल्या, तटावर फेरी मारून झाली, त्यानंतर सेवकांच्या राहण्याच्या जागा किंवा इतर काही कामासाठी असलेल्या छोट्या इमारती डोळयांखालून घातल्या. सर्वत्र असलेली मोकळी जागा स्वच्छ आणि नीटस ठेवलेली आहे. बागेसारखा काही भाग आहे, कोठेकोठे हिरवळ आहे, आणि सर्वत्र रेखीव पायवाटा आहेत. एक वस्तुसंग्रहालयही आहे. त्यात अनेक जुन्या गोष्टी ठेवलेल्या आहेत. या सर्वांवर धावती नजर टाकून बाहेर आलो, तर समोरच अगदी वेगळ्या प्रकारची पाटी, लंडन नगरीच्या इतिहासाचे धावते चित्रमय दर्शन असे मोठ्या फलकावर लिहिले होते. दोन हजार वर्षांचा इतिहास असे शब्द होते. तिकीट काढले आणि आत गेलो. तीनचार माणसे बसू शकतील असा एक सुबक आकाराचा छोटासा डबा रूळांवरून समोर आला. मार्गदर्शकाने तेथील बाकावर बसण्यास सांगितले. त्याप्रमाणे बसलो. तो डबा हलला आणि अंधारात शिरला. वेड्यावाकड्या वळणांचा मार्ग होता. एकेक दृश्य आपल्यासमोर येत होते. जवळजवळ दोन हजार वर्षापासून निरनिराळ्या शतकात लडन कशा प्रकारचे होते, तेथील लोक कसे होते, त्यांचे जीवन आणि राहणी कशी होती, व्यवसाय कोणते होते, यांतील साधने आणि अवजारे यांत बदल कसे होत गेले, याचे धावते दर्शन घडावे, अशी योजना केलेली होती.

आपण अंधारात असतो आणि रंगमंचावर दिसावे तसे एकेक दृश्य आपल्याला समोर दिसते. ही छायाचित्रे नव्हती, तर ऐतिहासिक वास्तवाला अनुसरून बाल, तरुण, वृद्ध अशा स्त्रीपुरुषांच्या मूर्ती, त्या त्या वेळचे सामान, राहण्याची घरे, रस्त्यांवरची दृश्ये, सागरी जीवनाशी संबंधित असे मच्छीमाराचे किनाऱ्यावरील उद्योग, असे सारे बदलत आलेल्या

लोकजीवनाचे धावते दर्शन घडवले होते. मला अपेक्षा होती की, मॅग्ना चार्टावर स्वाक्षरी करणारा जॉन, बळी गेलेल्या राजवशातील व्यक्ती, आधीच्या काळातील विल्यम दि कॉकरर, आठवा हेन्री, पहिली एलिझाबेथ,ट्राफलगारसारखे युद्ध, लोकशाहीचा विकास, साम्राज्याचा विस्तार, आणि या शतकातील दोन महायुद्धे, यांतील काही घटना पाहावयास मिळतील. उत्तम शोकंतिका लिहिणारा शेक्सपियर, लगोलग आलेला पॅराडाइज लॉस्ट हे महाकाव्य लिहिणारा जॉन मिल्टन, बारा वर्षाच्या प्रदीर्घ तुरुंगवासात "पिलग्रिम्स प्रोग्रेस" लिहिणारा जॉन बनियन, गेल्या शतकातील डिकन्स, असे कोणी कोणी साहित्यिक दिसतील. लंडनच्या इतिहासात हे राजे, वीर, मुत्सद्दी आणि कलावंत यांचा मोठा सहभाग आहे. पण त्यांतील कशाचाही समावेश या अंधारयात्रेत प्रकाशमान केलेल्या त्या दृश्यांमध्ये नव्हता. केवळ लोकजीवनावर आधारलेले ते प्रदर्शन होते. जवळजवळ अर्धा तास ही भूतकाळातील सफर झाली. जगाच्या इतिहासात कोणत्याही देशात आढळेल असेच सारे काही होते.

### इंग्रजांची ज्ञानलालसा

शेजारी वस्तुसंग्रहालय होते. टॉवर ऑफ लडनच्या आसपासचा परिसर हा लंडनचा मध्ययुगातील मुख्य भाग असावा. थेम्स नदीच्या काठाशी काही कामाच्या निमित्ताने किंवा नौकांसाठी धक्के बांधताना जमीन खणतेवेळी काही शतकांपूर्वीच्या अनेक वस्तू सापडल्या. त्या साऱ्या वस्तुसंग्रहालयात मांडून ठेवल्या होत्या, त्यांची माहितीही दिली होती. इग्लंडच्या पुराणवस्तु संशोधन खात्याच्या वतीने हे काम चालते. या छोट्या वस्तुसंग्रहालयाचा उद्देश मर्यादित आहे. पण ज्ञानाचा कोणताही प्रदेश वर्ज्य मानला जात नाही, वा इतिहासातील कोणतीही गोष्ट कमी महत्त्वाची वा दुर्लक्ष करण्यासारखी आहे, अशी दृष्टी या पाश्चात्त्य देशांत नाही. जे जे सापडेल ते ते जतन करावे, आणि नवे शोधत राहावे, ही दृष्टी आहे. आतापर्यंत काय काय हाती लागले आहे व यानंतरची संशोधनाची दिशा कोणती आहे, याची माहितीही व्यवस्थितपणे एका फलकावर दिलेली होती. अशा एकेका विषयात ही माणसे स्वतःला गाडून घेतात, त्यांची परपरा चालू राहते, आणि ज्ञानाच्या या शोधात खंड पडत नाही हे यांचे केवढे वैभव आहे। १७५७ मध्ये प्लासीची लढाई झाली, आणि बंगालचा राज्यकारभार ईस्ट इंडिया कपनीकडे आला. व्यापाराच्या क्षेत्राची मर्यादा ओलांडून राज्यकारभाराच्या क्षेत्रात त्यांनी प्रवेश केला. त्या दृष्टीने ईस्ट इंडिया कपनीचे संचालक मंडळ नव्या जबाबदारीचा विचार करून नवी पावले टाकू लागले.

पण एवढ्यावर ते थांबले नाहीत. वीस वर्षे उलटण्याच्या आत त्यांनी कलकत्त्याला रॉयल एशियाटिक सोसायटी उभी केली. ज्या भारतात आपण आलो आहोत त्या या देशाची

माहिती मिळवणे, त्याचा भूगोल आणि इतिहास समजून घेणे, आणि या देशाचा इतिहास काय आहे त्याचा अभ्यास करणे हा त्या सोसायटीचा हेतू होता. व्यापार वाढावा आणि जमेल त्या भागावर राजकीय प्रभुत्व स्थापन करावे, एवढ्याशी या आक्रमक इंग्रजाना थांबता आले असते. पण ते तेथे थांबले नाहीत. भारतावर दोन हजार वर्षात अनेक आक्रमणे झाली अलेक्झांडर आला आणि पंजाबपर्यंत आल्यावर तेथून परत फिरला. त्यानंतर शक आणि हूण आले ते सामावले गेले. पारशी लोक आसरा शोधण्यासाठी आले व स्वतःची अस्मिता सांभाळून पण थोडासाही कलह उत्पन्न न करता राहिले आठव्यानवव्या शतकात इस्लामचे पाऊल भारतात पडले, व नंतर त्यांनी वैभवशाली साम्राज्य उभे केले. अकबराने सामंजस्याचा थोडा प्रयत्न केला आणि सूफी संप्रदाय हिंदू धर्माच्या थोडा जवळ आला, पण अखेर मुसलमान अलग राहिले. त्यांनी सतत जुलूम आणि अत्याचार यांचा अवलंब केला आणि अनेक प्रकारे विध्वंस केला. वेरूळ येथील कैलासचे अप्रतिम लेणेही त्या विध्वंसातून सुटले नाही.

त्यानंतर इंग्रज आले. हे आक्रमक नवी विद्या तर घेऊन आलेच, पण त्याच्या ठायी काही शहाणपणही होते. त्यांनी भारताचे शोषण केले, पैसा लुटून नेला, भारतात नाना मार्गांनी दुही वाढेल हे पाहिले, आणि अंदमानच्या कारागृहात देशभक्तांचे हाल केले, हे सारे खरे. पण आजवरच्या आक्रमकांच्या तुलनेने ब्रिटिश सौम्य म्हणावे लागतील. जर्मनी आणि रशिया या समकालीन देशांच्या तुलनेनेही इंग्लंड सुसंस्कृत म्हणावे लागेल. शिवाय त्यांनी येथे ज्ञानाचा शोध घेतला आणि कलाकृतीचा विध्वंस केला नाही. उलट आपली कला उठून दिसावी म्हणून दिल्ली, मुंबई व कलकत्ता येथे दिमाखदार इमारती उभ्या केल्या व आधुनिक नगररचनेचा आदर्श उभा केला. इस्लाम आणि ब्रिटिश यांच्या आक्रमणांत हा फरक आहे. हिंदूंचे धर्मांतर घडवून आणण्यासाठी मुस्लीम आणि इंग्रज धर्मप्रचारकांनी जे प्रयत्न केले त्यांतही फरक आहे. दोघांच्याही एका हातात तलवार व बदूक होती, तर दुसऱ्या हातात कुराण व बायबल होते. पण तरी एकाचा मार्ग केवळ जुलूम आणि अत्याचार यांचा होता, तर दुसऱ्याचा सेवा व प्रलोभन यांचा होता. दोघेही आक्रमक, पण त्यांत काही फरक आहे हे आपण जाणून घ्यावयास हवे. मुस्लीम आक्रमक शूर होते, जिद्दीचे होते, पण सांस्कृतिक दृष्ट्या भारतीयांना देण्यासारखे त्यांच्याजवळ विशेष असे काही नव्हते. येथील संस्कृती समजून घ्यावी अशी जिज्ञासाही त्यांना मुळातच नव्हती.

याउलट इंग्रजाजवळ आपल्याला द्यावे असे बरेच काही ज्ञान होते, आणि त्याच वेळी या देशात ज्ञानाच्या अंगाने काय आहे ते समजून घेण्याची जिज्ञासाही होती. कलकत्त्याला रॉयल एशियाटिक सोसायटीची जुनी इमारत आजही उभी आहे त्या सव्वाशेदीडशे वर्षापूर्वीच्या

इमारतीचे तीनचार मजले चढून वरच्या मजल्यावरील प्रशस्त खोलीत निरनिराळ्या विषयांवर चर्चासत्रे होत व निबंधवाचन होत असे. भिंतीला लागून सागवानी सुदर कपाटे होती, त्यांत अनेक ग्रंथ होते. सारे फर्निचर दीडशे वर्षापूर्वीचे. मधले मेज भलेमोठे व त्याच्याभोवती खुर्च्या. सुमारे पचवीसतीस. शिवाय आणखी वीसपंचवीस खुर्च्यांची श्रोत्यांसाठी सोय. अशा या संस्थेची स्थापना होऊन आता दोनशे वर्षे होऊन गेली. इंग्रजांच्या विशुद्ध ज्ञानोपासक वृत्तीची ती खूण आहे येथेच त्यांना संस्कृत भाषेचा प्रथम शोध लागला, आणि ज्ञानाचे एक विस्तीर्ण दालन खुले झाले. आजची इंडॉलॉजी किंवा भारतविद्या ही जी ज्ञानशाखा जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, किंवा अमेरिका येथील विद्यापीठांतून आहे, तिचा प्रारंभ त्या रॉयल एशियाटिक सोसायटीत आहे.

१९९५- च्या सप्टेंबरमध्ये कलकत्त्याला रामकृष्ण मिशन इन्स्टिटय़ूट ऑफ कल्चर या संशोधनसंस्थेच्या वसतिगृहात दोन महिने वाचनलेखनासाठी राहिलो असताना तेथे जर्मनीतील हायडेलबर्ग विद्यापीठात प्राध्यापक असलेले डॉ. रॉदरमुंड भेटले होते. तीनचार वेळा त्यांच्याशी संवाद करण्याची संधी लाभली होती. ते आपल्या विद्यापीठातील दक्षिण आशिया विभागाचे प्रमुख होते, व आपल्या हाताखाली सात प्राध्यापक व सात संशोधक काम करीत आहेत, असे म्हणाले दक्षिण आशिया असे विभागाच्या नावात म्हटले असले तरी प्राधान्याने त्यांच्या संशोधनाचा विषय भारत हा आहे, असे रॉदरमुंड सांगत होते. मी हे ऐकूनच थक्क झालो. कोणकोणत्या विषयांचे सशोधन सध्या चालू आहे व आजवर कायकाय झाले, हे विचारण्याचा मोह झाला होता, पण तेवढा वेळ नव्हता. या तुलनेने आम्ही काय करीत आहोत, हा प्रश्न मनात विषाद उत्पन्न करणारा आहे. अशीच रॉयल एशियाटिक सोसायटी मुंबईतही पुढे निघाली अनेक अभ्यासकांनी तिचा लाभ घेतला हे खरे पण नुकतीच काही महिन्यांपूर्वी बातमी वाचली होती की, तेथील जुने मौल्यवान ग्रंथ पाने जीर्ण होऊन नष्ट होण्याची भीती आहे, आणि काही ग्रंथ वाळवीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. स्वतंत्र भारतात पन्नास वर्षांत झालेली ही दुर्दशा आहे. भारतातील हे सारे चित्र टॉवर ऑफ लंडनजवळचे ते छोटे वस्तुसंग्रहालय पाहताना मनात आले

लडन शहराच्या दोन महत्त्वाच्या खुणा आहेत असे म्हणता येईल. एक थेम्स नदीच्या तीरावरील पार्लमेट हाऊस आणि दुसरी त्याच थेम्स नदीवरील टॉवर ब्रिज ऑफ लडन हा सुप्रसिद्ध पूल. हा पूल टॉवर ऑफ लंडनच्या अगदी जवळ आहे पुलावर असलेले गॉथिक पद्धतीच्या वास्तुशिल्पाचे आकर्षक मनोरे हे त्याचे वैशिष्ट्य आहे दोन बाजूंना असलेले टॉवर जोडणारा वरच्या बाजूचा रस्ता नदीच्या पात्रापासून एकशेचाळीस फूट उचीवर आहे. त्यावरून जाताना लंडन शहराचा दूरवर पसरलेला विस्तार दिसतो. टॉवर ऑफ लंडनजवळ आहे म्हणून

या पूलाला टॉवर ब्रिज हे नाव दिले गेले, का या उंच मनोऱ्यामुळे ते मिळाले, असा प्रश्न मनात डोकावून गेला. भल्यामोठ्या उद्वाहकातून वर जाता येते प्रत्येक मजल्यावर काही ना काही माहिती पुलासंबंधी मिळते. मार्गदर्शक असतात. शिवाय एका ठिकाणी सुमारे वीस मिनिटांचा एक चित्रपट दाखवला जातो. १९९४ - मध्ये पुलाला शभर वर्षे पूर्ण झाली, तेव्हा त्या शताब्दीच्या निमित्ताने हा चित्रपट तयार करण्यात आला.

पूल कोणत्या पद्धतीने बांधावा याचा आराखडा करण्यासाठी पहिली बैठक घेतली गेली, तेथून त्याची सुरवात होते. निरनिराळे आराखडे व त्यांवरील उलटसुलट चर्चा, अनेक आक्षेप व त्यांचे निराकरण, आणि अखेर पुलाच्या प्रत्यक्ष बांधकामाची काही दृश्ये, असे चित्रपटाचे स्वरूप आहे. तो पाहिल्यामुळे पुलाचा इतिहास डोळ्यांसमोर साकार होतो. शंभर वर्षांपूर्वीचे बांधकाम या दृष्टीने पुलाची ही योजना मोठी महत्त्वाकांक्षी होती पण ती यशस्वी झाली, आणि आज हा पूल हे लंडन शहराचे एक भूषण होऊन गेला आहे. मी पुलावरून एकदा एका बाजूने पलीकडे, आणि तेथून परत अशी सावकाशपणे फेरी टाकली, पूल आणि आसपासचे दृश्य पाहिले. सप्टेंबर महिना संपला होता, आकाश भरलेले होते, आणि पुलावर तुफान वाऱ्याचा झोत होता. आपले शरीर जोराने मागे रेटले जात आहे असे चालताना वाटत होते. थंडी तर एवढी होती की, अंगात जॅकेट होते म्हणूनच निभाव लागला. इंग्लंड काश्मीरच्याही उत्तरेला आहे, तेव्हा ही थंडी स्वाभाविक होती.

**ब्रिटिश म्युझियम**

लंडनमधील सर्वात गाजलेले वस्तुसंग्रहालय म्हणजे ब्रिटिश म्युझियम. याची इमारतच केवढी भव्य आहे. पुढच्या बाजूला रोमन वास्तुशिल्पाच्या पद्धतीचे उंचच उंच खांब घेतलेले, खूप मोठी प्रशस्त पडवी, तेथवर चढून जाण्यासाठी पंधरावीस पायऱ्या, आणि समोर छोटेसे मोकळे आवार. बाहेरच्या प्रवेशद्वारापासून नजर टाकताच इमारतीची भव्यता मनात भरते. खरे तर समोरचा रस्ताच त्या मानाने अरुंद वाटतो. हे लंडनमधील सर्वात महत्त्वाचे वस्तुसंग्रहालय. भरभक्कम दगडी इमारतीचे मनावर छाप टाकणारे वास्तुशिल्प. इमारतीतील दालने प्रचंड, जिने भरपूर मोठे. इमारतीची रचना रेखीव. सर्वत्र उंची भरपूर. प्रेक्षक खूप होते, पण गर्दी वाटत नव्हती. हरएक दालनातील प्रत्येक वस्तू काचेच्या लहानमोठ्या कपाटातून ठेवलेली. त्यांचीही कोठे गर्दी नाही. जागोजाग लहानमोठ्या फलकांवर ऐतिहासिक तपशील नोदवलेला.

नानाविध वस्तू. केवळ इंग्लंडमधील नाहीत, जगाच्या निरनिराळ्या देशांतून प्रयत्नपूर्वक गोळा करून आणलेल्या. मी मुद्दामच प्रथम भारताच्या विभागात शिरलो. नुसती एक फेरी

टाकली. कारण तेथील सारे काही आपल्याला पूर्ण परिचित आहे. अनेक देवदेवताच्या व गौतमबुद्धाच्या मूर्ती अधिकाशाने होत्या. इतर वस्तूही बऱ्याच प्रमाणात धार्मिक जीवनाशी संबद्ध होत्या. पण भारतातील विविधतेचे साम्ग्र्याने दर्शन घडण्याच्या दृष्टीने त्या पुरेशा आहेत, असे वाटले नाही. त्यांचाही तसा दावा असणार नाही. सारी दालने पाहात पाहात इमारतीच्या मागच्या भागाशी पोचलो तर तेथे मध्यावर भल्यामोठ्या हत्तीचा डौलदार पूर्णाकृती पुतळा उभा होता. हा भारताचा एक प्रतिनिधीच. त्याला तेथे स्वतंत्र स्थान मिळाले होते.

अनेकानेक विभाग होते. माझ्या हाताशी केवळ तीनचार तास होते. जगाचा सर्वात प्राचीन ऐतिहासिक धागा मिळतो तो इजिप्तमध्ये, म्हणजे प्राचीन काळच्या मिसर देशात. चारसाडेचार हजार वर्षापूर्वीच्या राजवंशांचे तपशील हाती लागले आहेत. कैरोजवळचे पिरॅमिड हे तर जगातील एक आश्चर्य मानले जाते. त्याच्या अतर्भागात काय आहे हे एक गूढ होते. पण गेल्या पानपन्नास वर्षात तेथील पुरातन वस्तू मिळाल्या आहेत. त्या काळातील राजवंश, धर्मविचार, आणि समाजजीवन यावर पुष्कळ प्रकाश पडला आहे. तेथील ममीचे मोठे आकर्षण मनात होते. म्हणून थेट इजिप्तच्या विभागात शिरलो. एका भल्यामोठ्या दालनात कितीतरी ममी कपाटांतून मांडून ठेवलेल्या होत्या. ममी म्हणजे त्या प्राचीन काळात मृत्यू पावलेल्या माणसांची निष्प्राण कलेवरे. स्त्रियांची तशीच पुरुषांची, सामान्य माणसांची तशीच राजघराण्यातील व्यक्तींची. अंत्यविधीच्या त्या काळातील प्रथेनुसार त्यांचे देह लाकडी खोक्यांत वा भल्यामोठ्या कपाटात ठेवून ते पुरलेले. ती कपाटे उघडून ठेवलेली आहेत. न समजणारी अक्षरे आणि आकृत्या त्यांवर रंगवलेल्या होत्या. त्यांचे प्राचीनत्व स्पष्ट जाणवते, पण तरीही त्या पेट्या भरभक्कम आहेत.

त्यांतील कलेवरे जवळच मांडून ठेवलेली. उपलब्ध झालेला स्थल आणि काल, व्यक्तीचे नाव आणि वय हा सारा तपशील प्रत्येक ठिकाणी नोदवलेला आहे. एवढे पुरातन मानवी देह जसेच्या तसे आपल्यासमोर आज साक्षात आहेत, याचा विस्मय मनात दाटून येतो. निष्प्राण झालेली ती शरीरे दोनदोन अडीच अडीच हजार वर्षे टिकून राहावीत यासाठी आवश्यक ती रासायनिक प्रक्रिया त्यांवर करण्याचे ज्ञान एवढ्या प्राचीन काळात मिसरमध्ये उपलब्ध होते, असा याचा अर्थ होतो. ती रसायने कोणती होती व ती कशी बनवली जात होती, यांचा शोध आताच्या संशोधकांनी एव्हाना घेतला असेल. तीसचाळीस ममी त्या स्वतंत्र दालनात होत्या. त्या कलेवरांभोवती वस्त्रे लपटलेली होती. चेहरेसुद्धा कापडात बंद केलेले त्यामुळे एकही मानवी शरीर वा कोणाचा चेहरा पाहता आला नाही. ते कुतूहल मनात फार मोठे होते. पण देह उघडून ठेवले तर हवेचा परिणाम होऊन ते नाश पावण्याचा धोका असावा. शोभा आणि नक्षीकाम ओबडधोबड वाटते, त्याला सौन्दर्याचा वा नाजूकपणाचा स्पर्श कमी

आहे.

त्या सौन्दर्याचे दर्शन ग्रीस आणि रोम या भागात घडते. मानवी आकृतीतील सौदर्य तेथील कलावंतांनी संगमरवरी दगडांवर नाजूकपणाने छिन्नी चालवून मूर्तिमंत उभे केलेले आहे. हे दालनही समृद्ध आहे. मिनर्व्हा, अपोलो, आदी देवताच्या मूर्ती होत्या. ग्लॅडिएटर्सच्या द्वुद्वयुद्धाचा जीवघेण्या खेळाचा विभाग होता. शिल्पकला आणि मूर्तिकला यांचे नाना प्रकारचे नमुने होते. पार्थेनॉनची प्रतिकृती होती. किती किती गोष्टी पाहावयास मिळाल्या. आपण काय काय पाहिले त्याचे सारे तपशील नंतर ध्यानातही राहात नाहीत. दोनअडीच तास कोठे गेले ते कळलेही नाही. पॉंपी शहर व्हेसुव्हियस ज्वालामुखीच्या स्फोटाच्या वेळी बाहेर पडलेल्या लाव्हारसात बुडले आणि सारेच्या सारे शहर गाडले गेले. तेथे उत्खनन करून शहराचे सारे भाग आता मोकळे केले आहेत. त्यातील काही येथे पाहावयास मिळेल, किंवा सॉक्रेटिसच्या कालातील अथेन्समधील काहीतरी डोळ्यांसमोरून जाईल, अशी अपेक्षा होती. पण त्यांपैकी काहीही त्या दालनात नव्हते.

अर्थात यामुळे या संग्रहालयाचे मोल कमी ठरते असे नाही. लंडनमध्ये आणखीही अनेक संग्रहालये आहेत. एकेक संग्रहालय शांतपणे पाहता आले असते, तर ज्ञानात केवढी तरी भर पडली असती. पण तेवढा वेळ हाताशी नव्हता. या ब्रिटिश म्युझियममध्ये ग्रंथालय आहे. ते चांगले समृद्ध आहे आणि तेथे अनेक नामवंत संशोधकांनी अभ्यास केलेला आहे कार्ल मार्क्स कॅपिटल हा ग्रंथ लिहितेवेळी येथे बसत होता, असे कानांवर होते. त्या ग्रंथालयाच्या दाराशी पोचलो, तर सदस्यांशिवाय कोणालाही प्रवेश नाही, असे तेथे म्हटलेले होते. फारसे वाईट वाटले नाही. कारण पुस्तकांची नुसती कपाटे पाहून काही पदरात पडणार नव्हते. एक महत्त्वाची जागा पाहिली, एवढे समाधान पुरेसे वाटले.

# ६. डिकन्सचे घर आणि वेदान्त सेंटर

चार्ल्स डिकन्स हा गेल्या शतकातील विख्यात कादंबरीकार. त्याचे निवासस्थान याच भागात आहे. शेक्सपियरचे घर स्वतत्र आहे, तसेच डिकन्सचे असणार अशा समजुतीने मी शोध घेत राहिलो व त्यात अर्धा तास गेला. एका चौकात ''डिकन्सचे घर'' असा फलक होता व बाणाने दिशाही दाखवली होती. त्या बाजूने दोनतीन रस्त्यांवर जाऊन पुन्हा त्या चौकात आलो. कल्पना अशी होती की, डिकन्सच्या घराच्या बाहेर मोठा फलक असेल. दोघातिघा सदगृहस्थांना विचारले तर त्यांना डिकन्सचे घर माहीत नव्हते. थोडे आश्चर्य वाटले व बरेही वाटले. येथेही एवढ्या महत्त्वाच्या स्थानाची माहिती नसणारी कोणी कोणी माणसे आहेत, केवळ आपल्याच देशात अज्ञान आहे असे नाही; असे सुप्त व फसवे समाधानही वाटले. अशी गाजलेली स्थाने त्या त्या भागात सर्वांना माहीत असणार, असे आपण गृहीत धरतो. पण हे गृहीत धरणे चुकीचे असते. आपण पुण्यात राहात आहोत, पुण्यातील साऱ्या महत्त्वाच्या ऐतिहासिक जागा आपल्याला माहीत आहेत का, असा विचार केल्यावर ध्यानात येते की तशा आपल्याला ठाऊक नाहीत. दूर अंतरावरून येणाऱ्या प्रवाशाच्या मनात जेवढे कुतूहल असते, तेवढे त्या त्या स्थळी राहणाऱ्या माणसाच्या मनात असत नाही. आपल्या मनातही असत नाही हे थोडा विचार केल्यावर ध्यानात येते.

## डिकन्स आणि त्याचा सिडने कार्टन

अखेर एका प्रौढ स्त्रीने डिकन्सचे घर बरोबर दाखवले. त्या बाणाच्या दिशेला रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एक भली लांबचलांब तीनचार मजली इमारत होती. तळ मजल्यावर ओळीने क्रमांक लिहिले होते, तितकी स्वतंत्र निवासस्थाने होती. त्यांतील अठ्ठेचाळीस क्रमांकाचे घर डिकन्सचे होते. त्या दारावरून मी आधी दोनतीन वेळा गेलो होतो. पण एक तर दार बंद होते, व त्यावरची पाटी छोटी होती. येथे एखादे स्मारक म्हणून जपलेले घर असेल असे मनात येण्यासारखी काहीही बाह्य खूण नव्हती. त्या छोट्या पाटीवर डिकन्सचे घर हा उल्लेख होता. घंटी दाबली. दार उघडले गेले व आत शिरलो. पहिल्याच खोलीत तिकीट मिळण्याची व्यवस्था होती. ते घेऊन पुढच्या खोलीत गेल्यावर शेक्सपियरच्या घराची आठवण व्हावी, त्या

प्रकारे सारे काही स्मारक म्हणून व्यवस्थित जपून ठेवलेले आहे, असे आढळले तीनमजली निवासस्थान आहे. निरनिराळ्या खोल्यांचा कोणता उपयोग केला जात असे त्याची नोद आहे प्रत्येक खोलीत माहिती देणारे फलक होते. डिकन्सच्या वापरातील अनेक वस्तू ठेवलेल्या होत्या. आपले लक्ष साहजिकच त्याची बसण्याची खुर्ची, लिहिण्याचे मेज, त्यावरील दौत आणि पीस असलेली त्या काळातील लेखणी या वस्तूंकडे जाते. त्याच्या पहिल्या पत्नीची धाकटी बहीण वयाच्या केवळ अठराव्या वर्षी मृत्यू पावली होती. ती खोली दाखवतात. डिकन्सला तिच्याबद्दल विशेष वात्सल्य होते.

प्रत्येक खोलीत अनेक छायाचित्रे आहेत. डिकन्स आपल्या कादंबऱ्यांतील कथाभागांचे सार्वजनिक वाचन करीत असे, आणि त्याचे हे कार्यक्रम फार लोकप्रिय झाले होते. आपल्याकडे पु. ल. देशपांडे यांनी "असा मी असा मी" रंगभूमीवर एकट्याने उभे केले एकपात्री प्रयोग असे नाव त्याला रूढ झाले. कथेतील वा नाटकातील एकच पात्र असा त्याचा अर्थ करता येईल? शंका वाटते. कारण पात्र हे कथानकात असते. पात्र म्हणजे ते ते काम करणारा नट नव्हे. तेव्हा एकपात्री हा शब्द एकच नट या अर्थाने घेता येणार नाही. पु. लं नी नेपथ्य आदींचे कोणतेही इतर साहाय्य न घेता निरनिराळया पात्रांचा वेगवेगळा आवाज आणि अतिशय बोलक्या हालचाली व मुद्राभिनय यांच्या बळावर अनेक पात्रे आपल्या प्रयोगात जिवंत उभी केली. डिकन्सच्या वाचनापेक्षा पु. लं. ची कला वरच्या पातळीवर जाईल असे वाटते. हे विधान त्यांच्या वाङ्मयसंपदेला उद्देशून घ्यावयाचे नाही, रंगभूमीवर एकट्याच्या बळावर सादर केलेला जणू काही एक नाट्यप्रयोग एवढ्या मर्यादेत घ्यावयाचे आहे. अभिनयाची उत्कृष्ट जोड ते देत, म्हणून केवळ कथाकथन न म्हणता नाट्यप्रयोग म्हणावयाचे. पुलंनी आपल्या लेखनाचे वाचन करण्याचे जे प्रयोग क्वचित केले ते श्रोत्यांची पकड घेऊ शकले नाहीत. त्यांनी हे डिकन्सचेच अनुकरण केले असेल काय? डिकन्सला मात्र यश मिळाले. त्याच्या वाचनाला केवळ इंग्लंडमध्येच नव्हे, तर अमेरिकेतही उदंड प्रतिसाद मिळाला.

पिकविक पेपर्स, ग्रेट एक्स्पेक्टेशन्स किंवा डेव्हिड कॉपरफील्ड या डिकन्सच्या कृती फार गाजल्या. A Tale of Two Cities ही त्याची कादंबरी माझ्या मनावर फार परिणाम करून गेली होती. ती ज्याने लिहिली त्याचे हे निवासस्थान आहे, हा भाव माझ्या मनात विशेष जागा होता. फ्रेंच राज्यक्रांतीच्या पृष्ठभूमीवरील त्यातील उदात्त प्रेमकथा मनाला चटका लावणारी आहे. जिच्यावर आपले प्रेम होते, पण जिने दुसऱ्या तरुणाशी विवाह केला, तिचे जीवन सुखाचे व्हावे यासाठी तिच्या पतीच्या जागी तुरुंगात आपण जाऊन त्याला ज्याने तेथून बाहेर काढण्याची व्यवस्था केली, आणि क्रांतीच्या त्या उत्पातात तो शांतपणे गिलोटिनला सामोरा गेला, अशा त्यागी प्रेमिकाची त्यातील उदात्त व्यक्तिरेखा मनावर फार खोल ठसा

उमटवून जाते. व्यक्तीच्या आयुष्यातील प्रेमाची कहाणी आणि समाजमानसातील प्रक्षोभाचा भीषण उद्रेक यांची उत्कृष्ट सांगड त्या कादंबरीच्या कथानकात आहे. तिच्यावर निघालेला चित्रपटही उत्कृष्ट होता. त्यातील शेवटचा प्रसंग केवळ अविस्मरणीय आहे. बारा-पंधरा कैद्यांना तुरुंगातून गिलोटिनवर मृत्युदंड देण्यासाठी आणलेले असते. सारे एका रांगेत उभे असतात. त्यांत एक सोळासतरा वर्षांची कोवळी मुलगी असते.

एकेक कैदी पुढे नेला जातो. खालच्या फळीवर त्याची मान टेकवली जाते, वरून गिलोटिनचे भलेमोठे धारदार पाते वेगाने त्याच्या मानेवर आदळते, कैद्याचे मस्तक समोरच्या करंडीत पडते, आणि सार्वजनिक ठिकाणी चाललेले हे भीषण हत्याकांड पाहण्यासाठी जमलेले हजारो लोक आनंदाने किंचाळतात, त्यांत काही स्त्रियाही बेहोषपणे सामील झालेल्या दिसतात. चित्रपटातील तो प्रसंग पाहताना आपल्या अंगावर काटा येतो. ती मुलगी हे सारे बघत असताना केवळ सुंद होऊन जाते. हे काय चालले आहे, आपल्याला का पकडले आहे, आपण कोणता अपराध केला आहे, आणि पुढील पाचसात मिनिटांत आपले काय होणार, हे काही जाणण्याची तिची संवेदनाही बधिर होऊन गेलेली असते. अजाण, निष्पाप अशी ती मुलगी. पूर्ण भेदरलेली, हताश वैफल्यपूर्ण मुद्रा, डोळयांत निस्तेज भकासपणा. ही तिची अवस्था सिडने कार्टन पाहतो. तो अतिशय शांत असतो. त्याचीही वाट तीच असते. जिच्यावर त्याचे प्रेम होते ती आपल्या पतीसमवेत सुखाने संसार करील, एवढेच त्या प्रेमाचे साफल्य त्याच्या मनात भरून राहिलेले असते. त्याच्या मनश्चक्षूंसमोर या अंतिम क्षणी केवळ आपल्या प्रेयसीचीच मूर्ती असणार.

पण या मुलीची विकल अवस्था पाहिल्यावर त्याचे हृदय हलून जाते. तिला थोडा धीर दिला पाहिजे असे त्याला वाटते. तो दोन पावले अलीकडे येतो व तिच्या पाठीवरून हळुवारपणाने आपला वत्सल हात फिरवतो. त्या मुलीच्या चेहऱ्यावरील कारुण्य लोपत नाही,पण वाऱ्याची एक मंद झुळुक येऊन जावी तसा तिला त्याचा तो स्पर्श वाटतो. त्याच्या त्या कृतीला तरी काय अर्थ आहे, असे कोणाला वाटणे शक्य आहे. पण तेथे उभ्या केल्या गेलेल्या साऱ्या व्यक्तींचा घास घेण्यासाठी मृत्यू समोर उभा असतानाच्या क्षणी सिडने कार्टनच्या मनात जो मानवतेचा भाव जागा होतो, त्याचे ते दर्शन आपले मन हेलावून टाकते. मानवाची नियती ही कोणत्या स्वरूपाची गोष्ट आहे, असा प्रश्न मनात दाटून येतो. उत्तर मिळत नाही.

## फ्रेंच राज्यक्रांती आणि एडमंड बर्क

फ्रेंच राज्यक्रांती स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता ही घोषणा घेऊन उभी राहिली. पण सूड

आणि क्रौर्य यांचे थैमान त्या निमित्ताने फ्रान्समध्ये घडून आले झाडाझाडावरून अनेकाचे मृत देह लटकलेले होते. ध्येय उच्च असले किंवा मनातील भाव उदात्त असला, तरी समूहाचे मन आणि व्यक्तीचे मन ही फार वेगवेगळ्या दिशांनी जातात. व्यक्तीचे मन त्यागाच्या भावनेने प्रेरित झाले, तर उच्च मूल्ये आणि उदात्त वर्तन यांचा काही मेळ पडतो. सामाजिक उद्रेकाच्या प्रसंगात तसे घडत नाही. ध्येय म्हणून स्वातंत्र्य-समता-बंधुता अशा उदात्त मूल्याचा स्वीकार केला असला, तरी सतत दडपला गेलेला वर्ग एकदा पेटून उठल्यावर पिढ्यांपिढ्यांतून आपल्यावर होत आलेला अन्याय तो विसरू शकत नाही. अशा परिस्थितीत केवळ सूड घेण्याची भावना भडकून उठते आणि त्या ज्वालेत कोणाचाही बळी पडतो. फ्रेंच राज्यक्रांतीत हेच घडले. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांना पूर्ण विरोध, आणि म्हणून त्यांचे प्रतिनिधित्व करणारे किंवा त्यांच्याशी दुरून संबंधित असणारे जे जे कोणी असतील, त्या सर्वांना यमलोकी पाठवणे, हा एकच दडक होऊन गेला. क्रांतीचे नेतृत्व करणाऱ्या समितीने ही दिशा धरली, आणि त्यामुळे सामान्य जनसमूहाच्या आधीच तप्त असलेल्या भावना आग पेटत जावी तशा भडकत चालल्या. होमकुंडात एकेक आहुती पडावी आणि ज्वाला अधिक उंच उठावी, त्या प्रकारे धर्मगुरू आणि सरदारउमराव, तसेच त्यांचे अनुयायी आणि सारे नातेवाईक यांची मस्तके जसजशी गिलोटिनखाली धडावेगळी होत चालली, तसतशी सामान्य समाजाची सूडाची भावना सामुदायिक क्रौर्याचे रूप धारण करून अधिक अधिक प्रज्वलित होत गेली.

अपराधी मानल्या गेलेल्या व्यक्तीच्या छातीत तलवार खुपसून त्याचा प्राण घेतला, तरी तेवढ्याने मनाचे समाधान झाले नाही. ती तलवार बाहेर उपसून काढून कोणीकोणी त्या भळाळत्या जखमेत खोलवर हात घालून आतील हृदय बाहेर काढले, आणि प्रक्षोभाच्या आवेगात ते आपल्या तोडात टाकले. राजघराण्यातील स्त्रियांचीही धडावेगळी केलेली मस्तके भाल्यावर टोचून मिरवली गेली, विद्रूप केली गेली, आणि त्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे केले गेले. हे सारे पाहण्यासाठी जमलेला प्रचंड जमाव आनंदाने चीत्कार करीत असे. पॅरिसमध्ये या काळात क्रातिचौक या नावाचे एक स्थान निर्माण करण्यात आले होते. जे कोणी तेथे आणले जातील त्यांचा घास घेण्यासाठी तेथे गिलोटिन सतत सज्ज होते. दोन ते सहा सप्टेंबर १७९२ या पाच दिवसांत पॅरिसच्या निरनिराळ्या तुरुंगांतून ठेवलेल्या कैद्यांपैकी बाराशेतेराशे जणाची हत्या झाली. गिलोटिनवर एकेक व्यक्ती बळी देण्यात वेळ जाऊ लागला म्हणून की काय त्यानंतर पन्नास पन्नास जणांना एकाच वेळी बंदुकीच्या फैरीने मारण्याची आणखी एक पद्धत अवलंबिली गेली. पॅरिसबाहेरही अनेक ठिकाणी असेच हत्याकांड झाले. फ्रान्समधील क्रांतीच्या काळातील बळींची ही संख्या पस्तीस हजारांवर पोचली असावी, असे इतिहासात नमूद केले आहे. पण क्रौर्यातील अशा सार्वजनिक

उधाणाला आणि प्रदर्शनालाही अखेर एक सीमा असते. अराजकाचे वातावरण समाज फार काळ सहन करू शकत नाही.

गिलोटिनवरील हत्याकांड पाहण्यास जमणाऱ्या लोकांची गर्दी हळूहळू कमी होऊ लागली. सततच्या या संहारामुळे सर्वत्र भय आणि संशय याचे वातावरण निर्माण झाले. प्रतिनिधीमंडळातील सदस्यांची सभेतील उपस्थिती घटत गेली. तेथेही एकमेकांविषयी संशय. हेच संशयाचे भूत कार्यकारी मंडळाच्या सदस्यांच्या मनात ठाण मांडून बसले. अखेर ज्यांनी अनेकाना परलोकी पाठवले होते, असे डांटन, मॅरट, राब्सपीएर, हे नेतेही गिलोटिनवर गेले. भगवद्‌गीतेत विश्वरूपदर्शनाचे वर्णन करताना म्हटले आहे, ''कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः।'' म्हणजे मी लोकांचा ग्रास करण्यासाठी उभा राहिलेला काल आहे, आणि सर्वांचा संहार करण्यासाठी प्रवृत्त झालो आहे. ते काव्यात्म वर्णन फ्रान्समध्ये प्रत्यक्षात अवतरले

हे सारे घडले स्वातंत्र्य,समता आणि बंधुता या उदात्त तत्त्वत्रयीच्या नावाखाली. समाजाच्या मनावरचे सारेच निर्बंध काढून टाकले, तर तो किती क्रूर, विक्राळ, आणि हिंसक रूप धारण करतो, याचे फ्रेंच राज्यक्रांती हे एक भयकारक आणि जळजळीत उदाहरण आहे. याच्या तुलनेने इंग्लंडचा लोकशाहीकडील प्रवास बराच कमी क्रूरतेचा आणि सखोल विचारावर आधारलेला आहे. पुढे रशियन क्रांतीत फ्रान्सचीच पुनरावृत्ती झाली. स्तालिनने केलेले हत्याकांड कितीतरी पटीनी मोठे आहे. हिटलरच्या जर्मनीत व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेपोटी तसाच अनर्थ घडला. दोन्ही देशांत लक्षावधी निरपराध लोकांची हत्या झाली. त्या दोघांनी मिळून लाखांच्या संख्येत ज्यूंचे शिरकाण केले. त्यांचा अपराध काय, तर केवळ ते ज्यू आहेत. भारतात विषमतेपोटी शतकानुशतके अन्याय झाला, पण अशी सामूहिक हत्या झाली नाही. हे जातिभेद वा अस्पृश्यता यांचे समर्थन नव्हे. दोन संस्कृतीतील भेद दाखवण्यापुरते हे विधान मर्यादित आहे आधुनिक काळातील सुधारलेल्या म्हटल्या जाणाऱ्या, धर्मनिरपेक्ष वैज्ञानिक संस्कृतीचे आदर्श मानल्या जाणाऱ्या, आणि व्हॉल्टेयर, रूसो किंवा कार्ल मार्क्स यांचा वैचारिक वारसा सांगणाऱ्या देशांतील हत्याकांडांची ही कथा आहे. आधुनिकतेचा स्वीकार करताना आपले सारे सांस्कृतिक संचित नाकारून आणि धर्मनिरपेक्षतेची ध्वजा खांद्यावर घेऊन वाट चालताना आपण फार सावध राहिले पाहिजे.

फ्रान्समधील आर्थिक विषमतेला आणि लोकांच्या अपार दुर्दशेला विलासी राज्यकर्ते कारण होते, तितकेच उच्चवर्णीय सरदार आणि उमराव जबाबदार होते. पण केवळ त्यांना परलोकी पाठवून समाजमानसातील संतापाची आग शमली नाही. प्रचंड संहार झाला. सुक्यापेक्षा ओले अधिक जळले. अन्याय करणाऱ्यांना बाजूला केल्यावर. उरलेल्या सर्वांना आपल्या

घोषणेतील तत्त्वत्रयीचा लाभ मिळाला पाहिजे, हे भान क्रोधाच्या आहारी गेलेल्या समाजाला राहात नाही. पण ही नकळत होणारी अराजकाकडील वाटचाल असते. समाज अशी बेबंदशाही फार काळ सहन करू शकत नाही. अखेर नेपोलियनचा उदय झाला आणि फ्रेंच राज्यक्रांतीनंतर काही वर्षे उलटल्यानंतर फ्रान्स काही वेगळाच होऊन गेला. क्रांती पचवण्याइतका तो समाज परिपक्व झालेला नव्हता, असा याचा अर्थ आहे. चित्रपटातील त्या शेवटच्या दृश्यामुळे व्यक्तिगत पातळीवरील असीम त्याग आणि सामाजिक पातळीवरील क्रौर्याचे भीषण दर्शन ही दोन्ही एकत्रित डोळ्यांसमोर उभी राहतात. इंग्लंडमधील सुप्रसिद्ध विचारवत एडमंड बर्क याचे ब्रिटिश पार्लमेंटमध्ये फ्रान्समधील या उत्पातावर उत्कृष्ट भाषण झाले होते.

आजवर चालत आलेल्या साऱ्या गोष्टी समूळ नष्ट करू पाहणाऱ्या फ्रेंच राज्यक्रांतीतील धोक्यांकडे बर्क सातत्याने लक्ष वेधत राहिला. केवळ बहुमताला तसा अर्थ नसतो, आणि बहुमतावर आधारलेल्या लोकशाहीचे रूपांतर झुंडशाहीत होऊ शकते. ही झुंडशाही एखाद्या अन्यायी राजापेक्षाही जुलमी ठरेल. शहाणपण ही एक वेगळी गोष्ट आहे. ती केवळ संख्येवर ठरत नाही, तर अनुभवातून प्राप्त होणारी गोष्ट आहे. परंपरा पूर्णपणे त्याज्य नसते. समाजाचे पिढ्यानपिढ्यांच्या अनुभवाचे संचित परंपरेत लपलेले असते, ते जतन केले पाहिजे. धर्माचे स्थानही असेच आहे. माणसंतील पशुत्व मोकाट सुटू नये, यासाठी धर्माने घालून दिलेल्या निर्बंधाइतका दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा उपयोग होत नाही. सातत्य राखणारी राजसत्ता, परंपरा जतन करणारी धर्मसंस्था, आणि अल्पसंख्येत असणारा समंजस असा उच्चभ्रू वर्ग, या सर्वांना समाजाचे स्थैर्य, रक्षण, आणि दूरगामी कल्याण, या दृष्टींनी फार महत्त्व आहे. एकीकडे राजसंस्था, कायदा व कशाचा तरी धाक; तर दुसरीकडे धर्मसंस्था, कोणता तरी संप्रदाय, आणि कशाविषयी तरी असणारा आदरभाव; या सर्व गोष्टी समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहेत. राजसंस्था, धर्मसंस्था, आणि समाजातील उच्च वर्ग या सर्वांचा पुरापुरा निःपात करण्यासाठी फ्रेंच समाज क्रांतीच्या नावाखाली समोर येईल त्याचा नाश करीत चालला होता. त्यातील धोके बर्कने असे दाखवून दिले.

## क्रांती, प्रगती आणि संस्कृती

फ्रेंच राज्यक्रांती ही अर्वाचीन काळातील एक फार महत्त्वाची घटना आहे. मॅग्ना चार्टापासून प्रारंभ होऊन इंग्लंडमध्ये लोकांच्या प्रतिनिधींच्या हातात अखेर खरी सत्ता आली, ही देखील एक क्रांतीच होती. आणखीही एक क्रांती डोळ्यांसमोर येते. गेल्या दोनअडीचशे वर्षांत पाश्चात्त्य देशांत यंत्रांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला, प्रचंड कारखाने उभे राहिले, आणि तेवढेच प्रचंड उत्पादन होऊ लागले त्यातून मालक आणि मजूर हे दोन वर्ग

निर्माण झाले, संपत्तीची विषम वाटणी फार मोठ्या प्रमाणात झाली. ही आर्थिक क्षेत्रातील सत्ता होती. यांतील सत्ताधीश भांडवलदार होते, आणि ज्यांच्यावर अन्याय होत होता तो कामकरी वर्ग होता. धनशक्तीचे प्रभुत्व असावे का श्रमशक्तीचे असावे, म्हणजेच कारखान्यांच्या व्यवहारावर, कामांच्या तासावर, व नफ्यातील पैशाच्या वाटणीच्या निर्णयावर त्या कारखान्यासाठी पैसा घालणाऱ्या धनिकाची हुकमत असावी, का माल निर्माण करणाऱ्या मजुरांची असावी, असा प्रश्न या नव्या प्रचंड उद्योगांमुळे उदयास आलेल्या औद्योगिक युगात निर्माण झाला.

त्याचा स्फोट प्रथम रशियात होऊन तेथे कामगार क्रांती झाली. तिची परिणती पुढे कशात झाली व पाचसात वर्षांपूर्वी सोव्हिएत रशियाचे तुकडे कसे झाले, हा विषय येथे बाजूला ठेवावा. हा समाजाच्या आर्थिक व्यवहारातील सत्तेचा प्रश्न होता. धनशक्ती आणि श्रमशक्ती एवढेच द्वंद्व यामध्ये वरवर पाहता दिसते. पण यातील एका महत्त्वाच्या घटकाकडे दुर्लक्ष होते असे वाटते. हाताशी पैसा असेल तर तो धंद्यात घालता येतो, किंवा अनेक व्यक्तीकडून भाग भांडवलाच्या रूपाने उभा करता येतो. जो कामगार म्हणून कारखान्यात नोकरी धरतो तो त्याला दिलेले तेवढेच काम करतो. या दोनही घटकांमध्ये माणसाच्या स्वतंत्र बुद्धीला विशेष स्थान नसते. त्याची आवश्यकताही नसते. शास्त्रज्ञ प्रयोगशाळांतून संशोधन करतात आणि ज्ञानाच्या क्षेत्रात भर घालतात. त्यातील सिद्धांतांचे उपयोजन करून त्यांतील कोणीकोणी नवनवीन वस्तू निर्माण करण्याचे तंत्र विकसित करतात. आणि ही तंत्रविद्या आता स्वतंत्र ज्ञानशाखा झाली आहे. अशा प्रयोगशाळांतून काम करणारे लोक बुद्धिमान असावे लागतात.

हे बुद्धीचे देणे सर्वांना सारखे लाभलेले नसते. उपलब्ध ज्ञान काही अंशाने आत्मसात करण्यापलीकडे सामान्य माणसाची बुद्धी जाऊ शकत नाही. प्रचड कारखाने उभे करण्यासाठी आणि त्याचे उत्तम प्रकारे व्यवस्थापन करण्यासाठीही अव्वल दर्जाची बुद्धिमत्ता लागते. हे ध्यानात घेता, श्रमशक्तीचाच शंभर टक्के मान ठेवला आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या हातात निर्णय घेण्याचा सर्व अधिकार दिला, तर उद्योगाची प्रगती व कार्यक्षमता यांवर प्रतिकूल परिणाम होईल. कामगारांची सत्ता व त्यांच्या हातात सारे अधिकार हे तत्त्व मान्य केले, अगदी सामान्य बुद्धी असलेल्या व्यक्तींना सारा अधिकार दिला आणि सर्व निर्णय त्यांच्यावर सोपवले, तर त्यामुळे प्रगतीत अडसर उत्पन्न होईल, ही शक्यता डोळ्यांआड होता कामा नये. संपत्तीच्या वाटणीत न्यायाचे तत्त्व सांभाळले जाणे सांस्कृतिक दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. कोणत्याही मार्गाने असो, पण ते साधलेच पाहिजे. पण विशेष बुद्धिमत्ता नसलेल्यांच्या हातात सारी सत्ता दिली तर प्रगती होणार नाही, याचाही विसर पडता कामा नये.

भांडवलदारी युगात पैशाच्या बळावर धनवंत व्यक्ती बुद्धिमंतांची बुद्धी विकत घेतात, तशीच कामगारांची श्रमशक्तीही विकत घेतात, आणि आपण श्रीमंत होत जातात. धनवंतांचा

पैसा समाजाच्या मालकीचा केला तर हा प्रश्न सुटतो, असे प्रथमदर्शनी वाटते, पण सर्व अर्थांनी सुटत नाही. व्यक्तीची सत्ता अन्याय करू शकते. तशीच समूहाची सत्ता कर्तृत्वाच्या अंगाने कमी पडू शकण्याचे भय असते. संपत्तीचे वाटप योग्य त्या प्रकारे कसे होईल हे पाहून आर्थिक न्याय सांभाळला पाहिजे, पण त्याचबरोबर समाजातील बुद्धिमंतांच्या बुद्धीचा उपयोग करून घेऊन नवे शोध कसे लागतील हेही जपले पाहिजे. त्याचबरोबर उच्च दर्जाच्या व्यवसायातील कार्यक्षमता टिकवण्यासाठी बुद्धीचा वापर केला गेला पाहिजे. एक भाग न्यायाचा आहे, दुसरी प्रगतीचा आहे. समाजाचे हे व्यापक प्रश्न अतिशय गुंतागुंतीचे असतात हेच अखेर खरे. इंग्लंडमध्ये राजसत्तेत प्रजेला वाटा मिळावा म्हणून संघर्ष झाला, व लोकसत्तेची घडी बसवली गेली. लोकांचे प्रतिनिधी निवडतानाही बुद्धिमान आणि प्रतिभावान व्यक्ती तेथे याव्यात या दृष्टीने हाऊस ऑफ लॉर्डस हा भाग ठेवण्यात आला, याचे विस्मरण होऊ नये. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये सर्वसामान्यांचे प्रतिनिधी निवडून येतात. यातही सामान्यांच्या निर्णयाला बुद्धिमंतांचा सहभाग असावा अशी कल्पना आहे.

परिपक्व बुद्धी असणारी माणसे नसतील, तर सर्वसामान्यांच्या मर्यादित बुद्धीमुळे वा अन्य काही रागलोभादी प्रादुर्भावामुळे भलतेच निर्णय घेतले जाण्याचे भय असते. येथेही दोहीचा तोल कसा साधावयाचा, किंवा मेळ कसा घालावयाचा, हा प्रश्न येतो. धनवंत लोभी असतात, सत्ताधीशांना ऐश्वर्याचा हव्यास असतो, तर सामान्य माणसाला तात्कालिक फायदा व्हावा असे वाटत असते. बुद्धिमंतांना दूरचे कळत असले, तरी तेही स्वार्थी असू शकतात. वृत्ती निःस्वार्थ व समाजहितपोषक असेल, तरच बुद्धिमंत योग्य तो न्याय करू शकतील. तेव्हा अखेर धनवंत असो, कामकरी असो, वा बुद्धिमान असो, ज्याच्या हातात सत्ता येईल तो निःस्वार्थी नसेल, तर न्याय वा प्रगती होण्याची शक्यता दूर राहते. अखेर प्रश्न सुसंस्कृतपणाचा आला, आणि हा सुसंस्कृतपणा समाजात कशाच्या आधारावर निर्माण करता येईल किंवा जोपासता येईल, हा प्रश्न आला. हा सोडवणेही सोपे नाही.

सुसंस्कृतपणा नसलेला सत्ताधीश किंवा राजा प्रजेवर जुलूम करू शकतो, त्याच प्रकारे स्वातंत्र्य-समता-बंधुता अशा उदात्त तत्त्वत्रयीचा उद्घोष करीत सारी सत्ता आपल्या हाती घेणारा सामान्य वा त्याहूनही खालच्या पातळीवरील समूह निर्माण झाला, तर तेथे मूळ तत्त्वे फार लवकर बाजूला पडतात, आणि सामूहिक पातळीवरील रागलोभांचा उग्र आविष्कार होतो. फ्रेंच राज्यक्रांतीत तेच झाले. ही क्रांती उग्र स्वरूपात होण्यालाही उच्चवर्णियांचे पिढ्यापिढ्यांचे केवळ स्वार्थी, विलासी, आणि बेजबाबदार वर्तन कारणीभूत होते हेही खरे. सामान्य माणसांना साधा पाव मिळत नव्हता, दोन वेळचे अन्न पुरेसे मिळत नव्हते, आणि सिंहासनावरील राजेराण्या व दरबारातील सरदार-उमराव ऐश्वर्यात लोळत होते. अशी अनेक

दशके गेली, काही पिढ्या गेल्या, आणि ज्वालामुखीचा स्फोट होऊन उकळता लाव्हारस बाहेर पडावा, तसा साठत आलेल्या असंतोषाचा स्फोट झाला. सामान्य माणसांच्या मनातील क्रोधांचा अंगार अन्यायकर्त्यांच्या विरुद्ध उभा ठाकला. त्यात सत्ताधीशाचा बळी पडला व त्यांच्या आसपासच्या गोतावळ्याची आहुती पडली.

पण यानंतर व्यवस्था कशी निर्माण होणार? ती न झाली, तर केवळ विनाशच होत राहणार. त्याला आवर कोण आणि कसा घालणार, हा प्रश्न होता. प्रश्न धोक्याचा कंदील दाखवणारा होता. फ्रान्समधील प्रजेचा हा उग्र उठाव व त्याची भीषण परिणती पाहून युरोपातील इतर देशांतील राजे काही काळ गडबडले होते. इंग्लंडमध्येही समिश्र प्रतिक्रिया होती. हा उदात्त तत्त्वांचा विजय होत आहे असे काही विचारवंतांना वाटले, किंबहुना ते काही काळ हर्षभरित होऊन गेले. पण तत्त्वे उदात्त असली तरी मार्ग योग्य नाही, आणि हा विनाशाकडे घेऊन जाणारा आहे; असे ठाम प्रतिपादन करणारा एडमंड बर्क निघाला. त्याचे पार्लमेंटमधील भाषण तर गाजलेच, पण त्यानंतर त्या अनुषंगाने त्याने जे लिहिले तेही गाजले. अखेर त्याचे म्हणणे खरे ठरले, ही इतिहासाची साक्ष आहे. रशियातील राज्यक्रांतीला एक दुसरी बाजू आहे हे पास्तरनॅकने डॉ. झिवॅगो या कादंबरीत दाखवले, आणि त्या दुसऱ्या बाजूचे भीषण दर्शन सोल्झेनिट्झिनच्या ''फर्स्ट सर्कल'' किंवा ''गुलाग आर्किर्तिलेंगो'' या कादंबऱ्यांतून घडले.

अखेर कामगारसत्ता कोसळली व साम्यवादाचा नवा रस्ता काढणाऱ्या माओ त्से तुंगनंतर आलेल्या चीनमधील नेत्यांना आपल्या तत्त्वज्ञानाला मुरड घालून परकी देशातील भांडवलासाठी आपल्या देशाचे दरवाजे उघडावे लागले. पण तेथेही चारपाच वर्षांपूर्वी बेजिंगच्या चौकात निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांवर निर्घृण गोळीबार केला गेला. शेकडो तरुण मारले गेले, आणि त्यांचा उठाव मोडून काढण्यात आला. आता हॉंगकॉंग चीनच्या ताब्यात गेले आहे, तर तेथे काय घडेल याची चिंता अनेकांच्या मनात आहे. क्रांत्या होतात आणि काहीतरी नवे दर्शन अल्पकाळ घडते. मूळ प्रेरक तत्त्वे उदात्तच असतात. पण ती उदात्तता क्षणिक असते आणि ती क्रांतीच ज्यांना जन्म देते त्या आपल्या अपत्यांना खाऊन टाकते, असा इंग्रजीतील एक उद्‌गार आहे. या साऱ्या अनुकूलप्रतिकूल प्रवाहांतून व त्यांच्या संघर्षातून मानवी संस्कृतीचे भविष्यात काय होणार आहे, याचा नेमका तर्क करता येत नाही. एखाद्या एडमंड बर्कच्या ते लवकर ध्यानात येते ते मात्र खरे.

### राजकीय पृष्ठभूमीवरील कादंबऱ्या

माझ्या मनाने डिकन्सच्या त्या वास्तूत हा एवढा प्रवास केला. डिकन्सच्या समग्र ग्रंथांच्या अनेक आवृत्त्या कपाटात हारीने लावल्या होत्या. त्यांतील ''ए टेल ऑफ टू सिटीज''

या कादंबरीकडे माझे लक्ष नकळत अधिक जात होते. राजकीय पृष्ठभूमी घेऊन उभ्या राहिलेल्या अशा अनेक कादंबऱ्या पाश्चात्त्य देशांत लिहिल्या गेल्या. टॉलस्टॉयची "वॉर अँड पीस" ही कादंबरी नेपोलियनने मॉस्कोपर्यंत मारलेल्या भरारीपर्यंत पोचली आहे. बोरोडिनोच्या युद्धात जखमी होऊन आलेले सैनिक दृष्टीला पडतात आणि त्या कादंबरीतील अठरावीस वर्षाची नताशा आतून बाहेरून बदलून जाते. तिच्या प्रेमाचा विषय झालेला आन्द्रे जखमी होतो. एका तंबूत त्याचे मृत्युशय्येवरील अंतिम दर्शन तिला घडते. अशा अनुभवातून ती अंतर्मुख आणि परिपक्व होत जाते. गिलोटिनवर चाललेली ती डिकन्सने रंगवलेली मुलगी, आणि युद्धात भीषण परिणामाच्या दर्शनातून जाणारी टॉलस्टॉयची नताशा. यांतील पहिलीचे दर्शन केवळ शेवटच्या क्षणी होणारे आहे, दुसरीचे परिवर्तन आपल्या डोळ्यांसमोरून जाते.

रशियातही पुढे कामगारक्रांती झाली. "मदर" ही कादंबरी लिहिणारा गॉर्की, नंतरच्या काळातील बोरिस पास्तरनॅक आणि सोल्झेनित्झिन यांच्या साहित्यकृती त्या क्रांतीच्या वाटचालीचे, आणि अखेरच्या पर्यवसानाचे अप्रतिम चित्र उभे करणाऱ्या आहेत. ऑर्थर कोसलरची "डार्कनेस ॲट नून" किंवा अर्नेस्ट हेमिंग्वेची "फेअरवेल टु आर्म्स" या कादंबऱ्यांची गणनाही यातच करावी लागेल. त्या वाचताना आपण कधी अस्वस्थ होतो, कधी अंतर्मुख होतो, तर कधी आपले सारे हृदय वेदनेने भरून जाते. इंग्लंड, फ्रान्स, आणि रशिया, या देशांतील या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना. दुसरे महायुद्धही यात येईल. चिंतनशील प्रतिभावंतांनी त्या अनुभवांवर आधारलेल्या अविस्मरणीय कलाकृती निर्माण केल्या. भारतातही फाळणी झाली, आणि हजारो लोक मारले गेले तर लक्षावधी परागंदा झाले. पण आपल्याकडे कोणी त्या साऱ्या भीषण वास्तवाचे भेदक दर्शन घडवणारा लेखक निर्माण झाला नाही. असे वाटते की, आपली प्रतिभाही थिटी पडली आणि चिंतनशीलताही तोटकी पडली. असे काही काही मनात घोळत असताना डिकन्सचा निरोप घेतला. एकूण दीड तास त्या घरात होतो. त्या स्मारक म्हणून जतन केलेल्या घरात एक विक्रीकेंद्रही होते. डिकन्सशी संबंधित अशा अनेक वस्तू, पुस्तके व छायाचित्रे तेथे विक्रीसाठी ठेवलेली होती.

मी केवळ एक आठवडा लंडनमध्ये होतो. लंडनमध्ये कला, साहित्य, आणि इतिहास या दृष्टीने पाहण्यासारखे इतके आहे की, संपूर्ण एक महिना दिला तरच लंडनची बरीचशी ओळख होऊ शकेल. पदार्थसंग्रहालये अनेक प्रकारची आहेत. ती सावकाशीने पाहता येण्याइतकी सवड मला नव्हती. एखादा पुतळा किंवा एखादे उद्यान, दहा डाउनिंग स्ट्रीट किंवा ट्राफलगार स्क्वेअर अशा गोष्टी थोड्या वेळात पाहून होतात. पण काही भागात पायी फिरले तर तो परिसर माहीत होतो व तेथे घडलेल्या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांशी आपल्या मनाचे जिवंत नाते जोडले जाते. दुसऱ्या महायुद्धाला प्रारंभ झाल्यावर विन्स्टन चर्चिलवर

नेतृत्व सोपवले गेले राणीकडून रीतसर नियुक्ती झाल्यावर बकिंगहॅम पॅलेसमधील समोरच्या प्रांगणातून बाहेर पडत असलेल्या चर्चिलचे छायाचित्र ग्रंथांतून पाहावयास मिळते. हातात काठी आहे, मुद्रेवर निर्धार आहे, नव्या जबाबदारीच्या जाणिवेने डोळे काहीसे अतर्मुख झाले आहेत. त्या पॅलेसपासून डाउनिंग स्ट्रीटवरील पतप्रधानाचे निवासस्थान, आणि युद्धकाळातील सुरक्षिततेच्या दृष्टीने भूपृष्ठाखालच्या तळघरातील त्यांचे कार्यालय, हा सारा भाग पायी फिरून पाहिला, तर चर्चिलच्या आत्मचरित्रातील दुसऱ्या महायुद्धाचा काळ आपल्या दृष्टीसमोर साकार होतो. असे सारे करता आले असते तर फार बरे वाटले असते. पण मी केवळ एक आठवडा लंडनमध्ये फिरू शकलो, आणि त्यातलेही दोन दिवस एक वेगळे स्थान पाहण्यात गेले.

**इंग्लंडमधील रामकृष्ण वेदान्त सेंटर**

राजा राममोहन रॉयमुळे भारतातील प्रबोधनयुगाचा प्रारभ झाला. एकोणिसाव्या शतकात परतंत्र भारताला जगात कोणताही मान नव्हता. दादाभाई नवरोजी, केशवचन्द्र सेन किंवा प्रतापचंद मुजुमदार असे कोणी कोणी भारतावर इंग्रजांचे अधिराज्य प्रस्थापित झाल्यानंतरच्या साठसत्तर वर्षात इग्लंडमध्ये गेले, व त्यांना थोडीफार मानाची वागवणूक मिळाली. पण भारताबद्दल व त्याच्या संस्कृतीबद्दल आदर उत्पन्न व्हावा अशी स्थिती सर्वात प्रथम स्वामी विवेकानन्दांच्या कार्यामुळे निर्माण झाली. ही १८९५-मधील घटना आहे. ज्या इंग्रज लोकांचे राज्य भारतावर होते, त्या समाजातही विवेकानन्द स्वाभिमानाने व ताठ मानेने वावरले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा काही ठसा इग्लंडमध्ये उमटला. विवेकानन्दाचे कार्यक्षेत्र अध्यात्म व तत्त्वज्ञान या क्षेत्रातील होते, आणि भारताचा आध्यात्मिक विचार पाश्चात्त्य देशांत पोचवणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. आपले कार्य चालू राहावे यासाठी त्यांनी इंग्लंड व अमेरिका येथे काही संस्था उभ्या केल्या. पण त्या हिंदू धर्माचा प्रचार करण्याच्या हेतूने काढल्या नव्हत्या. कोणी आपण होऊन आपला धर्म बदलला तर ती ज्याची त्याची वैयक्तिक बाब आहे, अशी त्यांची दृष्टी होती

विवेकानन्दांना सर्व धर्मातील सत्त्वांशाबद्दल आदर होता. तो ठेवून ते आपले वैचारिक क्षेत्रातील कार्य करीत होते म्हणून त्यांनी वेदान्त सेटर उभे केले. १८९६-च्या डिसेंबरमध्ये ते लडनमध्ये होते, व पाश्चात्त्य देशांतील आपला साडेतीन वर्षाचा सचार सपवून ते भारताकडे परत गेले. त्याच्या आधी त्याचा अद्वैतवेदान्ताच्या तत्त्वज्ञानावरील अखेरचा वर्ग आताच्या व्हिक्टोरिया स्थानकापासून अगदी जवळ असलेल्या रस्त्यावरील एका इमारतीत झाला. त्या वेळच्या इमारती आता राहिलेल्या नाहीत. दुसऱ्या महायुद्धात जो विध्वस झाला त्यात पूर्वीच्या अनेक इमारती नष्ट झाल्या. विवेकानन्दांच्या त्या वर्गाला चारशेपाचशे श्रोते येत

असत, आणि त्यांच्या विचारांनी ते सारे भारावून गेले होते. त्याच वेळी वेदान्त सोसायटीच्या कामाचा प्रारंभ झाला होता. पण कार्यकर्त्यांच्या अभावी व इतर काही कारणांमुळे ती संस्था वर्षभरातच बंद पडली. त्यानंतर १९३९- च्या सुमारास इंग्लंडमध्ये रामकृष्ण वेदान्त सेंटरचे काम पुन्हा सुरू झाले.

तो सेंटर पाहावयाला जाण्यासाठी एक ऑक्टोबरला सकाळी मी व्हिक्टोरिया स्थानकावर उतरून पॅडिंग्टनला जाणारी गाडी पकडली. हा भुयारी लोहमार्गाचा प्रवास होता. पॅडिंग्टनला गाडी बदलून अर्ध्या तासात मेडनहेड येथे उतरलो. अगदी छोटे स्थानक. तेथून अर्ध्या तासाने दुसरी गाडी घेऊन सातआठ मैलांवरील बोर्न एण्ड येथे पोचलो. हे छोटेसे गाव लंडनपासून सुमारे पंचवीस मैल दूर आहे. पॅडिंग्टन ते मेडनहेड ही गाडी पुढे रीडिंगपर्यंत जाणार आहे, हे डब्यामध्ये गाडीचा मार्ग दाखवणारा विजेने प्रकाशमान झालेल्या अक्षरांतील फलक सारखा सरकत होता त्यावरून समजले अमेरिकेहून विवेकानन्द प्रथम इंग्लंडला आले, तेव्हा त्यांचे वास्तव्य रीडिंग येथे स्टर्डी यांच्याकडे होते, त्याची आठवण झाली. मेडनहेडपासून रीडिंग बारापंधरा मैल अंतरावर असावे. बोर्न एंडला उतरलो तेव्हा दुपारचा एक वाजला होता. पॅडिंग्टन सोडल्यापासून इंग्लंडच्या ग्रामीण भागाचे दर्शन घडत होते. बोर्न एण्ड तर एक खेडेगावच म्हणावे लागेल. पण सर्वत्र स्वच्छता, रस्ते भरपूर रुंद, टुमदार घरे, आणि त्यांच्या आवारात नीटस बागा असे दृश्य होते. त्या ऐन दुपारी रस्त्यावर चारदोन माणसेही नव्हती. ब्लाइंड लेन या रस्त्यावर पोचावयाचे होते. टॅक्सीही नव्हती. सुदैवाने सरळ रस्त्याने जात असताना ब्लाइंड लेन ही पाटी दिसली. स्थानकापासून एक मैल दूर असलेल्या वेदान्त सेंटरच्या आवारात पोचलो तेव्हा दीड वाजून गेला होता.

अवेळ झाली होती, पण मी आधी कळवले होते. एका ब्रह्मचाऱ्याने दार उघडले, जेवणाची व्यवस्था केली, आणि अतिथिगृहातील एका खोलीत माझी व्यवस्था केली. खोलीत तिघांची सोय होती, पण मी एकटाच होतो. वातानुकूलित इमारत, आणि अद्ययावत सर्व सुविधा होती. जेवणाच्या वेळी पाहिले, तर स्वयंपाकाची व्यवस्थाही विजेच्या आधुनिक उपकरणांनी सज्ज होती. सकाळपासून दोन वाजेपर्यंत भटकत आल्यामुळे शरीर शिणले असावे. अडीचला आडवा झालो. केव्हा झोप लागली ते समजलेही नाही. जागा झालो तर घड्याळात सहा वाजले होते. विश्रांती उत्तम मिळाली होती, पण पूजाघरातील आरतीला दहा मिनिटे उशिरा पोचलो. सेंटरचे प्रमुख स्वामी दयात्मानन्द दोन दिवस आधी अमेरिकेला गेले होते. आठ वाजता जेवणाच्या वेळी त्यांचे साहाय्यक स्वामी त्रिपुरानन्द यांना मी बेलूर मठातील रामकृष्ण संघाचे कार्यवाह स्वामी स्मरणानन्द यांचे परिचयपत्र दिले व त्यांचे ते वाचून झाल्यावर ''रामकृष्ण आणि विवेकानन्द'' या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर त्यांच्या हाती

पाहण्यासाठी दिले आणि म्हटले, "This is my humble coutribution", आपलेच पुस्तक अशा प्रकारे आपण होऊन कोणाला दाखवावे व आपण हे लिहिले आहे असे सांगावे, हे खरे तर नम्रतेला सोडून आहे.

पण आपण परदेशात आलो आहोत तेव्हा रामकृष्ण-विवेकानन्दांशी आपल्या मनाचा असलेला धागा सहजपणे ध्यानात यावा या दृष्टीने मी हा मार्ग स्वीकारला. पुढील प्रवासातही हीच पद्धत ठेवली. एवढे करणे पुरेसे ठरते, अधिक काही बोलावे लागत नाही, आणि पुढचा संवाद सोपा होतो, असा अनुभव मला येत गेला. जेवण झाल्यावर थोडा वेळ सर्वजण एकत्र बसलो. पाचसहा जण होते. एका पुस्तकातील काही भाग कोणीतरी मोठ्यांदा वाचला व बाकीचे सर्वजण ऐकत होतो. वाचन संपल्यावर एका कपाटाशी चारदोन पुस्तके होती, त्यांतील एक पुस्तक घेऊन मी माझ्या खोलीत गेलो. पुस्तकाचे नाव होते "Involved in Mankind." लेखक मार्कस टॉइन. ते पुस्तक वाचण्यात नऊ ते अकरा एवढा वेळ गेला. पुस्तक विवेकानन्दांवर होते. विवेकानन्दांचे विचार अवघ्या मानवजातीसाठी होते, आणि त्यांचे मन हरएक मानवाला त्याच्या विकासाचा मार्ग दाखवण्यात गुंतलेले होते; असा त्या शीर्षकाचा अर्थ होता.

### "वनशोभेची खाणी उघडे।"

दुसरे दिवशी सकाळी सहा वाजता जागा झालो, आणि पाहतो तर खोलीत खिडकीतून स्वच्छ चांदणे पडले होते. गेल्या आठदहा दिवसांत चारपाच दिवस तर पाऊसच होता. आकाश सदैव ढगाळ होते. काही वेळा रस्त्यावर बोचरा थंड वारा असे. त्यामुळे चांदणे दिसल्यावर कुतूहल वाटले. खिडकीतून बाहेर दृष्टी टाकली, आणि स्वच्छ निळया आकाशातील इंग्लंडमधील चंद्र पाहिला. मन प्रसन्न झाले. इंग्लंडमध्ये हा अनुभव अपवादात्मकच म्हणावयास हवा. चंद्र भारतात असतो तसा डोक्यावर नव्हता. आकाशाच्या मध्यभागी पण क्षितिजाकडे तिरका होता. पुण्याच्या तुलनेने मी खूपच उत्तरेला आलो होतो, त्यामुळे हा फरक जाणवला. येथील सूर्यचंद्र व ग्रहनक्षत्रे यांचे मार्ग पृथ्वीच्या पृष्ठभागावरील भिन्न स्थानाना अनुसरून आहेत. विजय तासे याला इंग्लंडच्या निरभ्र आकाशातील हा चंद्रदर्शनाचा अनुभव नंतर सांगितल्यावर तो म्हणाला की, तो एकदा स्कॉटलंडमध्ये गेला असताना त्याला अकस्मात ऑरोरा बोरिॲलिस म्हणजे उत्तर ध्रुवाकडच्या प्रदेशात उषःकालच्या प्रकाशातील आंकाशाच्या विशाल पटावरील रमणीय रंगांचे अद्‌भुत दृश्य पाहावयास मिळाले होते. "एक तास ते दृश्य मी पाहात होतो, तो अनुभव अविस्मरणीय आहे", असे दिजय म्हणाला.

उत्तर ध्रुवावर सहा महिन्यांची रात्र तर सहा महिन्यांचा दिवस असतो आणि उषःकाली

उजळत जाणाऱ्या प्रकाशाची शोभा दोनतीन आठवडे दिसत राहते. नाना रंगांचे झगमगणारे झुळझुळीत संधिप्रकाशाचे आकर्षक पडदे उंच उंच आकाशात सोडलेले आहेत, असे ते उषःकालच्या शोभेचे प्रदीर्घ काळ चालत राहणारे विलसित असते. छायाचित्रांवरून आपण त्याची काही कल्पना करू शकतो. ही आपली विशाल पृथ्वी. तिच्या पृष्ठभागावर तीनचतुर्थांश भागात समुद्र, तर उरलेल्या भागात जमीन आहे. कोठे वाळवंट तर कोठे हरितभूमी. कोठे वृक्ष तर कोठे शेती. कोठे सपाट प्रदेश तर कोठे खोल दऱ्या. उंच पर्वतप्रदेशातून निघून वळणावळणांनी मार्ग काढत सागराला मिळणाऱ्या नद्यांचे प्रवाह, तर कोठे समुद्राएवढा विस्तार असणाऱ्या सरोवरांवर उठणाऱ्या जललहरी. स्वच्छ निळे निळे आकाश, अनंतात दृष्टी रोखून त्याच्याकडे पाहावे असे, तर कोठे काळ्याभोर ढगाचा मांडव, सारा भूप्रदेश अंधारून टाकणारा. पर्वत एक जागी स्थिर, तर सागराच्या खळाळणाऱ्या लाटा अहोरात्र किनाऱ्याकडे धाव घेत असलेल्या.

त्या लाटांचा मन्द्रगंभीर आवाज रात्रंदिवस चालू असलेला, तर अरण्यप्रदेशात सर्वत्र पक्ष्यांचा मधुर किलबिलाट चाललेला. याच्या उलट हिमालयासारख्या पर्वताच्या दरीत कोठेकोठे पिऊन घ्यावी अशी नीरव शांतता, तर सभोवार तशीच निःस्तब्ध अशी सृष्टी. कोठे वर्षात सारख्या कालमानाचे तीन ऋतू, तर कोठे दररोज पडणारा सूर्यप्रकाश व तसाच रिमझिम बरसणारा पाऊस. कोठे घनदाट अरण्य तर कोठे मानवाने फुलवलेली शेते, दररोज सकाळ-संध्याकाळ आकाशात संधिप्रकाशाचा खेळ. सकाळी उजळत जाणाऱ्या दिशा तर सायंकाळो काळवंडत जाणारे आकाश. त्यातच कलेकलेने वाढत जाणारा व नंतर कमी होत जाणारा चंद्राचा प्रकाश. निसर्गातील सौदर्याचे भिन्न भिन्न प्रदेशात दिसणारे आणि नित्य नवनवीन मनोहर रूपे धारण करून उभे राहणारे हे विविधरंगी दर्शन. त्याची ही अपार शोभा दृष्टीखालून घालता येणे हेदेखील जीवनातील एक आगळेवेगळे भाग्य आहे. पण ते भाग्य लाभण्यासाठीही काही भाग्य लागते आणि ते भाग्य समोर चालून आले तरी त्यातील निर्मळ आनंद घेण्याची रसिक वृत्तीही लागते. या सर्वांचा मेळ पडतो तेथे मूर्तिमंत आनंद अवतरतो. त्यातलाच एक अल्पशा अंश खिडकीतून दिसणाऱ्या त्या चंद्राने माझ्या पदरात टाकला.

हवा अतिशय प्रसन्न होती. सकाळच्या चहानतर मी सेंटरच्या दहा एकरांच्या आवारात सर्वत्र फिरलो. सुंदर बाग केलेली होती. नाना प्रकारची रंगीबेरंगी फुले वाऱ्यावर डुलत होती हवेत थंडी होती, पण सूर्यप्रकाश स्वच्छ होता. सेंटरची जागा एका छोट्याशा टेकडीच्या उतारावर आहे. एका ठिकाणी काचघरात रोपवाटिका होती. अनेक झाडांची रोपे व कलमे तेथे वाढवली जात होती. दररोज दोनतीन तास बागेत काम करणे हा तेथे नित्याच्या कार्यक्रमातील भाग होता. कोठेकोठे फुलझाडे होती, कोठे वेली होत्या, तर अधूनमधून

हिरवळ होती, आणि जागोजाग लहानमोठे अनेक वृक्ष होते. टेकडीच्या उतारावरचे हे प्रशस्त आवार, त्यात दोनतीन इमारती, सर्वत्र सपूर्ण शातता. उतारावरून खालच्या बाजूला दृष्टी टाकली तर दिसणारी छोटी छोटी घरे; आणि रेखीव प्रशस्त रस्ते. एक तासभर मी सेंटरच्या आवारात स्वस्थपणाने फिरत होतो. सर्वत्र हिरवीगार सृष्टी. पण नुसतीच हिरवीगार नव्हती थंडीच्या ऋतूपूर्वी होणाऱ्या पानगळीच्या आधीचे हे दिवस होते. या अवधीत साऱ्या झाडांवर नाना रंगांची मैफल जमते. आपल्याकडे पोपटी, हिरवी आणि पिकलेली पिवळी पाने अधिकांश दिसतात. क्वचित कोठे लालसर छटा आढळते. पण येथील रंगांची विविधता काही वेगळीच होती.

मूळ पाने हिरवीगार, पण त्यांचे रंग बदलण्यास प्रारंभ झाला होता. गुलाबी, शेंदरी, केशरी, पिवळसर, जांभूळसर असे निरनिराळे रंग, तर काही इतके समिश्र की त्याना नेमके नाव देता येणार नाही. थंडीतील शुष्कपणा पानांतून उतरण्यास अद्याप अवकाश होता. सकाळच्या स्वच्छ सूर्यप्रकाशात तजेलदार पानांवरील रंगांचे जणू मनोहर नृत्य चालले होते. कारण एकच एक छटा दिसत नव्हती. फिरत असताना प्रकाशाचा कोन बदलला की, रंगांच्या छाटेत फरक पडे, आणि प्रत्येक क्षणाला ती नवनवीन वेष धारण करी. ''का उद्यानी माधवी घडे। तेथे वनशोभेची खाणी उघडे।'' असे ज्ञानदेवाचे उद्‌गार आहेत. येथे वृक्षसौंदर्याच्या जोडीने रगसौदर्य उभे राहिले होते. मोठे आणि लहान असे सारे वृक्ष हे आपले रंगवैभव दिमाखात मिरवीत होते. कोठेकोठे मध्यम वा थोडी लहान झाडे होती आणि त्यांवरील पानांचा रंग जांभळा, पिवळा, किवा लालसर गुलाबी असा एकच एक होता. आपण घरात पुष्पगुच्छ ठेवावेत तसे हे भलेमोठे पर्णगुच्छ त्या आवारात ठिकठिकाणी मांडून ठेवले आहेत असे वाटले. एक तासभर हा सारा आनंद घेऊन मी सेंटरच्या इमारतीत आलो. वृक्षावरील रगाची ही शोभा यानंतरच्या दीड महिन्याच्या प्रवासात सर्वत्र माझी सोबत करणार होती.

### मानवमात्रात गुंतलेले विवेकानन्द

सकाळच्या नास्त्याच्या वेळी स्वामी त्रिपुरानन्दांशी निवातपणे संवाद झाला. ते इंग्रज आहेत. गौर वर्ण, मध्यम बांधा, सात्त्विक मुद्रा, प्रसन्न दर्शन, असे त्याचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आहे भगवी वस्त्रे परिधान केलेला एक इंग्रज सन्यासी आपल्यासमोर आहे, ही जाणीव मन सुखावणारी होती. बोलणे मनमोकळे होते, आणि त्यांचे इग्रजी उच्चार मला नीट समजत होते. इतरत्र काही वेळा अडचण येत असे. संन्यास घेण्यापूर्वी ब्रह्मचारी प्रशिक्षण वर्गाचा अभ्यासक्रम पुरा करण्यासाठी त्रिपुरानन्द बेलूर मठात सव्वादोन वर्षे होते. त्यांनी भारतात काही प्रवासही केला होता. बोर्न एण्डचा हा सेंटर १९३९- च्या सुमारास निघाला प्रशस्त

इमारत आहे आणि अद्ययावत सर्व सुविधा आहेत. सतराअठरा अतिथींसाठी पूर्ण सुसज्ज अशा खोल्या आहेत. एवढी व्यवस्था केली आहे त्या अर्थी तेवढी गरज पडत असणार. हे सारे काही देणग्यांतून उभे राहिले आहे, आणि सेंटरच्या कामासाठी पुरेशा देणग्या येत असतात. ग्रंथालयाचा लाभ कोणीकोणी घेतात. रविवारच्या साप्ताहिक प्रवचनाला चाळीस-पन्नास, तर लंडनमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित करतात तेव्हा अडीचतीनशे श्रोते येतात. उपनिषदे, भगवद्‌गीता, अद्वैत वेदान्त, हे प्रमुख विषय प्रवचनात असतात. एखाद्या ग्रंथावर वर्ग चालू असतो, त्याला आठदहा जण येत असावेत.

भारतातील रामकृष्ण मठातून रोजची वर्दळ असते. कालडी, आल्मोरा, मायावती अशी अपवादात्मक केन्द्रे वगळली, तर बहुतेक ठिकाणी संध्याकाळच्या आरतीला तीसचाळीस भक्त असतात, कोठे कोठे त्याहून अधिक. पण मठात ये-जा सतत चालू असते. या पाश्चात्त्य देशांतील राहणीला अनुसरून सोमवार ते शुक्रवार या दिवसांत दहापाच व्यक्ती येतात. शनिवार-रविवारी खरी वर्दळ असते. बोर्न एण्डच्या या सेंटरमध्ये सध्या दोन संन्यासी व पाच ब्रह्मचारी आहेत. भारतीय संस्कृतीतील उदात्त विचारांचा परिचय करून देणारे एक केंद्र इंग्लंडच्या या भूमीत उभे आहे, ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे. किती लोक येतात, हे कुतूहल फार व्यक्तींना असते. पण या केन्द्रांचे महत्त्व संख्येवर ठरत नसते. अशा ठिकाणी येण्यासाठी मनाची एक वेगळी वृत्ती लागते, आणि जीवनविषयक विशिष्ट दृष्टिकोण असावा लागतो, त्यासाठी बुद्धिमत्तेची काही पातळी असावी लागते आणि संयमी जीवन व्यतीत करण्याची प्रवृत्तीही लागते. अशा व्यक्ती भारतात तरी किती आढळतात? लाखांनी वस्ती असते, पण अशा ठिकाणी मठात येणाऱ्यांची संख्या काही शेकड्यांतच मोजावी लागते. आरतीच्या वेळी दोन इंग्रज आलेले दिसले, त्यांतील एक वृद्ध महिला होती. तिचा विनम्र श्रद्धाभाव चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. आध्यात्मिकतेचे हे सारे विश्व वेगळे असते, आणि त्याचे जिज्ञासूही थोडेच असतात. हे भारतात आहे, तसेच येथे विदेशात आहे, असे हा परदेशातील पहिला वेदान्त सेंटर पाहताना मनात आले.

स्वतंत्र भारताच्या वतीने कधीकधी सांस्कृतिक शिष्टमंडळे परदेशांत पाठवली जातात. देशादेशांत स्नेहभाव उत्पन्न होण्याच्या दृष्टीने किंवा औपचारिक संबंध ठेवण्याच्या दृष्टीने ही प्रथा चांगली आहे. त्या शिष्टमंडळात कोणत्या प्रकारच्या व्यक्ती असतात, याचा विचार स्वतःशी करून पाहण्यासारखा आहे. भारतात कोणीतरी बाहेरचा राष्ट्रप्रमुख येतो. त्याच्या सन्मानार्थ मेजवानी दिली जाते, तसाच एक सास्कृतिक कार्यक्रम सादर केला जातो. काय असते त्या कार्यक्रमात? हे सारे कार्यक्रम केवळ करमणुकीचे असतात. नृत्य, नाट्य किंवा संगीत हे सारे कलांचे विश्व आहे, यातून भारताच्या सौंदर्यसृष्टीचे किंवा कलावंतांच्या

कौशल्याचे दर्शन घडते. पण हा दिवसभराचा कामाचा व्याप आवरला आणि संध्याकाळचा प्रहर उलटला की, दोन घटका मनोरंजन करण्याचा भाग असतो. यात आपल्या देशाच्या संस्कृतीचे केवळ एक छोटेसे रूप दिसते. हे संस्कृतीचे सर्वाधिक महत्त्वाचे अंग नव्हे. या कार्यक्रमांना मनोरंजन किंवा कलादर्शन असे नाव देणे योग्य होईल.

हरएक राष्ट्राच्या जीवनात व्यक्तिगत आणि सामाजिक अशा दोन्ही पातळयांवर ज्या मूल्यांचा आदर केला जातो, मानवी जीवनाचे जे आदर्श मानले जातात, आणि ज्यात मानवाच्या आयुष्याचे श्रेय साठवलेले आहे असे समजले जाते, त्या द्वारा त्या त्या समाजाची संस्कृती व्यक्त होत असते. एखादा मनुष्य उत्तम संगीत सादर करू शकतो, किंवा सतारीवर आपली बोटे कुशलतेने चालवू शकतो, म्हणून तेवढ्यावर त्याला आपण सुसंस्कृत समजत नाही. कला, विद्वत्ता, सत्ता किंवा ऐश्वर्य या सर्वांच्या पलीकडे पोचणारी आणि त्या सर्वांसह जीवनाला काही उन्नत रूप देणारी अशी जी जीवनमूल्ये असतात, त्यांत संस्कृती साठवलेली असते. व्यक्तीचे श्रेष्ठत्व आपण या आधारे ठरवतो. तेच समाजाच्याही बाबतीत आहे. या दृष्टीने पाहू गेले तर बोर्न एण्ड या खेड्यात असलेला तो रामकृष्ण वेदान्त सेंटर भारताच्या संस्कृतीचे एक प्रतीक होता, असे म्हणता येते. संस्कृतीतील हे मर्म आणि त्यातील उदात्तत्व जाणणारे तेथे कोणीकोणी आहेत, याचा प्रत्ययही मला सहज येऊन गेला.

मार्कस् टॉइनचे पुस्तक आदल्या रात्री दोन तास वाचले होते, दुसऱ्या दिवशी जेवणाच्या वेळेपर्यंत उरलेले वाचून संपवले एकशेसाठ पृष्ठांचे हे पुस्तक या सेंटरने प्रसिद्ध केले आहे. मुद्रण आणि निर्मिती उत्कृष्ट आहेत. टॉइन विल्टशायरमध्ये प्रौढ शिक्षणाचे काम करतात. दहाबारा वर्षांपूर्वी कोणीतरी त्यांना विवेकानन्दाची व्याख्याने वाचावयास दिली, आणि त्यांतील विचारांनी ते भारावून गेले. त्यानंतर त्यांचा या वेदान्त सेंटरशी संबंध आला, आणि त्यांनी विवेकानन्दांचे इतर ग्रंथ वाचले. त्यांच्या मनावर आरंभी पडलेला प्रभाव उत्तरोत्तर वाढत गेला, आणि अखेर त्यांनी हे पुस्तक लिहिले. विवेकानन्दांचे चरित्र आणि विचार असे पुस्तकाचे स्वरूप आहे. टॉइनना विवेकानन्दांचे नेमके आणि सामग्र्यात आकलन झाले आहे, हे''मानवजातीत मनाने गुंतलेली एक महान विभूती'' असे जे शीर्षक त्यांनी पुस्तकाला दिले आहे, त्यावरून स्पष्ट होते. इंग्लंडला विवेकानन्दांची ओळख अद्याप पटावयाची आहे, असा उल्लेख त्यांनी प्रस्तावनेत केला आहे. आजच्या जागतिक परिस्थितीचे विदारक रूप त्यांनी अनेक संदर्भ देऊन पुस्तकात स्पष्ट केले आहे, आणि मानवाच्या कल्याणाचा विचार न करणारे विज्ञान जगाला कोठे घेऊन जाणार आहे याबद्दल चिंता व्यक्त करून, त्यासाठी जगाला आज ना उद्या विवेकानन्दाच्या विचारांचा स्वीकार करावा लागेल, असा निष्कर्ष त्यांनी अखेर काढला आहे. इंग्लंडचा भूतकालातील पराक्रम आणि त्यांचे वैभवशाली साम्राज्य यांची साक्ष

पटवणाऱ्या अनेक गोष्टी मी लंडनमध्ये पाहिल्या होत्या, पण मानवजातीच्या नियतीच्या दृष्टीने या सर्वांची परिणती कशात होणार आहे, याविषयीचे उद्‌बोधक विचार या पुस्तकात सहज वाचावयास मिळाले.

दुपारी तीन वाजता स्थानकावर जाण्यासाठी निघावे लागेल, असे त्रिपुरानन्द म्हणाले होते, त्याप्रमाणे पाच मिनिटे आधी खाली आलो. त्यांचा निरोप घ्यावा म्हणून इकडे-तिकडे पाहात होतो, तर ते दाराशी गाडी घेऊन तयार असलेले दिसले. ते मला स्वतः स्थानकावर पोचवावयास येतील ही अपेक्षा मला नव्हती. थोडे आश्चर्य वाटले मी काही कोणी मोठा माणूस नव्हतो. पण हे त्यांचे सहज सौजन्य होते आणि ते आपल्या वाट्याला आले, एवढाच त्याचा अर्थ मी घेतला. गाडीत मी त्याना म्हटले की, विवेकानन्द राहात होते ते रीडिंग येथून जवळ आहे. त्याला समती दर्शवून ते म्हणाले, ''मेडनहेडला विवेकानन्दांचं पहिलं व्याख्यान झालं, पण ते सभागृह आता नाही.'' मी अधिक चौकशी केली, तर विवेकानन्दांचे शेवटचे वर्ग लंडनमधील ज्या इमारतीत झाले तीही आता नाही, आणि भगिनी निवेदितांच्या विंबल्डन भागातील घराजवळ सारी दुकाने झाली आहेत, असे त्यांनी सांगितले. या जागा दृष्टीखालून घालाव्यात असे मनात होते, पण शंभर वर्षापूर्वीचे त्यांचे मूळचे रूप आता राहिलेले नाही, हे ध्यानात घेऊन तो विचार बाजूला ठेवला. बोर्न एण्ड स्थानकावर त्रिपुरानन्दांचा निरोप घेतला.

### डांटेची ''डिव्हाइन कॉमेडी''

विजयकडे मी आलो त्या दिवशी रात्री जेवणानंतर त्याचा छोटासा ग्रंथसंग्रह पाहात होतो, तर त्यात डांटेचे ''डिव्हाइन कॉमेडी'' हे पुस्तक दिसले. या महाकाव्याबद्दल मला उत्सुकता होती. महाविद्यालयात असताना मिल्टनच्या ''पॅराडाइज लॉस्ट'' या महाकाव्याच्या एका सर्गाचा अभ्यास करावा लागला होता. त्यातील सेटन हे पात्र ध्यानात राहिले होते होमरची इलियड आणि ओडेसी ही युरोपातील प्राचीन महाकाव्ये. पण ती फार उंचीवर पोचत नाहीत. मिल्टन आणि डांटे यांची महाकाव्ये खिस्तधर्मातील ईश्वर आणि मानव याविषयीच्या मूलभूत सिद्धांन्तांशी निगडित आहेत. मानवाने मूलतः एक अपराध केला आहे. ज्ञानवृक्षाचे फळ तोडणे हा अपराध का मानला जावा, हे आपल्याला उलगडत नाही. पण त्या अपराधाचे किंवा खिस्तधर्माच्या परिभाषेत ''ओरिजिनल सिन''चे प्रायश्चित्त घेण्यासाठी सर्व मानवांच्या वतीने येशू खिस्ताने क्रूसावर बलिदान केले, अशी कल्पना आहे. त्या बलिदानाचे आपल्याला सतत स्मरण राहावे यासाठी चर्चमध्ये क्रॉसला मध्यवर्ती स्थान दिलेले आहे, आणि क्रूसावर लटकलेले छायाचित्रही अनेक ठिकाणी लावलेले आढळते.

अशा प्रतीकांचे काही अर्थ लावता येतात. " To err is human" म्हणजे एखादी

चूक हातून घडणे हे मानवाच्या बाबतीत स्वाभाविक आहे, असे इंग्रजीत म्हटलेले आहे, आणि म्हणून कोणाच्याही हातून होणाऱ्या चुकीच्या बाबतीत आपण सहानुभूतीची दृष्टी ठेवली पाहिजे, माणसाला मोह पडू शकतो हे ध्यानात घेतले पाहिजे, हा त्या वाक्यातील सूचक आशय आहे. याचीच अखेरची परिणती होते ती "To Understand all is to forgive all,"म्हणजे कोणालाही आपण समजून घेऊ शकलो, तर त्याच्या हातून घडणाऱ्या कमी-अधिक गोष्टीबद्दल राग न धरता क्षमेचा भाव धारण करता येईल, आणि अखेर सर्वांच्याच बाबतीत क्षमाशील राहता येईल. एवढ्या व्यापक सहानुभूतीशी पोचणे सोपे नाही, हेही तितकेच खरे. कोणाच्याही किरकोळ चुकांविषयीची अढी मनात खोलवर रुतून बसते, असा आपला अनुभव असतो. अनेकांशी वागत असताना त्याची प्रतिक्रिया उमटते. त्या चुकीबद्दलचा राग मनातून जात नाही. याचा अर्थ असा झाला की, मनुष्य प्रमादशील किंवा स्खनशील आहे तसाच तो क्रोधशीलही आहे. प्रमाद आपल्या बाजूने टाळला पाहिजे आणि क्रोध दुसऱ्याशी वागताना आवरता आला पाहिजे.

माणसाने आपल्या या स्खलनशीलतेचे भान ठेवावे, असा ओरिजिनल सिनचा एक उलगडा करता येतो. ''ज्यानं कोणतंही पाप केलेलं नसेल त्यानं या दुराचारी म्हटल्या गेलेल्या स्त्रीवर पहिला धोंडा मारावा'', असे येशू ख्रिस्ताने म्हटले, त्याचा अर्थही अखेर हाच आहे. काम आणि क्रोध हे माणसाला भलत्या दिशेला नेतात, आपल्या प्रगतीच्या मार्गातील ते शत्रू आहेत हे जाणून असावे, आणि म्हणून कामनेपासून दूर राहावे तर क्रोधभावनेला आळा घालावा, असे भगवद्गीतेतही म्हटलेले आहे. माणसाला पडणारा मोह तोच मिल्टनने रंगवलेला सेटन किंवा सैतान होय. हा अतिशय बलवान असतो तेव्हा त्यापासून आपले रक्षण होण्यासाठी स्वतःची दुर्बलता सतत ध्यानात ठेवून ख्रिस्ताला शरण जावे, तोच आपला एकमेव आधार आहे असे मानावे, असे थॉमस-ए-केम्पिसने ''The Imitation of Christ" या ग्रंथात म्हटले आहे. या शरणभावाचा अतिशय परिणामकारक पुरस्कार त्याने केला आहे. सद्वर्तनी राहण्यासाठी माणसाने आटोकाट प्रयत्न केला पाहिजे, असा त्याचा अर्थ घेता येतो. यात मनुष्य विजयी होतो, तेव्हा ती त्याची Divine Comedy ठरते, असे डांटेच्या या महाकाव्याचे अंतिम सूत्र आहे असे म्हणता येईल.

भगवद्गीतेने ''उद्धरेदात्मनात्मानम्'' म्हणजे आपणच आपला उद्धार करावा असे म्हटले, यामध्ये माणसाच्या ठायी असणाऱ्या सुप्त शक्तीवर भर दिलेला आहे. पश्चात्तापदग्ध बुद्धी धारण करून सतत अपराधीपणाचा भाव धारण करावा, का स्वतःमधील सुप्त ईश्वरी अंश जाणून घेऊन त्या बळावर आपली उन्नती करून घेण्यासाठी स्वतःच्या सामर्थ्यावर भरवसा ठेवावा, हे ज्याने त्याने ठरवावयाचे आहे. ते कसेही असो. अधिक अधिक उन्नत

जीवन आपलेसे करण्यात जीवनाचे श्रेय आहे व ते श्रेय आपलेसे करण्याचा मार्ग उपर्युक्त ग्रंथ दाखवतात असे मानले, तर हे सारे ग्रंथ त्या त्या परीने अनुसरणीय ठरतात. ''डिव्हाइन कॉमेडी''-चे या दृष्टीने असलेले वैशिष्ट्यच उलगडून दाखवणारी एक विस्तृत प्रस्तावना विजयकडील त्या पुस्तकाला होती. मी पहिल्याच दिवशी ते पुस्तक आपल्या खोलीत घेऊन गेलो होतो. आठवड्याच्या अवधीत प्रस्तावना वाचून होईल, आणि ''डिव्हाइन कॉमेडी'' थोडीफार जाणून घेता येईल, अशी कल्पना होती. मधल्या दिवसांत त्या पुस्तकावर विजय आणि सूझन यांच्याशी गप्पा मारताना प्रस्तावना फार छान आहे, असे मी सहज म्हटले होते.

डोरोथी सेयर्सने मूळ इटालियन भाषेत असलेल्या त्या महाकाव्याचे इंग्रजी भाषांतर केले होते. तिने लिहिलेली प्रस्तावना वाचताना समजले की, डांटेचा जन्म ज्ञानदेवांच्या आधी दहा वर्षे झाला होता, आणि त्यांनी समाधी घेतल्यावर या महाकाव्याच्या रचनेस प्रारभ झाला होता. छप्पन वर्षांचे आयुष्य डांटेला लाभले होते. आपल्या आयुष्यात त्याला नाना आपत्तीतून जावे लागले होते. त्या वेळी आलेल्या अनुभवांचे प्रतिबिंब या त्याच्या रचनेत उमटले आहे. वासना आणि हव्यास यांच्या आहारी गेल्यामुळे माणसाच्या वाट्याला नरकतुल्य जीवन कसे येते याचे दर्शन घडल्यावर त्याच्या मनात कधीतरी पश्चात्तापाचा भाव निर्माण होऊन सद्‌बुद्धीचा अंकुर फुटतो, आणि त्या बळावर एकेक पायरी वर चढत तो अखेर ईश्वराच्या चरणांशी पोचतो, अशा या मार्गक्रमणाचे एक परिणामकारक चित्र डांटेने रंगवले आहे. प्राचीन कालातील श्रेष्ठ रोमन कवी व्हर्जिल हा डांटेला प्रथम नरकाचे दर्शन घडवतो. माणसाने दुर्वर्तन केले, तर त्याची ही शिक्षा असते. माणसाने प्रयत्न केला तर त्याला सन्मार्गाने जाता येते, पण त्यासाठी संयमाच्या आधारे इंद्रियांचा निग्रह करण्याचे कष्ट घ्यावे लागतात; हे दर्शवून व्हर्जिल डांटेचा निरोप घेतो. तेथे जिच्यावर डांटेचे प्रेम असते ती बिॲट्रिस त्याला भेटते, ती त्याला ईश्वराचे सान्निध्य जेथे लाभते त्या स्वर्गाचा प्रदेश दाखवते. हे महाकाव्य माणसाच्या सन्मार्गाकडील वाटचालीचे दर्शन घडवणारी एक रूपककथा आहे. व्हर्जिल हा ज्ञानाचे, तर बिॲट्रिस प्रेमाचे प्रतीक आहे. अंतिम शांतीकडील प्रवासाची ही सारी कहाणी आहे.

विशेष गोष्ट अशी की, अशा धार्मिक विषयावरील रचना लॅटिन भाषेत करण्याचा परंपरागत संकेत डांटेने बाजूला सारला, आणि सामान्य माणसाला समजावे यासाठी त्याने आपल्या काव्याची रचना इटालियन भाषेत केली. या बाबतीत ज्ञानदेवांशी असलेले त्याचे साम्य सहज ध्यानात येण्यासारखे होते, कारण त्यांनीही सर्वसामान्य माणसासाठी ''इये मऱ्हाटीचिये नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळु करी।'' असा संकल्प करून आपल्या ज्ञानेश्वरीची रचना केली होती. आपल्या प्रतिपादनाला काव्यात्मतेची जोड देण्याचा भागही दोन्हीकडे सारखा होता. डांटेने एक प्रतीकात्मक कथा उभी करून मानवाच्या आत्मोन्नतीचा प्रवास रंगवला आहे,

तर ज्ञानदेवांनी मूळ तत्त्वज्ञानपर आशय स्पष्ट करताना त्याला ''अनुभवावी हे कथा।'' असे रूप प्राप्त करून दिले आहे. रचनेचा असा एक फरक असला, तरी माणसाने आपल्यातील पशुत्व कमी करत उदात्त जीवन कसे प्राप्त करून घ्यावे हा विषय दोन्हीकडे सारखा आहे.

वाचनासाठी पुरेसा वेळ काढता आला नाही व लंडन सोडण्याच्या आदल्या रात्री मी विजयकडे पुस्तक परत दिले व म्हटले, ''प्रस्तावना काही पुरी वाचता आली नाही, पण भाषांतरकर्तीचे नाव मी लिहून घेतलं आहे.'' एक आठवडा विजय-सूझन यांनी माझी उत्तम देखभाल केली होती आणि माझे लंडनमधील वास्तव्य सुखाचे झाले होते. गप्पागोष्टीत घरी वेळही छान गेला होता. हा भाव व्यक्त करीत मी त्यांचा पाच ऑक्टोबरला सकाळी विमानतळावर जाण्यासाठी निरोप घेऊ लागलो, तर ''छोटीशी भेट'' असे म्हणून विजयने माझ्या हातात लाल कागदात गुंडाळलेले एक पुडके ठेवले. पाहतो तर ''डिव्हाइन कॉमेडी.'' औपचारिक भाषेत काही म्हणावे, असे मला त्यांच्या भावनेकडे पाहता वाटले नाही. मी आनंदाने म्हटले, "Oh! This is something Divine that will remain with me," थोडा थांबलो आणि पुढे म्हटले, "as well as a Comedy as regards my trip." त्या दोघांनाही बरे वाटले

पाँच ऑक्टोबर. मला इंग्लंडमध्ये उतरून दोन आठवडे झाले होते. पाहण्याच्या दृष्टीने हा वेळ फार कमी पडला. कितीतरी पाहावयाचे राहून गेले. विजय आणि सूझन यांचा निरोप घेताना हा विचार मनात होता. डॉ. अन्वयचा निरोप दूरभाषवर घेतला. अन्वय आणि विजय यांचा मित्र शैलेश सबनीस. वृत्तीने तितकाच सात्त्विक आणि मनमोकळा. तिशीच्या आतला. मला विमानतळावर पोचवण्याचे काम विजयने त्याच्यावर सोपवले होते. गप्पाटप्पा करीत हीथ्रो विमानतळावर आलो. विमानात चढण्यापर्यंतची माझी सारी व्यवस्था करून शैलेश परत गेला. बारा वाजून पन्नास मिनिटांनी विमान आकाशात झेपावले, आणि मी इंग्लंड सोडले. अटलांटिक महासागर दिसतो का ते पाहात होतो. पण मी खिडकीजवळ नव्हतो. अमेरिकेच्या वेळेप्रमाणे साडेचार वाजता वॉशिंग्टनला उतरलो. शंतनू आणि माधुरी देशपांडे मला उतरून घेण्यासाठी आली होती. शतनू तिशीचा. त्याचे वडील मुंबईच्या आय. आय. टी.-मध्ये गणिताचे प्राध्यापक, ते माझे मित्र. विमानतळाजवळ शंतनूचे बापट या नावाचे मित्र राहतात, त्यांच्याकडे चहा घेतला, आणि शंतनूच्या गाडीतून ऐंशी मैलांवरील न्यूकॅसल येथे रात्री साडेआठ वाजता पोचलो.

## ७. व्हॅली फोर्जचा परिसर

नव्या जगात येऊन उतरलो, पण योग असा होता की इकडच्या भागातील जुन्या जगाचे किंचितसे दर्शन व्हावे. अमेरिकेत उतरल्यावर दुसऱ्या दिवशी रविवार होता. अठरावीस मैल दूर असलेल्या लॅंकॅस्टर या गावी शंतनू मला घेऊन गेला. कारखान्यातून माल बाहेर पडताना जी किंमत असते त्या किमतीला नाना वस्तू मिळत असलेला एक मोठा बाजार तेथे होता. नाना प्रकारच्या वस्तूंची अनेक दुकाने होती. दुकानांची रचना आखीव आणि नेटकी, सर्वत्र भरपूर मोकळी जागा, स्वच्छता आणि टापटीप, कोणताही गजबजाट नाही, सारे वातावरण अतिशय शांत. सुटीचा दिवस असल्यामुळे बरेच लोक आलेले. सर्वांच्या गाड्या. त्या उभ्या करण्याची व्यवस्था स्वतंत्र केलेली. काही काही दुकानांतून एकेका प्रकारच्या वस्तूंच मिळतात, तर काही दुकाने अनेक प्रकारच्या वस्तू मिळण्याची सोय असलेली.

### आमिश आणि दिव्यांची मिरवणूक

''डिपार्टमेंटल स्टोअर्स'' हे शब्द बऱ्याच वर्षांपूर्वी ऐकले होते. दुकानात शिरल्यावर एक हातगाडी घ्यावयाची. निरनिराळ्या भागांतून हव्या त्या वस्तू गाडीत टाकावयाच्या. साधा पाव, बिस्कीटे, किंवा चॉकोलेट, यांचे कितीकिती प्रकार मांडून ठेवलेले असतात. निरनिराळ्या वजनांची पुडकी, त्यांवर किंमत लिहिलेली, आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती ती वस्तू गुणवत्तेच्या दृष्टीने विश्वसनीय. आपल्याला हवे असेल ते सारे काही गोळा करून दाराशी गेले की, संगणकावर हिशेब होतो. पैसे द्यावयाचे आणि बाहेर पडावयाचे. अलीकडे अशी दुकाने पुण्यामुंबईसारख्या शहरांतून तुरळक दिसू लागली आहेत. येत्या पाचदहा वर्षांत ती वाढणार. दुकानात गोंधळ, आवाज, गडबड, किंवा किमतीसाठी घासाघीस असे काहीही नाही. अशा दुकानांतून खरेदी करण्यात एक आनंद असतो. तो एकदा कळला की, व्यापारी आणि गिऱ्हाईक या दोघांनाही घेता येतो. विशेष गोष्ट वाटली ती अशी की, एखादी वस्तू कोणत्याही कारणाने बरी न वाटल्यामुळे आपण दुकानात एकदोन दिवसांनी घेऊन गेलो, तर थोडीही चौकशी न करता ती तात्काळ बदलून मिळते.

समाजाच्या हरएक व्यवहारात परस्परांविषयी असणारा असा विश्वास ही सुसंस्कृतपणाची एक खूण आहे इंग्लंड आणि अमेरिका येथील बाजार, दुकाने, किवा निरनिराळी कार्यालये, यांतून हा अनुभव येतो. याच्या उलट आपल्याकडचा सारा व्यवहार अविश्वासावर आधारलेला असतो, अशी सार्वत्रिक प्रचीती येत असते सार्वजनिक व्यवहारातील आपले वागणे काही थोडे अपवाद वगळता प्रामाणिकपणाचे असत नाही, त्याचा हा परिणाम आहे. त्यामुळेच विद्यापीठासारख्या संस्थांमध्ये काही कामानिमित्त एखाद्या सभेला निमंत्रणपूर्वक आपण गेलो, तर आपण पहिल्या वर्गाने प्रवास केला आहे हे सिद्ध करण्यासाठी तिकिटाचा क्रमांक द्यावा लागतो. प्रामाणिक माणसाला याचा अपमान वाटतो. पण आपली जशी एक व्यक्तिगत दानत असते, तशी समाजाचीही काही असते. ज्या समाजाचे आपण घटक असू, त्याच्या दानतीचे परिणाम आपल्याला स्वीकारावे लागतात. महाविद्यालयातील काही प्राध्यापक श्रीमंत विद्यार्थ्याबरोबर विश्रामगृहात जातात आणि त्यांच्या पैशाचे खातात-पितात. हे करण्यामुळे आपण शिक्षक म्हणून असलेली प्रतिष्ठा गमावतो. त्या विद्यार्थ्याच्या दृष्टीने आपली किंमत शून्य ठरते आणि पुढील साऱ्या आयुष्यात त्याच्या मनात आपली ती प्रतिमा राहते, याचे भान असत नाही. आपल्या अशा वागण्यामुळे आपण विद्यार्थ्यावर कोणता संस्कार करीत आहोत, याचाही विचार कोणाच्या मनात नसतो. अविश्वास आणि अप्रमाणिकपणा यांचा वारसा पुढच्या पिढीला पोचवण्याचे हे प्रमाण चढते वाढते होत चालले आहे, ही चिंतेची बाब आहे. शिक्षणाचे क्षेत्र बिघडले, तर त्याचा संपूर्ण पिढीवर परिणाम होतो, याचे स्मरण ठेवावयास हवे.

चॉकोलेट, कोका कोला, आणि आइस्क्रीम यांचे वेड या नव्या जगात फार मोठ्या प्रमाणात आहे. चॉकोलेटचे एक ते तीन किलोंचे पुडे सर्रास विकले जात होते. कोकाकोलाच्या लहानमोठ्या बाटल्या तर होत्याच, पण पाचपाच लीटरचे डबे होते, व ते अनेक जण घेत होते. आइसक्रीमचे तेच. याचा दुष्परिणामही होतो इकडील लोकांचे दातांचे आरोग्य सामान्यतः ठीक नसते. दंतवैद्य सर्वांत अधिक पैसा कमावतो, असे म्हणतात. आपल्याकडे पान आणि तंबाखू यांचे हेच परिणाम होतात. व्यसन ही गोष्ट जगात सार्वत्रिक आहे. कमीअधिक सुधारलेल्या अवस्थेप्रमाणे त्याचे रूप आणि आविष्कार भिन्न असतात इतकेच. तात्कालिक सुखाचा मोह पडणे, किंवा इंद्रियांचे चोचले पुरवण्याचे नाना मार्ग शोधणे ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. तिला आळा घालू शकणारी माणसे तुलनेने फार कमी असतात. सद्‌गुणांना पूरक अशी समाजाची व्यवस्था होत जाईल तसतशी यात सुधारणा होईल, पण तिची गती फार मंद असणार हेही आपण स्वीकारले पाहिजे.

अशी दुकाने आणि असे बाजार या पाश्चात्त्य देशांत सर्वत्र आहेत. ते दोनतीन ठिकाणी दृष्टीखालून घातले की, मग कोणत्याही शहरात हे भाग सारखेच असतात. अशीच

# ७. व्हॅली फोर्जचा परिसर

नव्या जगात येऊन उतरलो, पण योग असा होता की इकडच्या भागातील जुन्या जगाचे किंचितसे दर्शन व्हावे. अमेरिकेत उतरल्यावर दुसऱ्या दिवशी रविवार होता. अठरावीस मैल दूर असलेल्या लँकॅस्टर या गावी शंतनू मला घेऊन गेला. कारखान्यातून माल बाहेर पडताना जी किंमत असते त्या किमतीला नाना वस्तू मिळत असलेला एक मोठा बाजार तेथे होता. नाना प्रकारच्या वस्तूंची अनेक दुकाने होती. दुकानांची रचना आखीव आणि नेटकी, सर्वत्र भरपूर मोकळी जागा, स्वच्छता आणि टापटीप, कोणताही गजबजाट नाही, सारे वातावरण अतिशय शांत. सुटीचा दिवस असल्यामुळे बरेच लोक आलेले. सर्वांच्या गाड्या. त्या उभ्या करण्याची व्यवस्था स्वतंत्र केलेली. काही काही दुकानांतून एकेका प्रकारच्या वस्तूंच मिळतात, तर काही दुकाने अनेक प्रकारच्या वस्तू मिळण्याची सोय असलेली.

### आमिश आणि दिव्यांची मिरवणूक

''डिपार्टमेंटल स्टोअर्स'' हे शब्द बऱ्याच वर्षांपूर्वी ऐकले होते. दुकानात शिरल्यावर एक हातगाडी घ्यावयाची. निरनिराळ्या भागांतून हव्या त्या वस्तू गाडीत टाकावयाच्या. साधा पाव, बिस्कीटे, किंवा चॉकोलेट, यांचे कितीकिती प्रकार मांडून ठेवलेले असतात. निरनिराळ्या वजनांची पुडकी, त्यांवर किंमत लिहिलेली, आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती ती वस्तू गुणवत्तेच्या दृष्टीने विश्वसनीय. आपल्याला हवे असेल ते सारे काही गोळा करून दाराशी गेले की, संगणकावर हिशेब होतो. पैसे द्यावयाचे आणि बाहेर पडावयाचे. अलीकडे अशी दुकाने पुण्यामुंबईसारख्या शहरांतून तुरळक दिसू लागली आहेत. येत्या पाचदहा वर्षांत ती वाढणार. दुकानात गोंधळ, आवाज, गडबड, किंवा किमतीसाठी घासाघीस असे काहीही नाही. अशा दुकानांतून खरेदी करण्यात एक आनंद असतो. तो एकदा कळला की, व्यापारी आणि गिऱ्हाईक या दोघांनाही घेता येतो. विशेष गोष्ट वाटली ती अशी की, एखादी वस्तू कोणत्याही कारणाने बरी न वाटल्यामुळे आपण दुकानात एकदोन दिवसांनी घेऊन गेलो, तर थोडीही चौकशी न करता ती तात्काळ बदलून मिळते.

समाजाच्या हरएक व्यवहारात परस्परांविषयी असणारा असा विश्वास ही सुसंस्कृतपणाची एक खूण आहे इंग्लंड आणि अमेरिका येथील बाजार, दुकाने, किंवा निरनिराळी कार्यालये, यातून हा अनुभव येतो. याच्या उलट आपल्याकडचा सारा व्यवहार अविश्वासावर आधारलेला असतो, अशी सार्वत्रिक प्रचीती येत असते सार्वजनिक व्यवहारातील आपले वागणे काही थोडे अपवाद वगळता प्रामाणिकपणाचे असत नाही, त्याचा हा परिणाम आहे. त्यामुळेच विद्यापीठासारख्या सस्थांमध्ये काही कामानिमित्त एखाद्या सभेला निमंत्रणपूर्वक आपण गेलो, तर आपण पहिल्या वर्गाने प्रवास केला आहे हे सिद्ध करण्यासाठी तिकिटाचा क्रमाक द्यावा लागतो. प्रामाणिक माणसाला याचा अपमान वाटतो. पण आपली जशी एक व्यक्तिगत दानत असते, तशी समाजाचीही काही असते. ज्या समाजाचे आपण घटक असू, त्याच्या दानतीचे परिणाम आपल्याला स्वीकारावे लागतात. महाविद्यालयातील काही प्राध्यापक श्रीमंत विद्यार्थ्याबरोबर विश्रामगृहात जातात आणि त्यांच्या पैशाचे खातात-पितात. हे करण्यामुळे आपण शिक्षक म्हणून असलेली प्रतिष्ठा गमावतो. त्या विद्यार्थ्याच्या दृष्टीने आपली किंमत शून्य ठरते आणि पुढील साऱ्या आयुष्यात त्याच्या मनात आपली ती प्रतिमा राहते, याचे भान असत नाही. आपल्या अशा वागण्यामुळे आपण विद्यार्थ्यावर कोणता सस्कार करीत आहोत, याचाही विचार कोणाच्या मनात नसतो. अविश्वास आणि अप्रमाणिकपणा यांचा वारसा पुढच्या पिढीला पोचवण्याचे हे प्रमाण चढते वाढते होत चालले आहे, ही चिंतेची बाब आहे. शिक्षणाचे क्षेत्र बिघडले, तर त्याचा संपूर्ण पिढीवर परिणाम होतो, याचे स्मरण ठेवावयास हवे.

चॉकोलेट, कोका कोला, आणि आइस्क्रीम यांचे वेड या नव्या जगात फार मोठ्या प्रमाणात आहे. चॉकोलेटचे एक ते तीन किलोचे पुडे सर्रास विकले जात होते. कोकाकोलाच्या लहानमोठ्या बाटल्या तर होत्याच, पण पाचपाच लीटरचे डबे होते, व ते अनेक जण घेत होते. आइसक्रीमचे तेच. याचा दुष्परिणामही होतो. इकडील लोकांचे दातांचे आरोग्य सामान्यतः ठीक नसते. दंतवैद्य सर्वात अधिक पैसा कमावतो, असे म्हणतात. आपल्याकडे पान आणि तंबाखू यांचे हेच परिणाम होतात. व्यसन ही गोष्ट जगात सार्वत्रिक आहे. कमीअधिक सुधारलेल्या अवस्थेप्रमाणे त्याचे रूप आणि आविष्कार भिन्न असतात इतकेच. तात्कालिक सुखाचा मोह पडणे, किंवा इंद्रियांचे चोचले पुरवण्याचे नाना मार्ग शोधणे ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. तिला आळा घालू शकणारी माणसे तुलनेने फार कमी असतात. सद्गुणांना पूरक अशी समाजाची व्यवस्था होत जाईल तसतशी यात सुधारणा होईल, पण तिची गती फार मंद असणार हेही आपण स्वीकारले पाहिजे.

अशी दुकाने आणि असे बाजार या पाश्चात्त्य देशांत सर्वत्र आहेत. ते दोनतीन ठिकाणी दृष्टीखालून घातले की, मग कोणत्याही शहरात हे भाग सारखेच असतात. अशीच

स्वच्छता व सुविधा आपल्याला खाद्यपेयांच्या दुकानांतून आणि विश्रामगृहातून पाहावयास मिळते. अशी दुकाने मोठमोठ्या महत्त्वाच्या स्थानी म्हणजे एखादे मोठे वस्तुसंग्रहालय किंवा महत्त्वाची ऐतिहासिक वास्तू वा प्रदर्शन अशा ठिकाणी असतात. काही प्रमाणात त्याची गरज असते हे खरे, पण पुष्कळ ठिकाणी माणसे पाहण्याच्या स्थानांपेक्षा तेथील खाद्यपेयांत अधिक रमतात, असे आढळून येते. ही खाद्यसंस्कृती हाही या देशांचा विशेष आहे. आपल्याकडेही तो प्रकार झपाट्याने वाढत आहे. फास्ट फूड किंवा झटपट खाद्य पुरवणारी छोटी दुकाने आणि हातगाड्या याची संख्या प्रत्येक वर्षी वाढत आहे. हे आरोग्याला घातक आहे, हे सर्वांना माहीत असते. पण त्या माहितीचा प्रत्यक्षातील उपयोग शून्य असतो. अमेरिकेतील मासिकांतून या विषयावर आणि शारीरिक आरोग्यावर सतत लेखही येत असतात. लोक ते वाचत असतात, आणि त्यानतरही जशी सवय असेल तसे वागत राहतात. हीदेखील सनातन मानवी प्रवृत्ती आहे. म्हणून तर संयमी आणि निर्व्यसनी व्यक्तीचे कौतुक करावे लागते.

न्यूकॅसल ते लॅकॅस्टर या प्रवासात अमेरिकेचा ग्रामीण भाग आपोआप दृष्टीखालून गेला. परत येताना घोड्यांवरून जाणारी काही माणसे दिसली. कुतूहल वाटले. नाना प्रकारच्या विपुल वाहनांच्या या काळात घोड्यांवरून चाललेली माणसे! हा एक छंद असावा असे वाटले. पण शंतनूकडून माहिती ऐकावयास मिळाली ती अगदी वेगळी होती. या भागात मूळचे डच असलेले काही लोक राहतात. मुख्य रस्त्यापासून थोडया आतल्या बाजूला कोठेकोठे त्यांची घरे होती. या लोकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते कोणत्याही आधुनिक गोष्टीचा वापर करीत नाहीत. ते मोटारीत बसत नाहीत, घोड्यांवरून किंवा घोडागाडीतून जातात. अशा पधरावीस गाड्या पाहावयास मिळाल्या. पुढच्या बाजूला गाडी हाकणारा, आणि मागच्या बाजूला एकासमोर एक अशा दोन बाकांवर बंदिस्त जागेत कुटुंबातील लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वजण बसलेले. काही गाड्यांतून जोडपी मजेत फिरावयास चाललेली. जुन्या इंग्रजी चित्रपटांतून आपल्याकडील मेण्यांसारख्या घोड्यागाड्या पाहिल्या होत्या, त्यांची आठवण झाली आणि एकदम एकोणिसाव्या शतकाच्याही आधीच्या कालखंडात गेल्यासारखे वाटले.

थोड्या वेळाने रात्र झाली, अंधार पडला. त्या लोकांच्या घरातून कदांल व मेणबत्त्या दिसल्या. ते विजेचा वापर करीत नाहीत. पोषाख जुने, वाहने जुनी, निवासस्थाने कौलारू म्हणावीत अशी आणि एकदरीत त्यांचे दर्शन आणि वावरणे हेही तसेच जुने. या लोकांना आमिश या नावाने ओळखले जाते. अठरावीस हजार लोक फारफार तर असतील. अन्यत्र कोठेही यांची वस्ती नाही. यांची लग्नेही आपापसात होतात. हे सारेच नवल वाटावे असे होते. अमेरिकेत काय आढळेल ते खरोखरी सांगता येत नाही. मध्यंतरी बीटल्सची एक लाट

येऊन गेली. कोठेकोठे नग्न वावरणाऱ्या लोकांचे गट होते. ते थंडीत काय करीत होते. कोणास ठाऊक. बहुधा शिवलेला कपडा अगावर घेत नसावेत. एक आत्महत्यापथही होता. त्यांची सदस्यसंख्या थोडी असणार हे साहजिक आहे पण सामुदायिक आत्महत्या करून घेतल्याची बातमी एकदा वृत्तपत्रांत वाचली होती. आपल्याकडेही नंगे साधू अद्याप आहेत, आणि गेल्या शतकापर्यंत तरी अघोरपंथी लोक होते. धर्माच्या क्षेत्रातही गाढ अज्ञानाचे असे प्रकार असतात. त्यांतलाच हा आमिश लोकाचा एक प्रकार. पण हे फार काळ टिकणे अवघड आहे आताच्या नव्या पिढीतील तरुण वर्ग हळूहळू आधुनिक जीवनपद्धतीकडे वळत आहे. पाचपंचवीस वर्षांनी हे दृश्य दिसणार नाही. भारताच्या तुलनेने पाश्चात्त्य देश हे आधुनिक, त्यातही अमेरिका म्हणजे नवे जग ही संकल्पना अद्यापही डोक्यात रेंगाळत असते त्या नव्या जगात आल्यावर पहिल्याच दिवशी या दोनशे वर्षांपूर्वीच्या जुन्या जगाचे दर्शन घडावे, हा एक आगळावेगळा योग वाटला.

परतीचा प्रवास वीस मैलांचा. उत्तम रस्ते आणि उत्तम वाहने, त्याचबरोबर भरपूर रुंद रस्ते आणि तितक्याच प्रमाणात असलेल्या गाड्या यांमुळे वीसपंचवीस ते चाळीसपन्नास मैल अंतर जाणे हे अमेरिकेत केवळ अर्धा ते एक तासाचे काम असते. हा प्रवास कटकटीचा नसतो, तर अतिशय आरामशीर असतो. गाड्या वातानुकूलित असतात. त्यामुळे गाडीत बसणेही सुखावह असते. वाहनांची संख्या केवळ प्रचंड, पण गर्दी वा गोगाट नाही. चौकांतून वाट कशी काढावी हा प्रश्न कधीही पडत नाही. त्यामुळे एवढ्या प्रवासाचा शीण तर येत नाहीच, पण आपण एवढे अंतर आलो हे खरेही वाटत नाही. एक बाजूने चार तर दुसऱ्या बाजूने चार असे रस्ते होते. आपापल्या रेषेतून सुसाट वेगाने मोटारी चालल्या होत्या. एकामागोमाग मोटारी; एकीकडे चार व दुसरीकडे चार, म्हणजे एकाच वेळी आठ गाड्यांची ये-जा. काही ठिकाणी थोडा उतार व पुढे चढ असा रस्त्याचा एक दोन मैल लांबीचा भाग आला. प्रत्येक गाडीच्या पुढच्या बाजूला स्वच्छ पांढरे दिवे, तर मागच्या बाजूला झगझगीत लाल रंगाचे दिवे. अंधारात दूरच्या गाड्या दिसत नव्हत्या, पण एका बाजूला चारचार गाड्यांच्या पांढऱ्या तर दुसऱ्या बाजूला तेवढ्याच संख्येच्या लाल दिव्यांची रांग खूप दूर अंतरापर्यंत दिसत होती. असे वाटले की लाल-पांढऱ्या दिव्याची ही एक मोठी देखणी मिरवणूकच चालली आहे. ती पाहात घरी आलो.

## ज्ञानेश्वरीच्या निमित्ताने डलासला

आल्याबरोबर शंतनूची पत्नी माधुरी प्रथम दूरभाषकडे वळली. त्यावर लाल दिवा लुकलुकत होता. तिने दूरभाष उचलला. कोणीतरी दूरभाषवर निरोप ठेवला होता. तो

ध्वनिमुद्रित निरोप तिने ऐकला, आणि दूरभाष ठेवला. तरी पुनः लाल दिवा, याचा अर्थ आणखी एक निरोप होता, तो घेतला. घरी आल्याबरोबर प्रथम दूरभाषवर दृष्टी टाकावयाची ही इकडच्या लोकांची सवय होऊन गेली आहे. आता मुंबईत ही सुविधा आली आहे. हातातील दूरभाष तर आपल्याकडे सपन्न घरांत सर्वत्र आले आहेत. दूरभाषवरील निरोप ऐकणे हेही आणखी चारदोन वर्षांत सर्वत्र रूढ होईल. सुधारणेचा हरएक प्रकार झपाट्याने येत आहे. फक्त कामातील शिस्त व तत्परता आपण कधी घेणार, हा प्रश्न आहे. कारण रस्त्यावर खड्डे असणे, दूरभाष केव्हाही बंद पडणे, आणि वीज केव्हाही गडप होणे हे आपल्याकडे नित्याचे आहे कोणतेही साधन समाजाला चटकन विकत घेता येते. एखादा गुण आत्मसात करण्यास फार वेळ लागतो.

दहा ऑक्टोबरला डलासहून श्रीमती रेखाताई राव यांचा दूरभाष आला की, तेथील महाराष्ट्रीय समाजापुढे ज्ञानेश्वरीवर अकरा दिनांकी मी व्याख्यान द्यावे. फिलाडेल्फिया ते डलास आणि तेथून परत अशी विमानाची तिकिटे त्या पाठवणार होत्या. अमेरिकेत निरनिराळ्या शहरांतून फार मोठ्या संख्येने मराठी भाषक राहात आहेत. गेल्या पंधरावीस वर्षात ही संख्या खूप वाढली आहे. सर्वजण उत्तम बुद्धिमान, सुशिक्षित, आणि कर्तबगार असतात. वरच्या दर्जाच्या नोकऱ्या मिळतात, आणि त्यांच्या कामाचे चीज केले जाते. ठिकठिकाणी महाराष्ट्र मंडळे आहेत, आणि सर्व महाराष्ट्र मंडळांची एकत्रित अशी बृहन्महाराष्ट्र मंडळ ही संस्था आहे. दर दोन वर्षांनी संपूर्ण अमेरिकेतील मराठी बांधवांचे एक संमेलन एखाद्या मोठ्या शहरात होते व त्यासाठी भारतातील कोणातरी महनीय व्यक्तीला अध्यक्ष म्हणून बोलावले जाते, हे आपल्याकडेही सर्वांना माहीत आहे. स्थानिक महाराष्ट्र मंडळांचे काही काही कार्यक्रम होत असतात, आणि महिन्यातून एकदा तरी सर्वजण एकत्र जमतात. मात्र हे कार्यक्रम बरेच दिवस आधी ठरवले जातात. पुरेशी पूर्वसूचना सर्वांना मिळणे आवश्यक असते, कारण कार्यक्रमासाठी सर्वजण पंधरापंधरा वीसवीस मैल अंतरावरून येणारे असतात. सर्वांच्या स्वतःच्या गाड्या असतात. रस्ते उत्तम आणि वाहतूक व्यवस्थित, त्यामुळे वीसपंचवीस मैल कोठेतरी जाऊन येणे हे पुण्यात वा नागपूरमध्ये चारपाच किलोमीटर जाऊन येण्याइतके सुलभ असते. प्रवासाचा शीण असा जाणवतच नाही.

रिमोट कंट्रोल ही गोष्ट आता सार्वत्रिक झाली आहे. घराजवळ गाडी आल्यावर गॅरेजचा दरवाजा आपोआप उघडतो, आणि नंतर हवा असेल तेव्हा आपोआप बंद होतो. त्यासाठी काहीही करावे लागत नाही, आणि हे सारे इतके सुरळीत चालत असते की, अशा कोणत्याही गोष्टींची दुरुस्ती वगैरे फारच क्वचित करावी लागते. तशी वेळ आलीच तर दुरुस्तीचे कामही त्वरित आणि उत्तम होते. अमेरिकेतील जीवनमानाच्या तुलनेने तेथे स्वतःची

गाडी ठेवणे हे भारतापक्षा स्वस्त आहे. अन्नधान्य, भाजीपाला, वा दूधदही, या वस्तूचेही तसेच आहे. मात्र सोमवार ते शुक्रवार भरपूर काम करावे लागते. त्यात टाळाटाळ, चुकवाचुकव असला प्रकार करून चालत नाही. शिवाय परदेशात असल्यामुळे भारतीयाना जास्त जबाबदारीने वागावे लागते. कामात कुचराई केली तर नोकरी गमवावी लागते, अन्य पर्याय नसतो. तेव्हा मोकळीक ही शनिवार आणि रविवार या दोन दिवशीच असते. मराठी कार्यक्रमाना येणारी माणसे त्या दोन दिवसातच येऊ शकतात. हे सारे मला आधीच ऐकून माहीत होते. असे कार्यक्रम ठरवले जावेत अशी माझी अमेरिकेत कोणाला माहिती नव्हती, किंवा केवळ नाव ऐकून ध्यानात यावे अशी माझी प्रतिमाही नव्हती. मी भारतातून निघताना, परदेशी जात असल्याचे दहापाच मित्रापलीकडे कोणाला माहीत नव्हते, इंग्लंडमध्ये वा अमेरिकेत एखाद्या सार्वजनिक संस्थेशी सपर्क साधावा असा विचार आरभापासून माझ्या मनात नव्हता. अशा बाबतीत आपण होऊन काही हालचाल करण्यात शोभा नसते, हे ओळखून असणे हिताचे असते. ''तुम्ही येत असल्याच आधी का कळवल नाहीत'', असा प्रश्न मला काहीजणांनी नंतर केला. ते त्यांचे सौजन्य होते.

पण मी अमेरिकेत प्रवासासाठी चाललो आहे हे पुण्यातील भारतीय विद्याभवनचे अध्यक्ष व सस्कृत ग्रंथांवरील व्यासगी लेखक, श्री. म. रा. यार्दी याना समजल्यावर मी डलासला त्याच्या मुलीकडे जावे असे त्यानी मला सुचवले होते. लॉस अॅजेलिस आणि साता बार्बरा येथे यार्दीची पुतणी शोभाताई व पुत्र अनतराव होते. या दोन्ही ठिकाणची माझी व्यवस्थाही यार्दीनी केली. सॅनफ्रॅसिस्कोच्या वेदान्त सोसायटीमध्ये मला जाता यावे, हेही त्यानी पाहिले. रेखाताई राव या त्याची कन्या त्याना ज्ञानेश्वरी आदी ग्रथ आणि भारतीय सस्कृती व तत्त्वज्ञान याची आवड आहे. मी डलासला व्याख्यानासाठी यावे हे त्यांनी सुचवले व सारी व्यवस्था केली. अकरा ऑक्टोबरला सर्व मराठी माणसे एकत्र येणार होती. रेखाताईच्या विनतीला मी होकार दिला, आणि त्यानी विमानाच्या प्रवासाची तिकिटे पाठवून दिली. शतनू आणि माधुरी यांचा निरोप घेतला. शतनूने फिलाडेल्फियाच्या विमानतळावर मला सकाळी साडेआठ वाजता सोडले. दहा वाजता विमान निघाले.

आज मला खिडकीजवळची जागा मिळाली होती. विमानातील या खिडक्या फार छोट्या असतात. पण खालचा भूप्रदेश पाहता येत होता मध्यंतरी काही वेळ थेट क्षितिजापर्यंत पांढरेशुभ्र ढग पसरले होते. त्यावर सूर्यप्रकाश पडलेला. मोठे आकर्षक दृश्य होते ढग कोठे पाढऱ्या कापसाच्या पुंजक्यांसारखे, तर कोठे दाट पसरलेले असे होते. मध्येच त्या ढगामध्ये एखादी मोठी फट येई आणि घरातील खिडकीतून बाहेरच्या रस्त्यावरची माणसांची येजा आपण पाहावी, तसा खालचा भूप्रदेश दिसे एका नदीचा वळणावळणानी जाणारा सुंदर

नागमोडी प्रवाह दिसला. ती मिसिसिपी होती असे नंतर समजले एक मोठे सरोवर दिसले. मोठमोठ्या महामार्गाच्या मैलनमैल सरळ जाणाऱ्या रेषा पाहताना अमेरिकेतील रस्ते कसे आहेत त्याची कल्पना आली. काही गावे दिसली, छोट्या मोठ्या आगपेट्या असाव्यात तशी घरे दिसत. पण गावाची रचना रेखीव आहे, हे जाणवत होते

दोन वाजता डलासला उतरलो. विमानतळावरून रेखाताई घरी घेऊन गेल्या. प्रकाशराव आणि रेखाताई यांच्याबरोबर संध्याकाळी मंदिरात गेलो. पंधरावीस मैल अंतर असावे. मंदिराला शिखर वगैरे नव्हते. पण सारे रेखीव आणि व्यवस्थित होते. सभामडपात तीन बाजूंच्या भिंतींमध्ये सात-आठ फूट उंचीच्या स्वतंत्र गाभाऱ्यांतून गणेश, शंकर, महालक्ष्मी, राधाकृष्ण, विठ्ठलरखुमाई आदी आठदहा देवताच्या सुंदर संगमरवरी मूर्ती होत्या. सर्वत्र स्वच्छता होती. आरती व प्रसाद हा नित्याचा कार्यक्रम झाल्यावर माझे ज्ञानेश्वरीवर एक तास व्याख्यान झाले. चाळीस-पचेचाळीस श्रोते होते. नंतर अल्पोपाहार. दोघेतिघे पुण्याचे. काही गप्पाटप्पा. घरी येईतो दहा वाजून गेले. दुसरे दिवशी सकाळी साडेदहाच्या विमानात मला रेखाताईनी बसवले. आधी ठरल्याप्रमाणे मी पुन्हा चारपाच दिवसांनी येथे यावयाचा होतो, त्यामुळे अधिक थांबण्याचे कारण नव्हते. अडीच वाजता फिलाडेल्फियाला उतरलो. अजित घोरपडे मला उतरून घेण्यासाठी विमानतळावर आला होता. त्याचे वडील किसन घोरपडे हे माझे वर्गमित्र, काका आपल्याकडे आले आहेत, हा अजितचा भाव. त्या भावनेनेच त्याने व त्याची पत्नी रश्मी यानी माझे आतिथ्य केले

### स्वातंत्र्ययुद्धाच्या सिद्धतेचा परिसर

फिलाडेल्फियाला अमेरिकेच्या इतिहासात फार वेगळे महत्त्व आहे वॉशिंग्टनच्या आधी ही अमेरिकेची राजधानी होती. अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धात या शहराला सर्वात महत्त्वाचे स्थान आहे हा लढा १७६५-पासून प्रकट रूप धारण करू लागला. त्याच्या आधी किरकोळ कुरबुरी चालू होत्या. पण ब्रिटिश पार्लमेंटने अमेरिकेतील वसाहतीवर कर बसवला, आणि विरोधाला प्रारभ झाला. व्हर्जिनियातील पॅट्रिक हेन्री आणि मॅसॅच्युसेटसमधील सॅम्युअल ॲडॅम्स यानी हा विरोध करताना प्रजेचा अधिकार प्रस्थापित करण्यासाठी मॅग्ना चार्टाचा आधार घेतला. हे साहजिक होते. कारण अमेरिकेत व्यवसाय करून आपले भाग्य उजळण्यासाठी जे कोणी इंग्रज गेले, त्याचा वारसा इंग्लडमधील इग्रजांचाच होता. पार्लमेंटची सत्ता ते मानीत आले होते, पण आपल्या स्वातंत्र्यावर आक्रमण होत आहे ही जाणीव हळूहळू वाढत गेली. ज्या पार्लमेंटमध्ये आमचे प्रतिनिधी नाहीत त्याला आमच्यावर कर लादण्याचा अधिकार नाही, "No taxation without representation" ही घोषणा त्यातून जन्माला आली

लोकशाहीची गौरवगाथा गाणाऱ्या पार्लमेंटने अशी भूमिका घेतली की, जगात जेथे जेथे इंग्रज वसाहती आहेत त्या सर्वांवर ब्रिटिश पार्लमेंटचा अधिकार चालतो. सत्ता ही माणसाला किती मोह घालते आणि अंध बनवते, याचा हा एक उत्तम नमुना म्हणता येईल.

अमेरिकेतील लोकांनी ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकला. अमेरिकेतून कच्चा माल आणावयाचा आणि आपल्या कारखान्यांत तयार केलेला पक्का माल तेथे विकावयाचा, हे इंग्लंडचे धोरण होते. इंग्लंड हे व्यापारी राष्ट्र आहे, असे काही वेळा म्हटले जाते, त्याची येथे आठवण होते. पुढे भारतात आपले प्रभुत्व प्रस्थापित केल्यावर त्यांनी हेच केले आणि या सुवर्णभूमी मानल्या जाणाऱ्या देशाची अक्षरशः लूट केली. पण आपण एकजूट राखून प्रतिकार करू शकलो नाही. अमेरिकेत तसे घडले नाही. बहिष्काराची तीव्रता एवढी वाढली की, १७७३-च्या डिसेंबरमध्ये बॉस्टनजवळच्या समुद्रात चहा भरून घेऊन आलेल्या तीन ब्रिटिश जहाजांवर काही बहाणा करून पन्नाससाठ अमेरिकन तरुण चढले, जहाजावरील कर्मचारी वर्गाचा प्रतिकार त्यांनी मोडून काढला, आणि सारा चहा समुद्रात बुडवून टाकला. भारतात १९०६ सालच्या कलकत्ता येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनात लढ्याची जी चतुःसूत्री स्वीकारली गेली, तीमध्ये बहिष्काराचा समावेश केला गेला. ते बहिष्काराचे हत्यार अमेरिकेत त्याआधी सव्वाशे वर्षे वापरले गेले होते, हे यावरून ध्यानात येते. कर न भरण्याची चळवळही अमेरिकेत त्या वेळी अवलंबिली गेली, आणि त्याबरोबरच आवश्यक तर युद्ध करण्याची तयारीही सुरू केली.

अमेरिकेजवळ तेव्हा प्रशिक्षित सैनिक नव्हते. आणि त्यामुळे लढाईत प्रथम प्रथम पराभव पत्करावा लागला. पण या पराभवामुळे त्याच्यांत अधिक जागृती झाली. ते सर्वजण एकत्र आले लढाईत आपला पराभव का होतो आहे याची चर्चा झाली, आणि नव्या तंत्राचा अवलंब केला गेला. सहज मनात येते की, अशी पराभवाची मीमांसा, त्याच्या कारणांचा शोध, व त्याला अनुसरून नतर विचारपूर्वक केलेली उपाययोजना याचा मागमूस आपल्या देशाच्या इतिहासात गेल्या हजार वर्षात आढळत नाही. आक्रमक कोण आहेत, ते कोठून येतात, आणि त्याचे सामर्थ्य कशात आहे, याचा सखोल विचार खऱ्या अर्थाने शिवछत्रतींनी केलेला दिसतो. मोगल सैन्याविरूद्ध लढण्यासाठी त्यांनी मावळ्यांच्या हातात तलवारीबरोबर अधिक अतरावर पोचणारा भाला दिला, आणि जलद हालचाली करणारे घोडदळ उभे करून गनिमी काव्याचा अवलंब केला. मैदानात समोरासमोर लढाई देणे शक्यतो टाळले. इंग्रजापासून असलेला धोका शिवरायांनीच ओळखला, "इंग्रजास खाडीच्या तोडाशी जागा देऊ नये," अशी त्यांची सूचना आज्ञापत्रात नमूद केलेली आहे, आणि समुद्रकाठी किल्ले बांधून त्यानी मराठ्यांचे आरमार नव्याने तयार केले, हे त्यांचे दूरदर्शी कर्तृत्व आहे आपण ते कर्तृत्वही

टिकवू शकलो नाही आणि एकीही ठेवू शकलो नाही, हा अमेरिका आणि भारत यानी इग्रजांविरुद्ध केलेल्या लढ्यातील महत्त्वाचा फरक आहे. हा मागचा इतिहास आजही जाणून घेणे आवश्यक आहे

आपले सैनिक पुरेसे प्रशिक्षित नाहीत, याची जाणीव झाल्यावर अमेरिकेच्या सैन्याचे नेतृत्व करणाऱ्या जॉर्ज वॉशिग्टनने फ्रेडरिक व्हॉन स्ट्यूबेन या फ्रेंच अधिकाऱ्याचे साहाय्य घेऊन सैनिकांना शिक्षण देण्याची व्यवस्था केली, आणि विस्कळित शिपायांमधून शिस्तीने व कुशलतेने लढणारे सैन्य उभे केले. हे सारे घडले ते फिलाडेल्फिया शहरापासून जवळ असलेल्या व्हॅली फोर्ज या भागात. १७७७-च्या डिसेंबरपासून १७७८-च्या जूनपर्यंत वॉशिग्टन आपल्या सैनिकांसह या भागात होता. स्ट्यूबेन हा प्रशियाच्या फ्रेडरिक दि ग्रेट या राजाच्या लष्करात मोठ्या पदावर काम केलेला अधिकारी होता. त्या धाग्याची स्मृती म्हणून की काय या व्हॅली फोर्जच्या आसपास आता झालेल्या वस्तीला किंग ऑफ प्रशिया हे नाव दिले गेले आहे. अपुरी वस्त्रे, अपुरे अन्न, आणि रोगाचा प्रादुर्भाव यांमुळे त्या सहा महिन्यांच्या अवधीत तेथे एकत्रित केलेल्या स्वातंत्र्यसैनिकातील शेकडो शिपायांची आहुती पडली. नागरिकांतून सेवा उभी केली जात होती. स्वेटर्स विणणे आणि जखमी वा आजारी सैनिकाची शुश्रूषा करणे अशा प्रकारचे साहाय्य स्त्रियाकडून मिळत होते.

आपल्या सैनिकांची होत असलेली दुर्दशा आणि तरीही त्यांनी राखलेली जिद्द वॉशिंग्टन चार महिने पाहात होता. एकवीस एप्रिल १७७८ या दिवशी त्याने उद्‌गार काढले, ''आपलं शरीर झाकण्यासाठी पुरेसं वस्त्र अंगावर नाही, पाठ टेकण्यासाठी एखादी घोंगडी नाही किंवा पायात धड बूट नाहीत, निवाऱ्यासाठी पुरेशा बराकी उभ्या राहिलेल्या नाहीत त्यामुळे कित्येकाच्या डोक्यावर छप्पर नाही, आणि इतक्या साऱ्या हालअपेष्टा सोसत असतानाही कोणाच्या मुखातून तक्रारीचा शब्द नाही. अशी ही या सैनिकाची सहनशीलता आणि त्याचबरोबर असलेला आज्ञाधारकपणा मी पाहात आहे. अशी धारणा क्वचितच कोठे आढळेल.'' उत्तम सेनापती आपल्या सैनिकांचे मोल जाणून असतो वॉशिग्टनचे हे उद्‌गार नेपोलियनची आठवण करून देणारे आहेत. व्हॅली फोर्ज येथे प्रशिक्षण घेऊन तयार झालेल्या सैन्याने न्यू जर्सीमधील मॉनमाउथ येथे झालेल्या लढाईत ब्रिटिश सैन्याचा पहिला पराभव केला, आणि त्या विजयामुळे अमेरिकन सैन्यामध्ये आत्मविश्वासाचा हुंकार उमटला. या साऱ्या प्रक्रियेतून हळूहळू अमेरिका या नव्या राष्ट्राचा उदय होत होता. त्यातील महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांशी सबधित अशा सर्व स्थानाची जपणूक आजही अतिशय काळजीपूर्वक केली जाते.

अजितने या साऱ्या जागा मला दाखवल्या. हजारांनी सैनिक जेथे लष्करी तत्र आत्मसात करीत होते, तो सारा परिसर आम्ही पायी फिरलो. उच टेकाडावर हे एक अतिशय

विस्तृत असे पठार आहे. त्या वेळच्या काही तोफा तेथे ठेवलेल्या आहेत. भलेमोठे लाकडी ओंडके एकावर एक रचून, त्याच्याच भिंती बनवून, व वर तसेच छप्पर करून सैनिकासाठी झोपड्या तयार केल्या गेल्या. त्यांतील चारसहा लाकडी बराकी स्मारक म्हणून जपल्या आहेत. सर्वत्र सुंदर हिरवळ, उंच उंच वृक्ष, लांबवरचा दिसणारा रमणीय प्रदेश, आणि या सर्वांच्या सान्निध्यातील इतिहासाच्या या स्फूर्तिदायक खुणा पाहावयास मिळतात

## कार्पेंटर्स हॉल आणि इंडिपेंडन्स हॉल

एवढी एकच बाजू या लढ्याला नव्हती. नव्याने निर्माण होणारे लोकशाही राष्ट्र आणि त्यातील महत्त्वाच्या घटनाही या फिलाडेल्फियातच घडल्या. इंग्लडच्या तिसऱ्या जॉर्जने लादलेल्या अन्याय्य करांविरूद्ध पहिला आवाज उठवण्यासाठी कार्पेटर्स हॉलमध्ये अमेरिकेच्या सर्व राज्यांतील प्रतिनिधी १७७४- च्या सप्टेंबरमध्ये एकत्र आले. दोनशे वर्षापूर्वी उत्तर आणि दक्षिण भागांतील प्रतिनिधींना एकत्रित येण्यासाठी फिलाडेल्फिया सोयीचे वाटले. याचा एक अर्थ असा होतो की, जवळजवळ सव्वादोनशे वर्षापूर्वीच्या त्या काळात अटलांटिकच्या किनाऱ्याच्या बाजूला काही व्यवस्थित अशी निरनिराळी राज्ये होती. अमेरिकेच्या नव्या भूमीत संपन्नतेचा मार्ग शोधण्यासाठी स्पेन, फ्रान्स आणि इग्लंड या देशांतून अनेक साहसी लोक आले. काही थोडे डचही होते. पण सर्वाधिक संख्या इंग्रजांची होती, आणि नंतरच्या काळात ज्या लढाया झाल्या त्यातून इंग्रजाचा विजय होत गेला, आणि अमेरिकेला वारसा लाभला तो इग्लंडमधील प्रजेने राजाविरुद्ध आपल्या अधिकारांसाठी केलेल्या तीनचारशे वर्षांच्या लढ्याचा. अठराव्या शतकाच्या अखेरच्या या काळापर्यंत इग्लडमध्ये राजपद सुरक्षित राखलेले असले, तरी अंतिम अधिकार प्रजेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींना होता.

तोच कित्ता अमेरिकेतील स्थायिक झालेल्या इंग्रजांनी उचलणे स्वाभाविक होते. स्वातंत्र्यासाठी केलेल्या लढ्यापासून तो अमेरिकेतील सर्व राज्यांना लागू असणाऱ्या राज्यघटनेपर्यंत साऱ्या घडामोडी फिलाडेल्फियात घडल्या आहेत. हा इतिहास डोळ्यासमोर आला की, त्या शहरातील या जुन्या इमारती पाहताना आपली दृष्टी बदलते अमेरिकेतील लोकानी आपल्याला असलेल्या हक्काचा उद्घोष १७७४-मध्ये कार्पेटर्स हॉलमध्ये प्रथम केला, आणि ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकण्याचा निर्णयही तेथेच घेतला गेला. फिलाडेल्फिया ही तेव्हा पेनसिल्व्हानिया राज्याची राजधानी होती आणि स्टेट हाऊस ही त्या राजधानीची सर्वात महत्त्वाची वास्तू होती. ब्रिटिशांविरुद्ध लढा पुकारण्याचा निर्णय तेथील प्रतिनिधींच्या सभेत एक वर्ष उलटल्यावर १७७५- च्या मे महिन्यात घेतला गेला. युद्धाचा निर्णय बराच अनिच्छेने घेतला गेला, कारण त्यासाठी आवश्यक असे काहीच तेव्हा अमेरिकेतील या वसाहतीजवळ नव्हते इग्लंडची

सुसज्ज फौज होती, अमेरिकेला स्वातंत्र्यसैनिक उभे करावे लागले. हे सारे फिलाडेल्फियाच्या परिसरात घडले

विल्यम पेन हा पेनसिल्व्हानिया या राज्याचा शिल्पकार. राज्याचे कायदे करण्याच्या प्रक्रियेत त्याने आरंभापासून नागरिकांना सहभागी करून घेतले. १७५१ साली पेनसिल्व्हानिया असेंब्लीच्या सभापतीनी स्टेट हाउस या इमारतीवर बसवण्यासाठी एक भलीमोठी घंटा तयार करून घेण्याचा निर्णय घेतला. तांबे, शिसे, जस्त आदी धातूच्या मिश्रणाने लडनमध्ये बनवून घेतलेली ही दोन हजार पौंड वजनाची घंटा लिबर्टी बेल या नावाने ओळखली जाऊ लागली. अमेरिकेतील गुलामगिरीची प्रथा कायद्याने नष्ट केली जावी, यासाठी प्रयत्न करणाऱ्या गटाने आपल्या चळवळीचे प्रतीक म्हणून ते नाव योजले होते. नव्याने तयार होत असलेल्या घंटेवर कोरण्यासाठी सभापतीनी बायबलमधील पुढील वचन निवडले, "Proclaim liberty throughout all the land unto all the inhabitants thereof." आपल्या भूमीवरील सर्व रहिवाशांपर्यंत स्वातंत्र्याचा संदेश पोचवा, हा त्या वचनातील संदेश आहे

स्टेट असेंब्लीच्या याच इमारतीत भरलेल्या सभेत अमेरिकेला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे अशी मागणी सर्व राज्याच्या प्रतिनिधींनी १७७६-च्या जूनमध्ये केली, आणि तेव्हापासून त्या इमारतीवर बसवलेली लिबर्टी बेल ही अमेरिकेच्या स्वतंत्र्य घोषणेचे प्रतीक होऊन गेली. हरएक महत्त्वाच्या प्रसंगाच्या वेळी या घंटेची गभीर नाद फिलाडेल्फियात घुमत असे. जॉर्ज वॉशिंग्टनच्या जन्मदिनानिमित्त साजऱ्या झालेल्या एका समारंभाच्या वेळीही एकदा या घंटेचा नाद लोकांनी ऐकला होता. काही वर्षे उलटल्यावर घटेला पडलेला तडा दुरुस्त करावा लागला. नंतर पुन्हा एक बारीकशी चीर पडली व तेव्हापासून घंटेचा आवाज थांबला, पण तरीही तिच्यामुळे मिळणारा संदेश गेली दोनशे वर्षे अमेरिकन नागरिकाना मिळत राहिला, आणि ती घंटा मानवाच्या मूलभूत स्वातंत्र्याचे एक प्रतीक म्हणून मान्यता पावली आहे. तो प्रतीकाचा मान त्या घटेला आजही दिला जातो. लिबर्टी बेलच्या आकाराच्या लहानमोठ्या घटा प्रदर्शनात विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत.

स्टेट असेंब्लीच्या इमारतीला स्वातंत्र्याच्या मागणीनंतर इंडिपेंडन्स हॉल हे नाव मिळाले, त्यातील आशयही तोच आहे. हे सारे काही फ्रेंच राज्यक्रांतीतील तत्त्वत्रयीच्या घोषणेच्या आधी बारापंधरा वर्षे घडून आले आहे, आणि त्यातील स्वातंत्र्याची सकल्पना तर त्याच्याही आधी पंचवीसतीस वर्षांपर्यंत जाऊन पोचते, हे लक्षणीय आहे. याहूनही महत्त्वाची गोष्ट अशी आहे ती ही की, बोधचिह्नामध्ये जे तीन शब्द घातले आहेत, त्यांतील लिबर्टी हा शब्द मानवी स्वातंत्र्याचा तर इंडिपेंडन्स हा राजकीय स्वातंत्र्याचा द्योतक आहे. पण त्याहून ध्यानात येणारी गोष्ट अशी की, यांतील पहिला शब्द व्हर्च्यू म्हणजे सद्‌गुण हा आहे. सदगुणांतून सद्वर्तन

आकाराला येते, आणि त्याचा पाया नैतिक मूल्ये हा असतो, हे व्हर्च्यू हा शब्द वाचताना मनात आल्याशिवाय राहात नाही. स्वातंत्र्याच्या नावाखाली जुलूम वा अनाचार होता कामा नये, त्यासाठी माणसाने प्रथम सद्‌गुण अंगी बाणवले पाहिजेत, त्यायोगे त्याला लाभणाऱ्या स्वातंत्र्याचा उपयोग कसा करावा आणि कशासाठी करावा याची योग्य ती दिशा त्याला मिळू शकते; असेही काही हे तीन शब्द ज्या क्रमाने आले आहेत त्यामुळे मनात येऊन जाते.

स्टेट हाउसच्या इमारतीतील सभेत १७७६-च्या जून महिन्यात स्वातंत्र्याच्या मागणीचा प्रस्ताव संमत केला गेला, आणि म्हणून ती इमारत त्यानंतर इंडिपेंडन्स हॉल या नावाने ओळखली जाऊ लागली. त्याच्या आधीच्या वर्षी भरलेल्या सभेत जॉर्ज वॉशिंग्टन याची अमेरिकेच्या स्वातंत्र्यसेनेचा सेनापती म्हणून नेमणूक करण्यात आली. १७७४, १७७५ आणि १७७६ अशा लागोपाठच्या तीन वर्षांत घडलेल्या या महत्त्वाच्या घटना आहेत. त्या जेथे घडल्या त्या इमारती मी पाहात होतो, आणि युद्धाची तयारी केली गेली त्या परिसरातून फिरत होतो. अजितच्या मार्गदर्शनामुळे हे सारे पाहणे आणि समजून घेणे सुलभ होऊन गेले. त्याचा तेरा वर्षांचा कौस्तुभही उत्साही आणि हुषार मुलगा आमच्याबरोबर मोठ्या हौसेने फिरत होता. थॉमस जेफर्सनने अमेरिकेच्या राज्यघटनेला अखेरचा आकार दिला, तोही इंडिपेंडन्स हॉलमध्ये. विविध राज्यांना एका सूत्रात आणणे सोपे गेले नाही. पुढील अकराबारा वर्षांत अनेक बैठकी झाल्या. त्यांतील सारे चढउतार येथे पाहण्याचे कारण नाही. अखेर १७८७-च्या सप्टेंबरमध्ये अमेरिकेची राज्यघटना संमत करण्यात आली. १८००-मध्ये वॉशिंग्टनला राजधानी जाईपर्यंत फिलाडेल्फिया ही अमेरिकेची राजधानी होती, आणि एक नवीन राष्ट्र मजबूत पायांवर उभे करण्याच्या दृष्टीने अनेकानेक गोष्टींची उभारणी करण्याचे काम तेथे झाले.

## समकालीन भारतातील स्थिती

भारतातही या काळात इंग्रजांशी लढा सुरू झाला होता, आणि १७५७-च्या प्लासीच्या लढाईनंतर दिल्लीच्या बादशहाचे प्रतिनिधी म्हणून ईस्ट इंडिया कंपनी बंगालचा कारभार पाहू लागली. संपूर्ण भारतावर स्वामित्व मिळवण्याची आकांक्षा इंग्रजांच्या मनात तेव्हाच जागी झाली होती, पण भारतातील विखुरलेल्या राजसत्तांना हा आपल्या पारतंत्र्याकडील वाटचालीचा प्रारंभ आहे हे कधी कळले नाही. दिल्लीचा बादशहा इंग्रजांकडे कारभार देऊन मोकळा झाला मोगल साम्राज्याच्या केन्द्रस्थानी असलेल्या व्यक्ती कर्तव्यशून्य झाल्या होत्या. मराठ्यांचा झगडा मोगलांशी सुरू होऊन एक शतक उलटून गेले होते, आणि १७६१- मध्ये पानिपतच्या लढाईत भीषण पराभव होऊनही पुढील बारा वर्षांतच त्यातून पहिल्या माधवरावाने मराठेशाहीला पुन्हा ऊर्जितावस्था आणली. त्यान्च्या अकाली निधनानंतर पेशवेपदावरील व्यक्तींचे कर्तृत्व

संपुष्टात आले आणि राघोबादादाने तर गृहकलहच केला. तरीही मुत्सद्दी म्हणून नाना फडणीस इंग्रजांना चिंता उत्पन्न करू शकला, आणि महादजी शिंदे यानी तर दक्षिणच्या कारभाराची सूत्रे एका सनदेच्या रूपाने अधिकृतपणे मिळवण्यापर्यंत दिल्लीत मराठ्याचा जम बसवला.

पण इंग्रज या नावाची एक सत्ता हळूहळू आपल्या देशात पाय रोवते आहे, याकडे अवश्य त्या गांभीर्याने कोणी पाहिले नाही. मराठ्यांच्या छत्रपतीचे वास्तव्य सातारला होते, पण राजकरणाचे केन्द्र पेशव्यांमुळे पुण्यात आले. शनिवारवाडा हा त्याचा साक्षीदार आहे त्याच्या मुख्य दरवाजाच्या वरच्या बाजूस असलेल्या दालनामध्ये अखिल भारताच्या राजकारणावर परिणाम करणारे निर्णय काही काळ घेतले गेले आहेत. पण या साऱ्याला कधी नीट आकार आला नाही. पुण्यातील राजकीय केन्द्र आणि दिल्लीतील अस्तंगत होत असलेल्या साम्राज्याचे केन्द्र या दोन ठिकाणच्या नेत्यांनी एकत्रित बसून इंग्रजांना कसे तोंड द्यावे, याची काही योजना आखल्याचे आपल्या इतिहासात काहीही आढळत नाही. सारे फुटीर होते. राजस्थानमधील सारे शौर्य शिवरायांच्या समकालीन असलेल्या राजसिंहांशी समाप्त झाले होते. शीखाचा प्रभाव पंजाबात होता, पण त्याना इग्रजांच्या संकटाची तशी जाण नव्हती. थोडीफार रणजितसिंहाला होती, बिहारमध्ये राणा कुवरसिंहाला होती. १८५७-मध्ये एक प्रचंड उद्रेक झाला, पण त्यात शिस्त नव्हती, आणि खऱ्या अर्थाने योजनाही नव्हती.

कर्तबगार अशा महादजी शिंद्याच्या वशजानी आपली अधिसत्ता ग्वाल्हेरमध्ये प्रस्थापित केली होती, पण १८५७-मध्ये ते अलिप्त होते, राजस्थानात चिडीचीप होते, इंदूरच्या होळकरांनाही काही वार्ता नव्हती. नानासाहेब पेशवे पुण्याचे, लढले उत्तरेत जाऊन पण साथ कोणाची होती? इतिहासकार राजवाड्यानी म्हटले आहे की, नुसते शिंदे आणि होळकर हे दोघे जरी रणांगणात एकत्र उभे ठाकले असते, तरी इग्रजाना गाशा गुंडाळावा लागला असता. त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे सामान्य भारतीय माणसाला या राजकीय घडामोडीशी ना काही कर्तव्य होते, ना त्याची काही जाण होती. हे राज्य आपले आहे, असे प्रजेला वाटले पाहिजे, अशी शिवरायांची भूमिका होती, आणि तो भाव ते आपल्या प्रजेत निर्माण करू शकले होते, हे त्याच्या निधनानतर व छत्रपती सभाजी महाराजानी हौतात्म्य पत्करल्यावर अठरा वर्षे औरगजेबाने महाराष्ट्रात ठाण मांडूनही त्याला हा प्रदेश काबीज करता आला नाही, यात दिसून आले पण हा सारा उज्ज्वल वारसा पुढे स्वराज्याचे साम्राज्य झाल्यावर विस्मृतीत गेला आणि साम्राज्याचे रूपातर निरनिराळ्या स्वतत्र संस्थानात झाले. त्या साऱ्या सस्थानिकानी केवळ आपली जहागीर शाबूत राहावी एवढेच पाहिले. ते सारे एकत्रित बसले असते तर?

फिलाडेल्फियात पाठोपाठ तीन वर्षे सभा होत होत्या, विचारविनिमय होत होता, परिस्थितीला अनुरूप निर्णय घेतले जात होते त्याच वेळी नागरिकांतून सैनिक उभे राहात

होते. इंग्लडला सैन्य आपल्या देशातून अमेरिकेत न्यावे लागले, अमेरिकेत त्यांची नोकरी पत्करणारे सैनिक त्याला मिळाले नाहीत. भारतात मात्र येथील प्रजेतूनच इग्रजाना हजारानी सैनिक मिळवता आले. राज्यकर्त्यांचा सामान्य जनतेशी कोणताही धागा नसल्याचे हे लक्षण आहे. राज्य चालवण्याचे क्षेत्र असो वा धर्माच्या अनुशासनाचे असो, भारतात सर्वसामान्य माणसांशी या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांतील नेत्याचे कोणतेही नाते उरलेले नव्हते. ही आपल्या देशाची शोकांतिका ठरली.

अजूनही त्याचे बीज आपण नष्ट केले आहे आणि सामान्य माणसाच्या कल्याणापर्यंत राज्यशासन पोचले आहे वा सांस्कृतिक एकात्मतेची काही जाग आली आहे, असे आपण म्हणू शकतो काय, हा स्वातंत्र्यप्राप्तीला पन्नास वर्षे होत असतानाच्या या वर्षातील आत्मपरीक्षणाचा खरा प्रश्न आहे. संसदेतील लोकप्रतिनिधींनी व भिन्न भिन्न राजकीय पक्षानी याचा विचार करावयास हवा, आणि तो विचार सारा व्यक्तिगत वा पक्षगत स्वार्थ बाजूला सारून करावयास हवा. फिलाडेल्फियातील कार्पेंटर हॉल आणि इंडिपेंडन्स हॉल येथे घडलेल्या घटना, आणि स्वातंत्र्ययुद्धाच्या त्या काळात एकीकडे घटनाकार थॉमस जेफर्सन आणि दुसरीकडे सेनापती असलेला जॉर्ज वॉशिंग्टन अशा दोघांनी दोन भिन्न क्षेत्रांत बजावलेली कामगिरी पाहात असताना भारताचेही चित्र अपरिहार्यपणे डोळ्यांसमोरून अशा प्रकारे जात राहिले

## पिट, चॅथॅम आणि एडमंड बर्क

कार्पेंटर्स हॉल आणि इंडिपेंडन्स हॉल या दोनशेहून अधिक वर्षापूर्वीच्या दोन इमारतीच्या जवळच या लढ्याचे दर्शन घडवणारी भव्य आणि सुदर इमारत उभी राहिली आहे. पर्यटकांसाठी स्वागतकक्षापासून माहिती केन्द्रापर्यंत निरनिराळे विभाग आहेत. पत्रके, पुस्तिका, नकाशे, आणि महत्त्वाचे ग्रंथ यांचे दुकान आहे. अमेरिकन राज्यघटनेची सुबक छापलेली प्रत आणि इंडिपेंडन्स हॉलचा इतिहास असे काही साहित्य विनामूल्य दिले जाते. इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर एक चित्रमंदिर आहे ओडक्यांच्या साहाय्याने सैनिकांसाठी लाकडी बराकी तयार करण्यापासून तो सामान्य नागरिकांना युद्धाचे शिक्षण देण्यापर्यंत त्या काळात काय काय केले गेले, त्यावर आधारलेला वीस मिनिटांचा एक चित्रपट तेथे दर अर्ध्या तासाला दाखवला जातो. तो पाहताना व्हॅली फोर्जच्या परिसरातील इतिहास डोळ्यांसमोर साकार झाला. याच प्रशिक्षित सैन्याने पुढे जॉर्ज वॉशिंग्टनच्या नेतृत्वाखाली युद्धात विजय संपादन केला. त्यातून जे प्रजासत्ताक उदयाला आले, त्याच्या राज्यघटनेचा शिल्पकार असलेला फ्रॅंकलिन जेफर्सन याला तेवढेच महत्त्वाचे स्थान या साऱ्या लढ्यात होते. वॉशिंग्टन आणि जेफर्सन या दोघानी अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धात दोन प्रकारच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या.

ब्रिटिशाचा वसाहतवाद असा शब्दप्रयोग काही वेळा त्याच्या भारतावरील राजकीय आधिपत्याच्या संदर्भात कानावर येतो. आज होत असलेल्या आर्थिक आक्रमणाची चर्चा होत असतानाही तो शब्द क्वचित येतो. मागच्या अनेक शतकांच्या आपल्या इतिहासाची किंवा भारतातील आजच्या चालू राजकरणाची मीमांसा करताना एखाद्या आर्थिक, सामाजिक, वा राजकीय अन्यायावर बोट ठेवण्यासाठी त्याला वसाहतवाद असे म्हटले जाते. अशी त्या शब्दाची वाढती व्याप्ती दिसते मनात येते की, भारत ही काही इंग्रजांची वसाहत नव्हे. आपल्या देशावर झालेल्या त्यांच्या आक्रमणाला साम्राज्यवाद म्हणणे अधिक सयुक्तिक आहे. ब्रिटिशांच्या वसाहतवादाचे अमुकअमुक अवशेष अद्याप शिल्लक आहेत, असे विधान कधीकधी केले जाते.

एखाद्या प्रदेशात बाहेरून येऊन वस्ती केली जाते, तेव्हा तेथे वसाहत निर्माण झाली, हे म्हणणे बरोबर ठरते. अमेरिकेच्या अनेक भागांत इग्रजांच्या अशा निरनिराळ्या वसाहती निर्माण झाल्या. त्यांच्यावर अन्याय होऊ लागला, तेव्हा इंग्लंडमधील इंग्रजांशी सामना करताना वसाहतवादाला विरोध असा शब्दप्रयोग अमेरिकेतील लोकांनी केला. त्या वेळी त्या शब्दाचा जन्म झाला असावा. निरनिराळ्या वसाहतीना लढ्यासाठी एकत्र आणणे हादेखील त्या लढ्याचा एक भाग होता. तोवर त्या वसाहती विखुरलेल्या होत्या. अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या संदर्भात हा शब्द भेटतो, तेव्हा तो समर्पक वाटतो. तोच पुढे भारताच्या व इतर अंकित देशांच्या सदर्भात योजला जाऊ लागला असावा , असा एक तर्क व्हॅली फोर्जचा इतिहास आणि त्यावरील चित्रपट व प्रदर्शन पाहताना मनात येऊन गेला. कदाचित वसाहतवाद या शब्दाचे मूळ याहून निराळेही असू शकेल.

नव्याने उदयास येत असलेल्या अमेरिकेला विरोध करण्याचा शर्थीचा प्रयत्न लॉर्ड नॉर्थ यांच्या नेतृत्वाखाली इगलंडच्या पार्लमेंटने केला. सिंहासनावर असलेल्या तिसऱ्या जॉर्जने तर अटीतटीने युद्धाचा पाठपुरावा केला. पण फ्रेंच राज्यक्रांतीचे भवितव्य ओळखणारे जसे काही विचारवंत इंग्लंडमध्ये होते, तसेच अमेरिकेशी चाललेल्या युद्धाचे व्यर्थत्व जाणणारेही कोणीकोणी संसदपटू होते. यांतील पहिला आवाज उठवला तो पिटने. त्याने पार्लमेंटमध्ये १७६६-च्या जानेवारीत केलेल्या भाषणात स्पष्टपणे म्हटले, ''वसाहतीवर कर लादण्याचा कोणताही अधिकार इंग्लंडला नाही.'' वसाहतींचे प्रतिनिधित्व पार्लमेंटमध्ये आपोआपच केले जात आहे, या भ्रामक विधानाची तर त्याने केवळ टर उडवली, आणि स्पष्टपणे म्हटले, ''अमेरिका विरोध करीत आहे याचा मला आनंद वाटतो.''

हळूहळू अमेरिकेतील लढायात इंग्लंडचा पराभव होण्यास प्रारंभ झाला. पण तरीही युद्ध न थांबवण्याचा जॉर्ज राजाचा हट्ट कायम आहे हे पाहून १७७७ -च्या नोव्हेंबर महिन्यात

वयोवृद्ध सदस्य अर्ल ऑफ चॅथॅम याचे पार्लमेंटमध्ये एक गाजलेले भाषण झाले. राजा जॉर्ज पार्लमेंटच्या मताकडे काणाडोळा करीत आहे यावर घणाघाती टीका करणारे ते एक ओजस्वी भाषण होते. लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या मताकडे राजाला दुर्लक्ष करता येणार नाही, हा त्यातील इशारा लोकशाहीच्या रक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. भारताच्या मध्ययुगीन इतिहासात असे काहीही आढळत नाही. अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या सदर्भात ''इंग्लड अमेरिका पादाक्रांत करू शकणार नाही'' हे त्याचे त्या भाषणातील वाक्य दीर्घकाळ लोकांच्या स्मरणात राहिले. फ्रेंच राज्यक्रांतीवर कडाडून टीका करणारा एडमंड बर्क हा सतत चारपाच वर्षे अमेरिकेच्या बाजूने बोलत राहिला. इंग्लंडचा या लढ्यात निभाव लागणार नाही आणि आपण ही लढाई चालू ठेवण्यात आपले दूरगामी हित नाही, हे त्याचे उद्‌गारही चिरस्मरणीय ठरले. फ्रान्समधील राज्यक्रांती ही अमेरिकेच्या या युद्धानंतर बारापंधरा वर्षांनी घडलेली घटना आहे. या दोन्ही वेळी एडमंड बर्कने केलेली भाषणे अतिशय गाजलेली आहेत.

शहरातील आमचा हा फेरफटका सकाळी आणि दुपारी अशा दोन भागांत झाला. साडेअकरा वाजता आम्ही घरी आलो, तर साठे, कुलकर्णी, आणि वाकणकर असे अजितचे तीन मित्र सपत्नीक आले होते, आणि श्रीमती दीक्षित होत्या. ही अजितची मित्रमंडळी होती. या सर्वांनी त्याने गप्पागोष्टी करण्यासाठी मुद्दाम बोलावले होते. कोणी कोणी काही प्रश्न विचारले आणि त्यावर चर्चा झाली. सगळे चांगले जाणकार होते. वेदकाल, उपनिषदे, भारतीय युद्ध, त्यावरून भगवद्‌गीता, महाभारताची रचना, भगवान श्रीकृष्ण आणि गौतमबुद्ध या विभूती, असे अनेक विषय बोलण्याच्या ओघात येत गेले. सारेजण तिशीपस्तीशीतील तरुण आणि जिज्ञासू होते. संभाषणाला रंगत आली, वेळ कोठे गेला ते कळले नाही, आणि दोन तास असे गेल्यावर मग सर्वांचे एकत्रित भोजन झाले. हे सारे अजितने आधी ठरवून ठेवले होते. कोणी बर्वे म्हणून होते, त्यांना येता आले नाही म्हणून त्यांनी दूरभाषवरून माझ्याशी संपर्क साधला. त्यांनी काही प्रश्न विचारावयाचे होते. तो दूरसंवादही वीस मिनिटे चालू राहिला.

# ८. राजधानी वॉशिंग्टन

स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात राजधानीचे शहर असलेल्या फिलाडेल्फियातील ऐतिहासिक महत्त्वाची स्थाने पाहून अमेरिकेची राजधानी झालेल्या वॉशिंग्टनमध्ये मी पाऊल ठेवले. सुहास दामले हा माझ्या आतेभावाचा मुलगा फिलाडेल्फियात अजितकडे येऊन आपल्या गाडीतून मला वॉशिंग्टनला घेऊन गेला. हा प्रवास तीन तासांचा झाला. पुढील तीन दिवस वॉशिंग्टनमध्ये फिरण्यात गेले. ज्यावर सूर्य मावळत नव्हता अशा ब्रिटिश साम्राज्याची राजधानी म्हणून लंडनला जे ऐतिहासिक महत्त्व आहे, ते आताच्या काळात जगातील सर्वात बलिष्ठ महासत्तेची राजधानी असलेल्या वॉशिंग्टनला आहे. साऱ्या जगावर दूरगामी परिणाम करणारे निर्णय आज येथे घेतले जातात, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

### जगातील महासत्तेचे केन्द्रस्थान

दुसऱ्या महायुद्धात इंग्लंड, रशिया, आणि अमेरिका ही तीन राष्ट्रे आपद्धर्म म्हणून एकत्र आली, आणि त्यांनी जर्मनी, इटली, आणि जपान या तीन हुकूमशाही राष्ट्रांचा पराभव केला. त्या घटनेला आता बावन वर्षे होत आहेत. महायुद्ध संपल्यावर छोट्या इंग्लंडचे जागतिक रंगमंचावरील तेज त्याचे साम्राज्य नष्ट झाल्यामुळे मंद होत गेले हे भवितव्य अटळ होते. उरलेल्या दोघांतील अमेरिका लोकशाही राष्ट्र, तर रशिया हुकूमशाही पद्धतीचा. हेच वर्णन रशियाच्या बाजूने करावयाचे झाले, तर अमेरिका हा भांडवलशाही देश, तर रशिया हे साम्यवादी राष्ट्र. जागतिक कामगारक्रांतीची ध्वजा रशियाने खांद्यावर घेतलेली. ध्येय सामान्य नव्हते, जगाला गवसणी घालण्याचे होते. हरएक व्यक्तीला अन्न, वस्त्र आणि निवारा मिळाला पाहिजे, काम मिळाले पाहिजे, सारी संपत्ती संपूर्ण समाजाच्या मालकीची असली पाहिजे, आणि कोणत्याही निमित्ताने कोणाही व्यक्तीवर कसलाही अन्याय होता कामा नये, एवढेच नव्हे, तर हरएकाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवीत असताना सर्वात वरच्या दर्जाच्या सुविधा सर्वात सामान्य माणसांपर्यंत पोचून खरीखुरी समता प्रस्थापित झाली पाहिजे; हे कार्ल मार्क्सचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी लेनिनने रशियात क्रांती घडवून आणून साम्यवादी राजवट निर्माण केली. नवे रूप धारण केलेला हा रशिया जागतिक क्रांतीसाठी बद्धपरिकर

# ८. राजधानी वॉशिंग्टन

स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात राजधानीचे शहर असलेल्या फिलाडेल्फियातील ऐतिहासिक महत्त्वाची स्थाने पाहून अमेरिकेची राजधानी झालेल्या वॉशिंग्टनमध्ये मी पाऊल ठेवले. सुहास दामले हा माझ्या आतेभावाचा मुलगा फिलाडेल्फियात अजितकडे येऊन आपल्या गाडीतून मला वॉशिंग्टनला घेऊन गेला. हा प्रवास तीन तासांचा झाला. पुढील तीन दिवस वॉशिंग्टनमध्ये फिरण्यात गेले. ज्यावर सूर्य मावळत नव्हता अशा ब्रिटिश साम्राज्याची राजधानी म्हणून लंडनला जे ऐतिहासिक महत्त्व आहे, ते आताच्या काळात जगातील सर्वात बलिष्ठ महासत्तेची राजधानी असलेल्या वॉशिंग्टनला आहे सार्‍या जगावर दूरगामी परिणाम करणारे निर्णय आज येथे घेतले जातात, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

## जगातील महासत्तेचे केन्द्रस्थान

दुसर्‍या महायुद्धात इंग्लंड, रशिया, आणि अमेरिका ही तीन राष्ट्रे आपद्धर्म म्हणून एकत्र आली, आणि त्यांनी जर्मनी, इटली, आणि जपान या तीन हुकूमशाही राष्ट्रांचा पराभव केला. त्या घटनेला आता बावन वर्षे होत आहेत. महायुद्ध संपल्यावर छोट्या इंग्लंडचे जागतिक रंगमंचावरील तेज त्याचे साम्राज्य नष्ट झाल्यामुळे मंद होत गेले. हे भवितव्य अटळ होते. उरलेल्या दोघांतील अमेरिका लोकशाही राष्ट्र, तर रशिया हुकूमशाही पद्धतीचा. हेच वर्णन रशियाच्या बाजूने करावयाचे झाले, तर अमेरिका हा भांडवलशाही देश, तर रशिया हे साम्यवादी राष्ट्र. जागतिक कामगारक्रांतीची ध्वजा रशियाने खांद्यावर घेतलेली. ध्येय सामान्य नव्हते, जगाला गवसणी घालण्याचे होते. हरएक व्यक्तीला अन्न, वस्त्र आणि निवारा मिळाला पाहिजे, काम मिळाले पाहिजे, सारी संपत्ती सपूर्ण समाजाच्या मालकीची असली पाहिजे, आणि कोणत्याही निमित्ताने कोणाही व्यक्तीवर कसलाही अन्याय होता कामा नये, एवढेच नव्हे, तर हरएकाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवीत असताना सर्वात वरच्या दर्जाच्या सुविधा सर्वांत सामान्य माणसांपर्यंत पोचून खरीखुरी समता प्रस्थापित झाली पाहिजे; हे कार्ल मार्क्सचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी लेनिनने रशियात क्रांती घडवून आणून साम्यवादी राजवट निर्माण केली. नवे रूप धारण केलेला हा रशिया जागतिक क्रांतीसाठी बद्धपरिकर

आहे, असे विलोभनीय चित्र साऱ्या जगातील राष्ट्रांपुढे उभे केले गेले.

साम्यवादाचा हा मूळ ध्येयवाद एवढ्या उज्ज्वल स्वरूपाचा होता की, जगातील अनेक बुद्धिमंताना त्याची अक्षरशः भुरळ पडली, आणि तसे पाहू गेले तर यात काहीही गैर नव्हते. शतकानुशतके पोषण, आरोग्य, शिक्षण, आणि संस्कृती यांना वंचित राहिलेल्या प्रचंड बहुसंख्येच्या साऱ्या जगातील गोरगरिबांना व पददलितांना उज्ज्वल भवितव्याचे आश्वासन देणारा हा ध्येयवाद कोणाला आकर्षक वाटणार नाही? भारतीय स्वातंत्र्यासाठी हौतात्म्याचे दिव्य दाहक व्रत घेतलेले अनेक क्रांतिकारक या जागतिक पातळीवरील ध्येयवादाकडे आकर्षित झाले. भारतातून अमेरिकेत गेलेल्या नरेन्द्र भट्टाचार्य याचे नाव त्यांत अग्रभागी लिहावे लागेल. त्याने मेक्सिकोसारख्या परक्या देशात एवढे अद्‌भुत कार्य केले की, लेनिनने त्याला मुद्दाम रशियात बोलावून घेतले, आणि हा भारतीय तरुण त्याला भेटावयास गेला, तर रशियन क्रांतीचा शिल्पकार असलेल्या लेनिनने आपल्या खुर्चीतून उठून त्याचे स्वागत केले. तोवर नरेन्द्र भट्टाचार्य हा मानवेन्द्रनाथ रॉय या नावाने सर्वांना परिचित होऊन गेला होता. पुढील दशकात एकीकडे युगोस्लाव्हिया तर दुसरीकडे चीन येथे मार्शल टिटो आणि माओ त्से -तुंग या साम्यवादी नेत्यांचा उदय झाला, व ते दोन देश रशियन ध्येयवादाचे पाईक झाले.

जागतिक पातळीवर घडत असलेल्या या उज्ज्वल सांस्कृतिक कार्याचे सूत्रचालन करणारे जे अत्युच्च श्रेणीतील नेते होते, त्यांत एक भारतीय तरुण होता ही आपल्या देशाच्या कर्तृत्वाची व बुद्धिमत्तेची एक अभिमानास्पद खूण आहे. दृष्टिकोण थोडाफार निराळा असला, तरी कर्तृत्वाचे तेज निर्विवाद आहे. पण नंतर मार्शल टिटोची वाट थोडी बाजूला गेली. तेथील भिलोवान जिलास आणखी थोडा वेगळा मार्ग धरू लागताच तुरुंगात पाठवला गेला. माओने इतका वेगळा मार्ग काढला की, कालांतराने रशियावादी आणि चीनवादी असे साम्यवादाचे दोन भिन्न मार्ग होऊन गेले. परस्परांत दुरावाही आला. पण रशियाच्या सर्व हालचालीमागे जागतिक प्रभुत्वाची आकांक्षा होती, स्तालिनच्या कार्यपद्धतीत हुकूमशाही लपलेली होती, आणि जगापुढे जे चित्र उभे केले जात होते त्यात प्रचंड प्रमाणावर असत्याचा भाग होता, हे हळूहळू ध्यानात येऊ लागले. आर्थर कोस्लरची "डार्कनेस ॲट नून" ही कादंबरी त्या दृष्टीने अविस्मरणीय आहे. "असाइनमेट इन युटोपिया" या ग्रंथामध्ये एक अमेरिकेन पत्रकार साम्यवादाचे आकर्षण वाटून रशियात गेला. त्याने आपली कथा सांगितली आहे तेथील वस्तुस्थिती आणि जगात केला जाणारा प्रचार यांतील अफाट अंतर पाहून तो पत्रकार अतिशय उद्विग्न होतो. त्याचा भ्रमनिरास होतो.

त्या पत्रकाराचा तो सारा अनुभव वाचताना, एखाद्या श्रेष्ठ नेत्याकडून केवळ प्रचारयंत्रणेच्या द्वारा आपल्या देशबांधवांची आणि त्याच वेळी साऱ्या जगाची केवढी फसवणूक केली जात

होती, हे पाहून आपण केवळ दिङ्मूढ होऊन जातो. संपूर्ण राष्ट्राच्या पातळीवरून एवढे धादांत असत्य सतत सांगितले जाऊ शकते, जागतिक क्रांतीचे कंकण बांधलेल्या देशाच्या पोलादी पडद्याआड थोड्याशा मतभेदापोटी लक्षावधी लोकांची हत्या होते, आणि केवळ संशयापोटी हजारो कार्यकर्त्यांचे तुरुंगात अमानुष हाल केले जाऊ शकतात, यावर क्षणभर आपला विश्वासही बसत नाही. विसाव्या शतकातही असे घडू शकते, हे भीषण सत्य, आपला स्वत:वरचाच विश्वास उडून जावा एवढा विदारक परिणाम आपल्या मनावर करून जाते. तो तपशील १९५३ साली स्तालिनचा मृत्यू झाल्यानंतर क्रुश्चेवमुळे प्रथम उजेडात आला. हळूहळू तो सर्वांना समजला. पण त्याच अवधीत महायुद्धोत्तर कालखंडातील एक महासत्ता हे रशियाचे चित्र उभे राहिले. अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांची स्पर्धा जागतिक राजकारण ते चंद्रावर मानवाचे पदार्पण येथवर सर्व क्षेत्रांत चालू राहिली.

रशियामध्ये प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे, याचे विश्वरूपदर्शन अखेर दहा वर्षांपूर्वी गोर्बाचेव्हने घडवले, पण आपल्या देशात परिवर्तन घडवून आणण्यात त्याला यश आले नाही. तो बाजूला फेकला गेला. थोड्याच दिवसांत रशियाचेच तुकडे होऊन सत्तरपंचाहत्तर वर्षांचे जगातील अनेकानेक तरुणांनी मनाशी रंगवलेले रमणीय स्वप्न उद्ध्वस्त झाले. हा सारा इतिहास आताच्या पिढीने पाहिला आहे. मानवेन्द्रनाथांना याचा वास फार पूर्वी लागला होता. जागतिक पातळीवरचा आपला सारा ध्येयवाद बाजूला ठेवून ते दुसऱ्या महायुद्धाच्या आधीच भारतात परत आले आणि आपला विचार त्यांनी रॅडिकल ह्युमॅनिझम या नावाने मांडला. त्यांनाही अतिशय बुद्धिमान सहकारी मिळाले. भारतातील साम्यवादी पक्षातही अतिशय बुद्धिमान नेते होते. पण ते सारेच आता अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहेत, कारण त्यांचा रशियाचा आधार गेल्यामुळे त्यांच्या पक्षाभोवती असलेले आंतरराष्ट्रीय वलय नाहीसे झाले, आणि भारतातील सांस्कृतिक सत्त्वाशी नाते जोडण्याचा प्रयत्न आपण कधीच केला नाही, ही आपली फार गंभीर चूक झाली हे त्यांच्या ध्यानात आले. आता तो प्रयत्न चालू आहे, तो प्रामाणिकही आहे, पण आता फार उशीर झाला आहे.

शिवाय भारताचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे फुटीरपणा. त्या राष्ट्रीय शापातून अत्याधुनिक साम्यवादी पक्षही सुटला नाही. त्याचे चार गट परस्परांपासून दूर आहेत. त्या सर्वांना प्रतिगामी ठरवणारा नक्षलवाद्यांचा मार्ग आहे. ते तर हातात शस्त्र घेऊन उभे आहेत. काही लोकांची आहुती पडेल, पण कालांतराने ज्या मार्गाने रशिया गेला त्याच मार्गाने हे सारेजण जाणार आहेत. किती वर्षे लागतील एवढाच प्रश्न आहे. तोवर भारताची कोणती प्रतिमा उभी राहणार आहे हा ज्याच्या त्याच्या मताचा प्रश्न आहे. त्याचे उत्तर भविष्यकाळातच मिळणार आहे. पण एक खरे की, जागतिक राजकारणातील महासत्ता म्हणून उभा असलेला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

रशिया मोडून पडल्यावर आज तरी प्रत्यक्षात उरली आहे ती एकमेव महासत्ता म्हणजे अमेरिका. चीनला या स्पर्धेतून बाजूला ठेवता येणार नाही. अमेरिकाही सावध आहे. पण अद्याप तरी चीन वाटचाल करीत आहे. दुसरे महायुद्ध जिंकता आले, ते चर्चिलचा निर्धार आणि अमेरिकेचे सहकार्य यांमुळे युद्धातील विजयाबरोबर चर्चिलचे जीवितकार्य समाप्त झाले, आणि त्याच वेळी अमेरिकेला साऱ्या जगावर अधिराज्य चालवण्याची स्वप्ने पडू लागली. क्यूबासारख्या प्रसंगात तिला रशियाविरुद्ध विजय मिळाला, पण व्हिएटनाममधून दीर्घकाळानंतर पाऊल मागे घ्यावे लागले.

देशांच्या इतिहासात असे चढउतार अटळ असतात. रशिया कोसळल्यावर दुभंगलेला जर्मनी एकत्र आला आहे, तर रणांगणात पराभूत झालेल्या छोट्याशा जपानने व्यापाराच्या क्षेत्रात अमेरिकेवर मात केली आहे. तरीही हे खरे की, आज जागतिक राजकारणात महासत्ता आहे ती अमेरिका. त्या अमेरिकेच्या राजधानीत माझे पाऊल पडले होते. साहजिकच तेथे फिरत असताना व्हाइट हाउसकडे दृष्टी टाकल्यावर या ठिकाणी आज साऱ्या जगात प्रभावशाली असलेल्या अध्यक्ष बिल क्लिंटनचे वास्तव्य आहे, असे मनात आल्याशिवाय राहिले नाही. मी वॉशिंग्टनमध्ये असताना डोल आणि क्लिंटन यांची निवडणुकीची प्रचारमोहीम चालू होती. त्या दोघांना एका व्यापीठावर आणून त्यांना विचारले गेलेले प्रश्न आणि त्यांनी दिलेली उत्तरे ऐकली. प्रचाराचा सार्वजनिक गदारोळ मात्र थोडासाही नव्हता. सारे दैनंदिन व्यवहार शांतपणे चालू होते. रिपब्लिकन आणि डेमॉक्रॅटिक असे दोनच राजकीय पक्ष असल्यामुळे मतामतांचा गलबला नव्हता. दोन्ही बाजूंनी इतका मजकूर वृत्तपत्रांतून येत होता की, सारा दिवस खर्च केल्याशिवाय तो सगळा वाचणे अशक्य होते. नागरिकांच्या विविध प्रश्नांवरील प्रतिक्रियाही वर्तमानपत्रांतून येत होत्या.

पण माझे अमेरिकेतील अंतर्गत राजकारणाविषयीचे ज्ञान जवळजवळ शून्य म्हणावे इतके होते. त्यामुळे विचारवंतांच्या लेखांचेही पुरेसे आकलन मला होणे शक्य नव्हते. शिवाय कोणाही अमेरिकन व्यक्तीशी माझा संपर्क आला नाही आणि आला असता तरी संवाद तो काय होणार? आपण प्रवासी म्हणून अनेक स्थळाना भेटी दिल्या, आणि समजा, काही सार्वजनिक सभांना वा कार्यक्रमांना गेलो, तरी अशा धावत्या प्रवासात त्या समाजाचे अंतरंग समजणे हे जवळजवळ अशक्य असते. आपण नुसतेच साक्षी राहात नाही, तर ज्याला आसपास काय चालले आहे हे काहीही कळत नाही असे अज्ञानग्रस्त साक्षी असतो. भारतातल्या भारतात उत्तर प्रदेश, आसाम वा केरळ येथील अंतर्गत प्रवाह आपल्याला समजत नाहीत, मग अमेरिकत ते कळणे फारच दूर. इराकच्या सद्दाम हुसेनबद्दल माझे मत विशेष अनुकूल नाही. त्याने कुवेतवर केलेल्या आक्रमणाचे जावो, कुर्दिश निर्वासितांना

रेडक्रॉसकडून मिळालेली मदतही पोचू नये यासाठी त्याने निर्माण केलेले अडसर त्याच्याविषयी प्रतिकूल मत बनण्यास माझ्यापुरते पुरेसे होते. पण अमेरिकेत कोणाशी तरी बोलत असताना, सद्दाम हुसेनवर अमेरिकेने आणलेली टाच ही संपूर्णपणे एक देखावा उभा करून त्या निमित्ताने आणली गेली आहे, असे म्हटलेले ऐकल्यावर मला काही कळेनासेच झाले. मी केवळ अधिक प्रश्न विचारून त्या व्यक्तीचे म्हणणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. कारण संपूर्ण राष्ट्राच्या पातळीवरून धादांत खोटा प्रचार पद्धतशीर केला जातो, हे तोवर समजले होते.

आंतरराष्ट्रीय प्रश्नाचे राहू द्यावे. गर्भपाताचा अधिकार मुक्त असावा, का त्यावर काही मर्यादा घालावी, हा अनेक विवाद्य मुद्द्यांपैकी एक होता, असे वृत्तपत्रांतील काही मजकुरावरून वाटले. एका स्त्रीने तर ''कायद्याची कोणतीही सत्ता आमच्या शरिरावर असता कामा नये'' असे प्रतिपादन एका लेखात केले होते. त्यावरून हा काहीतरी वादाचा प्रश्न होता असे वाटते. पण तो नेमका काय आहे हे जाणून घेण्याच्या खटाटोपात मी शिरलो नाही. हे तपशील बाजूला ठेवावेत. बिल क्लिंटन याची अध्यक्ष म्हणून फेरनिवड झालेली दूरदर्शनवर पाहिली, त्याचे विजय मिळाल्यानंतरचे ओसंडून जाणारे हास्यही पाहिले, आणि वर्तमानपत्रांतून झळकलेल्या वार्ताही वाचल्या. एका दृष्टीने एका महत्त्वाच्या क्षणी मी अमेरिकेच्या या राजधानीत होतो.

### जॉर्ज वॉशिंग्टनचे नेतृत्व आणि लोकप्रियता

जॉर्ज वॉशिंग्टन हा अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धातील सेनापती. त्याची लोकप्रियताही सर्वात अधिक होती. वॉशिंग्टनचे स्मारक म्हणून साडेपाचशे फूट उंचीचा एक स्तंभ उभारण्यात आला आहे. पायथ्याशी त्याची एकेक बाजू जवळजवळ चाळीस फूट आहे, वरच्या बाजूस ही रुंदी दहाबारा फुटांपर्यंत कमी होत गेली आहे आतील बाजूस उद्वाहक आहे. त्यातून थेट वर गेले की, पोटोमॅक नदीच्या नागमोडी प्रवाहाच्या दोन्ही बाजूंना वसलेली ही वॉशिंग्टन नगरी डोळ्यांत भरते दूरवरचे विहंगम दृश्य दिसते. या स्तभांची जागा किंचित उंचावर घेतलेली आहे, चारी बाजूंना किंचितसा उतार, त्यानंतर सर्व बाजूंनी रस्त्यापर्यंत भरपूर मोकळी जागा आणि सर्वत्र सुंदर हिरवळ. सारे काही मोकळे आणि प्रशस्त. लंडनमध्ये थोडी दाटी वाटते, अमेरिकेत एकदम सारेच काहीसे भव्य वाटते. योजनापूर्वक उभी केलेली ही राजधानी आहे. आधुनिक नगररचनाशास्त्राचा उत्तम उपयोग करून घेतला आहे शहरातून फेरी मारणाऱ्या गाड्या पर्यटकांसाठी उपलब्ध आहेत. त्यांतून एक फेरफटका मारला.

महत्त्वाच्या विभागांच्या साऱ्या इमारती प्रचंड आहेत. वास्तुशिल्पाचे नमुनेही अनेक आहेत. एखाद्या प्रदर्शनाच्या वा पदार्थसंग्रहालयाच्या इमारतीचा दर्शनी भाग कसा उभा केला आहे हे पाहण्यातही वेगळा अनुभव असतो. काहीतरी निराळे दृष्टीसमोर येते. आपण

इष्टस्थानी आलो आहोत हे ध्यानात येताच एकदम प्रवेशद्वारातून आत शिरलो, तर काही आनंदाला आपण विनाकारण मुकतो. साऱ्या जगातील देशांच्या तुलनेने अमेरिका हे अजूनही नवे जग आहे देशाचा विस्तार प्रचड. भारताच्या अडीचपट. लोकसख्या मात्र बावीसचोवीस कोटीच्या आसपास, म्हणजे भारताच्या एकचतुर्थांश. भारताप्रमाणेच येथे निसर्गाची विविधता आहे. हिमालयाचे वैभव मात्र नाही. पण कोलोरॅडो नदीच्या प्रवाहामुळे निर्माण झालेली ग्रॅड कॅनियन ही दोन-अडीच हजार फूट खोल दरी आणि कॅनडाच्या सीमेवर असलेला सर्वात प्रचंड असा नायगारा धबधबा ही अमेरिकेची भूषणे आहेत. निसर्गाचे देणे भरपूर, भूमी सुपीक, अरण्ये घनदाट, नद्यांचे प्रवाह रुंद आणि या सर्वांना माणसाच्या कष्टाची व आधुनिक ज्ञानाच्या आधारे उभ्या राहिलेल्या तंत्रज्ञानाची जोड; यामुळे ऐश्वर्य ओसडून जात आहे

अमेरिकेत हिंडताना हा देश समृद्ध आहे हे पदोपदी आणि हरएक गोष्टीत जाणवते; आणि आपला भारत गरीब आहे हेही आठवते. आपण अद्याप नाना चुका करीत आहोत आणि प्रयत्नही पुरेसा होत नाही, पण तरीही भविष्यकालात भारतही असाच प्रगत होईल यात संशय नाही. अमेरिकेने आपल्या निसर्गसंपत्तीचा योजनापूर्वक वापर चालवला आहे, त्यामुळे तिचे वैभव डोळ्यांत भरते. असेच समृद्ध व्हावे व ती समृद्धी थेट खालच्या थरातील कामगार-शेतकऱ्यांपर्यंत पोचवावी, हे रशियन राज्यक्रांतीच्या प्रवर्तकांचे स्वप्न होते. पण माणूस भलत्या मार्गाने जातो व आपल्या हातानेच आपण बनवीत असलेली मूर्ती विद्रूप करतो. किंवा क्वचित ती त्याच्याच हातातून पडून फुटते. तेच रशियाचे झाले. गोर्बाचेव्हने उदगार काढले, "आम्ही जी क्राती करू पाहात होतो, ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी लोकमानसावर जे संस्कार करावयास हवे होते, ते केले नाहीत म्हणून आम्हाला अपयश आले." येथे सास्कृतिक विकासाचा प्रश्न येतो. ही उत्क्रांतीची प्रक्रिया असते, ती सावकाशीने घडते. ती रुजण्यासाठी प्रयत्न करावा लागतो व आवश्यक तो वेळही द्यावा लागतो. क्रांती एखाद्या उद्रेकासरशी घडून येते, पण त्या क्रातीची उद्दिष्टे साकार करण्यासाठी उत्क्रांतीची कास धरावी लागते. क्रांती सत्तेच्या आधाराने लोकांवर बाहेरून लादता येते. माणसांची मानसिकता बदलण्याची प्रक्रिया आंतरिक असते, ती बाहेरून लादता येत नाही.

हे स्तालिनला उमगले नाही आणि त्याची व्यक्तिगत महत्त्वाकांक्षाही आड आली. त्याने केलेल्या चुकांवर प्रथम प्रकटपणाने बोट ठेवणाऱ्या क्रुश्चेव्हने अमेरिकेला भेट दिली, तेव्हा हा देश पाहताना त्याने उद्गार काढले, "तुम्ही भाग्यवान आहात." भाग्य तर आहेच, पण स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर अमेरिकेला काही दूरदर्शी नेते मिळाले, आणि त्यांनी त्या स्वातत्र्याचे सोने केले. त्यांतील सर्वात महत्त्वाचा तो जॉर्ज वॉशिंग्टन. आपले ध्येय साध्य करण्यासाठी सामर्थ्य उभे करावे लागते, ते वॉशिंग्टनने व्हॅली फोर्ज येथील सहा महिन्यांच्या

वास्तव्यातील खडतर आपत्तींना तोंड देत केले. आपत्ती किती खडतर होती? केवळ अपुरे अन्नवस्त्र आणि रोगाचा प्रादुर्भाव यामुळे तेथे गोळा झालेल्या बारा हजार शिकाऊ सैनिकांपैकी जवळजवळ चार हजार मृत्युमुखी पडले, पण तरी कोणी खचले नाहीत. स्वातंत्र्याची आकांक्षा लोकांच्या मनात अशी प्रज्वलित झाली होती. ती जागती ठेवण्याचे काम वॉशिंग्टनने केले व कुशल नेतृत्वाच्या बळावर युद्धात विजयही मिळवून दिला. एखाद्या ध्येयाविषयीची नुसती आकांक्षा यशाचे शिखर गाठू शकत नाही. आवश्यक ते कर्तृत्व नेत्यांच्या ठायी नसेल, तर अनुयायांचा त्यागही विफल ठरतो. तसे वॉशिंग्टनने होऊ दिले नाही. त्याचे नाव राजधानीच्या या शहराला दिले गेले, आणि त्याचे केन्द्रस्थान म्हणावे अशा ठिकाणी आसपासच्या परिसरात कोठेही फिरत असताना डोळ्यांत भरेल असे त्याचे हे उंच स्मारक उभे केले गेले, हे स्वाभाविक आहे.

## गुलामगिरी आणि वंशसंहार

हा आसपासचा परिसर कसा आहे? स्मारकाच्या उंच स्तंभावरून खाली पाहिले तर तो सारा भाग आखीव आणि नेटका दिसतो. एका बाजूला लिंकनचे सुरेख स्मारक आहे, तर दुसऱ्या बाजूला अमेरिकेच्या संसदभवनाची कॅपिटॉल ही भव्य इमारत उभी आहे. तिसरीकडे थोड्या आतल्या बाजूला व्हाइट हाऊस हे राष्ट्राध्यक्षांचे निवासस्थान आहे, आणि त्याच बाजूला काही अंतरावर जेफरसनचे स्मारक आहे. जॉर्ज वॉशिंग्टन हा स्वातंत्र्ययुद्धातील सेनाप्रमुख, थॉमस जेफर्सन हा राज्यघटनेचा शिल्पकार, तर अब्राहम लिंकन हा गुलामगिरीचे निर्मूलन करणारा, अशा या अमेरिकेच्या राजकीय इतिहासातील तीन महत्त्वाच्या व्यक्ती आहेत. प्रत्येकाचे कार्य वेगळे, व्यक्तिमत्त्व वेगळे, पण तिघांच्याही जीवनाला उदात्ततेचा काही स्पर्श आहे.

अमेरिका स्वतंत्र होताच तिचे अध्यक्षपद वॉशिंग्टनकडे आले. युद्धातील नेतृत्व त्याने जेवढ्या समर्थपणाने केले, तेवढ्याच कुशलतेने तोवर निरनिराळी असलेली राज्ये एकत्रित आल्यावर त्याच्यामध्ये एकात्मता निर्माण करण्याचे अवघड काम त्याने पार पाडले. तो दोन वेळा अध्यक्षपदी निवडला गेला. जेफर्सनचे स्मारक ही एक भव्य गोलाकार इमारत आहे. चाळीस-पन्नास पायऱ्या चढून इमारतीत पोचावे लागते. एका भव्य दालनात मध्यभागी जेफर्सनचा वीसपंचवीस फूट उंचीचा भव्य पुतळा उभा आहे. चारी बाजूच्या उंचच उंच भिंतीवरून त्याच्या भाषणांतील आणि त्याने तयार केलेल्या राज्यघटनेतील महत्त्वाची अवतरणे भल्यामोठ्या अक्षरात कोरलेली आहेत, खाली उभे राहून ती सहज वाचता येतात. स्वातंत्र्य आणि समता यांचा पुरस्कार हा त्याच्या विचारांचा विशेष आहे, आणि दृष्टिकोण व्यापक

आहे स्मारकाची इमारत तशी अगदी साधी आहे पण समोरच्या बाजूच्या चढत गेलेल्या पायऱ्या आणि पुढच्या बाजूस तसेच छताला आधार देणारे उंच गोलाकार स्तंभ यांमुळे तिला भव्यतेचे लेणे लाभते. त्याला उठाव आणण्यास भोवतालचे प्रशस्त आवार उपकारक ठरते. स्मारकाच्या इमारतीत एक छोटेसे प्रदर्शन आणि ग्रंथविक्रीकेन्द्र आहे.

लिंकनचे स्मारकही याच प्रकारचे आहे. प्रचंड चौकोनी इमारत आणि बाहेरच्या चारी बाजूंना उंचच उंच स्तंभ. येथेही इमारतीत पोचण्यासाठी चाळीस पन्नास-पायऱ्या चढून जावे लागते. भव्य अशा दालनात मध्यभागी लिंकनचा खुर्चीवर बसलेला वीसपंचवीस फूट उंचीचा पुतळा आहे. भिंतीवर त्याच्या भाषणांतील वाक्ये आहेत. "All men are created equal." म्हणजे ''सारे मानव हे जन्मतः समान आहेत'' हे त्यांतील सर्वाधिक महत्त्वाचे सूत्र आहे. ''स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे'' या लोकमान्य टिळकांच्या वाक्याची येथे आठवण होते. त्याचबरोबर थोडा फरकही ध्यानात येतो. लिंकनची समता त्याला कृष्णवर्णियांची गुलामगिरी कायद्याने नष्ट करण्याकडे घेऊन गेली. टिळकांना आपल्या राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयाला सामाजिक समतेची जोड देता आली नाही, आणि अस्पृश्यतानिवारण त्यांनी तत्त्वतः मान्य केले असले, तरी त्यात काहीसा गुळमुळीतपणा राहिला. गांधीजींनी आपल्या चळवळीला अस्पृश्यतानिवारणाच्या कार्याची सुस्पष्ट जोड दिली, पण त्यांच्याविषयी अपार आदरभाव बाळगूनही समाजाने तो भाग आत्मसात केला नाही. धार्मिक परंपरा आड आली, आणि स्वातंत्र्य मिळाले पण अस्पृश्यतेचा शाप शिल्लक राहिला. मानवाच्या मूलभूत समतेचे मूल्य भारतामध्ये काही केल्या रुजत नाही. वरपासून खालच्या थरांपर्यंत हा अनुभव येतो. युरोपीय समाज आणि भारतीय समाज यांमध्ये हा एक मूलभूत भेद आहे.

धार्मिक स्वातंत्र्य मात्र भारतात आहे व ते नाना दैवतांच्या व उपासनांच्या रूपाने दिसते. त्याचा पुरस्कार लिंकननेही केला आहे. प्रत्येकाला आपल्या इच्छेनुसार हव्या त्या धर्माचे अनुसरण करण्याचा अधिकार आहे, असे त्याने म्हटले आहे. लिकनचे व्यक्तिमत्त्व उदात्त होते. वॉशिंग्टनने स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी आपले पूर्वज असलेल्या ब्रिटिशांशी युद्ध केले, तर लिंकनने गुलामगिरी कायद्याने नष्ट करण्यासाठी आपल्या देशबाधवांशी युद्ध केले. त्यालाही प्रारंभी पराभवाचा धक्का बसला, पण अखेर त्याने युद्ध जिंकले आणि ते समाप्त होताच ज्या दक्षिणेकडील राज्यांशी युद्ध केले त्यांना तात्काळ पुन्हा सामावून घेऊन अमेरिकेचे ऐक्य कायम राखले. पाश्चात्त्य देशातील प्रबोधनयुगाचा प्रारंभ जवळजवळ पाचशे वर्षापूर्वी झाला. तो वारसा घेऊन स्पेन, फ्रान्स, इंग्लंड, पोर्तुगाल आदी युरोपीय देशांतील लोक अमेरिकेत गेले. अटलांटिक महासागराच्या पूर्व किनाऱ्यावर हे सारे प्रारंभी उतरले तेथून पश्चिमेकडे अमेरिकेचा विशाल भूप्रदेश पसरलेला होता. दाट जंगलातील वृक्ष तोडणे,

घोड्यांवरून जाण्यापुरते रस्ते बांधणे, नद्याच्या काठावरून शेतीची लागवड करणे, अशा प्रकारे अमेरिकेच्या या विस्तीर्ण प्रदेशात हळूहळू आधुनिक पद्धतीची वस्ती होत गेली.

त्यासाठी प्रचड कष्ट करावे लागले तेथील मूळच्या रेड इंडियन लोकांशी झगडा करावा लागला, पण त्यांचा पराभव करणे अवघड नव्हते, ते सारे मागासलेले होते. पण हे सारे घडत असताना व अमेरिकेचे हे अत्याधुनिक राष्ट्र उभे राहत असताना प्रचड नरसहार झाला. मूळचे रेड इंडियन जवळजवळ नाहीसे झाले, आज त्यांची खूणसुद्धा फारशी कोठे दिसत नाही. शिवाय कष्टाची म्हणजे मजुरीची कामे करण्यासाठी आफ्रिकेतून निग्रो लोक हजारोंच्या संख्येने नौयानात जबरदस्तीने घालून जनावरे आणावीत तसे आणले गेले. समतेचा पुरस्कार करणाऱ्या गौरवर्णियांनी पहिला अन्याय आफ्रिकेतील तद्देशियांवर केला, आणि नंतर त्यांना अमेरिकेत नेल्यावर तेथील त्याच्या बांधवांनी तोच वसा उचलला. ही केवढी विसंगती आहे! उत्तर अमेरिकेपेक्षा दक्षिण अमेरिकेत ती अधिक का असावी, असा प्रश्न पडतो. गौरवर्णियांना एक, तर तशाच अपराधासाठी कृष्णवर्णियाना अधिक कडक शिक्षा असा पक्षपात आजही दिसतो, हे तेथे कोणा सिंप्सन नावाच्या कृष्णवर्णियावरील एका खटल्याचे प्रकरण वृत्तपत्रांतून गाजत होते, त्यावरून समजत होते.

या आक्षेपात तथ्य आहे हे नाकारता येत नाही. स्त्रियांवर हात टाकण्याचे किंवा त्यांच्यावर अत्याचार केले जाण्याचे प्रकार जगात सर्वत्र होत असतात. त्याला भारतासकट कोणताही देश अपवाद नाही. पण अशा प्रकारचा गुन्हा गौरवर्णीय तरुणाकडून झाला तर त्याला सक्तमजुरीची शिक्षा होते, तर कृष्णवर्णीय तरुणांकडून गौरवर्णीय स्त्रीची अशी आगळीक केली गेली, तर त्यासाठी मात्र जिवंतपणी कातडी सोलून काढण्याची अमानुष शिक्षा दक्षिणेकडील संस्थानात दिली जात असे. आजचा कायदा काय आहे ते माहीत नाही. शिक्षेचा हा प्रकारच अगावर शहारे आणणारा आहे. पण याहून भयानक गोष्ट अशी आहे की, असे खोटे आरोप करणाऱ्या गौरवर्णीय स्त्रिया अमेरिकेत आढळल्या आहेत. लीबोविश या नावाच्या एका गौरवर्णीय वकिलाला हे फार जाणवले. ज्यांच्यावर या प्रकारचा खोटा आरोप केला गेला आहे असे त्याला आढळून आले, अशा तीनचार कृष्णवर्णीय तरुणाचे वकीलपत्र त्याने घेतले. तो मोठा उदार मनाचा होता. एक पैसाही न घेता त्याने खटला न्यायालयात लढवला.

हे वकीलपत्र लीबोविशने घेऊ नये यासाठी गौरवर्णीय लोकांकडून त्याच्यावर प्रचंड दडपण आणण्यात आले. पण ते त्याने जुमानले नाही. खटला चालवण्यासाठी त्या शहरात तो गेला असता तो उतरला होता त्या विश्रामगृहासमोर गौरवर्णीय लोकांचा प्रचंड जमाव गोळा झाला लीबोविशला पोलिसांचे संरक्षण द्यावे लागले. त्या तरुणाविरुद्ध खोटा पुरावा

तयार करण्यात एका राज्याच्या प्रमुखाचा हात होता, इतके हे प्रकरण गंभीर होते. लीबोविशने हे सारे निर्भयपणे आणि मोठ्या कुशलतेने न्यायालयात पुराव्यानिशी सिद्ध केले, आणि ते निरपराध असलेले कृष्णवर्णीय तरुण निर्दोष सुटले. आपले वकिलीच्या व्यवसायातील अनुभव कथन करणाऱ्या कोर्टरूम या नावाच्या पुस्तकात ही सारी कथा लीबोविशने सविस्तर दिली आहे. ही सारी घटना केवळ पन्नास वर्षापूर्वीची आहे. लिकनची सारी पुण्याई कोठे गेली म्हणावयाची? अखेर "Some are more equal" असे शब्द लिकनच्या उद्‌गाराला कोणीकोणी जोडतात, त्यातही सत्याचा अंश आढळतो.

आफ्रिकेतून धरून आणलेल्या निग्रोकडून काम करून घेताना त्यांच्याबद्दल कोणतीही दयेची भावना ठेवली गेली नाही. गुलाम म्हणूनच त्यांना वागवले गेले त्याना कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. जनावरांची विक्री व्हावी तसा गुलामाचा बाजार चालत असे. माणसाने माणसांवर केलेला हा घोर अन्याय एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत लिंकनने त्याविरुद्ध हत्यार उचलेतो चालू होता. ही गुलामगिरी नष्ट झाली त्याला केवळ दीडशे वर्षे होत आहेत. समतेचे तत्त्व अमेरिकेतही किती अलीकडे प्रस्थापित झाले आहे, हे ध्यानात घेण्यासारखे आहे. हे कृष्णवर्णियांच्या संदर्भात झाले. लोकशाहीसाठी एवढा प्रदीर्घ लढा इंग्लंडमध्ये झाला, पण त्याच इंग्लंडने अमेरिकेत गेलेल्या आपल्याच देशातील बाधवांना निवडणुकीत मत देण्याचा किंवा पार्लमेंटमध्ये आपले प्रतिनिधी पाठवण्याचा अधिकार नाकारला. येथे समतेच्या तत्त्वाचे काय झाले? आणि इंग्लंडमधील स्त्रियांचे काय? तो तर समाजातील अर्धा भाग आहे. त्यांना शिक्षण मिळण्यासाठी व आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी झगडा करावा लागला. ज्या अमेरिकन लोकांनी आपल्याला मताधिकार मिळावा म्हणून रणांगणावर रक्त सांडले, त्यांनी स्त्रियांना मताचा अधिकार देण्यासाठी आपल्या राज्यघटनेत दुरुस्ती केली, ही गोष्ट १९२०-मधील म्हणजे या शतकाच्या प्रारंभीची आहे.

ती सुधारणा होऊन फक्त पंचाहत्तर वर्षे झाली. त्याच्याही आधी आपल्याला महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळावा, याकरिता अमेरिकेतील स्त्रिया झगडत होत्या, त्याला शंभर वर्षे झाली. त्यातही विनोदी वाटावी अशी गोष्ट अशी आहे की, काही वर्षे अशी गेली की महाविद्यालयात स्त्रियांना प्रवेश मिळे, परीक्षेला बसता येत असे, पण ती उत्तीर्ण झाली तरी आपल्या नावापुढे पदवी लावण्याची परवानगी त्यांना नव्हती. " All men are created equal" असे लिंकन म्हणून गेला त्याला तोवर चाळीस वर्षे होत आली होती, आणि घटनेमध्ये समतेचा अतर्भाव जेफर्सनने केला, त्याला शंभर वर्षे झाली होती. लिंकनच्या उद्‌गारात "All men" असे शब्द आहेत. हा तर पुरुषवाचक उल्लेख झाला. त्याच्या दृष्टीसमोर गुलाम असलेले निग्रो होते, त्यामुळे तो अनवधानाने झाला असावा. अधिक

बरोबर बोलावयाचे असेल, तर "All human beings are ereated equal" असे नंतर लिकननेही म्हटले असते. अखेर इतिहासात हाती लागणारे सत्य काय? कोणीही आपली सत्ता वा अधिकार सोडण्यास सहजासहजी तयार होत नाही, आणि कोणतीही सामाजिक सुधारणा लोकांच्या पचनी पडण्यास बराच काळ जावा लागतो.

## भारतातील सहिष्णुता आणि समावेशकता

भारतातही अशीच राजकीय-सामाजिक प्रक्रिया फार प्राचीन काळापासून घडत आली आहे. अमेरिकेत युरोपीय देशांतील लोक उतरले आणि त्यांची वसाहत वाढत जाण्याचा प्रारंभ झाला, तो कोलबस तेथे १४९२-मध्ये उतरला तेव्हापासून. या घटनेस केवळ पाचशे वर्षे झाली आहेत. अटलांटिक महासागर पार करून पूर्व किनाऱ्यावर जे लोक उतरले, ते पश्चिमेकडे सरकत थेट पॅसिफिक महासागराच्या तीरापर्यंत जाऊन थडकले. ''चला पश्चिमेकडे'' ही एक घोषणाच होती, आणि यातील रोमांचकारक घटनांवर उत्कृष्ट चित्रपट निर्माण झाले. पण युरोपीय लोक पश्चिमेपर्यंत पोचल्यावर अमेरिकेतील आधीच्या रहिवाशांचे नाव सांगणारा कोणताही गट शिल्लक उरला नाही. आज त्यांची नावनिशाणीही नाही. भारतात पंजाब-काश्मीरपासून गंगायमुनांच्या प्रदेशात बंगालआसामपर्यंत आणि विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेकडे रामेश्वर-कन्याकुमारीपर्यंत वसाहत होत गेली. ही सारी प्रक्रिया पाचसातशे वर्षे तरी चालू असावी. प्रथम प्रगत सिधुसंस्कृती होती, द्रविड संस्कृती तर विकसित अवस्थेत होतीच, नागसंस्कृतीही वेगळी होती, आणि भारताच्या प्रत्येक भागात पर्वतांतून आणि अरण्यांतून अनेकानेक जातीजमातीचे विविध गट होते. त्याचा परस्पराशी कोणताही संबंध नव्हता.

वैदिक आर्यानी या सर्व लोकांशी लढाया केल्या असणार हे उघड आहे पण त्यानंतर लगोलग सांस्कृतिक देवाणघेवाणीची प्रक्रिया सुरू झाली, हे जिला आज हिंदू संस्कृती म्हणतात व जिचा धागा तीन-साडेतीन हजार वर्षापूर्वीच्या वेद आणि उपनिषदे येथवर पोचतो, तिचा प्रसार भारताच्या सर्व भागात झाला यावरून दिसते. वैदिक तत्त्वज्ञानात सिंधु संस्कृतीतून काही महत्त्वाच्या सकल्पना आल्या आहेत, आणि इतर अनेक जातीजमातीच्या विविध प्रकारच्या देवदेवताचे नाते आधीच्या देवदेवतांशी जोडून घेतले गेले आहे. शत्रूचा युद्धात पराभव करावा हे उद्दिष्ट स्वाभाविकपणे होते; पण नतर त्याला साफ नष्ट करावा, असे धोरण जेत्या असलेल्या वैदिक आर्यानी स्वीकारले नाही. त्यामुळे नाग आणि द्रविड हे शिल्लक राहिले एवढेच नव्हे, तर उत्तरकालात वैदिक तत्त्वज्ञानावर उत्कृष्ट भाष्यग्रंथ लिहिणारे तत्त्ववेत्ते, आणि भक्तिमार्गाला विशेष प्राधान्य देणारे सत दक्षिणेतील केरळ, मलबार, तामिळनाडू या भागांत उदयास आले, आणि त्याचा प्रभाव उत्तरेवर पडला; असे अनेक शतकांच्या सांस्कृतिक

वाटचालीचे दृश्य उत्तर व दक्षिण याच्या देवाणघेवाणीतही दिसते. शकराचार्य केरळमधून काश्मीरपर्यंत गेले, आणि त्यानी पचायतनपूजा रूढ केली. अद्वैतवादी असून भक्तिपर स्तोत्रे रचली ही प्रक्रिया सामावून घेण्याची, दुसऱ्याच्या मताचा आदर करण्याची आणि देवाणघेवाण करण्याची होती.

तत्त्वज्ञानपर ग्रंथांपेक्षाही रामायण आणि महाभारत या महाकाव्यानी समग्र भारताच्या सास्कृतिक जीवनावर परिणाम केला आहे, हे ध्यानात घेण्यासारखे आहे. वनवासी जमातीत श्रीराम या देवतेला फार महत्त्व आहे. कथाच्या आणि प्रत्यक्षातील आदर्शाच्या द्वारा तत्त्वविचार सामान्य माणसांपर्यंतच नव्हे, तर रानटी जमातीपर्यंतही सुलभतेने पोचवला जातो. यामध्ये सारेच चांगले घडले असा समज करून घेऊ नये, बरेच वाईटही घडले. सारेच चांगले आजवरच्या इतिहासात जगात कोठेही घडलेले नाही, आणि मानवी स्वभाव लक्षात घेता कितीही सुधारणा झाली तरी पुढे कधी घडेल, असे ठामपणाने म्हणवत नाही. खरेखरे सत्ययुग पूर्वी कधी नव्हते, पुढेही कधी येणार नाही. पण हरएक समूहाची अस्मिता अशी स्वतंत्रपणे जपली गेल्यामुळे भारतात खरेखुरे ऐक्य कधी घडून आले नाही. एक साधताना दुसरे काहीतरी गमावते, तसे हे आहे. जेते आणि जित हा फरक तर राहिलाच. धार्मिक, राजकीय, आणि आर्थिक व्यवहाराची सूत्रे ज्यांच्या हातात होती ते त्रैवर्णिक उच्चवर्णीय ठरले, इतर कोणी दास, कोणी शूद्र, तर कोणी त्याहूनही खालचे अस्पृश्य ठरले. ही या प्रक्रियेतील काळी बाजू आहे व तिची फळे आपण भोगत आलो आहोत. त्यामध्ये सर्वात मोठ्या प्रमाणात बळी पडला तो सामाजिक न्यायाचा.

अद्वैतवेदान्ताच्या विचारात किंवा भक्तीच्या मार्गात तात्त्विक दृष्टीने समता मानली गेली, पण सामाजिक व्यवहारात तिचे प्रतिबिंब कधी पडले नाही आणि अजूनही पडत नाही हा अनुभव आहे पण त्याचबरोबर हे खरे की, भारतात शतकानुशतके सामाजिक विषमता होती, युद्धात संहारही झाला, पण वंशसंहार कधी झाला नाही. थेट खालच्या जातीपर्यंत प्रत्येक गटाला गावगाड्यात काही ना काही स्थान दिले गेले, आणि त्यांची स्वतंत्र अस्मिता थेट आजपर्यंत टिकून राहिली आहे. तीन हजार वर्षापूर्वीचे वेद आज जसेच्या तसे उपलब्ध आहेत, त्याचबरोबर भारतात संस्कृतीचा प्रसार होत असताना लढाया झाल्या असल्या तरी पर्वतांच्या दऱ्यांमधून आणि घनदाट जंगलांतून वेदकालापासून राहणाऱ्या असंख्य वनवासी जमाती आजही टिकून आहेत. सुधारलेल्या उच्चवर्णियाविरुद्ध समतेचा आपला अधिकार प्रस्थापित करण्यासाठी झगडा करण्याकरिता त्या अस्तित्वात आहेत. त्यांचा सरसकट संहार होऊन त्या नष्ट झाल्या नाहीत, हेही एक ऐतिहासिक सत्य आहे.

हिमालयाच्या कुशीतील मनाली हे अतिशय रमणीय गाव. जवाहरलाल तेथे विश्रातीसाठी

व निसर्गसौदर्याच्या आकर्षणापोटी कधी कधी जात असत. त्यामुळे सर्वांना परिचित होऊन गेले पर्यटनाचे ते एक महत्त्वाचे स्थान आहे भारतीय युद्ध कमीत कमी तीन हजार वर्षापूर्वी झाले. त्यातील भीमाची पत्नी हिडिबा ही त्या भागातील होती. तिचे मदिर आजही मनालीला उभे आहे, कुलू येथे मोठी जत्रा भरते, आणि हिडिंबा ही मनालीची ग्रामदेवता आहे. उंच डोंगराच्या उतारावर दीडशे फुटापर्यंत उची असलेल्या वृक्षांच्या गर्द छायेतील त्या मंदिराच्या वास्तुशिल्पावर बौद्ध संस्कृतीची काही छाप जाणवते. हरएकाला सामावून घेण्याची ही परंपरा तीन हजार वर्षांची असावी, ही केवढी गौरवास्पद बाजू आहे. आजही ती जपण्याची राष्ट्रीय एकात्मतेसाठी गरज आहे भारताची संस्कृती समावेशक आहे, असे सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ व ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनी म्हटले आहे. तो तिचा एक विशेष आहे. परधर्माविषयीची सहिष्णुता हे तिचेच विकसित रूप आहे. हिंदू धर्माचा हा विशेष विवेकानन्दानी प्रथम अमेरिकेतच १८९३ साली भरलेल्या शिकागो येथील जागतिक सर्वधर्मपरिषदेत सांगितला. धार्मिक स्वातंत्र्य हा भारतीय सस्कृतीचा महान विशेष आहे, असे सुप्रसिद्ध फ्रेंच विचारवंत रोमां रोलां यांचे उद्‌गार आहेत.

या सहिष्णुतेमुळेच भारतात आजही मारामाऱ्या होतात, पण सरसकट कत्तली होत नाहीत. पन्नास वर्षापूर्वी महात्मा गांधीजीची दुर्दैवी हत्या झाली. त्या निमित्ताने महाराष्ट्रात ब्राह्मणब्राह्मणेतर वाद उफाळून उठला. दुकाने आणि घरेदारे जाळली गेली, पण फ्रेंच राज्यक्रांतीत उमराववर्गाची झाली तशी ब्राह्मणांची सरसकट कत्तल झाली असे घडले नाही. आजही सवर्ण आणि दलित यांच्यातील संघर्ष तीव्र रूप धारण करीत आहे. कायद्याने अस्पृश्यता नष्ट केली गेली व राखीव जागा ठेवल्या गेल्या, तरीही विद्रोह आणि विद्वेष यांचे अंगार फुलवले जात असतात, याच्या बुडाशी राजकीय स्वार्थ आहे. उखाळ्यापाखाळ्या काढल्या जातात, जहरी भाषा वापरली जाते, आणि अशिक्षित आणि रुढिग्रस्त समाज बहुसंख्येने असलेल्या खेडेगावांत कोठेकोठे निर्घृण अत्याचार होतात आणि दलितांच्या झोपड्या जळतात. हे अतिशय निंद्य आणि क्लेशकारक आहे पण तरीही सार्वजनिक हत्याकांड पेटत नाही, हा सूक्ष्मपणाने जागा असलेला या देशाचा सास्कृतिक वारसा आहे. फ्रेंच राज्यक्रांतीतील सहार, जर्मनीरशियांतील ज्यूंचे शिरकाण, राजकीय विरोधकांचा सपूर्ण नायनाट, निग्रोवर लादलेली गुलामगिरी किंवा मध्यपूर्वेत दिसणारे निर्वासिताचे लोंढे, आणि त्याची केली जाणारी ससेहोलपट, या साऱ्या गोष्टीशी तुलना करता भारतातील सघर्षाचे रूप कितीतरी सौम्य आहे इंदिराजीनी लादलेली आणीबाणी हा एक अपवाद, तसाच त्यांच्या खुनानंतर राजधानी दिल्लीत झालेले तीन हजार शिखांचे भीषण हत्याकांड हा तसाच दुसरा लाजिरवाणा अपवाद. असे प्रकार आपण होऊ देता कामा नयेत. अपवाद वगळता, आधुनिक अर्थाने समता प्रस्थाप्रित करण्याची प्रक्रिया

कालाच्या गतीनुसार चालू असताना तीमध्ये सरसकट सहाराला आपल्या देशात स्थान मिळालेले नाही.

जगातील इतर देश आणि भारत यामध्ये हा महत्त्वाचा फरक आहे. अव्यवहार्य कोटीपर्यंत अहिंसेचे तत्त्व आचरणात आणणारे महात्मा गांधी हिंदू धर्मातच जन्माला येऊ शकतात. भारतात आज एक सामाजिक क्रातीचे पर्व चालू आहे. ते लोण थेट तळापर्यंत पोचले आहे, ही उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने स्वागतार्ह गोष्ट आहे. हे परिवर्तन शांतपणाने आणि समंजसपणाने कसे होईल, आणि त्यात द्वेषाचा अंश न शिरता परस्परांना समजून घेण्याची दिशा कशी मिळेल, हे विचारवतांनी व त्याहूनही राजकीय नेत्यांनी फार सावधपणे पाहावयास हवे. तात्कालिक राजकीय स्वार्थाचा मोह बाजूला सारता आला, आणि शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाला, तर हे लवकर साध्य होईल. त्यात सर्वांचेच कल्याण आहे अमेरिकेतील अब्राहम लिंकनपासूनही काही शिकता येईल. त्याने एकदा असे म्हटले, " I shall not be anybody's slave," म्हणजे ''मी कोणाचा गुलाम होणार नाही.'' हे तर कोणीही म्हणेल पण त्याने लगेच पुढे जे म्हटले आहे ते अधिक महत्त्वाचे आहे. ते उद्‌गार आहेत, "and hence I will not be anybody's master" म्हणजे ''त्याच कारणासाठी मी कोणावर स्वामित्व गाजवणार नाही.'' कोणीच कोणाला इतरांहून श्रेष्ठ मानले नाही, तर समता प्रत्यक्ष व्यवहारात उतरणे फार सोपे जाईल. लिंकनच्या त्या भव्य स्मारकातील भिंतीवर कोरलेली समतेचा उद्‌घोष करणारी त्याची वाक्ये वाचत असताना आताच्या भारताच्या संदर्भात असे काहीकाही मनात येत राहिले.

### दोन विस्तीर्ण परिसर-

लिंकनच्या स्मारकापासून जवळच व्हिएतनामच्या युद्धात मारल्या गेलेल्या अमेरिकन सैनिकांचे स्मारक आहे. रणांगणावर हातातील बंदूक सरसावून शत्रूवर हल्ला करण्यासाठी चाल करीत निघालेल्या हिरवटपिवळसर गणवेषांतील बारापंधरा सैनिकांचे पुतळे तेथे उभे केले आहेत. दोनतीन पुढच्या बाजूस, काही त्यांच्या मागे, आणि आणखी काही त्यांच्याही मागे, अशी त्या सैनिकांची रचना आहे. पुढील बाजूस जमिनीवरील फरशीत खोदलेला मजकूर आहे. ''ज्याच्याशी तसा कोणताही संबध नव्हता, किंबहुना ज्यांना कधी नुसते पाहिलेलेही नव्हते, अशा लोकांचे स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्यांना अभिवादन असो.'' यातील भाव अतिशय उदात्त पातळीवर पोचणारा आहे. पण वस्तुस्थिती अशी होती काय?

व्हिएतनामच्या या युद्धात अखेर हो चि मिन्हपुढे हार पत्करावी लागली. युद्धाचा

प्रदेश फार दूर होता, हे त्याचे महत्त्वाचे कारण होते हो चि मिन्ह हा आपली साम्यवादी हुकूमशाही दडुकेशाहीच्या बळावर व्हिएतनामच्या जनतेवर लादत आहे, आणि हा व्हिएतनामच्या जनतेच्या स्वातंत्र्यावर आघात आहे, असा अमेरिकेचा पवित्रा होता. पण हा काही लोकशाहीच्या सरक्षणाचा भाग नव्हता, तर तो चीनच्या विस्तारवादाविरुद्ध केलेल्या लष्करी डावपेचाचा होता. ही लढाई दीर्घकाळ चालली. आपले सैनिक यात विनाकारण बळी पडत आहेत, अशी तक्रार अमेरिकेतील लोकांकडून होऊ लागली, आणि अखेर अकराबारा वर्षांनी अमेरिकेला व्हिएतनाम युद्धातून बाहेर पडावे लागले. आता हो चि मिन्ह नाही, आणि चीनने आपला साम्यवादही परकी भांडवलाचे स्वागत करण्याइतका शिथिल केला आहे. पण राजकारणाच्या या धकाधकीत काही अमेरिकन सैनिकांची विनाकारण आहुती पडली हे मात्र खरे

कॅपिटॉलची प्रशस्त इमारत लिंकनच्या स्मारकाच्या थेट समोर आहे. त्या इमारतीवरील भव्य घुमट आपले लक्ष वेधून घेतो. हे अमेरिकन कॉंग्रेसचे प्रतिनिधीसभागृह आहे. भारतातील संसदभवन आहे तसे. साठसत्तर पायऱ्या चढून गेल्यावर आपण त्या इमारतीशी पोचतो. सभोवती प्रचंड आवार आहे. मुख्य इमारतीचे प्रवेशद्वार बंद होते. पण भोवतालच्या प्रशस्त आवारात फिरता आले. येथील जाणाऱ्यायेणाऱ्यावर लक्ष ठेवणारा पहारेकरी कृष्णवर्णीय होता हे पाहून बरे वाटले. त्याच्याशी उगाचच दोन शब्द बोललो. त्यानेही रुबाबात उत्तरे दिली. असे कृष्णवर्णीय सेवक संग्रहालयापासून विमानतळापर्यंत अमेरिकेत कोठेकोठे दिसत होते. गौरवर्णीय आणि कृष्णवर्णीय यांच्यांतील वैर अद्याप पुरते शमलेले नाही. अजून काही काळ जावा लागणार आहे वंशश्रेष्ठत्वाची भावना एकदम नाहीशी होत नाही. शिवाय शिक्षण आणि कर्तृत्व या दृष्टींनी एक क्रीडेचे क्षेत्र वगळता कृष्णवर्णीय फार मागे आहेत. स्पर्धेमध्ये ते टिकू शकत नाहीत. पण हा भाग परिस्थितिजन्य म्हणून बाजूला ठेवला, तरी दोन समूहांतील दूरता अद्याप संपलेली नाही. गुलामगिरी कायद्याने नष्ट झाली त्याला सव्वाशे वर्षे होऊन गेली, तरी ही स्थिती आहे दोन वर्षांपूर्वीच लॉस अँजेलिस येथे कृष्णवर्णियांनी मोठी दंगल केली. लष्कराचे साहाय्य घ्यावे लागले. आपल्याविरुद्ध जाणूनबुजून पक्षपात होतो, आणि न्यायालयातही कृष्णवर्णीय आरोपीवर आकस असलेला दिसतो, अशी तक्रार आहे.

आतापर्यंतच्या साऱ्या इमारती भव्य होत्या, पण तशा साध्या होत्या. ही भव्यता तर कॅपिटॉलच्या इमारतीला आहेच, पण घुमटामुळे तिला एक वेगळी शोभा आहे. उंच घुमटावर एक पुतळा आहे. बहुधा स्वातंत्र्यदेवीचा असावा किंवा कोलंबियाचा. कॅपिटॉलच्या इमारतीच्या समोरच्या बागेत उभे राहून थेट समोर पाहिले की, वॉशिंग्टनचे स्मारक असलेला स्तंभ आणि त्याच रेषेत पलीकडे लिंकनचे स्मारक दिसते. हे अंतर सुमारे दोन किलोमीटर आहे. तेथवरचा

आडवा सुमारे दोन फर्लांगाचा परिसर पूर्ण मोकळा आहे. त्या विस्तीर्ण परिसरात एकही इमारत नाही. अधूनमधून काही वृक्ष, बाकी सर्व भागात हिरवळ, आणि चारी बाजूंना असलेले रुंद रस्ते, असे हे विशाल दृश्य आपली दृष्टी खिळवून ठेवते. राजधानी वॉशिंग्टनच्या केन्द्रस्थानी असलेला हा परिसर जितका रेखीव तितकाच आकर्षक आहे.

पण अशीच शोभा भारताच्या राजधानीलाही लाभलेली आहे सुंदर घुमट असलेले राष्ट्रपतिभवन, त्यापुढे असलेला विजय चौक, त्यानतर उत्तर-दक्षिण अशी दोन बाजूंना असलेली केन्द्रीय सचिवालये, त्यांच्या रेखीव शोभिवत इमारती, त्या सर्वांची सीमा दाखवणारा पुढच्या बाजूचा आडवा रस्ता, तेथपासून थेट समोर जाणारा भला रुंद राजपथ, त्याच्या दोन्ही बाजूंना तसेच रुंद पादचारी मार्ग, राजपथाच्या अखेरीस दूरवर भव्य असे भारतद्वार किंवा इडिया गेट, त्याच्या उंचच उंच तीन कमानी, त्यापलीकडचे प्रशस्त गोलाकार उद्यान, आणि त्याच्या मध्यभागी नाजूक अशा मंडपीतील गांधीजीचा पुतळा. सचिवालयांच्या दोन इमारती मागच्या मध्यावर चबुतऱ्यावरील गांधीजी दिसतात, आणि तेथे आपली दृष्टी स्थिरावते. या मांडणीला अशीच एक आडवी बाजू आहे. राजपथाच्या दोन्ही बाजूना जवळजवळ एक फर्लांग जागा मोकळी राखलेली आहे. हिरवळीचा रुंद पट्टा, त्यानंतर थेटपर्यंत पाणी खेळवलेला बांधीव पाट, पुन्हा एक हिरवागार पट्टा, आणि त्यानंतर दोन्ही बाजूना डेरेदार वृक्ष असलेले सरळ जाणारे रस्ते, अशी रचना राजपथाच्या दोन्ही बाजूंना आहे

एकदीड मैल विस्तीर्ण परिसराची ही सुंदर रचना नव्या दिल्लीचे भूषण आहे. केवढे विशाल आणि सुंदर असे हे दृश्य आहे! नगररचनेचा एक आदर्श वस्तुपाठच. साम्राज्याचे वैभव दाखवण्यासाठी इंग्रजानी हे सारे कष्ट घेतले आहेत. साम्राज्याचा स्वामी जेथे वास्तव्य करतो, त्या लडनमधील बकिंगहॅम पॅलेसपेक्षा त्याचा एक सुभेदार म्हणजे भारताचा व्हाइसरॉय जेथे राहात होता, त्या परिसराचा दिमाख अधिक ऐटबाज होऊन गेला. जुन्या दिल्लीतील मध्ययुगीन लाल किल्ला आणि त्याच्या समोरचा चादणी चौक यांना आधुनिक नगररचनेने दिलेली ही सलामी आहे मनात येऊन जाते, भारताच्या या राजधानीत आल्यावर एका भागात एका आक्रमकाचे संगमरवरी वैभव आहे, तर दुसऱ्या भागात दुसऱ्या आक्रमकाचे आधुनिक नगररचनेचे ऐश्वर्य आहे. ख्रिस्ताच्याही पूर्वी, एवढेच नव्हे, तर युरोपातील ग्रीसच्याही पूर्वी ज्या या आपल्या देशाचा प्राचीन इतिहास एक हजार वर्षापर्यंत पोचतो, तो आपला प्राचीन भारतवर्ष या दिल्लीत कोठे आहे?

त्याची एक खूण या साऱ्यांपासून बारापंधरा किलोमीटर दूर अशोकाने उभ्या केलेल्या उंच लोखंडी स्तंभाच्या रूपाने शिल्लक आहे. दुःख मानण्याचे काही कारण नाही. एवढ्या प्राचीन काळातील काही इमारतीच्या रूपाने शिल्लक असावे, अशी अपेक्षा करता येत नाही.

पण तो एवढा जडच्या जड स्तंभ उभा कसा केला गेला, आणि तो इतकी वर्षे उन्हापावसात असून त्यावर गज कसा चढला नाही, याचे आश्चर्य आताच्या वैज्ञानिकांनाही वाटते. तशीच ही आमची प्राचीन भारतीय संस्कृती तीमध्ये अनेक उणिवा असूनही आणि अनेक आक्रमणांतील पराभव पचवूनही अद्याप टिकून कशी आहे, याचेही पाश्चात्त्य विद्वानांना व इतिहासकाराना एक कोडे आहे. आपणही मनाशी आपला अभिमान जपावा की, इमारती शेकडो वर्षांनी का होईना पण जीर्ण होतात पण काही सनातन मूल्ये जपणारे सांस्कृतिक संचित तीनतीन हजार वर्षे उलटली, तरी जसेच्या तसे ताजे राहते मग एखादा विवेकानन्द त्यातील उदात्त तत्त्वे आणि चिरंतन मूल्ये अमेरिकेतील जागतिक सर्वधर्मपरिषदेत गंभीर स्वरात प्रकट करतो, आणि सारे नव जग विस्मित होऊन जाते.

अमेरिकेतील आजच्या राज्यकर्त्यांना मनातून धास्ती वाटते की, एवढी दुहीची बीजे आपल्या भाईबंदांनी पेरून ठेवली आणि आपण त्यांना आजही सारखे खतपाणी घालीत आहोत, तरी अजून हा भारत आपलीच वैज्ञानिक विद्या आणि आधुनिक मूल्ये आत्मसात करून एकविसाव्या शतकात नव्या तेजाने उभा राहण्याचे भय आहे पण तसे भय त्यांनी बाळगण्याचे कारण नाही. नवीन सामर्थ्य प्राप्त करून घेतले, तरी कोणाला हतप्रभ करावे किंवा कोणाचा संपूर्ण नायनाट करावा, ही भारताची संस्कृती नाही. कॅपिटॉलच्या समोर उभे राहून वॉशिंग्टनचे स्मारक असलेला उंच स्तंभ, त्यापलीकडचे लिंकनचे स्मारक, आणि भोवतालचा सारा भाग पाहताना नव्या दिल्लीतील परिसर दृष्टीसमोर आला, आणि मनात आले की, नवी दिल्ली अधिक सुंदर आहे. इंग्रज आपला निरोप घेऊन गेले, आपला देश स्वतंत्र झाला, आणि भारताच्या राजधानीत केन्द्रस्थानी असलेले हे वैभव आपल्या पदरी आयते पडले. गांधीजींचे स्मारक असलेला राजघाट आणि जवाहरलालांचे स्मारक असलेले शांतिबन ही स्वतंत्र भारताने घातलेली भर आहे. आपण सौंदर्यदृष्टीत कमी आहोत, असे मानण्याचे कारण नाही.

## दफनभूमी आणि सजीव सृष्टी

राजघाटावरून आठवण झाली. वॉशिंग्टनमध्ये अर्लिंग्टन सीमेटरी ही एक अतिशय विस्तृत अशी दफनभूमी आहे. राष्ट्राध्यक्ष केनेडीचे दफन येथे झाले हे माहीत होते, त्यामुळे ती जागा पाहण्याची जिज्ञासा होती. दफनभूमीचा विस्तार कल्पनेबाहेर मोठा आहे. परिवहन गाडीतून फेरफटका मारला, कोठेही उतरलो नाही, तरी अर्ध्या तासाचा फेरफटका झाला. पण पाहणार काय? असंख्य थडग्यांवर पांढऱ्या फरशा उभारलेल्या. क्वचित एखादा संगमरवरी दगड, आणखी कोठे एखादी फरशी थोडी मोठी. काही फरशांवर त्या त्या व्यक्तीची नावे, तर

काही ठिकाणी नीटनेटके चौथरे युद्धांत मारले गेलेले हजारो अनामिक सैनिक येथे चिरनिद्रा घेत आहेत, असा काही भागांकडे अंगुलिनिर्देश करून मार्गदर्शकाने उल्लेख केला. एका शरीराला साडेसहा-सात गुणिले अडीच-तीन फूट जागा दिलेली आहे. दोन थडग्यांमध्ये दीड-दोन फुटांचे अंतर ठेवले आहे. सारे काही अतिशय रेखीव. त्यामुळे फरशांच्या आडव्याउभ्या रांगाच रांगा दोन्ही बाजूंना दिसत होत्या. आपल्याकडील तंबाखूच्या शेतामध्ये हारीने सरळ रेषेत लावलेली भल्यामोठ्या हिरव्या वा पिवळ्या पानांची रोपे काळ्या जमिनीत उठून दिसतात, त्याची आठवण झाली. पण त्याच वेळी मनात आले, एका काळी जिवंत असलेल्या माणसांची कलेवरे येथे गाडलेली आहेत.

वॉशिंग्टन शहरात मोठ्या उमेदीने आपले व्यवहार करणाऱ्या आणि मौजमजा करून जीवनातील आनंद घेणाऱ्या हरएक व्यक्तीचा शेवटचा मुक्काम या परिसरात व्हावयाचा आहे "जातस्य हि ध्रुवो मृत्युः" म्हणजे जो जन्माला आला तो अखेर मृत्यूच्या रस्त्याने जाणार आहे, या गीतेतील वचनाची आठवण झाली, आणि त्यामुळे मन काही वेगळ्या विचारांच्या प्रदेशात गेले. पण अशा या आवारात वावरत असूनही मनावर कोणतेही मळभ आले नाही. कारण दफनभूमी असली, तरी सर्वत्र सुरेख हिरवळ, फुलझाडे व मोठमोठे वृक्ष असल्यामुळे नव्याने फुलणाऱ्या जीवनाची चाहूल क्षणाक्षणाला लागत होती. किंबहुना ही दफनभूमी आहे या जाणिवेमुळे येणाऱ्या भयावहतेचा विसर पडावा, इतका तो सारा परिसर, एखाद्या रमणीय उद्यानाचे रूप घेऊन उभा होता. एकूण थडगी किती असावीत, याचा तर्क करणे कठीण असले, तरी ती संख्या लाखांच्या घरात जाणे अशक्य नाही. मनात आले, पिढ्यांमागून पिढ्या काळाच्या उदरात गडप होत जाणार, या साऱ्यांना आपल्या उदरात सामावून घेण्याइतकी जमीन कशी उपलब्ध होणार? केव्हातरी साऱ्या मानवाच्या बऱ्यावाइटाचा निर्णय होण्याचा क्षण येणार आहे. आणि त्या वेळी हे सारे जीव आपापल्या जागी उभे राहणार आहेत, ही ख्रिस्तधर्मातील कल्पना दफन या अंत्यसंस्काराच्या मागे आहे. असे वाटते की, वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या बळावर ती कधीतरी मागे पडेल, आणि अंत्यसंस्कार म्हणजे दहन या कल्पनेचा स्वीकार करून या पाश्चात्त्य देशांत विद्युद्दाहिन्या उभ्या राहतील.

फिलाडेल्फिया आणि वॉशिंग्टन या दोन शहरांतील फेरफटका हा आधीची व नंतरची अशा अमेरिकेच्या दोन राजधान्यांतील होता. फिलाडेल्फियात जुन्या इतिहासाची साक्ष अधिक पटते, वॉशिंग्टनमध्ये वर्तमानकाळापर्यंत तो इतिहास येऊन पोचतो, आणि ज्ञानाची कोणती नवी दालने अमेरिका धुंडाळत आहे त्याचे दर्शन घडते. निरनिराळ्या प्रकारची संग्रहालये ही त्याची साक्ष पटवतात. नॅचरल हिस्टॉरिकल म्युझियम चार तास पाहिले. डायनॉसोरचे स्वतंत्र दालन आहे. पक्षी, मासे, निरनिराळे प्राणी, समुद्राचा तळ, असे स्वतंत्र विभाग आहेत. या

पृथ्वीच्या पाठीवर किती प्रकारचे जीव आणि वनस्पती नांदत आहेत, आणि सजीवांच्या प्रारंभिक आविष्कारापासून तो आजपर्यंत इतिहासाच्या प्रचंड प्रवाहात निरनिराळ्या प्रकारच्या प्राण्यांचे हजारो वा लाखो वर्षांचे कालखंड कसे येऊन गेले आहेत, त्याचे चित्र आपल्यासमोर या प्रदर्शनात साकार होते.

पक्षी, पशू आणि मासे यांच्या किती तऱ्हा असाव्यात? प्राचीन काळात केव्हातरी वावरत असलेला डायनॉसोर. मांस आणि चरबी यांनी बनवलेल्या त्यांच्या महाप्रचंड शरिरांचे अवाढव्य आकार दिसतात. त्या मानाने हत्तीच्या सोंडेसारखे असणारे त्यांचे लांबट तोंड, निमुळती मान, आणि त्यावरील शरीराच्या आकाराच्या मानाने फारच छोटा असलेला मेंदूचा भाग, हे पाहताना या प्राण्याची संवेदनशक्ती फार बेताची असावी आणि तो सर्वत्र चाचपडत फिरत असावा असे वाटते. पाण्यात वावरणाऱ्या आणि काठावर सुस्तपणे पडणाऱ्या सुसरी आणि मगरी यांचे शरीर बेढब आणि दर्शन भीषण आहे. त्यांनी आपला प्रचंड जबडा पसरताच समोरचे प्रचंड सुळे व त्यांची साथ करणारे तेवढेच बळकट दात दिसतात. लालभडक भलीमोठी जीभ वखवखलेली आहे असे वाटते. संपूर्ण मानवी शरीर त्या जबड्यात केवळ एक घास होऊन जाईल.

पक्ष्यांच्या विभागाकडे वळले की रंगीबेरंगी सौंदर्याचे विश्व खुले होते. पाण्यात वावरणाऱ्या नाना प्रकारच्या माशांच्या शरिरावरचे नयनमनोहर रंग आणि इकडून तिकडे सुळकन जात असतानाची सफाईदार हालचाल दृष्टी खिळवून ठेवते. त्यांच्या इवल्याशा देहावरील त्वचेची कांती, तेजस्वी रंग, आणि शेपटीच्या पृष्ठभागावरील नाजूक नक्षी, हे सारे पाण्यातील विश्व बघताना आपण बागेत फुलाफुलांवरून फिरत असलेली सुंदर पंखांची व आकर्षक रेखाकृतींनी नटलेली निळीजांभळी फुलपाखरे पाहतो त्याची आठवण होते. निसर्गातील स्वाभाविक सौन्दर्याचे हे सहज दर्शन होते. समुद्रातील जीव आणि वनस्पती यांच्या विभागात छताला टांगलेला एक आडवाच्या आडवा प्रचंड व्हेल मासा होता. हा जमिनीवरील डायनॉसोरची आठवण करून देणारा. मोठ्या आकाराचे हौद असावेत तशी पाण्याने भरलेली मोठमोठी कपाटे होती. त्यांमध्ये सागराचा तळ दाखवलेला होता. तो सारा भूभाग उंचसखल, आणि त्यात नाना प्रकारच्या वेलींची आणि वनस्पतींची गर्दी.

आपल्या लांबट आकारांच्या पानांच्या विळख्यात जवळ येणाऱ्या माशांना पकडणाऱ्या काही वनस्पती होत्या. या वनस्पतींची संवेदनशक्ती कोणत्या प्रकारची म्हणावी? जीवसृष्टीची ही सारी विविध रूपे या प्रदर्शनात पाहताना ही सचेतन सृष्टी नेमकी कशातून आकाराला आली असे म्हणावे, आणि या सर्वांमध्ये मानवाचे स्थान किती आगळेवेगळे आहे, असा विचार मनात घोळत राहतो. विचाराला चालना देणारे असे हे संग्रहालय आहे. ज्ञानाचे

भांडारही आहे. प्रत्येक ठिकाणी दूरदर्शनच्या पडद्यावर तऱ्हेतऱ्हेची दृश्ये सतत दाखवली जात असतात, आणि नाना प्रकारची माहिती ऐकवली जात असते. या आधुनिक प्रदर्शनांना ही दृक्-श्राव्य माध्यमाची नवी जोड मिळाली आहे.

### अनंत अवकाशाचा शोध

हे पृथ्वीवरील जीवसृष्टीचे दर्शन झाले. वॉशिंग्टनमधील नासाचे म्हणजे अंतरिक्ष संशोधन विभागाचे संग्रहालय आपल्याला विश्वाच्या अनंत प्रदेशात घेऊन जाणारे आहे. १९५७-मध्ये रशियाने आकाशात पहिला स्पुटनिक सोडला, आणि मानवाने अवकाशात पहिली मोठी झेप घेतली. विज्ञानातील अतरिक्षसंशोधनाला तेथून एक नवी दिशा मिळाली. वृत्तपत्रांत ही स्पुटनिकची वार्ता अकस्मात झळकली, तेव्हा अवघे जग विस्मित होऊन गेले. यानंतर हे संशोधन मानवाला किती दूरवर घेऊन जाईल, असा एक रोमहर्षक विचार जाणकारांच्या मनात डोकावून गेला. पंडित जवाहरलालांनी या वेळी वयाची सत्तरी गाठली होती. त्यांच्या समोर दिसणारी उगवती पिढी विशीत होती. त्यांनी उद्‌गार काढले, ''नवी पिढी भाग्यवान आहे, ती अवकाशयुगात प्रवेश करीत आहे, नाना अद्‌भुत गोष्टी तिला पाहावयास मिळणार आहेत.'' त्या उद्‌गारांची प्रचीती आपण घेत आहोत. चंद्रावरची भूमी तर प्रत्यक्ष पाहून झाली, पण संशोधन त्याच्याही पुढे गेले आणि आता अवकाशयानातून माणूस न पाठवताही माहिती गोळा करता येते.

नुकताच अमेरिकेचा पाथफाइंडर मंगळावर उतरला. दूरनियंत्रणाने म्हणजे रिमोटकंट्रोलने दिशा देता येते आणि त्यानुसार यानातील उपकरणे सारी कामे करतात. मंगळाच्या पृष्ठभागाची उत्कृष्ट छायाचित्रे वृत्तपत्रांतून आली आहेत. पृथ्वीवर आहे तशीच खडकाळ भूमी आहे, एका छायाचित्रात तर थोड्या अंतरावरील छोटीशी टेकडी दिसत आहे. मनात एकदम विचार येऊन जातो की, आपण ती चढून जावे. या पाथफाइंडरमधून एक छोटीशी यांत्रिक गाडी खाली उतरली. ती मंगळावर थोडेफार फिरते आहे, त्यातून अधिक तपशील हाती येत आहेत. चंद्रानंतरचा हा मंगळ आता आपले आजवर अज्ञात राहिलेले रूप प्रकट करीत आहे. अंतरिक्षातील ताऱ्यांचा वेध घेताना पृथ्वीच्या वातावरणाचा काही अडथळा येतो. पण आता अवकाशयानात प्रयोगशाळा उभारली आहे, आणि तेथील अवकाशयात्री रेडियो टेलिस्कोपच्या साहाय्याने दूरवरचे विश्व न्याहाळत आहेत. काय आढळते त्यांना? आपल्या आकाशगंगेसारख्याच कित्येक आकाशगंगा दृष्टिपथात आल्या आहेत. या सर्वांची सीमा कोठे असेल? तशी असेल तर त्यापलीकडे काय, हा सनातन प्रश्न अखेर आपल्याला अनंताकडे घेऊन जाणारा आहे.

काही वर्षांपूर्वी आकाशात सोडलेले व्हॉएजर पुढे पुढे चालले आहे. मंगळ, गुरू,

शनी असे ग्रह ओलांडत व त्यांची छायाचित्रे पृथ्वीवर पाठवीत व्हॉएजर आता नेपच्यूनकडे झेपावत आहे. त्याची कक्षा ओलांडल्यावरही एखादा छोटा ग्रह असावा असे म्हणतात पण तोही मागे टाकला की, हे व्हॉएजर सूर्यमालेचा प्रदेश ओलांडेल. त्यानंतरची त्याची दिशा कोणती राहील? दिशा तरी कशी म्हणावयाची? दिशा ही सापेक्ष कल्पना आहे ऋग्वेदातील नासदीय सूक्तत तीन-साडेतीन हजार वर्षांपूर्वीच्या एका प्रज्ञावंत ऋषीने केवळ चिंतनशीलतेच्या बळावर अशीच झेप घेतली आणि उद्‌गार काढले,''हे विश्व निर्माण होण्यापूर्वी सत् नव्हते आणि असत्‌ही नव्हते.'' पण ही तत्त्वज्ञानातील गहन कल्पना झाली. त्याने पुढे म्हटले, ''त्या वेळी रात्र नव्हती आणि म्हणून दिवसही नव्हता.'' हे वाचताना मन भांबावून जात असे. रात्र आणि दिवस या दोहींतील एक तरी असणार, असे वाटून जाई. आता आधुनिक खगोलशास्त्राने हे सारे आपल्यासमोर आणून उभे केले आहे. अनंत आकाशात पोचले तर तेथे समोर सूर्य नाही आणि पायाखाली पृथ्वी नाही, त्यामुळे सूर्याचा उदय वा अस्त नाही. त्या उदयाशी संबंधित पूर्व नाही म्हणून मावळतीची पश्चिम नाही. मग कोणती दिशा उरली? व्हॉएजर ज्या बाजूला जाईल ती समोरची दिशा. कशामुळे तरी ते यान दुसरीकडे वळले, तर मग ती समोरची दिशा. आईनस्टाइनचा सापेक्षतावाद सूर्यमालेच्या मर्यादित प्रदेशातून बाहेर पडल्यावर कोणत्या रूपात प्रचीतीला येईल?

सूर्यमालेनंतरचा सर्वांत जवळचा तारा दक्षिण क्षितिजावर दिसणाऱ्या सदर्न क्रॉसमध्ये आहे. तो चार प्रकाशवर्षे दूर आहे. प्रकाशाचा वेग एका मिनिटाला एक कोटी मैलांहून थोडा अधिक. हे अंतर कालाच्या दृष्टीने केवढे झाले? व्हॉएजर तोवर टिकेल? संदेश पाठवीत राहील? त्याने पाठवले तर तोवर हा मानव, त्याची ही पृथ्वी, तो दूरवरचा सूर्य, आणि तो जीवनदायी प्रकाश, यांतील सारे काही शिल्लक राहीलच असे म्हणता येईल? मग व्हॉएजरने संदेश पाठवले तर ते कोण घेणार? घेणारा कोणी नसेल, तर त्या संदेशाला काय अर्थ राहील? जे कोणीच जाणत नसेल, अशा अस्तित्वाला अस्तित्व म्हणून कोणता अर्थ आहे असे म्हणावयाचे? पण जे कोणी जाणत नाही असे या विश्वात कितीतरी आहे एवढे तरी आपण जाणतो. पण तेवढेही जाणणारा कोणी उरला नाही तर? ज्ञात-अज्ञाताची सीमा ओलांडून जाणारे या विश्वाचे हे अनंत अस्तित्व आणि त्याचा अनंत पसारा. एका बिंदुवत अशा खिडकीतून या इवल्याशा पृथ्वीवरील हा इवलासा मानव त्या अनंताचा जो वेध घेत आहे, त्याचे तितकेच इवलेसे दर्शन नासाच्या या प्रदर्शनात घडते.

स्पुटनिक आकाशात झेपावला आणि अमेरिका खडबडून जागी झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या उत्तरार्धात जीव वाचवण्याच्या इच्छेपोटी ॲटम बॉंबचा शोध सुरू झाला. जर्मनीच्या हातात पडण्याच्या आधी ते अस्त्र आपण हस्तगत केले पाहिजे या ईर्ष्येने संशोधक रात्रंदिवस

प्रयोगशाळांतून काम करीत राहिले. स्पुटनिकच्या उड्डाणानंतर तेच घडले. अंतरिक्षज्ञानाच्या या स्पर्धेत आपण मागे राहता कामा नये, एवढेच नव्हे, तर रशियाच्या आधी अमेरिकेचा अवकाशयात्री चंद्रावर उतरला पाहिजे, असे अध्यक्ष जॉन केनेडी यांनी म्हटले. त्याप्रमाणे नील आर्मस्ट्रॉँगने १९६९ साली चंद्रावर पाऊल ठेवले. ती सारी वाटचाल नासाच्या या प्रदर्शनात पाहावयास मिळते. सारे काही केवळ प्रचंड आहे, एवढे म्हटले म्हणजे पुरे. आर्मस्ट्रॉँग चंद्रावर उतरला आहे, आणि त्याचा सहकारी अवकाशयानाच्या शिडीतून खाली उतरत आहे, असा तो ऐतिहासिक महत्त्वाचा क्षण साकार करण्यासाठी त्या सर्वांच्या पूर्ण आकारातील प्रतिकृती या प्रदर्शनात दाखवल्या आहेत.

### अंतरिक्षसंशोधनाचे दर्शन

या प्रदर्शनातील सारे काही अवकाशसंशोधनातील अद्ययावत प्रगतीचा आलेख दृष्टीसमोर उभे करणारे आहे. पहिले अंतरिक्षयान आकाशात गेले, तेथपासून अधिक अधिक सुधारत गेलेली सारी अवकाशयाने या प्रदर्शनात पाहावयास मिळतात. निरनिराळ्या दालनांतून अनेक स्वतंत्र विभाग आहेत. कोठे सूर्यमाला आहे, कोठे तीमधील निरनिराळे ग्रह आहेत. एका दालनात आपल्या आकाशगंगेचा भव्य देखावा होता. सारा प्रत्यक्ष संशोधनावर आधारलेला. अशीच इतर तारकापुंजांची घेतलेली वेधक छायाचित्रे होती. प्रत्येक दालनात दूरदर्शनचा संच आणि बटण दाबताच विशिष्ट विषयांवरील नाना दृश्ये पाहण्याची व त्यांची माहिती ऐकण्याची सोय. त्याशिवाय जागोजाग फलकांवर विविध प्रकारचे तपशील दिलेले. खरे तर हे अफाट अशा विश्वाच्या ज्ञानाचे विशाल भांडार खुले केलेले आहे. ते सारे शातपणे आपलेसे करीत सावकाशीने पाहिले, तर आपल्या ज्ञानात केवढी भर पडेल! पण तेवढा वेळ हाताशी नव्हता. त्यामुळे बराच वेळ येथे कायकाय मांडून ठेवलेले आहे त्याची केवळ नोद करण्यातच गेला.

अवकाशयानातून निरनिराळ्या अंतरांवरून आपली ही नीलवर्ण पृथ्वी कशी दिसते, त्याची चित्रे पाहताना त्यांतील सौंदर्याने मन वेडावून जाते. आकाशगंगेच्या अफाट विस्तारात जणू हरवून जाणारी आपली नगण्य म्हणावी अशी सूर्यमाला, त्यातील एक ती आपली पृथ्वी. आकाशगंगेच्या मानाने तिचे अस्तित्व ते काय? या आकाशगंगेत दहा हजार कोटी तारे आहेत, आणि असे कोट्यवधी तारकापुंज या विश्वात आहेत, असा शास्त्रज्ञांचा कयास आहे. या संख्येचीही कल्पना आपल्याला करवत नाही. आणि अवकाशाच्या विस्ताराची कथाही तशीच आहे. रेडियोटेलिस्कोपमधून सर्वात दूर असलेला तारकापुज आढळला आहे, तो सोळाशे कोटी प्रकाशवर्षे दूर आहे. यांतील प्रत्येक तारकापुंजात आपल्या आकाशगंगेसारखेच कोट्यवधी तारे आहेत. काळोख्या रात्रीच्या स्वच्छ आकाशात धूसर प्रकाशाचा थोडा मोठा

ठिपका असावा तसा नुसत्या डोळ्यांनी दिसणारा ॲण्ड्रोमेडा हा एकमेव तारकापुंज आहे. पृथ्वीपासून तो दोन कोटीहून अधिक प्रकाशवर्षे दूर आहे. त्याचा लंबवर्तुळासारखा आकार आपल्या आकाशगंगेपेक्षा अधिक आहे त्याचा व्यास सव्वा कोटी प्रकाशवर्षाहून थोडा अधिक, तर आपल्या आकाशगंगेचा जवळजवळ एक कोटी प्रकाशवर्षे आहे.

नासाच्या या प्रदर्शनात ताऱ्यांचा जन्म कसा होतो, त्याची चित्रे दिसतात, ते नाश कसे पावतात तेही चित्रांच्या साहाय्याने पाहावयास मिळते. अनत अंतरिक्षाच्या या महाविशाल अशा प्रयोगशाळेत अनेकानेक तारकापुजांत भिन्न भिन्न अवस्थांतील ताऱ्यांमधून तितकीच भिन्न भिन्न प्रक्रिया कशी चालू आहे, त्याचे विराट दर्शन ती सारी चित्रे पाहत जाताना घडते. विश्वाच्या पसाऱ्याचे वर्णन करताना अनंत हा शब्द का वापरावा लागतो, ते साक्षात समजते. पाण्यावर बुडबुडे उठावेत, त्यावर सूर्याचे किरण पडून क्षणमात्र विविध रंगांचा खेळ दिसावा, आणि पुढच्या क्षणी ते फुटून नवे बुडबुडे निर्माण व्हावेत, आणि अशी ही साखळी एखाद्या नदीच्या खळाळत्या प्रवाहात प्रतिक्षणाला चालू असावी, तसे काहीतरी या अनंत विश्वाच्या तेवढ्याच अनंत अवकाशपटावर अनंत कालापासून चालू आहे. हे सारे अनंत कालपर्यंत असेच चालू राहणार आहे, असे अनुमान करावे लागते. कोणी चालवली आहे ही विराट क्रीडा, आणि कशासाठी?

मानवाच्या ठायी त्या विश्वचालक वा निसर्गस्थित अशा शक्तीने प्रचंड जिज्ञासा ठेवली आहे, ती पुरी करून घेण्यासाठी त्याला बुद्धी लाभली आहे; ती थेट अस्तित्वाच्या अस्तित्वापर्यंत जाऊन थडकत आहे. नाना प्रश्न तिला पडत आहेत. ''दिगंतराची द्वारे उघडित। अवकाशाची सीमा धुंडित।'' ती बुद्धी पुढेपुढे चालली आहे, आणि ''कालतरूची मोजिन पाने। अनंततेची शोधिन भवने।। चैतन्याचे बघेन ठाणे। छंद घेऊनी या ईर्ष्येनि।।'' हा धिटुकला मानव शोध घेत आहे. या साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्याला मिळणार आहेत काय? का ती मिळण्याच्या आधीच पृथ्वीसकट हा मानव समाप्त होणार आहे? आणि मग त्या स्वतंत्र बुद्धी लाभलेल्या मानवाच्या जीवनाचा आणि विश्वात अवतीर्ण होऊन काही काळ धडपडत राहून अखेर नाहीसे होऊन जाण्याचा अर्थ काय आहे असे समजावयाचे? त्याच्याही पुढचा प्रश्न असा की, हा जाणणारा मानव कोण आहे? त्याच्या ठायी असलेल्या जाणिवेच्या शक्तीचे स्वरूप काय आहे? प्रकाशाचे स्वरूप काय आहे, हा जसा एक प्रश्न, तसाच हाही एक प्रश्न. पण प्रकाश जड आहे, जाणिवेची शक्ती जड म्हणता येत नाही

आजवर विज्ञान केवळ जड पदार्थाच्या गुणधर्मांचा विचार करीत होते. आता क्वांटम फिजिक्स या नव्या ज्ञानशाखेचा उदय झाल्यापासून विज्ञानाचा मोहरा बदलला आहे. जडाहून स्वरूपतः वेगळ्या असलेल्या जाणिवेच्या या घटकाकडे ते वळले आहे. किंबहुना त्या

शक्तीचे स्वरूप समजून घेतल्याशिवाय या विश्वाचे वा एकूण अस्तित्वाचे कोडे उलगडणार नाही, हे निदान काही शास्त्रज्ञांना तरी पुरते भावले आहे. भावले आहे असेच म्हणावयास हवे. कारण अणूतील घटक शोधले, किंवा अनुमानाच्या आधारे त्याचे अस्तित्व कल्पून त्यांच्या संभाव्य परस्परव्यापारांचा पडताळा घेतला गेला, तसे अद्याप तरी जाणिवेच्या संदर्भात करता आलेले नाही. पण तो अतिशय महत्त्वाचा व स्वतंत्र असा घटक आहे, हे मान्य होत आहे. स्थल, काल, द्रव्य, आणि ऊर्जा या चार अंतिम घटकांच्या बरोबर Consciousness किंवा चैतन्य या घटकाला स्थान लाभत आहे. निरनिराळ्या रसायनांच्या मिश्रणाचे जसे काही परिणाम होतात, तसाच काही जड घटकांच्या विशिष्ट संरचनेचा एक परिणाम म्हणजे जाणीव हा विचार आता सर्वमान्य राहिलेला नाही. विख्यात शास्त्रज्ञ श्रोडिंजर याच्या १९४४ साली प्रसिद्ध झालेल्या ''What is Life " या ग्रंथात त्याने हा आशय फार मार्मिकपणे व्यक्त केला आहे. मानवाचे शरीर जड आहे. याला अनुलक्षून त्याने म्हटले आहे, ''माझे शरीर ही निसर्गनियमांच्या विशिष्ट प्रणालीनुसार चालणारी एक यंत्रणा आहे.'' पण त्यानंतर तो म्हणतो, ''मला प्रत्यक्ष येत असलेल्या अनुभूतीवरून मी हेही जाणतो की, त्या शरिराच्या द्वारा होणाऱ्या काही व्यापारांना मी विशिष्ट दिशा देतो, त्याचे होणारे परिणाम मी आधीपासून जाणू शकतो, आणि त्याच्या पुढची सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे ती ही की, त्या परिणामांची जबाबदारी मी स्वीकारतो.''

या दोन विधानांचा परस्परसंबद्ध व पररपरपूरक असा काही मेळ घालता येईल का, असा प्रश्न येथे उत्पन्न होतो. त्यांच्या उत्तराबाबत मतभेद असावेत हे स्वाभाविक आहे. श्रोडिंजरने केलेल्या विधानांतून उत्पन्न होणारे प्रश्न निखळ जडवादाला छेद देणारे आहेत, हे विसरता येत नाही. पुस्तकाच्या नावातच Life हा शब्द आहे आणि तो उपर्युक्त विधानांतील दुसऱ्याशी नाते जोडणारा आहे. किंबहुना पहिले विधान केवळ जड शरिराच्या व्यापाराशी, तर दुसरे विधान चैतन्याशी व त्याद्वारा घडणाऱ्या स्वतंत्र बुद्धीच्या विचारव्यापाराशी संबंधित आहे. स्वतंत्र विचारशक्ती ही ठराविक परिणामात पर्यवसित होणारी ठरीव स्वरूपाची प्रक्रिया नसते. त्या विचारशक्तीच्या व्यापाराला व संचाराला अनंत दिशा खुल्या आहेत. जडाच्या संदर्भात असे घडत नाही. त्यांचे व्यापार एक प्रकारे साचेबंद असतात. चैतन्याचा विलास केवळ मुक्त म्हणावा असा आहे. विश्वाच्या स्वरूपाचा शोध आता जडाच्या मर्यादेशी थांबू इच्छीत नाही. पण अशा या जाणिवेच्या व बुद्धीच्या बळावर अखेर हा शोध लागेल का? ''या विश्वाच्या व्यापारातील अखेरची तत्त्वे कोणती आहेत हे केवळ तो परमेश्वर जाणतो, आणि ज्यांच्यावर त्याचे प्रेम असते ती माणसे जाणतात,'' असा प्लेटोचा एक उद्गार आहे हा तर अप्रत्यक्षपणे ईश्वरतत्त्वाचा अंगीकार झाला. साध्या अणूच्या रचनेचे स्वरूप यथार्थपणे

स्पष्ट करताना आपली भाषा व तीद्वारा व्यक्त होणाऱ्या संकल्पना अपुऱ्या पडतात, असा हायझेनबर्गचा एक उद्‌गार आहे. ''यतो वाचो निवर्तते'' या उपनिषदातील सुप्रसिद्ध श्लोकाचाच हा एक पडसाद आहे, असे म्हटले तर?

## जडाचा शोध आणि चैतन्याचा वेध

विश्वातील नाना घटकांचा तुटक तुटक असा वेगवेगळा शोध हा पुरेसा नाही. त्या सर्वांच्या मागे उभ्या असलेल्या एकत्वाचा शोध घ्यावयास हवा. या विश्वात जी व्यवस्था वा नियमबद्धता आढळते, ती भिन्नभिन्न घटकांच्या परस्परसंबंधावर आधारलेली आहे, आणि या परस्परसंबंधाला कोणत्यातरी स्वरूपात सर्वांच्या मुळाशी असणाऱ्या एकत्वाचा आधार आहे, असे म्हणण्यापर्यंत काही वैज्ञानिक आले आहेत. एकत्वाची ही संकल्पना भारतीय तत्त्वज्ञानातील समग्र विश्वाच्या बुडाशी असणाऱ्या वस्तुतत्त्वाच्या अधिष्ठानाच्या जवळ येते. ही विचारांची सरणी येथेच थांबत नाही. विश्वाचा विचार करताना केवळ त्यातील नाना पदार्थ ध्यानात घेणे हे अपुरे आहे, तर त्यांच्याबरोबर आपल्या भोवताली असणाऱ्या मानवांचाही अंतर्भाव त्यात करावयास हवा, असेही काही शास्त्रज्ञांचे मत आहे. याचा अर्थ असा होतो की, जड वस्तूंच्या व्यापारांबरोबर मानवाचे मन आणि बुद्धी यांची जी भावनात्मक आणि विचारात्मक चलनवलने आहेत त्यांना कारणीभूत होणाऱ्या तत्त्वाचा शोध घेणे प्राप्त आहे, त्याशिवाय विश्वाच्या स्वरूपाचा विचार पुरा होणार नाही. येथवर येऊन पोचले की, कोठेतरी जड घटकांची सीमारेषा ओलांडली जाते आणि जाणिवेच्या प्रदेशात पाऊल पडते. मग या विश्वाचे अचेतन आणि सचेतन असे दोन भाग आपोआपच पडतात, हे स्पष्ट दिसते. द्रव्य आणि मन, शरीर आणि आत्मा, ही दोन्ही मिळून अस्तित्वाचा एकूण पसारा बनतो, अशी मांडणी कोणीकोणी केली आहे.

मनाचा व्यापार म्हटले की संवेदना आली. आत्मा हा शब्द आला की चैतन्यतत्त्व आले, हे स्पष्ट आहे. नुसताच जडाचा शोध मानव या घटकाकडे दुर्लक्ष करणारा आणि त्याच्या सवेदनशीलतेला पारखा ठरणारा आहे, आणि असे करणारा शास्त्रज्ञ जणू एक पापच करतो; अशी भाषा रॉबर्ट ओपेनहायमरने वापरली आहे. पाप आणि पुण्य ही परिभाषा धर्माच्या क्षेत्रातील आहे, पण एका दृष्टीने ती अंतिम मूल्यविचाराकडे अंगुलिनिर्देश करते. अखेर हा सारा विचार अध्यात्माकडे घेऊन जातो, हे काही शास्त्रज्ञांनी अलीकडे नमूद केले आहे. त्याच्या अलीकडे थांबून कोणीकोणी नीतिमूल्यांचा संदर्भ देतात. पण नीतिमूल्ये म्हणजे जड सृष्टीच्या व्यापारांच्या नियामक तत्त्वांचा भाग नव्हेत हे स्पष्ट आहे. किंबहुना एकदा नीतिमूल्यांच्या प्रदेशात शिरले की, समग्र विश्वाचा विचार करताना अध्यात्माचा रस्ता अटळ आहे.

एक गंभीर आजारात मृत्यूचा धोका दिसत असताना आइनस्टाइनला कोणीतरी प्रश्न केला, ''मृत्यूची भीती वाटते का?'' त्याने उत्तर केले, ''साऱ्या सचेतन प्राणिजाताबद्दल मला इतका दृढ संबंध असल्याचा भाव जाणवतो की, एखाद्या व्यक्तीचं नव्यानं अस्तित्वात येणारं जीवन वा त्याचा अंत ही माझ्या दृष्टीनं फार महत्त्वाची गोष्ट उरत नाही.'' समग्र अस्तित्वाचे रहस्य आपल्या हाताला लागावे, असा ध्यास घेतलेल्या या महान शास्त्रज्ञाच्या तत्त्वचिंतनातील अशा शलाका डॉ. मो. रा. गुण्ये यांनी अलीकडेच लिहिलेल्या ''आइनस्टाइनचे मनोविश्व'' या मनोवेधक चरित्रग्रंथात आपल्याला पाहावयास मिळतात. याच आइनस्टाइनने १९२७ साली शास्त्रज्ञांच्या एका संमेलनात, विश्वाचे स्वरूप उलगडण्याच्या दृष्टीने क्वांटम मेकॅनिक्स हे एक अपुरे स्पष्टीकरण आहे, एवढेच फार फार तर म्हणता येईल, असे आपले मत व्यक्त केले आणि त्यामागची कारणेही त्याने स्पष्ट केली. सॉल्व्हे येथे भरलेल्या या संमेलनाला क्वांटम सिद्धान्तावर संशोधन केलेले अनेक शास्त्रज्ञ उपस्थित होते. आइनस्टाइन आपल्या या मताला जीवनाच्या अखेरीपर्यंत चिकटून होता. विश्वाच्या अस्तित्वाचे कोडे उलगडावे यासाठी साऱ्या आयुष्यभर जीव ओतून संशोधन करीत राहिलेल्या आइनस्टाइनला अवघ्या सचेतन सृष्टीशी आपला दृढ असा काही संबंध आहे असे वाटले, ही गोष्ट आध्यात्मिक क्षेत्रातील सिद्ध पुरुषांना जाणवणाऱ्या अद्वैतसिद्धान्ताच्या साक्षात्कारी अनुभूतीच्या जवळ येणारी आहे, असे मनात आल्यावाचून राहात नाही.

कोणीतरी जाणणारा आणि त्याच्याकडून जे जाणले जाते ते, ही विभागणी ध्यानात घेणे विश्वस्वरूपाच्या शोधात अपरिहार्य आहे, हे अनेक शास्त्रज्ञांना मान्य होऊ लागले आहे. जीव आणि जगत ही भारतीय तत्त्वज्ञानातील कल्पना किंवा ज्ञानदेवांनी अनुभवामृतात योजलेली द्रष्टा आणि दृश्य ही परिभाषा वैज्ञानिकांच्या या मांडणीपासून फारशी दूर वा वेगळी नाही, हे सहज समजण्यासारखे आहे. आपल्याला सभोवताली जे विश्व दिसत आहे ते एकसारखे बदलत आहे, याची नोद प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ हेरॅक्लिटस याने घेतली होती. तत्त्वज्ञांना प्रश्न असा पडला की, या सतत बदलत असणाऱ्या विविध पदार्थांच्या मागे न बदलणारे असे तत्त्व कोणत्या प्रकारचे आहे? वेदान्ताच्या परिभाषेत हाच प्रश्न असा होईल की, प्रकृतीच्या सतत परिवर्तनीय अशा व्यापारांना कोणत्या स्थिर आणि अपरिवर्तनीय तत्त्वाचे अधिष्ठान आहे? गौतम बुद्धाने तसे अधिष्ठानरूप असे काहीही नाही असे म्हटले, आणि त्यातून शून्यवाद अवतरला. घट, रांजण, परळ, वाडगा, पणती, अशा निरनिराळ्या विनाशी आकारांच्या द्वारा समोर येणाऱ्या पदार्थांमध्ये भरून राहिलेले आणि स्थिर असे मृत्तिका हे द्रव्य आहे, आणि म्हणून उपनिषदांत उद्गार आला, ''मृत्तिकेत्येव सत्यम्''. उठणाऱ्या व विरणाऱ्या तरंगांमध्ये पाणी हे स्थिर स्वरूपात असणारे द्रव्य आहे तरंगांच्या उठण्याचा वा निमण्याचा कोणताही

परिणाम त्या पाण्यावर होत नाही. याचाच अर्थ असा की, ते त्या बदलांच्या वा विकारांच्या पलीकडे आहे. सतत बदलत असणाऱ्या विश्वातील अनेकानेक पदार्थांच्या बुडाशी असणारे तत्त्व अशाच प्रकारे सर्व विकाराच्या पलीकडे असणारे म्हणजे निर्विकार किंवा निर्विकल्प आणि सर्वव्यापक असणार हे स्पष्ट आहे तर्काने येथवर पोचता येते, आणि त्यालाच उपनिषदांत आत्मा वा ब्रह्म म्हटलेले आहे गेल्या पाचपन्नास वर्षांत वैज्ञानिक या पायरीशी येऊन ठेपले आहेत.

काय आहे यापेक्षा अवलोकनात काय येते याच्याशी क्वांटम सिद्धान्ताला कर्तव्य आहे, असे म्हटले जाते. काय आहे हा केवळ अनुमानाचा विषय होईल, म्हणून ही शब्दयोजना आली असावी. पण त्या मार्गाने जात असताना वस्तू आणि ती पाहणारा, किंवा object आणि subject अशा दोन भागांत विश्व विभागले जाते, आणि ही मांडणी हायझेनबर्गच्या नावाने ओळखली जाते. पाहणारा असा कोणी संवेदनशील द्रष्टा नसला आणि त्याच्या जागी घटितांची नोंद घेणारे एखादे यंत्र वा उपकरण असले, तरी त्यामुळे काही बिघडत नाही; असा एक युक्तिवाद केला गेला आहे. अवलोकनाचे तपशील नोंदले जाण्याच्या मर्यादेत हे म्हणणे ठीक आहे. पण अवलोकनाचे साधन असलेले ते यंत्र कोण बनवतो, त्या यंत्रावर जे उमटते त्याचे अवलोकन कोण करतो, आणि त्याच्या आधारे निष्कर्ष कोण काढतो, असे प्रश्न यावर सुचतात. जड असे यंत्र विचार करू शकत नाही वा निष्कर्ष काढू शकत नाही. ते यंत्र म्हणजे केवळ एक साधन आहे. तेव्हा कोणीतरी पाहणारा किंवा जाणणारा या संकल्पनेकडे अपरिहार्यपणे जावे लागते.

Conceiousness म्हणजे जाणीव वा चैतन्य याच्यायोगे होणारे ज्ञान, आणि ते ज्याला होते तो ज्ञाता यांची दखल घेण्यावाचून पर्याय उरत नाही, असे काही वैज्ञानिकांनीही म्हटले आहे. एडिंग्टन किंवा जेम्स जीन्स अशा तत्त्वज्ञांनी म्हटले आहे की, विश्वव्यापाराच्या बुडाशी असलेले नियम अखेर ज्ञान या घटकात पर्यवसित होतात. प्रयोगशील शास्त्रज्ञ आणि चिंतनशील तत्त्वज्ञ यांची येथे गाठ पडत आहे असे वाटून जाते. प्रयोगशील वैज्ञानिकांच्या बुद्धीला अशा प्रकारे चिंतनशीलतेचा स्पर्श झाला की, तेथे नव्या संकल्पनांचे स्फुरण होऊन जाते. ते स्फुरण अवलोकनासाठी थांबून राहात नाही. असे स्फुरण हा निर्मितिशील प्रज्ञेचा आविष्कार असतो. त्यामुळेच की काय, आताच्या कालातील अशा प्रकारच्या शास्त्रज्ञांचा उल्लेख करताना, पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या New Quest या नियतकालिकाच्या सप्टेंबर-ऑक्टोबर १९९७-च्या अंकातील "Our Image of Nature and Creative Scientists" या विचारप्रवर्तक लेखाच्या शीर्षकात Creative या विशेषणाची योजना शशिभूषण रथ यांनी केली असावी. उपर्युक्त विवेचनातील काही संदर्भ त्या लेखातून घेतले

आहेत, हे नमूद करणे आवश्यक आहे.

नासाच्या त्या प्रदर्शनात स्थल आणि काल यांच्या अनंतत्वाची प्रचीती येईल अशा कितीतरी गोष्ट होत्या. पण त्या संकल्पनांचा वेध घेणारा जो ज्ञाता त्याला तेथे स्थान नव्हते. तो ज्ञाता कधीकाळी हाताला लागला, तर तो त्या प्रदर्शनाचा अधिष्ठाता होऊन जाईल, असे वाटून गेले. तो ज्ञाता आणि त्याच्या ठायी असणारे चैतन्य यांचा ठाव अद्याप तरी लागलेला नाही. जड आणि चैतन्य यांच्यांतील सीमारेषा नेमकी कोठे आहे, किंवा त्या चैतन्याचे स्वरूप काय आहे, हे अद्याप तरी कोणा संशोधकाला गवसलेले नाही. तो शोध घेताना कोठेतरी माणसाची बुद्धी कुंठित होते, आणि "क्षणी भासते, जातसे मी जडाच्या अनुल्लंघ्य सीमेस उल्लंघुनी। परी थांग लागे न काही पुढे अन् फिरे मागुती तेथ घोटाळुनी।।", अशा निष्कर्षाला अद्याप तरी यावे लागते. त्या ज्ञात्याच्या विचारांचे, भावनांचे आणि चिंतनाचे विश्व हादेखील समग्र अस्तित्वाचाच भाग आहे. त्याचाही उलगडा व्हावा लागेल. हा सारा विषय मानव्य विद्याशाखेतील अभ्यासाचा आहे. पण तेथे तो ज्ञाता गृहीत धरलेला आहे. तत्त्वज्ञान या शास्त्रात त्याचा वेध घेण्याचा काही प्रयत्न विशेषत्वाने केला जातो. तेथे अनेकांनी अनेक प्रकारचे विचार व्यक्त केलेले आढळतात. पण "विज्ञातारमरे केन विजानीयात्।" म्हणजे जो हे काहीकाही जाणतो, त्या ज्ञात्याला कोणत्या साधनाच्या आधारे जाणून घ्यावयाचे, हा प्राचीन काळी उपनिषदांत विचारलेला प्रश्न अद्याप तरी अनुत्तरित राहिलेला आहे

असे वाटते की, यांतील कशाचेच उत्तर हाती लागत नाही ही, अपार शोध घेऊ शकणाऱ्या बुद्धीचे एका दृष्टीने अमोघ पण तोटक्या सामर्थ्याचे एक साधन लाभलेल्या, आणि क्षणभंगुर म्हणावे अशा आयुष्यमात्राच्या मानवजातीची अंतिम शोकांतिका आहे. पण शोकांतिका पाहण्यातही एक आनंद असतो. त्याही मनाला काही उदात्ततेची दिशा देऊन जातात. अशा कोणत्यातरी अगम्य आणि अज्ञेय विश्वात केवळ आश्चर्यमुग्ध होऊन आपण वावरत आहोत, असे त्या नासाच्या प्रदर्शनात फिरताना वाटत होते.

या प्रदर्शनात एक चित्रपटगृह आहे. तेथे अर्ध्या अर्ध्या तासाचे दोन चित्रपट पाहावयास मिळाले. सत्तर एम एम हा आपल्याकडील चित्रमंदिरातील सर्वात मोठा पडदा. त्याच्या तिप्पट आकाराचा पडदा येथे होता. त्यामुळे सारेच दृश्य अतिशय विशाल रूप धारण करते. "The Living Planet" हा पहिला चित्रपट. आरंभी पृथ्वीचे स्वरूप काय होते येथपासून तीवर सचेतन सृष्टी कशी अवतरली, याचे दर्शन त्यात घडते. उत्तर आणि दक्षिण दिशांना असणारा निरंतर बर्फाच्छादित असा ध्रुवप्रदेश. प्रचंड पर्वत आणि बर्फाचे मोठमोठे कडे. ते कोसळताना कसे दिसतात आणि हिमनद्या कशा सरकत जातात यांचे दर्शन अद्भुत वाटणारे होते. हळूहळू पृथ्वीच्या मध्यावरील विषुववृत्ताच्या दिशेने सरकू लागले की गवताळ प्रदेश

येतो. त्यानंतर हिरवीगार वनस्पतीसृष्टी अवतरते पर्वतांच्या उतारावरील फेसाळणारे पाण्याचे प्रवाह लक्ष वेधून घेतात. खळाळत चाललेल्या नद्या, त्याच्या काठावरची शेते, त्यांतून डोलणारे मोठमोठे वृक्ष, सतत किनाऱ्याकडे झेपावत असलेल्या समुद्राच्या फेसाळत्या लाटा, अशी सृष्टीची नाना रूपे समोरून जातात. अशी ही पृथ्वी अवकाशातून कशी दिसते त्याचे मनोवेधक दृश्य. सारेच अतिशय सुंदर, आणि दृष्टी खिळवून ठेवणारे.

झाडांवरून किलबिलणारे पक्षी आपले पंख उभारून निळ्या निळ्या आकाशात विहार करताना माणसाने पाहिले, आणि त्याच्या मनात तशीच झेप काढण्याची आकांक्षा निर्माण झाली. ती माणसाच्या मनात प्राचीन काळापासून फार खोलवर लपून राहिलेली असावी. आकाशमार्गाने जाणाऱ्या देवदेवतांच्या कथा जगाच्या अनेक भागांतील पुराणकथांतून आहेत. आपल्याकडील नारदमुनी आकाशमार्गाने खांद्यावर वीणा घेऊन जातात, तर शिवपार्वती परस्परांशी संवाद करीत पृथ्वीवरील परिस्थितीचे अवलोकन करताना आढळतात. कालिदासाच्या रघुवंशातील रामजानकीच्या पुष्पक विमानाच्या उड्डाणाचे वर्णन, जणू त्या महाकवीने तो अनुभव प्रत्यक्ष घेतला असावा, एवढे प्रत्ययकारी आहे मध्यप्रदेशातील रामगिरीहून उत्तरेकडील हिमालयावर असलेल्या अलकानगरीकडे आकाशातून चाललेल्या मेघाला जमिनीवरील विविध दृश्ये कशी दिसतात याचे कालिदासाने केलेले वर्णन वास्तवाशी जुळणारे आहे, असा निष्कर्ष संशोधकांनी प्रत्यक्ष अवलोकन करून काढला आहे.

पण हे सारे कल्पनासृष्टीतील झाले. आधुनिक युगात मानवाने आपली ती आकांक्षा पूर्ण करून घेतली आहे. "To Fly " हा दुसरा चित्रपट त्याची संपूर्ण कहाणी समोर उभी करणारा होता. अगदी आरंभी बलूनला धरून वर जाण्यापासून तो आत्ताच्या जेट विमानापर्यंतचे सारे टप्पे त्यात दाखवले होते, आणि अखेर अतरिक्षात जाणारे अवकाशयान कसे विकसित होत गेले हे चित्रित करून त्या चित्रपटाचा धागा नासाच्या प्रदर्शनाशी आणून ठेवला होता. एक तास कोठे गेला ते कळलेही नाही. चित्रमंदिरातून बाहेर आल्यावर एखाद्या अद्‌भुत विश्वात फिरून आल्यासारखे वाटले. हे चित्रपट तयार करण्यासाठी केवढे परिश्रम घेतले असतील, असे मनात आल्याशिवाय राहिले नाही. या वर्षातच ज्याने या जगाचा निरोप घेतला त्या कार्ल सगानची ''कॉसमॉस '' ही विश्वाच्या स्वरूपाचा आणि निर्मितीचा वेध घेणारी मालिका जगातील लक्षावधी लोकांनी दूरदर्शनवर पाहिली, आणि ती अतिशय लोकप्रिय झाली होती, हे वृत्तपत्रांतून आपल्याला माहीत झाले आहे. त्याचीच अल्पशी छटा नासाच्या या प्रदर्शनात दृष्टीसमोर आली सारे काही पाहात असताना केवळ वेळ संपली म्हणून बाहेर पडलो आणि उपाहारगृहात चहा घेतला. अमेरिकेत ज्ञानाचा हा केवढा शोध घेतला जात आहे, असा विचार मनात तरळत होता.

## रशिया आणि अमेरिका

तीन दिवस मी वॉशिंग्टनमध्ये फिरत होतो. बरेच काही पाहावयाचे राहिले. पण लडनमध्ये पाहण्यासारखे कितीतरी राहून गेले होते. लंडनला ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टी अधिक आहेत. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्या नगरीला सहासातशे वर्षांचा लोकशाही राज्यपद्धती विकसित करण्याचा इतिहास आहे. शिवाय सुमारे दीडशे वर्षे ती ब्रिटिश साम्राज्याची राजधानी होती. अमेरिकेचा सारा इतिहासच मुळी पाचशे वर्षांचा आहे. त्यातील महत्त्वाचा कालखंड तिने स्वातंत्र्य प्राप्त केल्यापासून सुरू होतो. वॉशिग्टन आणि जेफर्सन यांनी या राष्ट्राचा पाया घातला. तेथून पुढचा इतिहास केवळ दोनशेवीस वर्षांचा. गुलामगिरी नष्ट करण्यासाठी अब्राहम लिंकनने दक्षिणेतील राज्याविरुद्ध केलेले युद्ध ही सर्वात संस्मरणीय घटना. तीमुळे अमेरिकेच्या इतिहासाला उदात्ततेचा एक स्पर्श झाला.

एका बाजूला पॅसिफिक तर दुसऱ्या बाजूला अटलांटिक महासागर. यामुळे युरोप वा आशिया यांतील संघर्षाच्या क्षेत्रापासून अमेरिका खूप दूर होती. या शतकाच्या दुसऱ्या दशकात झालेल्या महायुद्धापर्यंत अमेरिकेने आपले तटस्थपण जपले. त्यामुळे तिला एक वेगळी शोभा प्राप्त झाली. निसर्गसंपत्ती भरपूर, त्यामुळे तिला कोणांवर अवलंबून राहण्याचे कारण नव्हते. दोन माणसांमागे एक गाडी असावी एवढी समृद्धी आज तेथे आहे. जगातील सर्वात समृद्ध आणि ज्ञानसंपन्न असा हा एक प्रचंड देश आहे. जर्मनी किंवा दक्षिण कोरिया ही राष्ट्रे काही क्षेत्रांत अमेरिकेहून काहीशी प्रगत असतील. पण सर्वांगीण विचार केला, तर अमेरिका फार पुढे आहे. शिवाय लोकसंख्येने तो जगात तिसऱ्या क्रमाकाचा देश आहे. दुसऱ्या महायुद्धातही अमेरिका काहीशी अनिच्छेने पडली, किंवा असेही म्हणता येईल की ती त्या संग्रामात खेचली गेली. पण नाझी भस्मासुराचा अंत अमेरिकेच्या साहाय्यामुळे झाला, आणि जपानी हुकूमशाहीला अखेर शरणागती पत्करावी लागली, तीही अमेरिकेच्या अणुस्फोटकांमुळे.

हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरांत अणुस्फोटकांमुळे एका आठवड्याच्या अवधीत जो प्रचंड नरसंहार झाला, तो अंगावर काटा आणणारा आहे यात शंका नाही. पण जर ते पाऊल उचलले नसते, तर जपानच्या क्रूर लष्करी सत्तेने किती बळी घेतले असते, याचा तर्क करणे अवघड नाही. हिटलर आणि स्टालिन या दोघांच्या हुकूमशाहीमुळे जवळजवळ दोन कोटी लोकांचा संहार झाला, आणि तो त्यांच्या हातात अणुस्फोटकाचे भयानक शस्त्र नसताना. ते शस्त्र वापरल्याबद्दल अमेरिकेला कोणी कोणी दोष देतात. पण असा दोष देणे सोपे आहे. तो दोष देण्यासाठी आपण आज जिवत आहोत, किंवा विचारस्वातंत्र्याचा उपभोग घेतो आहोत, याचे श्रेय त्या अणुस्फोटकाचा शोध लावणाऱ्या वैज्ञानिकाना आणि ते कठोरपणे वापरणाऱ्या अमेरिकेला आहे. शांततेचा भोक्ता असलेला सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञ आइनस्टाइन,

त्याला अणुस्फोटकामुळे झालेल्या प्रचंड संहाराचे अतिशय दुःख झाले. तो शोध घेण्याचा सल्ला त्यानेच दिला होता, याचा विसर पडता कामा नये. अणुस्फोटकाचा वापर करण्यापूर्वी अमेरिकेने जपानला इशारा दिला होता, हेही ध्यानात घ्यावयास हवे. जपानला ती केवळ धमकी वाटली असणार.

पण दुसऱ्या महायुद्धानतर अमेरिकेची दृष्टी पूर्वीइतकी तटस्थ राहिली आहे असे म्हणवत नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर रशिया आणि अमेरिका या दोन महासत्ता उदयास आल्या. साम्राज्याची भरजरी वस्त्रे अंगावरून उतरल्यावर इंग्लंडचा प्रभाव हळूहळू ओसरत गेला. जर्मनी पराभूत झाला होता, आणि पॅरिसची रात्र हीच फ्रान्सच्या दिमाखाची गोष्ट होऊन गेली होती. रशियाची परंपरा हुकूमशाहीची होती, अमेरिका लोकशाहीच्या रक्षणार्थ बद्धपरिकर होती. एक भांडवलशाही राष्ट्र म्हणून पिळवणूक करणारे, आणि दुसरे श्रमिकांची सत्ता साऱ्या जगात प्रस्थापित करण्यासाठी वचनबद्ध असलेले, हे या दोन राष्ट्रांचे वर्णन साम्यवादाचा पुरस्कार करणाऱ्यांच्या दृष्टीने मोठे विलोभनीय होते. जगातील भलेभले बुद्धिमंत सुमारे अर्धशतक त्या स्वप्नात रमत राहिले व अखेर फसले, हा गेल्या पंचाहत्तर वर्षांच्या इतिहासाचा परिपाक आहे. जे कोणी फसले त्यांना दोष देण्याचे थोडेसेही कारण नाही. त्यांनी एका उदात्त ध्येयाच्या पूर्तीसाठी श्रद्धा ठेवली, पण पोलादी पडद्याआड काय चालले आहे ते साफ खोट्या प्रचाराच्या डोळे दिपवणाऱ्या रोषणाईमुळे कोणाच्या ध्यानात आले नाही. ज्यांनी विश्वास ठेवला त्यांची वंचना झाली, हे त्यांचे दुर्दैव.

पण अशा या रशियाचे प्रभुत्व जगात वाढू नये व अखेर तो अजिंक्य ठरण्याचा धोका उत्पन्न होऊ नये, यासाठी अमेरिकेला सतत दक्ष राहावे लागले. शीतयुद्धाच्या प्रदीर्घ कालावधीत ती तशी दक्ष राहिली, हादेखील तिचा लोकशाही मानणाऱ्या राष्ट्रांवर एक उपकारच आहे. ते ऋण विसरता येत नाही. याचे परमोत्कर्षाचे नाट्य घडले ते १९६२-मध्ये. क्यूबाचा सत्ताधीश फिडेल कॅस्ट्रो साम्यवादी होता. स्तालिनच्या तुलनेने निकिता क्रुश्चेव्ह कितीतरी सौम्य होता हे खरे असले, तरी अमेरिकेचे प्रभुत्व कमी करण्याची आकांक्षा त्याला होतीच. त्याने स्तालिनची पापे उघडकीस आणली, पण साम्यवाद आणि त्याची जणू सहचरी असावी अशी हुकूमशाही हा वारसा त्याने पुरतेपणाने बाजूला ठेवला नाही. जवळजवळ वीस वर्षे उलटावी लागली, आणि गोर्बाचेव्हने सारे नंगे सत्य जगासमोर ठेवले. त्याआधी कोसिजिन व त्याच्याही आधी क्रुश्चेव्ह यांचे लक्ष्य जगावर प्रभुत्व मिळवण्याचे होते, आणि निरनिराळ्या देशांतील साम्यवादी पक्ष आपल्या बोटाच्या तालावर नाचावेत, अशीच त्यांची विचारसरणी होती. क्षेपणास्त्रांचे प्रकार आणि त्यांचा पल्ला विज्ञानाच्या नव्या शोधांमुळे अधिक भयकारक होत गेला. क्यूबामध्ये क्षेपणास्त्रांचे तळ उभे करण्याचा पवित्रा रशियाने टाकला. यातील धोका अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष

जॉन केनेडी याने बरोबर ओळखला.

रशियातून क्षेपणास्त्रे सुटली, तर अमेरिकेला प्रतिकारासाठी सिद्ध होण्याकरिता पंधरा मिनिटांचा अवधी मिळत होता. क्यूबामध्ये क्षेपणास्त्रे उभी राहिली तर हा अवधी दोन मिनिटांवर येणार होता. वेळीच प्रतिकाराचे पाऊल उचलले पाहिजे हे केनेडीने ओळखले. क्रुश्चेव्हला सख्त इशारा दिला गेला की, क्यूबात तळ तर उभारता येणार नाहीच, पण तेथे पोचलेली क्षेपणास्त्रेही रशियाने काढून घ्यावीत. क्यूबाची सागरी नाकेबंदी करण्यात आली. पुन्हा महायुद्ध भडकणार की काय, या आशंकेने भयभीत झालेले सारे जग चार दिवस प्राण डोळ्यांत आणून काय होत आहे व होऊ शकेल याकडे पाहात होते. कारण काहीही असो, क्रुश्चेव्हने उचललेले पाऊल मागे घेतले, आणि साऱ्या जगाने सुटकेचा निःश्वास टाकला.

तरुण आणि तडफदार अशा केनेडीचे नाव साऱ्या जगात झाले. केनेडी हे एक उमदे आणि चैतन्यशील व्यक्तिमत्त्व होते. जगातील इतर सर्व राष्ट्रांचे नेते वयाने ज्येष्ठ आणि अनुभवाने मोठे होते. पण तरी सर्वजण केनेडींमुळे काही काळ प्रभावित होऊन गेले. केनेडीहून जवाहरलाल पंचवीस वर्षांनी मोठे असावेत. जगातील साऱ्या नामवंत व्यक्ती त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. पण त्यांनाही केनेडीने भारून टाकले. वॉशिंग्टनमधील व्हाइट हाउसच्या उद्यानातून केनेडी आणि जवाहरलाल हे दोघे एकमेकांशी बोलत फेरफटका करीत असतानाचे त्यांचे एक छायाचित्र त्या वेळी वृत्तपत्रांतून आले होते. दोघांनाही परस्परांबद्दल एक प्रकारचे आकर्षण वाटले, हे दिसत होते. पण १९६३-च्या नोव्हेंबर महिन्यात केनेडीचा खून झाला, आणि सारे जग हादरून गेले. हा खून जेथे झाला त्या डलासला मी वॉशिंग्टनहून पुन्हा गेलो. ही नंतरची भेट दोन दिवसांची झाली.

## प्रगती आणि कार्यक्षमता

वॉशिंग्टन पाहताना मला सुहास आणि त्याची एंजिनियर असलेली पत्नी वैशाली यांची सतत सोबत मिळाली, आणि सारे फिरणे केवळ आनंदपूर्ण होऊन गेले. वॉशिंग्टनमध्ये लंडनप्रमाणेच उत्कृष्ट भुयारी लोहमार्ग आहे. तो काही ठिकाणी जमिनीत शंभरसव्वाशे फुटांहून अधिक खोल पोचला आहे. यंत्रावर चालणारे फिरते जिने तर सर्वत्रच आहेत. एका स्थानकावर उतरून वर येईतो एकशे अठ्ठेचाळीस पायऱ्यांचे अंतर कापले. सुधारणा किती पुढे गेली आहे त्याची हीदेखील एक खूणच आहे. वैज्ञानिक दृष्टीने जे म्हणून अत्याधुनिक आहे, त्या सर्वांची प्रचीती वॉशिंग्टनच्या तीन दिवसांच्या वास्तव्यात घेतली. सतरा ऑक्टोबरला सकाळी पावणेदहाला निघालेले विमान मला डलास फोर्टवर्थ या विमानतळावर घेऊन आले, आणि रेखाताई मला गाडीतून घरी घेऊन गेल्या. संध्याकाळी प्रकाश राव यांच्याबरोबर शेजारच्या एका उद्यानात

तासभर फेरी टाकून आलो. सुरेख नीटस बाग, हिरवळ आणि झाडे. रेखीव पायवाट. सर्वत्र शांतता. माणसांची वर्दळ फार कमी. मोठ्या शहरांत वास्तव्य असले, तरी निवासी भागात अमेरिकेतील सर्व शहरांतून शांततेचा आनंद घेता येतो.

दुसरे दिवशी सकाळी मुकुंद जोगळेकर हे रेखाताईचे एक मित्र आले. मला डलास दाखवण्याची जबाबदारी त्यांनी त्यांच्यावर सोपवली होती. डलास खूप पसरलेले शहर आहे. डलासचा भाग वेगळा, फोर्टवर्थचा वेगळा. दोन्ही जवळ जवळ आहेत. दोहोच्या मध्यावर म्हणता येईल असा विमानतळ. विमानतळाच्या आसपास वस्ती असून चालतच नाही. त्यामुळे मोकळा परिसर खूप विस्तीर्ण. सर्वत्र जाणारे महामार्ग. त्यांवरून आपली गाडी चाललेली असते. सारा मिळून तीसचाळीस मैलांचा फेरफटका सहज झाला. अमेरिकेतील शहरांमधून बँका, बाजारपेठ, प्रचंड दुकाने, शासकीय विभागांची कार्यालये, नगरपरिषदांची सार्वजनिक सभागृहे, ग्रंथालये किंवा वस्तुसंग्रहालये, निरनिराळ्या व्यापारी मंडळांची कार्यालये, आलीशान पंचतारांकित विश्रामगृहे, अशा साऱ्या सार्वजनिक उलाढाली चालत असलेला जो भाग असतो, त्याला डाउन टाऊन एरिया असे म्हटले जाते. या भागांतून सर्वत्र तीसचाळीस मजले असलेल्या इमारती असतात. आकाशाचा वेध घेत जाणारी एखादी उंच इमारत आपले लक्ष वेधून घेते हे खरे. इमारती उभ्या करण्याचे शास्त्र किती पुढे गेले आहे, हे त्यामुळे कळते. येथवर ठीक वाटते. पण वीसवीस मजली इमारती एखाद्या भागात उभ्या राहिल्या, तर मधला रस्ता शंभर फूट रुंद असला, तरी तो अरुंद वाटतो. अनेक कामांची माणसे एकत्र गोळा झाल्यामुळे गर्दी वाढते, आणि प्रत्येकाजवळ गाडी असली तरी ती उभी कोठे करावयाची हा प्रश्न पडतो. एकेका मजल्यावर सत्तरऐंशी गाड्या उभ्या करण्याची सोय आणि असे एकावर एक चारपाच मजले, अशा विस्तृत इमारती केवळ गाड्या उभ्या करण्यासाठी मोठ्या शहरांमधून बांधलेल्या आहेत. त्या रांगांमधून गाडी सहज बाहेर काढता येईल एवढी मुबलक जागा तेथे मोकळी सोडलेली असते. या सोयीचे व त्यातील व्यवस्थितपणाचे कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही. पण अशा ठिकाणीही काही वेळा गाडी उभी करण्यास जागा मिळत नाही. वॉशिंग्टनला विमानतळावर पोचवण्यासाठी सुहास आला होता, गाड्यांच्या रांगांमागून रांगा लागल्या होत्या. गाडी उभी करण्यासाठी जागा शोधण्यात जवळजवळ पंधरा मिनिटे वेळ गेला. त्या त्या ठिकाणी जागा कोठे मिळेल हे दाखवणारा रखवालदार असतो.

एवढ्या सर्व सुविधा असूनही जेथे प्रचंड प्रमाणावर माणसांची सतत येजा चालू असते, तेथे जाताना हाताशी वेळ ठेवून निघावे लागते. मोठमोठ्या शहरांचे विमानतळ एवढे प्रचंड आहेत की, त्यांचा विस्तार पाहताना डोळे फिरून जातात. सत्तरसत्तर-ऐशीऐंशी विमाने आकाशात झेपावण्यासाठी उभी राहू शकतात, एवढे विमानतळ आहेत. आपल्याकडे पुणे वा

मुंबई, किंवा दिल्ली वा कलकत्ता, अशा मोठ्या शहरांतून निरनिराळ्या ठिकाणी जाणाऱ्या राज्य परिवहन मंडळाच्या अनेक गाड्या स्थानकावर उभ्या असतात. त्याहून अधिक विमाने अमेरिकेतील पाचपंचवीस शहरांतून तरी विमानतळावर उभी असतात. डलासच्या विमानतळावर दिवसाच्या चोवीस तासांत येणाऱ्या आणि जाणाऱ्या विमानांची संख्या सहाशेच्या आसपास आहे. जंबो जेट विमान असले तर त्याचे ते दोन बांजूचे लांबच लांब पंख, तीनशेचारशे उतारू बसण्याची व त्या सर्वांचे सामान ठेवण्याची मधली जागा, आणि मागच्या बाजूला असलेला शेपटासारखा भाग डोळ्यांसमोर आणला, तर एवढे हे प्रचंड वाहन डावीकडे वा उजवीकडे वळताना केवढी जागा लागत असेल, त्याची मनाशी कल्पनाच करावयास हवी.

अशा विमानतळावरील यंत्रणाही तशीच मोठी असते, आणि ती सुसूत्रपणे चालण्यासाठी माणसांची कार्यक्षमताही फार वरच्या दर्जाची असावी लागते. आधुनिक यांत्रिक साधने हाताळण्यातील कुशलता असणारा, आणि सांघिक शिस्तीने आपले काम तत्परतेने व बिनचूक करणारा कर्मचारीवर्ग असावा लागतो. यंत्रे ही अखेर जड साधने आहेत, पण ती हाताळणारा अखेर माणूस आहे. त्याच्या कार्यक्षमतेवर अखेर सारे सुरळीत चालणे शक्य आहे. समाजाच्या सर्व प्रकारच्या व्यवहारांतील प्रत्येक टप्प्यावर आढळणारी शिस्त आणि कर्तव्यतत्परता हादेखील एक सुसंस्कृतपणाचा भाग आहे. या सुसंस्कृतपणाचे दर्शन पाश्चात्त्य देशांत सर्वत्र घडते. या सर्व सुधारणा पुढील पंचवीसतीस वर्षांत आपल्या देशात येणार आहेत. त्यांना पुरी पडेल अशी समाजव्यवहारातील शिस्त आणि जबाबदारीची जाणीव कशी उत्पन्न करता येईल, हा खरा प्रश्न आहे. शिक्षणपद्धती कालाला अनुरूप करण्यापासून शासकीय यंत्रणेचे भाग चोखपणे चालतील हे पाहण्यापर्यंत सर्वत्र गुणवत्ता वाढणे आवश्यक आहे. काळाचे आह्वान हे आहे, आणि आपल्या राष्ट्रीय चारित्र्याची लक्तरे रोज वृत्तपत्रांच्या चव्हाट्यावर धुतली जाताना आपण पाहात आहोत. ही दरी कशी आणि कधी भरून येणार?

## केनेडीचा अंतिम क्षण

मुकुंद जोगळेकर यांनी मला शहराच्या काही भागांतून फिरवले. गजबजलेल्या व्यापारी व कार्यालयांच्या भागातून त्यांची गाडी गेली. हे दृश्य अर्थात सगळीकडे सारखेच असते. दुपारचे जेवण उपाहारगृहात घेतले. तोही एक देश पाहण्याचाच भाग असतो. डलासमध्ये जेथे नाना प्रकारांनी पाणी खेळवलेले आहे, असे एक स्थान होते. नगरपालिकेचे एखादे उद्यान असते, तसे जललहरींचा विलास दाखवणारे नाना प्रकार तेथे होते. पाटांतून सरळ वाटेने वा बाकदार वळण घेऊन जाणारे पाणी, झुळझुळता पडदा असावा तसे उंच भिंतीवरून खाली उतरत असलेले पाणी, कोठे मोठा डोह म्हणावा असा खोल हौद, कोठे धबधब्यासारखे

कोसळणारे पाणी, पाण्याखाली तळाशी असलेल्या भूभागाला निरनिराळे आकार दिल्यामुळे त्यांवरून जाणाऱ्या पाण्याला येणारे अनेक आकार, असे नाना प्रकार तेथे निर्माण केले होते. या सर्वांमधून खाली, वर, वा इकडे-तिकडे फिरण्यासाठी रुंद भिंतीवरच्या वाटा होत्या. अंगावर पाण्याचे बारीक तुषार उडण्यातील आनंदही घेता आला.

ज्या ठिकाणी १९६३-च्या नोव्हेंबर महिन्यात जॉन केनेडीचा खून झाला, त्या जागेवर आम्ही पोचलो प्रचंड बाजारपेठेतील उंच उंच इमारतीचा भाग संपतो, आणि त्या गर्दीतून मोकळया वाऱ्यावरील भल्यामोठ्या चौकातील किंचित उताराच्या एका रस्त्यावर जेथे केनेडीला गोळ्या लागल्या, ती जागा नेमकी दाखवली जाते. सारे जग हादरून टाकणारी ही घटना आपल्या पिढीने पाहिली आहे. राष्ट्राराष्ट्रातील चुरस आणि शत्रुत्व कितीही असो, पण या तरुण, उत्साही आणि चैतन्यशील व्यक्तिमत्त्वाचा अकाली झालेला असा अंत साऱ्या जगातील लोकांना चटका लावून गेला. या हत्येच्या स्थानाच्या आसपास भरपूर मोकळी जागा आहे वळणाच्या कोपऱ्यावर एक सहा मजली उंच इमारत उभी आहे. तिच्या शेवटच्या मजल्यावरून केनेडीवर गोळ्या झाडण्यात आल्या. केनेडी राष्ट्राध्यक्ष, सुरक्षा व्यवस्था उत्कृष्ट, अध्यक्षांच्या गाडीच्या मागेपुढे अनेक शासकीय अधिकाऱ्यांच्या गाड्या, असा हा ताफा भल्या रुंद रस्त्यावरून चालला असताना धावत्या गाडीतील केनेडीवर साठसत्तर फूट उंचीवरून नेमकी गोळी घातली गेली, त्यासाठी वापरलेली बंदूक केवढी अव्वल दर्जाची असली पाहिजे, असे मनात आले. त्या इमारतीचे रक्षण केले आहे आणि सहाव्या मजल्यावर या घटनेचा इत्थंभूत इतिहास डोळ्यांसमोर उभे करणारे प्रदर्शन आहे. ते सावकाशपणे पाहिले.

या हत्येचा सारा वृत्तांत वृत्तपत्रांतून वाचला होता. तो सारा येथील अनेक छायाचित्रांमुळे डोळ्यांसमोर पुन्हा उभा राहिला. जेथून गोळी झाडली गेली ती खिडकी, तिच्या आसपासचा भाग, गोळ्या झाडण्यासाठी उभे राहण्याकरिता ओस्वाल्डने एकावर एक रचलेली पुस्तकांची खोकी, त्यांच्या आजूबाजूस विखुरलेल्या तशाच काही वस्तू, हे सारे काही जसेच्या तसे ठेवलेले आहे. ते आपण काचेतून पाहू शकतो. ज्या खिडकीतून गोळी झाडली ती भिंतीतून काढून घेऊन त्या दालनात मध्यभागी एका काचेच्या कपाटात मुद्दाम उभी करून ठेवली आहे. या खुनानंतर निरनिराळ्या वृत्तपत्रांतून आलेल्या वार्तांची कात्रणे भिंतीवरून लावलेली आहेत. केनेडीचा जीवनपट, आणि त्याच्या मृत्यूनंतर व्यक्त झालेल्या जगातील राजकीय नेत्यांच्या आणि नामवंत व्यक्तींच्या प्रतिक्रिया नोंदवलेल्या आहेत. ज्याने खून केला त्या ओस्वाल्डला पोलीस न्यायालयात घेऊन चालले होते. उद्वाहकातून बाहेर पडत असतानाच तो मारला गेला. अमेरिकेतील गुप्तचरविभाग अत्यंत प्रगत, सर्व साधने हाताशी असलेला. पण केनेडी आणि ओस्वाल्ड या दोघांच्याही खुनांमागे नेमके कोण होते, याचा छडा आजपर्यंत लागलेला

कोसळणारे पाणी, पाण्याखाली तळाशी असलेल्या भूभागाला निरनिराळे आकार दिल्यामुळे त्यांवरून जाणाऱ्या पाण्याला येणारे अनेक आकार, असे नाना प्रकार तेथे निर्माण केले होते. या सर्वांमधून खाली, वर, वा इकडे-तिकडे फिरण्यासाठी रुंद भितीवरच्या वाटा होत्या. अंगावर पाण्याचे बारीक तुषार उडण्यातील आनंदही घेता आला.

ज्या ठिकाणी १९६३-च्या नोव्हेंबर महिन्यात जॉन केनेडीचा खून झाला, त्या जागेवर आम्ही पोचलो. प्रचंड बाजारपेठेतील उंच उंच इमारतींचा भाग संपतो, आणि त्या गर्दीतून मोकळ्या वाऱ्यावरील भल्यामोठ्या चौकातील किंचित उताराच्या एका रस्त्यावर जेथे केनेडीला गोळ्या लागल्या, ती जागा नेमकी दाखवली जाते. सारे जग हादरून टाकणारी ही घटना आपल्या पिढीने पाहिली आहे. राष्ट्राराष्ट्रांतील चुरस आणि शत्रुत्व कितीही असो, पण या तरुण, उत्साही आणि चैतन्यशील व्यक्तिमत्त्वाचा अकाली झालेला असा अंत साऱ्या जगातील लोकांना चटका लावून गेला. या हत्येच्या स्थानाच्या आसपास भरपूर मोकळी जागा आहे. वळणाच्या कोपऱ्यावर एक सहा मजली उंच इमारत उभी आहे. तिच्या शेवटच्या मजल्यावरून केनेडीवर गोळ्या झाडण्यात आल्या. केनेडी राष्ट्राध्यक्ष, सुरक्षा व्यवस्था उत्कृष्ट, अध्यक्षांच्या गाडीच्या मागेपुढे अनेक शासकीय अधिकाऱ्यांच्या गाड्या, असा हा ताफा भल्या रुंद रस्त्यावरून चालला असताना धावत्या गाडीतील केनेडीवर साठसत्तर फूट उंचीवरून नेमकी गोळी घातली गेली, त्यासाठी वापरलेली बंदूक केवढी अव्वल दर्जाची असली पाहिजे, असे मनात आले. त्या इमारतीचे रक्षण केले आहे आणि सहाव्या मजल्यावर या घटनेचा इत्थंभूत इतिहास डोळ्यांसमोर उभे करणारे प्रदर्शन आहे. ते सावकाशपणे पाहिले.

या हत्येचा सारा वृत्तांत वृत्तपत्रांतून वाचला होता. तो सारा येथील अनेक छायाचित्रांमुळे डोळ्यांसमोर पुन्हा उभा राहिला. जेथून गोळी झाडली गेली ती खिडकी, तिच्या आसपासचा भाग, गोळ्या झाडण्यासाठी उभे राहण्याकरिता ओस्वाल्डने एकावर एक रचलेली पुस्तकांची खोकी, त्यांच्या आजूबाजूस विखुरलेल्या तशाच काही वस्तू, हे सारे काही जसेच्या तसे ठेवलेले आहे. ते आपण काचेतून पाहू शकतो. ज्या खिडकीतून गोळी झाडली ती भिंतीतून काढून घेऊन त्या दालनात मध्यभागी एका काचेच्या कपाटात मुद्दाम उभी करून ठेवली आहे. या खुनानंतर निरनिराळ्या वृत्तपत्रांतून आलेल्या वार्तांची कात्रणे भिंतीवरून लावलेली आहेत. केनेडीचा जीवनपट, आणि त्याच्या मृत्यूनंतर व्यक्त झालेल्या जगातील राजकीय नेत्यांच्या आणि नामवंत व्यक्तींच्या प्रतिक्रिया नोंदवलेल्या आहेत. ज्याने खून केला त्या ओस्वाल्डला पोलीस न्यायालयात घेऊन चालले होते. उद्वाहकातून बाहेर पडत असतानाच तो मारला गेला. अमेरिकेतील गुप्तचरविभाग अत्यंत प्रगत, सर्व साधने हाताशी असलेला. पण केनेडी आणि ओस्वाल्ड या दोघांच्याही खुनामागे नेमके कोण होते, याचा छडा आजपर्यंत लागलेला

नाही, हे एक आश्चर्य आहे. या उमद्या मनाच्या तरुण राष्ट्राध्यक्षाचे एवढे शत्रुत्व कोणाच्या मनात असेल, याचा काहीही तर्क करता आलेला नाही, हे त्या प्रदर्शनात दीड तास फिरून सारा मजकूर डोळ्यांखालून घातल्यावर ध्यानात आले. चारपाच ठिकाणी दूरदर्शनचे संच होते. बटन दाबले की, त्या वेळी घडलेल्या घटनांचे छायाचित्रित केलेले भाग पाहावयास मिळत होते. त्या सहाव्या मजल्यावर आमच्यासारखे बरेच जण ते प्रदर्शन पाहात होते.

केनेडीची अंत्ययात्रा भव्य होती. अंत्यसंस्काराचा सारा कार्यक्रम सरकारी इतमामाने, अत्यंत शिस्तीत, आणि तेवढ्याच गांभीर्याने पार पडला. हे सारे त्याच वेळी चित्रपटाच्या आधी दाखवल्या जाणाऱ्या एका छोट्या लघुपटात पाहिले होते. जगातील अनेक राष्ट्रप्रमुख अंत्यसंस्काराला उपस्थित होते. जॅकेलिन केनेडी आपल्या चारपाच वर्षाच्या मुलाला जवळ घेऊन उभी होती. केनेडीची शवपेटिका भूमीत उतरवली जाण्याच्या क्षणी जॅकेलिनने आपल्या छोट्या मुलाला हळूच सांगितल्यावर आपला चिमुकला हात वर करून त्याने आपल्या वडिलांना अखेरचा निरोप दिला. आपले नेमके काय हरपले आहे हे त्या निरागस बालकाला काय कळणार? पण त्याचा तो उंचावलेला हात हलत असलेला बातमीपटात पडद्यावर पाहताना प्रेक्षकांची मने हेलावून गेली. तेहतीस वर्षांपूर्वी एक भीषण आणि महत्त्वाची घटना जेथे घडली, ती जागा व त्या घटनेचे सारे तपशील डोळ्यांखालून घातले, आणि ते मनात घोळवीत मी त्या सहाव्या मजल्यावरून खाली उतरलो.

मुकुंद जोगळेकर बावीसतेवीस वर्षे डलासमध्ये आहेत. त्याना भारताचा अभिमान आहे, आणि अमेरिकेचे आकर्षण नाही. येथील जीवनाचा त्यांचा प्रदीर्घ कालाचा अनुभव आहे. अशा अनेक व्यक्ती अमेरिकेत भेटत होत्या, आणि त्यांच्याशी चर्चा करताना रशियाच्या आक्रमकतेला पायबंद घालण्याचे मोलाचे काम अमेरिकेने केले असले, तरी आता तिच्या अप्रत्यक्ष आक्रमकतेस पायबंद कोण घालेल, अशी चिंता कोणाकोणाच्या बोलण्यात व्यक्त होत असे. जगाच्या राजकीय मंचावर जे काही घडत असते त्यातील सारे सत्य लोकांसमोर कधी येत नसते, याची अनेकांना जाण आहे. मनुष्य कितीही सुसंस्कृत असला, तरी इतरांवर प्रभुत्व गाजवण्याची आकांक्षा त्याला साहजिक असते. ती वावगी म्हणता येत नाही. अशी व्यक्ती केवळ ज्ञानाच्या, शास्त्रीय संशोधनाच्या वा एखाद्या सांस्कृतिक कार्याच्या क्षेत्रात असेल, तर ते तिचे रूप कोणाला धोकादायक होत नाही. पण अशी प्रभुत्वाकांक्षी व्यक्ती एखाद्या राष्ट्राची प्रमुख असेल, आणि तिच्या हाताशी अमाप साधने असतील तर? जगात ज्या अनेक राजकीय घटना घडतात, त्यांमागे कोणातरी व्यक्तीची महत्त्वाकांक्षा असते आणि तिची दृष्टी प्राधान्याने आपल्या राष्ट्राच्या स्वार्थावर असते. त्यासाठी इतर राष्ट्रांतील अनेक जीवांची विनाकारण हत्या झाली, हजारो संसार उद्ध्वस्त झाले, किंवा अनेकांच्या कपाळी

वनवास आले, तरी त्याची फिकीर कोणत्याही राष्ट्रांचे प्रमुख करीत नाहीत. राष्ट्रवाद हा मोठा घातक आहे, असे मत यामुळेच टॉलस्टॉयसारख्या अनेक मोठमोठ्या विचारवंतांनी व्यक्त केले आहे.

संपूर्ण मानवजातीचे हित, सर्वांचे कल्याण, आणि शांततेची आवश्यकता, या गोष्टी केवळ स्वतःच्या राष्ट्राचा विचार करणाऱ्या सत्ताधीशांच्या लेखी विचारात घेण्यासारख्या नसतात. मग केवळ आपल्या देशाची आर्थिक सुबत्ता वाढावी, जगातील आर्थिक व्यवहाराच्या नाड्या आपल्या हातात असाव्यात, आणि इतर राष्ट्रे आपली जणू आश्रित असावीत, अशी पिपासा उत्पन्न होते. बंधुभाव वा सहानुभूती यांचे क्षेत्र स्वतःच्या देशापुरते मर्यादित राहते. इतर देशांवर आपले प्रभुत्व निर्माण व्हावे, यासाठी त्यांच्यांत कलह निर्माण होतील अशी पद्धतशीर व्यवस्था केली जाते. दोन राष्ट्रांत युद्ध उत्पन्न व्हावे व ती दोन्ही कमजोर होऊन जावीत, अशी पावले टाकली जातात. आपण नव्या हत्यारांचा शोध लावला आहे. आता जुन्या हत्यारांचे काय करावयाचे? शस्त्रास्त्रांचे कारखाने आपल्या देशात आहेत. त्यांना गिऱ्हाईक मिळावयास हवे. मग कोठेतरी युद्ध जुंपले तर बरे. मग त्यात हजारांनी माणसे मृत्युमुखी पडली तरी त्याची पर्वा उरत नाही. आपली हत्यारे खपल्याशी कारण. केवढा निर्घृण असा हा स्वार्थ आहे! असा हा भयानक आणि संहारक स्वरूपाचा स्वार्थ आज जगातील राजकारणामध्ये परवलीचा शब्द झाला आहे. ज्यांना संधी मिळत नाही, तेवढेच यापासून मुक्त आहेत.

बलवान राष्ट्रे तर या स्वार्थाने झपाटलेली आहेत. करुणा, उदारता, उदात्तता, किंवा मानवाचे कल्याण साधण्याची आकांक्षा, या भावना काही संतप्रवृत्तीच्या व्यक्तींपुरत्या मर्यादित आहेत. जगाचा राजकीय बाजार केवळ सत्ताकांक्षेच्या चलनी नाण्यावर चाललेला आहे. वॉशिंग्टन, जेफर्सन, आणि लिंकन या नावांशी अमेरिकेतील उदात्तचरित सत्ताधीशांची यादी समाप्त होते. पहिल्या महायुद्धापर्यंत अमेरिका निदान संहाराकडे घेऊन जाणाऱ्या आकांक्षेपासून दूर होती. या संहारात्मक व्यापात ती दोन्ही महायुद्धांत बऱ्याच प्रमाणात ओढली गेली. पण असे वाटते की, गेल्या पन्नास वर्षांत अमेरिकेची जी पावले पडत आहेत, ती स्तालिन किंवा हिटलर यांच्याइतकी नृशंस नसतील, पण ती निखळ न्यायाकडे झुकणारीही नाहीत. ही सत्ताकांक्षा अमेरिकेला भविष्यकाळात कोणत्या दिशेला घेऊन जाईल हे सांगवत नाही. भारताला निवांतपणाने प्रगती करता येऊ नये, यावर ती लक्ष ठेवून आहे, आणि सर्वांना आपल्या बोटांवर नाचवू पाहात आहे. अण्वस्त्रबंदी करारापासून तो भारत-पाकिस्तान वादात विशिष्ट भूमिका घेण्यापर्यंत सर्वत्र हे जाणवल्याशिवाय राहात नाही.

## सी आय ए आणि जागतिक शांतता

अमेरिकेत एक फार चांगली गोष्ट आहे. दैनंदिन शासकीय व्यवहारांपासून तो विज्ञानातील नवनवीन शोधांपर्यंत हरएक घटनेतील वरवर दिसणारे सत्य आणि त्यामागे लपून असलेले सत्य यांचा छडा लावण्याची प्रवृत्ती असणारा बुद्धिवंतांचा एक निष्ठावत वर्ग तेथे सतत कार्यरत असतो. स्वतःच्या देशाचे वैभव वा अभिमान यांमुळे या विचारवंतांची दृष्टी अंध झालेली नसते. ते घेत असलेल्या शोधामागे एक तटस्थ भूमिका असते, मनाची निकोप धारणा असते, आणि इतर देशांतील नागरिकांच्या भल्याचीही काही चिंता असते. एखादा सामान्य पत्रकारही या दृष्टीने केवढे अद्भुत काम करून जातो, हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्यावर रीतसर महाभियोग चालवला जाऊन त्यांना पदत्याग करावा लागला, या घटनेत दिसते. जनार्दन ठाकूर यांनी " All the Prime Ministers' Men" या आपल्या पुस्तकात इंदिरा गांधीच्या आणीबाणीच्या कालखंडातील व त्याआधीच्या काळातील राजकीय हालचालीवर प्रखर प्रकाशझोत टाकला होता, त्याची येथे आठवण होते. अमेरिकेचे आजचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्यावर नुकताच एका महिलेने त्यांनी आपला लैंगिक छळ केल्याच्या आरोपावरून खटला भरला आहे. छळाची घटना काही वर्षापूर्वीची आहे आणि ती महिला आरोपाच्या समर्थनासाठी आपला पुरावा नेमक्या कोणत्या प्रकारे सादर करू शकेल ते ध्यानात येत नाही, किवा यातील सत्य काय आणि असत्य काय याचा तर्क करण्यास आज तरी आपल्यासमोर काही मार्ग नाही. पण महत्त्वाची गोष्ट आहे ती ही की, हा खटला दाखल करून घेऊ नये, असा क्लिंटनने केलेला अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. राष्ट्राध्यक्षांविरुद्ध एक महिला उभी राहते आणि तिने केलेला दावा तपासून पाहण्यास न्यायालय तयार आहे, ही यातील खरी शोभादायक बाजू आहे, मग उद्या खटल्यातून काहीही निष्पन्न होवो

पण हे सारे म्हणत असताना आणि अशी सारी न्यायाची प्रक्रिया चाललेली पाहताना हे विसरता येत नाही की, वर्तमानकाळापुरते जे काही समोर येत असते ते सारेच सत्य असते असे नाही. त्यासाठी काही वर्षे वाट पाहावी लागते आणि तोवर बरेच भलेबुरे घडून गेलेले असते. त्याचे दुष्परिणाम टळत नाहीत. राज्यशासनाला काही घटनांचे तपशील गुप्त ठेवावे लागतात. ते अपरिहार्य असते. त्या घटनांशी संबंधित अशी गोपनीय कागदपत्रे काही वर्षे उलटल्यावर कोणालाही उपलब्ध होतात. त्यांच्या आधारे आपल्या देशाच्या नेत्यांनी त्या त्या वेळी उचललेली पावले योग्य होती का, याचा शोध काही विचारवंत घेऊ लागतात. अमेरिकेत हे काम मोठ्या कसोशीने केले जाते. या संदर्भात अलीकडेच तेथे उत्पन्न केला गेलेला एक नवा प्रश्न जागतिक शांतता आणि शास्त्रास्त्रांचा व्यापार या दृष्टीने फार बोलका आहे. सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी ही अमेरिकन शासनाची गुप्त हेर यत्रणा रशियातील

केजीबी, तशीच ही अमेरिकेतील सीआयए. परकी शत्रू किंवा स्वदेशातील कोणीकोणी घातकी यांच्या कारवायांपासून शासनयंत्रणा व देशातील जनता यांना धोका पोचू नये, हा या संस्थेचा मूळ हेतू होता प्रत्येक देशातच अशी एखादी यंत्रणा असते आणि ती आवश्यक असते. आपल्या भारतातही सी बी आय आहे आणि तिच्या कामावर खुद्द पंतप्रधानांचे नियंत्रण असते. पण गोपनीयतेचे कवच लाभलेल्या व केवळ राष्ट्रप्रमुखाच्या आदेशानुसार काम करणाऱ्या या संस्था आपल्या हालचालीची न्यायाधिष्ठित अशी रास्त मर्यादा ओलांडू शकतात आणि त्यातून इतर राष्ट्रांवर भीषण आपत्ती ओढवतात. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा किंवा जागतिक प्रभुत्वाची अनावर हाव या गोष्टी त्याला विशेषत्वाने कारण होतात. सीआयए ही संस्था दुसरे महायुद्ध संपल्यानंतर दोन वर्षे उलटत असताना १९४७ साली स्थापन करण्यात आली. तिचा त्या वेळचा प्रधान हेतू रशियाच्या आक्रमक वृत्तीला पायबद घालणे हा होता. तो पूर्णपणे समर्थनीय होता.

महायुद्धात आपला सहकारी असलेला स्तालिन हुकूमशाही वृत्तीचा आणि विश्वविजयाची आसुरी आकांक्षा धरणारा आहे, हे पंतप्रधान चर्चिल आणि रुझवेल्टच्या आकस्मिक मृत्यूनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झालेले ट्रूमन हे दोघे पुरते ओळखून होते. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरच्या मुसंडीत एकीकडून रशिया तर दुसरीकडून इंग्लंडअमेरिका यांच्या फौजा जर्मनीचा एकेक भाग पादाक्रांत करीत चालल्या होत्या. आपला वेग अधिक राहिला पाहिजे आणि निदान बर्लिन शहराचा ताबा आपण रशियाच्या आधी घेतला पाहिजे, यासाठी दोस्तराष्ट्रांकडून शर्थीचे प्रयत्न केले गेले. रशियाची धडपड तीच होती. अखेर एखादा चुरशीचा सामना बरोबरीत सुटावा त्याप्रमाणे बर्लिनच्या पश्चिमेकडील भाग दोस्तराष्ट्रांच्या तर पूर्वेकडील भाग रशियाच्या सैन्याने व्यापला. पण युद्ध म्हणजे केवळ सामना नसतो, तो एक संग्राम असतो आणि शत्रुत्व हा त्याचा पाया असतो त्यामुळे अखेर बर्लिन शहराची विभागणी करणारी सुप्रसिद्ध भिंत उभी राहिली, आणि जेरुसलेम या धर्मक्षेत्रातील भिंतीवर फुटत आले आहेत तसे हुंदके या भितीवरही फुटत राहिले. ती ओलाडण्याच्या प्रयत्नात अनेकांचे प्राणही गेले ती भिंत पुढे रीतसर पडली जाण्यापर्यंतचा सारा इतिहास आपल्या पिढीने पाहिला आहे. राष्ट्राराष्ट्रांची राजकीय रणनीती कशी असते, या दृष्टीने हे ध्यानात घेण्यासारखे आहे की, अंतिम विजय दृष्टिपथात आल्यानंतर बर्लिनकडे कूच करीत असण्याच्या काळातच तोवर महायुद्धात एकमेकाचे सहकारी असलेले आपण दोघे एकमेकांचे कट्टर वैरी आहोत, हे सत्य रशिया आणि दोस्तराष्ट्रे ही दोघेही मनोमन पुरते जाणून होते. जर्मनीचा पाडाव करीत असतानाच जणू त्यांनी पुढच्या संग्रामाची मोर्चेबांधणी चालू झाली होती. याला राजकारणातील वास्तवाचे नेटके भान, आणि "मुख्य ते हरिकथानिरूपण" असे आरंभी म्हणणाऱ्या समर्थ

रामदासांनी त्यानंतर लगेच राजकारणापाठोपाठ ज्याचा उल्लेख केला आहे ते ''सर्वविषयी सावधपण'' म्हणतात. भारताच्या नेत्यांना अद्याप ते वास्तव व सावधपण नीटसे आत्मसात करता आलेले नाही, हेही येथे मनात आल्याशिवाय राहात नाही. पूर्वयुरोपातील जो जो भाग ताब्यात येईल तो तो रशिया गिळंकृत करणार. हे दोस्तराष्ट्रे जाणून होती, एवढेच नव्हे, तर त्यापासून आपले रक्षण होण्यासाठी नंतरच्या काळामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आपल्याला सावध राहावे लागेल, हेही त्यांचे नेते समजून होते. रशियाच्या आक्रमक हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी व त्यांना पायबंद घालण्यासाठी तिच्या केजीबीसारखी सीआयए ही गुप्तहेर यंत्रणा अमेरिकेने उभी केली.

पण कोणाच्याही हातात एखादे अमोघ साधन आले की, स्वार्थाला धुमारे फुटतात. रशियाच्या आक्रमक व सर्वभक्षक वृत्तीला विरोध करण्यासाठी सावध राहणारी अमेरिका थोड्याशा सभ्य आणि काहीशा कमी क्रूर मार्गाने पण रशियाच्याच वळणावर गेली, असे तिचा उत्तरकालीन इतिहास सांगतो. क्यूबाच्या प्रकरणातही अमेरिकेचे हेतू स्वसंरक्षणापुरते मर्यादित राहिले नव्हते, असे एक मत आहे. त्याहून पुढची गोष्ट अशी आहे की, एखाद्या देशातील सत्ताधीशाला त्याच्या आसनावरून उलथून टाकून तेथे आपले बाहुले असणारी व्यक्ती आणावी अशी कारस्थाने अमेरिकेने केली आहेत, आणि अखेर ही पावले एखाद्या राष्ट्रप्रमुखाची हत्या घडवून आणण्याचा कट करण्यापर्यंत पोचली आहेत. सीआयएच्या स्थापनेनंतर केवळ पाच वर्षांत याचा प्रारंभ झाला. १९५२ ते ५४ या अवधीत ग्वाटेमालातील राज्यकर्त्या व्यक्तीची हत्या करण्याचा पद्धतशीर कट सीआयएने केला. तो अयशस्वी झाला. त्या कटाचा सविस्तर वृत्तांत आता ग्रंथरूपाने प्रकाशात आला आहे. इराक, इराण, निकाराग्वे किंवा अफगाणिस्तान या देशांतून अशीच कारस्थाने पद्धतशीरपणे केली गेली. त्यासाठी कोट्यवधी डॉलर्स खर्च केले गेले एखाद्या देशात कोणते सरकार असावे, हे ठरवण्याचा अधिकार तेथील जनतेचा आहे, असे लोकशाही मानणाऱ्या अमेरिकेला वाटू नये, हे कशाचे द्योतक आहे? ही संस्कृती कोणत्या प्रकारची आहे असे म्हणता येईल? ही मानवजातीच्या हिताची आहे असे म्हणता येईल काय?

येथेच हेही आठवते की, याच अमेरिकेत जगातील दुःखितांना साहाय्य करणाऱ्या किंवा मानवी स्वातंत्र्याची जपणूक करू पाहणाऱ्या संस्था आहेत आणि त्या जगभर आपले काम करीत असतात. पण त्यांतील हेतूही निखालसपणे शुद्ध असतात. किंवा त्या त्या स्थळीचे वास्तव सामग्र्याने ध्यानात घेणाऱ्या असतात असे म्हणवत नाही. लहान मुलांना मोलमजुरीसारखी कष्टाची कामे करावी लागू नयेत, यासाठी एका जागतिक पातळीवरील संस्थेने अलीकडे आवाज उठवला आहे लहान मुलांना त्यांची दमछाक होईल अशी कामे

करावी लागतात आणि त्यांना पोटभर अन्न मिळेल एवढी मजुरीही दिली जात नाही, हे आपल्या देशातील दृश्य क्लेशकारक आहे. पण भारतासारख्या गरीब देशातील मजूर वा शेतकरी आपल्या मुलांना पुरेशी भाकरी देऊ शकत नाहीत. खरा प्रश्न आहे तो दारिद्र्याचा आहे. अशा परिस्थितीत दरिद्री आईबापांनी आपल्या मुलांना कामावर पाठवावयाचे नाही असे ठरवले, तर त्यांनी दुपारी काय खावे? खरे तर हा प्रश्न आपल्या राज्यकर्त्यांनी दूरगामी योजना आखून व त्या नेटाने अमलात आणून सोडवावयास हवा. पण पाश्चात्त्यांच्या वळणाने भोगासक्त झालेले आपले राजकीय पुढारी तोंडाने गरिबांचा कळवळा दाखवतात आणि कृतीच्या बाबतीत करुणाशून्य असतात, हे आपण पाहात आहोत. त्यामुळे आपल्यालाही इतरांना नावे ठेवण्याचा अधिकार पोचत नाही.

भौतिक प्रगतीतील झगमगाटामुळे डोळे दिपून गेल्यामुळे ज्या आधुनिक पाश्चात्त्य संस्कृतीचे गोडवे येथील अनेक विचारवंत नित्य गात असतात, तिचे अंतरंग काय आहे हेही आपण समजून असावयास हवे. पाश्चात्त्यांना येथील बालकांची तशी चिंता नाही. त्यांचे काम थांबले तर येथील उत्पादन घटेल आणि तसे झाले तर आपल्या देशातील माल येथे खपवता येईल, असाही हेतू यामागे असू शकतो. कोणी गुन्हेगारी प्रवृत्तीचा माणूस किंवा या देशात घूसखोरी करणारा परकीय एखाद्या कारवाईत मारला गेला, तर जागतिक मानवी आयोग अलीकडे भारतावर ठपका ठेवतो. पण पैशाच्या थैल्या घेऊन त्या मोबदल्यात कोणाचाही प्राण घेणाऱ्या ज्या निष्ठुर क्रूरकर्म्या हिंसाचारी संघटना आहेत, त्यांचा बीमोड करण्यासाठी आपल्या पैशाचा व बळाचा वापर करावा, असे प्रगत म्हणवणाऱ्या अमेरिकेला का वाटत नाही? अतिरेक्यांना हत्यारे कोठून मिळतात, याचा शोध मानवी आयोग का घेत नाही? असे काही केले, तर उद्याचा इतिहासकार त्यांचे गोडवे गाईल. पण माणसाला सद्बुद्धी सुचत नाही आणि या ना त्या स्वरूपातील त्याचा स्वार्थ सुटत नाही, हेच अखेरचे दारुण सत्य आहे.

रशियापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी उभारल्या गेलेल्या सीआयएने निरनिराळ्या देशांतून नको त्या कारवाया केल्या व त्याचे पर्यवसान अनेक लोक मृत्युमुखी पडण्यात व त्याहून अधिक देशोधडीला लागण्यात झाले, असा गेल्या चाळीस वर्षांचा इतिहास हळूहळू प्रकाशात येत आहे. तो तसा येऊ नये यासाठी लक्षावधी डॉलर्स केवळ कागदपत्र नष्ट करण्यासाठी खर्च केले गेले, असाही तपशील उजेडात आला आहे. रशिया कोसळून पडला आणि ज्याचे अमेरिकेने भय मानावे असा कोणीही शत्रू आता जगात कोठेही उरलेला नाही. अशा परिस्थितीत सीआयए या संस्थेचे काही प्रयोजन उरलेले नसल्यामुळे तिचे विसर्जन करावे, हेच उचित असल्याचे सुस्पष्ट प्रतिपादन अमेरिकेतील एक नामवंत राजकीय भाष्यकार थिओडोर ड्रेपर यांनी १९९७ - मध्ये प्रसिद्ध केलेल्या "Struggle for Power : The

American Revolution" या पुस्तकात केले आहे. १९९१-पासूनच्या कालखंडातील सीआयएच्या तीन प्रमुखांचे मतही शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आपल्या संस्थेला काहीही काम उरलेले नाही असे आहे. ते त्यांनी आपापल्या त्या त्या वेळच्या निवेदनात व्यक्त केले आहे. जॉर्ज टेनेट या प्रमुखाने तर ''आम्ही काही चांगल्या गोष्टी केल्या, तशाच काही वाईटही केल्या'', अशी प्रांजल कबुली दिली आहे. दहशतवादी संघटनांच्या साऱ्या जगभर चालू असलेल्या कारवाया बंद पाडणे आणि अणुशक्तीच्या वापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामांपासून माणसाचे रक्षण करणे यांकडे आता आपण लक्ष द्यावे, असेही या प्रमुखाने सुचवले आहे कोठेतरी सदसद्विवेकबुद्धीचा अंश जागा आहे, असा याचा अर्थ आहे. पण या साऱ्या निवेदनांना पेंटॅगॉन, परराष्ट्रखाते आणि अध्यक्षपदावरील सत्ताधीश यांच्याकडून योग्य तो प्रतिसाद मिळत नाही, असा निष्कर्ष हाताला लागतो. सीआयएसारखेच गोपनीय काम करणाऱ्या आणखी बाराचौदा संस्था शासनाच्या आदेशानुसार आजही कार्यरत आहेत, हा तपशीलही या संदर्भात लक्षणीय आहे.

अखेर ज्यांच्या हातात प्रत्यक्ष अधिकार असतो त्यांना विवेक सुचत नाही, तोवर जागतिक राजकारणाला अप्रत्यक्षपणे मिळत असलेली मानवसमूहांच्या संहाराची आणि त्यातून वाचणाऱ्या निराश्रितांवर कोसळणाऱ्या नानाविध आपत्तींची दिशा टळत नाही. सारे जगच आज सत्ताधीशांच्या अशा जीवघेण्या खेळामुळे विनाशाच्या कड्यावर उभे आहे. अमेरिका पाचशे वर्षांपूर्वी नव्याने उदयाला आली, तेव्हा त्या खंडातील मूळच्या रहिवाशांचा निर्घृण संहार झाला, आणि तीच अमेरिका आज जगातील सर्वात समृद्ध आणि बलवान महासत्ता म्हणून मानाने मिरवीत आहे, अशा या कालातही तशाच संहाराची प्रेरक ठरत आहे, यातील सुसंगती कोणत्या प्रकारचे श्रेय पदरी टाकणारी आहे? जेवढा धोका रशियाच्या हुकूमशाहीकडून होता, तेवढाच लोकशाहीवादी अमेरिकेकडून इतरांना आहे, असा निष्कर्ष काढावा काय; असा प्रश्न स्वतःला विचारण्याहून अधिक काहीही सामान्य माणूस वा जागता विचारवंत या संदर्भात करू शकत नाही. जी पाश्चात्त्य संस्कृती भौतिक दृष्टीने खरोखरीच विस्मयकारक प्रगती करीत आहे, तिचे अंतरंग आणि अखेरचे रूप हे असे आहे. अमेरिकेला फार मोठा इतिहास नाही आणि सद्विचाराची पेरणी करणाऱ्या सज्जनांची प्रभावी परंपराही तिला लाभलेली नाही. गरीब आणि अप्रगत असा हा आपला भारत. त्याचा सांस्कृतिक वारसा आणि इतिहासाची परंपरा याहून निराळी आहेत. साकल्याने विचार करता ती जगाला शांतता आणि सामंजस्य यांचा संदेश देणारी आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरेल काय? पण केवळ सत्ताकारणात दंग असणाऱ्या आपल्या पुढाऱ्यांना तो वारसा जाणून घेण्याइतकी फुरसत नाही, आपल्याजवळ केवढे उदात्ततेचे धन आहे याची वार्ता नाही, आणि आपली परंपरा जागवण्याची ऊर्मी नाही.

या अफाट अवनीतलावरील मानवजातीची भीषण शोकांतिका होण्याचे भय आहे, तीच अवस्था भारताचीही आहे. सर्वत्र माणूसच माणसाचा शत्रू आहे

जोगळेकर आणि कुलकर्णी म्हणून आणखी एक महाराष्ट्रीय संध्याकाळच्या जेवणासाठी थांबले होते. दिनांक अकराच्या माझ्या व्याख्यानाला हे दोघे आणि प्रकाशराव होते. त्यावरून विषय निघाला, आणि रेखाताईनी मला म्हटले, "आमच्या मुलांना इंग्रजीतून ज्ञानेश्वरांबद्दल काही माहिती सांगा, त्यांना मराठी येत नाही-" तीनही मुले महाविद्यालयात जाणारी आणि चांगल्या समजत्या वयातील होती. पण जन्मापासून अमेरिकेत असल्यामुळे त्यांना भारताची फार थोडी माहिती होती. हे ध्यानात घेऊन भारतातील मध्ययुग, त्या काळातील अवनती, ज्ञानदेवांचे चरित्र, त्यांनी सोसलेल्या आपत्ती, वारकरी पंथासाठी त्यांनी केलेले कार्य, आणि त्यांचे ग्रंथ, अशा अनुषंगाने बोलत गेलो; आणि अखेर त्यांच्या महाराष्ट्रावरील सांस्कृतिक प्रभावाचे स्वरूप स्पष्ट केले. त्या अनुरोधाने नंतर थोड्या गप्पागोष्टी झाल्या. दुसरे दिवशी सकाळी प्रकाशराव यांचा निरोप घेतला. रेखाताई व त्यांची कन्या यांनी मला विमानतळावर पोचवले. रेखाताई अमेरिकन एअरलाइन्समध्ये नोकरी करतात, त्यांनी माझी पुढच्या साऱ्या प्रवासाची आरक्षणे करून दिली. माझे मोठेच काम झाले. दहा वाजता विमान निघाले आणि दीड वाजता मी लॉस अँजेलिसला उतरलो. रेखाताईची चुलतबहीण सौ. शोभाताई कित्तूर विमानतळावरून मला घरी घेऊन गेल्या.

# ९. कॅलिफोर्नियातील विवेकानन्दांच्या पाऊलखुणा

संध्याकाळी डॉ. कित्तूर मला पंधरासोळा मैल दूर असलेल्या समुद्र-किनाऱ्यावर घेऊन गेले. थोडा अंधार पडू लागला होता. डावीकडे एक डोंगर, त्याच्या कडेने भरपूर रुंद रस्ता, आणि उजवीकडे विशाल पॅसिफिक महासागर. किनाऱ्यावर खाण्यापिण्याची छोटी छोटी बरीच दुकाने होती. अनेक स्त्रीपुरुष आणि लहान मुले मोकळ्या वाऱ्यात फिरत होती. एक फ्रेंच सर्कस आली होती आणि तिचा भलामोठा तंबू किनाऱ्यापासून थोडा आत उभारलेला होता. अजून पाश्चात्त्य देशांत सर्कस ही संस्था टिकून आहे असे दिसते. सर्कशीच्या व्यवसायात एका काळी महाराष्ट्र फार पुढे होता. अनेक कसरतपटू, नाना प्रकारची जनावरे, आणि तंबू आदी प्रचंड सामानसुमान यांचा भार वाहात तो व्यवसाय चालवणे आता दुष्कर झाले आहे.

### होलीवुडची वेदान्त सोसायटी

दुसरे दिवशी सकाळी डॉ. कित्तूर मला पंधरासोळा मैल दूर असलेल्या वेदान्त प्लेस या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागी घेऊन गेले. तेथे 'वेदान्त सोसायटी ऑफ साउथ कॅलिफोर्निया'' या संस्थेच्या इमारती होत्या. आसपास निवासी घरे आहेत. निरनिराळ्या तीनचार इमारती अगदी जवळ जवळ आहेत. त्यांच्याभोवती मोकळे आवार नाही. कार्यालय, ग्रंथालय, ग्रंथविक्रीकेन्द्र आणि श्रीरामकृष्णांचे मंदिर आहे. भारतात असते तसे शिखर मंदिराला नव्हते. ते मंदिर हेच प्रवचनासाठी उपयोगात येणारे सभागृह होते. संन्यासी आणि ब्रह्मचारी यांच्या निवासाच्या जागा, भोजनगृह आदी सारे काही सर्व सोयींनी सुसज्ज होते. काही अमेरिकन स्त्रीपुरुष वावरत होते. ग्रथालय आणि ग्रथविक्रीकेन्द्र चांगले समृद्ध आहे. भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि इतिहास यांवरील अनेक ग्रंथ होते. सेंटरने प्रकाशित केलेले काही ग्रंथ सहज पाहिले. त्यांची निर्मिती उत्कृष्ट होती. भारताच्या तुलनेने फारच सरस होती. संपूर्ण महिन्याचा प्रत्येक आठवड्यातील कार्यक्रम काय आहे, त्याची तपशीलवार माहिती एका पत्रकात होती. वेदान्त सोसायटीचे उद्दिष्ट आणि कार्यपद्धती यांची थोडक्यात माहिती देणारी छोटी पत्रके होती.

''वेदान्त सोसायटी ऑफ सदर्न कॅलिफोर्निया'' ही सस्था १९३०- मध्ये स्थापन झाली. भारतामध्ये रामकृष्ण सघ ही एक आध्यात्मिक संस्था आहे आणि तिच्याशी संलग्न असलेली ही एक स्वायत्त शाखा आहे, अशी बारातेरा केन्द्रे अमेरिकेत तर इतर देशांत काही ठिकाणी आहेत, हा उल्लेख बहुतेक पत्रकातून केलेला असतो. रामकृष्ण संघ याला पर्यायी म्हणून ''रामकृष्ण ऑर्डर ऑफ इंडिया'' असे शब्द योजले जातात. इतर केन्द्रांचे पत्ते दिलेले असतात. प्रत्येक महिन्याच्या कार्यक्रमांचा तपशील देणारी पत्रके स्वतंत्रपणे काढली जातात. वर्ग, व्याख्याने, विशेष कार्यक्रम, बोलणारे वक्ते आणि त्या त्या वेळचे विषय, अशी सारी तपशीलवार माहिती त्या पत्रकात दिलेली असते. आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी सोसायटीच्या प्रमुखांना व्यक्तिशः भेटता येईल, किंवा शंका-समाधान वा प्रश्न विचारणे यासाठी प्रवचनानंतर भेटता येईल असा उल्लेख पत्रकात होता. पाश्चात्त्य पद्धतीनुसार पूर्वसूचना आणि भारतीय पद्धतीतील अनौपचारिकता या दोहीचा मेळ साधण्याची दृष्टी असते. वेदान्त म्हणजे काय, आणि त्याची मूलभूत तत्त्वे काय आहेत, यांचा निर्देश बहुतेक पत्रकांवर दहाबारा ओळींत केलेला असतो. श्रीरामकृष्ण किंवा स्वामी विवेकानंद यांची एकदोन वचने असतात. या साऱ्या पत्रकांसाठी वापरला जाणारा कागद आणि त्यांचे मुद्रण उत्कृष्ट दर्जाचे असते. यांतील बऱ्याच गोष्टींची भारतात साहजिकच आवश्यकता नसते. पण परक्या देशांत काम करावयाचे तर या सर्वांची गरज आहे, हे थोडा विचार केल्यावर ध्यानात येते. अमेरिकेतील इतर केन्द्रांतून याच पद्धतीचे अनुसरण केले जाते.

स्वामी स्वाहानंद हे या होलीवुडच्या वेदान्त सोसायटीचे प्रमुख, ते सांता बार्बरा येथे गेले होते. एका अमेरिकन संन्याशाशी थोडा संवाद झाला. चारपाच संन्यासी व तेवढेच ब्रह्मचारी येथे आहेत. कार्यालय व ग्रंथालय येथे काम करणाऱ्या काही महिला दिसल्या. ही गोष्ट भारतापेक्षा वेगळी होती. एक अमेरिकन संन्याशी होते त्यांनी पॅंट आणि शर्ट असा वेष धारण केला होता. त्याचेही मला कुतूहल वाटले. पण मी काही विचारले नाही. त्यांचे नाव स्वामी आत्मविद्यानंद होते. ''ब्रह्मचारी प्रशिक्षण वर्गासाठी बेलूर मठात गेला असाल,'' असे मी म्हटल्यावर ''आमचा येथे स्वतंत्र वर्ग असतो'' असे ते म्हणाले. हा भाग थोडा वेगळा वाटला. मी भारतातून आलो आहे व पुस्तक लिहिले आहे हे समजल्यामुळे त्यांनी पंधरावीस मिनिटे माझ्यासाठी खर्च केली. रविवारचे साप्ताहिक प्रवचन थोड्या वेळात सुरू होणार होते. कार्यक्रम पत्रिकेवरून समजले की, ब्रह्मचारी नित्यचैतन्य बोलणार आहेत. विषय होता, Is Vedanta For the West?" ते तासभर बोलले. अमेरिकन होते. उंचनिंच, गोरेपान, आणि प्रसन्न मुद्रा. समोर टिपणे होती, त्यांच्या आधारे बोलत होते. अद्वैतवेदान्ताची मुख्य संकल्पना त्यांनी विशद केली. मंदिरात सुमारे शंभर खुर्च्या होत्या. सत्तर-पंचाहत्तर स्त्रीपुरुष

श्रोत्यांमध्ये बारापंधरा भारतीय दिसले. स्वामी सर्वदेवानंद उपप्रमुख होते. माहितीपत्रकात मिनिस्टर आणि असिस्टंट मिनिस्टर असे शब्द अध्यक्ष आणि उपाध्यक्ष या अर्थाने घातलेले आढळले.

अमेरिकेतील ही पहिली वेदान्त सोसायटी मी पाहिली. डॉ. कित्तूर यांच्याबरोबर एक वाजता घरी परत आलो. हा सेंटर होलीवुड भागात होता. मी लॉस अँजेलिसच्या विमानतळावर उतरलो होतो हे खरे पण म्हणून त्या शहरातच वावरत होतो, असे म्हणता येत नव्हते. अधूनमधून निवासी भाग असलेल्या अनेक ठिकाणी लोक राहात असतात. त्या त्या भागांची नावे वेगळी असतात. वस्ती तुरळक असते, त्यामुळे गर्दी मुळीच नसते. किंबहुना रस्त्यांवर माणसे फार थोडी दिसतात. पण कोठेही असले तरी दोन्ही बाजूंनी चार चार वाहने एकाच वेळी जाऊ शकतील असे महामार्ग असतात, आणि त्यांवरून सतत वाहने चाललेली असतात. गाड्यांचा वेग खूपच असतो. पंधरावीस मैल अंतर आपण केव्हा जातो ते कळतही नाही, त्यामुळे होलीवुड आणि लॉस अँजेलिस या दोहोंतील अंतर माझ्या ध्यानातही आले नाही. संध्याकाळी वैद्य, काळे आणि पुरोहित असे डॉक्टरांचे तीन मित्र सपत्नीक आले. थोडयाफार गप्पा व जेवण झाल्यावर शोभाताई ''थोडा वेळ बसू या'' असे म्हणाल्या. डॉ. कित्तूर यांचे आईवडील होते. ज्ञानदेव आणि विवेकानन्द या दोघांचे जीवन आणि कार्य यांविषयी कोणीकोणी काही प्रश्न विचारले. रात्री अकरा वाजेपर्यंत हा संवाद चालला होता.

## पॅसाडेना येथील विवेकानन्द हाऊस

एकवीस ऑक्टोबर, भारतीय पंचांगाप्रमाणे दसरा होता, हे शोभाताईंनी सांगितले म्हणून समजले - ''होलीवुडमधील स्टुडिओ पाहायचे आहेत का'' असा प्रश्न डॉक्टरांनी सकाळी कामावर जाता जाता मला केला. होलीवुड किंवा मेट्रो गोल्डविन मेयर आणि ट्वेंटिएथ सेंचरी फॉक्स अशा नावांत तरुण वयापासून कितीतरी वर्षे एक जादू भरून राहिलेली होती. बघताबघता मन भूतकाळातील चित्रपटांच्या प्रदेशात एक फेरी टाकून आले. धुंद वातावरणात नेणारा ''नायगारा'', तर रंजक पातळीवरचा नाट्यपूर्ण ''रोमन हॉलिडे''; प्रेमाची कथा त्यागाच्या उदात्त पातळीवर नेणारा ''ॲन अफेअर टु रिमेंबर'', तर साध्या पक्ष्यांच्या हालचालीमुळे अंगावर काटा उभा करणारा ''बर्ड्स''; ट्रक ड्रायव्हरच्या कष्टप्रद जीवनातील आनंदाचा क्षण ऐन क्षणी हिरावून घेणारा ''वेजिस ऑफ फीअर'', तर युद्धाच्या भयप्रद पृष्ठभूमीवरील निरागस बालिका आणि तिची सारखी चिंतेत असलेली माता यांतील द्वैत उभे करणारा ''टू विमेन'', शेक्सपियरच्या असामान्य प्रतिभेचा आविष्कार असणारा तरुण ''हॅम्लेट'' आणि म्हातारा ''किंग लिअर'', तर युद्धातील भीषणता आणि मानवाचे भवितव्य

यांचा एकाच वेळी वेध घेणारा "वॉर अँड पीस.", नेपोलियनचा उत्कट प्रेमभाव आणि दुर्दम्य महत्त्वाकांक्षा एकत्र गुंफणारा "मेरी वॅलेवास्का", तर दुसऱ्या महायुद्धाला कलाटणी देणारा प्रसंग चित्रित करणारा "दि लॉगेस्ट डे", अॅलेक गिनेसचा अप्रतिम अभिनय असलेला "ब्रिज ऑन दि रिव्हर क्वाय", तर सोफिया लॉरेनची अभिनयकुशलता प्रकट करीत काळाच्या गतीचा वेध घेणारा "यस्टरडे, टुडे अँड टुमारो"; यौवनात पदार्पण करीत असलेल्या अठरावीस वयाच्या तरुणाच्या मनात जागी होणारी स्त्रीविषयक अबोध ओढ संयमाने चित्रित करणारा "समर ऑफ फॉर्टीटू" तर रशियन राज्यक्रांतीतील हळुवार मानवी भावनांना पारखे होणारे कोरडे मन दाखवणारा "डॉ. झिवॅगो;" बायबलमधील शिकवणुकीच्या मूळ स्रोताशी जाऊन पोचणारा "टेन कमांडमेटस" तर येशू ख्रिस्ताचे शांत आत्मसमर्पण पाहून आरपार बदलून जाणारा दरोडेखोर "बॅराब्बस", किंवा सेंट पॉलचे उदात्त आध्यात्मिक व्यक्तिमत्व मूर्तिमंत साकार करणारा "को वाडिस." असे कितीकिती चित्रपट डॉक्टरांच्या त्या सहज केलेल्या प्रश्नासरशी एक क्षणात् स्मृतीच्या गुंफेतून वर आले. पण माझ्या मनात आणखी काहीतरी होते, डॉक्टरांच्या उद्गाराला मी फक्त मूकपणे दाद दिली.

विवेकानन्द १८९९-च्या डिसेंबरमध्ये कॅलिफोर्नियात आले होते, आणि जवळजवळ सहा महिने या भागात होते. त्या काळात निरनिराळ्या ठिकाणी त्यांचे वास्तव्य झाले. काही व्याख्याने दिली, तसेच योग आणि वेदान्त यांवरील अनेक वर्ग त्यांनी घेतले. पॅसाडेना येथे मीड भगिनीच्या घरी विवेकानन्द काही दिवस राहिले होते. ते घर वेदान्त सेटरने विकत घेऊन स्मारक म्हणून जतन केले आहे. तिकडे जाऊन येण्याची माझी इच्छा आहे, असे म्हटल्यावर शोभाताई अकरा वाजता मला गाडीतून घेऊन निघाल्या. त्यांच्या सासूबाई बरोबर आल्या. पस्तीसचाळीस मैल अंतर असावे. सारा प्रदेश डोगरांच्या रांगा असलेला आणि मोठा रमणीय होता. शंभर वर्षांपूर्वी तसे दहा हजार वस्तीचे असलेले पॅसाडेना आता चांगले मोठे शहर झाले आहे. बाजारपेठेचा रस्ताच एक मैल लांबीचा होता. मोठमोठ्या इमारती आणि अनेक कार्यालये दिसत होती. मीड भगिनींचे ते जुने घर एका बाजूला आणि अगदी शांत वातावरणात आहे. ते पूर्वी होते तसेच राखलेले आहे. "विवेकानन्द हाउस" या नावाने ते आता ओळखले जाते. दुमजली छोटे घर, खोल्याही तशा लहान. मागेपुढे मोकळी जागा. मागच्या बाजूला असलेल्या छोट्याशा बागेत विवेकानन्द संध्याकाळच्या वेळी अनेकांशी संवाद करीत असत.

येथे स्वामी वेदरूपानन्द हे अमेरिकन संन्यासी होते. एकटेच आणि जाऊन-येऊन असतात. १९८० ते ८४ ही चार वर्षे ते कलकत्त्याला "रामकृष्ण मिशन इन्स्टिट्यूट ऑफ कल्चर" या संस्थेत होते. त्याच काळात त्यांनी संन्यास घेतला. एक तासभर आम्ही त्या घरात होतो. वेदरूपानन्दांनी साऱ्या खोल्या दाखवल्या. पन्नाससाठ वर्षांपूर्वीचे आपल्याकडील

यांचा एकाच वेळी वेध घेणारा "वॉर अँड पीस.", नेपोलियनचा उत्कट प्रेमभाव आणि दुर्दम्य महत्त्वाकांक्षा एकत्र गुंफणारा "मेरी वॅलेवास्का", तर दुसऱ्या महायुद्धाला कलाटणी देणारा प्रसंग चित्रित करणारा "दि लाँगेस्ट डे", ॲलेक गिनेसचा अप्रतिम अभिनय असलेला "ब्रिज ऑन दि रिव्हर क्वाय", तर सोफिया लॉरेनची अभिनयकुशलता प्रकट करीत काळाच्या गतीचा वेध घेणारा"यस्टरडे, टुडे अँड टुमारो"; यौवनात पदार्पण करीत असलेल्या अठरावीस वयाच्या तरुणाच्या मनात जागी होणारी स्त्रीविषयक अबोध ओढ संयमाने चित्रित करणारा "समर ऑफ फॉर्टीटू" तर रशियन राज्यक्रांतीतील हळुवार मानवी भावनांना पारखे होणारे कोरडे मन दाखवणारा "डॉ. झिवॅगो;" बायबलमधील शिकवणुकीच्या मूळ स्रोताशी जाऊन पोचणारा "टेन कमांडमेंटस" तर येशू ख्रिस्ताचे शांत आत्मसमर्पण पाहून आरपार बदलून जाणारा दरोडेखोर "बॅराब्बस", किंवा सेंट पॉलचे उदात्त आध्यात्मिक व्यक्तिमत्व मूर्तिमंत साकार करणारा "को वाडिस." असे कितीकिती चित्रपट डॉक्टरांच्या त्या सहज केलेल्या प्रश्नासरशी एक क्षणात् स्मृतीच्या गुंफेतून वर आले. पण माझ्या मनात आणखी काहीतरी होते, डॉक्टरांच्या उद्‌गाराला मी फक्त मूकपणे दाद दिली.

विवेकानन्द १८९९-च्या डिसेंबरमध्ये कॅलिफोर्नियात आले होते, आणि जवळजवळ सहा महिने या भागात होते. त्या काळात निरनिराळ्या ठिकाणी त्यांचे वास्तव्य झाले. काही व्याख्याने दिली, तसेच योग आणि वेदान्त यांवरील अनेक वर्ग त्यांनी घेतले. पॅसाडेना येथे मीड भगिनीच्या घरी विवेकानन्द काही दिवस राहिले होते. ते घर वेदान्त सेंटरने विकत घेऊन स्मारक म्हणून जतन केले आहे. तिकडे जाऊन येण्याची माझी इच्छा आहे, असे म्हटल्यावर शोभाताई अकरा वाजता मला गाडीतून घेऊन निघाल्या. त्यांच्या सासूबाई बरोबर आल्या. पस्तीसचाळीस मैल अंतर असावे. सारा प्रदेश डोंगरांच्या रांगा असलेला आणि मोठा रमणीय होता. शंभर वर्षापूर्वी तसे दहा हजार वस्तीचे असलेले पॅसाडेना आता चांगले मोठे शहर झाले आहे. बाजारपेठेचा रस्ताच एक मैल लांबीचा होता. मोठमोठ्या इमारती आणि अनेक कार्यालये दिसत होती. मीड भगिनींचे ते जुने घर एका बाजूला आणि अगदी शांत वातावरणात आहे. ते पूर्वी होते तसेच राखलेले आहे. "विवेकानन्द हाउस" या नावाने ते आता ओळखले जाते. दुमजली छोटे घर, खोल्याही तशा लहान. मागेपुढे मोकळी जागा. मागच्या बाजूला असलेल्या छोट्याशा बागेत विवेकानन्द संध्याकाळच्या वेळी अनेकांशी संवाद करीत असत.

येथे स्वामी वेदरूपानन्द हे अमेरिकन संन्यासी होते. एकटेच आणि जाऊन-येऊन असतात. १९८० ते ८४ ही चार वर्षे ते कलकत्त्याला "रामकृष्ण मिशन इन्स्टिट्यूट ऑफ कल्चर" या संस्थेत होते. त्याच काळात त्यांनी संन्यास घेतला. एक तासभर आम्ही त्या घरात होतो. वेदरूपानन्दांनी साऱ्या खोल्या दाखवल्या. पन्नाससाठ वर्षापूर्वीचे आपल्याकडील

मध्यमवर्गीय माणसाचे घर असावे, तसे हे घर होते. मीड भगिनीची विवेकानन्दांवर भक्ती होती. ते झोपत असत ती खोली वरच्या मजल्यावर आहे. जेमतेम दहा फूट लांबरुंद अशी चौकोनी खोली आहे. त्या खोलीत त्यांचे ध्यानमग्न अवस्थेत डोळे मिटून बसलेले असे मोठे छायाचित्र होते. त्यांना प्रणाम करण्याची ही जागा होती. भारताचा हा महापुरुष ज्या खोलीत येथे झोपत होता तेथे आपण उभे आहोत, ही कल्पनाच रोमांचकारक होती. १९०० सालच्या जानेवारी-फेब्रुवारी महिन्यांतील बरेच दिवस त्यांचे वास्तव्य येथे होते. पॅसाडेनामध्ये त्यांची काही व्याख्याने झाली, आणि त्यांच्याशी संवाद वा चर्चा करण्यासाठी अनेक व्यक्ती त्यांना या घरात भेटावयास येत असत. विवेकानन्दांनी आपल्याकडे राहावयास यावे, अशी या तीन भगिनींपैकी मिसेस हॅन्स्ब्रो यांची फार मोठी इच्छा होती. आपले उत्तम आतिथ्य करावे असे आमच्या घरात कोणतेही ऐश्वर्य नाही, असे त्यांनी म्हटले, तर "मला कोणताही थाटमाट लागत नाही" असे उत्तर विवेकानन्दांनी दिले होते. हॅन्स्ब्रो यांनी विवेकानन्दांच्या कॅलिफोर्नियातील वास्तव्यामध्ये काही महिने त्यांची दैनंदिन देखभाल करणे आणि वर्ग वा व्याख्याने यांची व्यवस्था पाहणे या द्वारा त्यांना फार मोठे साहाय्य केले.

सर्व खोल्यांमधून विवेकानन्दांची अनेक छायाचित्रे लावलेली होती. श्रीरामकृष्ण आदींचीही होती. सारे पाहून झाल्यावर वेदरूपानन्दांनी आमच्यासमोर व्हिजिटर्स बुक ठेवले. "बाहेरच्या बाजूला विवेकानन्द हाउस अशा अर्थाची एखादी मोठी पाटी का नाही", असा प्रश्न मी केला. कारण घर शोधत असताना आम्ही दोन वेळा त्या घरावरून गेलो होतो, पण आमच्या काही ध्यानात आले नव्हते. अखेर क्रमांकाच्या आधारे आम्ही फाटकातून आत शिरलो होतो. वेदरूपानन्द म्हणाले, "येथे तसे नित्याचे वा आठवड्याचे काही कार्यक्रम होत नाहीत, शिवाय एवढ्या या बाजूच्या गावात केवळ हे घर पाहण्यासाठी फार कोणी येत नाहीत." एक तास त्या आवारात घालवून आम्ही त्यांचा निरोप घेतला.

## डोंगरावरील वणवा आणि शहरातील मंदिर

तिरुपतीच्या मंदिरासारखे एक भव्य आणि सुंदर मंदिर अलीकडेच बांधले गेले आहे. लॉस अॅजेलिसपासून थोड्या बाजूला बारापंधरा मैलांवर ते आहे. ते दाखवण्यासाठी शोभाताईंनी गाडी तिकडे घेतली. सारा प्रदेश डोंगराळ होता. काही ठिकाणी भरपूर झाडे होती. प्रदेश पाहात नुसते भटकण्यातही आनंद होता. आम्ही मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याकडे वळण्याच्या अलीकडे दोनतीन मैल असताना एका डोंगराच्या पलीकडच्या बाजूस धुराचे लोट दिसले. प्रथम विशेष वाटले नाही. पण तेथवर गेल्यावर पाहिले तर डोंगरावर वणवा पेटला होता. एका बाजूची वाहतूक थबकली होती. आगीचे बब रस्त्यावर दिसले. आकाशात दोनतीन

हेलिकॉप्टर्स दिसली. त्यांनी वरच्या बाजूने पाण्याचा मारा केला. ती परत फिरलेलीही पाहिली. वणव्याच्या भागात रस्त्यावर पोलीस उभे होते. डोंगराचा काही भाग गवत आणि झुडपे जळल्यामुळे काळा पडला होता, तर मोठ्या झाडांच्या बुंध्यांचे पेटते निखारे चारदोन ठिकाणी दिसले. वाट मोकळी होण्यास बराच वेळ लागणार असे पाहून आम्ही परत फिरलो.

या वणव्याचे रूप त्या वेळी विशेष ध्यानात आले नाही. पण रात्री दूरदर्शनवरील बातम्यांमध्ये त्याच्या दृश्यांसाठी तीनचार मिनिटे दिली गेली. तेव्हा ध्यानात आले की, रत्यावरून दिसलेल्या डोगराच्या पलीकडच्या उतारावरील तो वणवा खूपच मोठा होता. प्रथम खालचे गवत, मग छोटी झुडपे, आणि अखेर मोठमोठे वृक्ष पेटत चाललेले पाहता आले. आगीच्या ज्वालांचे तांडव चालले होते, आणि आकाशात धुराचे लोटच्या लोट जात होते. वणवा विझत येत असताना आम्ही तेथे पोचलो होतो, असा याचा अर्थ होता. डोंगरावर वणवा पेटणे ही अनेक वेळा घडणारी घटना आहे. हा वणवा शहरापासून बाजूच्या भागात होता. लोकांच्या जीविताला वा मालमत्तेला कोणताही धक्का पोचण्याची शक्यता नव्हती. पण तरीही त्या भडकत्या आगीचे लोळ प्रेक्षकांपर्यंत पोचवण्याचे परिश्रम दूरदर्शनने घेतले होते.

आणखी एका ठिकाणी एका मंदिर होते. शोभाताईंनी तिकडे गाडी घेतली. एकावर एक अशा तीनचार संगमरवरी चौथऱ्यांवर अनेक देवदेवतांच्या सुंदर मूर्ती होत्या. सभामंडपासारखी प्रशस्त जागा होती. भोवती थोडे मोकळे आवार. मंदिराच्या व्यवस्थेसाठी पुजारी होता. हातात फुले घेऊन कोणी कोणी येतजात होते, कारण दसऱ्याचा दिवस होता. गुजराती लोकांची संख्या अधिक दिसली. कालच्या आणि आजच्या भ्रमंतीत लॉस अँजेलिस आणि पॅसाडेना यांच्या आसपासचा बराच परिसर पाहून झाला. बाजाराच्या उंच इमारतींचा भाग पाहण्याची उत्सुकता नव्हती. आणखी एक दिवस हाताशी असता, तर होलीवुडचे स्टुडियो मात्र पाहिले असते. ग्रेटा गार्बो, इनग्रिड बर्गमन, मेरिलिन मनरो किंवा सोफिया लॉरेन अशा विख्यात नट्या; क्लार्क गेबल, ग्रेगरी पेक, चार्ल्स लाफ्टन किंवा अँथनी क्विन असे नामवंत नट; आणि कल्पक निर्माता व उत्कृष्ट अभिनयपटू असा जगविख्यात चार्ली चॅप्लीन, अशा अव्वल दर्जाच्या कलावंतांची कर्मभूमी पाहण्यात आनंद होता. लॉरेल आणि हार्डी यांचीही आठवण झाली. अलीकडच्या काळातील असे कलावंत मात्र जवळजवळ माहीत नाहीत. आपण आपल्या ऐन वयात जे पाहतो, त्यांच्याशीच आपल्या मनाचे धागे अधिक जुळलेले असतात हेच खरे.

शिवाय अलीकडे कित्येक वर्षे चित्रपट पाहण्याचा भाग माझ्या बाजूने फार कमी झाला आहे. स्टार टीव्हीवर चालू असलेल्या एखाद्या सीरियलचा कोणता तरी मधलाच भाग एखाद्या मित्राकडे अवचितपणे दृष्टीखालून जातो. कधीकधी तो वेधक वाटतो. मग त्याचे

तेथवरचे सूत्र विचारून घेतल्यावर ध्यानात येते की, कथा अर्थपूर्ण आहे, मानवी जीवनातील सूक्ष्म आणि संमिश्र गुंतागुंत समोर उभी करणारी आहे. निर्मिती, अभिनय, आणि छायाचित्रण हे भाग तर तंत्र आणि गुणवत्ता या दृष्टींनी अलीकडे फार पुढे गेले आहेत. पण हे सारे खरे असले, तरी हा भाग अखेर मनोरंजनाशी अधिक निगडित आहे. त्यासाठी दिवसातील अणि एकंदर आयुष्यातील किती वेळ आपण खर्ची घालावा, हा ज्याच्यात्याच्या आवडीचा भाग असतो. पण नुसता वेळ छान गेला असे म्हणण्यापेक्षा, ज्ञानाच्या क्षेत्रातील वरच्या दर्जाचे असे काहीतरी जाणून घेणे, आणि त्याचा मेळ आपल्या जीवनात परिपक्वता आणण्याशी साधला जाणे ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे, हे निदान बुद्धिमंतांनी तरी ध्यानात घ्यावयास हवे असे वाटून जाते. पण हेदेखील कोणाला सांगण्याचा अधिकार आपण स्वतःकडे कधी घेऊ नये. आपले आयुष्यही फार वरच्या पातळीवर पोचलेले नसते, हे श्रेष्ठ विभूतींची चरित्रे डोळ्यांसमोर आपली, तर सहज ध्यानात येऊ शकते.

संध्याकाळी डॉ. कित्तूर दवाखान्यातून परत आल्यावर मी त्याना म्हटले, ''मला हवे होते ते शोभाताईनी दाखवले.'' म. रा. यार्दी यांचे सुपुत्र आणि शोभाताईचे चुलतबंधू अनंतराव रात्री आठ वाजता आले. दसऱ्याचे जेवण साजरे झाले, आणि मी सर्वाचा धन्यवादपूर्वक निरोप घेऊन अनंतरावांच्या गाडीत बसलो. पावणेदोन-दोन तासांत ऐंशी मैल प्रवास करून रात्री साडेअकरा वाजता सांता बार्बरा येथे अनंतरावांच्या निवासस्थानी बंगल्यात पोचलो. दसऱ्याचे चांदणे होते. वाटेवरच्या भागात अनेक ठिकाणी छोट्या टेकड्यांवर वळणावळणाचे रस्ते होते; आणि भोवताली पुष्कळ ठिकाणी झाडी आहे हे समजत होते. दिवसाची वेळ असती, तर हा आनंद अधिक घेता आला असता. पण चांदण्याची सोबत छान होती.

## स्वामी स्वाहानन्द यांच्याशी संवाद

दुसरे दिवशी सकाळी जागा झालो तर ध्यानात आले की, आपल्या खोलीच्या एका बाजूला संपूर्ण काच आहे, आणि तीमधून बाहेरचे दृश्य दिसते. अनंतरावांचे प्रशस्त निवासस्थान एका छोट्याशा टेकडीच्या वरच्या बाजूला आहे. काचेतून पाहिले, तर बाजूला डोंगराची रांग, तीवरील मोठमोठे वृक्ष, आणि समोरच्या बाजूस खालचा दरीचा प्रदेश, असे मोठे सुंदर दृश्य दिसले. स्वामी स्वाहानन्दांनी सकाळी आठ वाजता न्याहारीसाठी बोलावले होते. अनंतरावांनी मला तेथे पोचवले व ते आपल्या कामाला गेले. यार्दी कुटुंबाचा आणि स्वाहानन्दांचा चांगला परिचय आहे, त्यामुळे माझे स्वागत विशेष आस्थापूर्वक झाले. स्वाहानन्द अतिशय प्रसन्न आणि मनमोकळे, त्यांच्या सहवासात दोन तास कोठे गेले ते कळलेही नाही. होलीवुडच्या

सेटरमध्ये मी जाऊन आलो हे ऐकून त्यांना बरे वाटले.

''तुम्ही पुणे विद्यापीठात होता काय'', असा प्रश्न स्वाहानन्दांनी मला केला. फर्गसन महाविद्यालयात मराठी विभागाचा प्रमुख होतो, त्या वेळी पदव्युत्तर विभागात शिकवण्यासाठी सतरा वर्षे विद्यापीठात जात असे, आणि निवृत्तीनंतर आठनऊ वर्षे उलटल्यावर नव्याने निर्माण केल्या गेलेल्या श्रीज्ञानदेव अध्यासनावर निमंत्रित प्राध्यापक म्हणून साडेतीन वर्षे होतो, हा तपशील सांगितला. ''रामकृष्ण आणि विवेकानन्द'' हे इंग्रजीतील पुस्तक पाहून त्यांनी अतिशय समाधान व्यक्त केले. पण या विषयावर कितीतरी अधिकारी व्यक्तीनी ग्रंथलेखन केले आहे, असे म्हणून तो विषय मी बाजूला ठेवला. रामकृष्ण संघातील हे संन्यासी भोवतालच्या विलासी वातावरणाशी सतत संपर्क येत असून व्रतस्थ जीवन व्यतीत करतात, आणि त्यांच्या संपर्कात आल्यामुळे येथील समाजाला भारतीय संस्कृतीचे सत्त्व ज्या आध्यात्मिक धारणेत साठवलेले आहे तिचा परिचय घडतो, एवढेच नव्हे, तर नित्याच्या व्यवहारात होणारा त्याचा आविष्कार पाहावयास मिळतो. अशा धारणेच्या व्यक्तीसमोर आपण आपली नम्रता जपणे हिताचे असते.

नंतरच्या संवादात काही माहिती करून घेतली. अमेरिकेत एकूण पंचवीस संन्यासी व तितकेच ब्रह्मचारी सध्या आहेत. शिक्षणवर्गासाठी ब्रह्मचाऱ्यांना भारतात पाठवीत नाहीत. त्यांचा तो अभ्यास येथेच करून घेतला जातो. संन्यास घेण्यासाठी मात्र बेलूर मठात जावे लागते. गेल्या तीनचार महिन्यांत अमेरिकेतील तीन संन्यासी कालवश झाले. त्यांतील स्वामी अशेषानन्दाचे वय पंचावनच्या पुढे होते. त्यांची आध्यात्मिक धारणा वरच्या दर्जाची होती. स्वामी भाष्यानन्दांनी मोठेच कार्य केले, त्यांनी सुमारे पंधरा दिवसांपूर्वी या जगाचा निरोप घेतला होता. भाष्यानन्द पूर्वाश्रमीचे मराठी बोलणारे. त्यांचा-माझा नागपूर मठात परिचय झाला होता व पुण्यातही भेट झाली होती, हे स्वाहानन्दांना सांगितले

होलीवुडच्या सेटरमध्ये एक संन्यासी भगव्या वस्त्रात दिसले नाहीत, याबद्दल विचारता स्वाहानन्द म्हणाले, ''सतत भगवी वस्त्रं घातली तर या देशातील सर्वसामान्य माणसं फार जवळ येत नाहीत, असा अनुभव येतो. पाश्चात्त्य वेष अंगावर असला की, ती अधिक मनमोकळेपणानं बोलतात. त्या दृष्टीनं आम्ही कधी भगवी वस्त्रं परिधान करतो, तर कधी पाश्चात्त्य वेष. पण सेटरचा विशेष कार्यक्रम असतो तेव्हा मात्र भगवी वस्त्रंच असतात. बौद्ध भिक्षू नेहमी त्यांच्या परंपरागत पीतवस्त्रांत असतात. त्यांना मी त्यांचा अनुभव विचारला, तर त्यांनीही लोक थोडे दूर राहतात, हे मान्य केलं.'' आपला विचार समाजात पोचवावयाचा असेल, तर लोकसंपर्क महत्त्वाचा. अमेरिकेत असताना विवेकानन्द बहुतेक वेळा पाश्चात्त्य वेष घालत असत, हे त्यांच्या अनेक छायाचित्रणांत आपल्याला पाहावयास मिळते. त्या दृष्टीने

स्वाहानन्दानी जे सांगितले ते पूर्ण पटण्यासारखे होते. थोड्या वेळाने होलीवुडला जाण्यासाठी ते आत जाऊन बाहेर आले, तर आधीची भगवी वस्त्रे नव्हती. पॅटशर्ट हा पोषाख त्यांनी केला होता. त्या वेषात ते एकदम फार निराळे दिसले. त्याचे संन्यासव्रत ध्यानात येणेही शक्य नव्हते.

स्वाहानन्द निघण्यापूर्वी सातआठ महिला आल्या. त्या साऱ्या येथील सेटरशी संबंधित होत्या. सेटरच्या आवाराला लागूनच स्त्रियासाठी चालवले जाणारे स्वतत्र केन्द्र आहे. तेथे त्या सर्वाचे वास्तव्य असते. १९५३-मध्ये भारतात स्वतंत्र सारदामठ स्थापन झाला, आणि त्यात संन्यासिनी असतात. पण अमेरिकेतील महिलाकेन्द्रे त्याच्या आधीपासून सुरू झालेली आहेत,आणि आजही त्यांचा सारदामठाशी काही संबंध नाही. होलीवुड सेंटरच्या महिन्याच्या कार्यक्रमपत्रिकेत प्रवचन करणाऱ्यांमध्ये दोनतीन स्त्रियांची नावे दिसली होती; त्याचा यामुळे उलगडा झाला. सेटरच्या कामामध्ये या महिलांचा दैनंदिन संबंध असतो. निवासस्थान आणि भोजनगृह मात्र स्वतंत्र इमारतीत असतात. तेथे संन्यासी वा ब्रह्मचारी जात नाहीत. सेटरमध्ये त्या महिला दिवसभर आपल्याला दिलेले काम करतात. भारतातील रामकृष्ण मठ किंवा रामकृष्ण मिशन यांच्या शाखांतील व्यवस्था अगदी वेगळी असते. तेथील सर्व कामे पुरुषच करतात. पंधरावीस मिनिटे त्या सर्व जणींशी स्वाहानन्दांचे काही संभाषण झाले, आणि दहा वाजता ते गाडीत बसले. त्या सर्व स्त्रियांनी त्यांना पदस्पर्शपूर्वक प्रणाम केला. मीही प्रणाम करून त्यांचा निरोप घेतला.

## पॅसिफिकच्या तीरावरील सांता बार्बरा

त्यानंतर सेटरचा परिसर पाहिला. आम्ही बसलो होतो त्या इमारतीत येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना भेटण्यासाठी प्रशस्त जागा होती. झोपण्यासाठी एकदोन खोल्या, इतर दोनतीन खोल्या, स्नानगृह, पाकशाळा, आणि भोजनगृह अशी एकूण व्यवस्था होती. आसपास बागेत फुलझाडे होती. हा परिसर एका उंच टेकडीच्या छोट्याशा पठारावर आहे. पश्चिमेकडे पाहिले, तर खालच्या बाजूस दरी व काही घरे दिसली. डाव्याउजव्या बाजूंना डोंगर होते, आणि समोर पॅसिफिक महासागराचा विस्तार होता. दृश्य अतिशय सुरेख होते. सेंटरचा हा एकूण परिसर जनवस्तीपासून थोडासा बाजूला व एकांतवासात राहण्याचा आनंद देणारा होता. सारी व्यवस्था पाहणारे पन्नाशीच्या जवळ आलेले एक अमेरिकन होते. त्यांनी मला शेजारी असलेल्या मंदिरात नेले. तेथे श्रीरामकृष्णांचे भव्य तैलचित्र होते. गाभारा संपताच दोन बाजूंना दोन भिंतींवर एका बाजूला गौतमबुद्ध तर दुसऱ्या बाजूला येशू ख्रिस्त यांची उभ्या राहिलेल्या अवस्थेतील मोठी तैलचित्रे होती. येथे रविवारची प्रवचने होतात, त्यासाठी सुमारे शंभरसव्वाशे व्यक्ती येतात. दीड लाख वस्तीच्या सांता बार्बराच्या मानाने ही संख्या चांगली वाटली. त्या

साप्ताहिक प्रवचनासाठी होलीवुडच्या सेटरमधून कोणीतरी येतात.

येथील सारी देखभाल पाहणारी ती अमेरिकन व्यक्ती संन्यासी नव्हती. विवाह केला होता. एक मुलगा आहे. पण पुढे घटस्फोट घेतला. कुटुंबियांशी विशेष संबंध ठेवलेला नाही. आईवडील आहेत, त्यांच्याशी दूरभाषवरून अधूनमधून संपर्क साधतात. आठवड्यातून चारपाच दिवस ते येथे बहुतेक वेळा एकटे असतात. शेजारच्या महिला निवासातील स्त्रियांना त्यांची सोबत आहे. कोणत्या कारणामुळे तुम्ही या सेंटरकडे आकृष्ट झालात, असा प्रश्न मी केला असता त्यांनी म्हटले, ''श्रीरामकृष्णांचं जगन्मातेशी असलेलं जे नातं त्यांच्या संवादांतून आढळतं, ते मला विशेष भावलं.'' अशा प्रकारचा संवाद थोड्या वेळाच्या पहिल्या भेटीत तरी एका मर्यादेत ठेवावा लागतो. अर्धा तास होत होता, एवढ्यात अनंतरावांचा महाविद्यालयात शिकत असलेला मुलगा जेसर गाडी घेऊन आला आणि मी निरोप घेतला.

मला शहरात फिरवून आणावे, असे जेसरला वडिलांनी सांगितले होते. सांता बार्बरा मिशन म्हणून दीडदोनशे वर्षापूर्वीची इमारत आहे, तेथे तो मला घेऊन गेला. या शहराचे ते मुख्य सांस्कृतिक स्थान म्हणता येईल. इमारत आडवीच्या आडवी आहे. बऱ्याच खोल्या बंद होत्या. एकदोन खोल्या उघड्या होत्या, पण त्यांमध्ये विशेष काही नव्हते. एक दुकान होते. त्यात ख्रिस्त आणि ख्रिस्तधर्म यांवरील पुस्तके, ख्रिस्त आणि माता मेरी यांचे छोटेछोटे पुतळे, अनेक आकारांतील कमीअधिक किमतीचे क्रॉस, काही चित्रे, व ख्रिस्तधर्माशी संबंधित अशा वस्तू विक्रीसाठी होत्या. या जुन्या आणि धार्मिक वास्तूची पुरेशी देखभाल केली जात आहे, असे वाटले नाही. ते काम करणाऱ्या पुरेशा व्यक्ती मिळत नसाव्यात. इमारतीच्या समोर खूप मोकळी जागा होती. एक मोठी गाडी येऊन उभी राहिली, आणि तीमधून तीसचाळीस प्रवासी उतरले. सांता बार्बराला येणारे प्रवासी येथे आवर्जून येतात.

तेथून आम्ही समुद्रावर गेलो. किनाऱ्यावर उभे राहिल्यावर महासागराचा क्षितिजाशी भिडलेला विस्तार दृष्टीसमोर आला. काही छोट्या होड्या तर चारपाच यांत्रिक नौका उभ्या होत्या. समुद्रात फेरी मारून येण्याची सोय होती शहराच्या मुख्य रस्त्यांवरून आणि बाजारातून एक फेरी मारून बारानंतर आम्ही अनंतरावांच्या कार्यालयात गेलो. अमेरिकेच्या समृद्धीला शोभेल असे सारे काही तेथे होते. आधुनिक उपकरणानी सुसज्ज आणि वैभवशाली अशी तेथील सारी व्यवस्था होती. हा अनंतरावांचा स्वतंत्र व्यवसाय आहे. स्वतःच्या कर्तृत्वावर उभा केलेला. सत्तरऐंशीपर्यत कर्मचारी असावेत. स्वागतकक्ष, इतर विभाग, अनेक टकलेखक आणि वरच्या श्रेणीतील विभांगाचे प्रमुख होते. व्यवस्थापनाचे निरनिराळे भाग होते. कॉम्प्युटरशी संबंधित असा हा व्यंवसाय होता. मालकांचा मुलगा माझ्याबरोबर फिरत होता, सर्वत्र आदबशीर स्वागत होत होते.

एका भारतीय व्यक्तीने आपला स्वतःचा एवढा व्यवसाय उभा करून आपल्या हाताखाली अनेक अमेरिकन नोकरीस ठेवावेत, याचा मला अभिमान वाटला. जेसर, अनंतराव, आणि मी एका विश्रामगृहात नंतर जेवण घेत असताना मी माझा हा भाव व्यक्त केला. अनंतराव दिल्लीच्या आय. आय. टी. त पदवी घेतल्यावर अमेरिकेत आले. प्रथम काही वर्षे नोकरी करून नंतर हा स्वतंत्र व्यवसाय त्यांनी उभा केला. एका ऑस्ट्रेलियन युवतीशी त्यांचा प्रेमविवाह झाला आहे. त्यांच्याव्यतिरिक्त कुटुंबातील इतर कोणाला मराठी येत नाही. वळणावळणाच्या मार्गाने टेकडीवरील सुरेख रस्त्याने गेल्यावर असलेले त्यांचे निवासस्थान एका प्रशस्त आवारात आहे. त्यांच्या वैभवाची साक्ष तेथेही पटते. आपल्या वडिलांचे मित्र या नात्याने ते माझी सारी देखभाल अतिशय आस्थेने करीत होते. कॅलिफोर्नियातील हे छोटेसे सुंदर शहर त्यांच्यामुळे पाहता आले.

तेवीस ऑक्टोबर. कुटुंबियांचा निरोप घेतला, आणि अनंतरावांच्या बरोबर विमानतळावर आलो. सूर्योदय होण्यास अद्याप थोडा अवकाश होता. सात वाजता विमानाने आकाशात झेप घेताच समोर पॅसिफिकचा विस्तार क्षणभर डोळ्यांत भरला. पाचसात मिनिटे खाली डोंगरांच्या रांगा दिसत होत्या, आणि त्यानंतर ते दिसेनासे झाले. विमान ढगांच्या वर गेले. मला खिडकीजवळची जागा मिळाली होती. सर्वत्र विखुरलेले ढगांचे पांढरे भुरके पुंजके थेट क्षितिजापर्यंत खालच्या बाजूस दिसत होते. उगवत्या सूर्याचे किरण त्या ढगांवर पडले, आणि सर्वत्र गुलाबीकेशरी रंगांच्या सतत बदलत चाललेल्या मनोहर छटा दहापधरा मिनिटे दिसत राहिल्या. सूर्योदयाचे हे एक आगळेवेगळे दर्शन मला घडत होते. ढगांमुळे सूर्य दिसणे शक्य नव्हते. पण त्याच्या किरणांचे नयनरम्य विलसित मात्र पाहावयास मिळाले. सूर्योदयाच्या आगेमागे जमिनीवरून वर आकाशात दिसणाऱ्या ढगांवरील रगांचा खेळ आजवर अनेक वेळा पाहिला होता. आज तीच शोभा मी ढगांच्या वरच्या बाजूने सर्वदूर पसरलेली पाहात होतो. सूर्य वर येताच सारे रंग नाहीसे झाले, आणि सर्वत्र पांढरा पिंजलेला कापूस पसरलेला असावा तसे ढगांचे रूप होऊन गेले. हळूहळू ढग दाट आणि काळसर होत गेले तास सव्वा तासानंतर मी सॅनफ्रॅन्सिस्कोच्या विमानतळावर उतरलो, तेव्हा आकाश चांगलेच भरून आले होते.

## सॅनफ्रॅन्सिस्कोचे स्वामी प्रबुद्धानन्द

रेखाताई राव यांची मैत्रीण कल्पना देसाई. त्या मला उतरून घेण्यासाठी आल्या होत्या. त्या गुजराती आहेत, इकडे येऊन पंचवीस वर्षे होत आली एशियन आर्ट्स म्युझियममध्ये नोकरी करतात. आकाशात उंच गेलेले प्रचंड उच खाब, त्याना आडव्या जोडणाऱ्या पुलाच्या वरच्या बाजूस असलेल्या प्रचंड जाडजूड अशा मध्यावर झुकलेल्या

लोखंडी तारा, आणि त्यांच्या तुलनेने कमी जाड अशा या टोकापासून त्या टोकापर्यंत असलेल्या उभ्या तारा, अशी खाडीवरील प्रचंड लांबीचा वैशिष्ट्यपूर्ण पूल ही सॅनफ्रॅन्सिस्कोची कोणत्याही छायाचित्रात दिसणारी ठळक खूण आहे. गच्च भरून आलेल्या हवेत तो पूल शहरात शिरल्यावर किंचितसा पुसट असा दिसला. तशाच आराखड्याचे आणखीही दोन पूल आहेत. त्या सर्वावरून जाण्याचा योग दुसरे दिवशी यावयाचा होता. शहराच्या भर वस्तीत असलेल्या वेदान्त सोसायटीमध्ये कल्पनाताईनी मला नेले. स्वामी स्वाहानन्दांनी काल केलेला, मी आज सकाळी येत असल्याचा दूरभाष तेथे पोचला होता. त्यामुळे सारी व्यवस्था लगेच झाली. ''वेदान्त सोसायटी ऑफ नॉर्दर्न कॅलिफोर्निया'' हे या केन्द्राचे नाव. स्वामी प्रबुद्धानन्द हे तेथील अध्यक्ष. त्यांची भेट होताच कल्पनाताईनी निरोप घेतला. त्याना द्यावेत तेवढे धन्यवाद थोडे होते. ना ओळख ना पाळख. पण अमेरिकेतील या प्रचंड शहरात सुमारे वीस मैल दूर असलेल्या विमानतळावरून त्यांनी मला इच्छित स्थळी आणून पोचवले होते. मी डलासला उतरल्यापासून सॅनफ्रॅन्सिस्कोला पोचेपर्यंत रेखाताई सतत माझ्या व्यवस्थेची चौकशी करीत होत्या. मी काय करू शकत होतो? कल्पनाताईना म्हटले, ''तुम्ही दूरभाष कराल, तेव्हा रेखाताईना माझा नमस्कार सांगा.''

एका अमेरिकन महिलेने सोसायटीची सारी इमारत दाखवली. ही इमारत मध्यवस्तीत म्हणता येईल अशा भागात आहे. रुंद असा रस्ता समोर होता, आणि दोन्ही बाजूंना एकाला एक सलग अशा तीनचार मजली इमारती उभ्या होत्या. सोसायटीचे उत्तम ग्रंथालय व ग्रंथविक्रीकेन्द्र आहे. स्वतंत्र विवेकानन्द सभागृह आहे. तेथे दीडशेपर्यंत खुर्च्या आहेत. मुख्य मंदिर म्हणजे एक प्रशस्त सभागृह आहे. वरच्या बाजूस ॐ हा परब्रह्मवाचक शब्द आहे, त्याच्या खाली आडव्या चौथऱ्यावर श्रीरामकृष्ण, श्रीसारदामाता, आणि विवेकानन्द यांच्या प्रतिमा आहेत, आणि त्याच रांगेत एका बाजूला गौतमबुद्ध तर दुसऱ्या बाजूला येशू ख्रिस्त यांच्या प्रतिमा आहेत. सर्वांची नित्यपूजा एकत्रित केली जाते. तेथेच साप्ताहिक प्रवचने रविवारी होतात, सुमारे दीडशे खुर्च्या आहेत. याशिवाय आठवड्यातून तीन दिवस एखाद्या ग्रंथावर वा विषयावर वर्ग चालू असतो. त्या वर्गाला तीस-चाळीस व्यक्ती येतात, तर रविवारी ही संख्या सव्वाशेच्या आसपास असते. सहा ते चौदा या वयोगटातील मुलांसाठी एक संस्कारवर्ग घेतला जातो. सर्व धर्मातील श्रेष्ठ विभूतींची चरित्रे त्यांना सांगितली जातात. श्रीसारदा लायब्ररी या नावाचे वाचनालय आहे. मरीन काउंटीमधील ओलेमा येथे जवळच एक आध्यात्मिक केन्द्र आहे. ध्यान, प्रार्थना आणि वाचन यांसाठी कोणीही तेथे जाऊ शकतो. तेथेही एक छोटे ग्रंथालय आहे.

कॅलिफोर्नियातील आपले सहा महिन्यांचे वास्तव्य संपत येत असताना १९००- च्या

जूनमध्ये विवेकानन्दांनी या सोसायटीच्या कामाचा प्रारंभ केला, आणि लगोलग स्वामी तुरीयानन्दांना या भागात पाठवले. ते दोन वर्षांनी भारतात परत आले, तोवर विवेकानन्दांनी इहलोकाचा निरोप घेतला होता. त्यानंतर स्वामी त्रिगुणातीतानन्द आले. सॅनफ्रॅन्सिस्को येथे १९०६-च्या जानेवारीत एका तीनमजली वास्तूमधील स्वतंत्र सभागृहात त्यांनी श्रीरामकृष्णांचे मंदिर उभे केले. ते अमेरिकेतील पहिले मंदिर, आणि ते ''हिंदू टेंपल'' म्हणून प्रसिद्ध झाले. वेदान्त सोसायटीची नवीन इमारत उभी राहिल्यावर तिला न्यू टेंपल हे नाव मिळाले, आणि आधीची वास्तू ओल्ड टेंपल या नावाने ओळखली जाऊ लागली. पूर्वीचे श्रीरामकृष्णमंदिर आजही तसेच आहे. त्या इमारतीतील एका स्वतंत्र खोलीमध्ये माझी निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने अमेरिकेतील एका फार महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तूमध्ये आपण राहिलो आहोत, असा भाव मनात होता.

ही वास्तू भर वस्तीमध्ये आहे, आणि तेथून आताच्या वेदान्त सोसायटीची तीनमजली इमारत दोन रस्ते पलीकडे पाच मिनिटांच्या अंतरावर आहे. हा सारा भाग एका उंच टेकडीच्या उतारावर आहे. ओल्ड टेंपलमधून सोसायटीच्या इमारतीत जाताना सारा चढाचा रस्ता आहे. अध्यक्ष स्वामी प्रबुद्धानन्द यांचे वास्तव्य वेदान्त सोसायटीच्या इमारतीत आहे. आधुनिक सर्व सुविधा उपलब्ध आहेत. रात्रीची वेळ सोडली, तर माझा बहुतेक वेळ वेदान्त सोसायटीत गेला. स्वाहानन्दांचा दूरभाष आधी आला असल्यामुळे असेल, पण कोणत्याही स्वरूपाचा पूर्वपरिचय झालेला नसतानाही प्रबुद्धानन्दांच्या माझ्याशी वागण्यात आरंभापासून कमालीचे प्रेम आणि मोकळेपणा होता. अनेक प्रश्न विचारून त्यांनी माझी माहिती आरंभीच करून घेतली. अमरिकेतील एका महत्त्वाच्या केन्द्राचे ते प्रमुख होते. सदुसष्ट-अडुसष्ट वय आहे. प्रकृती उत्तम आहे. त्यांची नुसती दृष्टी आपल्या मनात एक विश्वास आणि जवळीक निर्माण करून जाते.

अनेक सुशिक्षित पाश्चात्त्य व्यक्ती येथे येत असतात, आणि त्यांचे मार्गदर्शन घेतात. वेदान्तावरील त्यांची प्रवचने प्रत्येक आठवड्याला होत असतात, वर्ग तर चालू असतातच. अशा अधिकारी व्यक्तीचा मनमोकळा सहवास हा एक मोठा योग होता. त्यांच्याशी नाना विषयांवर सर्व वेळ संवाद चालू होता. १९७०-पासून येथे असलेले प्रबुद्धानन्द भारतीय आहेत, त्यांचे सहकारी असलेले स्वामी वेदानन्द अमेरिकन आहेत. तुरीयानन्दांनंतरच्या स्वामी प्रभवानन्दांपासून थेट अलीकडच्या स्वामी अशोकानन्दांपर्यंत एकेक समर्थ संन्यासी या सोसायटीचे कार्य वाढवीत राहिले आहेत. आजचे नेतृत्वही तेवढेच समर्थ आहे आणखी एकजण होते ते ब्रह्मचारी त्यागीशचैतन्य. तेही अमेरिकन. या इमारतीपासून जवळच स्वतंत्र महिलानिवास आहे. तेथे सेंटरशी संबंधित आणि दैनंदिन कामात सहभागी होणाऱ्या पंधरासोळा महिला राहतात.

जगाच्या सांस्कृतिक इतिहासावरील कोणताही ग्रंथ असला, तर भारताविषयी लिहिताना त्यामध्ये गौतम बुद्धाचा उल्लेख सर्वप्रथम येतो, व त्याला एक श्रेष्ठ विभूती म्हणून मानाचे स्थान दिले जाते. हे सर्वथा योग्य आहे. पण तत्त्वज्ञानविचारांचा उल्लेख येतो, तेव्हा बुद्धाच्या शिकवणुकीतील अहिंसा, करुणा, आणि सर्वसामान्यांशी जवळीक एवढ्या मर्यादेत तो राहतो. पुढच्या काळातील हिंदू धर्म तो बुद्धाच्या काळातील वैदिक धर्म, आणि त्यातील ऋग्वेदाचा काळ सहासातशे वर्षे आधी, आणि उपनिषदे त्यानंतर थोड्या शतकांतील. त्यावर आधारलेल्या भगवद्गीतेला साऱ्या जगात एक आध्यात्मिक आणि तत्त्वज्ञानपर ग्रंथ म्हणून मान्यता लाभलेली आहे. इंग्रजीतील " The Song Celestical" हे तिचे भाषांतर प्रसिद्ध आहे. अनेक भाषांमध्ये गीतेचा परामर्श घेतला गेला आहे. एवढे सारे असून गौतम बुद्धाचा उल्लेख येतो त्या तुलनेने त्याच्या आधी किमान पाचसहाशे वर्षे होऊन गेलेल्या भगवान श्रीकृष्णाचा उल्लेख प्रामुख्याने केला जात नाही. गीतेचा उल्लेख येतो, पण ती गीता सांगणाऱ्याचा येत नाही. शिवाय श्रीकृष्ण काही केवळ ग्रंथकार नव्हता. सर्वांगीण दृष्टीने विचार करता तो एक आदर्श मानव होता, आणि तत्त्वज्ञान प्रत्यक्ष जगणारा होता. जीवनाच्या हरएक टप्प्यात त्याचे श्रेष्ठत्व प्रतीत होते. त्याचे नाव मात्र बुद्धाप्रमाणे येत नाही. प्रबुद्धानंन्दांशी बोलताना मी हा प्रश्न एकदा उपस्थित केला. श्रीकृष्ण ही प्रत्यक्ष होऊन गेलेली ऐतिहासिक व्यक्ती आहे की नाही, याबद्दल पाश्चात्त्य संशोधकांना फार शंका होती, तिचा हा परिणाम आहे; असे ते म्हणाले. ''परमेश्वराचा अवतार आणि तो युद्ध करावयास सांगतो हे समजून घेणे अवघड जात असेल का'', असे मी म्हटले. प्रबुद्धानन्द म्हणाले, 'तेही एक कारण असू शकेल.''

## मेरी ल्युई बर्क यांची भेट

मेरी ल्युई बर्क सॅनफ्रॅन्सिस्कोला राहतात, असे मी ऐकलेले होते. दुपारच्या जेवणाच्या वेळी मी सहज म्हटले, ''शक्य असेल तर बर्क यांची भेट व्हावी, अशी इच्छा आहे.'' जेवण होईतो दीड वाजून गेला होता. थोड्या वेळाने प्रबुद्धानन्द मला म्हणाले, ''अडीच वाजता बर्क येथे येतील.'' मला आश्चर्यच वाटले. इतक्या सहजपणे ही भेट घडेल अशी अपेक्षा नव्हती. पण नंतर समजले की, त्या जवळच असलेल्या महिलाकेन्द्रात राहतात. तेथे एकूण पंधरासोळा स्त्रिया आहेत. त्यांचे वय आता ब्यांयशीत्र्यांयशी वर्षाचे आहे. ही एक अडचण ठरण्याची शक्यता आहे असेही मनात होते. पण तसे काही झाले नाही. माझा भेटीचा योग होता, एवढेच म्हणता येते. ठरल्याप्रमाणे त्या बरोबर अडीच वाजता आल्या. मध्यम आकाराची देहयष्टी, प्रकृती छान, मुद्रा शांत, आणि प्रवृत्ती स्वागतशील, असे त्यांचे एकूण दर्शन होते. आम्हा दोघांची एका स्वतंत्र खोलीत बसण्याची व्यवस्था केली होती. त्यानंतर सारा संवाद

आम्हा दोघांमध्ये झाला. सुरुवातीलाच मी त्यांच्याबद्दल माझी आदराची भावना व्यक्त केली. त्या अविवाहित आहेत आणि नात्यागोत्यातील जवळचे कोणी नाही, हे संवादात समजले.

रामकृष्णविवेकानन्दांच्या परिवाराबाहेर इतरांना हे नाव माहीत असण्याची शक्यता नाही. पण ही एका अतिशय अभ्यासू, संशोधक, आणि तितक्याच निष्ठावंत व समर्पित वृत्तीच्या व्यक्तीची भेट होती. त्यांनी केलेल्या विवेकानन्दविषयक संशोधनाच्या कार्याबद्दल बेलूर मठाकडून त्यांना अतिशय महत्त्वाचा मानला जाणारा स्वामी विवेकानन्द पुरस्कार देण्यात आला आहे. रामकृष्ण संघ ही संन्याशांनी चालवलेली आध्यात्मिक संस्था असली, तरी तेथे विद्यापीठीय शिस्तीने केल्या जाणाऱ्या अभ्यासाला व ग्रंथलेखनाला फार महत्त्व दिले जाते. बर्क यांनी केलेले काम त्या प्रकारचे आहे. विवेकानन्द आपल्या पहिल्या भेटीत साडेतीन तर दुसऱ्या भेटीत दीड, अशी एकूण पाच वर्षे अमेरिका, इंग्लंड, आणि युरोपातील काही देश, येथे संचार करीत होते. त्याविषयीची सर्वसामान्य माहिती त्यांच्या चरित्रांतून आपल्याला वाचावयास मिळते. पण सुमारे पंचेचाळीस-शेहेचाळीस वर्षांपूर्वी बर्क यांच्या असे ध्यानात आले की, त्यांच्या या वास्तव्यातील अनेक गोष्टी अज्ञात राहिल्या आहेत.

१९५० साली न्यूयॉर्कमध्ये राहात असताना वेदान्त सोसायटी ऑफ नॉर्दर्न कॅलिफोर्निया या संस्थेतील कोणातरी सदस्याने सुचवल्यावरून, न्यूयॉर्क, बाल्टिमोर, आणि बॉस्टन येथील ग्रंथालयांत विवेकानन्दांवरील काही जुने लेख आढळतात का, हे पाहण्यास बर्क यांनी प्रारंभ केला. त्यांच्या हातून पुढे व्हावयाच्या एका फार मोठ्या कामाचा हा प्रारंभ होता, अशी पुसटशीही कल्पना त्या वेळी त्यांना नव्हती. सामग्री हाताशी येत गेली, तसतशी त्यांच्या शोधाची कक्षा वाढत गेली. त्या संकलनावर आधारलेला "Swami Vivekananda in the West : New Discoveries" हा त्यांचा दोन खंडांतील ग्रंथ १९५७ साली प्रथम प्रसिद्ध झाला. पण त्यांचे काम चालू राहिले, आणि काही भर घातलेली त्याची दुसरी आवृत्ती १९६६-मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतरही हे संशोधन चालू राहिले, आणि त्याचे फलित म्हणून १९८३ ते ८७ या अवधीत त्या ग्रंथाची तिसरी आवृत्ती बाहेर पडली. एकूण छत्तीस-सदतीस वर्षे विवेकानन्दांच्या पाश्चात्त्य देशांतील वास्तव्यामधील बारीकसारीक घटनांचा विश्वसनीय तपशील गोळा करण्यात व त्यावर आधारलेले लेखन करण्यात बर्क गुंतलेल्या होत्या. त्यांच्या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रत्येकी पाचशे पृष्ठाचे सहा खंड आहेत. एवढयावरून त्यांच्या कामाची व्याप्ती ध्यानात येण्यासारखी आहे. सॅनफ्रॅन्सिस्कोच्या वेदान्त सोसायटीचे प्रमुख आणि आपले गुरू, स्वामी अशोकानन्द यांच्या प्रेरणेमुळे आणि प्रोत्साहनामुळे आपण हे काम पूर्ण करू शकलो, असे त्यांनी आपल्या अर्पणपत्रिकेत म्हटले आहे

या सहा खंडांतून दिलेला हरएक तपशील तावूनसुलाखून आणि सर्व प्रकारे तपासून

मगच बर्क यांनी स्वीकारलेला आहे. हे चरित्र नाही, तर माहितीचे अनेक कण गोळा करण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे, असे त्यांनी प्रस्तावनेत नमूद केले आहे हे तपशील गोळा करण्यासाठी, विवेकानन्द जेथे जेथे गेले, त्या त्या गावात बर्क गेल्या. ते जेथे राहिले होते त्या जागा त्यांनी पाहिल्या. त्या वेळच्या स्थानिक वृत्तपत्रांतून त्या त्या वेळी जी म्हणून बातमी, मुलाखत, किंवा एखादा लेख आलेला आढळला, तो तो संग्रहित केला. विवेकानन्द ज्यांच्याकडे राहिले होते, त्या कुटुंबातील आजच्या पिढीमधील व्यक्तीना भेटल्या. त्यांनी आपल्या वडीलधाऱ्या व्यक्तींकडून ऐकलेल्या आठवणी गोळा केल्या. विवेकानन्दांच्या संदर्भात कोणा व्यक्तीने कोणाला तरी लिहिलेल्या पत्रांत काही उल्लेख आढळतात का, याचा मागोवा घेतला. त्यांची व्याख्याने व मुलाखती यांचे वृत्तांत निरनिराळ्या वृत्तपत्रांवरून संकलित केले. त्याच्या निवासाची हरएक जागा, संपर्कात आलेल्या व्यक्ती, आणि जेथे व्याख्याने वा वर्ग झाले त्या इमारती, यांची छायाचित्रे त्यांनी गोळा केली.

हा सारा तपशील बर्क यांनी निरनिराळ्या प्रकारे पडताळून पाहिला, त्या सर्वाचे पद्धतशीर वर्गीकरण केले, आणि टप्प्याटप्प्याची माहिती एकत्रित केली. विवेकानन्दांच्या परिचयात वा सहवासात आलेल्या हरएक व्यक्तीची अशीच तपशीलवार माहिती त्यांनी गोळा केली. विवेकानन्दांचे कार्य आपल्याला दोन विभागांत पाहता येते. श्रीरामकृष्णांच्या महासमाधीनंतर पंधरासोळा अंतरंगशिष्य एकत्रित आणून १८८६- मध्ये वराहनगर मठ उभा करणें, आणि १८९३ - च्या सप्टेंबरमध्ये अमेरिकेत शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्मपरिषदेतील अपूर्व यशानंतर पाश्चात्त्य देशांत वेदान्तविचाराचा प्रसार तर भारतात रामकृष्ण संघाची उभारणी करणे. यांतील दुसरा भाग प्राधान्याने त्यांच्या जीवितकार्याशी सबंधित आहे, आणि तो काळ एकूण नऊ वर्षांचा आहे त्यांतील पाच वर्षे ते पाश्चात्त्य देशांत फिरत होते हे ध्यानात घेतले, तर बर्क यानी शोध घेतला आहे तो कालखंड किती महत्त्वपूर्ण आहे, हे लक्षात येते.

त्याहून महत्त्वाची गोष्ट आहे ती अशी की, त्या कालखंडातील विवेकानन्दांचे कार्य जागतिक पातळीवरचे आहे. भारताच्या ज्ञात इतिहासात अशा स्वरूपाचे कार्य अन्य कोणा व्यक्तीने केलेले आढळत नाही. सहज मनात येऊन जाते की, असाच संचार विवेकानन्दांनी अमेरिकेत जाण्यापूर्वी भारतातही पावणेतीन-तीन वर्षे केला, आणि नंतरही जवळजवळ तेवढाच काळ केला. बर्क यांनी घेतला तसा विवेकानन्दांचा भारतसंचार, नाना व्यक्तीशी झालेल्या भेटीगाठी व संभाषणे, आणि त्यांनी दिलेली व्याख्याने आणि मुलाखती यांचा शोध घ्यावा, असे कोणी मनात आणले तरी ते शक्य होईल का? प्रयत्न केला तर काही माहिती कदाचित हाती लागेल, पण ती विशेष महत्त्वाची असेल असे म्हणवत नाही. इतिहासाविषयीची

अनास्था हे याचे प्रमुख कारण आहे. त्या त्या वेळी त्या त्या व्यक्तीनी घडलेल्या घटनांची नोंद ठेवली आहे, असे आपल्याकडे कोणाही व्यक्तीच्या बाबतीत घडलेले नाही.

## मेरी बर्क यांचे अमोल कार्य

बर्क यांनी विवेकानन्दांविषयीची यच्चयावत माहिती गोळा करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांचे एक निरीक्षण फार मार्मिक आहे. अमेरिकेत त्यांना अपार सामग्री गोळा करता आली. भारतातही आपल्या कामापुरता त्यांनी तसा थोडाफार प्रयत्न केला. पण त्यातून फारसे काही हाती लागले नाही. नरेन्द्र तरुणपणी कसा दिसत होता, त्याच्या जन्मघराची रचना कशी होती, तो केव्हा कोणता वेष करीत असे; किंवा श्रीरामकृष्ण दक्षिणेश्वरला येणाऱ्या लोकांना त्या त्या वेळी कसे दिसले, त्यांची शरीरयष्टी कशी होती, उंची किती होती, आणि वर्ण कसा होता, यांविषयीचे कोणतेही तपशील कोठेही नमूद केलेले आढळत नाहीत; असे बर्क यांनी खेदपूर्वक नमूद केले आहे. आज रामकृष्ण संघाच्या सर्व शाखांमधील मंदिरांतून श्रीरामकृष्ण, श्रीसारदामाता, आणि विवेकानन्द यांच्या प्रतिमा पूजास्थानी ठेवलेल्या आपण पाहतो. यांतील श्रीरामकृष्ण वगळता दुसऱ्या दोघांची छायाचित्रे त्यांच्या पाश्चात्त्य शिष्यांनी घेतलेली आहेत, हे आपल्याला समजते तेव्हा आपण त्यांचे किती ऋणी असावयास हवे, असे मनात आल्याशिवाय राहात नाही.

सर्वधर्मपरिषदेच्या वेळी विवेकानन्दांची छायाचित्रे अमेरिकेतील वृत्तपत्रांतून झळकली. पण त्याशिवाय त्यांची अनेक छायाचित्रे इतर व्यक्तींनी नंतर मुद्दाम घेतली आहेत, आणि तीच आज प्राधान्याने आपल्यासमोर आहेत. छातीवर दोन्ही हातांची घडी घातलेले, तेजस्वी मुद्रेचे आणि बोलके टपोरे डोळे असलेले, असे त्यांचे प्रभावी आणि रुबाबदार व्यक्तिमत्त्व मूर्तिमंत साकार करणारे जे छायाचित्र सर्वात लोकप्रिय आहे, ते एका छायाचित्रकाराने स्वतंत्रपणे घेतलेले आहे. अमेरिकेत त्यांच्या वापरातील काही वस्तू पुढील काळात तेथील वेदान्त सोसायटीतील प्रमुखांकडे कोणी कोणी आवर्जून आणून दिल्या आहेत. या सर्वांना फार मोठे मोल आहे, हे आपल्याला अगदी अलीकडे समजू लागले आहे. अखेर कोणाही श्रेष्ठ व्यक्तीचे कार्य आणि विचार महत्त्वाचे असतात हे तर खरेच. पण ते देणारा महापुरुष कसा दिसत होता, कोणाशी कसा बोलत होता, आणि निरनिराळ्या प्रसंगांत कसा वावरत होता, हे समजले तर त्याचे एक जिवंत दर्शन घडते. अशा तपशिलांमुळे आपण त्या व्यक्तीच्या सहवासात गेल्यासारखे वाटते, आणि मनाला एक प्रचीतीचा स्पर्श लाभतो. विवेकानन्दांनी ही दिशा आपल्या अनुयायांना भारतात परत आल्यावर दिलेली आहे, आणि त्यामुळे त्या वेळच्या कितीएक गोष्टी जशाच्या तशा आपल्यापर्यंत आल्या आहेत आणि अनेक वस्तूंचा

संग्रह ठिकठिकाणी केला गेला आहे. वस्तुनिष्ठ तपशिलांनाही काही महत्त्व असते. महेन्द्रनाथ गुप्त तथा श्री 'म' यांनी लिहिलेले श्रीरामकृष्णकथामृत मात्र असे अनेक तपशील देणारे आहे, हे मात्र खरे.

मी एक जिज्ञासू, भारतातून आलो आहे, आणि विवेकानन्दांवरील वाङ्मय वाचत राहिलो आहे, एवढी ओळख मी करून दिली; आणि बर्कना म्हटले, ''मी तुम्हाला तुम्ही केलेल्या अपार महत्त्वाच्या संशोधनामुळे उत्तम ओळखतो. भेट झाली याचाच मला आनंद आहे.'' साऱ्या वास्तव्यातील एकेका पर्वाची सारी संकलित माहिती सुसंगतपणे ग्रथित केल्यावर त्या त्या टप्प्यात काय साधले गेले, कोणत्या अडचणी समोर उभ्या राहिल्या, त्या हळूहळू निवारल्या कशा गेल्या, अनुकूल-प्रतिकूल अशा कोणत्या घटना घडल्या, आणि अखेर कार्याच्या दृष्टीने पाऊल कसे पुढे पडले, याचा चिकित्सक आढावा बर्क यांनी आपल्या ग्रंथात फार चांगला घेतला आहे. निरनिराळ्या वर्गातून आणि व्याख्यानांतून व्यक्त होत गेलेल्या विचारांचा त्यांनी घेतलेला मागोवा जितका सूक्ष्म तितकाच मर्मग्राही आणि विश्लेषणशील आहे. आपल्या पहिल्या वास्तव्यात विवेकानन्दांनी लंडनमध्ये जो अखेरचा वर्ग घेतला, त्याचा विषय ज्ञानयोग किंवा अद्वैत वेदान्त हा होता. बर्क यांना भारतीय तत्त्वज्ञानाची सखोल जाण आहे. त्या वर्गाचा त्यांनी दिलेला वृत्तांत वैचारिक पातळीवरून पाहता अतिशय वरच्या दर्जाचा आहे, असे सांगून ''आम्ही भारतीय तुमचे फार ऋणी आहोत'', असे मी म्हटले. त्यांनी असे गौरवाचे उद्गार अनेक मान्यवरांकडून व अधिकारी व्यक्तीकडून आतापर्यंत ऐकले असणार. त्यांना त्यात काय नवीन होते? ते बोलून दाखवण्याची मला मिळालेली संधी माझ्या दृष्टीने अपूर्वाईची होती इतकेच.

विवेकानन्दांवर बर्क यांची नितांत निष्ठा आहे, हे त्यांच्या शब्दाशब्दांतून जाणवत होते. आपले सारे आयुष्य त्यांनी त्यांच्या विचारांचा मागोवा घेण्यात व्यतीत केले आहे. दोन वर्षातून एकदा तरी त्या बेलूर मठात येतात, आणि महिना दोन महिने राहतात. मी जे काही म्हटले त्यातील गौरवाचा स्वीकार त्यांनी अतिशय नम्रपणे केला. रामकृष्ण संघ कोणत्या प्रकारचे काम करतो, भारताचा अध्यात्मविचार त्याच्याद्वारे आजही या विदेशात कसा पोचत राहिला आहे, आणि त्या क्षेत्रातील कार्याचा काय परिणाम होतो, याचे साक्षात दर्शन बर्क याच्याशी झालेल्या संवादात मला होत होते. वेदान्तविचार ही फार वरच्या दर्जाची गोष्ट आहे. त्याला हिंदू धर्माच्या चौकटीत बंदिस्त राहू न देता तो विवेकानन्दांनी जगातील साऱ्या धर्मजिज्ञासूंच्या समोर ठेवला आहे. त्या अधिष्ठानावर हरएक धर्मातील जे चांगले असेल त्याचा स्वीकार करून आणि अखेर त्या सर्वांच्या अतीत पोचून विश्वधर्माची दिशा कशी धरता येते, हे त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांतून आपण समजू शकतो.

एवढ्या व्यापक पातळीवरचा आणि अवघ्या मानवजातीकडे बंधुभावाने पाहणारा उदात्त विचार वॉशिंग्टनच्या राजकीय घडामोडींच्या केन्द्रस्थानी किंवा लॉस अँजेलिसच्या डाउन टाउन एरियात कोठे आढळेल, ही अपेक्षा करणे चूक आहे. प्रिन्स्टन विद्यापीठात अत्युच्च शास्त्रीय संशोधन करणाऱ्या एखाद्या आइनस्टाइनचे विचारही अत्यंत प्रगत अशा सुशिक्षित समाजात जेमतेम शेकडा एक टक्का व्यक्तीना परिचित असतील. नुसते नाव ऐकलेले असणे हे त्यासाठी पुरेसे नसते. आध्यात्मिक विचार तर त्याहून वरच्या स्तरावरचा, तरल संवेदनशीलतेची गरज असणारा, आणि विशुद्ध मनाने जीवनाचे श्रेय शोधणाऱ्यांनाच भावणारा असतो. तो इंद्रियांचे तर्पण करण्याचे नाना विषय आकर्षक पद्धतीने माणसांच्या समोर ठेवलेल्या बाजारात कसा सापडेल? होलीवुडला चित्रपटांची राजधानीही आहे, आणि छोटीशी वेदान्त सोसायटीही आहे. चित्रपट सारा दिवसभर कोट्यवधी लोक दूरदर्शनवर पाहात आहेत. वेदान्त सोसायटीत शांतपणे दिले जाणारे प्रवचन ऐकणारे आठवड्यातून एकदाच येतात, व संख्येने शंभराच्या आतबाहेर असतात. पण जीवनातील चिरंतन मूल्यांचा शोध घेणाऱ्या कार्याचे मोजमाप असे संख्येवर करता येत नाही. एखादी मेरी ल्युइसी भेटते, तिने चाळीस वर्षे केलेल्या तपश्चर्येचे तेज तिच्या मुद्रेवर दिसते, आणि त्यामुळे लाभलेले समाधान तिच्या दृष्टीत ओसंडत असते. एवढी प्रचीती पुरेशी असते.

बर्क अपासून इपर्यंत विवेकानन्दांचे जीवन जाणणाऱ्या होत्या. त्यांच्याजवळ माहितीला काय उणे होते? सारे ग्रंथ त्यांनी वाचले होते, सारे काही पुरे जाणून घेतले होते, आणि त्या प्रकाशात त्या वाटचाल करीत आल्या होत्या. विवेकानन्दांच्या चरित्रातील काही प्रसंगांबद्दल मी त्यांच्या प्रतिक्रिया समजून घेतल्या. काही ग्रंथांत काही उल्लेख वाचले होते त्याबद्दल त्यांचे मत विचारून घेतले. अतिशय मनमोकळेपणाने पण संयमित भाषेत त्यांनी प्रश्नांची उत्तरे दिली. त्यामुळे काही दिशा मिळून गेली. एवढ्या मोठ्या व्यक्तीशी मी तरी अधिक काय बोलणार? तरी त्यांनी आपला दीड तास माझ्यासाठी खर्च केला. या वयात दुपारची विश्रांती आवश्यक वाटते. पण तसे काही त्यांच्या बोलण्यात जाणवले नाही. ''बेलूर मठात केव्हा जाण्याचा विचार आहे'' असे मी अखेर विचारले. ते त्यांचे विश्रांतिस्थान आहे हे माहीत होते. चार वाजता आमचा हा संवाद संपला आणि मी त्यांच्याबरोबर प्रबुद्धानन्द बसले होते तेथे गेलो. दाराशी उभे राहून बर्कनी त्यांचा निरोप घेतला, आणि त्या परत गेल्या. त्यानंतर मी हिंदू टेंपलच्या इमारतीतील माझ्या खोलीत गेलो. रात्रीच्या जेवणासाठी पुन्हा सोसायटीच्या इमारतीत आलो. जेवणाच्या वेळी नाना विषयांवर गप्पा झाल्या. जीवनातील साऱ्या वासनाविकारांपासून दूर राहून व्रतस्थ जीवन नेणाऱ्या व्यक्तीशी होणारा संवाद एक निर्मल स्पर्श घेऊन देत असतो.

## कॅप टेलर आणि ओकलंड

हिंदू टेपलच्या इमारतीतून, दुसरे दिवशी सकाळी सेटरमध्ये सकाळचा नाश्ता झाला, आणि स्वामी वेदानन्द मला गाडीतून घेऊन निघाले. सत्तावीस-अठ्ठावीस मैल दूर असलेल्या कॅप टेलर या जागी आम्ही पोचलो. मुख्य रस्त्यापासून चालत थोडे आत गेलो. उंच डोंगर, दाट जंगल, मोठमोठे वृक्ष, असीम शांतता, रमणीय निसर्ग, या साऱ्यांची सोबत असलेली मनुष्यवस्तीपासून दूर अशी ती जागा होती. हिमालयातील शांत दरीची आठवण व्हावी अशी. १९०० साली सतत चारपाच महिने लॉस अँजेलिसपासून सॅनफ्रॅन्सिस्कोपर्यंतच्या कॅलिफोर्नियाच्या भागात अनेक व्याख्याने देऊन आणि वर्ग घेऊन शिणलेले विवेकानन्द या ठिकाणी मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात मिसेस हॅन्स्ब्रो, मिसेस ॲस्पिनॉल, मिस इडा ॲन्सेल, आदी पाचसहा अनुयायांसह तंबूमध्ये राहिले होते. थॉमस ॲलन आपल्या पत्नीसह अधूनमधून येऊन जास्त असत. एक छोटा ओहोळ जवळून जात होता. शेजारच्या लोहमार्गावरून एक छोटी गाडी जात असे, हात दाखवला की ती थांबत असे. थोड्या अंतरावर एक विश्रामगृह होते. तेथे शनिवाररविवारी कोणी कोणी सहलीसाठी येत असत. स्वयंपाक आणि जेवण यांसाठी एक, विवेकानन्दांसाठी एक स्वतंत्र, आणि इतरांसाठी तीन तंबू होते.

रात्रीच्या चांदण्यात तेथे ज्या ठिकाणी बसून विवेकानन्द सर्वांशी गप्पागोष्टी करीत, नेमक्या त्या जागेवर आम्ही दोघे उभे होतो. सुमारे शंभर चौरस फुटांच्या अर्धवर्तुळाकार रेषेत सरळ वर गेलेले आणि शंभरसव्वाशे फूट उंच असलेले चारपाच वृक्ष खडे होते. ते शंभर वर्षापूर्वीच्या त्या घटनेचे साक्षीदार होते. तेथे विवेकानन्दांचा सर्वांबरोबर आरण्यक सवाद चाले. सकाळच्या वेळी जागे झाल्यावर विवेकानन्द काही संस्कृत श्लोक किंवा स्तोत्रे म्हणत असत. त्यांच्या तंबूतून येणारा तो मधुरगंभीर स्वर कानांवर पडताच आपले मन मोहरून जात असे, अशी आठवण मिसेस रुरबाख यांनी सांगितली आहे. अनेक वेळा विवेकानन्द ध्यानस्थ बसत, आणि इतरांनाही ध्यान करण्यासाठी आपल्या सभोवती बसवीत. विवेकानन्दांच्या श्रेष्ठ आध्यात्मिक धारणेचा प्रत्यय अशा ध्यानाच्या वेळी विशेषेकरून येत असे, आणि त्याच्या नुसत्या आठवणीने आपल्या मनात अद्यापही एक विलक्षण शांतीचा भाव निर्माण होतो, अशी आठवण मिसेस हॅन्स्ब्रो यांनी कित्येक वर्षे उलटल्यावर सांगितली आहे. इतरांच्या आठवणीही तशाच प्रकारच्या आहेत. संध्याकाळच्या वेळी विवेकानन्द जवळच्या झाडीमधून दूरपर्यंत सर्वांबरोबर फिरावयास जात असत. शहरातील गजबजाटापासून दूर आल्यामुळे येथील शांत अरण्यवासात ते फार आनंदात होते. पंधरा दिवस विवेकानन्द जेथे राहिले होते, नेमके त्या जागेवर आपण उभे आहोत, ही जाणीव अंतःकरण पुलकित करून ेली.

त्यानंतर आम्ही ओकलंडकडे निघालो. वेदानन्दांशी काहीकाही संवाद सतत होत

## कॅप टेलर आणि ओकलंड

हिंदू टेंपलच्या इमारतीतून, दुसरे दिवशी सकाळी सेंटरमध्ये सकाळचा नाश्ता झाला, आणि स्वामी वेदानन्द मला गाडीतून घेऊन निघाले. सत्तावीस-अठ्ठावीस मैल दूर असलेल्या कॅंप टेलर या जागी आम्ही पोचलो. मुख्य रस्त्यापासून चालत थोडे आत गेलो. उंच डोंगर, दाट जंगल, मोठमोठे वृक्ष, असीम शांतता, रमणीय निसर्ग, या साऱ्यांची सोबत असलेली मनुष्यवस्तीपासून दूर अशी ती जागा होती हिमालयातील शांत दरीची आठवण व्हावी अशी. १९०० साली सतत चारपाच महिने लॉस अँजेलिसपासून सॅनफ्रॅन्सिस्कोपर्यंतच्या कॅलिफोर्नियाच्या भागात अनेक व्याख्याने देऊन आणि वर्ग घेऊन शिणलेले विवेकानन्द या ठिकाणी मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात मिसेस हॅन्स्ब्रो, मिसेस ॲस्पिनॉल, मिस इडा ॲन्सेल, आदी पाचसहा अनुयायांसह तंबूमध्ये राहिले होते. थॉमस ॲलन आपल्या पत्नीसह अधूनमधून येऊन जास्त असत. एक छोटा ओहोळ जवळून जात होता. शेजारच्या लोहमार्गावरून एक छोटी गाडी जात असे, हात दाखवला की ती थांबत असे. थोड्या अंतरावर एक विश्रामगृह होते. तेथे शनिवाररविवारी कोणी कोणी सहलीसाठी येत असत. स्वयंपाक आणि जेवण यांसाठी एक, विवेकानन्दांसाठी एक स्वतंत्र, आणि इतरांसाठी तीन तंबू होते.

रात्रीच्या चांदण्यात तेथे ज्या ठिकाणी बसून विवेकानन्द सर्वांशी गप्पागोष्टी करीत, नेमक्या त्या जागेवर आम्ही दोघे उभे होतो. सुमारे शंभर चौरस फुटांच्या अर्धवर्तुळाकार रेषेत सरळ वर गेलेले आणि शंभरसव्वाशे फूट उंच असलेले चारपाच वृक्ष खडे होते. ते शंभर वर्षांपूर्वीच्या त्या घटनेचे साक्षीदार होते. तेथे विवेकानन्दांचा सर्वांबरोबर आरण्यक संवाद चाले. सकाळच्या वेळी जागे झाल्यावर विवेकानन्द काही संस्कृत श्लोक किंवा स्तोत्रे म्हणत असत. त्यांच्या तंबूतून येणारा तो मधुरगंभीर स्वर कानांवर पडताच आपले मन मोहरून जात असे, अशी आठवण मिसेस रुरबाख यांनी सांगितली आहे. अनेक वेळा विवेकानन्द ध्यानस्थ बसत, आणि इतरांनाही ध्यान करण्यासाठी आपल्या सभोवती बसवीत. विवेकानन्दांच्या श्रेष्ठ आध्यात्मिक धारणेचा प्रत्यय अशा ध्यानाच्या वेळी विशेषेकरून येत असे, आणि त्याच्या नुसत्या आठवणीने आपल्या मनात अद्यापही एक विलक्षण शांतीचा भाव निर्माण होतो, अशी आठवण मिसेस हॅन्स्ब्रो यांनी कित्येक वर्षे उलटल्यावर सांगितली आहे. इतरांच्या आठवणीही तशाच प्रकारच्या आहेत. संध्याकाळच्या वेळी विवेकानन्द जवळच्या झाडीमधून दूरपर्यंत सर्वांबरोबर फिरावयास जात असत. शहरातील गजबजाटापासून दूर आल्यामुळे येथील शांत अरण्यवासात ते फार आनंदात होते. पंधरा दिवस विवेकानन्द जेथे राहिले होते, नेमके त्या जागेवर आपण उभे आहोत, ही जाणीव अंतःकरण पुलकित करून गेली.

त्यानंतर आम्ही ओकलंडकडे निघालो वेदानन्दांशी काहीकाही संवाद सतत होत

होता. ते अमेरिकन आहेत. साठीच्या जवळ आले आहेत, पण वयाच्या मानाने खूप तरुण वाटतात. उत्साही आणि मनमोकळे वेदानन्दांनी भगवी वस्त्रे परिधान केली होती. प्रबुद्धानन्दही त्याच वेषात होते. एकं काषायवस्त्रधारी विदेशातील संन्यासी स्वतः गाडी चालवीत आपल्याला आस्थेने सारे काही दाखवीत आहे, हा आपल्या आयुष्यातील एक आगळावेगळा योग आहे, असा विचार मनात डोकावून गेला. मोकळेपणाने बोलणे चालू होते. काहीकाही गोष्टीची माहिती त्या सहज संवादातून मिळून गेली. वेदान्तकेन्द्राच्या तीन मजली दोन इमारती आहेत. महिलाकेन्द्रात सतराअठराजणी आहेत. इमारतींची देखभाल ठेवणे हासुद्धा खर्चाचा भाग होऊ शकतो. वर्ग आणि व्याख्याने यांची व्यवस्था हे नित्याचे काम आहे. स्नानगृह आणि स्वयंपाकगृह येथपासून साऱ्या अद्ययावत सुविधा आहेत. एवढा सारा खर्च कशातून चालवता येतो, हे कुतूहल होते. वेदानन्द म्हणाले की, देणग्या येत असतात, त्यांतून सारा खर्च चालतो. कोणीकोणी मृत्युपत्रात सोसायटीसाठी देणग्यांच्या मोठ्या रकमा लिहून ठेवतात. अशा देणग्या मुदतबंद ठेवीत गुंतवून त्याच्या व्याजावर बऱ्याच गोष्टी होतात.

येथून जवळच्या भागात नुकतीच दोन हजार एकर जमीन देणगी म्हणून मिळाली आहे, असे वेदानन्द म्हणाले - ''तेथे काय करण्याचा विचार आहे'', या प्रश्नावर त्यांनी उत्तर केले की, काहीही करावयाचे म्हटले तरी त्यासाठी प्रथम चारदोन माणसे मिळावी लागतील. बरोबर आहे. विवेकानन्दांनीही अनेक वेळा उद्‌गार काढला आहे की, त्यागी आणि बुद्धिमान माणसे हवी आहेत. यांतील बुद्धिमान हा शब्दही महत्त्वाचा आहे. भारतातून जे संन्यासी इकडे पाठवले जातात त्यांच्या ठिकाणी फार वरच्या दर्जाचे कर्तृत्व असावे लागते. येथे वास्तव्य करणाऱ्या संन्याशांच्या व्रतस्थ, प्रसन्न, आणि सर्वांविषयी प्रेमभाव असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय येत राहण्यानेच कार्य होत असते. 'तसे कोणीच नसेल, तर उदात्त जीवनाचा संदेश पोचणार कसा? बर्क आणि वेदानन्द या दोघांच्या बोलण्यात स्वामी अशोकानन्दांच्या सहवासाचा खोलवर संस्कार त्यांच्यावर झाला असल्याचे जाणवत होते. त्याच वेळी या उदात्त आचारविचारांच्या क्षेत्रात फार अपेक्षा करता येत नाही, हेही ध्यानात ठेवावे लागते. कोणाकोणाची जीवने पार पालटून गेली आहेत हे दिसते, आणि काही घडू शकते याची प्रचीती येते. वेदानन्दांच्या बोलण्यात श्रीरामकृष्ण आणि विवेकानन्द यांच्याविषयी असलेला भक्तिभाव प्रकर्षाने जाणवत होता. त्यागीशचैतन्य आपल्याला संन्यास घेता येईल म्हणून वाट पाहात आहे, हे त्याच्याशी बोलताना जाणवले. त्या वेळी आपल्याला बेलूर मठात जाता येईल यांचेही त्याला आकर्षण आहे.

वीसपंचवीस मैल अंतर कापून आम्ही ओकलंडला पोचलो. तेथील फर्स्ट युनिटेरियन चर्चमध्ये विवेकानन्दांची व्याख्याने होत असत. तेथे आम्ही पोचलो, पण इमारतीची दुरुस्ती

करण्याचे काम चालू असल्यामुळे काही दिवसांसाठी चर्च बंद आहे, असे तेथे असलेल्या व्यक्तीने सांगितले. बाहेरून इमारत पाहिली. विवेकानन्दांच्या येथे झालेल्या व्याख्यानांना त्या काळात हजारपंधराशे श्रोते जमत असत. तेथून अलमीडा हे गाव पलीकडे होते. तेथेही जाण्याचे मनात होते. पण तेवढा वेळ हाताशी नव्हता. गाडी सॅनफ्रॅन्सिस्कोकडे वळली. सकाळपासूनच्या या भ्रमंतीत तेथील साऱ्या प्रचंड पुलांवरून आम्ही गेलो. शंभर वर्षांपूर्वी विवेकानन्दांना या खाड्या नौकांतून ओलांडाव्या लागत होत्या. सॅनफ्रॅन्सिस्कोच्या डाउनटाउन एरियात गाडी शिरली, आणि दोन्ही बाजूंना प्रचंड उंच इमारती लागल्या. मधला रस्ता कितीही रुंद असला, तरी दोन्ही बाजूंना जर पंचवीसतीस मजल्यांच्या इमारती असल्या, तर ते रस्ते अरुंद वाटू लागतात. थेट डोक्यावरच आकाश दिसणार, आणि तेथे सूर्य आल्यावरच या रस्त्यांवर प्रकाश पडणार, असे मनात आले. मी वेदानन्दांना म्हटले, "नुकतेच आपण डोंगरातल्या दरीत जाऊन आलो, आणि आता या माणसानं निर्माण केलेल्या क्रॉंक्रीटच्या दरीतून चाललो आहोत." ते म्हणाले, "अशा दऱ्या इथं सर्वत्र आहेत."

आम्ही शहरातील युनियन स्क्वेअरमध्ये आलो. या भागात विवेकानन्दांची व्याख्याने होत असत. मूळ चौकाचा भाग त्यांच्या काळात होता तसाच अद्याप आहे, पण त्याच्या भोवतीच्या रस्त्यांवरून मात्र सर्वत्र उंच इमारती उभ्या राहिल्या आहेत. केन्द्रामध्ये परत येईतो एक वाजला. पुन्हा जेवणाच्या वेळी निवांत गप्पागोष्टी झाल्या. पाच वाजता शिकागोला जाणारे विमान मला पकडावयाचे होते. "मला एका भक्ताला भेटायला जायचं आहे, मी तुम्हाला विमानतळावर सोडेन" असे प्रबुद्धानन्द म्हणाले. स्वामी अशोकानन्दांचे स्वामी प्रेमानन्दांवरील एक छोटे पुस्तक त्यांनी मला भेट म्हणून दिले. मनात आले, आपण त्यांच्यासाठी काहीच करू शकलो नाही.

अडीच वाजता आम्ही निघालो. त्यागीशचैतन्य गाडी चालवीत होता. विमानतळावर पोचल्यावर तो गाडीत थांबला आणि प्रबुद्धानन्दांनी माझी मोठी बॅग उचलली. काही केल्या ती त्यांनी मला घेऊ दिली नाही. मला फार अवघडल्यासारखे झाले. पण मला काही करता आले नाही. अशी ही सेवाभावी वृत्ती. आपण निदान मनोमन तीबद्दल कृतज्ञ असावयास हवे, असे वाटले. शिकागोचे विमान सुटण्याची जागा होती. तेथवर प्रबुद्धानन्द आले. चार वाजले होते. "आता इथं थांबा" असे ते मला म्हणाले, कालपासून त्यांच्या पावन आणि प्रेमळ सहवासाचा लाभ मला मिळाला होता. "आपलं ऋण व्यक्त करण्यासाठी पुरेसे शब्द माझ्याजवळ नाहीत", असे म्हणून मी त्यांना पदस्पर्शपूर्वक प्रणाम केला. त्यांनी प्रसन्नपणे माझ्या खांद्यावर थोडे थोपटले आणि ते परत गेले सॅनफ्रॅन्सिस्कोचा हा मुक्काम माझ्या बाजूने अतिशय संस्मरणीय होऊन गेला होता.

# १०. अटलांटिकच्या तीरावर

एव्हाना आकाश भरून आले होते. पाचचे विमान सातला सुटेल अशी घोषणा झाली. मी बसलो होतो तेथून समोरच्या वरपासून खालपर्यंत असलेल्या काचेतून विमानतळाचा बराच मोठा भाग दिसत होता. त्यात एक धावपट्टीही होती. दर पाच मिनिटांत एखादे विमान वर जाऊन ढगात नाहीसे होत होते, किंवा एखादे त्याच ढगातून खाली उतरत होते. विमानतळावरून अनेक लहानमोठ्या गाड्या कामाच्या निमित्ताने इकडून तिकडे जात होत्या. त्याच वेळी विमानांची हालचाल चालू होती. उतारूंचे सामान नेणाऱ्या आणणाऱ्या मोठ्या गाड्याही विमानांच्या तुलनेने लहान मुलांच्या खेळातल्या मोटारी असाव्यात, तशा वाटत होत्या. मनात येऊन गेले, केवढा प्रचंड व्यवहार येथे चाललेला आहे! यासाठी व्यवस्थापकीय यंत्रणाही तेवढीच कार्यक्षम असावी लागते. असे प्रचंड विमानतळ पुढच्या पंधरावीस वर्षांत भारतातही येणार यात संशय नाही. जबाबदारी पडत गेली की, कार्यक्षमताही आत्मसात करावी लागते, आणि कार्यक्षमतेतून होणाऱ्या सुसूत्र आणि शिस्तबद्ध व्यवहारातील आनंद एकदा समाजाला घेता येऊ लागला की, गोंधळ आणि अव्यवस्था आपोआप कमी होत जाईल.

## चंद्राचे किरण आणि दिव्यांची रांगोळी

विमानाने सात वाजता आकशात झेप घेतली, आणि पॅसिफिक महासागराचा अफाट विस्तार दिसला. मला खिडकीजवळची जागा मिळाली होती, त्यामुळे बाहेरचे बरेच काही पाहता येत होते. हे पॅसिफिकचे अखेरचे दर्शन होते. एकदोन मिनिटांत विमान ढगांच्या वर गेले. थेट क्षितिजापर्यंत पांढरे पांढरे ढगांचे पुंजके पसरलेले होते, आणि त्यांवर स्वच्छ नितळ चांदणे पडले होते. सुमारे तासभर हे दृश्य मी डोळे भरून पाहात होतो. सॅनफ्रॅन्सिस्कोला येतेवेळी उगवत्या सूर्याच्या कोवळ्या किरणांनी पांढऱ्या पांढऱ्या ढगांवर चालवलेला रंगांचा मनोहर खेळ मला पाहावयास मिळाला होता, तर आता त्या ढगातून बाहेर पडल्यावर त्याच ढगांच्या विशाल विस्तारावर चंद्राच्या शीतल किरणांची चाललेला बरसात दृष्टीला

सुखवीत होती. चांदण्याचा हा आनंद काही वेगळाच होता नंतर सारे ढग गेले, आणि खालचा जमिनीचा भाग दिसू लागला.

स्वच्छ चंद्रप्रकाशात खालच्या भूमीवरची छोटी आणि मध्यमवस्तीची गावे दिव्यांच्या लहानमोठ्या पुंजक्यांमुळे उठून दिसत होती. ही शोभा आणखी निराळी होती. ''वसुंधरा ही सुंदरा मनोरमा'' हा एका गीतातील चरण आठवला. निसर्गाच्या या सौन्दर्याचा आस्वाद घेण्याचे नवनवीन मार्ग माणसाने शोधले आहेत, आणि त्या निसर्गावर आपला ठसा उमटवून त्याच्या शोभेत भर घातली आहे. शिकागो शहराचा प्रचंड विस्तार आला. चोहीकडे दिवेच दिवे. लांब सरळ उभ्या रेषेतील रस्त्यांवरचे दिवे, त्यांना छेदून जाणाऱ्या तेवढ्याच प्रचंड लांबीच्या आडव्या रस्त्यांवरील दिवे, आणि या रोषणाईसारख्या दिसणाऱ्या दिव्यांच्या रांगांच्या आसपास असलेले छोट्या दिव्यांचे पुंजके. भूमीच्या विशाल पटावर जणू दिव्यांची सुंदर रांगोळी काढली आहे, असे ते दृश्य पाचसहा मिनिटे दिसत राहिले. विमानाने जमिनीकडील दिशा धरली. दूरचे दिवे लपत गेले आणि विमानतळाजवळच्या परिसरातील दिवे जणू स्वागतासाठी वर येताना दिसले. एक-दोन मिनिटांत विमान खाली उतरले

विमानाला उशीर झाल्यामुळे रात्रीचे साडेबारा वाजले होते. अवधूत कुलकर्णी हा फर्गसन महाविद्यालयात माझे सहकारी असलेले निकटचे मित्र डॉ. परळीकर यांचा पुतण्या. तो मला उतरून घेण्यासाठी येणार होता. बाहेर येऊन रस्त्याजवळ उभे राहण्याची सूचना त्याने दूरभाषवरील संभाषणात केली होती. अपरात्रीची वेळ आणि आम्ही एकमेकांना आधी पाहिलेही नव्हते. बाहेर आलो व रस्त्याजवळ उभा राहिलो. एकेक उतारू गेले व आम्ही साठआठ जण उरलो. विखुरलेले असे उभे होतो. समोर भला रुंद असा रस्ता होता. पण गर्दी कमी झाल्याचाच उपयोग झाला. अवधूत दहा मिनिटांत थेट माझ्याजवळ आला. त्याचे वडील गाडीतच थांबले होते. त्यांचा परिचय पुण्यात झाला होता. ''फार उशिरा येण्याची तसदी घ्यावी लागली'' असे मी त्यांना नमस्कार करताकरता म्हटले. घरी पोचून अंथरुणावर पडेतो दीड वाजला. गेल्या दोन दिवसांत काय काय घडले त्याचे चित्र डोळ्यांसमोरून सरकत गेले. मनात आले, सॅनफ्रॅन्सिस्कोचे वास्तव्य ध्यानात राहील असे झाले.

अवधूतच्या आईवडिलांशी दुसरे दिवशी सकाळी थोड्या गप्पागोष्टी झाल्या. भारतात डॉ. परळीकरांकडे गाठभेट झाली होती, पण येथे भेट अधिक निवांतपणे झाली साडेनऊ वाजता श्री. शरद गोडबोले आले. त्यांना अवधूतने मुद्दाम कळवले होते. परिचय अगदी नवीन. प्रसन्न आणि उमदे असे त्यांचे दर्शन आहे. गेली तीस वर्षे ते येथे आहेत. आता निवृत्त. हाडाचे कार्यकर्ते आहेत. कित्येक सस्थांशी त्यांचा संबंध आहे. लोकसंग्रह आणि मित्रपरिवार मोठा. कोणत्याही क्षेत्रातील वा राजकीय पक्षातील व्यक्ती त्यांना वर्ज्य नाही.

सामाजिक जीवनातील प्रत्येक चळवळीचे स्थान आणि महत्त्व ते समजू शकतात. त्यांनी आपल्या घरी अनेकांचे खास आतिथ्य केले आहे. परदेशात नव्याने येणाऱ्या व्यक्तीला काही साहाय्य लागते व ते आपण केले पाहिजे, अशी त्यांची उदार दृष्टी आहे. मराठी माणसाला त्यांचा आधार सदैव मिळत आला आहे. मलाही तो मिळावयाचा होता.

विशेष गोष्ट अशी की, अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे ते एक संस्थापक सदस्य आहेत. अमेरिकेतील अनेक शहरांत महाराष्ट्र मंडळे आहेत. त्या सर्वांचे सुव्यवस्थित सुसूत्रीकरण झाले आहे. दर दोन वर्षांनी या सर्व मंडळांचे एकत्रित संमेलन निरनिराळ्या शहरी भरते. साडेनऊला गोडबोले आले ते आमची विचारांची तार जुळल्यामुळे साडेअकरापर्यंत गप्पा मारत बसले. यातून खरा लाभ व्हावयाचा होता तो माझा. गप्पांतून निष्पन्न झाले की, त्याना ज्ञानदेव, श्रीरामकृष्ण आणि विवेकानन्द याची विशेष आवड आहे. ते शिकागोच्या विवेकानन्द वेदान्त सोसायटीमध्ये अनेक वर्षे जात आहेत. त्यांनी तत्परतेने म्हटले, ''दोन वाजता येतो, तुम्हाला सारे काही दाखवतो.'' अवधूत येथे नुकताच आलेला, आणि त्याला नोकरीवर जावयाचे होते. त्याने माझ्यासाठी गोडबोले यांना मुद्दाम दूरभाष करून बोलावून घेतले होते. तेवढ्यावर पुढचे सारे काम होऊन गेले. दोन वाजता गोडबोले आले, त्यांच्या गाडीतून बाहेर पडलो.

अवधूतच्या निवासस्थानापासून पंधरा-सोळा मैल तरी जावे लागले असावे. शिकागोचा बराच भाग डोळ्यांखालून गेला. अमेरिकेतील अशी एकदोन प्रचंड शहरे पाहिली की, इतर कोणती पाहण्याचे काम उरत नाही. प्रथम नावीन्य असते, नंतर सारे ठराविक साच्याचे व तेच ते असते. त्यामुळे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची अशी स्थाने पाहणे आणि निरनिराळ्या प्रकारची पदार्थसंग्रहालये सावकाशीने नजरेखालून घालणे हाच पाश्चात्त्य जगातील देश पाहण्याचा खरा मार्ग असतो. प्रदेश डोळ्यांखालून घालणे आणि निसर्गाची विविध रूपे न्याहाळणे हा एक निराळा अनुभव असतो. उद्योगव्यवसायातील उपक्रमशील व्यक्ती असेल, तर निरनिराळे कारखाने पाहणे व नवीन काय येऊ घातले आहे ते समजून घेणे महत्त्वाचे ठरते. आपला देश अद्याप विकसनशील आहे. नवी शास्त्रीय विद्या आणि तंत्रज्ञान आपण अजून शिकत आहोत. त्यामुळे हरएक क्षेत्रातील पाश्चात्त्यांची प्रगती आणि नवनवीन साधने आपण डोळ्यांखालून घालणे आवश्यक आहे. इकडचे देश पाहण्यातील तोही एक महत्त्वाचा भाग आहे. जो कोणी ज्या क्षेत्रातील असेल त्यानुसार पाहण्याचे हे रूप ठरत असते.

### सर्वधर्मपरिषदेचे स्थान

तीनच्या सुमारास आम्ही वेदान्त सोसायटीच्या इमारतीत पोचलो. या देशातील

केन्द्रांची बरीचशी कल्पना आतापर्यंत आली होती. स्वागत करणारी एक महिला होती. आज गोडबोले यांनी मार्गदर्शकाचे काम घेतले होते. मी भारतातून मुद्दाम आलो आहे, हे त्यांनी सांगितल्यावर तिने आम्हाला सारे भाग दाखवले. इमारत चांगली मोठी आहे. खूप प्रशस्त अशा रस्त्यावर दोनतीन इमारती शेजारी आहेत. त्यांतील एक महिलानिवासाचे केन्द्र असावे. कार्यालय, ग्रंथालय, विक्रीविभाग आदी ठिकाणी काम करीत असलेल्या स्त्रिया दिसत होत्या. वेदान्त सोसायट्यांमधून काम करणाऱ्या या स्त्रियांचे दर्शन, त्यांचे वावरणे, मुद्रेवरील भाव, हे सारे इतर पाश्चात्त्य स्त्रियांपेक्षा निराळे असते, हे ध्यानात आल्याशिवाय राहात नाही. आपल्या स्त्रीत्वाचे प्रदर्शन हा भाग त्यांच्या ठिकाणी आढळत नाही, आणि डोळ्यांतील स्निग्धतेला विनम्र अशा सात्त्विकपणाचा स्पर्श असतो. पाश्चात्त्य देशांतील सर्व स्त्रिया आपल्या सौन्दर्याचे प्रदर्शन करणाऱ्या असतात, असे सुचवण्याचा थोडासाही हेतू हे वर्णन करताना मनात नाही. चांगले आणि वाईट सर्वत्र असते. भारतातही या दोन्ही तऱ्हा आहेत. आविष्काराची रूपे निराळी असतात इतकेच.

येथेही श्रीरामकृष्णमंदिरात श्रीसारदामाता आणि विवेकानन्द यांच्या जोडीला गौतमबुद्ध आणि येशू ख्रिस्त होते. प्रवचने तेथेच होतात. सुमारे दीडशे खुर्च्या होत्या. स्वामी चिदानन्द हे येथील प्रमुख होते. गौरवर्ण, मध्यम बांधा, शांतगंभीर मुद्रा, अंगावर भगवी वस्त्रे, असे त्यांचे प्रसन्न दर्शन होते. पंधरावीस मिनिटे संवाद झाला, आणि आम्ही त्यांचा निरोप घेतला. माझे त्यांच्याशी काही खास काम नव्हते आणि ते अतिशय गडबडीत आहेत हे स्पष्ट दिसत होते. त्यांचा अधिक वेळ घेणे योग्य वाटले नाही. याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शिकागोच्या या भागात पंचवीसतीस वर्षांहून अधिक काळ काम करणारे स्वामी भाष्यानन्द यांनी प्रदीर्घ आजारानंतर आपल्या नश्वर कुडीचा त्याग केला होता. ते फार मोठे संघटक होते. अमेरिकेत वेदान्त सोसायट्यांचे काम वाढवण्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दुसरे दिवशी एक विशेष सभा आयोजित केली होती, आणि त्या निमित्ताने अमेरिकेतील सर्व केन्द्रांचे प्रमुख येणार होते. कार्यक्रम मोठा होता, महत्त्वाचा होता. ''मलाही शिकागोला यायचं आहे'' असे बोलताबोलता प्रबुद्धानन्द म्हणाले होते, त्याचा हा अर्थ होता. सोसायटीच्या इमारतीच्या बाहेरच्या बाजूला या कार्यक्रमाची सूचना लावली होती, तेव्हाच आम्हाला हे समजले होते, आणि आत शिरल्यावरही बरेच जण काही ना काही कामात आहेत हे दिसत होते. थोडा वेळ इकडे-तिकडे फिरून आम्ही बाहेर पडलो.

आतापर्यंत सर्व ठिकाणी पाहात आलो होतो की, या वेदान्त केन्द्रांच्या कामात स्त्रियांचा प्रत्यक्ष सहभाग आहे त्यांचे निवासस्थान, भोजनगृह, स्वाध्याय वा इतर गोष्टी स्वतंत्र इमारतीत असतात आणि तेथे संन्यासी जात नाहीत. दिवसभरात केन्द्रातील आपले

काम त्या करतात आणि आपल्या स्थानी परत जातात. पुरुषांपेक्षा कितीतरी अधिक संख्येने स्त्रिया काम करताना दिसतात. विवेकानन्दांच्या विचारांनी प्रभावित होणाऱ्या आणि त्यांना प्रत्यक्ष साहाय्य करणाऱ्याही स्त्रियाच अधिक होत्या. आपल्या समाजातही धार्मिक वा आध्यात्मिक कार्याविषयी स्त्रियांना अधिक आस्था असते. स्त्री ही संस्कृतीची परंपरा चालवणारी अधिक समर्थ शक्ती आहे, आणि श्रेष्ठ मूल्यांचे दर्शन त्यांच्या सहज आचरणातही अधिक दिसते, ही लक्षात येणारी गोष्ट आहे. अध्यात्म आणि तत्त्वज्ञान यांवरील जवळजवळ सारे ग्रंथ पुरुषांनी लिहिले आहेत, पण त्यांचे अनुसरण स्त्रिया अधिक करतात, असे हे पूर्वापार चालत आलेले चित्र आहे. अमेरिकाही त्याला अपवाद नाही.

केन्द्राच्या इमारतीतून आम्ही थोडे पुढे आलो, आणि एका कोपऱ्याशी आल्यावर गोडबोले म्हणाले, ''इथं विवेकानन्दांचा भव्य पुतळा लवकरच उभा राहणार आहे.'' हे ऐकून मोठेच समाधान वाटले. तेथून आणखी थोडे पुढे आलो आणि १८९३साली जेथे जागतिक सर्वधर्मपरिषद भरली होती, त्या स्थानाशी पोचलो. ''दि आर्ट इन्स्टिट्यूट ऑफ शिकागो'' या संस्थेच्या भव्य इमारतीत त्या वेळी पंचवीसतीस खोल्या होत्या, आणि प्रत्येकी तीन हजार आसनांची व्यवस्था असलेली ''हॉल ऑफ कोलंबस'' आणि ''हॉल ऑफ वॉशिंग्टन'' अशी दोन सभागृहे होती. यांतील पहिल्या सभागृहात अधिवेशनाचे मुख्य कार्यक्रम होत होते, आणि दुसऱ्या सभागृहातही श्रोते बसत होते. दोन्ही सभागृहांत गर्दी मावेनाशी होई, एकेक हजार श्रोते दोन्ही ठिकाणी उभे राहून व्याख्याने ऐकत, आणि बाहेरही गर्दी असे. सतरा दिवसांचे अधिवेशन वैचारिक आदानप्रदानाच्या दृष्टीने उत्कृष्ट झाले. पण श्रोत्यांच्या दृष्टीने सर्वात प्रमुख आकर्षण होते स्वामी विवेकानन्द. येथे त्यांनी तेव्हा पराधीन असलेल्या भारताची आध्यात्मिक क्षेत्रातील विजयपताका उंच उभारली. गेल्या हजारबाराशे वर्षांच्या भारताच्या अवनतीच्या इतिहासातील सांस्कृतिक क्षेत्रामधील जागतिक पातळीवरील गौरवाचे एकमेव पान त्यामुळे लिहिले गेले केवढी अभिमानास्पद घटना होती!

आज आपल्या देशात त्याची विशेष जाण आहे असे नाही, पण इतिहास ती घटना जपून ठेवील, आणि ती अधिकाधिक उज्ज्वल रूप धारण करून येणाऱ्या पिढ्यांच्यासमोर जाईल, यांत शंका नाही. डॉ. बॅरोजनी सर्वधर्मपरिषदेच्या वृत्तांतात लिहिले आहे की, समारोपाच्या शेवटच्या कार्यक्रमाच्या वेळी दोन्ही बाजूंचे रस्ते लांबपर्यंत भरून गेले होते, एवढी अफाट गर्दी झाली होती. त्या वेळी केलेल्या आपल्या भाषणात विवेकानन्दांनी सारेच धर्म राहणार आहेत, कोणताच धर्म नष्ट होणार नाही, आणि होण्याचे कारण नाही, असे म्हटले. अशा बंधुभावातून व स्वीकारशीलतेतून विश्वधर्माची दिशा त्यांनी दाखवली होती आजवरच्या इतिहासात एवढे उदार आणि आश्वासक उद्गार कोणीही काढले नव्हते. ते

भारतातील एका तीस वर्षाच्या संन्याशाच्या मुखातून बाहेर पडले होते. ती ही जागा होती. नुकतीच वीसएकवीस वर्षे पुरी केलेल्या व महाविद्यालयात शिकत असलेल्या नरेन्द्राकडे पाहून श्रीरामकृष्णांनी उत्स्फूर्त उद्गार काढले होते, ''नरेन एक दिवस सारं जग हलवील'' ती भविष्यवाणी खरी ठरण्याचा दिवस शोधण्यासाठी शिकागोतील या स्थानाशी पोचावे लागते. दोन्ही बाजूंच्या रस्त्यांवर मी सहज एक दृष्टी टाकली. शंभर वर्षे उलटली. कोणतेच मोठे शहर आता पूर्वीच्या अवस्थेत उरलेले नाही. पुणे नाही वा मुंबई नाही, शिकागोही नाही.

समोरच्या बाजूस खूप मोठा पट्टा मोकळा होता. त्यापलीकडे आडवाच्या आडवा रुंद रस्ता होता आणि त्याच्या पलीकडे डाउन टाउन एरियातील उंच उंच इमारती उभ्या होत्या. शंभर वर्षापूर्वीच्या या शिकागो शहरात रस्त्यांवरून अनेक ठिकाणी विवेकानन्दांची पूर्णाकृती छायाचित्रे लावली गेली होती. केवळ उत्स्फूर्तपणे. कोणतीही संस्था त्या वेळी तेथे त्यांच्या पाठीशी नव्हती. मग कोणी लावली असतील ती चित्रे? काहीही तर्क करता येत नाही. जागतिक सर्वधर्मपरिषदेत हिंदू धर्माचा एक प्रतिनिधी म्हणून व्यासपीठावर उभे राहून विश्वधर्माचा उदात्त संदेश देणाऱ्या त्या विश्वमानवाला दिली गेलेली ती रस्त्यांवरून लावली गेलेली चित्रे ही जणू एक मानवंदना होती. खरोखरीच एक वंदना. कारण त्या वेळच्या अनेक व्यक्तींनी नमूद केले आहे की, विवेकानन्दांच्या त्या रत्यांवरून लावलेल्या छायाचित्रासमोरून जाताना कित्येक लोक आदराने मस्तक नम्र करीत असत. समोर अफाट नवे व्यापारी जग आता खडे झाले होते. जेथे ही सर्वधर्मपरिषद भरली ती दोन्ही सभागृहे आता अस्तित्वात नाहीत. त्यांच्या जागी नवीन इमारती उभ्या राहिल्या आहेत. नवलाची गोष्ट इतकीच की, त्याचा पुढचा दर्शनी भाग मात्र पूर्वी होता तोच आहे त्या सोनेरी क्षणाचा तो साक्षीदार आहे

सांस्कृतिक क्षेत्रातील असले क्षण दुंदुभी वाजवत येत नाहीत. तो संदेश दिला जातो, तेव्हा त्या क्षणांपुरते सारे वातावरण चैतन्यमय होऊन जाते. तो समारंभ समाप्त होतो आणि जग आपल्या नित्याच्या सवयीनुसार आपल्या कामाला लागते. त्याचा तो रस्ता विशेष बदलत नाही. पण काही व्यक्तीच्या हृदयात एक ज्योत पेटवली जाते व ती शांतपणे तेवत राहते. त्या ज्योतीने कधीतरी दुसरी ज्योत लागते, कालांतराने तिसरी लागते. पण या ज्योतीच्या प्रकाशातही कोणताही झगमगाट नसतो. हा अंतरंग उजळणारा शांत असा प्रकाश असतो, तो आपला प्रकाश देत राहतो. त्यामुळे सांस्कृतिक क्षेत्रातील उदात्त मूल्यांचा पाठपुरावा करण्याचे काम होत असते. तेथे मानवजातीच्या अतिशय मद गतीने होणाऱ्या आत्मिक विकासाची चाहूल लागते. नी चाहूल कानांत साठवून घेतली आणि आम्ही निघालो. गोडबोल्यांनी गाडी उलट दिशेला वळवली, आणि थोडे अंतर गेल्यावर त्यांनी दाखवले रस्त्याच्या वळणावर एका उद्यानात कोलंबियाचा भव्य, देखणा, सोनेरी रंगातील

पुतळा उभा होता. विवेकानन्द शिकागोला आले त्या वेळी जागतिक स्तरावरील एक प्रचंड औद्योगिक प्रदर्शन तेथे सातशे एकरांच्या परिसरात भरले होते. शास्त्रीय शोधांच्या हरएक क्षेत्रात आणि निरनिराळी यंत्रे व उपकरणे बनवण्यात तोवर मानवाने जी काही प्रगती केली होती, तिचे उत्कृष्ट दर्शन त्यांना त्या प्रदर्शनात घडले होते. पाश्चात्त्य जगाचे ज्ञानाचे क्षेत्र किती विस्तारलेले आहे, याची प्रचीती विवेकानन्दांना अमेरिकेत पाऊल ठेवता ठेवता तेथे येऊन गेली होती. नव्या जगातील वैज्ञानिक संस्कृतीची ती एक ठसठशीत खूण होती.

## शिकागोतील कोजागिरी पौर्णिमा

विवेकानन्दांना ज्ञानाचे कोणतेही क्षेत्र वर्ज्य नव्हते. हे प्रदर्शन पाहण्यात त्यांनी एक आठवडा घालवला होता. त्या प्रचंड परिसरातील औद्योगिक प्रदर्शन आणि आर्ट इन्स्टिट्यूटमध्ये भरलेली जागतिक सर्वधर्मपरिषद मानवाच्या दोन दिशांनी जाणाऱ्या बुद्धीचो भरारी दाखवणारी होती. वेदान्त सोसायटीची जागा या दोहींपासून फार दूर नाही. हा एकंदर परिसर अर्ध्यापाऊण मैलांचा असेल. औद्योगिक प्रदर्शन भरले होते त्या साऱ्या भागात आता निरनिराळ्या इमारती उभ्या राहिल्या आहेत. थोडे पुढे जाताच मिशिगन सरोवराचा प्रचंड निळानिळा विस्तार दूर क्षितिजापर्यंत हेलावताना दिसला. सरोवर एवढे विशाल असू शकते, यावर क्षणभर विश्वास बसत नाही. काश्मीरमधील वुलर हे गोड्या पाण्याचे सरोवर डोंगरांच्या रांगांच्या सान्निध्यात आहे, तेही प्रचंड आहे. त्याच्या भोवती गाडीतून एक प्रदक्षिणा घातली होती पण मिशिगन त्यापेक्षाही मोठे, मैलच मैल पसरलेले आहे. प्रचंड शिकागो शहराला त्याची सोबत आहे त्याच्या काठावर सर्वत्र असलेली स्वच्छता डोळ्यात भरणारी आहे. अनेक ठिकाणी शांतपणे फिरता यावे आणि घटकाभर बसता यावे, अशा नीटस जागा केलेल्या आहेत. त्याच्या काठाकाठाने घरी परतण्याचा मार्ग धरला. संध्याकाळ होत आली होती.

आयुष्यभरात गोडबोल्यांजवळ सार्वजनिक जीवनातील अनेक अनुभव साठलेले होते. स्वभावही मनमोकळा आणि संवादशील. अमेरिकेतील जीवन आणि तेथे येणारे भारतीय यांविषयी अनेक गोष्टी त्याच्या बोलण्यात येऊन गेल्या. त्यांचा वावर भिन्नभिन्न क्षेत्रांत आहे अभिरुची वरच्या दर्जाची आहे. महिन्यातून एकदा आलटून पालटून एकेकाकडे त्यांचे सात-आठ मित्र सपत्नीक संध्याकाळी एकत्र जमतात. एखादा तास ज्ञानेश्वरी किवा दासबोध अशा कोणत्या तरी आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन करतात, आणि त्यावर काही चर्चा होते, असा कार्यक्रम असतो. आज तो दिवस होता. गोडबोले मला म्हणाले, ''तुम्ही यावं अशी इच्छा आहे '' नकार देणे मला कसे शक्य होते? शिकागोत मी ज्यासाठी आलो होतो, ते सारे मला त्यांनी सुखाने दाखवले होते, आणि त्या त्या स्थळाची माहिती सागितली होती. मी त्यांचा

ऋणी होतो. शिवाय चार मराठी माणसांशी या परदेशात संवाद करण्यास मिळण्यातही आनंद होता. मी म्हटले ''अवश्य येईन.'' साडेसहाला त्यांनी मला घरी सोडले. पुन्हा तासाभरात नेण्यासाठी येणार आहे, असे सांगून गेले.

साडेसात वाजता उभयता गोडबोले आले त्यांच्या पत्नीची ओळख झाली. मी म्हटले, ''अनेकांचं आतिथ्य आणि देखभाल करण्याचं पुण्य तुम्ही गोळा केलं आहे.'' त्यांनी यावर केवळ थोडे स्मित केले. आठ वाजता आम्ही इष्ट स्थानी पोचलो. मित्रमंडळी जमली होती, एकदोन पाठोपाठ आली. माझे तेथील आगमन सर्वांना अनपेक्षित होते. गोडबोल्यांनी परस्परपरिचय करून दिला. पंधरासोळा स्त्रीपुरुष. सारे उत्तम सुशिक्षित. मनमोकळे आणि स्नेहभाव जपणारे. त्याच वेळी सत्प्रवृत्त. असे छोटे गटही कोठेकोठे असतात. आज वाचन न करता मीच काहीतरी बोलावे, असे सुचवण्यात आले. विषय दिला ज्ञानेश्वरीचे वैशिष्ट्य. मी म्हटले, ''प्रश्नोत्तरे ठीक होतील, तुम्हाला हवे असेल ते अंग आपोआप येईल.'' पण प्रथम मी अर्धा तास बोलावे अशी सूचना आली. त्याप्रमाणे बोललो आणि त्यानंतर प्रश्न विचारले गेले. स्त्रियांनीही प्रश्न विचारले आणि त्यांतील काही अधिक मार्मिक होते. सर्वांना या विषयाची आवड होती व माहितोही होती, हे स्पष्ट जाणवत होते. हा प्रश्नोत्तररूप संवाद सव्वा तासाहून अधिक वेळ झाला.

त्यानंतर काही खाद्य पदार्थ आले. अखेर आटीव दूध आले आणि ते माझ्यासमोर ठेवताना गृहिणीने म्हटले, ''आज कोजागिरी पौर्णिमा आहे.'' अमेरिकेतील ही माझी कोजागिरी फारच उत्तम साजरी झाली, असे मी म्हटले. काहीकाही गप्पा झाल्या. तो मनमोकळा संवाद होता. त्यातही बराच वेळ गेला, आणि गोडबोले यांनी मला परळीकरांकडे सोडले. तेव्हा रात्रीचे अकरा वाजून गेले होते. येथे गोडबोले पतिपत्नींचा निरोप घेतला. ''उद्या पुन्हा भेटलो असतो, पण मला काम आहे,'' असे गोडबोले मला म्हणाले. त्यावर मी त्यांना म्हटले, ''केवळ तुमच्यामुळं शिकागोदर्शन मला हवं होतं तसं झालं, हा केवळ एक योगायोग होता, पण माझा फार मोठा लाभ झाला, एवढच कृतज्ञता म्हणून म्हणतो.'' त्यांनीही काही प्रतिसाद दिला, आणि आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. दिवसभरात काही महत्त्वाच्या जागा पाहिल्या. सकाळी घरी काही संवाद झाला होता, तर रात्री अल्पाहाराच्या वेळी आठदहाजणांशी बोलताना अमेरिकेत राहणाऱ्या मराठी माणसांच्या मनात थोडेफार डोकावता आले होते. रात्री अंथरुणावर पडलो, तेव्हा या सर्वांचे पडसाद मनात उमटत होते

### मित्रांच्या भेटी आणि गप्पागोष्टी

आनंद शारंगपाणी हा माझे चाळीसहून अधिक वर्षांचे निकटचे मित्र आणि फर्गसन

महाविद्यालयातील सहकारी, प्रा. राजाभाऊ इनामदार यांचा मेहुणा. राजाभाऊंची पत्नी या आशावहिनी. आपल्या बहिणीकडे आनंदा दोनतीन वर्षांनी येत असल्यामुळे आणि आम्हा दोघांची वास्तव्यस्थाने जवळ जवळ असल्यामुळे अनेक भेटी झाल्या होत्या. आनंदा वेदान्त सोसायटीच्या कार्यक्रमांना नेहमी जाणारा. तो मला कधीकधी प्रश्न करीत असे, ''शिकागोला कधी येणार?'' ही एक वेगळी जवळीक होती. त्याची पत्नी दीप्ती. सव्वीस ऑक्टोबरला मी शिकागोहून ग्रेहाउंड कंपनीच्या गाडीतून दुपारी निघून संध्याकाळी हॉलंडला पोचलो. दुसरे दिवशी सकाळी आनंदा मला गाडीतून गॅंजीस येथील वेदान्त केन्द्रात घेऊन गेला. शहरापासून दूर असलेली ही जागा प्रशस्त परिसरात आहे. अमेरिकेतील संन्याशांना काही दिवस शांतपणे विश्रांती घेता यावी, तसेच ध्यानधारणा आणि ग्रंथवाचन यांसाठी निवांत वेळ देता यावा, यासाठी येथे स्वतंत्र खोल्या बांधलेल्या आहेत. त्याशिवाय इतरत्र आहेत ते सर्व विभाग आहेत. श्रीरामकृष्ण आणि विवेकानन्द यांच्या जीवनातील काही महत्त्वाचे प्रसंग त्यांचे छोटे छोटे पुतळे करून त्यांच्या आधारे उभे केले आहेत, आणि काचेच्या कपाटांतून ती दृश्ये मांडून ठेवली आहेत. भारतीय वातावरणाची थोडीफार कल्पना यावी, असा हेतू त्या प्रदर्शनाचा आहे. भाष्यानन्दांच्या श्रद्धांजलीच्या कार्यक्रमासाठी येथील संन्यासी शिकागोला गेले होते. दोघेतिघे अमेरिकन होते. तास दीड तास आम्ही त्या आवारात घालवला, आणि ॲन आर्बरच्या दिशेने निघालो.

आनंदाशी नाना विषयांवर गप्पा मारत मजेत हा प्रवास चालला होता. असे गाडीतून फिरण्यास मिळाले तर प्रदेश पाहण्याचा आनंद मिळतो. रस्त्यावर वाहनांची विशेष गर्दी नव्हती. जवळजवळ पंचवीस वर्षे आनदा अमेरिकेत आहे. येथील लोकांचे जीवन आणि अमेरिकेतील भारतीय यांवरील त्याचे काही विचार ऐकावयास मिळाले. वाटेत एका ठिकाणी आनंदाने गाडी उभी केली आणि आम्ही मिशिगन सरोसराच्या काठावर रस्त्याजवळ असलेल्या एका जागेवर उभे राहिलो. त्या सरोवराच्या पृष्ठभागावर उठणाऱ्या सौम्य जललहरी पाहण्यात मोठा आनंद वाटला. थेट क्षितिजापर्यंत पाणी पसरलेले होते, आणि तेथे त्या निळयानिळया पाण्याची निळयानिळया आकाशाशी भेट झाली होती. आसपास कोणीही नव्हते. वृक्षांनी गजबजलेला भूप्रदेश पाठीशी, आणि समोर विशाल जलसंभार.

अशा शांत स्थळी आपल्या मनाचे निसर्गाशी काही नाते जोडले जाते. सभोवताली पसरलेल्या निसर्गाचाच आपण एक भाग आहोत, याचे भान मनात जागे होते. संसारातील छोटीमोठी सुखदु:खे, माणसामाणसातील मत्सर आणि हेवेदावे, राष्ट्राराष्ट्रांतील स्पर्धा आणि चुरस, त्यापोटी उत्पन्न होणारी युद्धे आणि नरसंहार, निरनिराळ्या देशांचे प्रश्न आणि एकंदर मानवजातीचे भवितव्य, असे व्यक्तिजीवनापासून तो समाजजीवनापर्यंचे सारे कूट प्रश्न

मनातून क्षणभर नाहीसे होतात. एकीकडे दैनंदिन सुखात भर पडत असावी, तर दुसरीकडे राष्ट्राराष्ट्रातील स्पर्धेमुळे पुढील पन्नास वर्षात या जगाचे काय होईल असा प्रश्न उभा राहावा, हा केवढा विरोधाभास आहे; येथवर तो विस्तीर्ण जलाशय पाहून पुढे निघाल्यावर गप्पा मारताना आम्ही पोचलो. मी मिशिगनचे केलेले कौतुक ऐकून आनंदा म्हणाला, ''अमेरिकेच्या या उत्तरेच्या प्रदेशात अशी एकूण पाच प्रचड सरोवरे आहेत, सारी गोड्या पाण्याची. या सर्वाचं पाणी अर्ध्या जगाला पुरेल इतकं आहे '' अमेरिकेला निसर्गाचे वरदान आहे, आणि तिने ते जपले आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वृक्षराजी होती. पानगळीच्या आधी साऱ्या झाडांचे रंग मनोहर रूप घेऊन उभे राहतात. इंग्लंडमध्ये बोर्न एंड येथे त्याचा प्रारंभ पाहिला होता. आता त्याला पूर्ण बहर आलेला दोन्ही बाजूंच्या सपाट प्रदेशात दिसत होता. त्या शोभेवर दृष्टी ठरत नव्हती. हेच अपूर्व वैभव कॅलिफोर्नियात डोगरांच्या सोबतीत पाहिले होते. एके ठिकाणी आनंदाने गाडी उभी केली. रस्त्याच्या बाजूला एक उत्तमपैकी मध्यम आकाराची उघडी पडवी होती. शेजारी स्वच्छतागृह होते. नळाला स्वच्छ पाणी होते. बाहेरच्या मोकळ्या आवारात काही बाके व त्यांसमोर जमिनीत रोवलेली लाकडी टेबले होती. रस्ता पाठीशी ठेवून आम्ही बाकांवर समोरच्या झाडांचे रंग न्याहाळत मजेत दुपारचे जेवण केले. दीप्तीने सारी तयारी करून दिली होती. ही प्रवाशांसाठी मुद्दाम केलेली सोय होती. कोणीही रखवालदार तेथे नव्हता. पण तरी सर्वत्र सारे काही स्वच्छ होते. ही पाश्चात्त्य लोकांची सार्वजनिक जीवनातील शिस्त

दुपारी चार वाजता ॲन आर्बर येथे प्रा. क्षीरसागर याच्या निवासस्थानी मला सोडून आनंदा डेट्रॉइटला गेला. क्षीरसागर गेली कित्येक वर्षे येथील विद्यापीठात प्राध्यापक आहेत. एक अतिशय बुद्धिमान विद्यार्थी ही त्यांची सांगलीतील प्रतिमा माझ्या मनात ताजी होती. ते आणि मी बी ए. च्या वर्गातील सहाध्यायी. विलिंग्डन महाविद्यालयातील १९४६-४७ सालातील दिवस, त्या काळात आम्हाला लाभलेले उत्तम प्राध्यापक, आणि विद्यार्थ्यांची संख्या केवळ पाचसहाशे असल्यामुळे असलेले शांत वातावरण, अशा साऱ्या आठवणींची देवाणघेवाण झाली. फर्गसनमध्ये विद्यार्थी असलेले माधव देशपांडे आणि त्याची पत्नी शुभांगीही येथे प्राध्यापक. त्यांच्याकडे रात्री तासभर गप्पा. एका चर्चासत्रासाठी आलेले एक युरोपातील व दुसरे भारतातील असे दोन प्राध्यापक त्यांच्याकडे आले होते. भारतातील प्राध्यापक दाक्षिणात्य होते. चर्चासत्राचा विषय आर्य-अनार्य असा होता. त्या अनुषंगाने सिंधुसंस्कृती व वैदिक संस्कृती यांतील परस्परसंबंधाबद्दल व सांस्कृतिक धाग्याबद्दल अद्ययावत संशोधन काय आहे, असे मी विचारले थोडी चर्चा झाली, पण ग्रंथांमधून जी माहिती वाचली

होती तीत विशेष भर पडली नाही. दाक्षिणात्य प्राध्यापक होते, त्यांनी मला ज्ञानदेवांविषयी काही प्रश्न विचारले. ॲन आर्बर विद्यापीठात संस्कृत घेणारे विद्यार्थी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असणार. पण तरी अशी परदेशातील माणसे बोलावून तो विभाग असे चर्चासत्र घडवून आणू शकतो. देशपांडे यानी रात्री अकरा वाजता मला क्षीरसागरांकडे सोडले.

दुसरे दिवशी सकाळी नऊ वाजता दीप्ती गाडी घेऊन आली आणि सर्वांचा अल्पोपाहार झाल्यावर क्षीरसागर विद्यापीठात गेले तर दीप्ती आणि मी त्यांचा निरोप घेऊन दहा वाजता निघालो. सौ. क्षीरसागरांचा परिचय नव्याने झाला. आनंदाला या भागात नवीन घर विकत घ्यावयाचे होते, कारण त्याची नवी नोकरी हॉलंडपासून दूर व डेटॉइटला जवळ आहे. ॲन आर्बरपासून डेट्रॉइट चाळीस मैल आहे. वाटेत दीप्ती घरांचा शोध घेणार होती. तीस-तीस चाळीस-चाळीस घरांचा एक गट असे निवासी भाग महामार्गापासून थोड्या आतल्या बाजूस उभे केले जात होते. निरनिराळ्या प्रकारची घरे असली, तरी त्या त्या भागाची विशिष्ट रचना केलेली असते. ही सारी घरे स्वतंत्र भूखंडांवर बांधली जात होती. आणि मग ती तयार घरे विकली जातात. प्रमुख शहरांपासून हे भाग पंधरावीस मैलांच्या टप्प्यात असतात. शहरातील गर्दीपेक्षा अशा ठिकाणी राहणे साहजिकच आनंदाचे असते. निरनिराळी घरे बांधली जात असताना पाहावयास मिळाली. भारताच्या तुलनेने हे सारे काही फार वरच्या दर्जाचे असते. अमेरिकेतील हे एक वेगळे अंग अनायासे दृष्टीखालून गेले.

चार वाजता आम्ही डेट्रॉइटला आनंदाचे निकटचे मित्र डॉ. अभय मेहेदळे यांच्याकडे पोचलो. त्यांचे निवासस्थान सुरेख आणि प्रशस्त होते. संध्याकाळी ते मला मंदिरात घेऊन गेले. लक्ष्मीनारायणाचे हे मंदिर संगमरवरी होते. मोठे सुरेख होते. व्यवस्थेसाठी पगारी पुरोहित होता. कोणीकोणी येऊन जात होते. सर्व प्रकारची सोय तेथे होती. उत्सवाच्या वेळी अनेक भारतीय येथे एकत्र येतात. सर्वांच्या जेवणाची सोय होऊ शकते, इतकी जागा आणि व्यवस्था तेथे होती. स्वच्छता आणि शांतता ही भारतातील मंदिरांहून वेगळी वाटणारी वैशिष्ट्ये होती. अमेरिकेतील भारतीयांची सांस्कृतिक भूक या मंदिरांमुळे व तेथील प्रासंगिक उत्सवांमुळे भागवली जाते. भरघोस देणग्या येत असतात. संस्कृत स्तोत्रे आणि आरत्या यांच्या ध्वनिफिती उपलब्ध असतात. निरनिराळे सण आणि उत्सव होतात. त्यांची माहिती देणाऱ्या छोट्या पुस्तिका तेथे ठेवल्या होत्या. डेट्रॉइट येथील एका दिवसाचे हे वास्तव्य अनपेक्षित होते. दुपारी तीन वाजता दीप्ती आणि डॉ. अभ्यंकर यांनी मला ग्रेहाउंड कंपनीच्या स्थानकावर पोचवले. आनंदा आणि सौ. अभ्यंकर यांनी सकाळी कामाला जाताना माझा निरोप घेतला होता. रात्री आठ वाजता क्लीव्हलॅंड येथे गाडी बदलली आणि बॉस्टनची गाडी

घेतली. दिनाक तीस ऑक्टोबरला दुपारी साडेबारा वाजता बॉस्टनला उतरलो.

### ॲनिस्क्वॅम मधील विवेकानन्द

माझी पत्नी शाता, हिचा भाचा अरविंदा. तो बॉस्टनला मला उतरून घेण्यासाठी आला होता, म्हणजे वॉशिंग्टनप्रमाणेच येथेही मी आपल्या घरी होतो. अरविंदाची सुविद्य पत्नी ज्योती आणि दोन मुले या सर्वांच्या सहवासात दोन दिवस मजेत गेले. अरविंदाचा कॉम्प्यूटरच्या क्षेत्रातील छोटासा स्वतंत्र व्यवसाय आहे. अमेरिकेत कोणी कोणी भारतीय तरुण असा स्वतंत्र व्यवसाय करताना दिसतात, तेव्हा मनाला मोठा आनंद वाटतो. त्यांचे येथील उद्योगव्यवसाय आणि अमेरिकेतील एकूण जीवन यांविषयीचे अनुभव ऐकण्याने आपल्या ज्ञानात भर पडते. दुसऱ्या दिवशी बॉस्टन येथील रामकृष्ण वेदान्त सोसायटीकडे जाताना सुप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठाच्या आवारातून एक फेरफटका मारला. चार्ल्स नदीचा प्रवाह सोसायटीच्या जवळून जातो. स्वामी परमानन्द यांनी येथील केन्द्र १९०८-मध्ये सुरू केले. पुढे स्वामी अखिलानन्दांनी अनेक वर्षे ती जबाबदारी उचलली आणि १९४१- मध्ये डीअरफील्ड स्ट्रीटवरील ही सोसायटी स्वतःच्या वास्तूत उभी राहिली. अध्यक्ष स्वामी सर्वगतानन्द आता पंच्यांयशी वर्षांचे आहेत, पण त्यांचे प्रवचन, वर्ग आणि भेटीगाठी हे काम सतत चालू असते. स्वामी सर्वात्मानन्द हे त्यांचे सहकारी आहेत. मंदिर सुरेख आहे, आणि केन्द्रात सर्व सुविधा आहेत. सर्वगतानन्दांशी काही संवाद झाला.

दोन नोव्हेंबरला सकाळी सातला अरविंदाच्या गाडीतून तीसपस्तीस मैलांवरील ॲनिस्क्वॅमकडे निघालो. अटलांटिक महासागराच्या तीरावरील हे एक छोटे आणि टुमदार गाव आहे. एका वळणावरून आम्ही वळलो, आणि एकदम समोर ॲनिस्क्वॅमचा सारा परिसर व त्याच्या पलीकडचा अटलांटिक महासागराचा विस्तार दिसला. मोठे विलोभनीय दृश्य होते. ॲनिस्क्वॅम या नावाची एक छोटी नदी आहे. तिच्यावरील पूल ओलांडून आम्ही गावात शिरलो. येथे येण्याचे एक वेगळे आकर्षण मला होते. विवेकानन्द अमेरिकेत उतरले ते पॅसिफिक महासागराच्या तीरावर व्हॅंकुव्हर येथे. तेथून शिकागोस आठदहा दिवस राहून ते मिस सॅनबोर्न यांच्या निमंत्रणावरून बॉस्टनजवळच्या ब्रीझी मॅडोज येथे आले. प्रतिनिधी म्हणून नाव नोंदवण्याची मुदत संपून गेली असल्यामुळे त्यांनी सर्वधर्मपरिषदेला उपस्थित राहण्याचा विचार बाजूला ठेवला होता. भवितव्य अनिश्चित होते. हार्वर्ड विद्यापीठातील ग्रीक आणि लॅटिन या प्राचीन भाषांचे ख्यातनाम प्राध्यापक जॉन हेन्री राइट यांनी विवेकानन्दांची भेट घ्यावी, असे त्यांना सॅनबोर्न यांनी सुचवले. त्यांनी निमंत्रण पाठवले आणि त्यांना भेटण्यासाठी एका शनिवार-रविवारी विवेकानन्द ॲनिस्क्वॅमला आले.

घेतली. दिनांक तीस ऑक्टोबरला दुपारी साडेबारा वाजता बॉस्टनला उतरलो.

**ॲनिस्क्वम मधील विवेकानन्द**

माझी पत्नी शांता, हिचा भाचा अरविंदा. तो बॉस्टनला मला उतरून घेण्यासाठी आला होता, म्हणजे वॉशिंग्टनप्रमाणेच येथेही मी आपल्या घरी होतो. अरविंदाची सुविद्य पत्नी ज्योती आणि दोन मुले या सर्वांच्या सहवासात दोन दिवस मजेत गेले. अरविंदाचा कॉम्प्यूटरच्या क्षेत्रातील छोटासा स्वतंत्र व्यवसाय आहे. अमेरिकेत कोणी कोणी भारतीय तरुण असा स्वतंत्र व्यवसाय करताना दिसतात, तेव्हा मनाला मोठा आनंद वाटतो. त्यांचे येथील उद्योगव्यवसाय आणि अमेरिकेतील एकूण जीवन यांविषयीचे अनुभव ऐकण्याने आपल्या ज्ञानात भर पडते. दुसऱ्या दिवशी बॉस्टन येथील रामकृष्ण वेदान्त सोसायटीकडे जाताना सुप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठाच्या आवारातून एक फेरफटका मारला. चार्ल्स नदीचा प्रवाह सोसायटीच्या जवळून जातो. स्वामी परमानन्द यांनी येथील केन्द्र १९०८-मध्ये सुरू केले. पुढे स्वामी अखिलानन्दांनी अनेक वर्षे ती जबाबदारी उचलली आणि १९४१- मध्ये डीअरफील्ड स्ट्रीटवरील ही सोसायटी स्वतःच्या वास्तूत उभी राहिली. अध्यक्ष स्वामी सर्वगतानन्द आता पंच्यायशी वर्षांचे आहेत, पण त्यांचे प्रवचन, वर्ग आणि भेटीगाठी हे काम सतत चालू असते. स्वामी सर्वात्मानन्द हे त्यांचे सहकारी आहेत. मंदिर सुरेख आहे, आणि केन्द्रात सर्व सुविधा आहेत. सर्वगतानन्दांशी काही संवाद झाला.

दोन नोव्हेंबरला सकाळी सातला अरविंदाच्या गाडीतून तीसपस्तीस मैलांवरील ॲनिस्क्वॅमकडे निघालो. अटलांटिक महासागराच्या तीरावरील हे एक छोटे आणि टुमदार गाव आहे. एका वळणावरून आम्ही वळलो, आणि एकदम समोर ॲनिस्क्वमचा सारा परिसर व त्याच्या पलीकडचा अटलांटिक महासागराचा विस्तार दिसला. मोठे विलोभनीय दृश्य होते. ॲनिस्क्वम या नावाची एक छोटी नदी आहे. तिच्यावरील पूल ओलांडून आम्ही गावात शिरलो. येथे येण्याचे एक वेगळे आकर्षण मला होते. विवेकानन्द अमेरिकेत उतरले ते पॅसिफिक महासागराच्या तीरावर व्हॅकुव्हर येथे. तेथून शिकागोस आठदहा दिवस राहून ते मिस सॅनबोर्न यांच्या निमंत्रणावरून बॉस्टनजवळच्या ब्रीझी मॅडोज येथे आले. प्रतिनिधी म्हणून नाव नोंदवण्याची मुदत सपून गेली असल्यामुळे त्यांनी सर्वधर्मपरिषदेला उपस्थित राहण्याचा विचार बाजूला ठेवला होता. भवितव्य अनिश्चित होते. हार्वर्ड विद्यापीठातील ग्रीक आणि लॅटिन या प्राचीन भाषांचे ख्यातनाम प्राध्यापक जॉन हेन्री राइट यांनी विवेकानन्दांची भेट घ्यावी, असे त्यांना सॅनबोर्न यांनी सुचवले. त्यांनी निमंत्रण पाठवले आणि त्यांना भेटण्यासाठी एका शनिवार-रविवारी विवेकानन्द ॲनिस्क्वॅमला आले.

शंभर वर्षापूर्वी हे गाव अगदी छोटे होते. येथे रात्रीच्या शांत प्रहरी विवेकानन्दांचा अमेरिकेतील पंधरावीस सुशिक्षित व्यक्तींशी पहिला अनौपचारिक संवाद झाला. त्यात काही प्रश्नोत्तरे झाली. जगाच्या आजवरच्या इतिहासापासून प्रारंभ झाला. निरनिराळ्या राष्ट्रांनी इतर देशांवर केलेली आक्रमणे आणि त्यांतून होत गेलेले अन्याय व अत्याचार यांचा परखड परामर्श त्यात येऊन गेला. या अपराधाचे प्रायश्चित्त त्या त्या राष्ट्रांना ईश्वरी शासनाच्या रूपाने भविष्यात कधीतरी भोगावे लागणार आहे; येथवर विवेकानन्दांचे विवेचन येऊन ठेपले. हे सारेच श्रोत्यांना अनपेक्षित होते. पण या तरुण संन्याशाच्या विचारांतील तेज आणि प्रतिपादनातील स्पष्टवक्तेपणा ही वैशिष्ट्ये जशी ऐकणाऱ्यांच्या मनात भरली, तशीच त्याची विशाल दृष्टी आणि व्यापक विचारसरणी त्यांच्या अंतःकरणाला स्पर्श करून गेली.

प्रा. राइट यांच्याशी तर विवेकानन्दांचा धर्म आणि तत्त्वज्ञान या विषयांवर संपूर्ण दोन दिवस अखंड संवाद चालू होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे राइट केवळ थक्क होऊन गेले. पण मिसेस राइट हे सारे संभाषण ऐकत होत्या, आणि त्यांनी आपल्या आईला पत्रात लिहिले, ''रूढ कालगणनेनुसार या तरुण संन्याशाचे वय तीस वर्षांचे आहे, पण ज्ञान आणि शहाणपण या दृष्टीने ते कित्येक युगांचे आहे.'' सर्वधर्मपरिषदेला उपस्थित राहण्याचा राइट यांनी विवेकानन्दांना आग्रह केला. आपल्याजवळ कोणत्याही संस्थेचे अधिकारपत्र नाही, असे विवेकानन्द म्हणाले, तर राइट उत्स्फूर्तपणे उद्‌गारले, ''स्वामीजी, सर्वधर्मपरिषदेला उपस्थित राहण्यासाठी तुमच्याकडं अधिकारपत्र मागणं म्हणजे सूर्याला तुला प्रकाशण्याचा काय अधिकार आहे, असं विचारण्यासारखं आहे.'' राइट नुसता सल्ला देऊन थांबले नाहीत. त्यांनी परिषदेच्या कार्यवाहांना एक परिचयपत्र दिले. त्यात विवेकानन्दांबद्दल म्हटले होते, ''आपल्याकडच्या साऱ्या प्राध्यापकांचे ज्ञान एकत्रित केले, तर त्याहून ज्याची विद्वत्ता अधिक भरेल असा हा तरुण संन्यासी आहे.''

ॲनिस्क्वम येथील व्हिलेज चर्चमध्ये विवेकानन्दांचे एक व्याख्यान आयोजित करण्यात आले. हे विवेकानन्दांनी अमेरिकेत दिलेले पहिले व्याख्यान. आम्ही त्या चर्चकडे गेलो, पण ते बंद होते. तेथील आवारात एक व्यक्ती काही काम करीत होती. अरविंदाने त्यांना म्हटले, 'हे माझे काका भारतातून आले आहेत, हे चर्च पाहण्याची त्यांना फार इच्छा आहे.'' योगायोग असा की, त्यांच्याकडेच त्या चर्चची सारी देखभाल होती. ते घरी गेले. किल्ली घेऊन आले, आणि त्यांनी सारे चर्च आम्हाला दाखवले. सुमारे दीडदोनशे लोकांची बसण्याची व्यवस्था तेथे होती. अखेर त्यांनी व्हिजिटर्स बुक समोर ठेवले. आम्ही दोघांनी आमची नावे व पत्ते त्यात लिहिले. एक अज्ञात संन्यासी म्हणून स्वतःला तितक्याच अज्ञात असलेल्या एका परक्या देशात विवेकानन्दांनी पाऊल ठेवल्यावर, जेथे पाश्चात्त्य सुशिक्षितांशी

त्यांचा पहिला अनौपचारिक सवाद झाला, विद्यापीठात अध्यापन करणाऱ्या एका ख्यातनाम प्राध्यापकावर जेथे त्यांचा विलक्षण प्रभाव पडला. छोट्याशा श्रोतृसमुदायासमोर जेथे त्यांचे पहिले प्रकट व्याख्यान झाले, आणि जेथे एक प्रशस्तिपर परिचयपत्र मिळाल्यामुळे त्यांना सर्वधर्मपरिषदेचा आणि भारताचा अध्यात्मविचार पश्चिमेला पोचवण्याचा दरवाजा खुला झाला, त्या छोट्याशा खेड्यातील व्हिलेज चर्चच्या आवारात फिरताना मन समाधानाने भरून गेले. बॉस्टनला परत येऊन सव्वाअकराच्या गाडीने मी न्यूयॉर्ककडे निघालो. अरविंदा आणि ज्योती लोहमार्ग स्थानकावर मला निरोप देण्यास आली होती. न्यूयॉर्कच्या थोडे पलीकडे असलेले मार्लबरो येथे जावयाचे होते किरण रेगे मेट्रोपार्क स्थानकावर येऊन आपल्या गाडीतून मला घरी घेऊन गेला, तोवर संध्याकाळ झाली. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यानंतर मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक म्हणून काम करीत असलेले प्रा. मे. पु. रेगे हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य, ते आणि मी अनेक वर्षे सहकारी होतो. किरण त्यांचा मुलगा. त्याची पत्नी दीप्ती, आणि सहा वर्षांचा मुलगा निश्चय. त्याचे प्रशस्त आणि सुंदर निवासस्थान न्यूयॉर्कपासून पचवीसतीस मैल आहे. त्याला येथे येऊन चार वर्षे झाली होती, पण त्याआधीही तो अमेरिकेत दोनतीन वर्षे होता. मध्यंतरी तीन वर्षे भारतात राहून पुन्हा अमेरिकेत परत गेला. त्याच्या बुद्धिमत्तेचे चीज आपल्याकडे होऊ शकले नाही. दीप्तीने समाजसेवेच्या अभ्यासातील पदवी मिळवली आहे. ती अर्धवेळ नोकरी करते.

### विदेशातील भारतीयांपुढचा यक्षप्रश्न

असे अनेक बुद्धिमान महाराष्ट्रीय तरुण आज अमेरिकेत मोठ्या पदांवरून कामे करीत आहेत. हा अनुभव मन प्रसन्न करणारा होता. इतर प्रांतांतीलही कितीतरी असे लोक आहेत, हे समजत होते. नासामध्ये काम करणारे, विद्यापीठांतून संशोधन करणारे, वैद्यकीय क्षेत्रात लोकांचा विश्वास संपादन केलेले, अशा विविध क्षेत्रांत आपल्या व्यावसायिक बुद्धिमत्तेची मुद्रा उमटवणाऱ्या या साऱ्या व्यक्ती होत्या. ही भारताच्या कर्तृत्वाची एक खूण होती. साठ वर्षांपूर्वीचे चित्र काय होते? आमची पिढी तेव्हा विशीच्या जवळ होती. पारतंत्र्याची बोच मनात किती खोलवर पोचत असते, आणि "वंदे मातरम्" हे गीत ऐकताना स्वदेशाविषयीच्या अभिमानाने मन कसे थरारून जात असे, याची कल्पना आजच्या विशीतील तरुणांना त्यांनी मनाशी थोडा शातपणाने विचार केला तर येऊ शकेल. त्यानंतर दहा वर्षात आपला देश स्वतंत्र होणार आहे, याची पुसटशी कल्पनाही कोणाला तेव्हा नव्हती. या देशात तेव्हा काय होते? साधी काचेची बांगडी आपल्या देशात होत नाही, हे दैन्य रंगवणारी गाणी वयाच्या चौदापंधराव्या वर्षी गणेशोत्सवाच्या मेळ्यामधून देशभक्तीचा एक आविष्कार म्हणून म्हटली

होती.

लक्ष्मणराव किर्लोस्कर आणि प्रभाकरपंत ओगले यांची नावे केवढी दुमदुमली! त्या काळात ते सर्वथा योग्य होते. पण कोणता चमत्कार त्यांनी घडवून आणला होता? एकाने शेतात उपयोगी पडणारा नागर बनवला, तर दुसऱ्याने घरात प्रकाश देणारा कंदिल तयार केला. आज त्याच्या कितीतरी पट तांत्रिक कुशलता असलेले कामगार कोल्हापुरात आहेत, आणि उत्तरेकडे पंजाबातही आहेत. साधी शस्त्रक्रिया भारतात होत नव्हती, आता मध्यपूर्वेतील श्रीमंत अरब उपचारासाठी मुंबईला येतात. स्वातंत्र्यानंतर शिक्षण आणि उच्च तंत्रविद्या आपल्या तरुणांनी बघताबघता आत्मसात केली, आणि गेल्या दहावीस वर्षांत अनेक भारतीय तरुण अमेरिकेत मोठ्या हुद्द्यावर कामे करू लागले. प्रगती जितकी व्हावयास हवी होती तितकी झाली नाही, ही तक्रार रास्त असूनही एवढी मजल आताच्या पिढीने मारली आहे. ही भारताच्या बुद्धिमत्तेला मिळालेली पावती आहे. तुलनेने भारतीय तरुण अधिक हुषार असतात, असे कोणीकोणी आपले निरीक्षण सांगितले ते ऐकताना फार बरे वाटले. या तरुणांच्या बुद्धिमत्तेचा उपयोग स्वदेशाला का होत नाही हा एक वेगळा प्रश्न आहे

त्यातील दोषाचा भाग, ज्याच्या हातात आज राजकीय सत्ता आहे आणि जी नोकरशाही या देशाची प्रशासकीय यंत्रणा चालवते, त्या वडील पिढीकडे अधिक आहे, याचा विसर आमच्या पिढीने पडू देता कामा नये; कारण स्वातंत्र्यासाठी आम्ही लढा दिला आहे असा एक अभिमानाचा भाग आपल्या मनोमनी असतो, पण त्याच आपल्या पिढीने त्यातील सारी शोभा पार गमावली आहे. इतकी गमावली आहे की, ती निस्तरण्याचा भार आपल्या शिरावर घेण्याचे धाडस आपण करावे की नाही अशा संभ्रमात आजचा विचारी आणि समाजहितैषी तरुण आहे. ऐन तरुण वयापासून मागच्या पिढीतील जे भारतीय अमेरिकेत राहिले आहेत, त्यांची मुले त्या देशातील वातावरणात तेवढ्याच परक्या पद्धतीने लहानाची मोठी झाली आहेत. दिवसभर आईवडील कामावर जातात, आणि त्यांची संस्कारक्षम वयातील मुले त्या विदेशी वातावरणात वावरत असतात. भारतीय संस्कृतीची साधी झुळूकदेखील त्याच्या अंगावरून जात नाही. पंधरासोळा वर्षांची झालेली ही मुले कधीकधी भारतात येतात, पण येथे समरस होऊ शकत नाहीत वा रमत नाहीत, हे पाहिल्यावर आईवडील मनातून कष्टी होतात.

हा अनुभव ध्यानात घेऊन अलीकडे अमेरिकेतील काही भारतीय पालक मुलांना घरात रामायणमहाभारतातील काही कथा सांगतात, धार्मिक पुस्तके वाचावयास देतात, किंवा आठवड्यातून एकदा एखाद्या मदिरात तास दोन तास घेऊन जातात. अशी मंदिरे हवीत असे वाटू लागल्यामुळे तिकडे स्थायिक झालेल्या भारतीयांनी अनेक शहरांत मंदिरे उभी केली

आहेत. तेथे पालकांना काही विरंगुळा मिळतो, पण मुले समरस होत नाहीत. आठवड्यातील सहा दिवस ती ज्या वातावरणात वावरतात त्याचा होणारा मनावरील परिणाम अशा एखाद्या साप्ताहिक आरतीमुळे पुसला जात नाही, किंवा आठपंधरा दिवसांचा संस्कारवर्ग घेतला तरी तो अंतःकरणात स्थिर होत नाही. अशी ही मुले पंचविशीला येतात, तेथेच कोणाशी तरी विवाह करतात. तो मुलगा व ती मुलगीही अशीच विदेशी वातावरणात वाढलेली आणि पाश्चात्त्य ढंगाची असतात. विदेशी तरुणाशी वा तरुणीशी क्वचित कोणाचा प्रेमविवाह झाला तर विवाह प्रेमाचा होतो, पण संसाररूपी वृक्षाला जी फळे येतील ती कोणती मानसिक घडण घेऊन उभी राहतील? त्यांना तेथील समाज आपल्याला सामावून घेईल? त्यांचे सांस्कृतिक वातावरण या भारतीयांचे मन पुलकित करील?

गाडीतून शनिवार-रविवार सहलीला जाणे ठीक आहे, चॉकोलेट आणि कोकाकोला आपलासा करणे तर फार सोपे आहे. तेथील रीतिरिवाज आपलेसे करणेही जमून जाईल. पण आज नाताळचा दिवस आहे किंवा ईस्टरचा सण आहे, वॉशिंग्टनचा जन्मदिन आहे किंवा अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन आहे, म्हणून होत असलेल्या तेथील सार्वजनिक उत्सवांचा भावनिक स्पर्श मनाला होईल काय? बालपणापासून अमेरिकेत राहून भारतीय संस्कृतीला पारख्या होऊन गेलेल्या आणि अमेरिकन संस्कृतीशी काही नाते निर्माण न झालेल्या या पिढीचे पुढील एकंदर आयुष्य कोणते सांस्कृतिक रूप धारण करील? आलीशान निवासस्थान मालकीचे असेल, भोवती सुंदर बाग असेल, घरात चार माणसे असली तर दारात पाच गाड्या असतील, अत्याधुनिक सर्व यांत्रिक सुविधा बटन दाबताच "जी हुजूर" म्हणतील, बँकेत शिल्लक इतकी पडेल की तिचा हिशेबही करावासा वाटणार नाही, अपार भौतिक ऐश्वर्य असेल; पण आपण कोणत्या समाजाचे? भारतीय का अमेरिकेचे? नागरिकत्वाच्या दृष्टीने नाही, तर सांस्कृतिक वारशाच्या दृष्टीने आपण कोण? कोणत्या समाजाच्या सामूहिक जीवनाशी आपले आंतरिक आणि भावनिक असे सहजसिद्ध नाते आहे? असे प्रश्न स्वतःला विचारले तर काय उत्तर देता येईल?

पंचविशीत असलेल्या अमेरिकेतील आजच्या भारतीय युवकयुवतींना या प्रश्नांची निकड भासत नाही, किंबहुना जाणवतही नाही. या गोष्टीचा विचार करण्यास त्यांना वेळच नाही. सोमवार ते शुक्रवार सारा दिवस कार्यालयातील वा व्यवसायातील तेच ते काम, आणि काही वर्षानंतर तोच तो होऊन जाणारा सप्ताहान्त किंवा वीक एंड. ती मौजमजाही हळूहळू निर्जीव होऊन जाणारी. या मुलांचे हे भवितव्य पालकांना जाणवते आणि ती चिंतेत पडतात, क्वचित व्याकुळ होतात. अनाथाश्रमात वाढलेल्या मुलाला उत्तम विद्या आणि शिक्षण मिळावे, पैसा व प्रतिष्ठाही लाभावी, पण रक्ताच्या नात्याचा आनंद मिळू नये, किंवा

केवळ अनौपचारिकपणे आणि सहज स्वाभाविकतेने येणारा कोणाच्या जवळिकीचा अनुभव लाभू नये, आणि मग त्याला स्वतःच्या जीवनात येणारा रितेपणा जाणवू लागावा; तशी काहीशी पण त्याहूनही अधिक रिती असणारी पोकळी उत्पन्न करणारी जीवनसरणी बालपणापासून विदेशी वातावरणात वाढत आलेल्या पिढीच्या वाट्याला उद्या येणार आहे. ना धड भारतीय, ना धड अमेरिकन, असे तिचे रूप होण्याचे फार मोठे भय आहे. त्यांच्या आईवडिलांच्या सर्व आर्थिक चिंता मिटलेल्या आहेत, पण अंतःकरणात कोठेतरी खोलवर हे शल्य आहे.

पण तीसपस्तीस वर्षे विदेशात वास्तव्य केल्यावर याहून निराळे काही घडू शकत नाही. बालपणापासून येथे वाढलेली मुले पाश्चात्त्य जीवनशैली उचलतात, पण ती येथील समाजात सामावली जातील हे शक्य नसते. अशा या पिढीच्या जीवनाला सामाजिक आणि सांस्कृतिक रूप कोणते राहणार? कोणतेच राहणार नाही हे स्पष्ट आहे. मग उत्तम पैसा व फारफार तर सुखाचे वैवाहिक जीवन एवढेच अधिकात अधिक त्यांच्या हाताला लागेल. बाकीचे सारे रितेपण येईल. हे सर्वांना मानवेल? काही सांगता येत नाही. पण अशा प्रकारे त्यांची व्यक्तिगत जीवने कोठेतरी त्रिशंकूसारखी अधांतरी लटकलेली, आणि ना शेंडा ना बुडखा अशी अवस्था असलेली, अशी होऊन जाणे कितपत स्पृहणीय मानता येईल? अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीचा प्रचार धूमधडाक्याने चालू होता. अमेरिकेचे नागरिकत्व घेतल्यामुळे ज्यांना मताचा अधिकार प्राप्त झाला आहे, अशा भारतीयांना मनाने ना डेमॉक्रॅटशी कर्तव्य आहे, ना रिपब्लिकनाशी आहे. ते भले अमेरिकेचे नागरिक झाले असतील, पण त्यांना येथील समाज आपल्यापैकीच हे कोणीतरी असे मानीत नाही. मानसिक किंवा भावनिक पातळीवर तसे घडणे अशक्य असते, त्यात दोन्ही बाजूंनी कोणाचा दोष नसतो. तो परिस्थितीचा एक अपरिहार्य परिपाक असतो.

पण अशा परिस्थितीत नागरिकत्वाचा व मतदानाचा हक्क प्राप्त झाला, तरी त्याचा काय उपयोग आहे? व्यक्तीची स्वतःची अशी एक अस्मिता असते, तिचा जसा व्यक्तिगत पातळीवरील कर्तृत्वाशी संबंध असतो, तसा सामाजिक पातळीवरील सांस्कृतिक संचिताशी असतो. ते संचित अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीयांच्या पुढच्या पिढीला कोणतेच लाभणार नाही. यामुळे काय बिघडते, असे एखादा एकलकोंड्या प्रवृत्तीचा मनुष्य म्हणू शकेल, आणि बुद्धिवादाच्या पातळीवर त्याचा प्रतिवाद करता येणार नाही. ती त्याची त्याच्यापुरती व्यक्तिगत निवड आहे असे म्हणता येईल. पण अशी व्यक्ती हा अपवाद असतो. जीवनात काहीतरी उणे खचितच पडते आणि ते फार मोलाचे असते. सर्वसामान्य माणसाला सांस्कृतिक वातावरणाचा धागा हवा असतो. अशी भारतीय माणसे पुढच्या पिढीविषयीचा विचार करताना मनातून अस्वस्थ असतात हे जाणवते. याच्या उलट ज्यांचे

आईवडील इकडे भारतात असतात आणि मुले अमेरिकेत चाळीशी ओलांडून गेलेली असतात, त्याच्यातील पिढीचे अतर हे केवळ वर्षाचे राहात नाही, तर त्याला एक सांस्कृतिक दुराव्याचे रूप प्राप्त होते.

कितीही वर्षे अमेरिकन नागरिकत्व घेऊन राहिले आणि कितीही उत्तम कर्तृत्व दाखवले, तरी अमेरिकन समाज भारतीयांना दुय्यम स्थानावरच ठेवणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. तो त्यांचा दोषही म्हणता येणार नाही. आपल्याकडे असाच एखादा चिनी, जपानी वा अमेरिकन मुलेबाळे येथेच मार्गी लागेपर्यत राहिला, तरी त्याचीही आपल्या समाजात तीच अवस्था होईल अमेरिकेत थोडा काळ राहिल्यावर एकाने मला पत्रात लिहिले होते, ''येथील हे अपार ऐश्वर्य काही खरे नाही, आपल्या देशात अस्वच्छता असेल किंवा मुंबईत झोपडपट्टी असेल, पण अखेर आपला देश तो आपला देश.'' या उद्गारात मानवी जीवनातील सुखाचा भौतिक समृद्धीपासून निराळा असणारा असा फार मार्मिक अंश व्यक्त झालेला आहे. अमेरिकेत वावरताना, तेथील आपल्या लोकांशी गप्पाटप्पा करताना, आणि एखाद्या गाफिल क्षणी कोणाच्या तरी मुखातून बाहेर पडणारा उद्गार ऐकताना, त्यांच्या मनातील हे शल्य वा त्यांच्यापुढे उभा असलेला यक्षप्रश्न जाणवत असे. एखादी अपवादात्मक व्यक्ती सोडली, तर हरएकाला हे सांस्कृतिक अनाथपण जाणवल्याशिवाय राहात नाही. अखेर मानवी जीवनातील आनंद कशात साठवलेला आहे, याचा विचारही आपला देश सोडून दीर्घकाळ परदेशात राहणाऱ्या विचारी व्यक्तीनी करणे आवश्यक आहे. सर्व क्षेत्रांतील ज्ञान आणि भौतिक सोय प्राप्त करून देणाऱ्या अत्याधुनिक सुविधा कितीही प्राप्त झाल्या, तरी माणसाच्या मनातील भावनिक अंगाचे समाधान त्यामुळे होत नाही, हे ध्यानात घेणे फार आवश्यक आहे.

सर्वात सोपा मार्ग दिसतो तो हा की, जीवनाचा प्रारंभ करताना अनुभवासाठी अवश्य परदेशात जावे, कर्तृत्व दाखवावे, नवे ज्ञान संपादन करावे, तिकडे पैसा तर मिळतोच तोही साठवावा, वैवाहिक जीवनानतरही राहावे, पण आपली मुले पाचसहा वर्षांची होत असताना मायभूमीच्या कुशीत परत यावे. तिच्या जुन्यापुराण्या झालेल्या पण तरीही अपार मायेच्या वस्त्रात जी ऊब आणि प्रेम मिळते, ते विदेशातील अद्ययावत लांड्या फ्रॉक्समध्ये किंवा घोट्यापर्यंतच्या जीन्समध्ये लाभत नाही. आपल्या मातृभूमीच्या दुधावर आपल्या मुलाबाळाचे मानसिक आणि भावनिक पोषण होईल अशी दक्षता घ्यावी. विदेशात मिळवलेली लक्षावधी रुपयांची संपत्ती त्यांच्यासाठी मागे ठेवण्यापेक्षा आपल्या देशाचा आणि संस्कृतीचा बरा-वाईट जो काही असेल तो संस्कार त्यांच्या मनावर सहज स्वाभाविकपणे होऊ देणे हे लक्षपटीनी॰अधिक मोलाचे आहे अर्थात हा विचार ज्याचा त्याने करावयाचा आहे. पण

विदेशात फिरत असताना हे जाणवत होते हे मात्र खरे.

### स्वावलंबन आणि अपरिपक्वता

सध्या तरी भारतीय तरुणांना अमेरिकेत वाव मिळत आहे. दूरभाषवर मुलाखत घेतली जाते, आणि नियुक्तीपत्र व्हिसाच्या कागदपत्रांसह काही तरुण पदवीधरांना थेट कंपनीकडून जाते. आधी काहीही कल्पना नसताना काही तरुण या प्रकारे अमेरिकेत आले, आणि त्याची पहिल्या दोनतीन महिन्यांची निवासापासूनची सारी व्यवस्था केली गेली. हॉलंड येथे गेलो असताना तेथे आमच्या घराजवळ राहणारे माझे एक मित्र श्रीकांत कुलकर्णी यांचा मुलगा कांचन अकस्मात भेटला. मला मोठा आनंद वाटला. ''तू एकदम इथं कसा काय'', या प्रश्नावर त्याने सांगितले, ''आमच्या कंपनीतले चौघेजण असेच इथं अचानक नोकरी मिळाली, म्हणून आलो आहोत.'' कांचनची पत्नीही बरोबर आली होती; त्यांच्या तेथील निवासस्थानी जाऊन आलो. संगणकक्षेत्रात अमेरिकेमध्ये सध्या प्रचंड वाढ होत आहे आणि अमेरिकेत त्या क्षेत्रातील पदवीधर आवश्यक त्या प्रमाणात तेथे उपलब्ध होत नाहीत, यामुळे हे सारे घडत आहे. ही गरज कोठेतरी संपेल आणि ही मागणी थांबेल. ते स्वाभाविक आहे.

पण एवढ्या या प्रगत देशात उच्च शिक्षण घेतलेल्या आवश्यक त्या माणसांची अशी उणीव का भासावी, हा प्रश्न उरतोच. एक उत्तर असे मिळाले की, या देशात महाविद्यालयीन शिक्षण फार महाग आहे, ते देणे सामान्य नागरिकाला शक्य होत नाही. हे उत्तर मला तितकेसे पटणारे नाही. भारतातील सामान्य मध्यमवर्गीय आईबाप प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन आपल्या मुलांना विद्या मिळावी यासाठी धडपडतात. जो देश आज साऱ्या जगात समृद्ध आहे, तेथे विद्यासंपादनाची थोडीफार अडचण पडली तरी ती निवारता येणार नाही, असे वाटत नाही. असेही ऐकावयास मिळाले की, सर्वसामान्य अमेरिकन विद्यार्थी अधिक शिकण्यास उत्सुक नसतो, किंवा झटून अभ्यास करण्याची त्याची प्रवृत्ती नसते. हे नेमके बरोबर असेल असा आग्रह धरण्याचे कारण नाही, पण तेथे अनेक वर्षे राहिलेल्या भारतीयांचे हे निरीक्षण आहे. असे तरी का व्हावे? एकूण व्यक्तिजीवनाची व कौटुंबिक जीवनाची जी सरणी या देशात आहे, तीमध्ये याचे उत्तर मिळेल काय?

पाश्चात्त्य समाजातील उगवत्या पिढीविषयी कितीएक वर्षे असे ऐकावयास मिळाले आहे की, तेथील मुलेमुली सोळाअठरा वर्षांची होताच स्वतंत्र जीवनाचा मार्ग चोखाळू लागतात, आणि आपण आईवडिलांवर अवलंबून राहता कामा नये अशी त्यांची प्रवृत्ती असते. माझ्या निरीक्षणाला मर्यादा आहेत हे मला विसरता येत नाही, तेव्हा कोणतेही ठाम वा आग्रही विधान मी करू नये. पण पाश्चात्त्य देशांतील मुले अठराव्या वर्षापासून मिळेल ते

काम करतात, आपला आपण पैसा मिळवतात, वेळप्रसंगी शेतात मजुरी करणे किंवा उपाहारगृहात गिऱ्हाईकांना खाद्यपदार्थ टेबलावर नेऊन देणे अशीही कामे करतात, पण स्वावलंबी जीवन जगू लागतात; हा त्यांच्या जीवनातील एक गौरवास्पद भाग म्हणून अनेक वेळा कौतुकाने सांगितला जातो. यातील लवकरात लवकर स्वावलंबी होणे हा मोठाच गुण आहे, यात शंका नाही. पण आपल्या मुलांना ती जितके शिकू शकतील तितके शिक्षण देणे व त्यासाठी आवश्यक तो खर्च करणे, आवश्यक तर त्यासाठी काही तोशीस सोसणे, ही तेथील आईवडिलांना आपली जबाबदारी का वाटू नये?

पंचवीस वर्षांपर्यंत विद्यार्जन करावे हा भारतीय संस्कृतीतील आदर्श मानलेला आहे. उत्तम विद्या संपादन करण्यासाठी पदव्युत्तर पातळी ओलांडावयाची असेल, तर तेवीसचोवीस वर्षांचे वय होईतो अभ्यास करावा लागतो, हे आजच्या आधुनिक काळातही दिसते. तेवढे विद्यार्जन होईतो आपल्या मुलावर बाहेर कष्ट करण्याची वेळ का यावी? तोच वेळ त्याला आपले मन आणि बुद्धी विकसित करण्याची पूर्ण संधी आपण द्यावी, किंबहुना तशी ती दिली पाहिजे. ज्या मुलांना आपण जन्म दिला त्यांच्या बाबतीतील ही आपली नैतिक जबाबदारी आहे, असे का मानले जाऊ नये? कोठेही कोणी आपद्ग्रस्त असेल, तर त्याला मदत करणारे अनेक हात या नव्या जगात पुढे येतात, अशी त्यांची कीर्ती आहे. मग शिक्षण पूर्ण होईतो मुलांचे सारे काही प्रेमाने करणे हा सहज आचरणाचा भाग का होऊ नये? या प्रश्नाला आणखी एक बाजू आहे आणि तीही विचारात घेणे फार आवश्यक आहे. अठराव्या वर्षी मुलांची सारी शारीरिक वाढ पूर्ण झालेली असते आणि बुद्धीला जगातील व्यवहाराची पुरेशी जाण आलेली असते, असे म्हणता येत नाही. ती वयोमर्यादा मुलींच्या बाबतीत वीसएकवीस तर मुलांच्या बाबतीत चोवीसपंचवीस मानणे अधिक प्रशस्त आहे. सोळाव्या वर्षी मुलगा जगातील गोष्टी काहीशा जाणकारीने पाहू लागतो. त्यानंतर दोनतीन वर्षे ही क्षमता वाढत जाऊन वीसएकवीस वयाशी येताना त्याची स्वतंत्र मते बनू लागतात, तर बावीसतेवीस वयाला त्याच्या प्रवृत्तीची दिशा बरीच स्पष्ट होते, त्याच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला आकार आला आहे हे जाणवते, आणि पंचविशीच्या मुलाकडून तर वडिलांना एखादा मोलाचा सल्लाही मिळू शकतो.

ही सारी प्रक्रिया डोळ्यांसमोर आणली, तर सोळासतरा ते बावीसतेवीस ही वर्षे मुलांच्या प्रवृत्तीला इष्ट वळण लागण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची असतात. तोवर घरातील एकूण वातावरणात अबोधपणे झालेले संस्कार या वयात दृढ होतात. या कालावधीत प्रेमळ आणि जगाच्या व्यवहारातील चार टक्केटोणपे खाल्लेल्या अनुभवी मातापित्यांशी या मुलांचा नित्य मनमोकळा संवाद होत राहणे, त्यांच्या क्रियाप्रतिक्रियांना योग्य दिशा मिळण्यावर

आईवडिलांचे लक्ष असणे, आणि शाळामहाविद्यालयातील ठराविक शिक्षणाबरोबर बरे काय आणि वाईट काय, योग्य काय आणि अयोग्य काय, किंवा तात्कालिक सुखाचे काय आणि दूरगामी हिताचे काय, हे जाणण्याची क्षमता त्या त्या मुलाची निसर्गसिद्ध कुवत असेल तिला अनुसरून जेवढी निर्माण होणे शक्य असेल, तेवढी होण्यासाठी आपल्या मुलांचे कल्याण चिंतणाऱ्या आईवडिलांच्या छत्राखाली मुलेमुली असणे हे अधिक योग्य होय. पैसा योग्य प्रकारे कसा खर्च करावा हे आधी कळावे, आणि मग पैसा हाती द्यावा. कोणते सुख घ्यावे, ते कोणत्या मार्गानि आणि कोणत्या मर्यादेपर्यंत घ्यावे, याचे ज्ञान अगोदर प्राप्त व्हावे, आणि मग स्वतंत्रपणाने सुख घेण्याची मोकळीक मिळावी. कोणत्या प्रकारच्या लोकांच्या संगतीत राहावे आणि कोणापासून दूर राहावे याचा विवेक करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे आणि मग समाजात वावरण्याची मुभा मिळावी. आयुष्यात कोणता मार्ग धरला असता ऐंशीनव्वद वर्षांपर्यंतचे प्रत्येक दशक समाधानाचे होत जाईल, याची दिशा कळावी आणि मग आपल्या आयुष्याला दिशा देण्याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य प्राप्त व्हावे.

असा दृष्टिकोण स्वीकारला, तर अठराव्या वर्षी मुले स्वावलंबी होतात व आईवडिलांवर आपला भार टाकत नाहीत, यामध्ये जो चांगला अंश आहे, त्याहून काहीतरी अधिक हितकारक, ती मुले तेवीसचोवीस वयाशी येईपर्यंत निश्चिंतपणाने आईवडिलांच्या छत्राखाली आपले शरीर आणि मन-बुद्धी यांचा परिपूर्ण विकास करून घेण्याचा आनंद घेत असावीत, या घराच्या आश्रयात आहे असे म्हणावे लागेल. आजकाल सतत तक्रार ऐकू येत आहे की, नवीन पिढी बेबंद होत आहे, त्यांच्यात प्रेमाचा आणि कर्तव्याचा भाग कमी होत आहे, ती व्यसनांच्या आहारी जात आहे, आणि अखेरचे ध्यानात घ्यावयाचे असेल तर ती सोळा अठरा वयापासून कामजीवनाचा आस्वाद घेत आहेत; त्यांतून त्यांचे मानसिक संतुलन लवकर बिघडणे किंवा निरनिराळ्या रोगांचा प्रादुर्भाव होणे अशा गोष्टी घडत आहेत. पंधरा वर्षांची मुलगी गर्भवती होते. अशा बहुसंख्य प्रकारांत जबाबदार असलेला तरुण हात झटकून मोकळा होतो, तो मी नव्हेच ही भूमिका घेतो, त्या मुलीची विचारपूस करीत नाही, अशा अनेक उदाहरणांत मुलीचे जीवन उद्ध्वस्त होते.

हे नमूद करणे आवश्यक वाटते की, क्षणभराच्या वासनापूर्तीसाठी एखाद्या मुलीचे पुढचे सारे जीवन कोणाकडून उद्ध्वस्त होऊन गेले, आणि वर्षानुवर्ष ती भग्न मनोवस्थेत पिचत राहिली, तर तो एक महान अपराध आहे, एखाद्याचा खून करण्याहूनही काही दृष्टींनी तो अधिक गंभीर आणि निर्घृण असा गुन्हा आहे. टॉलस्टॉयच्या रिसरेक्शन या कादंबरीतील कथा उमराव घराण्यातील तरुणाकडून एका मोहाच्या क्षणी घडून गेलेल्या प्रमादावर उभी आहे, आणि मॅस्लोव्हा ही त्या कादंबरीतील नायिका त्या प्रमादाची बळी होऊन सुसस्कृत

जीवनाला कायमची मुकलेली एक दुर्दैवी स्त्री आहे. त्याही परिस्थितीतील तिची मूक उदात्तता आपल्या मनाला चटका लावून जाते. त्या तरुणाच्या मनात स्वतःच्या अपराधाबद्दल प्रायश्चित्त घेण्याची ऊर्मीही तेवढीच उदात्त आहे. असा हा गुन्हा तरुण मुलाच्या हातून सहजपणाने का घडतो आणि एखाद्या मुलीच्या कपाळी वनवास का येतो, याचा विचार करू गेले तर असे आढळून येते की, प्रेम आणि वासना यांतील फरक समजलेला नसतो अशा अजाण वयात हे प्रकार घडून जातात.

असे तरुणही एकदा ती चटक लागल्यावर नित्य नव्या मैत्रिणीच्या सहवासाचा आनंद घेऊ पाहतात, पुढे विवाह केला तरी ही भ्रमरवृत्ती जात नाही. ती चालूच राहते. विवाहित स्त्रीही काही वेगळा अनुभव घेऊ पाहते. या सर्वाला व्यक्तिस्वातंत्र्याच्या गोडस तत्त्वाचे समर्थनही लाभते. अखेर हा मार्ग जीवनात समाधान देणारा नाही हे कळते, तेव्हा फार उशीर झालेला असतो. मुले अठराव्या वर्षीच स्वावलंबी होतात या काहीशा गौरवपर सुरात केल्या जाणाऱ्या विधानाचे हे अंतिम फलित असते, असे म्हटले तर काय उत्तर सुचेल? पाश्चात्त्य देशांत बाह्य जीवन इतके सुखसोयींनी भरलेले आहे की, आपण थक्क होऊन जातो. पण नाना विलास आणि विविध सुखोपभोग यांचा मुक्त रस्ता असलेल्या त्या जीवनात आंतरिक समाधान आहे काय, याचा शोध घेऊ लागले की मन दचकते.

**मुक्त शृंगार आणि प्रेमाचा शोध**

ब्रिटनची घटस्फोटित युवराज्ञी डायना हिचा याआधी उल्लेख येऊन गेला आहे. नंतर हे लेखन चालू असताना तिचा अपघाती मृत्यू झाला. ऐन तरुण वयातील मृत्यू, सारे जग हळहळले. त्या निमित्ताने अनेक छायाचित्रे प्रसिद्ध झाली. पण त्यांतील काही चित्रे तिच्या निरनिराळ्या प्रियकरांची होती; याचा विसर पडतो. आपल्यावर खरेखुरे प्रेम करणाऱ्याचा ती शोध घेत होती, असे मोठे वेधक वर्णनही येऊन गेले. पण जो कोणी योगायोगाने भेटेल आणि ज्याच्याविषयी त्या क्षणी शारीरिक ओढ वाटेल, त्याला आपल्या तारुण्याचा आणि सौन्दर्याचा उपभोग घेऊ देण्याच्या मार्गाने खऱ्या प्रेमाचा शोध लागत नाही, हे तिला ना तिच्या आईबापांनी आपल्या वर्तनातून शिकवले, ना समाजातील एकंदर व्यवहारातून ते तिला उमजले. राजघराण्यातील सिंहासनी विलासांतही ते तिला समजू शकले नाही. कसे समजणार? तेथे तर तिचा पती तिच्याशी विवाह करण्यापूर्वीच प्रेयसीचा अनुभव घेऊन चुकला होता, आणि विवाह केल्यावरही आणखी कोणा प्रेयसीच्या आकर्षणात गुंतलेला होता. प्रेमाचा शोध घेण्यासाठी शृंगाराचा आस्वाद घेऊ देणारी डायनासारखी तरुणी, आणि आयुष्यभर कोणाच्या तरी सुखदुःखाची वाटेकरीण आपण होणार आहोत असे मानून मग त्याच्याशी शृंगार

करणारी युवती, त्या दोघींत जमीनअस्मानाचे अंतर असते. पण हे अंतर तरुण पुरुषाला कळावयाचे असेल, तर जबाबदारीची एक वेगळी जाणीव निर्माण व्हावी लागते. साऱ्या दिशा मोकळ्या असतील तर धनवंत तरुणाला कोणावरही त्या त्या वेळी प्रेम करणे परवडते. पण राजघराण्यातील पुरुषाशी विवाह करूनही डायनाला ते अखेर परवडले नसते, हे विदारक सत्य समजण्याच्या आधीच तिचे जीवन समाप्त होऊन गेले. तिच्या आयुष्याच्या शोकांतिकेचे मूळ अखेर पाश्चात्त्य जगातील स्त्रीविषयक संबंधाविषयीच्या कल्पनांत जाऊन पोचते. तिच्या थोरल्या मुलाने शवपेटिकेच्या मागून सर्वांच्या अग्रभागी राहण्यास नकार दिला, ही घटनाही बोलकी आहे. अखेरच्या क्षणी छायाचित्रकारांनी डायनाचा केलेला जीवघेणा पाठलाग हेसुद्धा पाश्चात्त्य समाजातील जीवनाचे प्रातिनिधिक चित्र आहे.

डायना राजघराण्यातील एक झाली होती. सर्वसामान्य मुलीचे काय? अमेरिकेत फिरत असताना रीडर्स डायजेस्टचा ताजा अंक हातात पडला. त्यातील एका लेखामध्ये, विवाह झालेला नसताना मुलेमुली एकत्र वागतेवळी मर्यादेचे उल्लंघन करतात, त्याचे परिणाम प्रांजळपणे व काहीशा कळवळ्याने वर्णन केले होते. मुलीला दिवस राहतात आणि तिची फसगत होते, याची तीन प्रत्यक्ष घडलेली उदाहरणे लेखकाने वस्तुनिष्ठ तपशिलांसह दिली होती. तीनही उदाहरणांतील मुलींच्या जीवनाची शोकांतिका होते. त्यांतील एक मुलगी आपण गर्भवती असल्याचे वडिलांना सांगते तेव्हा वडिलांना धक्का बसतो. ती म्हणते, ''काळजीचं कारण नाही, तो माझ्याशी लग्न करणार आहे '' मुलगी त्या मुलाशी बोलते तेव्हा तो बावरतो, पण प्रथम गोड बोलतो. नंतरच्या एका भेटीत ती मुलगी त्याच्याशी बोलताना भाबडेपणाने बोलून जाते, ''तुझी माझी एकदा एकांतात भेट झाली, त्याच्या आदल्या रात्री मी दुसऱ्या एका मित्राबरोबर होते.'' त्या तरुणाला ही संधीच मिळते. तो तिला ताडकन म्हणतो, ''मग हे मूल माझं कशावरून? माझी काही जबाबदारी नाही.'' ती मुलगी गयावया करते. ''आपलं प्रेम आहे'', म्हणते. पण या म्हणण्याचा काहीही उपयोग होत नाही. तो तरुण पुन्हा भेटावयासही येत नाही.

वडील मुलीला डॉक्टरकडे घेऊन जातात. पण कारण काही असो, गर्भपाताचा मार्ग स्वीकारला जात नाही. यथाकाल मुलाचा जन्म होतो. आई झालेल्या या मुलीचे वय केवळ सोळा. अल्लड वयातील या मुलीला मातृत्व म्हणजे काय आणि मूल असणे म्हणजे काय, याचीही समज आलेली नसते. ज्याचा जन्मदाता त्याच्या रक्षणपोषणासाठी व आपल्याला आधार देण्यासाठी कधी येणार नाही, अशा अवस्थेतील नको असलेले ते मूल मांडीवर घेतले, तरी तिचे वात्सल्य जागे होत नाही. अशा भग्न अवस्थेतील त्या मुलीच्या आयुष्याचा भविष्यकाळ तिला भेडसावीत राहतो आणि वर्तमानकाळ हा केवळ दु:खाचे रूप घेऊन समोर

सतत उभा ठाकलेला असतो. त्या तीन उदाहरणांतील हे एक उदाहरण. आदल्या दिवशी एकाबरोबर तर दुसऱ्या दिवशी दुसऱ्या कोणाबरोबर, हा त्यातील तपशील काय दर्शवणारा आहे? प्रातिनिधिक म्हणून अशी तीन प्रत्यक्ष घडलेली उदाहरणे देऊन लेखकाने सुस्पष्ट इशारा दिला होता की, मुलींनी अशा बाबतीत सावध राहावे. पण प्रश्न असा आहे की, जेथील समाजाची एकूण वैवाहिक निष्ठेची आणि चारित्र्याची कल्पनाच केवळ सवंग म्हणावी अशी आहे, तेथे कोण कशाची सावधगिरी घेऊ शकणार? समाजाच्या हाडीमाशी मुरलेला एखादा दोष असला की, तो काही केल्या दूर होत नाही. आपल्याकडे जातिभेदांतील विषमता नष्ट व्हावी यासाठी शंभराहून अधिक वर्षे प्रयत्न चालू आहे. त्याला अद्याप यश येत नाही. पाश्चात्त्य देशातील जीवनातील विवाहपूर्व स्त्रीपुरुषसंबंध आणि विवाहोत्तर जीवनातील निष्ठा यांबाबतही तीच स्थिती आहे

डायजेस्टमधील उपर्युक्त लेख तरी कोण वाचणार? केवळ प्रौढ माणसेच वाचणार. आणि कोणी विशीतल्या तरुण मुलाने वा मुलीने वाचला, तरी उपयोग काय? असे सांगतात की, जी मुलगी एकांतात सोबत देण्यास तयार होत नाही, तिचे लग्न ठरू शकत नाही. आताच्या भारतात लग्नासाठी मुलगी पाहण्याचा कार्यक्रम करणे हे आपल्याला त्या विशी-एकविशीतल्या सुशिक्षित मुलीचा अपमान केल्यासारखे वाटते. मुलगा आणि मुलगी यांचा औपचारिक परिचय करून दिल्यावर त्यांनी एकमेकांशी संवाद करून परस्परांचे विचार, सवयी, आवडीनिवडी आणि जीवनविषयक दृष्टी समजून घेऊन विवाहविषयीचा निर्णय घ्यावा, हे हल्ली योग्य मानले जाते. मुलगी पाहणे हा शब्दप्रयोगही आता आपल्या सुसंस्कृतपणाला धक्का देणारा वाटतो. पण अमेरिकेच्या नव्या जगातील हे मुलगी पाहणे आपण कोणत्या कोटीत घालू शकू? आईवडिलांनी चौकशी करून लग्न ठरवावयाचे ठरवले, तर वयाच्या अठराव्या वर्षापासून स्वावलंबी होऊन घराबाहेर राहणारा मुलगा कसा वागणारा असेल, हे कोण सांगू शकणार? आणि मुलीचे लग्न करू पाहणारे आई आणि वडील ही जर जीवनाच्या या वाटेनेच चालत आली असतील, तर त्यांना तरी वेगळी अपेक्षा करण्याचा काय अधिकार? मुलींच्या वसतिगृहातून त्यांच्या खोलीत त्याच महाविद्यालयातील कोणीही मुलगा जाऊ शकतो, प्राध्यापकांनी तास घ्यावा, त्यांना या खासगी गोष्टीत लक्ष घालण्याचा काय अधिकार, असा प्रश्न करण्यापर्यंत विद्यार्थ्यांची मजल जाते.

हे खोटे तरी कसे असेल? सर्वेक्षणातून असे निष्पन्न झाले आहे की, पंधरासोळा वर्षांच्या बहुसंख्य मुलींनी कामक्रीडेचा अनुभव घेतलेला असतो आणि तेच अठरा- एकोणीस वर्षांच्या मुलांबाबतही आहे. आईवडिलांच्या नजरेखाली नसलेल्या मुलांच्या मनाला कोणती दिशा मिळते, हे अशा घटनांवरून समजते. यातूनच पुढे अनेकांच्या जीवनातील समाधान

नष्ट झालेले आढळते. तिकडील विचारवंतांना उगवत्या पिढीची ही वर्तणूक हा चिंतेचा विषय वाटत आहे, हे वृत्तपत्रे व नियतकालिके यांतून येणाऱ्या लेखांवरून समजते. ही दिशा उन्नत आणि सुसंस्कृत जीवनाची आहे का, याचा आपल्या देशातही गंभीरपणाने विचार करण्याची वेळ आली आहे, असे कोणीकोणी सांगतात. तसे खरोखरीच असेल, तर पाश्चात्त्यांचे असे अंध अनुकरण आपण का करतो असा मूलभूत प्रश्न उत्पन्न होतो.

आपल्याकडे अद्याप तरी मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी पालक उचलतात, आणि तोवर त्यांच्या वागण्यावर त्यांचे लक्ष असते. ही स्थिती टिकून आहे तोवरच सावध राहणे शक्य आहे. सतराव्या-अठराव्या वर्षी मुले घराबाहेर जाणे हे केवळ स्वाललंबन राहत नाही, तो अपरिपक्व अवस्थेत कसेही वागण्याचा परवाना ठरू शकतो, व त्याचे दूरगामी परिणाम भयावह होतात, हे सत्य नाकारण्यात कोणाचे हित नाही. पाश्चात्त्य संस्कृती आणि तेथील रूढ आचारविचार, आणि भारतीय संस्कृती व येथील रूढ आचारविचार यांत असे काही मूलभूत भेद आहेत. कशातील काय ग्राह्य याचा विचार केला पाहिजे. आपल्याकडेही दुराचार कमी आहे असे नाही, असे मानण्यास काही जागा आहे. एड्सपासून सावध राहण्यास सांगणाऱ्या शहरातील चौकांमधून सध्या लागत असलेल्या जाहिराती ही आपल्या समाजातील चारित्र्यहीनतेची भर बाजारात टांगली जाणारी लक्तरे आहेत, हे नाकारण्यात काही अर्थ नाही. स्खलनशीलता हा माणसाचा सहज धर्म आहे, आणि म्हणून निदान समाजापुढे आदर्श कोणता असावा आणि त्या आदर्शच्या दिशेने पाऊल पडेल असे आचारविचार कसे घालून द्यावेत, एवढे तरी पाहणे आवश्यक आहे.

# ११. राष्ट्रसंघ आणि वेदान्तकेन्द्र

तीन नोव्हेंबरला सकाळी किरणबरोबर त्याच्या गाडीतून न्यूयॉर्कमध्ये आलो. एकशेदोन मजली एंपायर स्टेट बिल्डिंग गेली काही दशके जगातील सर्वात उंच इमारत म्हणून गाजलेली होती. आता वर्ल्ड ट्रेड सेंटरची इमारत एकशेदहा मजली नवीन झाली आहे. ती पाहण्यासाठी साऱ्या जगातून येणारे प्रवासी सारखे येत असतात. यूनो म्हणजे राष्ट्रसंघ. त्याचे कार्यालय जवळच आहे त्यामुळेही सारे प्रवासी येथे येतात. हा सारा भाग त्यामुळे अतिशय गजबजलेला असतो. किरणला गाडी उभी करण्यास जागा शोधावी लागली. तेथून आम्ही त्या भागात सर्वत्र पायी फिरलो. रस्ते तसे रुंद आहेत, पण उंचच उंच इमारती सर्व रस्त्यांवरून उभ्या असल्यामुळे ते अरुंद वाटतात, आणि आपण सर्वत्र इमारतींच्या सावल्यांतून फिरत असतो.

**स्वातंत्र्यदेवीचा पुतळा आणि कन्याकुमारीचे शिलास्मारक**

वर्ल्ड हेल्थ सेंटरच्या तळमजल्याची रचना अतिशय व्यवस्थित आहे. कितीतरी माणसे येत-जात होती, पण कोठेही गर्दी वाटली नाही, एवढी प्रशस्त जागा होती. भलेमोठे खांब दिसतात, आणि बांधकामाचा भक्कमपणा ध्यानात येतो. मनात आले, एकशेदहा मजल्यांचा भार पेलण्यासाठी हा भक्कमपणा आवश्यकच आहे. स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने हा मोठा कर्तृत्वाचा भाग आहे. सर्वत्र सुविधाही तशाच आहेत. भल्यामोठ्या उद्वाहकातून आम्ही एकशेसात क्रमांकाच्या मजल्यावर फार थोड्या वेळात पोचलो. इमारत पाहण्यासाठी प्रवेशमूल्य आहे हे प्रवेशमूल्य बहुतेक सर्वत्र असते. नदीखालून जाणारा भुयारी मार्ग किंवा एखादा खूप मोठा पूल अशा सर्व ठिकाणी अमेरिकेत अर्धा किंवा एक डॉलर द्यावा लागतो. वाहनचालकाला असे पैसे हाताशी ठेवावे लागतात. ही पद्धत चांगली आहे. एवढ्या मोठमोठया शहरांची आणि तेथील रस्त्याची, किंवा मोठमोठ्या महामार्गांची आणि त्यांवरील तशाच मोठमोठ्या पुलांची, दोनदोन तीन तीन फर्लांगावर असलेले दूरभाष किंवा गाडी थांबवून थोडा वेळ आराम करण्याच्या जागा, या सर्वांची योग्य ती देखभाल अशा गोळा

केल्या जाणाऱ्या पैशातून होत असते. तो तो पैसा त्या त्या कामासाठीच खर्च करण्याची व ते ते काम शंभर टक्के व्यवस्थित करण्याची ही सार्वजनिक व्यवहारातील शिस्त फार फार अनुसरणीय आहे, किंबहुना सुसंस्कृतपणाची एक खूण आहे.

कर्तव्यनिष्ठा हा पाश्चात्त्यांचा मोठा गुण आहे. मला एका मित्राने म्हटले, "शिस्त पाळतात म्हणजे काय, नाही पाळली तर लगेच शिक्षा होते." मी म्हटले, "शिक्षा होते ही गोष्ट शासकीय यंत्रणेला भूषणावह आहे." अखेर टाळाटाळ किंवा चुकवाचुकव हा सर्वसामान्य माणसाचा स्वभावगत दोष असतो. त्याला शिक्षेच्या भयाने व्यवस्थित वागणे भाग पाडण्यात काही गैर नाही. अखेर "दंडो धारयति प्रजाः" हेच खरे आहे. भारतात कितीएक मोठमोठ्या गुन्ह्यांना शिक्षा होत नाही. ते गुन्हे करणाऱ्यांत लोकांचे नेते आणि प्रतिष्ठित लोक असतात. शासकीय अधिकारी तेच करतात. मग पोलिसाला दररोज चिरीमिरी देऊन साऱ्या पादचारी मार्गावरून फेरीवाले रस्ते अडवतात. लोहमार्गावरून बारापंधरा फुटांवर झोपड्या उभ्या राहतात, आणि मुंबई व कलकत्ता ही महानगरे घाणीची आगरे होऊन जातात. कोठेतरी शासन असावेच लागते, ते आपल्याकडे नाही, म्हणून साध्या गोष्टी अक्राळविक्राळ रूप धारण करून त्या अखेर अवघड समस्या होऊन बसतात. माझा मित्र जे म्हणाला होता, त्याची प्रचीती न्यूयॉर्कच्या या सर्वांत महत्त्वाच्या भागातच मला आली. पाचसहा गाड्या एके ठिकाणी चुकीने वा दडपून उभ्या केल्या होत्या, आणि पोलीस त्या गाड्यांवर दंड भरण्याच्या चिठ्ठ्या डकवीत चालला होता.

वर्ल्ड हेल्थ सेंटरच्या एकशेदहाव्या मजल्यावर पोचलो. विस्तीर्ण गच्ची होती. न्यूयॉर्क शहराचे अफाट पसरलेले विहंगम दृश्य दिसले. साडेबाराशेतेराशे फूट उंचीवर आम्ही उभे होतो. खोल दरीच्या तळाशी असावी अशा खालच्या रस्त्यांवरून फिरताना वारा ही गोष्ट कळतच नव्हती. त्या उंच गच्चीवर आल्हाददायक वारा होता. चारी दिशांना तीनतीन चारचार दुर्बिणी लावून ठेवल्या होत्या. त्यांतून शहराची दृश्ये पाहता येत होती. सर्वात महत्त्वाची दिशा समुद्राकडची. नुसत्या डोळ्यांनीही हडसन नदीचा रुंद प्रवाह दिसत होता. समुद्रात न्यूयॉर्कची खूण असलेला स्वातंत्र्यदेवीचा भव्य आणि उंच पुतळा उभा होता. तो दुर्बिणीतून पाहिला, अर्थातच पाठमोरा दिसला. त्याच्या दोन्ही बाजूंना थोडा जमिनीचा भाग आहे, त्यामुळे पुतळ्याच्या आसपासचा समुद्र शांत आहे. वरपर्यंत जाऊन हा पुतळा पाहता येतो. पण त्याची खरी शोभा अर्थातच अटलांटिक महासागरातून न्यूयॉर्ककडे नौयानातून दिसत असणार. जमिनीवरून नौकेतून जाऊन पुतळा पाहण्याची सोय आहे, थेट पुतळ्याच्या वरच्या भागापर्यंत पोचता येते. पण त्यासाठी तीनचार तास कमीतकमी लागणार. तेवढा वेळ हाताशी नव्हता. एवढ्या उंचीवरून तो दुर्बिणीतून पाहिल्यावर त्याची भव्यता ध्यानात आली.

पण समुद्रात उभे असलेले साऱ्या राष्ट्राचे एक प्रतीक या दृष्टीने कन्याकुमारीजवळच्या समुद्रातील खडकावर उभे असलेले विवेकानन्दांचे शिलास्मारक निःसंशय अधिक सुंदर आहे. हा न्यूयॉर्कचा पुतळा मानवाचा मूलभूत अधिकार असलेल्या स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. कन्याकुमारीच्या खडकावरील विवेकानन्दांचे मंदिर हे उदात्त संस्कृतीचे प्रतीक आहे. स्वातत्र्य लाभलेला मनुष्य त्या स्वातत्र्याचा उपयोग करून किती मोठा होऊ शकतो, याची साक्ष त्या मंदिरात पटते, आणि एखाद्या देशाची संस्कृती केवढा उदात्त आदर्श जगासमोर ठेवू शकते, याचे दर्शन विवेकानन्दांच्या सर्वसमन्वयशील विचारप्रणालीत घडते. आपण ते साध्य करू शकलो आहोत असा याचा अर्थ नाही. त्याला अद्याप काही शतके जावी लागतील. पण जगाने अनुसरण करावे असे जे काही भारतीय संस्कृतीत आहे, ते विवेकानन्दांनी अवघ्या मानवजातीसमोर ठेवले. त्याचा पहिला उच्चार त्यांनी अमेरिकेत केला, हादेखील एक अर्थपूर्ण योगायोग आहे असे वाटून गेले. स्वातंत्र्यदेवीच्या पुतळ्याच्या हातातील मशाल उंचावून अमेरिका साऱ्या जगाला साद घालीत आहे, तर कन्याकुमारीच्या मंदिरात भारताकडे दृष्टी टाकत उभ्या असलेल्या विवेकानन्दांनी अमेरिकेत अखिल मानवजातीसाठी सर्व धर्मांच्या अतीत घेऊन जाणाऱ्या विश्वधर्माचा संदेश दिलेला आहे.

निसर्गाची विराट पृष्ठभूमी या दृष्टीनेही कन्याकुमारीचे शिलास्मारक अधिक सुंदर आहे. या खडकावरून तीनही बाजूंना समुद्र क्षितिजापर्यंत पोचलेला दिसतो. येथे सागरात सूर्योदय होतो आणि सागरात सूर्यास्तही होतो. मंदिराच्या मागच्या बाजूला उभे राहिले, तर मोकळ्या समुद्रावरून येणारा भन्नाट वारा अंगावरून जात असतो. दृष्टी खाली वळवली तर सतत समुद्राच्या लाटा खडकावर आदळून फेसाळलेले पाणी वर उसळत असते. भारताच्या भूमीचा भाग आपल्या मागच्या बाजूला राहतो, तो दिसतच नाही. मग उरलेल्या तीनही दिशांना दृष्टी टाकली तर दूरवरच्या क्षितिजाशी पोचलेले पाणी आकाशाला भिडलेले दिसते, आणि पृथ्वीच्या पाठीवरील अनताची प्रतीकमात्र साक्ष देणारा सागर आकाशातील अनंत अशा अनताशी आपली साक्षात भेट घडवून आणतो. पौर्णिमा किंवा अमावस्या असेल, तर त्या शिलास्मारकावरून समुद्राच्या प्रचंड आणि दोनदोन किलोमीटर लांबीच्या लाटा आपली मान उंचावीत सतत आपल्याकडे येताना दिसतात, आणि एखादी लाट फुटली की तिचे पांढरे शुभ्र फेसाळणारे पाणी आडवेच्या आडवे सरकत जाताना दिसते. उषःकालच्या रम्य प्रहरी दिशा उजळताना आणि सायंकाळी मावळतीच्या समयी अंधाराच्या सावल्या गडद होत जाताना सभोवतालाचा सारा जलसंभार मंद वाऱ्यावर हेलावताना दिसतो आणि त्याचे ते शांत रूप मनात एक वेगळाच भाव निर्माण करून जाते. त्याच वेळी आकाशात रंगांचा मनोहर विलास चालू असतो.

शुक्ल पक्षातील नवमीदशमीनंतरची रात्र असेल, तर या समुद्राच्या सोबतीस चंद्र येतो, आणि आकाशातील तो चंद्र अधिक सुंदर, का त्याच्याच शीतल प्रकाशाचा लाभ घेऊन झळाळणाऱ्या लहरींनी नटलेला जमिनीवरील सागर अधिक सुंदर असा प्रश्न मनाला पडतो. आधीच शीतल असलेले चन्द्राचे किरण अथांग सागराच्या असीम विस्तारावरून परावर्तित होताना अधिकच शीतल होऊन उठतात, आणि ''शारदीयेचे चंद्रकळे-माजी अमृतकण कोवळे'' या काव्यपूर्ण चरणांची आठवण करून देतात. दिवसरात्रीच्या निरनिराळ्या प्रहरांत सौन्दर्याची ही भिन्नभिन्न विलसिते पाहताना आपल्या दृष्टीसमोर तीनही बाजूंना केवळ हेलावणारा समुद्र आणि शांत निःस्तब्ध असे आकाश या दोनच गोष्टी असतात, हे कन्याकुमारीच्या शिलास्मारकाचे खरे वैभव आहे. कधीतरी तेथे जावे, हे सारे शांतपणे न्याहाळावे आणि आपले आपल्याशीच तृप्त होऊन जावे. अशी ही सागर आणि आकाश यांची भेट स्वातंत्र्यदेवीच्या पुतळ्याच्या मस्तकाशी पोचल्यावर होईल. तशी ती भूभागापासून दूर असलेल्या एखाद्या बेटावरील एखाद्या उंच स्थानी उभे राहून सभोवताली पाहताना किंवा नौयानातून विशाल समुद्रातून जात असतानाही चहू दिशांनी होते. पण तेथे मंदिराचे सान्निध्य नसते, विवेकानन्दांचे दर्शन नसते, आणि मन उन्नत करणारा त्यांच्या विचारांचा प्रकाश नसतो, हा फरक आहे आणि तो महत्त्वाचा आहे. सुंदर निसर्ग, उदात्त जीवन, आणि व्यापक विचार, या सर्वांचा संगम साधणारी अशी जागा जगात कोठेही नाही.

**जागतिक पातळीवरील राष्ट्रसंघ**

राष्ट्रसंघाची इमारत येथून जवळच आहे. ती पाहणे हे मोठेच आकर्षण होते. सारेच प्रचंड आणि व्यवस्थित आहे. अनेक अंगांनी ही जगातील सर्वश्रेष्ठ संस्था आहे, तितकीच आकर्षक आणि अर्थपूर्ण आहे. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. हे ध्यानात येते. सिक्युरिटी कौन्सिल म्हणजे सुरक्षा समिती, जनरल ॲसेंब्ली म्हणजे सर्वसाधारण प्रतिनिधीसभा, आणि सोशियो इकॉनॉमिक म्हणजे जगातील सर्व देशांच्या आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांतील विविध प्रश्नांचा विचार करणारा विभाग, अशी तीन निरनिराळी सभागृहे आहेत, आणि त्यांची स्वतंत्र कार्यालये आहेत. विज्ञानाची अद्ययावत यंत्रणा येथे उपलब्ध आहे. राष्ट्रसंघाचे सदस्य असलेल्या देशांची संख्या आता शंभरावर गेली आहे. इतक्या साऱ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची आणि त्यांच्या बरोबर येणाऱ्या साहाय्यकांची व कर्मचाऱ्यांची निवासव्यवस्था, कार्यालयांसाठी स्वतंत्र जागा व तेथील आवश्यक त्या सुविधा, जगाच्या निरनिराळ्या भागांतून येणाऱ्या लोकांची भोजनाची आणि खाद्यपेयांची सवय ध्यानात घेऊन त्याची सोय असे सारे करणे, हे विविध भाग व्यवस्थापनाच्या दृष्टीने तर प्रचंड आहेतच, पण त्यासाठी

लागणारा राष्ट्रसंघाच्या कार्यालयाचा स्वतंत्र पसाराही तसाच अवाढव्य आहे

राष्ट्रसंघाशी संलग्न अशा भल्यामोठ्या इमारती आसपास दिसतात. हे सारे पेलण्याची आर्थिक क्षमता एका अमेरिकेजवळच आहे, हे ध्यानात आल्याशिवाय राहात नाही. जागतिक शांततेच्या दृष्टीने अशी संस्था पहिल्या महायुद्धानंतर प्रथम जागतिक राजकारणातील संघर्षातून स्वतःला अलिप्त ठेवणाऱ्या स्विट्झर्लंडमधील जिनीव्हाला स्थापन झाली. पण दुसऱ्या महायुद्धानंतर तिचा व्याप फार वाढला. मग तो भार अमेरिकेने उचलला. समृद्ध अमेरिकेलाच ते शक्य होते, आणि तिच्या मागे वॉशिंग्टन, जेफर्सन, आणि लिंकन अशा उदार नेत्यांची एक परंपरा होती. तिचाही काही उपयोग होता.

राष्ट्रसंघ हे जागतिक पातळीवरील मानवसंस्कृतीच्या विकासातील एक फार महत्त्वाचे पाऊल आहे, यात संशय नाही. बहिष्कृत मानली गेलेली त्या त्या काळातील चीनसारखी दोनतीन राष्ट्रे वगळता जगातील सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधी येथे एकत्र जमतात, आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर विचारविनिमय करतात, एखाद्या राष्ट्राला येथे आपली तक्रार मांडता येते, कोठे युद्ध सुरू झाले तर समेटाचा प्रयत्न केला जातो, आणि कधीकधी त्या दोन राष्ट्रांच्या सीमेची देखभाल करण्यासाठी शांतिसेना पाठवली जाते, येथवरचे सारे रूप निःसंशय स्वागतार्ह आहे. हे राजकारणाचे क्षेत्र झाले, यात प्रत्येक राष्ट्राचे हितसंबंध गुंतलेले असतात, कोणत्याही वादाच्या प्रश्नावर मत देताना न्याय आणि अन्याय यांचाच निकष लावला जातो असे घडत नाही, आणि मानवी प्रवृत्ती लक्षात घेता तशी अपेक्षाही करता येत नाही. पण निदान असे एक व्यासपीठ निर्माण झाले आहे. हे चांगले आहे. शंभराहून अधिक राष्ट्रे. यांतील काही भारतातील दोनतीन जिल्ह्यांएवढी असावीत. पण प्रत्येकी एक मत. शिवाय यांतील बहुसंख्य राष्ट्रांना सुसंस्कृतपणाचा निखळ निकष लावला, तर हाती निष्कर्ष काय लागेल? सर्व राष्ट्रे ज्ञानाच्या दृष्टीने कोणत्या पातळीवर आहेत? किती प्रतिनिधींची वैचारिक क्षमता कोणताही जटिल प्रश्न समजून घेण्यास समर्थ असेल? तशी समर्थ असली, तरी विवेकबुद्धी किती प्रमाणात आढळेल?

हे सारे ध्यानात घेऊन मगच येथे होणाऱ्या कामातून किती प्रमाणात विधायक कालनिष्पत्ती होईल, याची अपेक्षा करावी लागेल. जागतिक परिषदेतील एखाद्या खुर्चीवर कोणीतरी बसले, तरी तेवढ्याने त्याची बुद्धी सूक्ष्म आणि मन व्यापक होते असे घडू शकत नाही. केवळ बहुमतावर येथील सारे निर्णय सोपवले, तर जगात अनर्थ होईल. हे सारे स्वच्छ ध्यानात ठेवावे लागते. आपल्या देशाचा कोणता प्रश्न राष्ट्रसंघात न्यावयाचा आणि तो नेत असताना आपल्या स्वायत्ततेबद्दल दक्ष तर सार्वभौमत्वाबाबत ठाम कसे राहावयाचे, याचे भान दाखवावे लागते. काश्मीरचा प्रश्न राष्ट्रसंघात जवाहरलालांनी नेला. आणि पंचशीलचा

जप करीत चीनच्या खांद्यावर त्यांनी विश्वासाने आपली मान टेकली. दोन्हीचे परिणाम काय झाले हे आपल्याला माहीत आहे. रशियासारख्या हुकूमशाही देशाने आपल्यासारख्या लोकशाही राष्ट्रासाठी सतत नकाराधिकार वापरला, म्हणून राष्ट्रसंघात आपण काश्मीर प्रश्नावर वाचलो. पण रशियाने तो नकाराधिकार आपल्यावरील प्रेमाने वापरला नाही, तर त्याला अमेरिकेला शह द्यावयाचा होता, आणि आशिया खंडात चीनविरुद्ध त्याला कोणीतरी शेजारी हवा होता म्हणून. लालबहादुर शास्त्रीसारखा या देशाचा सच्छील पंतप्रधान पाकिस्तानच्या युद्धात समेट करण्याच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी रशियात गेला. त्याचा तेथे आकस्मिक अंत कसा झाला हे गूढ उकलण्याची सारी शक्यताही आता मावळती आहे, आणि आपल्या मनातील शंका निर्मूल होण्याचा कोणताही मार्ग आपल्याला उपलब्ध नाही.

अशा अनुभवातून काही शिकावे लागते. पण तेही आपण अद्याप शिकू शकलेलो नाही. अमेरिका हे एक लोकशाही राष्ट्र, भारतातील नेते किती वरच्या दर्जाचे विचारवंत आहेत, आणि हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे, हे पुरेपुरे माहीत असून पाकिस्तानसारख्या धर्मांध आणि हुकूमशाही वृत्तीच्या राष्ट्राची भलावण तिने केली, आणि भारताला सतत डोकेदुखी राहील याची काळजी घेतली. राष्ट्रसंघाकडून अपेक्षा करताना हे सारे ध्यानात ठेवावे लागते. शिवाय आपण समर्थ असू तर राष्ट्रसंघाची फिकीर करावी लागत नाही हे प्रचंड अशा चीनने दाखवून दिले आहे, आणि खंबीर असू तर भोवती शत्रुराष्ट्रांचा पाशवी वेढा असताना ताठ मानेने वावरता येते, हे छोट्या असलेल्या इस्राएलने दाखवले आहे. त्या दोघांचे ते सामर्थ्यनिर्भर सत्त्व आपलेसे करून मग भारत राष्ट्रसंघात उदार भूमिकेचा पाठपुरावा करील, तर त्याला खरी शोभा प्राप्त होईल. केवळ बहुसंख्येवर भरवसा ठेवता येणार नाही हे ओळखून थोडे सदस्य असणाऱ्या सुरक्षा समितीकडे राष्ट्रसंघापुढे येणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णय घेण्याची जबाबदारी सोपवलेली आहे, हे वास्तवाचे राखलेले भान आहे. अर्थात तेथे कोण असावे वा नसावे, यातही राजकारण चालतेच.

## राजकीय स्वार्थ आणि मानवाचे कल्याण

असा हा राष्ट्रसंघ ज्या दुसऱ्या महायुद्धामुळे निर्माण झाला, त्या महायुद्धाचाच अपरिहार्य परिणाम होऊन भारतातील स्वातंत्र्याच्या चळवळीला अवचितपणे यश लाभले त्याचा लाभ आपण खऱ्या अर्थाने किती करून घेतला, हा निराळा प्रश्न आहे. भारताला इतिहासाची प्रदीर्घ परंपरा आहे. चार हजार वर्षांची सांस्कृतिक पृष्ठभूमी आहे. तीमधील काही तेज भारतीयांच्या रक्तातच उतरलेले आहे. व्यापक भूमिकेवरून विचार करण्याची क्षमता येथे आहे. अति उदार आणि अति व्यापक अशी अव्यवहार्य भूमिका घेणारे काही नेते

येथे होते हे खरे, पण येथील राज्यकर्त्यांपैकी कोणीही क्रूरकर्मे नव्हते हे विसरता येत नाही. रघुवंशामध्ये राजा दिलीपाचे माहात्म्य सांगताना, ''प्रजानां विनयाधानाद्रक्षाद्भरणादपि। स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः॥'' म्हणजे प्रजेला विद्या देणारा, आणि तिचे रक्षणपोषण करणारा तो राजा साऱ्या प्रजेचा पिता होता, सर्वांचे आईवडील केवळ जन्म देण्यास कारण होते,'' असे वर्णन कालिदासाने केले आहे. भारतातील राजांसाठी घालून दिलेला हा आदर्श आहे. त्याचबरोबर जे योद्धे असतील त्यांना सांगितलेले आहे, ''आर्तत्राणाय व. शस्त्रं न प्रहर्तुमनागसि।'' म्हणजे ''तुमच्या हातांत जे शस्त्र आहे ते संकटात सापडलेल्यांचे रक्षण करण्यासाठी आहे, निरपराध माणसावर आघात करण्यासाठी नाही.'' असा सांस्कृतिक वारसा असलेला हा भारत स्वतंत्र झाल्यावर त्याच्या गुणांचेही काही तेज लगोलग प्रत्ययाला आले. विजयालक्ष्मी पंडित राष्ट्रसंघाच्या अध्यक्ष म्हणून निवडल्या गेल्या ही त्याची एक खूण. त्या वेळी अध्यक्षपदाच्या मध्यवर्ती खुर्चीवर आसनस्थ असलेले असे त्यांचे छायाचित्र वृत्तपत्रांत झळकले. ते पाहताना साऱ्या भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. सर्वसाधारण प्रतिनिधीगृहाच्या भल्यामोठ्या सभागृहाकडे पाहताना ती आठवण झाली. अशा संघटनेचे कार्यवाहपद समर्थपणाने सांभाळणे सामान्य गोष्ट नाही. दाग हॅमरशील्ड त्या पदावर असताना त्यांचा फार मोठा प्रभाव पडला होता, आणि तितकाच पुढे ब्रह्मदेशातील ऊ थांट यांचाही पडला.

राजकारणापासून अलिप्त असलेला असा राष्ट्रसंघाचा एक विभाग आहे. जगातील देशांचे निरनिराळे आर्थिक, सामाजिक प्रश्न समजावून घेणे, अविकसित राष्ट्रांच्या समस्या कशा सुटतील हे पाहणे, आणि निरनिराळ्या विषयांवरील माहिती सर्वेक्षणाच्या द्वारा गोळा करून ती सर्वांना उपलब्ध करून देणे, हे एक विधायक स्वरूपाचे कार्य आहे. या विभागाच्या कामाबद्दल समाधान मानता येते, किंबहुना पृथ्वी नावाच्या या छोटया ग्रहावर असलेली साधनसामग्री एका मर्यादित लोकसंख्येलाच पुरेशी ठरणार आहे, निसर्ग आणि वैज्ञानिक प्रगती यांचा तोल राखला पाहिजे, आणि असलेल्या साधनसंपत्तीचा उपयोग फार सावधानतेने केला पाहिजे; हे दाखवून देणारा हा विभाग खऱ्या अर्थाने साऱ्या जगातील मानवजातीचे कल्याण चिंतणारा आहे हे सारे काही पाहताना आपण खरोखरीच काहीतरी चांगले पाहात आहोत, असा भाव मनात होता. यश-अपयश किती हा मुद्दा गौण मानावा, निदान येथे जगातील साऱ्या राष्ट्रांचे प्रतिनिधी सर्वांच्या भल्यासाठी काहीतरी करीत आहेत, ही गोष्टही उपेक्षा करावी अशी नाही.

जागोजाग नाना प्रकारच्या माहितीचे फलक होते. राष्ट्रसंघाने किती ठिकाणी आतापर्यंत शांतिसेना पाठवली ती माहिती देणारा एक फलक होता. भारत आणि पाकिस्तान यांच्या

सीमेवर दोन वेळा शांतिसेना पाठवल्याचा उल्लेख या फलकावर केलेला होता. बारापधरा लोकांच्या आमच्या गटाला माहिती सांगणारी व सारे काही दाखवणारी एक मार्गदर्शिका होती. ती एक तिशीच्या आतील अमेरिकन तरुणी होती. त्या फलकावरील माहितीकडे तिने आम्हा सर्वांचे लक्ष वेधले. फलक वाचल्यावर मी तिला म्हटले, ''जर अमेरिका पाकिस्तानला शस्त्रे पुरवीत राहिली, तर त्या दोन देशांच्या सीमेवर तिसऱ्यांदा शांतिसेना पाठवावी लागण्यास फार काळ जावा लागणार नाही.'' ती बिचारी यावर काय म्हणणार? थोडीशी हसली आणि पुढील फलकावरील माहितीकडे वळली.

## संहारक अण्वस्त्रांचे भीषण सावट

पण खरोखरीच प्रश्न पडतो, अमेरिकेसारख्या देशाला असे करावेसे का वाटावे? असे करण्याची तिला खरोखरी कोणती गरज आहे? अखेर हेच खरे की, सत्ताकांक्षा हादेखील एक व्यर्थ लोभच आहे. सहारक अस्त्रांमध्ये नित्य नवी क्षेपणास्त्रे तयार होत आहेत, आणि जुनी शस्त्रे इतर राष्ट्रांना विकली जात आहेत. ती खपावीत यासाठी राष्ट्राराष्ट्रांमध्ये सामजस्य उत्पन्न करण्याऐवजी कलह कसा वाढेल हे पाहिले जात आहे, आणि त्यासाठी स्वतत्र शासकीय विभाग कार्यरत आहे. एका काळी ब्रिटिशानी साम्राज्याच्या आधारे हेच केले, आज रशियाचे तुकडे झाल्यावर जगातील एकमेव महासत्ता असलेली अमेरिका तेच करीत आहे. पण तिला चीनचे भय वाटत आहे. त्या चीनमध्ये साम्यवादी क्रांती झाली, आणि कॉनफ्यूशियसची प्रेमाची व शाततेची शिकवणूक बाजूला सारून वर्गकलह उत्पन्न करणारी आणि सघर्षवादी कम्युनिझमची विचारधारा पद्धतशीरपणे वाढवली जाऊ लागली. तेथेही अतर्गत असंतोष आहे. बेजिगच्या तिएन्‌तीन चौकात निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांवर काही वर्षापूर्वी बेछूट गोळीबार करण्यात आला, आणि शेकडो तरुणाच्या रक्ताने भूमी लाल होऊन गेली. चळवळ शमली किंवा दडपली गेली हे खरे, पण पुन्हा कधीतरी स्फोट होऊन भडका उडेल. मात्र दरम्यान किती लोकाचा बळी जाईल, हे कोण सांगू शकेल?

अन्य देशांतील माणसे मृत्यूच्या वाटेने गेली तरी चालेल, पण आपली हत्यारे खपली पाहिजेत, हा स्वार्थ कोणत्या कोटीतील म्हणावयाचा, आणि यात कोणता सुसस्कृतपणा आहे असे म्हणता येईल? अर्थात आपल्या देशासकट जगात सर्वत्र हेच चित्र आहे. सर्वभूती एक भगवत विराजत आहे असे तत्त्वज्ञान ज्या भारतात सांगितले गेले, तेथे जातिभेद आणि अस्पृश्यता यांच्या रूपाने थेट प्राचीन काळापासून विषमता नांदत आली; हा जसा एक प्रचड अतर्विरोध आहे; तसाच "All men are created equal" हे उदात्त तत्त्वज्ञान जेफर्सन आणि अब्राहम लिंकन अशा महापुरुषानी ज्या देशात उच्चरवाने सागितले, त्याच अमेरिकेला

आपल्या देशातील नागरिकांप्रमाणेच इतर देशांतील नागरिकांनाही जगण्याचा अधिकार आहे, हे बोलताना पटत असले, तरी तिची कृती भलतीच होत आहे, आणि ती अज्ञानापोटी नाही, तर जाणूनबुजून केली जात आहे सर्वात प्रगत आणि सर्वात समृद्ध असलेल्या देशाची ही कहाणी आहे. ''युरोप ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेला आहे, जर अध्यात्माच्या जलाने हा अग्नी शमवला गेला नाही, तर केव्हाही भडका उडण्याची शक्यता आहे '' असे विवेकानन्द शंभर वर्षापूर्वी म्हणून गेले. त्यानंतर दोन महायुद्धे होऊन गेली. आज सारे जगच ज्वालामुखीच्या तोंडावर बसले आहे.

पृथ्वीच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत ती थंड होण्यापूर्वी सतत ज्वालामुखीचे उद्रेक होऊन त्यांतून बाहेर पडणारा तप्त लाव्हारस भोवतालचा प्रदेश भाजून काढत होता. तीच पृथ्वी यथाकाल थंड होऊन सचेतन जीवाची उत्पत्ती झाली व पुढे स्वतंत्र बुद्धी लाभलेला मानव अवतरला. धरणीमाता उदार आहे, अनत हस्तांनी धान्य देण्यास सिद्ध आहे, पण महत्त्वाकांक्षेचे बळी असणारे राज्यकर्ते परस्परांकडे संशयाने पाहात अण्वस्त्रसज्ज होत आहेत, आणि जगात कोठे ना कोठे युद्धाच्या भडकत्या अंगारात निष्पाप जीवांचे बळी पडत आहेत. हे असेच चालू राहिले, तर पुढील शेपन्नास वर्षात काय होणार या मानवजातीचे? विवेकानन्दांनी या संदर्भात सांगितलेले अध्यात्म अमूर्त पातळीवरच्या तत्त्वज्ञानाच्या प्रदेशातील नव्हते, तर ते कलहाऐवजी सामंजस्याने वागण्याचे, परस्परशत्रुत्वाऐवजी एकमेकांना समजून घेणाऱ्या स्वीकारशीलतेचे, आणि विश्वबंधुत्वाचे नाते प्रत्यक्षात उतरवण्याचे होते. बर्ट्राण्ड रसेल यांच्यासारख्या इहवादी तत्त्वज्ञानेही अण्वस्त्रांचा धोका दाखवून दिला होता. आज मात्र परिस्थिती अशी आहे की, पाश्चात्त्यांमध्ये कोणी रसेलही दिसत नाही, आणि भारतातील कोणी विवेकानन्दही जगाला साद घालू शकत नाही.

अमेरिकेत फिरत असताना तेथील समृद्धी पदोपदी जाणवली, सार्वजनिक व्यवहारातील शिस्त पाहता आली, आणि ज्ञानाच्या क्षेत्रात चाललेला उदंड शोध प्रचीतीला आला. पण ही सारी भौतिक समृद्धीची बाजू आहे. माणसाच्या मनाचा विकास होण्याचे काय? त्याच्या ठिकाणी सुप्त स्वरूपात असलेल्या सद्बुद्धीला जाग आणण्यासाठी काय केले जात आहे? उन्नत आणि उदात्त जीवनाचा कोणता आदर्श तेथे आज विद्यमान आहे? याच्या उलट दिशेने चाललेले मात्र सारे काही आहे. न्यूयॉर्क आणि शिकागो ही शहरे गुन्हेगारीची आगरे आहेत असे म्हणतात. संयम आणि विवेक यांना कितीसे स्थान आहे? पतीला पत्नीचा किंवा पत्नीला पतीचा ठाम विश्वास वाटत नाही. हा अप्रामाणिकपणा नव्हे काय? ना बाप रक्षण देतो, ना आई माया देते, कारण ते दोघेही विलासाच्या नवनवीन जागा शोधत आहेत. अशा मातापित्यांच्या सहवासात वावरताना किंवा स्वतःचे आईवडील सुदैवाने प्रेमळ लाभले, तरी

बाहेर सर्वत्र शीलाचे व चारित्र्याचे दिवाळे निघालेले दिसत असताना कोवळ्या मुलांच्या मनावर कोणते संस्कार होण्याची शक्यता आहे?

आधुनिक साधनांनी जग जवळ आले आहे आणि ते जणू एक वैश्विक खेडे झाले आहे हे जितके खरे, तितकेच कितीही अंतरावरून कोणाचाही बळी घेता येतो हे त्या जवळिकीचे दुसरे रूप आहे, हेही खरे पूर्वी खूप दूर असणारा धोका आता प्रत्येकाच्या दाराशी दबा धरून बसलेला आहे. चारित्र्य हा विश्वासाचाच एक उच्चतम आविष्कार आहे, आणि व्यक्तिस्वातंत्र्याप्रमाणेच महापुरुषांपुढे नम्र असणे हेही एक मूल्य आहे. एकीकडे नासाचे प्रदर्शन पाहिले, आणि दुसरीकडे नित्य वृत्तपत्रांत येणाऱ्या बातम्यांवर दृष्टी टाकली; किंवा एकीकडे राष्ट्रसंघाचे प्रतिनिधीसभागृह पाहिले आणि दुसरीकडे जगातील राजकीय ताणतणाव पाहिले, आणि भौतिक दृष्ट्या विसाव्या शतकाच्या अखेरीस अतिशय प्रगत झालेला मानव एकविसाव्या शतकात कोणत्या दिशेने जाणार आहे, याचा विचार गंभीरपणाने करू लागले; तर विवेकशील माणसाचे मन भयकंपित होऊन जाते, त्यावर चिंतेचे दाट सावट येते. यातील काहीही सामान्य माणूस दुरुस्त करू शकत नाही, तो केवळ अशरण असतो. अब्राहम लिंकनच्या हातात सत्ता होती म्हणून तो स्वकीयांशी युद्ध करूनही गुलामगिरी नष्ट करू शकला. जगातील मोठ्या देशांचे सत्ताधीश जर काही सद्बुद्धीची कास धरतील, आणि त्या मार्गाने जाण्याचा रस्ता सामान्य माणसाला खुला करतील, तरच जग शांततेच्या मार्गाने जाण्याची शक्यता आहे, आणि मानवाला आत्मिक विकासाची वाट चोखाळता येणार आहे. पण माणसाच्या मनातील सद्बुद्धीचा आवाज नेहमीच क्षीण असतो, आणि ज्यांच्या हातात सत्ता असते त्यांच्या अंतःकरणातील तो आवाज तर त्याहूनही क्षीण असतो. तो बलवान आणि परिणामकारक व्हावा यासाठी शर्थीचे प्रयत्न करावे लागतात.

### ''मा विद्विषावहै।''

''आपल्या भूमीतील साऱ्या नागरिकांपर्यंत स्वातंत्र्याचा संदेश पोचवा'' अशी घोषणा बायबलमधील एका वचनाच्या आधारे घटनाकार जेफर्सन आपल्या अमेरिकन बांधवांना देऊन गेला. त्याच्या पुढचे पाऊल टाकून दूर क्षितिजापर्यंत आपली दृष्टी टाकणारी आणि साऱ्या जगाला स्वातंत्र्याचा प्रकाश दाखवणारी स्वातंत्र्यदेवीची भव्य मूर्ती आपल्या हातातील मशाल उंचावून समुद्रात उभी राहिली. जगातील लोकशाहीचे रक्षण झाले पाहिजे, हा चर्चिलचा आग्रह रुझवेल्टने मानला, हीदेखील एका उदात्त हेतूने प्रेरित होऊन केलेली कृती होती. तोवर जगातील साऱ्या संघर्षापासून अमेरिका दूर राहिली होती. पण या साऱ्या उज्ज्वल परंपरेचा तिला जणू साफ विसर पडला, आणि आज ती संघर्षाला खतपाणी घालत आहे हे दृश्य

किती विपरीत आहे! रशियाच्या आक्रमक वृत्तीपासून सावध राहणे तिला भाग होते, हे खरे आहे ''दुसरे ते राजकारण।'' असे म्हणता म्हणता समर्थ रामदासांसारखा साक्षेपी संत ''तिसरे ते सावधपण।'' असा उद्‌गार काढून गेला.

पण अशी स्वसंरक्षणविषयक सावधानता आणि इतरावर सत्ता गाजवण्याची आकांक्षा या दोहीतील सीमारेषा फार सूक्ष्म असते, आणि राजकीय प्रभुत्वाच्या आकांक्षेला फार झपाट्याने आसुरी रूप प्राप्त होते. एकीकडे अडीचतीन हजार तर दुसरीकडे त्याहूनही थोडा मोठा असे दोन महासागराचे विशाल खंदक अमेरिकेला लाभले आहेत. तिला आज कोणाचे भय आहे? आपल्या समृद्धीचा उपयोग तिने आपल्या लोकाच्या सौख्याबरोबर मानवजातीच्या कल्याणासाठी केला तर? अधिक पिकलेला गहू समुद्रात बुडवून त्याचा भाव वाढवण्यापेक्षा तो अर्धपोटी असलेल्या लोकांपर्यत पोचवला तर? असंख्य भुकेल्या माणसांच्या पोटात दोन घास जातील, लक्षावधी मातांच्या डोळ्यांतील अश्रू पुसले जातील, आणि स्वातंत्र्यदेवीच्या हातातील त्या मशालीचा प्रकाश साऱ्या जगाला साद घालू शकेल. पण हे अमेरिकेला सुचत नाही.

पण ही अपेक्षा अमेरिकेकडून करण्यापूर्वी आपल्या भारताचे काय? त्याला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर सत्तेच्या खुर्चीवर बसलेल्या देशभक्तांचे काय झाले? साने गुरुजीसारख्या हळव्या मनोवृत्तीच्या सज्जनाचा एवढा दारुण अपेक्षाभंग झाला की, त्यांनी केवळ तीन वर्षानी आत्महत्या केली. सत्तेचे ऐश्वर्य हे अधोगतीकडे घेऊन जाते. एवढया प्रचंड देशाच्या भवितव्याला आकार देण्याचे भाग्य ज्यांना लाभते, त्यांना पैसा गोळा करणे किवा आपले घर भरणे अशा गोष्टी केवळ तुच्छ वाटावयास हव्यात. येथील विविधतेने नटलेला पण परस्परांपासून दुरावलेला समाज आपल्याला सर्वाना समान लेखणाऱ्या एका राष्ट्रीय सूत्रात गुंफावयाचा आहे, अशी काही महदाकांक्षा आपल्या राज्यकर्त्याच्या मनात पेटून उठली असती, तर त्यांचा सारा स्वार्थ जळून भस्मसात झाला असता. असे उज्ज्वल ध्येयाकांक्षी सत्ताधीश या भारताचे शतकाशतकांचे सांस्कृतिक संचित आणि त्यातील बरेवाईट जाणू शकले असते. या देशाला सामर्थ्य आणि आत्मसन्मान याची भक्कम बैठक दिली गेली, तर तो पुन्हा सुवर्णभूमी होऊन जाईल आणि येथे होऊन गेलेल्या श्रेष्ठ विभूतीच्या पुण्याईवर साऱ्या जगाला शांतीचा संदेश देऊ शकेल.

क्षुद्र राजकीय स्वार्थापोटी जातीजातीत संघर्ष उत्पन्न करण्यापेक्षा सर्वाना एकत्र घेऊन त्यांच्यात समता उत्पन्न करता आली, तर या देशातील फुटीर असलेला हिंदू समाज एकत्रित येईल, आणि भिन्नधर्मियांतील दुरावा नष्ट करून परस्परविश्वासाचा भाव निर्माण करता आला, तर हा भारत प्रांत, भाषा, जाती, किंवा धर्म अशा साऱ्या भेदांचे अडसर बाजूला

सारून खऱ्या अर्थाने एकात्म होईल. जात वा धर्म नष्ट करण्याची काहीही आवश्यकता नाही. केवळ ''मा विद्विषावहै।'' म्हणजे परस्पराविषयीचा द्वेषाचा भाव टाकून द्या, एवढा संदेश पुरेसा आहे. आपण आपले हित आणि सत्त्व जपावे, पण तसे करताना ते इतराच्या कल्याणाच्या आड येऊ नये. आपण आपले स्वत्व सांभाळावे, पण ते सांभाळताना इतराच्या स्वाभिमानाला धक्का पोचू देऊ नये. अशा सहिष्णुतेची आणि स्वीकारशीतलेची शिकवणूक उगवत्या पिढीला मिळणे आवश्यक आहे. शासनाचा सारा व्यवहारही त्या दिशेने होत राहिला पाहिजे.

वेद आणि उपनिषदे या प्राचीन धर्मग्रंथांत काही देवतासूक्ते आहेत, तशाच अखिल मानवजातीचे मंगल व्हावे अशा काही सामूहिक प्रार्थना धर्मनिरपेक्ष वृत्तीने केलेल्या असाव्यात अशा स्वरूपाच्या आहेत. आपण सारे एकत्र असू, सारे मिळून सुखांचा उपभोग घेऊ, सारेजण काही कर्तृत्व दाखवू. आपणा सर्वांची बुद्धी तेजस्वी असो; असे एकामागोमाग कानांवर पडल्यावर आता काय म्हणावयाचे राहिले असे मनात येते, तर तेवढ्यात अखेरचा उद्‌गार येतो, ''मा विद्विषावहै।'' असे वाटते की, हे सांगण्याची काय गरज आहे? हे तर काहीसे खालच्या पातळीवर उतरण्यासारखे आहे. पण समाजाच्या व्यवहाराचे आणि व्यक्तीव्यक्तींच्या परस्परांशी होणाऱ्या वर्तनाचे अनुभव आपण घेतो, तेव्हा ध्यानात येते की, सारे काही चांगले असूनही केवळ द्वेषापोटी त्या सर्वावर पाणी पडते. मग कळते की, निदान परस्परांत द्वेष असू नये, हे सांगण्याची फार आवश्यकता आहे.

कोणाची जात वा कोणाचा धर्म इतरांना दुय्यम लेखणारा असता कामा नये, एवढी एक दक्षता पुरेशी आहे. आजवर कोणी कोणावर किती अन्याय केला याची तीच ती चर्चा पुन्हा पुन्हा करीत राहण्यापेक्षा तो अन्याय आता शिल्लक राहणार नाही यासाठी चालू क्षणाला प्रत्येकाने काय केले पाहिजे, असा विधायक विचार करण्याची खरी आवश्यकता आहे. अर्थात हे सारे लिहिणे सोपे आहे, ते प्रत्यक्षात घडवून आणणे अवघड आहे, ते घडवून आणण्यासाठी फार कष्ट घ्यावे लागतील. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यक्तीचा वा एखाद्या गटाचा स्वार्थ विसरण्यास शिकावे लागेल. निःस्वार्थ देशभक्तीची सर्वाधिक गरज आहे. तो आदर्श राज्यकर्त्यांनी स्वतः उदाहरण घालून देऊन समाजासमोर ठेवणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधीच्या काळात राजकीय नेत्यांनीच हा भार उचलला होता, हे ध्यानात घ्यावयास हवे.

स्वातंत्र्य प्राप्त झाल्याच्या क्षणापासून आपल्या नियतीचे शिल्पकार आपण झालो आहोत. मग ''भूमीत या कुणि कुठेहि भुकी नसावा। सारा समाज स्वजनांत सुखी असावा।।''अशी भव्य आकांक्षा आपल्या राज्यकर्त्यांच्या मनात का उत्पन्न होत नाही? लोकशाही पद्धतीमध्ये

समाज ज्या लायकीचा असेल तसे राज्यकर्ते त्याला मिळतात, असे म्हटले जाते. पण तसे निवडून आलेले राज्यकर्ते जागे होतील, तर अवघा समाज बराचसा सन्मार्गाला लागू शकेल. राजा परिस्थितीला वळण देतो का परिस्थिती राजाला वळण देते, "कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम्।" असा प्रश्न उत्पन्न करून महाभारतात महर्षी व्यासांनी म्हटले आहे की, याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही, "राजा कालस्य कारणम्।।" म्हणजे राज्यकर्तेच समाजाला दिशा देऊ शकतात. येथील राज्यकर्त्यांच्या मनात काही भव्य आकांक्षा निर्माण झाली पाहिजे. साऱ्या समाजाचे भाग्य उजळण्यास कारणीभूत होण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे, याची जाग त्यांना आली पाहिजे.

## वेदान्तकेन्द्र आणि व्यासांचा आक्रोश

न्यूयॉर्कच्या त्या प्रचंड महानगरात दोन वेदान्तकेन्द्रे आहेत. त्यांतील एका वेदान्त सोसायटीमध्ये पत्ता शोधत किरण मला घेऊन गेला. भर वस्तीमध्ये एका इमारतीत ती वेदान्त सोसायटी होती. घंटी वाजवल्यावर एका अमेरिकन व्यक्तीने दार उघडले जिना चढून वर गेलो. मंदिर आणि ग्रंथालय वगैरे सारे विभाग तेथे होते. तेथील प्रमुखांचे नाव होते स्वामी तथागतानन्द. तथागत म्हणजे भगवान बुद्ध. तेथील स्वामींजीचे तथागतानन्द हे नाव म्हणजे हिंदू धर्म आणि बुद्धधर्म यांचा समन्वय होता. गौतमबुद्धाची करुणा आणि शंकराचार्यांचा वेदान्तविचार यांचा समन्वय साधणाऱ्या विचारप्रणालीची आजच्या भारताला गरज होती आणि ती आपल्या गुरुदेवांनी दिलेल्या शिकवणुकीमुळे भागवली; असा विवेकानन्दांचा भाव होता. तथागतानन्दांशी अर्धा तास निवांतपणे संवाद झाला. वेदान्त सोसायटीतील मंदिरामध्ये श्रीरामकृष्णांच्या दोन्ही बाजूंना गौतमबुद्ध आणि येशू ख्रिस्त याना स्थान देऊन, भारतासाठी आवश्यक असलेला आणि त्याच वेळी पूर्व आणि पश्चिम यांचा मेळ घालणारा विचार लोकांच्या समोर ठेवण्याचा एक प्रयत्न अमेरिकेतील वेदान्तकेन्द्रांमधून केला जात आहे भारतीय संस्कृतीतील शांतीचा, सहिष्णुतेचा आणि मानवाला त्याच्या ईश्वरत्वाचे भान करून देण्याचा विचार जगासमोर सतत मांडला जाण्याची फार आवश्यकता आहे; असा तथागतानन्दांच्या बोलण्यातील प्रमुख सूर होता. हे सारे ते ज्या तळमळीने सांगत होते, त्यावरून भारतात आज काय घडत आहे आणि अमेरिकेसारख्या समृद्ध देशात कशाची उणीव पडत आहे, याची स्पष्ट जाणीव त्यांना आहे, हे ध्यानात येत होते. सतत चिंतनशील वृत्तीने जीवन व्यतीत करणाऱ्या त्यांच्यासारख्या संन्याशाला वर्तमानकालातील परिस्थितीचे भान नसणे कसे शक्य होते? नुकताच राष्ट्रसंघाच्या कार्यालयात फिरत असताना मी विचारांच्या एका आवर्तात सापडलो होतो, त्याचाच एक निराळ्या स्वरूपातील पडसाद मला स्वामी

तथागतानन्दांच्या बोलण्यात जाणवत होता. तो सूर मनात साठवून घेतला, आणि प्रणाम करून त्यांचा निरोप घेतला.

''धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते।'' म्हणजे ''तुम्हाला पैसा हवा आहे, त्या द्वारा कामनांची पूर्ती करून घ्यावयाची आहे.'' सर्वांनाच ही इच्छा आहे. ती पूर्ण होण्याचा सुरक्षित मार्ग धर्माचा म्हणजे सदाचाराचा आहे तो सन्मार्ग का अनुसरत नाही, असा प्रश्न महाभारतात व्यासांनी केला आहे. त्याआधी पूर्वार्धात मोठ्या विषादाने त्या महर्षींनि म्हटले आहे, ''ऊर्ध्वबाहुर्विरौम्येषः न च कश्चिच्छृणोति मे' म्हणजे ''बाहू उभारून मी आक्रोश करीत सांगतो आहे. पण माझं कोणी ऐकत नाही.'' हा व्यासांचा आक्रोश तीन हजार वर्षापूर्वीचा होता. त्यानंतर गौतम बुद्धाचा तोच होता, आणि येशू ख्रिस्ताचाही तोच होता. तो ऐकणे व त्यातून योग्य तो बोध घेणे माणसाला जमत नाही, असा गेल्या कित्येक शतकांचा अनुभव आपल्याला इतिहासाने सांगितला आहे. असे घडते, याचे कारण सद्बुद्धी फार थोड्या लोकांच्या ठायी असते. पण तरीही व्यासांचा तो आक्रोश चालू राहिला पाहिजे. ''सद्बुद्धि म्हणो नये थेकुटी।'' म्हणजे कितीही अल्प प्रमाणात असो, पण सद्बुद्धीला कधी कमी लेखू नये, कारण अखेर मानवाला जीवनातील शांतीचा मार्ग तीच दाखवणार असते; असे ज्ञानदेवांनीही ज्ञानेश्वरीत सांगून ठेवले आहे.

आपापल्या देशापुरता स्वार्थ साधण्यासाठी का असेना, पण जेथे जगातील साऱ्या देशांचे प्रतिनिधी एकत्र येतात, ती राष्ट्रसंघाच्या कार्यालयातील सभागृहे डोळ्यांखालून गेली. त्याचबरोबर ऐहिकातील तो स्वार्थ उन्नत पातळीवरील रूप कसे धारण करू शकेल आणि त्यासाठी जगातील निरनिराळ्या धर्माच्या अनुयायांनी कोणत्या तत्त्वांचा अवलंब केला पाहिजे, हे सांगणाऱ्या विवेकानन्दांचा वारसा जपणाऱ्या वेदान्त सोसायटीतील स्वामी तथागतानन्दांचे चार शब्द कानांवरून गेले. दोन्ही संस्था जागतिक पातळीवरून आपापल्या परीने अवघ्या मानवजातीसाठी निरनिराळ्या क्षेत्रांत काहीतरी विधायक कार्य करू पाहणाऱ्या होत्या. दोहींच्या दिशा भिन्न होत्या आणि प्रभावक्षेत्रेही निराळी होती. पण कसेही असो, त्या दोहींचे रूप थोडेफार पाहता आले होते. आता अमेरिकेचा निरोप घेण्यास हरकत नव्हती.

किरण आणि दीप्ती यांचा निरोप घेतला आणि दिनांक पाच नोव्हेंबरला दुपारी दीड वाजता लोहमार्गाने निघालो. तीन तासांचा हा प्रवास अमेरिकेतील शेवटचा टप्पा होता. नानाविध रंगांचे मनोहर दर्शन घडवणारी झाडे सोबत करीत होती. त्याचबरोबर हिवाळा जवळ आला आहे याची खूणही दिसू लागली होती. काही काही झाडांवर एकही पान शिल्लक नव्हते. लांब लांब फांद्यांचे केवळ खराटे झाले होते. हे इकडचे ऋतुचक्र आहे. गाडी वॉशिंग्टनमध्ये शिरत असताना जॉर्ज वॉशिंग्टनचे स्मारक असलेला उंच स्तंभ दिसला.

वैशाली स्थानकावर आली होती. विनासायास मी घरी पोचलो. विमानाचे आरक्षण झालेले होते. काही घोटाळा होऊ नये म्हणून मी मुद्दाम एक दिवस आधी आलो होतो. कोठेही गेलो नाही दिनाक सातला सायकाळी सहा वाजता सुहासने मला विमानतळावर पोचवले परतीचा प्रवास थेट मुंबईचा होता.

लंडनला हीथ्रो विमानतळावर विमान पोचले तेव्हा तेथे सकाळ होत होती. साडेतीनचार तास अवधी होता. दहा वाजता आमच्या विमानाने आकाशात झेप घेतली. आम्ही पूर्वेकडे म्हणजे प्रकाशाच्या दिशेने चाललो होतो नऊ नोव्हेंबरला पहाटे मुंबईच्या विमानतळावर उतरलो, आणि सारा प्रवास सुखाचा झाला व निर्विघ्नपणे पार पडला, या समाधानात पन्नासाव्या दिवशी मी पुन्हा भारताच्या भूमीवर पाऊल ठेवले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0029497